# देवाचे स्वभावाविषयीं सिसेरोचा निबंध व त्याचें चरित्र.

वसंतराव अनंत देव.

# देवांचे स्वभाव व सामर्थ्य याविषयीं

# सिसेरो याचा निबंध

## आणि त्याचें चरित्र.

हें पुस्तक

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड

सेनाखासखेल समशेर बहादुर

यांच्या उदार आश्रयानें

**बळवंतराव अनंत देव**

यांनीं इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें

रचिलें

तें

पुणें येथें

" आर्यविजय " छापखान्यांत छापिलें.

१८९५.

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदलें आहे. )

किंमत २ रुपये.

VERIFIED
1971

# अनुक्रमणिका.

## देवांचे स्वभाव व शक्ति यांविषयीं सिसरो याचा निबंध.

पुस्तक पहिलें.—पान १....९८.
पुस्तक दुसरें.— पान ९८....१२९.
पुस्तक तिसरें— पान १२९....१६९.

## मार्कस टलियस सिसेरो (MARCUS TULLIUS CICERO) याचें चरित्र.

भाग १ ला.—सिसेरो याचा जन्म. २ बाळपणाचा त्याचा विद्याभ्यास. ३ तरुणपणीं त्यानें कोणत्या विद्यांचा अभ्यास केला याविषयींचा वृत्तांत. ४ तो बारिस्टरचा धंदा करूं लागल्यावर त्याचा लौकिक वाढत चालला याविषयींची हकीकत. ५ त्यास एकामागून एक राजकीय अधिकार मिळत चालले त्यांविषयींचा वृत्तांत. ६ सिसिली प्रांताच्या सुभेगिरीचा अधिकार चालवीत असतां त्यानें जें न्यायनिष्ठपणाचें वर्तन केलें त्याविषयींची हकीकत. ७ सिसेरोकडे न्यायमनंमुंबीच्या कामाची देखरेख करण्याचा अधिकार होता तेव्हां त्यानें सिसिलीचा सुभेदार व्हेरेस ( Verres ) याजवर अन्याय केल्याबद्दल खटला चालवून त्याचें पारिपत्य केलें वगैरे गोष्टी या भागांत आहेत. पान १....१८.

भाग २ रा—व्हेरेस याजवर खटला चालविण्यापासून सिसेरोस मोठा लाभ काय झाला. कान्सलचा अधिकार मिळविण्याविषयीं त्याचा प्रयत्न. संमती देणारांचीं मनें कशीं वश करून घ्यावीं

याबद्दल त्याचा बंधु **क्विन्टस** यानें त्यास पत्र लिहिलें त्यांतील तात्पर्य. **सिसेरोच्या** वक्तृत्वशक्तीचा प्रादुर्भाव. **सिसेरोचे** एकार्थाभिलाषी सहा प्रतिपक्षी मोठे प्रबळ असून व त्यांस **सीझरसारख्या** वजनदार पुरुषाचें पाठबळ असून लोकांनीं **सिसेरोस कान्सल** निवडलें. **सिसेरोचा** प्रतिस्पर्धी **क्याटीलाइनविषयीं** गुणदोषविवेचन. **रोमराष्ट्राचें** स्वामित्व आपणास मिळावें याबद्दल **क्याटीलाईनचें** दुष्ट कारस्थान व तत्संबंधानें **सिसेरोचें** वर्तन. **क्याटिलाईन** याच्या सोबत्यांनीं परकीय देशाच्या **रोमन** नगरांतील वकिलाबरोबर कारस्थान रचलेलें उघडकीस आलें. त्या कारस्थानांतील पुढारी लोकांस **सेनेटच्या** हुकुमानें **सिसेरोनें** देहान्त शासन केलें. **क्याटिलाइन** याच्या सैन्याचा पराभव आणि रणांगणीं त्याचा मृत्यु. कान्सल **म्युरेना** याजवर त्याच्या प्रतिपक्षानें आणलेला आरोप; आणि त्या प्रसंगीं **सिसेरोनें म्युरेनातर्फे** केलेलें भाषण. **सिसेरोच्या** अधिकाराचा शेवट. त्याची संपत्ति आणि प्रापंचिक सुख वगैरे प्रकरणें या भागांत आहेत. पान १९....५८.

भाग ३ रा—**सिसेरोचा** कान्सलचा अधिकार संपल्यावर देखील त्याची दरबारांत मोठी मान-प्रतिष्ठा होते.—**रोमन** राष्ट्रांत दुफळी होऊन **सीझर** आणि **पॉम्पी** हे मोठे प्रबळ होतात.—**पॉम्पी** मोठा जय मिळवून **रोमनगरीं** येतो.—**सिसेरोचे** शत्रू **पॉम्पीला** अनुकूल करून घेऊन **सिसेरोचा** सूड उगविण्याची मसलत करितात.—तत्संबंधानें **मेटेलसच्या** प्रयत्नांची निष्फळता.—**क्लोडियस**च्या खाजगी आळसावरून **सिसेरोवर** मोठें संकट गुजरतें.—**क्लोडियस** स्त्रीवेष धारण करून एका दैविक समारंभांत स्त्रियांच्या समाजांत शिरल्याबद्दलच्या आरोपाची चौकशी व लांचखाऊ जूरच्या बहुमतानें त्याची दोषमुक्तता.—**क्लोडियस** ट्रायबूनचें

अधिकार मिळविण्याविषयीं प्रयत्न करितो व त्यांत त्याला यश येतें.—**पॉम्पी**चा जयोत्सव.—**पॉम्पी**च्या आचरणाविषयीं **सिसेरो**चा अभिप्राय.—वगैरे प्रकरणें या भागांत आहेत. पान ९९....१०८.

**भाग ४ था.—सिसेरो** याजवर घरगुती संकटें गुजरलीं. त्यानें पहिल्या बायकोस सोडचिठ्ठी देऊन दुसरें लग्न केलें, व तिलाही सोडचिठ्ठी दिली. **सीझर** याचा उत्कर्ष व त्याचें आपल्या शत्रूंशीं उदात्त वर्तन; राजकीय व्यवस्थेंत सुधारणा व त्यामुळें त्यास नवे नवे शत्रु उत्पन्न होतात; **सिसेरोचें रोम**नगरीं आगमन व **सीझर**-च्या संबंधानें त्याचें मनोवेधक व अत्यंत स्तुतीपर भाषण. **सीझर** याचा वध करण्याविषयीं त्याच्या शत्रूंचें कारस्थान. **सेनेट** सभेंत त्याचा वध; त्याचा मोठ्या थाटाचा प्रेतसंस्कार; त्या प्रसंगींचें ॲन्टनीचे करुणापर भाषण. पान १०९....१४३.

**भाग ५. वा**—प्रजासत्ताक राज्याविषयीं **सिसेरो**च्या निःसीम भक्तीची निष्फळता. त्याचें **रोम** नगर सोडून बाहेर जाणें. त्याचा **ॲन्टनी**बरोबर पत्रव्यवहार. **ॲन्टनी**चें अनीतिपर आचरण. **सिसे-रो**नें आपला काळ ग्रंथरचनेंत घालविला. त्याचें **रोम** नगरीं पुनरा-गमन. **रोम** राष्ट्राची तत्कालीन स्थिति. **सिसेरो** व **ॲन्टनी** यांजमधील वैराग्नी जास्त वृद्धीस पावतो. **ॲन्टनी**नें **सीझर**चा वारस **ऑक्टे-व्हियस** यास **सीझर**च्या संपत्तीचा ताबा दिला नाहीं, यामुळें त्या दोघांमध्यें फार वैर माजलें. **ऑक्टेव्हियस** आणि **डेसिमसब्रूटस** **ॲन्टनी**वर चाल करून गेले, परंतु नव्या**कौन्सिला**कडून सरकारी फौजेची मदत न मिळाल्यामुळें **ॲन्टनी**चा पराभव झाला नाहीं. नवें **कौन्सील हेरटियस** व **चानसा** यांच्या मनांत **ॲन्टनी**बरोबर साम करावयाचें होतें. व त्याजकडे वकील पाठविण्याचा विचार ठरला. **ॲन्टनी**नें **सेनेट** सभेच्या अटी कबूल केल्या नाहींत. व त्यानें ज्या

अटींवर साम करण्याचें कबूल केलें होतें त्या अटी **सेनेट** सभेस मान्य होतील अशा नव्हत्या. **अॅन्टनी**ची समजूत पाडण्याकरितां **सिसेरोस** पाठवावें अशी **सेनेट** सभेंत सूचना करण्यांत आली. परंतु **सिसेरो**नें त्याविरुद्ध भाषण केल्यामुळें ती सूचना रद्द झाली. व **अॅन्टनी**बरोबर युद्ध करून त्याचें पारिपत्य करावें असें ठरलें.

पान १४४.... १६४.

**भाग ६ वा—कान्सल हॉरिटियस, पानसा** व **आक्टेव्हियस** यांच्या सैन्यांनीं **अॅन्टनी**बरोबर युद्ध करून त्याचा पराभव केल्या-मुळें **म्युटीना** शहराचा वेढा उठवून तो **गाल** देशाकडे चालता झाला हें विजयाचें वर्तमान ऐकून **रोमन** लोकांनीं **सिसेरो**चा मोठा जयजयकार केला. तत्संबंधानें **सिसेरो**च्या अत्युत्तम भाषणांतील सारांश व त्यापासून लोकांच्या मनावर झालेला परिणाम. **अॅन्टनी** मारला गेला नाहीं व पकडलाही गेला नाहीं, यामुळें त्याच्या पराभवापासून इच्छित अर्थ सिद्धिस गेला नाहीं. **कान्सल हेरि-टियस** व **पानसा** हे **अॅन्टनी**बरोबर युद्ध करतांना रणांगणीं पडल्यामुळें **कान्सल**चा आधिकार कोणास द्यावा याविषयीं अडचण उत्पन्न झाली. **सिसेरो** सेनापत्य स्वीकारून लढाईवर जाण्यास योग्य नसल्यामुळें या प्रसंगीं **कॉन्सल**च्या अधिकारास तो पात्र नाहीं असें ठरलें. **सेनेट** सभेनें **डेसियस ब्रूटस** यास **कॉन्सल** निवडलें. पण **ऑक्टेव्हियस** यास ती गोष्ट आवडली नाहीं. त्याच्या मनांत आपणास **सिसेरो**चा जोडीदार **कॉन्सल** नेमावें असें होतें. **सेनेट** सभेनें त्याचें ह्मणणें ऐकिलें नाहीं, व आपल्या फौजेस कबूल केल्याप्रमाणें पगार व बक्षिसें दिलीं नाहींत ह्मणून त्यानें **अॅन्टनी**बरोबर सख्य केलें. हें वर्तमान **डेसियस ब्रूटस** याच्या सैन्यास समजल्यावर तेंही त्यास सोडून गेलें. व **ब्रूटस**-

याचा एक अधमी मनुष्यानें वध केला. **ऑक्टेव्हियस** आपल्या सैन्यासह **रोम** नगराजवळ आला, तेव्हां **सेनेट** सभेनें निरुपाय होऊन त्यास **कॉन्सल नेमिलें.** पान १६९....१७६.

**भाग ७.—सिसेरो**चा मृत्यु. पान १७७....१८२.

॥ श्री ॥

# प्रस्तावना.

**रोमन** लोकांत **मार्कस टुलियस सिसेरो** नांवाचा एक मोठा राजनीतिविशारद, वक्ता आणि ग्रंथकार होऊन गेला. त्यानें अनेक विषयांवर ल्याटिन भाषेंत ग्रंथ लिहिले आहेत. ग्रीक भाषेखेरीज दुसरी कोणतीही भाषा गहन विषयावर ग्रंथ लिहिण्यास योग्य नाहीं अशी युरोपखंडांतील तत्कालीन लोकांची समज होती; तींत कितपत तथ्यपणा होता व त्यासंबंधानें लोकांची आज समजूत आणि अनुभव काय आहे याविषयीं मला कांहींएक सांगतां येत नाहीं. अनेकभाषाभिज्ञ विद्वानांचा हा अधिकार आहे. परंतु **सिसेरोनें** असें ह्मटलें आहे कीं मीं ल्याटिन भाषेंत जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांची ग्रीक भाषेंतील ग्रंथांशीं तुलना करून पाहतां, शब्द-प्राचुर्याच्या दृष्टीनें देखील माझ्या ग्रंथाच्या ल्याटिनभाषेंत मला कांहीं उणीव दिसत नाहीं. यावरून व पुढें ल्याटिन भाषेंत जे नामांकित ग्रंथ झाले त्यांवरून ल्याटिन भाषा गहन विषयांवर ग्रंथ लिहिण्यास पात्र आहे असें दिसतें. असो. **सिसेरोनें** अनेक विषयांवर जे ग्रंथ लिहिले होते ते सर्व आज उपलब्ध नाहींत; आणि जे उपलब्ध आहेत त्यांतील पुष्कळ भाग ठिकठिकाणीं नष्ट झाल्यामुळें ग्रंथ वाचीत असतां वाचकांचा फार हिरमोड होत असेल असें माझें अनुमान आहे. कारण ज्या ग्रंथाच्या भाषांतराची ही प्रस्तावना आहे त्या ग्रंथाविषयीं देखील माझा तसा अनुभव आहे. **सिसेरोची** लेखनसरणी फार उत्तम आहे. अत्यंत मनोरम विषयाचें फार सुंदर विवेचन केलें असून विषयप्रतिपादन करण्याची

त्याची सरणी फारच सुरेख असल्यामुळें, ग्रंथ वाचीत असतां वाचकाचें मन अगदीं सानंदित झालेलें असतें; आणि पुढें त्याहूनही ज्यास्त चित्ताकर्षक विषय वाचण्यांत येईल अशी त्यास आशा उत्पन्न होते. अशा प्रसंगीं ग्रंथाचीं कांहीं पृष्ठें नष्ट झाल्यामुळें त्याच्या मनाचा विरस होऊन जी खिन्नता प्राप्त होते ती कांहीं लिहून दाखवितां येत नाहीं. **सिसेरो**चे ग्रंथ वाचूनच तिचा अनुभव घेतला पाहिजे. स्फटिकतटाकपरिष्कृत आणि नलिनीप्रयुक्त सरोवराच्या स्वच्छोदकांत एखादा मीन स्वच्छंदानें क्रीडा करीत असतां एकाएकीं तटाक भग्न होऊन व त्यांतील पाणी ओसरून जाऊन तें सरोवर पंकावशिष्ट झाल्यामुळें त्या मीनाची जशी तळमळ होते, त्याप्रमाणें वाचकाच्या मनाची स्थिति होते. परंतु ग्रंथकाराच्या ग्रंथरचनेंत असा कांहीं मोहक गुण आहे कीं, जशी तटाकाची दुरस्ती होऊन नूतनोदकानें सरोवर परिपूर्ण झाल्यावर त्या मीनाची तळमळ नाहींशी होते त्याप्रमाणेंच, ग्रंथाचीं पुढचीं कांहीं पत्रें वाचलीं ह्मणजे पुनः नवीन विषयाकडे मन वेधलें जाऊन नव्या आल्हादास प्रारंभ होतो; अशी त्या महान् पुरुषाच्या ग्रंथाचीं योग्यता आहे. त्याच्या उपलब्ध ग्रंथांचीं पुष्कळ भाषेंत भाषांतरें झालीं आहेत. त्यांपैकीं देवांच्या गुणांविषयीं आणि स्वभावाविषयीं एका ग्रंथांत विचार केला आहे. त्याचें इंग्रजी भाषेंत भाषांतर झालें असून त्यास 'Nature of Gods' असें नांव दिलें आहे. त्याचें मीं मराठींत यथाशक्त्या सारांशरूपानें भाषांतर केलें आहे. ग्रंथांतील कांहीं भाग दुर्बोध असल्यामुळें मला वगळावा लागला. त्याविषयीं टीप देऊन विशेष स्पष्टीकरण केलें आहे. ह्या माझ्या प्रयत्नापासून मराठी वाचकांला कांहीं उपयोग होईल किंवा नाहीं याविषयीं मला कांहींच सांगतां येत नाहीं. विशेषेंकरून माझ्या रिकाम्या

काळाचा मीं एका प्रकारें विनियोग केला आहे, तेव्हां माझ्या प्रयत्नाला लोकांनीं चांगलें ह्मणावें अशी मुळींच मी अपेक्षा करीत नाहीं. आपल्या देशांतील बहुतकरून इंग्लिश भाषाभिज्ञ विद्वान लोकांनीं मुद्दाम आपल्या देशभाषेची हेलना मांडली आहे. तेव्हां अशा काळांत त्या भाषेंत ग्रंथ लिहून यश संपादन करणें हें निदान मला तर शक्य नाहीं.

या ग्रंथांत **मार्कस टुलियस सिसेरो**चें जन्मचरित्र फक्त संक्षेपानें निरूपण केलें पाहिजे; कारण ज्याच्या ग्रंथाचें मीं भाषांतर केलें आहे तो होता कोण, कधीं जन्मला आणि त्यानें आपल्या आयुष्यांत कोणकोणतीं महत्कृत्यें केलीं व त्याचा शेवट काय झाला, हें जाणणें आवश्यक आहे. हें चरित्र मनोवेधक होण्याकरितां माझ्यानें जितका प्रयत्न करवला तितका मीं केला आहे. या महात्म्याचें चरित्रच असें मनोवेधक आहे कीं, तें कोणींही लिहिलें असलें तरी तें वाचतांना वाचकाचें मन लुब्ध होऊन जावें.

माझें इंग्रजी भाषेचें ज्ञान अल्प असून एका गहन विषयाच्या ग्रंथाचें भाषांतर करण्याचा मीं प्रयत्न केला, ह्यामुळें मूळ ग्रंथास हें माझें भाषांतर ताडून पहाणाराला चुका सांपडणार नाहींत असें माझ्यानें ह्मणवत नाहीं; परंतु प्राचीन काळच्या गहन विषयांवरील ग्रंथांचें केवळ मराठी भाषाभिज्ञ लोकांना साहाय्य करून दिलें ह्मणून मला अशी आशा आहे कीं, माझ्या चुकांबद्दल ते मला क्षमा करतील.

श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहाद्दूर यांनीं हा ग्रंथ छापण्याचे कामीं उदार आश्रय दिल्यामुळें ग्रंथप्रसिद्धीचें सर्व यश त्यांजकडे आहे.

# देवांचे स्वभाव व शक्ति यांविषयीं सिसरो याचा निबंध.

---:o:---

## पुस्तक १ लें.

**सिसरो ब्रूटस** यास म्हणतो हे माझे परम मित्राः-

तत्वज्ञान्यांनीं ज्यांविषयीं आपणास अद्याप चांगला उलगडा करून सांगितला नाहीं असे पुष्कळ विषय आहेत, आणि त्यांत विशेषेंकरून देवांच्या स्वरूपांविषयीं आपलें अज्ञान फार मोठें आहे. हा विषय पराकाष्ठेचा दुर्ज्ञेय आहे, तथापि त्याविषयीं आपणास बोध होणें फार अगत्याचें आहे, कारण त्यावांचून खरा धर्म समजणें सर्वथैव अशक्य आहे; परंतु त्याविषयीं तत्वज्ञानी यांजमध्यें मोठा मतभेद आहे. अनेकांचीं अनेक मतें असून तीं परस्पर इतकीं भिन्न आहेत कीं, अज्ञान हेंच तत्वज्ञानाच्या उत्पत्तीचें कारण किंवा मूळ आहे, असा तर्क करणें आपणास भाग पडतें. जी वस्तु संशयित आहे, तीविषयीं आमचे मतानुयायी एक्याडेमिक (हें एक मत आहे त्याविषयीं पुढें बोध होईल) आपली कधींच अनुमति देत नाहींत, आणि हेंच त्यांच्या तत्वज्ञपणास उचित आहे. शहाण्या मनुष्यानें अविचारानें अमुक एक गोष्ट अशीच आहे असा प्रमाणांवांचून सिद्धांत करून टाकावा, त्यापेक्षां ती गोष्ट आपल्यास समजली नाहीं असें ह्मणावें हें त्यास उचित नाहीं काय ? एखाद्या खोट्या मताचा पक्ष घ्यावा, किंवा ज्या मताविषयीं आपण चांगला शोध केला नाहीं व स्पष्ट बोध करून

घेतला नाहीं, तें मत कांहीं आक्षेप न घेतां उपपादन करण्याविषयीं प्रयत्न करावा, हें तत्वज्ञानी ह्याच्या विशाल बुद्धीस, गांभीर्यास आणि स्थैर्यास कसें शोभतें तें मला कळत नाहीं. देव आहेत याबद्दल पुष्कळांचें एकमत आहे; कारण सृष्टींतील व्यवहारावरून देवांचें अस्तित्व विशेष संभवनीय असल्यामुळें आपल्यास तशी कल्पना करणें भाग पडलें आहे. कित्येकांला देव आहेत किंवा नाहींत याविषयीं संशय आहे; कित्येक मुळींच देव नाहींत असें म्हणतात; परंतु देव आहेत असें मानणारी लोकसंख्या फार मोठी आहे. पण तत्संबंधानें त्यांचे विचार इतके भिन्न आहेत कीं, त्यांचीं नुसतीं मतें काय आहेत, हें सांगणें देखील कंटाळवाणें आहे; कारण ते देवांच्या आकाराविषयीं, त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाविषयीं, आणि त्यांच्या आयुष्यांतील वर्तनक्रमाविषयीं अनेक प्रकार सांगतात. तत्ववेत्त्यांमध्यें यासंबंधानें मोठा मतभेद आहे. देव हे अगदीं निर्व्यापार, अगदीं अनुद्योगी आणि जगाच्या व्यवस्थेविषयीं अगदीं उदासीन आहेत, असें कित्येकांचें मत आहे. त्याहून उलट पक्षाचें असें ह्मणणें आहे कीं, देवांनीं आरंभापासून सर्व वस्तु निर्माण करून त्यांची सुव्यवस्था केली आणि जगांतील व्यवहारावर त्यांची दृष्टी असून त्यांच्याच इच्छेनें सर्व गोष्टी घडतात. आतां यांतून कोणतें खरें याचा जर निवाडा केला नाहीं तर मानवी प्राणी अतिशयित भ्रांतींत आणि अज्ञानांत निमग्न होऊन राहील; यास्तव खरें काय तें त्यानें जाणलेंच पाहिजे.

२. कांहीं जुने आणि नवे तत्वज्ञानी असें मानितात कीं मनुष्याच्या व्यवहारांत देव किंचित् देखील आपलें मन घालीत नाहींत. जर ह्यांचें मत खरें आहे असें गृहीत धरावें तर मग आपण देवांची भक्ति कशासाठीं करावी ?- अंतःकरणाच्या शुद्धीचें प्रयोजन काय ?

आणि धर्माचा उपयोग काय? देवांची मनुष्यांवर कृपादृष्टी आहे आणि त्यांनीं त्यांवजर अनंत उपकार केले आहेत व करीत आहेत अशा समजुतींनीं आपण कृतज्ञतेनें आणि पवित्र मनानें त्यांची भक्ति करीत आहोंत.

परंतु जर देवांमध्यें आपल्यास साहाय्य करण्याची शक्ति नाहीं किंवा इच्छा नाहीं; जर ते आपल्याविषयीं कळकळ बाळगीत नाहींत; आणि आपण काय करतों याजकडे ते लक्ष देत नाहींत; सारांश, मानवी प्राण्याला देवांपासून कोणत्याही प्रकारचा फायदा होत नाहीं तर मग आपण त्यांची आराधना कां करावी? त्यांजविषयीं आपल्यास पूज्य बुद्धि ठेवण्याचें प्रयोजन काय? आणि त्यांची आपण प्रार्थना कशासाठीं करावी? दुसऱ्यां सदाचारांप्रमाणें भक्ति हा असा सदाचार आहे कीं, त्याजमध्यें पोकळ ढोंग आणि मनांत एक व जनांत एक असें असणें कांहीं उपयोगाचें नाहीं; आणि भक्ति नाहीं तर पवित्रपणा नाहीं व धर्महीं नाहीं; आणि पवित्रपणा व धर्म, हे सर्वांशीं लयास गेले ह्मणजे मानवी प्राण्याला खरें सुख कधींही प्राप्त व्हावयाचें नाहीं.

देवांविषयीं आपल्या भक्तीचा जर आपण त्याग केला तर कोणी कोणावर विश्वास ठेवणार नाहीं; समाजाच्या योगानें जे लाभ होतात ते सर्व बुडतील; आणि नीतिशास्त्रदृष्ट्या जीं कर्में विहित आहेत तीं कोणीही आचरणार नाहीं, आणि असें झाल्यानें कोणते अनर्थ उद्भवतील याची तर आपल्याच्यानें कल्पनाही करवणार नाहीं.

ह्या जगांतील व्यवहार देवांच्या चातुर्यानें व संकल्पानें चालले आहेत, असें मानणारे पुष्कळ तत्ववेत्ते असून ते फार मोठे विख्यात आहेत. त्यांचा आणखी असा देखील अभिप्राय आहे कीं, मनुष्या-

च्या संरक्षणासाठीं देव आपापल्यामध्यें सल्लामसलत करून मनुष्यांना सर्व वस्तूंचा पुरवठा करितात. त्यांस असें वाटतें कीं फळें, पृथ्वीपासून उत्पन्न होणारे दुसरे पदार्थ; तसेंच ऋतु आणि हवेचे फेरफार ह्या सर्व गोष्टींची योजना देवांनीं बुद्धिपुरःसर मनुष्याच्या हितासाठीं केली आहे. त्या योगानें पृथ्वीपासून उत्पन्न होणाऱ्यां पदार्थांला परिपक्कदशा येऊन त्यांचा मनुष्याच्या चरितार्थाकडे विनियोग होतो. प्रमाणांसाठीं आणखी ते पुष्कळ गोष्टी सांगतात. अमर्त्य देवांनीं केवळ मनुष्याच्या हिताकरितां व कल्याणाकरितां सर्व वस्तु निर्माण केल्या आहेत असा आपला विश्वास बसावा हें त्या गोष्टींचें मुख्य रहस्य आहे. ह्या मतावर क्यारनीड्स्* याचा असा जबर कटाक्ष आहे कीं, जो मनुष्य स्वभावतः आळशी नाहीं, त्याच्या मनांत सत्य काय आहे याचा शोध करण्याविषयीं उत्कट इच्छा उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं; कारण विद्वान् व त्याचप्रमाणें अविद्वान् यांमध्यें या विषयाच्यासंबंधानें इतका मतभेद आहे कीं, तसा मतभेद उत्पन्न करणारा दुसरा विषयच ह्या जगांत नाहीं; आणि तत्वज्ञानी यांचे

* हा एक तत्वज्ञानी होता. अक्याडमी मतांत आणखी बारीक पोटभेद आहेत. त्यांपैकीं तिसऱ्या किंवा नवव्या एक्याडमी मताची प्रवृत्ती याजपासून झाली. ग्रीक लोकांनीं यास रोम येथें वकिलीच्या कामावर पाठविलें होतें. ह्याची विद्वत्ता आणि वाक्चातुर्य पाहून रोमन लोक त्याजवर इतके आसक्त झाले कीं, सर्व कामधंदा सोडून ते त्याचीं भाषणें ऐकण्यांत, आणि तदुपदिष्ट तत्वज्ञानाचा विचार करण्यांत निमग्न झाले. ही गोष्ट रोमन लोकांचा धर्माध्यक्ष केटो ( Cato ) याचे कानांवर गेली; त्यानें त्यास लागलीच सेनेट सभेंत बोलावून आणून आपल्या नगरांतून एकदम निघून जाण्याविषयीं आज्ञा केली. तो त्यास ह्मणाला कीं, आह्मां रोमन लोकांचा बाणा काय तो क्षत्रविद्या. तिला भ्रष्ट करणाऱ्या तुझ्या तत्वज्ञानाचा आह्मांस कांहीं उपयोग नाहीं. क्यारनीड्स् ह्याचें असें मत होतें कीं, ह्या जगांतील कोणत्याही पदार्थाचें खरें ज्ञान मुळींच होत नाहीं. हा आपल्या वयाच्या नव्वदाव्या वर्षीं ख्रिस्ति शकापूर्वीं १२८ वर्षें मरण पावला.

यासंबंधानें अभिप्राय परस्पर इतके विरुद्ध आहेत कीं, त्यांपैकीं कदाचित् एखादा खरा असूं शकेल, परंतु एकापेक्षां अधिक खरे असावे हें तर सर्वथैव संभवनीय नाहीं.

३. उद्देश चांगला असून ज्ञानप्राप्ति करून घेण्यासाठीं जे प्रतिपक्ष उचलितात, त्यांच्या मनाचें मला समाधान करितां येईल आणि दोषैकदृष्टि प्रतिपक्षी लोकांचीं मतें खंडन करितां येतील असें मला वाटतें. आपल्यास ज्ञान प्राप्त झालें ह्मणून पहिल्यास आनंद होईल, आणि असमंजसपणानें अयुक्तिक विषाद केल्याविषयीं दुसऱ्यास पश्चात्ताप होईल, याविषयीं मला कांहीं संशय नाहीं. केवळ बोध करून घेण्यासाठीं मित्रभावानें आक्षेप घेतात त्यांचें समाधान करणें, आणि जे शत्रुभावानें आक्षेप घेतात त्यांचा पराजय करणें योग्य आहे. तसेंच मला असें समजून आलें आहे कीं, ज्या मताच्या योगानें जगांतील ज्ञानरूप सूर्याचा प्रकाश नष्टप्राय होऊन कृत्रिम अंधःकारानें पदार्थमात्राचा लोप होऊन जातो, त्या मताला तुच्छ मानून लोकांनीं पुष्कळ दिवसांपासून त्याचा त्याग केला असतां त्या मताचें पुनः मंडन करण्याविषयीं मी एकाएकीं कां प्रवृत्त झालों याबद्दल पुष्कळांस मोठें नवल वाटतें.

अलीकडे मीं जे कांहीं ग्रंथ* प्रसिद्ध केले आहेत त्यांपासून लोकांत बराच गवगवा झाला आहे, व त्यांजवर अनेकविध चर्चाही झाल्या आहेत. मी एकाएकीं तत्वज्ञानाचा अभ्यास कां करूं लागलों याविषयीं प्रत्येकास मोठें नवल वाटतें, आणि कित्येक तर त्या विषयाबद्दल माझा अभिप्राय काय आहे तें जाणण्याची इच्छा करीत आहेत, परंतु मीं एकाएकीं माझें चित्त तत्वज्ञानाकडे लाविलें

* सिसरोनें आयुष्याच्या शेवटल्या तीन वर्षांत तत्वज्ञानविषयावर ग्रंथ लिहिले आहेत. त्यानें हा ग्रंथ लिहिला तेव्हां तो त्रेसष्ट वर्षांच्या वयाचा होता.

अशी कल्पना करण्यांत लोकांची चूक आहे. मला समजूं लागलें तेव्हां-पासून मी त्या विषयाविषयीं विचार करीत आहें; आणि मी त्या कामांत कांहीं थोडा वेळ घालविला नाहीं, किंवा कमी श्रम केले नाहींत. जेव्हां मी त्याविषयीं कांहींच करीत नाहीं असें दिसत असे तेव्हां तर मी तत्वज्ञानाच्या विचारांत अगदीं निमग्न होत असें, याविषयीं माझीं प्रसिद्ध भाषणें प्रमाणभूत आहेत. त्यांत तत्ववेत्त्यांच्या अनेक वाक्यांचा पदोपदीं उपन्यास केला आहे; आणि मोठमोठ्या तत्वज्ञानविशारद लोकांबरोबर माझा सख्यभाव, माझे घरीं त्यांचें वारंवार येणें, व त्यांजबरोबर माझे अनुदिन संवाद, हीं दुसरीं प्रमाणें होत. आयुष्यांतील वर्तनक्रमावरून मनुष्याचें आचरण कसें आहे व त्याचे विचार कसे आहेत हें कळतें. मला असें वाटतें कीं जीं मूलतत्वें समर्पक असून ज्यांला उत्तम ग्रंथाचा आधार आहे त्यांचाच सार्वजनिक व्यवहारांत व खासगी कामांत मीं उपयोग केला आहे.

४. परंतु मला जर कोणी असें विचारिलें कीं, अशा उतरअवस्थेंत ह्या विषयावर लिहिण्याचा माझा उद्देश काय ? तर त्याबद्दल मला सहज उत्तर देतां येईल; कारण जेव्हां राज्यकारभारांतून मी अगदीं मोकळा झालों असें मला दिसलें, आणि एका मनुष्यांच्या* विचारानें व अधिकाराखालीं रोमच्या प्रजासत्तात्मक राज्याचा राज्यकारभार चालावा असा काळ प्राप्त झाला, तेव्हां माझे मनांत मी असा विचार केला कीं, माझ्या देशांतील लोकांस मी तत्वज्ञानाचें ज्ञान करून दिलें आणि अशा प्रकारच्या उत्तम विषयाचा ल्याटिन भाषेंत संग्रह केला तर आमच्या नगराला एक मोठें भूषण होईल. हें अवघड काम मीं हातीं घेतल्याविषयीं मला कांहीं खेद वाटत नाहीं, कारण त्यांत मला यश मिळालें आहे, आणि ह्या विषयाचें

---

* ज्युलिअस सीझर.

ज्ञान करून घेण्यासाठीं पुष्कळांस इच्छा उत्पन्न झाली आहे इतकेंच नाहीं, तर पुष्कळ लोक या विषयावर ग्रंथ लिहूं लागले आहेत. आपल्यांतील पुष्कळ रोमन लोक ग्रीक भाषेंतील ग्रंथांत मोठे तरबेज आहेत. परंतु त्यांस आपण संपादित केलेलें ज्ञान आपल्या भाषेंत आपल्या देशांतील लोकांस सांगतां येत नाहीं; कारण कीं ग्रीक भाषेपासून जें ज्ञान संपादित करून घेतलें तें ल्याटिन भाषेंत सांगतां येणें अशक्य आहे असें त्यांस वाटत आहे. ह्यासंबंधानें मला असें वाटतें कीं, मीं ल्याटिन भाषेंत जे ग्रंथ लिहिले आहेत, त्यांची ग्रीक भाषेंतील ग्रंथांशीं तुलना करून पाहिली तर शब्दचातुर्याच्या दृष्टीनें देखील माझ्या ग्रंथाच्या भाषेंत मला कांहीं उणीव दिसत नाहीं. तत्वज्ञानाचा विचार करण्याविषयीं माझें मन प्रवृत्त झालें त्यास आणखी दुसरें एक कारण होतें. दैव पराकाष्ठेनें प्रतिकूल झाल्यामुळें व दुसऱ्या अनेक अडचणींमुळें, माझें मन अगदीं उदास झालें होतें. दुसऱ्या कोणत्याही उपायानें माझ्या मनाचें समाधान होईल अशी माझे मनाची खातरजमा झाली असती तर मी तत्वज्ञानाचा विचार करण्याच्या खटपटींत पडलों नसतों; परंतु दुसऱ्या कोणत्याही व्यासंगानें माझे मनाला समाधान होईल असें मला वाटेना, तेव्हां मी तत्वज्ञानाचा विचार करूं लागलों, आणि नुसते ग्रंथ वाचून देखील चांगलें समाधान वाटेना, तेव्हां त्या विषयावर मी स्वतंत्र ग्रंथ लिहूं लागलों. स्वतः लेख लिहिण्याची योग्यता फार मोठी आहे. कोणत्याही विषयाच्या प्रत्येक भागाचें आणि शाखेचें चांगलें विवेचन करावयाचें आहे तर तो विषय लिहून काढला पाहिजे, एरव्हीं कांहीं चांगलें विवेचन होत नाहीं; कारण लेखांमध्यें विषय अशा उत्तम क्रमानें आणतां येतात कीं, प्रत्येकाचा दुसऱ्याशीं आणि सर्वांचा परस्परांशीं संबंध जुळून त्यांची एक सांखळी बनून जाते.

९. आतां प्रत्येक विषयाच्या संबंधानें माझे खासगत विचार काय आहेत हें जाणण्याविषयीं ज्यांची इच्छा आहे, ते या विषयाच्या संबंधानें माझे विचार जाणण्याविषयीं वाजवीपेक्षां जास्त जिज्ञासु आहेत. वादविवादात्मक विषयांत अमुक मत कोणाचें आहे हें जाणण्यापेक्षां त्या मताचीं प्रमाणें कशीं आहेत हें जाणणें विशेष महत्वाचें आहे. ज्ञान प्राप्त करून घेण्याविषयीं जे उत्सुक आहेत, त्यांस गुरूंचा अधिकार हा नेहमीं गैरफायद्याचा असतो; कारण ते नेहमीं आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्यास नाकबूल करितात; आणि ज्या मतांची त्यांनीं दीक्षा घेतलेली असते त्या मतांच्या आचार्यांच्या वाक्यांवर त्यांचा अनन्यभावेंकरून विश्वास असतो, ही चाल मला कधींही आवडत नाहीं. वादविवादांत जेव्हां ते एखादी गोष्ट अशीच आहे असें निश्चयपूर्वक सांगतात, तेव्हां त्याविषयीं त्यांस जर प्रमाण काय ह्मणून विचारिलें तर आमच्या आचार्यानें तसें सांगितलें आहे असें उत्तर देतात. याप्रमाणें व्यर्थ कल्पना व अभिप्राय यांची इतकी मातबरी मानली गेली आहे कीं, प्रमाण अथवा रास्तपणावांचून गुरु जें सांगेल त्याजवर लोकांचा विश्वास आहे.

मी विशेषेंकरून Academic मतानुयायी झालों याबद्दल ज्यास नवल वाटतें त्यांनीं त्या मतांवर मी चार ग्रंथ लिहिले आहेत, ते वाचिले असतां त्यांस संशयनिवर्तक उत्तर सांपडेल. परंतु अग्राह्य म्हणून ज्याचा लोकांनीं अव्हेर करून त्याग केला आहे, त्या गोष्टींचें समर्थन करण्याचा मी पतकर घेतला आहे, असें कोणीं समजूं नये; कारण मताच्या उत्पादकांनीं स्पष्ट खुलासा करून सांगितला नसल्यामुळें, त्यांतील कांहीं गोष्टींचा चांगला बोध होत नाहीं तरी मनुष्यांचीं मतें कांहीं त्यांजबरोबर मरत नाहींत. सर्व पदार्थांच्या वास्तविकपणाविषयीं संशय घेणें आणि कांहींच खरें न

मानणें, ह्या तत्वान्वेक्षण करण्याच्या पद्धतीस सॉक्रेटीस याजपासून आरंभ झाला. आरेसीलर्स (Arecsilars) यानें तिचें पुनर्जीवन केलें. कारनेआडस् (Carneades) यानें तिला बळकटी आणिली; आणि आपल्या ह्या काळापर्यंत देखील ती प्रबळत्वेंकरून प्रचारांत आहे. परंतु आतां मात्र ग्रीक लोकांनीं देखील तिला सर्वांशीं नाकारली आहे, असें मला सांगण्यांत आलें आहे. परंतु एक्याडमीमत सदोष आहे असें मी मानीत नाहीं. मानवी प्राण्यांच्या अंगीं असा दोष आहे कीं कोणत्याही वस्तूचें यथार्थ ज्ञान करून घेण्यास ते हयगय करितात. जर एका मतांतील सर्व सिद्धांतांचें समग्र ज्ञान होणें परम कठिण आहे, तर सर्व मतांच्या सिद्धांतांचें समग्र ज्ञान होणें किती बरें कठीण आहे? तथापि ज्याला सत्य शोधून काढण्याकरितां निष्पक्षपातानें सर्व मतांच्या तत्वज्ञान्यांबरोबर वाद करावयाचा आहे, त्यानें सर्व मतांविषयीं चांगलें ज्ञान करून घेतलें पाहिजे.

अशा प्रकारच्या दुर्बोध विषयाचें ज्ञान संपादन करून घेण्यासारखें माझें बुद्धिवैभव आहे असा मी कांहीं डौल घालीत नाहीं; परंतु हें मी प्रतिज्ञापूर्वक सांगतों कीं, चांगलें ज्ञान प्राप्त व्हावें म्हणून मीं प्रयत्न केला आहे; आणि मी जी पद्धत स्वीकारिली आहे, त्या पद्धतीनें जे तत्वान्वेक्षण करीत आहेत, त्यांस त्यांच्या प्रयत्नाचें कांहींच फळ मिळूं नये ही गोष्ट अशक्य आहे. मी या संबंधानें दुसऱ्या ठिकाणीं पुष्कळ विस्तारपूर्वक बोललों आहें, परंतु कांहींकांची बुद्धि फारच जड असल्यामुळें व कांहींकांची आस्थाहीन असल्यामुळें, मनुष्यांना नेहमीं सूचना करण्याची जरूर आहे; कारण सत्य ह्मणून कांहींच नाहीं असें मानणाऱ्यांपैकीं आपण नाहीं; परंतु आपण असें ह्मणतों कीं, सर्व खऱ्या गोष्टींबरोबर कांहीं खोट्या गोष्टी

अशा कांहीं मिश्र होऊन गेल्या आहेत कीं त्या खऱ्या गोष्टींसारख्या दिसतात, आणि त्यांची निवड कशी करावी याविषयीं कांहीं नियम नसल्यामुळें त्यापासून असा सिद्धांत निघतो कीं, इंद्रियाला गोचर नाहींत अशा कांहीं वस्तु असणें शक्य आहे; आणि त्यांच्या ठायीं असा कांहीं मनोवेधक गुण आहे कीं त्यास अनुलक्षून वागण्याविषयीं शहाण्या मनुष्यांची मनःप्रवृत्ति होते.

एकॅडेमिक (Academic) मताविषयीं माझा पक्षपात आहे असा लोकांचा मजवर अपवाद आहे; तो टाळण्याकरितां मी देवांच्या गुणांविषयीं तत्वज्ञानी यांचीं जीं मतें आहेत तीं तुम्हांस निवेदन करितों. त्यांविषयीं लोकांनीं विचार करून कोणतें मत खरें आहे हें ठरवावें, किंवा त्या मतांहून वेगळेंच मत कोणास सांपडेल तर तें केवळ सत्यस्वरूप आहे असें सिद्ध करून द्यावें ह्मणजे मी (Academic) एकॅडेमिक मत अगदीं पोकळ आहे असें समजून त्याचा त्याग करण्यास तयार आहें. परंतु धर्म, भक्ति, पवित्रपणा, संस्कार, श्रद्धा, शपथक्रिया, मंदिरें, मूर्ति आणि समारंभ युक्त यज्ञयाग यांचें संरक्षण होण्याकरितां काय केलें पाहिजे याविषयीं त्यांनीं विचार केला पाहिजे. दुसरें शकुनविद्येच्या संबंधानें काय केलें पाहिजे याविषयीं देखील विचार केला पाहिजे; कारण सांप्रतच्या प्रश्नाशीं त्या विद्येचा देखील निकट संबंध आहे. ह्या विषयाच्या संबंधानें विद्वान् लोकांत द्वैतभाव असल्यामुळें, आपल्यास ह्या विषयाचें कांहीं ज्ञान आहे असें ज्यांस वाटत आहे ते देखील संशयांत पडले आहेत; वास्तव सत्य काय आहे याचा निर्णय झाला पाहिजे.

माझा मित्र सी. कोटा (C. Cotta) याच्या घरीं दैविक गुणाविषयीं पुष्कळ वाटाघाट झाली आहे. एका सणाच्या दिवशीं त्यानें मला पाचारण केल्यावरून मी तेथें गेलों. तेव्हां त्याचें सी. व्हेलियस (C. Velleius)

याजबरोबर भाषण चाललें होतें. *एपिक्यूरिअन मताचे लोक त्यांस फार मान देतात. क्यू. लुसीअस् बाल्बस् (Q. Lucius Balbus)

* एपिक्यूरियन मताची ज्यापासून प्रवृत्ती झाली तो एपिक्यूरस हा एक मोठा तत्ववेत्ता होता. ह्याचे मातापिता जरी फार गरीब आणि अविख्यात कुलोत्पन्न होते तरी त्यांनीं त्यास शाळेंत घातले. तेथें तो पराकाष्ठेचा बुद्धिवान् आहे असें लागलीच उदयास आलें. त्याच्या वयाच्या बाराव्या वर्षीं त्याच्या गुरूनें एक श्लोक ह्मटला. पहिल्यानें पंचभूतें उत्पन्न केलीं अशा अर्थाचा तो श्लोक होता. एपिक्यूरस यानें मोठ्या उत्सुकतेनें त्या गुरूस असें विचारलें कीं हीं पंचभूतें कोणीं उत्पन्न केलीं? गुरू ह्मणाला "हें तत्ववेत्त्यांस माहीत. मला कांहीं माहीत नाहीं." तेव्हां एपिक्यूरस् ह्मणाला कीं, तर मग मला आजपासून तत्ववेत्तेच शिकवितील. नंतर त्यानें देशाटन करून मोठें ज्ञान संपादन केलें, आणि आथेन्स येथें आला. तेथें प्लेटो आणि मोठेमोठे तत्ववेत्ते यांचे अनुयायी एकत्र जमले होते. एपिक्यूरस् याचे वाणीचें माधुर्य ऐकून, आणि त्याचें सौजन्य व गांभीर्य पाहून, अनेक लोक त्याच्या भोंवतीं जमूं लागले. त्यानें लोकांस असा उपदेश केला कीं, मनुष्यप्राण्याचें सुख काय तें सुखोपभोग सेवन करण्यांत आहे. विषयलंपट होऊन अथवा दुर्गुणांचा आश्रय करून इंद्रियांच्या वासना तृप्त कराव्या असें जरी त्याच्या मताचें रहस्य नव्हतें, तरी सदाचाराचा लोप न होतां जे सुखोपभोग घेतां येतील ते घ्यावे असें त्याच्या मतांचें बीज असतांही दुसऱ्या तत्वज्ञान्यांनीं त्याच्या मतावर कोट्या केल्या. त्यांत स्टोइक हे प्रमुख होते; कारण कीं, इंद्रियांच्या वासना तृप्त न करितां त्या माराव्या असें त्यांच्या मताचें रहस्य आहे. त्यांनीं त्याच्या मताला असा दोष लाविला कीं, त्याच्या मतापासून देवांची मोठी तेजोहानि होते; ते पराकाष्ठेचे जड असून विषयसुखांत निमग्न झाले आहेत असा त्यांजकडे दोष येतो; मनुष्याच्या हिताविषयीं ते अगदीं बेपरवा आहेत असें ठरतें. एपिक्यूरस यानें आपल्या मतावर जे आक्षेप घेतले त्यांचें उत्तम रीतीनें खंडन केलें आहे. तो मोठा सदाचारसंपन्न असून लोकांस मान्य झालेल्या देवांची भक्ति करीत असे. त्याच्या शत्रूंनीं त्याजवर असा आरोप आणिला होता कीं, तो आपली शिष्यीण लिवोन्टिअस् इजबरोबर अयोग्य कर्म करीत असे; परंतु हा आरोप खोटा आहे असें त्यानें त्यासंबंधीं मुग्धता स्वीकारून आणि कित्ता घेण्यासारखें सद्वर्तन करून लोकांच्या नजरेस आणून दिलें. लोकांस उपदेश करण्यापासून त्याला पराकाष्ठेचे श्रम झाल्यामुळें तो अगदीं क्षीण झाला आणि त्यास मूत्रावरोध होण्याचा रोग जडल्यामुळें तो आपल्या वयाच्या

ही तेथें हजर होता. * स्टोइक मतानुयायी त्यास केवळ आपला आचार्य असें मानतात.

७२ वे वर्षीं ह्मणजे ख्रिस्तीशकाचे पूर्वीं २७० वर्षें मरण पावला. प्रत्येक मताचे अनुयायी हे नेहमीं लोकांबरोबर आणि आपआपसांत भांडत असतात; परंतु एपिक्यूरस याच्या अनुयायांमध्यें भांडणकज्जे कधींही झाले नाहींत. ते परस्परांशीं परम मित्रत्वाच्या नात्यानें वागत असत. प्राचीनकाळीं जे मोठे तत्वज्ञानी होऊन गेले त्यांत एपिक्यूरस यानें जितके ग्रंथ लिहिले तितके कोणींच लिहिले नाहींत. तीनशें ग्रंथांपेक्षां त्यानें कमी ग्रंथ लिहिले नाहींत. प्रत्येककाळीं आणि प्रत्येक देशांत एपिक्यूरस याचे अनुयायी फार असल्यामुळें, त्यांच्या मताचा चहूंकडे प्रसार झाला; परंतु सदाचाराच्या ठिकाणीं इंद्रियवासना तृप्त करणें हेंच काय तें त्या मताचें मुख्य रहस्य आहे असें लोक मानूं लागले तेव्हां त्या मताची लोकांत विटंबना झाली; आणि त्यामुळें एपिक्यूरिअन मताच्या लोकांस विषयी मानतात.

* स्टोइक मताची ज्यापासून प्रवृत्ती झाली तो झिनो इतालि देशांत ग्रीक लोकांत मोठा तत्ववेत्ता होऊन गेला. त्याचे अनुयायी त्याच्या मतास स्टोइक "Stoic" मत असें ह्मणतात. तो पराकाष्ठेचा स्थीरमनस्क आणि अल्पसंतुष्ट होता. तो अतिशय पवित्र असून, त्याचे आहारविहार नेमस्त असत व स्वतः नियमनिष्ठ असल्यामुळें त्याची शरीरप्रकृति नेहमीं चांगली असे. त्यानें ४८ वर्षेंपर्यंत लोकांस उपदेश करून आपल्या वयाच्या ९८ वे वर्षीं मृत्यु पावला. त्याला साऱ्या जन्मांत कधीं कांहीं रोग झाला नाहीं, आणि असमाधानवृत्तीनें त्याला कधीं अडचण केली नाहीं. आपण जे शोध केले, त्यांत सदाचारासारखी उत्तम वस्तु आपल्यास कोणतीही सांपडली नाहीं असें त्याचें मत आहे. दुसऱ्यावर प्रीति करावी हेंच आपल्या जन्माचें सार्थक असें तो मानीत असे; आणि तो आपल्या शत्रूंवर देखील ममता करीत असे. ममताळू, कृपाळू आणि नियमतत्पर असावें यांतच काय तें परम सुख आहे; दुसऱ्यावर आपण प्रीति केली ह्मणजे तो आपल्यावर ममता करतो, दुसऱ्यावर कृपा केली ह्मणजे तोही आपल्यावर कृपा करतो, असा हा अन्योन्यसंबंध आहे, असें तो मानीत असे. त्यानें या विश्वाची अशी स्थिति पाहिली कीं एक वस्तु दुसऱ्यावर अवलंबून असून परस्परांशीं परस्परांचा संबंध आहे. त्यावरून त्यानें अशी कल्पना केली कीं, समाजामध्यें, आईबापांचें आपल्या मुलांविषयीं कारुण्य, व मुलांचा आईबापांविषयीं कृतज्ञपणा हे मनोधर्मही त्या सृष्टिनियमापासूनच उत्पन्न झाले आहेत. सदाचारसंपन्न होण्याकरितां ज्या मनाच्या देवता मानल्या आहेत त्यांस तो जास्त मान देत असे;

*कोटा यानें मला पाहिल्याबरोबर तो म्हणाला कीं, तुह्मी फार वेळेवर आलांत; कारण एका महत्वाच्या विषयावर व्हेलिअस याजबरोबर माझा वादविवाद चालला आहे; आणि अलीकडे तत्वज्ञानाविषयीं तुह्मीं विचार करीत आहांत यामुळें ह्या वादांत तुम्हीं सामील झालां असतां कांहीं अयोग्य होणार नाहीं.

मी म्हणालों, खरोखर तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें मी वेळेवर आलों असें मलाही वाटतें; कारण येथें तीन मुख्य मतांचे तीन आचार्य एकत्र झाले आहेत. जर एम्. पिसो (M. Piso) येथें असता तर जीं मतें आज लोकमान्य आहेत त्या मतांचे सर्व आचार्य येथें जमले असें झालें असतें. कोटा ह्मणाला कीं, ॲन्टिओकस (Antiochus) यानें बाल्बस याजकडे नुकताच एक ग्रंथ पाठविला आहे. त्यांत जें कांहीं लिहिलें आहे तें खरें आहे, तर तुह्मांला तुमचा मित्र एम्. पिसो याच्या विद्यमानतेची अपेक्षा करण्याचें कारण नाहीं; कारण ॲन्टिओकस याचा असा अभिप्राय आहे कीं, मूलतत्वांच्या संबंधानें स्टोइक याचें मत

---

आणि एकदां आपल्याला सदाचाराची सवय लागली ह्मणजे आपल्या सुखाला कांहीं उणीव राहिली नाहीं असें त्यांस वाटत असे. त्याचे मतानुयायी आरोग्य आणि व्याधि, संपत्ति आणि दारिद्र्य, सुख आणि दुःख यांविषयीं अगदीं बेपरवा आहेत; कारण त्यांपासून कांहीं मनाची प्रसन्नता कमीही होत नाहीं आणि वाढतही नाहीं असें ते मानतात. ईश्वरेच्छेस अनुसरून असावें अशी झेनो याची सर्वांस शिफारस आहे; कारण मनुष्याला सृष्टीचे नियम फिरवितां येत नाहींत हें त्यास पक्कें माहीत होतें. यास्तव त्याचें आपल्या शिष्यांस असें सांगणें होतें कीं, "तुह्मी ईश्वराची प्रार्थना कराल तेव्हां अमुक एक वाईट होणार आहे तें होऊं नये असे शब्द कधींहि उच्चारूं नका. पण अशी प्रार्थना करा कीं, ईश्वरानें आपणास अत्यंत उग्र दुःखें सुखानें सहन करण्याविषयीं धैर्य द्यावें; आणि ईश्वरेच्छेस अनुसरून वागत जा."

* हा रोमन लोकांत राज्यकारभार पहाणारे मुख्य अधिकारी असत त्यांपैकीं होता.

पेरिपॅटोटेक्स् ( Peripatetics ) याहून कांहीं भिन्न नाहीं; शब्दयोजना मात्र भिन्न आहे. बाल्बस, त्या ग्रंथाच्या संबंधानें तुझा अभिप्राय जर तूं सांगशील तर मला फार आनंद होईल.

बाल्बस ह्मणाला, मी तुला माझा अभिप्राय सांगूं काय ? ॲन्टिओकस् कुशाग्र बुद्धीचा मनुष्य असून त्यास स्टोइक आणि पेरिपॅटोटेक्स् यांच्या मतांत काय भेद आहे हें समजलें नाहीं याबद्दल मला फार नवल वाटतें. पेरिपॅटेटिक्स्, हे ज्यांत आपलें हित आहे त्यांत प्रामाणिकपणा आहेच, हितकारकपणा आणि प्रामाणिकपणा ह्या दोन वस्तु नामानें मात्र भिन्न आहेत, जातिभिन्न नाहींत, असें मानतात. हा स्टोइक मताशीं मोठा विरोध आहे. अप्रामाणिकपणा करून देखील आपलें हित करून घेतां येतें; तेव्हां जें हितकारक तेंच प्रामाणिक असें कसें होईल ? ह्या दोन वस्तूंमध्यें केवळ शाब्दिक भेद नाहीं परंतु वस्तुभेदही आहे. मीं तुला उदाहरणार्थ एक गोष्ट सांगितली तीविषयीं जास्त वाटाघाट करण्याची ही वेळ नाहीं. आतां आपण ज्या विषयाला आरंभ केला तो पुढें चालू द्यावा.

कोटा म्हणाला, होय, माझीही मनापासून तीच इच्छा आहे. पण ( मजकडे पाहून ), हा आपला पाहुणा नुकताच आला आहे. त्याला आपलें कोणत्या विषयावर भाषण चाललें आहे हें समजलें पाहिजे. देवांच्या स्वरूपांविषयीं आपण चर्चा करीत आहोंत. एपिक्यूरस याचे यासंबंधानें काय विचार आहेत ते आपल्यास कळवावे अशी आपण व्हेलिअस यास विनंति केली आहे. व्हेलिअस, जर तुला श्रम होत नसतील तर तूं एक वेळा जें कांहीं सांगितलें त्याची पुनरावृत्ति कर. व्हेलिअस ह्मणाला, तसें करण्यास मी राजी आहें; पण हा नवा पाहुणा कांहीं माझा पक्ष घेणार नाहीं; कारण तुह्मी दोघेही फिलो याचे शिष्य आहांत. मी म्हणालों कीं, मी कोटा

याचा कैवार घेईन असें तुला वाटेल असें मला वाटलें नव्हतें. मी केवळ श्रोता आहें. मला कोणाचा पक्ष नाहीं, आणि कोणतेंही विशेष मत प्रतिपादन करण्याविषयीं मी बांधलों गेलों नाहीं; मग तें मत मला मान्य असो किंवा नसो.

८. ह्यानंतर व्हेलियस यानें आपल्या भाषणास सुरुवात केली. तेव्हां आपल्या मतावर त्याचा इतका विश्वास बसलेला दिसला कीं, जसा काय तो नुक्ताच देवाशीं सल्लामसलत करून खालीं उतरला आहे. तो म्हणाला कीं, तुम्ही कल्पित आणि अनर्थक अशा गोष्टी कांहीं खऱ्या मानूं नका. प्लेटो म्हणतो त्याप्रमाणें ईश्वर या जगताचा कर्ता असून त्यानें हें सर्व जग निर्माण केलें आहे असें मानण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

अशा ह्या प्रचंड जगाला ईश्वरानें निर्माण केलें आहे असें सिद्ध करून दाखविण्यास प्लेटो याजपाशीं काय हो पुरावा आहे? हें मोठें प्रचंड काम करण्याकरितां कोणती सामुग्री, कोणतीं हत्यारें, कोणतीं यंत्रें, कोणते सुतार, गवंडी व मजूर कामास लाविले होते? वायु, तेज, जल आणि पृथ्वी यांनीं त्या शिल्पकाराच्या इच्छेला अनुसरून त्याची आज्ञा मान्य केली यास काय हो प्रमाण आहे?

ज्यांचा संयोग करून हें सर्व जग निर्माण केलें असें ह्मणतां, त्या पृथ्वीची आणि आप, तेज, वायु यांची उत्पत्ति कशापासून झाली आणि मन व इंद्रियें यांच्या उत्पत्तीस तीं तत्वें कोणत्या प्रकारें कारणीभूत झालीं याविषयीं विचार करणें मोठें कंटाळवाणें आहे. ज्या वस्तु आपल्या दृष्टीस पडतात त्या स्पृहणीय आहेत, परंतु त्यांचें मूळ शोधून काढणें फार अवघड आहे.

आतां प्लेटो याचें हेंच ह्मणणें किती चमत्कारिक आहे तें पहा!

ईश्वरानें सृष्टि निर्माण करून आपल्यास दिली असेंही तो म्हणतो आणि ती आदिमध्यांतरहित म्हणजे नित्य सनातन आहे, असेंही त्याचेंच म्हणणें आहे; तेव्हां तें जुळतें कसें व त्याची एकवाक्यता करावी कशी ? ज्याला आरंभ आहे त्याला अनादित्व आहे असें तुम्ही कबूल कराल काय ? जिला आरंभ झाला आहे तिला अंत नाहीं अशी जगांत कोणती वस्तु आहे ? आणि संयोग करून एकत्र केली असतां तिचें विभागीकरण होत नाहीं किंवा ती मोडत नाहीं अशी तरी कोणती वस्तु आहे ? लुसिअस, प्लेटो याचा ईश्वर आणि तूं ज्याला विधाता म्हणतोस हे दोघेही एकच आहेत, तर मी तुला असें विचारतों कीं, हें जग निर्माण करण्याकरितां मदतगार कोण होते ? कोणतीं यंत्रें एकत्र केलीं होतीं आणि जग अमुक प्रकारचें तयार करावयाचें याचे नमुने कोणीं तयार केले ? आणि हें जग प्लेटो याच्या ईश्वरानें आपल्याप्रमाणें शाश्वत न करितां अशाश्वत कां केलें ?

९. मी तुम्हांला आणखीं असें विचारतों कीं पुष्कळ काळपर्यंत ह्या जगताचा कर्ता गाढ निद्रेंत कां होता ? आणि एकाएकीं जग निर्माण करण्याविषयीं कां उद्युक्त झाला ? जगच निर्माण केलें नव्हतें तेव्हां काळ कोठून असणार असें तुम्हीं म्हणतां काय ? सूर्य, चंद्र, आणि पृथ्वी इत्यादिकांच्या परिभ्रमणावांचून काळ मोजितां येत नव्हता; परंतु जग निर्माण करण्यापूर्वीं ज्याची ऋतुमानांवरून गणना करतां येत नाहीं असा, व आद्यंतशून्य काळ होता असें गृहीत केलें पाहिजे. तर तेव्हां काय स्थिति होती हें कांहीं आपल्याच्यानें सांगवत नाहीं; कारण कीं, वेळ मोजतां यावी अशी स्थिति प्राप्त झाल्यापूर्वी काय स्थिति होती याविषयीं कांहीं कल्पनाच करणें शक्य नाहीं. यासाठीं, बाल्बस, मला तुझ्यापासून असें जाणावयाचें

आहे कीं, तूं ज्याला विधाता म्हणतोस तो अनंत काळपर्यंत असा आळशी कां होता? त्याला श्रम करण्याचा कंटाळा आला होता काय? परंतु श्रमांचा देवाला कंटाळा यावा हें कांहीं संभवनीय नाहीं; कारण ज्याच्या संकल्पानें सर्व गोष्टी घडतात, त्याला श्रम रे कशाचे? पण हें जग प्रकाशित करून सुशोभित करण्याविषयीं देवास कोणीं प्रेरणा केली? अशी जर कल्पना केली कीं, आपल्यास जास्त सोयीवार राहतां यावें ह्मणून देवानें जग निर्माण केलें, तर जग निर्माण करण्यापूर्वीं तुझा देव अनंतकाळपर्यंत कोंडून ठेविल्याप्रमाणें अंधारांत बसून राहिला होता, असें कबूल करणें भाग पडतें. अशी आपल्यास कल्पना करवते काय कीं, आकाश आणि पृथ्वी अलंकृत केल्यावर देवाला मोठा हर्ष झाला? त्याला आनंद देणारी अशी कोणती बरें वस्तु आहे? आणि जर आहे असें मानिलें तर संकल्पमात्रेंकरून पाहिजेल तें निर्माण करण्याविषयीं शक्ति असून तिजवांचून त्यानें फार काळपर्यंत राहावें हें काय?

अथवा तूं नेहेमीं प्रतिपादन करतोस त्याप्रमाणें हें जग देवानें मनुष्यांसाठीं निर्माण केलें हें खरें आहे काय? आणि त्यांतही शाहण्या मनुष्यांकरितां काय? जर तसें असेल, तर हा प्रचंड प्रयत्न त्यानें फार थोड्या लोकांकरितां केला; कारण कीं या जगांत शहाणे लोक फार थोडे आहेत. जर मूर्ख लोकांसाठीं एवढा मोठा खटाटोप केला असें ह्मणावें, तर दुष्ट लोकांकरितां असा प्रयत्न करणें हें कांहीं उचित नव्हतें. आयुष्यांत अनेकविध गैरसोयी आहेत, परंतु त्या सहज सोसतां याव्या हें जसें शहाण्यांस कळतें तसें कांहीं मूर्खांस कळत नाहीं. भावी संकटें निवारण करण्याची आणि प्राप्त झालेलीं संकटें सोसण्याची मूर्खांमध्यें ताकद नसते.

१०. कित्येक असें म्हणतात कीं, हें जग सचेतन असून जरातीत

आहे इतकेंच नाहीं, तर तें आणखीं परमसुखी असून वर्तुळाकार आहे. मला ह्या मतवाद्यांचें मोठें हंसूं येतें. या वर्तुळाला ते सचेतन कसें मानतात हें कांहीं मला कळत नाहीं. तुलना करितां येणार नाहीं अशा शीघ्र गतीनें भ्रमण करीत आहे अशा जगाच्या ठायीं स्थीर मन आणि सुखी प्राण कसे असूं शकतील याची तर बोवा आपल्याच्यानें कल्पना देखील करवत नाहीं! अशा प्रकारचें परिभ्रमण त्या जगरूपी देवतेला त्रासास्पद होत नसेल काय? पृथ्वी ही सृष्टीचा एक भाग आहे; तेव्हां तो त्या देवतेचाही एक भाग आहे हें स्पष्ट आहे. आपण पहातों कीं पृथ्वीचा कांहीं प्रदेश अगदीं रुक्ष असल्यामुळें वासानर्ह आहे; कांहीं भाग सूर्याच्या जवळ असल्यामुळें भाजून जात आहे; आणि कांहीं भाग सूर्यापासून फार अंतरावर असल्यामुळें हिम आणि बर्फ यांनीं व्यापिला आहे. तस्मात् हें जग जर एक देवता आहे तर वर जे पृथ्वीवरील प्रदेश सांगितले ते त्या देवतेचे अवयव आहेत असें मानणें भाग पडतें; आणि मग असेंही कबूल करावें लागतें कीं, त्या देवतेचे कांहीं अवयव सूर्याच्या उष्णतेनें होरपळत असून कांहीं अवयव हिम आणि बर्फ यांच्या योगानें गारठून जात आहेत.

लुसिअस, अशा प्रकारचीं देवांविषयीं तुमचीं मतें आहेत. त्याखेरीज, आणखी पुष्कळ लोकांनीं देवांविषयीं विचार केले आहेत त्यांचीं मतें काय आहेत त्याचा आपण आतां विचार करूं. एका तत्वज्ञान्याचें "थेलस" (Thales the Milesian) असें ह्मणणें आहे कीं, सर्व वस्तूंच्या उत्पत्तीस जल हें कारणीभूत आहे व जलामध्यें देवानें मनरूपानें प्रविष्ट होऊन त्यापासून सर्व वस्तु निर्माण केल्या; परंतु जर देहावांचून देवाचें अस्तित्व असूं शकेल आणि शरीरांवाचून जर मन असूं शकेल तर, त्यानें उदकाशीं मनाचा संयोग कां केला?

अनॅक्झिमेन ( Anaximens ) असें ह्मणतो कीं, वायु हा देव आहे. तो अमर्याद असून अपार आहे, आणि सदा गतिमान आहे. पण ज्याला आकृति नाहीं त्याला देवत्व कसें असूं शकेल ? देवतेला नुस्ती आकृतीच असणें अवश्य आहे असें नाहीं, परंतु ती अत्यंत सुंदर असली पाहिजे. दुसरें, मी असें विचारतों कीं, ज्याला आरंभ आहे तो पदार्थ मरणधर्माला पात्र नाहीं काय ?

११. अनॅक्झिमेन याजपाशीं ज्यानें तत्वज्ञानाचा अभ्यास केला त्या अनॅक्झागोरानें असें सिद्ध केलें आहे कीं, सर्व वस्तु निर्माण कशा कराव्या, याविषयीं अगोदर योजना करणें, नंतर त्या उत्पन्न करणें आणि पुढें त्या परिपूर्ण दशेस आणणें ह्या गोष्टी एका अमर्याद मनाच्या ज्ञानाचीं आणि शक्तीचीं कार्यें आहेत; परंतु अशा प्रकारच्या मनाशीं इंद्रियांचा आणि चलनधर्माचा संयोग कसा होऊं शकेल हें कांहीं त्याच्या ध्यानांत आलें नाहीं. अशा प्रकारचें मन एक प्राणि आहे, असें कल्पिलें तर त्याच्या अंतस्थ असें दुसरें कांहीं तत्व असलें पाहिजे कीं त्याच्या योगानें त्याला मन हें अभिधान देतां येईल. पण मनाहून आणखी अंतस्थ वस्तु ती कोणती असूं शकणार आहे ? तेव्हां त्या मनाला एखाद्या बाहेरच्या आवरणानेंच आच्छादित केलें पाहिजे. पण त्याच्या मताला ही गोष्ट कांहीं अनुकूळ नाहीं; परंतु आपल्याला हें कांहीं कळत नाहीं कीं, नुस्तें मन त्याच्याशीं अन्य द्रव्याचा संयोग झाल्यावांचून तें अस्तित्वांत कसें राहूं शकेल ?

कोणी चंद्र, सूर्य, नक्षत्रें आणि मन यांस देवत्व देतात; परंतु त्यांस असें कळत नाहीं कीं आपण नाशवंत पदार्थांला शाश्वत मानतों.

पायथागोरा असें ह्मणतो कीं, आत्मा ह्मणून-जें एक तत्व आहे तोच ईश्वर आहे. तो ह्या सृष्टीमध्यें व्यापून राहिला आहे आणि

आपले आत्मे हे त्याचे अंश आहेत. पण या मतापासून एक अनर्थ उत्पन्न होतो तो त्यांस कळत नाहीं. प्रत्येक मनुष्याचा आत्मा त्या आत्म्यापासून काढावयाचा ह्मटलें म्हणजे त्यास चिरलें पाहिजे; आणि जर मनुष्याच्या आत्म्याला कांहीं इजा झाली, तर त्या योगानें त्या मुख्य आत्म्यालाही इजा झाली पाहिजे; कारण मनुष्याचा आत्मा त्या आत्म्याचा एक अवयव आहे. आतां मनुष्याचें मन जर देव आहे असें मानलें तर त्याच्या ठिकाणीं अज्ञान कसें असूं शकेल ?

झेनोफन पृथ्वी, आप, तेज आणि वायु यांस देव मानतो. परंतु ज्यापेक्षां त्यांस आरंभ आहे त्यापेक्षां त्यांस क्षीणावस्थाही लागलीच आहे, आणि त्यांस कोणतेंही इंद्रिय नाहीं.

१२. प्लेटो याचें मत संदेहयुक्त आहे हें दाखविणें मोठें कंटाळवाणें आहे. तो ह्मणतो कीं, ह्या जगाचा निर्माणकर्ता एक ईश्वर आहे असें प्रतिपादन करण्याच्या खटपटीस पडणेंच उचित नाहीं. त्यानें आपल्या ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, ईश्वराचा स्वभाव कसा आहे याविषयीं फार बारीक शोध करण्याच्या आपण खटपटीस पडूं नये. त्याचें असें ह्मणणें आहे कीं, ईश्वर हा निराकार आहे. ती कल्पना आपण खरी कशी म्हणावी ? जर ईश्वराला देह नाहीं तर त्यास इंद्रियें नाहींत, मागला पुढला विचार नाहीं, आणि आनंदही नाहीं; आणि आपण तर ईश्वराच्या ठिकाणीं हे धर्म आहेत असें मानतों. दुसरें त्याचें प्रतिज्ञापूर्वक असें म्हणणें आहे कीं, हें सारें जग—दिव्य लोक, नक्षत्रें, मन आणि आपले पूर्वज ज्याची भक्ति करीत आले आहेत, तें सर्व मिळून एक देवता आहे. ह्या मताचा पृथक् विचार केला तर तें अगदीं मिथ्या भासत असून, युगपत् विचार केला तर तें अगदीं विसंगत भासत आहे.

१३. अरिस्टोटल याचें मत त्याचा गुरु प्लेटो याहून कांहीं भिन्न नाहीं. एकदां तो मनाला ईश्वर म्हणतो, दुसऱ्यानें तो हें सर्व जग ईश्वर आहे असें मानतो. एकदां तो मेघमंडळांत जी उष्णता आहे तिला ईश्वर म्हणतो. पण मेघमंडळ हें जगाचा एक अवयव असून आपण जगाला ईश्वर मानिलें आहे, तेव्हां त्याच्या अवयावाला आणखी ईश्वर कसें मानावें ही चूक त्यास समजत नाहीं. हा तत्वज्ञानी जेव्हां ईश्वर निराकार आहे असें ह्मणतो तेव्हां त्याला तो बुद्धिहीन आणि सुनाबधिर असा एक जीव आहे असें ठरवितो.

अरिस्टोटल याचा सहाध्यायी झेनोक्रचाटिस ( Xenocrates ) यानें आठ देव मानले आहेत. शनि, बृहस्पती, मंगळ, बुध व शुक्र हे पांच आणि सहावा हे अचल तारे. हे अनेक असून भिन्न असतां त्यानें एकच देवता मानिली आहे. सातवा सूर्य आणि आठवा चंद्र; परंतु ते कोणत्या गुणांनीं सुखी आहेत आणि त्यांस देवत्व कोणत्या गुणांनीं आलें हें सिद्ध करून दाखविणें कांहीं सोपें नाहीं.

१४. बाल्बस, आतां मी तुझ्या मताविषयीं विचार करतों. तुझ्या मताचा मूळ उत्पादक झेनो याचें मत असें आहे कीं, आपल्यावर बलात्कार करून सन्मार्गास लावावें आणि असन्मार्गापासून परावृत्त करावें असा जो ह्या सृष्टीच्या अंगीं स्वाभाविक धर्म आहे, तोच ईश्वर. आतां ह्या स्वाभाविक धर्माचे अंगीं कसें चेतनत्व असूं शकेल हें कांहीं मला कळत नाहीं; परंतु ईश्वराच्या ठायीं चेतन धर्म आहे हें आपल्यास कबूल केलें पाहिजे. तोच तत्वज्ञानी दुसरे ठिकाणीं असें ह्मणतो कीं, आकाश हें देव आहे. परंतु आपल्याच्यानें असें कबूल करवतें काय कीं, देव हा एक सुनाबहिरा प्राणी आहे; त्यास कांहीं आमच्या प्रार्थना ऐकूं येत नाहींत; आपल्या इच्छा काय आहेत हें त्यास कळत नाहीं; आपले संकल्प त्यास माहित नाहींत व त्याचा

आपल्याशीं कांहीं एक संबंध नाहीं! तो नक्षत्रें, वर्षें, महिने आणि ऋतु यांचे ठायीं देखील दैविकशक्तीचा आरोप करीत आहे. त्यानें *हेसिओड्स ( Hesiods ) यानें केलेल्या ग्रंथाचें भाषांतर केलें आहे. त्यांत देवतांविषयीं स्थापित मतांचा अगदीं विध्वंस केला आहे. बृहस्पती, जूनो, (बृहस्पती आणि मंगळ, यांच्या मधल्या चार ग्रहांपैकीं एक ग्रह आहे, व ही विवाहदेवता आहे असेंही रोमन व ग्रीक लोक मानीत असत), आणि व्हेस्टा, (बृहस्पती व मंगळ यांच्या मधल्या चार ग्रहांपैकीं एक ग्रह आहे) आणि दुसरे आणखी कीतीएक यांस तर त्यानें देवांच्या संख्येंतून अगदीं काढून टाकिलें आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं, वाक्शून्य व प्राणरहित अशा वस्तूंला कांहींएक प्रकारच्या चुकीनें देवकोटींत मानिलें आहे. त्याचा शिष्य आरिस्टो याचे विचार कांहीं कमी अशुद्ध नाहींत. देवांच्या आकृतीविषयीं कल्पना करणें, हें त्यास परम अशक्य वाटतें; आणि तो प्रतिज्ञापूर्वक असें सांगतो कीं, देवांना मुळींच इंद्रियें नाहींत, आणि देव सचेतन आहेत किंवा नाहींत याविषयीं तो संशयी आहे.

झिनो याचा शिष्य क्लीन्थेस यानें एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, जग हें देवता आहे. दुसरे ठिकाणीं तो प्रतिज्ञापूर्वक असें स्थापित करतो कीं, अतिशय दूर, अतिशय उंच, आणि सर्ववेष्टक असें आकाश ही एक देवता आहे. सरतेशेवटीं त्यानें तर्कशक्तीपेक्षां दुसऱ्या कोणत्याही वस्तूच्या ठायीं ईशशक्ति नाहीं असेंही ह्मटलें आहे. क्लीन्थेस याच्या देवाला मनाच्या कल्पनेवांचून ओळ-

---

*हा एक महा कवि होता. होमर आणि हा समकालीन होते असें कोणी ह्मणतात. कोणी ह्मणतात कीं, हा होमर याच्या पूर्वीं होता. सिसरो या कवीचें फार वर्णन करितो. आणि ग्रीक लोकांची या कवीच्या कवितेवर इतकी प्रीति होती कीं, त्यांनीं आपल्या मुलांनीं त्याची कविता आणि नीतिसंबंधीं शिक्षण हीं तोंडपाठ करून ठेवावीं असा शिक्षणपद्धतींत एक नियम घालून दिला होता.

खण्यास दुसरें कांहीं साधन नाहीं; कारण कीं, त्यास दृश्य अशी कोणतीच आकृति नाहीं.

१५. झिनो याच्या दुसऱ्या एका छात्रानें असें ह्मटलें आहे कीं मनुष्याला हितकारक असे ज्यांनीं शोध केले आहेत त्यांनाच देव मानावेत; आणि त्यांनीं ज्या वस्तु शोधून काढल्या त्यांस देखील देव म्हणावें. आबडधोबड आणि क्षुद्र वस्तूंला देवता मानणें आणि जीं मनुष्यें मरून जाऊन धुळीस मिळालीं त्यांस देवांच्या कोटींत बसविणें यासारखे विवेकशून्य विचार दुसरे कोणते असावयाचे? त्यांच्या मरणाविषयीं फार झालें तर तुह्मीं शोक करावा, याखेरीज त्यांस दुसरा मान तो तुह्मीं कोणता देऊं शकाल?

झिनो याच्या एका दुसऱ्या शिष्यानें तर कधीं कोणास माहीत नाहींत अशा अनेक देवांची यादी तयार केली आहे. त्या देवांचीं आपण कधीं नांवें देखील ऐकिलीं नव्हतीं. तेव्हां त्यांजविषयीं कल्पना करणें हें देखील बुद्धिशक्तिपलीकडील काम आहे. तो तर्कशक्तीच्या ठायीं दैविक शक्ति आहे असें मानतो. ह्या जगाला आत्मा आणि मन आहे असें कल्पून त्यांस देव ह्मणतो. तेज, वायु, पृथ्वी आणि आप यांस तो देव मानतो. चंद्र, सूर्य आणि तारे यांस देव मानून त्यांनीं व्यापून राहिलेल्या रिकाम्या जागेसही त्यानें देवत्व दिलें आहे.

१६. मला असें वाटतें कीं, मी तत्ववेत्त्यांचीं देवांविषयीं मतें काय आहेत हें कांहीं सांगत नाहीं; पण नष्ट बुद्धीचे लोक निद्रेंत काय बरळले तें सांगत आहें. कवींच्या दंतकथेसारख्या असमंजस गोष्टी तर क्वचितच आपल्या ऐकण्यांत येतील. त्यांनीं ह्या जगांतील भोळ्या लोकांच्या मनांत भलत्याच गोष्टी भरवून देऊन त्यांचें जें

नुकसान केलें आहे तें कधींही भरून देतां येणार नाहीं. त्यांच्या वाणीच्या ठायीं जें माधुर्य आहे त्याचा हा प्रताप होय. त्यांनीं देव पराकाष्ठेचे रागीट आणि विषयी बनवून दिले आहेत. त्यांनीं त्यांच्या लढाया, परस्परांविषयीं त्यांचें वैर, कलह, बेबनाव, त्यांचें जन्म, मरण, गाऱ्हाणीं व शोक, त्यांचे व्यभिचार, सर्व प्रकारच्या उपभोगांविषयीं त्यांचें अनियत वर्तन, त्यांचीं बंधनें, मृत्युधर्मविशिष्ट प्राण्यांच्या ठायीं त्यांचें कामचरित्र, आणि त्यापासून मर्त्य प्राण्यांच्या उत्पत्ति यांचीं चित्रें काढून आपल्यापुढें मांडलीं आहेत.

ह्याप्रमाणें कवींनीं अनर्थकारक आणि उपहासास्पद कथानकें कथन करून त्या देवांची जितकी त्यांच्यानें करवेल तितकी विटंबना केली आहे. अशा प्रकारचे लोक पूर्वकाळीं होते आणि आतांही नाहींत असें नाहीं. ज्यांस सत्याविषयीं अगदीं अज्ञान आहे ते नेहमीं अशाच कांहीं तरी वेड्यावांकड्या कल्पना करून आपला काळ घालवितात.

जो कोणी ह्या मतांच्या स्थापकांच्या असमंजसपणाचा व द्वाडपणाचा विचार करील त्यास एपिक्यूरस् याजविषयीं अतिशय पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं; आणि तो त्यांस ज्यांच्याविषयीं आपण वादविवाद करीत आहोंत, त्या देवांच्या कोटींत देखील नेऊन बसवील; कारण ह्या सृष्टिरचनेवरून मनुष्याच्या मनांत देवभाव उत्पन्न होतो त्याचा प्रथमारंभ एपिक्यूरस् याजपासून झाला. कोणत्याही प्रकारचें शिक्षण मिळविल्यावांचून देवांविषयीं स्वाभाविक भावना उत्पन्न होत नाहीं असें जगावर एकही राष्ट्र नाहीं. हा एक मनुष्याच्या मनाचा स्वाभाविक धर्म आहे. कोणतीही गोष्ट अगोदर मनांत आल्या-

वांचून, तीविषयीं शोध करावा ही बुद्धि उत्पन्न होणार नाहीं व त्याविषयीं वाटाघाट करतां येणार नाहीं.

१७. तुम्ही पहा, देव आहेत किंवा नाहींत ह्या प्रश्नाचा अगदीं येथें स्पष्ट निकाल लागला आहे ; कारण मानवी प्राण्याचा कायमचा आणि सर्वसाधारण अभिप्राय असा आहे कीं, ह्या जगांत देव ह्मणून एक जाति आहे. ही भावना आपल्या मनांत येण्यास कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाची आपल्यास गरज लागली नाहीं, किंवा कोणत्याही एखाद्या कायद्यानें तशी भावना करणें आपल्यास भाग पाडलें नाहीं. तेव्हां यापासून असें निष्पन्न होतें कीं, देव आहेत ही भावना नैसर्गिक आपल्या मनामध्यें वास करीत आहे. ज्यापेक्षां हें सर्वमान्य मत आहे त्यापेक्षां तें सर्वथैव खरें आहे; ह्मणून देव यांचें अस्तित्व आहे हेंही सिद्ध आहे ; कारण, याविषयीं आपलें सर्वांचें एकमत आहे. तत्वज्ञान्यांसच ही गोष्ट मान्य आहे असें नाहीं, तर अज्ञानी आणि विद्याशून्य या लोकांस देखील ही गोष्ट मान्य आहे.

ही गोष्ट देखील आपल्यास कबूल करावी लागेल कीं, देवांच्या अस्तित्वाविषयीं आपल्या मनांत स्वाभाविक भावना उत्पन्न होते. नव्या वस्तूला नव्या नामाची गरज आहे हें स्वाभाविक आहे. एपिक्यूरस यानें ह्या भावनेला " पूर्व भावना " हें नांव दिलें आहे. ह्या नामाचा पूर्वीं कधीं कोणीं उपयोग केला नव्हता. देव आहेत ह्या तर्क करण्याच्या पद्धतीवरून आपल्यास असेंही वाटतें कीं, देव हे सुखी आणि अमर आहेत ; कारण ज्या सृष्टिधर्मानें आपली अशी खातरजमा करून दिली आहे कीं ह्या विश्वांत देवांची एक जाति आहे, त्यानेंच आपल्या मनांत असेंही ठसवून दिलें आहे कीं ते अजरामर असून सुखी आहेत ; आणि जर ते तसे आहेत तर एपि-

क्यूरस यानें जें ह्मटलें आहे तें खरें आहे. "जे कांहीं निरंतर सुखी आहेत ते स्वतः आपल्यावर कोणतेही श्रम करण्याचा भार घालूं शकत नाहींत, व दुसऱ्यांवरही त्यांच्यानें कांहीं भार घालवत नाहीं. त्यांना कोणाचा कधीं राग येत नाहीं व कोणावर कृपा करावी अशीही इच्छा त्यांना होत नाहीं; कारण ज्या वस्तूच्या अंगीं असे धर्म आहेत ती वस्तु दुर्बळ आणि क्षणभंगुर अशी असलीच पाहिजे." अतिरिक्ताचारावांचून आपण देवांची भक्तीनें पूजा करावी हें स्थापित करण्याकरितां इतका वेळ जें कांहीं सांगितलें तें पुरे आहे.

कारण, उत्तम स्वभावांच्या देवांची मनुष्यांनीं पवित्र मनानें आराधना करावी हें उचित आहे; कारण देव अजरामर असून परम सुखी आहेत. जें कांहीं उत्तम आहे त्याजविषयीं सर्वांची पूज्य बुद्धि असावी असा त्यांचा सर्वांवर हक्क आहे. देवांच्या सामर्थ्याविषयीं व क्रोधाविषयीं जें आपल्यास भय वाटतें तें आपल्या मनांतून समूळ काढून टाकिलें पाहिजे; कारण ही गोष्ट आपण चांगली जाणली पाहिजे कीं, क्रोध आणि प्रीति हे मनोविकार सुखी आणि अजरामर प्राण्याच्या स्वभावाला विसंगत आहेत. ह्या असत्कल्पना आपल्या मनांतून नाहींशा झाल्या ह्मणजे मग देवांच्या अगाध शक्तीचें कांहीं आपल्यास भय वाटण्याचें प्रयोजन रहात नाहीं. आतां देवांची आकृति कशी आहे, त्यांचा आयुष्यक्रम कसा आहे, आणि त्यांच्या बुद्धीचा ते कोणत्या प्रकारें उपयोग करतात, याचा आपल्यास विचार केला पाहिजे. त्यावांचून ते अजरामर असून ते सुखी आहेत हें मत कांहीं दृढ होणार नाहीं.

१८. देवांच्या आकृतीविषयीं आपल्यास विचार करावयाचा असला ह्मणजे कांहीं अंशानीं आपल्याला ह्या सृष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे व

कांहीं तर्क केला पाहिजे. मनुष्याच्या आकृतीसारखी देवांची आकृति आहे अशी आपल्या मनांत कल्पना उत्पन्न होते. कारण जी वस्तु उत्तम आहे, म्हणजे जी परमसुखी असून अजरामर आहे, ती अतिशय सुंदर असलीच पाहिजे. अवयवांची रचना आणि नीटनेटकेपणा, मुखांची ठेवण व सुंदरपणा आणि शरीराचा डौलदार आकार या योगांनीं मानवी प्राणी किती तरी सुंदर आहे! यासारखा या जगांत दुसरा कोणता तरी सुंदर प्राणी तुम्हीं अवलोकन केला आहे काय? लुसिअस्, जेव्हां तुझे मतानुयायी मनुष्याच्या शरीररचनेविषयीं सृष्टिकर्त्याच्या कारागिरीचें आणि कसबाचें वर्णन करितात तेव्हां त्यांच्या वर्णनांत असें येतें कीं, मनुष्याचा प्रत्येक अवयव फारच नीटनेटकेपणानें रचला असून, त्यांत सोयीवारपणा आणि सौंदर्य हे दोन्हीही गुण उत्तम प्रकारें साधले आहेत. यास्तव जर मनुष्याची आकृति इतर प्राण्यांहून सुंदर आहे, तर देव स्वतः सचेतन आहेत, तेव्हां तेही मनुष्याच्या आकृतीचेच असले पाहिजेत; कारण ती आकृति अतिशय सुंदर आहे. दुसरें असें मान्य झालें आहे कीं, देव हे परम सुखी आहेत, आणि सद्गुणांवांचून कोणीही सुखी असूं शकणार नाहीं हेंही खचित आहे; आणि जेथें बुद्धि नाहीं तेथें सद्गुण असूं शकणार नाहीं हाही तसाच निर्बाध सिद्धांत आहे; आणि बुद्धि ही मनुष्य प्राण्याहून दुसऱ्या कोणत्याही प्राण्याच्या ठिकाणीं निवास करीत नाहीं ही गोष्टही तशीच सिद्ध आहे; तेव्हां देव हे मनुष्याच्या आकृतीचे आहेत असें आपल्यास मानलें पाहिजे. पण ती आकृति कांहीं शरीर नाहीं, शरिरासारखें कांहीं आहे आणि त्यांत रक्त नाहीं, पण रक्तासारखें कांहीं आहे. जरी एपिक्यूरस यानें याविषयीं अतिशय कुशाग्रबुद्धीनें आणि युक्तीनें विवेचन केलें आहे

तरी सामान्य बुद्धीच्या मनुष्याचा हा कांहीं विषय नाहीं. तुमच्या आकलनशक्तीवर अवलंबून राहून ह्या विषयाविषयीं मी फार मितभाषी असलें पाहिजे. एपिक्यूरस यानें या सृष्टींतील गूढ आणि बहुतकरून प्रच्छन्न असें रहस्य शोधून काढून तें अवगत करून घेतलें इतकेंच नाहीं, तर तें सहज रीतीनें लोकांच्या मनांत ठसवून दिलें आहे. तो आपल्यास असें शिकवितो कीं, देवांचा आकार आणि स्वभाव हे कांहीं आपल्यास इंद्रियाच्या द्वारें कळत नाहींत; फक्त मनानें मात्र कळतात.

१९. खरोखर देवांची अपार शक्ति अतिशय विचारणीय आहे. सृष्टीची रचना अशी आहे कीं, तिच्या प्रत्येक भागाचा दुसऱ्या भागाशीं पूर्णपणें संयोग केला आहे आणि एपिक्यूरस या संयोगाला "समान वांटणी" असें म्हणतो. त्यावरून त्यानें असा तर्क केला आहे कीं, ह्या विश्वांत मर्त्यांचा फार मोठा समुदाय आहे तर त्या विश्वांत अमर्त्यांची संख्या कमी असणें हें शक्य नाहीं; आणि जर नाशवंत प्राणी असंख्य आहेत तर अविनाशी असे प्राणी देखील असंख्य असले पाहिजेत. बाल्बस्, तुझे मतानुयायी मला नेहमीं विचारीत असतात कीं देव कोठें राहतात आणि ते आपली वेळ कशी घालवितात ? ह्याचें उत्तर असें आहे कीं देव पराकाष्ठेचे सुखी आहेत. आपल्याच्यानें कल्पना करवेल अशा सर्व जातींच्या सुखांचीं प्रचुर साधनें त्यांस अनुकूल आहेत. ते कांहींएक करीत नाहींत आणि आपल्यावर कोणत्याही कार्यांचा भार घेऊन ते चौऱ्याशींच्या फेऱ्यांत पडत नाहींत. आपले सद्गुण व शहाणपण यांतच त्यांस आनंद आहे. शाश्वत सुखांचा आपल्यास उपभोग घेण्यास मिळतो त्यांतच ते संतुष्ट आहेत.

२०. अशा जातीच्या देवतेलाच सुखी देवता असें ह्मणावें. पण तुझा

देव तर बोवा फारच कष्टाळु. आपण अशी कल्पना करूं कीं, हें जग ही एक देवता आहे. क्षणभरही न थांबतां अतर्क्य गतीनें आकाशांत परिभ्रमण करणें यापेक्षां असुखकारक अशी ती कोणती स्थिति असूं शकणार आहे ? ज्यांना विश्रांति नाहीं ते कधींही सुखी असूं शकणार नाहींत. आपण दुसरी अशी कल्पना करूं कीं, ह्या जगांत देवतेचा निवास आहे. तिच्या प्रेरणेनें ह्या जगाचा व्यवहार चालत आहे. ती नक्षत्रांचे मार्ग आणि ऋतूंचे फेरफार सुरक्षित ठेविते. पृथ्वी आणि समुद्र यांचें निरीक्षण करून मनुष्यांच्या गरजा आणि फायदे यांस त्यांचा उपयोग होईल अशा रीतीनें त्यांस वर्तविते. खरोखर ही देवता त्रासदायक आणि कष्टाळु काम आपल्या डोक्यावर घेऊन चौऱ्याशींच्या फेऱ्यांत पडली आहे. मनाची स्वस्थता, पूर्ण निष्काळजीपणा, आणि सर्व प्रकारच्या उद्योगधंद्यापासून आपली सुटका हीं काय तीं सुखाचीं साधनें आहेत. ज्यांपासून आपल्यास ज्ञान प्राप्त झालें त्या तत्वज्ञान्यांनीं आपल्यास असें शिकविलें कीं, हें जग एका वस्तुशक्तीनें निर्माण केलें आहे, व तें निर्माण करण्याकरितां कांहीं शिल्पकलेचें प्रयोजन लागलें नाहीं. आणि जरी तुझें मत असें आहे कीं, दैविक शक्तीवांचून असें प्रचंड काम होणें शक्य नाहीं, तरी मी तुला असें सांगतों कीं, त्या वस्तुशक्तीचें असें कांहीं विलक्षण सामर्थ्य आहे कीं, तिनें हें जग सहज निर्माण केलें आहे. ती आतां आणखी करीत आहे आणि पुढेंही असंख्य जगें निर्माण करील. परंतु तुला तसें वाटत नाहीं. दैविक शक्तीवांचून अशा वस्तूमध्यें जग निर्माण करण्याचें सामर्थ्य कोठून असेल असें तुला वाटतें ? दैविक शक्तीचा आश्रय केल्यावांचून तुला दुसरें कांहीं सुचत नाहीं, परंतु ह्या अमर्याद विश्वाकडे तूं जर विचारपूर्वक अवलोकन करशील तर तुला दैविक शक्तीचें कांहीं प्रयोजन पडणार

नाहीं. हें विश्व असें कांहीं प्रचंड आहे कीं, आपलें मन जर आपण या विश्वाचा प्रवास करण्याकरितां पाठविलें तर त्याला कांहीं शेवट सांपडणार नाहीं. ह्या लांब, रुंद, आणि उंच, अशा या अवाढव्य विश्वांत असंख्य परमाणु एकमेकाला भेटतात, संछन्न होतात आणि परस्परांचें अवलंबन करून राहतात आणि त्या संयोगापासून रूपांतर होऊन आकारयुक्त अशा वस्तु बनतात. या वस्तु भाता, ऐरणी आणि अग्नि, यांवांचून होऊं शकावयाच्या नाहींत असें तुझें मत आहे. तूं आमच्या शिरावर आद्यतरहित असा एक स्वामी स्थापन केला आहेस त्यास आम्ही नहेमीं रात्रंदिवस भ्यालें पाहिजे, कारण जो देव भावी काय होणार हें जाणतो आणि आपल्या आचरणावर ज्याची दृष्टी आहे त्याचें भय वाटल्यावांचून कसें राहील ? जो प्रत्येक वस्तु आपली आहे असें मानतो, तो देव फारच चमत्कारिक आणि मोठा अचाटउद्योगी ! ह्यापासून नियतीची कल्पना उत्पन्न होते आणि त्यापासून अनादि काळापासून जी कारणकार्यांची एक मालिका चालत आली आहे त्या योगानें सर्व गोष्टी घडतात असें निष्पन्न होतें. वृद्ध स्त्रिया आणि विद्याशून्य पुरुषांप्रमाणें प्रत्येक वस्तु दैवाधीन आहे असें ह्मणणाऱ्या ह्या तत्ववेत्त्यांच्या ज्ञानाला कायहो किंमत आहे ? ज्याला तूं "दैवयोग" ह्मणतोस तें जर आह्मी खरें मानलें तर मग आह्मीं अगदीं रसातळास गेलों. मग धर्मभोळेपणा स्वीकारून तुमच्या यज्ञमंडपांतील हेरांची, शकुनवक्त्यांची, आणि भविष्य कथन करणारांची आह्माला आराधना केली पाहिजे.

एपिक्यूरस यानें आह्मांस सर्व भयांपासून मुक्त केलें आहे, आणि आम्हास पूर्ण मोकळीक दिली आहे. जे सर्व प्रकारच्या त्रासापासून वेगळे आहेत, आणि दुसऱ्यास कांहीं त्रास देत नाहींत, त्या देवाचें भय बाळगण्याचें आम्हास कांहीं प्रयोजन नाहीं.

जें सर्वांहून उत्तम आणि पूर्ण आहे त्या तत्वाची आह्मी मोठ्या भक्तीनें आणि पूज्यबुद्धीनें उपासना करतों. मला असें भय वाटतें कीं, ह्या मताविषयीं माझी जी उत्कट आस्था तिनें मला फार चावट केलें आहे. तथापि हा महत्वाचा विषय पूर्ण केल्यावांचून माझ्याच्यानें उगीच रहावत नाहीं. तरी मी स्वतः बोलण्यापेक्षां दुसऱ्याचें भाषण ऐकण्याचा प्रयत्न करावा हें मला रास्त वाटतें.

२१. कोटा यानें-आपल्या नेहमींच्या सभ्य सांप्रदायास अनुसरून भाषण सुरू केलें. व्हेलियस्, तूं ज्या विषयावर भाषण केलें, तो जर महत्वाचा नसता तर मी स्तब्ध बसलों असतों. कारण नेहमीं मी माझ्या बुद्धीचे ठायीं असा धर्म पहातों कीं, कोणताही पूर्वपक्ष कां खोटा आहे हें जसें मला सहजरीतीनें कळतें तसें कांहीं तो कां खरा आहे हें कळत नाहीं. जर तूं मला असें विचारलें असतेंस कीं देवाविषयीं तुला काय वाटतें, तर कदाचित् मी त्याजवर उत्तर देखील दिलें नसतें. परंतु जर तूं मला असें विचारशील कीं, मी आतां वर्णन केलें आहे त्याप्रमाणें देवांचा आकार, स्वभाव आणि वर्तन आहे असें तुला वाटतें काय ? तर त्याचें मी लागलीच असें उत्तर देईन कीं, तुझे विचार मला अगदीं ग्राह्य नाहींत. मी पुष्कळ वेळा तुझा जिवलग मित्र लक्रचासस् याच्या मुखानें असें ऐकिलें आहे कीं, आपल्या रोमन लोकांत जे विद्वान् आहेत त्यांचें तूं शिरोभूषण आहेस, आणि ग्रीस देशांत तुझ्याशीं साम्य करावें असे एपिक्यूरिअन यांजमध्यें फार थोडे आहेत. परंतु तुझ्याविषयीं लक्रचासस् याची जी विलक्षण मान्यताबुद्धि आहे तीवरून मी अशी कल्पना करतों कीं, तुझी प्रशंसा करण्यांत तो फार सढळ मनाचा आहे. आतां जो समक्ष आहे त्याची प्रशंसा करणें मला आवडत नाहीं, तरी मला असें कबूल केलें पाहिजे कीं, गूढ आणि गुंतागुती-

त्या विषयावर त्वां आपले विचार फार सुबोध शब्दांनीं सांगितले आहेस. तुझ्या कल्पनेंत प्राचुर्य आहे इतकेंच नाहीं, पण तुझ्या वाणींत असें कांहीं माधुर्य आहे कीं तुझ्या मतांत देखील तशी गोडी नाहीं. जेव्हां मी अथेन्स येथें होतों तेव्हां फिलो याच्या उपदेशावरून मी *झीनो याचें भाषण ऐकण्यास जात असें. फिलो त्यास एपिक्यूरिअन यांजमध्यें प्रमूख मानीत असे. त्याचें भाषण ऐकण्याचा माझा उद्देश असा होता कीं, एपिक्यूरिअनमध्यें जो अतिविद्वान् आहे त्याच्या मुखानें त्या मताचीं मूलतत्वें समजलीं असतां त्या मतांचें खंडन करावें कसें याविषयीं विचार करण्यास मला सुलभ पडावें आणि त्या मताचा पक्ष घेऊन जो कोणी वादविवाद करावयास पुढें येईल त्याचा सहज पराभव करतां यावा; आणि खरोखर त्याचें भाषण कांहीं जसें तसें नव्हतें. तुझ्याप्रमाणें तें स्पष्ट, प्रौढ आणि अलंकारिक होतें. परंतु तुझें भाषण ऐकून जसें माझ्या मनाला वारंवार फार अस्वास्थ्य प्राप्त झालें तसेंच त्याच्या भाषणश्रवणापासून झालें. अशा उत्तम बुद्धीच्या मनुष्यानें फुसक्या मतांचा अंगीकार करून आपल्या बुद्धीला विटाळून घेतलें, याबद्दल मला वाईट वाटतें. तथापि मला प्रस्तुत जास्त चांगलें कांहीं सांगतां येणार नाहीं; कारण मी पूर्वीं सांगितलेंच आहे कीं अनेक विषयांत अमुक खोटें कां असें आपणास सहज शोधून काढितां येईल, परंतु अमुक खरें कां हें शोधून काढतां येणार नाहीं.

२२. जर तूं मला असें विचारतास कीं, ईश्वर ह्मणजे काय, त्याचें आचरण कसें आहे आणि त्याचा स्वभाव कसा आहे, तर मला †सिमोनिडस् याचा कित्ता वळविला पाहिजे होता. जेव्हां त्या

---

* स्टोइकमताचा प्रवर्तक झीनो हा नव्हे. हा एपिक्यूरिअन मतानुयायी होता.

† हा एक मोठा कवि होऊन गेला.

जुलमी *हियेरो यानें त्यास हेच प्रश्न विचारले, तेव्हां त्यानें विचार करण्याकरितां एक दिवसाची मुदत मागितली. दुसरे दिवशीं पुनः त्यास विचारलें, तेव्हां दोन दिवसांची मुदत मागितली. याप्रमाणें तो प्रश्नांचीं उत्तरें न देतां प्रत्येक वेळेस पहिल्यापेक्षां दुप्पट दिवसांची मुदत मागूं लागला; तेव्हां राजास मोठें नवल वाटलें, आणि असें करण्यांत अर्थ काय ह्मणून राजानें त्यास विचारलें. तो कवी म्हणाला "जसजसा मी जास्त दिवस विचार करतों तसतसा हा विषय मला अधिक दुर्बोध भासतो." सिमोनिडस हा नुसता कवीच नव्हता; दुसऱ्या अनेक शास्त्रांमध्यें तो मोठा प्रवीण व शाहणा होता अशी त्याची ख्याती होती. त्यानें देवांच्या संबंधानें आपली संशयनिवृत्ति करण्याकरितां त्याला सुचलेल्या अनेक प्रमाणांची योजना करून पाहिली; परंतु त्यास सत्य कांहीं सांपडलें नाहीं, यामुळें तो फार निराश झाला.

परंतु ह्या गहन विषयाच्या संबंधानें तुझा एपिक्यूरस् कांहीं तरी सांगतो काय? सामान्य वर्गाच्या लोकांमध्यें जें ज्ञान असतें तें देखील त्याजमध्यें नव्हतें.

देवांच्या स्वभावाविषयीं विचार करीत असतां पहिल्यानें तो असा शोध करीत आहे कीं, देव आहेत किंवा नाहींत. सर्व लोकसामान्य अशा व्याख्यान देण्याच्या जागेंत बसून नास्तिक पक्षाची बाजू घेणें घातक आहे असें मला वाटतें. परंतु अशा प्रकारच्या भाषणाच्या प्रसंगीं आणि ह्या मंडळीमध्यें ती बाजू घेणें फार सुरक्षित आहे. मी धर्माधिकारी आहें. धर्म आणि धर्मसंबंधीं विधानें

---

* हा सिऱ्याकसचा फार दुष्ट आणि लोभी राजा होता. पण सिमोनिडस इत्यादि तत्ववेत्त्यांच्या उपदेशानें तो पुढें मोठा गुणग्राही झाला.

हीं पवित्र मनानें लोकांनीं पाळावीं अशी माझी इच्छा आहे. तेव्हां देवांचें अस्तित्व मानावें हें मला फार इष्ट आहे, आणि आपल्या वादविवादांत मुख्य मुद्दा काय तो तोच आहे, तेव्हां त्याजविषयीं विचार झाला पाहिजे ; कारण त्यासंबंधानें अनेक विचार आपल्या मनांत शिरून आपल्यास अगदीं गोंधळून टाकितात आणि कधीं कधीं आपल्या मनांत असें येतें कीं, मुळीं देवच नाहींत ; परंतु तुह्मी पहाल कीं, मी किती सरळ बुद्धीनें तुमच्याबरोबर वागेन. देवांच्या अस्तित्वाविषयीं मी कांहीं वादविवाद करणार नाहीं, कारण कीं, तें मत बहुतकरून सर्व लोकांस आणि विशेषेंकरून मला आवडतें आहे ; परंतु त्याविषयीं तूं जीं कारणें दाखविलीं आहेस त्यांत चुका आहेत असें दाखविण्याविषयीं मला मोकळीक दे.

२३. तूं असें म्हटलें आहे कीं, सगळ्या राष्ट्रांतील सर्व मनुष्यें यांची देवांच्या अस्तित्वाविषयीं कबुली आहे, हें एक देव आहेत याविषयीं मोठें प्रमाण आहे. हें प्रमाण नुसतें दुर्बल नाहीं पण अगदीं खोटें आहे. कारण पहिल्यानें मी तुला असें विचारतों कीं सर्व राष्ट्रांचे अभिप्राय तुला कळले कसे ? मला असें खचित माहीत आहे कीं देवांविषयीं ज्यांच्या मनांत कांहीं देखील विचार नाहींत असे पुष्कळ रानटी लोक आहेत. ज्याला लोक नास्तिक ह्मणतात त्या *डियागोराजविषयीं व त्यानंतर ‡थिओडोरस् झाला त्याविषयीं तुला काय वाटतें ? स्पष्टपणें त्यांनीं देवांचें अस्तित्व नाकबूल केलें नाहीं काय ? प्रोट्यागोराज्विषयीं तुम्हीं आतांच सांगितलें कीं तो पराकाष्ठेचा नास्तिक होता, आणि ह्यासाठींच त्याला ग्रीक लोकांनीं आपल्या शहरांतून आणि देशांतून हांकलून

---

* ग्रीक लोकांमध्यें हा एक तत्वज्ञानी होता. पहिल्यानें तो मोठा धर्मभोळा असे, पण त्यापासूनच तो पुढें पराकाष्ठेचा नास्तिक झाला.

‡ हाही एक नास्तिकच होता.

लाविलें होतें, व त्याचे सर्व ग्रंथ लोकांसमोर जाळून टाकिले, कारण ग्रंथाच्या आरंभींच देवांच्या संबंधानें त्याचें हें वाक्य होतें:—“देव आहेत किंवा नाहींत यांपैकीं एकही गोष्ट सांगण्याला माझ्यामध्यें ताकद नाहीं.” देवांच्या अस्तित्वाविषयीं ज्याला नुसता संशय होता त्यालादेखील शासन झालें. तेव्हां पुष्कळ लोक देवांविषयीं अविश्वास मानीनातसे झाले. यास्तव तूं आपला पूर्व पक्ष सिद्ध करून दाखविण्याकरितां जें कारण सांगितलेंस तें कांहीं तूं मानतोस इतकें निर्णायक नाहीं. परंतु दुसऱ्या तत्ववेत्त्यांची आणि तुझी या विषयाचें मंडन करण्याविषयींची पद्धत एकच आहे त्यापेक्षां हल्लीं मी त्याबद्दल विशेष चर्चा करणार नाहीं. तुझे स्वतःचे विचार काय आहेत त्यांवर चर्चा करणें मला प्रशस्त वाटतें.

तूं म्हणतोस त्याप्रमाणें देव आहेत हें मी कबूल करितों; तर तूं मला आतां असें शिकीव कीं, देवांचें आदिकारण कोणतें, त्यांचें राहण्याचें ठिकाण कोणतें, त्यांचें शरीर कोणत्या प्रकारचें आहे, त्यांचें मन कसें आहे, आणि ते आपलें आयुष्य कसें घालवितात? कारण, ह्या गोष्टी मला तुजपासून शिकावयाच्या आहेत. तूं परमाणूंच्या ठिकाणीं अद्भुत शक्ति व कार्यसाधकता आहे असें मानतोस; त्यांच्यापासून सर्व वस्तु झाल्या आहेत असें सिद्ध करून दाखविण्याचा तूं बाणा बाळगतोस. परंतु मुळीं परमाणूच नाहींत; कारण, या विश्वांत शरिरावांचून रिकामी जागा मुळींच नाहीं, तस्मात् त्यांत पोकळी अथवा परमाणू असण्याचा मुळींच संभव नाहीं.

२४. सिद्धपदार्थविज्ञानवेत्त्यांच्या मतांतरून मी वरील तत्वें प्रतिपादन केलीं आहेत. आतां तीं मतें खरीं आहेत किंवा खोटीं आहेत हें जरी मला सांगतां येत नाहीं, तरी तुमच्या मतांपेक्षां त्यांचीं मतें पुष्कळ अंशीं

खऱ्यासारखीं दिसतात; कारण *डिमोक्रिट्स् आणि त्याचा गुरु †लिउसिपूस् यांचीं मतें अगदीं उपहासजनक आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, अगदीं हलके परमाणु, त्यांत कांहीं गुळगुळीत, कांहीं खरमरीत, कांहीं वाटोळे, कांहीं चतुष्कोण आणि कांहीं वक्र—यांचा दैववशात् संयोग होऊन हें जग बनलें आहे. त्याच्या उत्पत्तीस दुसऱ्या कोणत्याही दैविक शक्तीचें प्रयोजन पडलें नाहीं. व्हेलिअस्, तें मत आतां तूं आमच्या ह्या काळांत प्रतिपादन करीत आहेस, पण तशानें तुझा फार उपहास होईल; कारण त्या मताविषयीं चांगली माहिती करून घेण्यापूर्वींच तूं आपल्यास एपिक्यूरिअन म्हणवून घेऊं लागलास. तेव्हां आतां तुला त्या विवेकशून्य मताचा अंगीकार केला पाहिजे, किंवा तूं आपल्यास तत्वज्ञानी म्हणवितोस तो बाणा सोडून दिला पाहिजे. मला एपिक्यूरिअन मतांमध्यें कांहीं अर्थ दिसत नाहीं. पण त्या मतांचा तूं त्याग करावास यासाठीं तुझें मन तरी कसें वळवावें? तूं असें ह्मणतोस कीं, ह्या मतांचा त्याग करण्याविषयीं माझें मन

---

* हा एक मोठा तत्ववेत्ता होऊन गेला. ज्ञान संपादन करण्याकरितां त्यानें यूरोप, एशिया आणि आफ्रिया या तिन्ही महाद्वीपांतील बहुतेक भागांत प्रवास केला, आणि घरीं आला तेव्हां तो अतिशय दरिद्री होता. अबडेरा (एक नगर आहे) येथें असा कायदा होता कीं जो दरिद्री असेल त्यास मरणानंतर प्रेतसंबंधीं कोणताही सन्मान देऊं नये. ही अप्रतिष्ठा टाळण्याकरितां त्यानें ज्या कविता केल्या होत्या त्यांपैकीं एक, तो आपल्या देशबांधवांपुढें नेहेमीं ह्मणत असे. ती ऐकून लोक त्याजवर इतके संतुष्ट झाले कीं, त्यांनीं त्यास ५०० ट्यालेन्स दिले, त्याचे पुतळे उभारले, आणि त्याच्या प्रेतक्रियेचा खर्च राज्याच्या तिजोरींतून द्यावा असा ठराव केला. असें ह्मणतात कीं आपल्यास तत्वज्ञानाचा चांगला विचार करतां यावा ह्मणून त्यानें आपले नेत्र फोडून टाकिले होते.

† हा अबडेरा नगरांत ख्रिस्ती शकाच्या ४२८ वर्षांपूर्वीं तत्वज्ञानी होऊन गेला. ह्यानेंच पहिल्यानें परमाणु आणि पोकळी हीं जगाच्या उत्पत्तीचीं मूळ कारणें आहेत असें शोधून काढिलें.

कोणीही वळवूं शकणार नाहीं. आयुष्य सुखी करण्याचे तें खरें साधन आहे. पण त्यांत सत्य आहे काय? तुझ्या सुखाचा मी हेवा करीत नाहीं; कारण तें मला नको आहे. तूं म्हणतोस कीं, देव जर रेंगत पडून आळसांत आपला वेळ घालविणार नाहींत तर त्यांना कांहीं सुख होणार नाहीं; तर तशा सुखाची मी अपेक्षा करीत नाहीं. परंतु सत्य कोठें आहे? ह्या तुझ्या असंख्य जगांत आहे काय? ज्यांनीं दुसऱ्या कोणत्याही शक्तीचा, अथवा ज्ञानाचा आश्रय घेतल्यावांचून, हीं अत्युत्तम कामें तयार केलीं त्या तुझ्या परमाणूंत तरी आहे काय? आतां मी असेंही कबूल करितों कीं, तूं ह्मणतोस त्याप्रमाणें प्रत्येक वस्तु परमाणूंनीं केली आहे; पण तुझ्या पक्षाला त्यापासून कोणतीरे बळकटी येते? कारण आपण दैविक गुणांचा शोध करीत आहोंत. जर आपण असें मानलें कीं देवांची उत्पत्ति परमाणूंपासून झाली आहे तर ते शाश्वत असूं शकणार नाहींत, कारण त्यांस परमाणूंनीं निर्माण केलें आहे; तर त्यांस आरंभ आहे असें होतें, आणि ज्याला आरंभ आहे त्याला अंत आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. झेटोच्या विश्वरूपी ईश्वराविषयीं वाटाघाट करितांना तूं हाच दोषारोप केला आहेस. मग तुझ्या देवांचें सौंदर्य आणि अजरामरत्व कसें सिद्ध होतें? जी गोष्ट खरी करून दाखविण्याकरितां तूं प्रयत्न करितोस त्यापासून-उलटें तुझ्याच गळ्यांत धोंगडें येतें.

२९. हा तुमचा नेहेमींचा सांप्रदाय आहे कीं, जेथें सत्याचा प्रतिभास देखील नाहीं असा कांहीं पूर्वपक्ष सिद्ध करून दाखविण्याचा असला आणि त्याजवरील दोष टाळावयाचे असले ह्मणजे तुह्मी निखालस असंभवनीय असें कांहीं तरी सांगत असतां. तुह्माला असें वाटतें कीं, जी गोष्ट संशयित आहे तीविषयीं, आपला प्रतिपक्षी प्रतिवाद करण्याच्या भरीस न पडतां आपण जें सांगतों तें मान्य करील. पण

असें करून एखादा पूर्वपक्ष सिद्ध करण्याच्या खटपटीस पडण्यापेक्षां आपल्याच्यानें तो पूर्वपक्ष सिद्ध करून देतां येत नाहीं, असें कबूल करण्याची तुला कां लाज वाटते? लहानशी थप्पड टाळण्याचा प्रयत्न करून मोठा मार खाण्यांत काय प्रतिष्ठा आहे? दैविक गुणांविषयीं सांगत असतां एपिक्यूरस याची अशीच स्थिति झाली आहे. इतर प्राण्यांच्या शरीराचे मुख्य धर्म देवांच्या शरीरास लागू होतील या भयानें देवांला शरीर आहे असें तो कबूल करीत नाहीं; परंतु त्यांस शरिरासारखें कांहीं आहे असें तो ह्मणतो.

२६. एक शकुन्या जोशी जेव्हां दुसऱ्या शकुन्या जोशास पाहतो तेव्हां त्यास हंसूं आल्यावांचून कसें राहील? पण हा एक विशेष चमत्कार आहे कीं, तुह्मीं आपल्यांत एकमेकांस हंसत नाहीं. शरीर नाहीं पण शरिरासारखें कांहीं आहे! मेणाच्या किंवा चिखलाच्या पुतळ्याला जर तसें ह्मटलें तर त्याचा अर्थ मला समजला असता; परंतु देवांच्या संबंधानें शरिरासारखें व रक्तासारखें ह्मणण्यांत तुमचा काय आशय आहे हें कांहीं मला कळत नाहीं. व्हेलियस्, तूं कांहीं कबूल करणार नाहींस, परंतु माझी खचित खातरजमा आहे कीं, तुला देखील त्याचा अर्थ कांहीं समजला नाहीं. एपिक्यूरस उगीच कांहीं तरी बरळला आहे हें उघड आहे; कारण त्यानें आपल्या लेखांत मोठ्या गर्वानें असें लिहून ठेविलें आहे कीं, आपणास कोणी गुरु नव्हता. त्यानें असें जरी लिहून ठेविलें नसतें तरी देखील ही गोष्ट मी सहज खरी मानली असती. एखाद्या वाईट इमारत बांधणाऱ्या मिस्तरीनें गर्वानें असें ह्मटलें कीं, मला कोणी गुरु नव्हता, मीच माझा गुरु; तर ती गोष्ट खरी आहे याविषयीं त्यानें बांधलेली इमारत त्याबद्दलचा पुरावा आहे. खरोखर, तुमच्या मतांत पोरकटपणाशिवाय दुसरें कांहीं नाहीं.

तर आतां "शरिरासारखें व रक्तासारखें" याचा अर्थ तुला समजला काय ? बुझा हेवा केल्यावांचून मी असें कबूल करितों कीं, तूं मजपेक्षां फार बुद्धिवान् आहेस. परंतु जर बोध होईल अशा शब्दांनीं कोणतीही गोष्ट सांगितली तर तुला समजेल आणि मला समजणार नाहीं असें त्यांत काय आहेरे ? शरीर म्हणजे काय आणि रक्त ह्मणजे काय हें मला कळतें, परंतु "रक्तासारखें आणि शरिरासारखें" याचा अर्थ काय हें मला कळत नाहीं. तुमचीं मूळतत्वें मला समजूं नयेत यासाठीं तूं बुद्धिपुरःसर कांहीं मजपासून लपवून ठेवीत नाहींस. खरी गोष्ट हीच कीं, तुला स्वतःला त्यांचा अर्थ काय आहे हें समजत नाहीं.

२७. आतां मी असें कबूल करितों कीं, तूं जें सांगतोस तें ध्यानांत भरण्यास कठिण आहे, तर मग सांग कीं देवांचीं रूपें आणि आकृति कशा आहेत ? मनुष्यांसारखी देवांची आकृति आहे असें सांगण्यास तुजपाशीं पुष्कळ प्रमाणें आहेत. पहिलें प्रमाण हें आहे कीं, आपल्या मनाला अशी सवयच पडून गेलेली आहे कीं, जेव्हां आपण देवांविषयीं विचार करितों, तेव्हां आपल्यापुढें मनुष्याची आकृति येऊन उभी रहाते. दुसरें प्रमाण हें कीं, दैविक गुण इतर वस्तुगुणांपेक्षां उत्तम आहेत; तेव्हां त्या देवता इतर वस्तूंपेक्षां अतिशय सुंदर असल्या पाहिजेत; आणि जगांत मनुष्यापेक्षां सुंदर अशी दुसरी आकृति नाहीं; आणि तिसरें कारण हें कीं, बुद्धि ही कांहीं मनुष्यावांचून इतर प्राण्यांस प्राप्त झाली नाहीं.

आतां आपण तुझ्या प्रत्येक प्रमाणाचा निरनिराळा विचार करूं. जेथें कांहीं संभवनीयता नाहीं, तेथें तूं भलतीच गोष्ट स्वीकारून तिजविषयीं वादविवाद करीत बसतोस. असा कोण मूर्ख आहे कीं,

ह्या विषयाचा विचार करतांना त्यास असें समजणार नाहीं कीं, मनुष्यासारखी देवांची आकृति आहे ही; कोणी तरी शहाण्या मनुष्यानें अज्ञानी मनुष्यांचीं मनें देवांच्या भक्तीकडे वळविण्यासाठीं एक युक्ति योजिली आहे; आणि त्यापासून फळही तसेंच झालें आहे. मनुष्याकृति देवांच्या मूर्तींची जेव्हां भोळे लोक पूजा करितात, तेव्हां त्यांस असें वाटतें कीं, आम्ही खऱ्या देवांजवळ जाऊन पूजा करीत आहोंत. कवि, चितारी आणि शिल्पकार यांनीं या भावना लोकांच्या मनांत विशेष दृढ केल्या. त्यांस दुसऱ्या प्रकारच्या आकृतींत सहज रीतीनें देवांचें इतकें सुंदर प्रदर्शन करितां आलें नसतें, आणि मनुष्यांस आपल्या सौंदर्याचा अभिमान आहे त्यापासून देखील कदाचित् ह्या कल्पनेचा उद्भव झाला असावा असें मला वाटतें.

पण आपली स्वतःची आकृति अति सुंदर आहे असें ज्यास वाटत नाहीं असा जलचरांत अथवा स्थलचरांत कोणी तरी प्राणी आहे असें तुला वाटतें काय? प्रत्येक प्राण्यास आपली आकृति सुंदर नाहीं असें वाटतें तर, बैल घोडीविषयीं आणि घोडा गायीविषयीं कामातुर झाला नसता काय? हंस, सिंह अथवा मासा यांस आपल्या आकृतीपेक्षां दुसऱ्याची आकृति आवडते असें तुला वाटतें काय? आपल्यापेक्षां दुसरें कोणी सुंदर नाहीं असें मनुष्याला वाटणें हें जर स्वाभाविक आहे तर देवांची आकृति मनुष्याच्या आकृतीसारखी आहे अशी आपण कल्पना करितों त्यांत काय नवल आहे? जर पशूला बुद्धि असती तर प्रत्येक प्राण्यानें देवांची आकृति आपल्यासारखी आहे असें म्हटलें नसतें असें तुझ्या मनांत येतें काय?

२९. मी आतां तुला असें विचारतों कीं, देवांमध्यें कोणी तिरळे आहेत काय? किंवा कोणाच्या डोळ्यांत वडस वाढला आहे काय?

आपल्यामध्यें कांहीं चपट्या नाकाचे आहेत, कोणाचें तोंड वांकडें झालें आहे, कोणाचे दांत बाहेर आले आहेत, कोणाच्या कानांची वळकुटी झाली आहे, कोणी पांगळे आहेत, कोणी कुबडे आहेत; त्याप्रमाणें देवांतही कोणी आहेत काय? किंवा ते अगदीं अव्यंग आहेत? ते अगदीं अव्यंग आहेत असें तुझ्या मर्जीखातर मी कबूल करितों, पण त्या सर्वांचे तोंडवळे एकसारखे आहेत काय? कारण कीं, जर ते पुष्कळ आहेत, तर एकाहून दुसरा जास्त सुरूप असावा हें स्वाभाविक आहे. तर मग अत्यंत सुरूप नाहींत असेही कांहीं देव असले पाहिजेत. जर सर्वांचे तोंडवळे सारखे आहेत, एक देव दुसऱ्याहून भिन्न नाहीं, तर हा अमुक असें ओळखतां येणार नाहीं.

३०. व्हेलियस्, तुझा पूर्वपक्ष अगदीं खोटा आहे. देवांविषयीं आपण विचार करीत असतां, मनुष्याखेरीज त्यांस दुसरी कोणती आकृति द्यावी हें आपल्यास सुचत नाहीं हीच गोष्ट खरी. वस्तुतः देव मनुष्याकृतीचे आहेत याविषयीं काय प्रमाण आहे? कांहीं एक नाहीं. तर असें असूनही तूं आपला पूर्वपक्ष खरा आहे असाच दुराग्रह धरून बसणार काय? ज्या मनुष्याचा (एपिक्यूरसचा) आपण तिरस्कार करावा, त्या मनुष्याच्या मताला अनुसरण्यापेक्षां जी गोष्ट आपल्यास कळत नाहीं, ती गोष्ट कळत नाहीं असें ह्मणणें भूषणास्पद नव्हे काय? तुला असें वाटतें काय कीं, देव तुझ्यासारखे किंवा माझ्यासारखे आहेत? आपल्यापैकीं कोणासारखे तरी देव आहेत असें तुला वाटत नाहीं, तर मग काय करावें बरें? सूर्य, चंद्र अथवा आकाश यांस मी देव असें ह्मणावें काय? त्यांस जर देव ह्मटलें तर ते सुखी आहेत असें मानिलें पाहिजे. पण त्यांस कोणतें सुख आहे कीं त्यावरून ते सुखी आहेत असें मानावें? ते शहाणे आहेत असेंही मानिलें पाहिजे. परंतु अशा प्रकारच्या आकृतित शहाणपण

कसें राहूं शकेल ? हीं तुझींच मूळतत्वें आहेत, तस्मात् मीं सिद्ध करून दिलें आहे त्याप्रमाणें देव जर मनुष्याच्या आकृतीचे नाहींत, आणि ते दुसऱ्या कोणत्या आकृतीचे आहेत हें जर तूं प्रतिपादन करूं शकत नाहींस, तर मुळींच देव नाहींत असें म्हणण्यास तूं कां बरें मागें पुढें घेतोस ? देव नाहींत असें ह्मणण्यांत देवांवांचून येथें दुसऱ्या कोणाचें तुला भय नाहीं, तरी, तुझ्याच्यानें देवांचें अस्तित्व नाकबूल करवत नाहीं; यांत तूं दूरवर दृष्टीनें पाहतोस. अथेन्स येथील नगरवासी लोकांचे कायदे मोडिले असतां त्यांस राग येईल ह्मणून, एपिक्यूरसनें देवांचें अस्तित्व नाहीं अशी त्याच्या मनाची खात्री असतांनाही, शब्दांनीं मात्र, देव आहेत म्हणून ह्मटलें आहे, यामुळें एपिक्यूरसमतानुयायी, देवांची कशी कां मूर्ति असेना तीस, भजतात.

३१. जर (मी आतां एपिक्यूरस् याला उद्देशून बोलत आहें) तुह्मीं देवांचें अस्तित्व नाकबूल करूं शकत नाहीं, तर तुह्मीं सूर्य, जग किंवा अविनाशी मन यांच्या ठायीं दैविक गुण आहेत असें ह्मणण्यास तुम्हांला कोणही अडथळा करीत आहे ? तो (एपिक्यूरस्) असें ह्मणतो कीं, मनुष्याच्या आकृतीखेरीज दुसऱ्या कोणत्याही आकृतींत शहाणपण आणि विचारशील आत्मा कोणी पाहिला आहे काय ? तर मी त्याला असें विचारतों कीं, चंद्र, सूर्य अथवा ते पांच ग्रह यांसारखे त्यानें दुसरे पदार्थ पाहिले आहेत काय ? सूर्य राशिचक्राभोंवतीं फिरून आपला प्रवास एका वर्षांत पुरा करितो. चंद्र सूर्यापासून तेज ग्रहण करून तितकाच प्रवास एका महिन्यांत पुरा करीत आहे. त्याचप्रमाणें दुसरे पांच ग्रह—त्यांत कांहीं पृथ्वीच्या समीप आहेत, कांहीं फार दूर अंतरावर आहेत, तेही निरनिराळ्या कालप्रमाणानें आपली सफर पुरी करीत

आहेत. एपिक्यूरस्, तूं चंद्र, सूर्य इत्यादिकांप्रमाणें, दुसरी एखादी वस्तु पाहिली आहेस काय ? तुझ्या मतांप्रमाणें ज्या वस्तूंला आपण स्पर्श करूं शकतों, किंवा अवलोकन करूं शकतों, त्यांखेरीज दुसऱ्या वस्तूंचें अस्तित्वच संभवत नाहीं. त्या मताप्रमाणें चंद्र, सूर्य आणि तारे यांचें अस्तित्व मुळींच संभवत नाहीं* तर मग तूं स्वतः कधीं तरी देवता पाहिली आहेस काय ? मग देव आहेत असें तूं कां मानतोस ? तुझ्या मताचा अंगीकार केला ह्मणजे, इतिहासदृष्टच्या ज्या वस्तूंचें अस्तित्व आहे, त्या सर्व नाकारल्या पाहिजेत; किंवा तर्कानें ज्यांचें आपण अस्तित्व मानतों त्याही नाकारल्या पाहिजेत. समुद्रापासून जे दूर मध्यदेशांत राहतात, त्यांनीं समुद्र म्हणून कांहीं वस्तु आहे असें मानतां कामानये. ही विचारसरणी कांहीं प्रशस्त नाहीं. अशी आपण कल्पना करूं कीं, तूं एका बेटांत जन्मला आहेस, आणि त्यांतून बाहेर कधीं गेला नाहींस, तर त्या बेटांतील ससे, व कोल्हीं मात्र तुझ्या पाहण्यांत आहेत, तर त्यांहून भिन्न जातीचे सिंह, व्याघ्र इत्यादि प्राणी साऱ्या जगांत नाहींत असें तूं मानावेंस यासारखे विवेकशून्य विचार ते कोणते बरें ? जर तुला हत्तीची आकृति अमुक प्रकारची आहे असें कोणी सांगितलें, तर तूं तो आपली थट्टा करीत आहे असें मानणार !

३२. व्हेलियस्, तूं आपला पूर्वपक्ष सिद्ध करण्याकरितां, तुझी जी नेहमींची सरणी आहे ती टाकून, नैय्यायिकांची सरणी घेतली आहेस; पण त्या शास्त्राविषयीं तुझे मतानुयायी तर अगदीं अनभिज्ञ आहेत. तूं असें गृहीत केलें आहेस कीं, देव फार सुखी आहेत. मी तें

* एपिक्यूरस याच्या मताप्रमाणें चंद्र, सूर्य आणि तारे-हे कांहीं आपल्यास स्पष्ट दृष्टिगोचर होत नाहींत.

कबूल करितों. तूं असें ह्मणतोस कीं, सद्गुणावांचून कोणी सुखी असूं शकणार नाहीं. या गोष्टींत देखील मी मोठ्या संतोषानें तुझ्याशीं एकमत होतों. तूं आणखी असें ह्मणतोस कीं, जेथें बुद्धि नाहीं तेथें कांहीं सद्गुण असूं शकणार नाहीं; ही गोष्टही मला अवश्य मान्य केली पाहिजे. तूं आणखीं ह्मणतोस कीं, मनुष्याच्या आकृतीखेरीज कोठेंही बुद्धीचा निवास नाहीं; पण ही गोष्ट कोण बरें कबूल करील? जर ही गोष्ट खरी असती तर तुला अशा क्रमानें उतरत उतरत येण्याचें कायरे प्रयोजन होतें? आणि कोणता उद्देश होता? तूं आपल्या मनगटाच्या जोरानेंच ती गोष्ट उपपादन केली असतीस. सद्गुणावांचून सुख नाहीं, आणि बुद्धीवांचून सद्गुण नाहीं, हा तुझा कोटिक्रम सरळ आणि क्रमयुक्त आहे; परंतु बुद्धीपासून तूं लागलीच मनुष्याच्या आकृतीवर कसा येऊन उतरलास? येथें तूं कांहीं क्रमानें उतरला नाहींस, एकाएकीं घसरून खालीं आलास.

एपिक्यूरस मनुष्यांसारखे देव आहेत असें ह्मणतो, पण देवांसारखीं मनुष्यें आहेत असें कांहीं म्हणत नाहीं. ह्याचें कारण काय तें मला समजत नाहीं. तूं मला असें विचारशील कीं देवांसारखीं मनुष्यें आहेत किंवा मनुष्यांसारखे देव आहेत, असें म्हणण्यांत भेद तो कोणता आहे? मी कबूल करतों कीं, त्यांत कांहीं भेद नाहीं. परंतु मी हें प्रतिज्ञापूर्वक सांगतों कीं, देवांनीं कांहीं मनुष्यांच्या आकृतीचें ग्रहण केलें नाहीं; कारण कीं, देव हे अनादिकालापासून आहेत, त्यांस कांहीं आरंभ नाहीं. म्हणून ज्या आकृतींत देव आहेत, ती आकृतीही मनुष्याच्या उत्पत्तिकालापूर्वींच अस्तित्वांत असली पाहिजे; तस्मात् देव मनुष्यांच्या आकृतीचे आहेत असें कांहीं म्हणतां येणार नाहीं, पण आपली आकृति देवांसारखी आहे असें म्हणतां येईल. असो. तूं म्हणतोस तसें कां असेना. मी आतां देवांची

आकृती मनुष्यांस कशी प्राप्त झाली याचा शोध करीत आहें; कारण, हें मनुष्यांचें विलक्षण सुदैव आहे. जग निर्माण करण्यांत बुद्धीचा कांहीं उपयोग आहे, असें तूं कांहीं कबूल करीत नाहींस. तर मग ह्या विलक्षण सुदैवाचा आरंभ कोठून झाला? परमाणूंचा असा प्राप्तेष्ट संयोग कसा झाला कीं त्यापासून अकस्मात् देवांप्रमाणें मनुष्यांची आकृती बनली? तुला असें वाटतें काय कीं, देवांचें बीज आकाशांतून पृथ्वीवर पडून त्यापासून आकाशस्थ देवांप्रमाणें मनुष्यांची आकृती झाली? मला अशी इच्छा आहे कीं ही गोष्ट तूं उपपादन करून द्यावीस; कारण देवांशीं आपला संबंध आहे हें कबूल करण्यास मी नाराजी नाहीं; परंतु तूं तसें कांहीं म्हणत नाहींस. मला असें दिसतें कीं, देवांशीं आपलें सादृश्य हें कांहीं यदृच्छेंकरून प्राप्त झालेलें नाहीं. आतां मला हें मत खंडन करण्याविषयीं योग्य प्रमाणांचा शोध करावयास नलगे काय? जें खोटें आहे तें खोटें आहे असें सिद्ध करून देण्याचें जसें मला ज्ञान आहे तसें सत्य शोधून काढण्याचें पूर्ण ज्ञान मला असावें अशी माझी इच्छा आहे.

३३. तुझी स्मरणशक्ति तरी किती ताजी आहे! दैविक गुणाविषयीं तूं कित्येक तत्ववेत्त्यांचीं मतें विस्तारपूर्वक सांगितलीं आहेस. तुझी विद्वत्ता पाहून मला फार आनंद वाटतो; पण हातपायांवांचून देवतांचें अस्तित्व शक्य आहे, असें ज्यांस वाटलें ते सर्व वेडे होते असें तुला वाटतें काय? मनुष्यांला जे अवयव आहेत त्यांचा किती उपयोग आहे हें तूं पहातोस. त्या अवयवांत एक देखील निरर्थक नाहीं. देवांची आकृति मनुष्यासारखी आहे, परंतु त्यांस अवयवाचें प्रयोजन पडत नाहीं, असें तुझें मत आहे; तर, जर चालावयाचें नाहीं तर पायांचा, कांहीं धरावयाचें नाहीं तर हातांचा, कायरे उपयोग आहे?

त्याचप्रमाणें इतर अवयवांविषयीं देखील तुला विचारतां येईल. त्या अवयवांत व्यर्थ, निरुपयोगी आणि अतिरिक्त असा एकही अवयव नाहीं ; ह्मणून आपल्यास अशी कल्पना केली पाहिजे कीं, सृष्टिकर्त्याच्या चातुर्याची कोणीही बरोबरी करूं शकणार नाहीं. देवतेला जिव्हा असून ती कांहीं बोलत नाहीं ; दांत, टाळू आणि जबडा असून त्यांचा तिला कांहीं उपयोग नाहीं. विश्वकर्त्यानें देवांस जननेंद्रियें दिलीं आहेत त्यांचा देखील त्यांस कांहीं उपयोग नाहीं. बाह्येंद्रियांचा जर कांहीं उपयोग नाहीं, तर अंतर्गत अवयव देखील कमी अतिरिक्त नाहींत असें होईल. काळीज, फुप्फुस आणि पित्ताशय व दुसरें अवयव यांचा जर कांहीं उपयोगच नाहीं, तर त्यांच्या सुरेखपणांत तरी अर्थ काय आहे? ह्या अवयवांच्या संबंधानें मी चर्चा केली त्याचें कारण हें कीं, मनुष्याकृतीच्या सौंदर्यामुळें तूं त्या अवयवांचा आरोप देवांच्या ठायीं केला आहेस.

३४. तुझ्या मतानुयायी लोकांनीं अन्य मतांच्या तत्ववेत्त्यांवर अपशब्दांचा भडिमार केला आहे. झीनो यानें, तत्वज्ञान्यांचा पिता जो सॉक्रेटिस त्यास खुपमस्कऱ्या देखील ह्मटलें. तूं स्वतः देखील तत्ववेत्त्यांची गणना केलीस तेव्हां, त्यांस तूं मूर्ख आणि नष्टबुद्धि असें म्हणण्यास मागेंपुढें पाहिलें नाहींस. दैविक गुणांच्या संबंधानें विचार करण्यांत जर ते चुकले असें ह्मणतोस, तर देव ह्मणून कोणी प्राणीच नाहींत असें तूं समज. दैविक गुणाच्या संबंधानें तूं जें कांहीं सांगितलें आहेस, ते सर्व छांदस वृत्तीचे विचार आहेत. एखाद्या थेरड्या बाईलाही ते चिंतनार्ह नाहींत. मनुष्य आणि देव यांची एकच आकृति आहे असें जर आमच्या मनांत भरवून देण्याचा तूं प्रयत्न करीत आहेस; तर तूं आपल्या डोक्यावर केवढी मोठी जबाबदारी ओढून घेतली आहेस याचें तुला किंचितही ज्ञान नाहीं, असें

मला ह्मटलें पाहिजे. मनुष्याच्या आकृतिसारखे जर देव आहेत तर त्यांनीं मनुष्यासारखा पोषाख केला पाहिजे ; कारण त्यांस जननेंद्रियें देखील आहेत, तेव्हां तीं उघडीं कशीं टाकतां येतील? सारांश, मनुष्य आपल्या शरिराविषयीं जितकी काळजी बाळगितो, तितकी देवानें आपल्या शरिराविषयीं बाळगिली पाहिजे. त्यांनीं चाललें पाहिजे, धांवलें पाहिजे, पडलें पाहिजे, झुकलें पाहिजे, बसलें पाहिजे, धरलें पाहिजे आणि बोललें पाहिजे. देवांच्या स्त्री आणि पुरुष अशा दोन जातीं कल्पिल्यानें काय परिणाम होतो, हें तुला स्पष्ट करून सांगण्याची कांहीं गरज नाहीं. तूं स्वतः समंजस आहेस तेव्हां त्याविषयींचे विचार तुझ्या मनांत सहज येतील.

तुमच्या गुरूनें अशा विलक्षण मतांचा कसा अंगीकार केला असेल तो असो. मला त्याबद्दल जितकें आश्चर्य केलें पाहिजे, तितकें देखील करतां येत नाहीं; पण तूं तर नेहमीं देव अमर्त्य आणि सुखी आहेत, या मताच्या खरेपणाविषयीं आग्रह धरून बसला आहेस. मी कबूल करतों कीं देव तसे आहेत; पण जर त्यांस दोन पाय नसते तर त्यांच्या सौख्यांत कांहीं कमीपणा आला असता काय? मनुष्यासारखी आकृति नाहीं, व अवयव नाहींत ह्मणून सूर्य, चंद्र अथवा तारे, हें विश्व, अथवा हें शाश्वत मन, यांच्या ठायीं सौख्य आणि अमर्त्यत्व असूं शकणार नाहीं काय? याविरुद्ध तुझें काय तें एवढेंच ह्मणणें आहे कीं, "सूर्य अथवा जग यांचे ठायीं मीं सौख्य पाहिलें नाहीं." या जगाशिवाय तूं दुसरें एखादें विश्व पाहिलें आहेस काय? मी पाहिलें नाहीं असेंच ह्मणशील; तर मग जगांची संख्या सहा लक्षच नाहीं, अनंत जगें आहेत असें तूं प्रतिज्ञापूर्वक कशावरून सांगतोस? आपण उत्तम व गुणयुक्त वस्तूंचा शोध करीत असतां आपणांस देवावांचून कोणी सुखी आणि अजरामर

सांपडत नाहीं ; तेव्हां आपल्या मनापेक्षां देवांचें मन उत्तम आहे. आणि जसें त्यांचें मन उत्तम आहे तसें त्यांचे देहही उत्तम आहेत असें तुला वाटत नाहीं काय ? जर आपण सर्व गोष्टींत उणे आहोंत, तर आकृतींत देवांचें साम्य आपणांस कसें प्राप्त होईल ? सदाचाराच्या संबंधानें मनुष्यें देवांच्या जवळ जवळ आहेत, पण आकृतीच्या संबंधानें नाहींत.

३९. आतां आपण प्रकृतविषयाकडे वळूं. तांबड्या समुद्रांत किंवा हिंदुस्थानांत जसे प्राणी जन्मतात, तसे दुसरे कोठेंही जन्मत नाहींत असें प्रतिज्ञापूर्वक सांगणें, यासारखा पोरकटपणा तो कोणता ? जे प्राणी पृथ्वी, सागर आणि नद्या यांजमध्यें जन्मतात त्या सर्वांचें ज्ञान होणें कांहीं शक्य नाहीं;-मग तो शोधक किती कां जिज्ञासू असेना —म्हणून काय, जी वस्तु आपण पाहिली नाहीं, तिचें अस्तित्व आपल्याच्यानें नाकबूल करवेल काय ? सादृश्यावर तुझी फार आवड आहे, परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. कुत्रा हा लांडग्यासारखा आणि कांहीं अंशांनीं माकड मनुष्यासारखें नाहीं काय ? तथापि त्यांच्या स्वभावांत अंतर आहे. हत्तीसारखें शहाणपण दुसऱ्या कोणत्याही पशूंत नाहीं ; तथापि त्याच्यासारखा प्रचंड शरिराचा दुसरा प्राणी तुला आढळेल काय ? मी येथें पशूंविषयीं बोलत आहें. सदृश असून आचरणामध्यें न्यूनाधिक भाव, व असदृश असून आचरणामध्यें सारखेपणा मनुष्यांत तुला आढळून येत नाहींत काय ? व्हेलियस, अशा प्रकारच्या उपपत्तींचा जगांत प्रसार झाला असतां त्यापासून काय परिणाम होईल याचा विचार कर. तूं असा सिद्धांत करून टाकिला आहेस कीं, मनुष्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही प्राण्यास बुद्धि नाहीं ; म्हणजे, बुद्धि हें ज्ञानेंद्रिय मनुष्यप्राण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही प्राण्यास नाहीं. दुसरा

कोणी प्रतिज्ञापूर्वक असें म्हणेल कीं, बुद्धि ही आकाशस्थ प्राण्यांखेरीज दुसऱ्या कोणत्याही प्राण्याच्या ठायीं नाहीं ; कोणी असें म्हणेल कीं, जे जन्मतात, वाढतात, आणि ज्यांस शिक्षण देतां येतें,—ज्यांस आत्मा आहे, ज्यांचीं शरीरें अशक्त असून, जे नाशवंत प्राणी आहेत, त्यांस मात्र बुद्धि आहे. सारांश, नाशवंत प्राण्याखेरीज कोणत्याही प्राण्यास बुद्धि नाहीं. परंतु जर हीं मतें तुला ग्राह्य नाहींत, तर मग नुसत्या मनुष्याच्या आकृतीनेंच तुझें मन इतकें घोंटाळ्यांत कां पडलें ?

उगीच वाग्व्यय करावा ही कांहीं वाद करण्याची रीत नाहीं, एक साहस मात्र आहे. कारण, अतिरिक्त आणि निरुपयोगी वस्तु केवळ मनुष्यासच नाहीं, परंतु वृक्षास देखील किती भारास्पद होते याचा तूं कांहीं विचार केला नाहींस. जास्त बोटें असणें हें कितीहो त्रासदायक आहे ! तसें कां बरें ? कारण, शोभेसाठीं किंवा उपयोगासाठीं, पांच बोटांहून जास्त बोटांचें प्रयोजनच नाहीं; परंतु तुझ्या देवतांना हवीं त्यापेक्षां जास्त बोटेंच नाहींत, तर डोकें, गळा, खांदा, कुशी, उदर, हात, पाय, मांड्या हे अवयव देखील जास्त आहेत. अमर्त्यांला ह्या अवयवांचें प्रयोजन काय ? देवांच्या अस्तित्वाला त्यांचा कांहीं उपयोग आहे काय ? तोंडाचा काय उपयोग आहे ? कदाचित् मस्तिष्क, रक्ताशय, आणि यकृत् यांचा कांहीं उपयोग आहे असें कोणी म्हणेल; कारण कीं, तीं इंद्रियें प्राणरक्षणास साधनीभूत आहेत; पण प्राणरक्षणाच्या कामीं तोंडाचा तर कांहींच उपयोग नाहीं.

३६. हें विश्व आणि त्यांतील आकाश, पृथ्वी आणि समुद्र इत्यादि, हा अत्युत्तम आणि विस्मयजनक कार्यवर्ग पाहून, सूर्य, चंद्र, आणि तारांगण यांजविषयीं विचार करून, व ऋतूंचे फेरफार आणि रहा-

टगाडग्याप्रमाणें काळाची पुनरावृत्ति लक्षांत घेऊन, ज्यांनीं असें अनुमान केलें आहे कीं, ह्या विश्वांत एक अत्युत्तम तत्व आहे; त्यानें प्रथमारंभीं हा कार्यवर्ग निर्माण करून त्याला प्राणविशिष्ट केलें आहे, आणि ह्या विश्वांतील सर्व घडामोडी त्या तत्वाच्या सत्तेनें होत आहेत, त्यांचा तूं उपहास केला आहेस.

आपण अशी कल्पना करूं कीं, ते अनुमान करण्यांत चुकले आहेत; तथापि, त्यांचें धोरण काय आहे तें मला कळतें. परंतु ह्या प्रचंड आणि उत्कृष्ट कार्याविषयीं तुला काय वाटतें? ईश्वरी सत्तेचा हा परिणाम आहे किंवा दुसरें कांहीं आहे? आणि देव आहेत हा सिद्धांत तूं कोणत्या प्रमाणांवरून केला आहेस? तूं असें ह्मणतोस कीं "देवतेच्या संबंधानें मला जी माहिती आहे तिचें प्रमाण काय तें माझें मन आहे." मला वाटतें त्यामुळें बृहस्पतीला दाढी आहे, आणि *मिनरवा देवता टोप घालीत असते असें तुझ्या मनांत भरलें आहे.

परंतु बृहस्पतीला दाढी आहे आणि मिनरवा देवता टोप घालीत असते याला प्रमाण तरी तुझें मनच, पण तें तुला खरें वाटतें काय? अगदीं अडाणी तेलीतांबोळी यांचे विचार किती चांगले आहेत! आपल्याप्रमाणें देवांस अवयव आहेत इतकेंच ते मानीत नाहींत, तर त्या अवयवांचा देव उपयोग करितात, असें ते मानतात; आणि ह्मणूनच, धनुष्य, बाण, आणि भाले इत्यादि शस्त्रांनीं युक्त देवांच्या मूर्ति त्यांनीं मंदिरांत स्थापन केल्या आहेत. देवांनीं केलेलीं कृत्यें त्यांच्या पाहण्यांत आलीं नाहींत, तरी देव कांहीं करीतच नाहींत असें कांहीं ते मानीत नाहींत. मिसर देशांतील लोक, ज्या पशूंपासून त्यांस विशेष

---

* ग्रीक लोकांनीं मानलेली एक देवता आहे. बृहस्पतीच्या मस्तीष्कापासून तिची उत्पत्ति झाली अशी दंतकथा आहे. ती संग्रामदेवता आहे असें ग्रीक लोक मानीत असत.

उपयोग होत नाहीं, त्यांस कांहीं ते देव मानीत नाहींत. अयबिस (Ibis) ह्मणून एक मोठा जबर पक्षी आहे, त्याचे पाय फार बळकट असून त्याची चोंच फार लांब आणि तीक्ष्ण आहे. तो सर्पांचा मोठा वैरी आहे. लिबियसच्या अरण्यांतून नैऋत्य दिशेच्या वाऱ्याबरोबर, ज्यांना पंख आहेत, असे सर्प मिसर देशांत येतात; त्यांचा ते पक्षी नाश करतात. त्या योगानें संसर्गजन्य रोगाची मिसर देशांत उत्पत्ति होत नाहीं; म्हणून मिसर देशांतील लोक त्या पक्ष्यांस देव मानितात. मी आणखी अनेक उदाहरणें सांगूं शकेन; परंतु माझ्या भाषणाचा दुसऱ्यास कंटाळा यावा असें मी इच्छित नाहीं. मला येथें इतकेंच सांगावयाचें आहे कीं, अडाणी लोक, ज्यांचा कांहीं आपल्यास उपयोग आहे, अशा पशूंस तरी देव मानतात; आणि तूं जे देव मानिले आहेस, त्यांचा तर आपल्यास कांहीं देखील उपयोग नाहीं. कारण कीं, ते आळशी असून कांहीं देखील करीत नाहींत. एखाद्या आळशी पोरापेक्षां देखील तुझे देव वाईट. तें आळशी पोर सणाच्या दिवसांत कांहीं तरी व्यायाम होईल असे खेळ खेळेल; परंतु तुझ्या मताप्रमाणें देवांनीं किंचित् हालचाल केली कीं, त्यांच्या सुखाचा लोप झालाच. ह्या मतानें देवांला अगदीं पांगळे करून ठेविलें आहे; आणि दुसरें, त्यापासून लोकांस आळशी होण्यास उत्तेजन मिळतें, कारण तुझें मत त्यांस असें शिकवितें कीं, किंचित् श्रम हे देवांच्याही सुखास घातक आहेत, मग मनुष्यांच्या सुखास घातक असतील यांत नवल काय?

२७. तुझ्या मताप्रमाणें देव मनुष्यांच्या आकृतीचे आहेत असें कां होईना; पण त्यांचें राहण्याचें ठिकाण कोणतें? आपल्यास सांपडेल अशी त्यांची राहण्याची जागा कोणती? ते आपला आयुष्यक्रम

कसा घालवितात ? आणि ते सुखांचा अनुभव घेतात तर तीं सुखें कोणत्या प्रकारचीं ? कारण जे प्राणी सुखी आहेत, त्यांनीं जें कांहीं आपलें आहे, त्याचा उपयोग केला पाहिजे व उपभोग घेतला पाहिजे. आतां जागेच्या संबंधानें ह्मटलें ह्मणजे अचेतन पदार्थांस देखील योग्य स्थलें मिळालीं आहेत, त्यांत पृथ्वी अगदीं खालीं आहे, तिच्यावर उदक आहे, उदकावर वायु आहे, आणि सर्वांहून उंच जागा अग्नीस मिळाली आहे. कांहीं प्राणी पृथ्वीवर राहतात, कांहीं जळांत राहतात, आणि कांहीं उभयचरही आहेत. कांहीं प्राणी तर अग्नींत उत्पन्न होतात असेंही मानलेलें आहे.

प्रथम मी तुला असें विचारतों कीं, तुझे देव राहतात कोठें ? आणि दुसरें असें विचारतों कीं, ते जर कधीं हालतात असें मानिलें तर एक जागा सोडून दुसरे जागीं जाण्याचा उद्देश काय ? आणि तिसरें विचारणें असें आहे कीं, सजीव प्राणी यांस वासना आहेत, यासाठीं त्यांचें चलनवलन उपयुक्त आहे; पण देवांस कोणत्या पदार्थांची गरज आहे कीं, त्यांसाठीं ते आपलें मन आणि बुद्धि यांचा उपयोग करितात ? सारांश ते सुखी आणि आद्यंतरहित कसे ? मीं जे प्रश्न विचारिले त्यांपैकीं कोणत्याही प्रश्नाचें तूं उत्तर देण्याचा प्रयत्न केलास, तरी तुझ्या गळ्यांत उलट जास्त घोंगडें येणारच. ज्या मताला सत्याचा आधार नाहीं, त्याविषयीं तूं किती जरी आपली अक्कल लढविलीस, तरी त्यापासून कांहीं तुझा इच्छित अर्थ सिद्धीस जाणार नाहीं. तूं असें सांगितलें आहेस कीं, देवांची आकृति मनावांचून दुसऱ्या इंद्रियांस कांहीं गोचर नाहीं.

३८. परंतु जर देव मनावांचून दुसऱ्या इंद्रियांस गोचर नाहींत तर अश्वमुखी मनुष्यांविषयीं चिंतन करणें आणि देवांविषयीं चिंतन करणें यांत भेद काय ? अशा प्रकारच्या मनोव्यापारास आपल्या

तत्वज्ञान्यांनीं तुच्छ मानिलें आहे; परंतु तूं अशा मनोव्यापारास मोठें महत्व दिलें आहेस, त्या योगानें देवांचा आपल्यास प्रत्यक्ष साक्षात्कार होतो असें तूं मानितोस.

जी वस्तु आपण कधींही पाहिली नाहीं, ती अमुक एक प्रकारची आहे असें आपल्या मनांत येतें. आपण नेहमीं अनेक वस्तु नेत्रांनीं पहातों, आणि श्रवणांनीं ऐकितों त्याचा तो परिणाम आहे. परंतु अशा प्रकारच्या मनोव्यापारांत सत्य मुळींच नसतें; तथापि त्याबद्दल मी तुला कांहीं दोष देत नाहीं. पण देव सुखी आणि अजरामर आहेत असें तूं कशावरून ह्मणतोस? भवति-न-भवति करण्याची ही फुसकी रीत तूं डिमोक्रिटस् याजपासून उसनी घेतली आहेस, परंतु तींत कांहीं अर्थ नाहीं; कारण त्याबद्दल पुष्कळ लोकांनीं त्यास वाग्दंड केला आहे, तेव्हां अशा प्रकारच्या पद्धतीचा स्वीकार केल्यानें तुला कांहीं फायदा होणार नाहीं. होमर, रामुलस्, जू, प्लेटो, यांच्या आकृती माझ्या मनांत येतील, परंतु ज्या आकृतींचे ते होते त्या आकृती कधींही माझ्या मनांत येणार नाहींत. तर मग, त्यांच्या ज्या आकृती माझे मनांत भरल्या आहेत त्याच आकृतींचे ते होते असें कसें होईल? जो मनुष्य आपण डोळ्यांनींही पाहिला नाहीं त्याच्या भिन्न भिन्न आकृती आपल्या मनांत भरतील, ह्मणून त्यास दोन आकृति होत्या असें मानतां येईल काय? मानतां येणार नाहीं; तर मग, त्या दोन आकृतींपैकीं एका आकृतीचा तरी तो होता हें तरी खरें आहे काय? तेंही खरें नाहीं असें तूं उत्तर दिलें पाहिजेस. तर मग देवांच्या आकृती मनुष्यांच्या आकृतीसारख्या आहेत हें तूं ह्मणतोस कशावरून? आपण कधीं अवलोकन केलीं नाहींत अशा मनुष्यांविषयीं, देशांविषयीं आणि नगरांविषयीं आपल्या मनांत विचार येतात ह्मणून त्या वस्तु अस्तित्वांत-आहेत आणि आपल्या

मनानें त्यांस जशा आकृती दिल्या आहेत तशाच आकृतींच्या त्या आहेत असें सिद्ध होतें काय ?

३२. व्हेलिअस, असा हा मोठा मानगडीचा खटला आहे. दर्शन हा नेत्रांचा धर्म असून देव अमुक आकृतींचे आहेत असें मानण्याविषयीं आमच्या मनावर तूं बलात्कार करितोस. अच्यावच्या भाषण करण्याची जशी काय तुला सनदच मिळाली आहे. तूं असें म्हणतोस कीं असंख्य देवांचे थवेच्या थवे नेहमीं इकडून तिकडें अशा प्रकारें फिरत असतात कीं त्यांतिकीं एखादा देव तरी दृष्टीस पडलाच पाहिजे ! तुझें ह्मणणें तुलाच समजलें असतें तर मला तें समजलें नाहीं याबद्दल मला वाईट वाटलें असतें. कारण देवांचे संचार अप्रतिबंध आहेत असें तूं कसें सिद्ध करून देशील ? किंवा सिद्ध करून दिलेंस तरी ते अविनाशी आहेत असें तूं कसें सिद्ध करून देणार ? आतां असंख्य परमाणूंचा नेहमीं पुरवठा होत आहे असें तूं म्हणतोस, पण त्यापासून देव अविनाशी आहेत असें कसें ठरतें ? तूं आपलें मत स्थापित करण्याकरितां कांहीं तरी युक्ती योजीत असतोस. निरनिराळया जातींच्या प्राण्यांमध्यें अगदीं सम प्रमाण आहे असें गृहीत धरून तूं असें ह्मणतोस कीं, ज्यापेक्षां मर्त्य प्राण्यांचा एक वर्ग आहे, त्यापेक्षां अमर्त्य प्राण्यांचा एक वर्ग असलाच पाहिजे. कांहीं पृथ्वीपासून उत्पन्न होतात, तेव्हां कांहीं जलापासून उत्पन्न झालेच पाहिजेत; आणि नाश करणारीं अशीं कांहीं कारणें आहेत, तर रक्षण करणारीं देखील कारणें असलींच पाहिजेत. तुला वाटेल तसें ह्मण, परंतु परमाणु एकत्र जमून एखादी आकृति तयार करतील, किंवा तीस रंग देतील, अथवा तिला प्राणविशिष्ट करतील, असा त्यांच्या आंगीं धर्म आहे, असें तुझ्याच्यानें प्रतिपादन करवत नाहीं, तस्मात् देव अजरामर आहेत असें ह्मणणें हा केवळ प्रलाप मात्र आहे.

४०. आतां आपण देवांच्या सुखाविषयीं विचार करूं. ही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, सद्गुणावांचून कांहीं सुख असूं शकणार नाहीं. पण सद्गुणप्रदर्शन करण्याकरितां कांहीं केलें पाहिजे. केल्यावांचून कांहीं सद्गुणाचें प्रदर्शन करितां येत नाहीं; आणि तुझ्या देवता तर कांहींच करीत नाहींत असें तूं ह्मणतोस, तेव्हां त्यांच्या ठायीं सद्गुणांचा अभाव ही गोष्ट सिद्ध झाली; आणि सद्गुणांचा अभाव झाला ह्मणजे सुखाचाही अभाव झाला पाहिजे. तर मग देव आपलें आयुष्य घालवितात तरी कसें ? तूं असें म्हणतोस कीं देवांस चांगल्या वस्तूंचा नेहमीं पुरवठा होत असतो, आणि त्या वस्तूंमध्यें वाईट वस्तूंचें मिश्रण झालेलें नसतें; तर त्या चांगल्या वस्तु तरी कोणत्या ? निःसंशय वैषयिक सुखांचा त्यांस भरपूर पुरवठा होत असेल, कारण मानसिक सुख ह्मणजे काय हें तुला मुळींच माहीत नाहीं, तेव्हां तुझ्या देवांना तरी तें कोठून माहीत असेल ? शरिरापासून आणि शरिरास जें सुख होतें तेंच काय तें सुख असें तुझें मत आहे. एपिक्यूरस् यानें निर्लज्जपणानें असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं, ऐच्छिक आणि अमंगळ विषयसुखें निराळीं काढून ठेविलीं तर, चांगलीं सुखें कोणतीं याचा विचारच माझे मनांत येत नाहीं; आणि त्या सुखांचीं नांवें सांगतांना त्याच्या मुखश्रीवर कांहीं देखील काळिमा आली नाहीं. या वाक्यांचा उच्चार करतांना एपिक्यूरियन यांस देखील लज्जा वाटते. परंतु तुला तर लाजही वाटत नाहीं. देवांच्या वासना तृप्त करण्याकरितां तूं त्यांस कोणतें अन्न, कोणतें पेय, कोणत्या जातीचीं वाद्यें आणि पुष्पें, कोणत्या जातीचीं उटणीं, आणि कोणत्या सुवासिक वस्तु अर्पण करणार ? कारण, तुझ्या देवता त्या वस्तु कोठून मिळवितील आणि मिळाल्या तर त्यांचा उपयोग कसा करूं शकतील हें कांहीं मला कळत नाहीं. सारांश, सुखोपभोग घेण्याकरितां मनुष्याचा स्व-

भाव फारच योग्य आहे, तसा कांहीं देवांचा नाहीं. मी कांहीं आतां तुजबरोबर उगीच वाद घालीत बसत नाहीं. माझें म्हणणें इतकेंच कीं, तुझे देव हे अगदीं सुखपराङ्मुख आहेत; आणि तूं ज्या कारणांमुळें ते सुखी आहेत असें म्हणतोस, त्याच कारणांनीं ते सुखी नाहींत असें सिद्ध होतें.

४१. एपिक्यूरिअन यांचें असें म्हणणें आहे कीं, देव हे आपल्याच सुखाविषयीं नेहेमीं चिंतन करितात; कारण कीं, त्यांच्या मनाला दुसरा व्यवसायच नाहीं. देवांची भक्ति करावी आणि निर्मळ भक्ति करतां यावी यास्तव आपलें मन पवित्र ठेवावें असे एपिक्यूरस् यानें ग्रंथ लिहून ठेविले आहेत. पण एपिक्यूरस् याच्या मताप्रमाणें, जर मनुष्यांच्या हितांविषयीं देव उदासीन आहेत, आणि ते मनुष्यासाठीं कांहीं देखील करीत नाहींत, तर, त्या देवांची मनुष्यांनीं भक्ति करावी तरी कशासाठीं हें मला सांग ?

तूं असें म्हणतोस कीं, देवांचा स्वभाव इतका उत्तम आहे आणि ते असे प्रतापशाली आहेत कीं, शहाण्या मनुष्यांचीं अंतःकरणें त्यांची सेवा करण्याविषयीं साहजिक प्रवृत्त झालीं आहेत. जे नेहेमीं आपल्याच सुखांविषयीं चिंतन करीत आहेत, दुसऱ्यांसाठीं ज्यांनीं कधीं कांहीं केलें नाहीं, करीत नाहींत, व करणार नाहींत, त्यांच्या ठिकाणीं प्रतापशालित्व आणि सौष्टव हे गुण कसे असूं शकतील हें, बाबा, मला कांहींरे समजत नाहीं. ज्याच्यापासून आपल्याला कांहीं प्राप्त होणें नाहीं, त्याची भक्ति आम्ही कशासाठीं करावी आणि जो आमच्यावर कांहींच उपकार करीत नाहीं, त्याचे आह्मी ऋणी कसे असूं शकूं ? देवाविषयीं आपली भक्ति असणें हा एक धर्म आहे, पण देव आणि मनुष्यें यांजमध्यें जर कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं, तर आमच्या भक्तीविषयीं देवांचा आमच्यावर काय

हक्क आहे ? आपण देवांचें अर्चन कसें करावें याविषयीं ज्ञान असण्याकरितांच अंतःशुद्धीचें प्रयोजन आहे असें तुझें ह्मणणें आहे; परंतु जर देवांपासून आम्हांस कांहीं प्राप्त होईल अशी आशा नाहीं, तर त्यांचें अर्चन आह्मीं कशासाठीं करावें हें कांहीं मला कळत नाहीं. ज्यांच्या वर्तनांत मुळींच चांगुलपणा नाहीं .त्यांची उगीच प्रशंसा करून आह्मी त्यांची पूजा करावी यांत अर्थ काय ?

४२. कांहीं लोकांचें ह्मणणें असें आहे कीं, जे लोक सदसद्विचारशून्य आहेत त्यांस धर्माचें आणि देवांचें भय घालून आपल्या काबूंत ठेवण्याकरितां राज्यकारस्थानी पुरुषांनीं ही एक युक्ति शोधून काढली आहे; तर याविषयीं तुला काय वाटतें ? ह्या मतापासून धर्माचा समूळ नाश होणार नाहीं काय? कित्येक असें ह्मणतात कीं, मनुष्य प्राण्याला ज्या वस्तु सुखदायक आहेत, त्या सर्व देवता मानाव्या; ह्या मतांत धर्माचा कांहीं तरी अंश आहे काय ? कित्येक असें ह्मणतात कीं, ज्यांची आपण प्रार्थना करितों, ज्यांस आपण अलंकार घालून सजवितों, ते मोठे पराक्रमी, बलाढ्य आणि नांमांकित पुरुष होते; आणि मेल्यानंतर त्यांस देवत्व प्राप्त झालें. असें ह्मणणारे लोक नास्तिक नव्हेत काय ? सारांश, आपला मित्र पॉसिडोनिअस यानें दैविक गुणांविषयीं लिहितांना आपल्या पांचव्या पुस्तकांत जें विवेचन केलें आहे तेंच वास्तविक आहे. एपिक्यूरस् यास देवांचें अस्तित्वच मान्य नाहीं; आणि त्यानें -अविनाशी देवांविषयीं जें कांहीं ह्मटलें आहे, त्याचें कारण इतकेंच कीं, लोकांचा नावडतेपणा त्यास टाळावयाचा होता. देवांचा बाहेरील आकार मनुष्यांप्रमाणें असून आंत कांहीं भरीवपणा नाहीं, देवांस सर्व अवयव असून त्यांचा उपयोग करण्याची त्यांस शक्ति नाहीं अशा भलत्याच कल्पना करील असा एपिक्यूरस कांहीं क्षीणप्रज्ञ नव्हता; आणि तो ह्म-

णतो त्याचप्रमाणें जर देव आहेत आणि ते कोणावर उपकार करीत नाहींत तर, आपण अशा देवांपासून लांब असावें हें चांगलें, कारण त्यांनीं आमच्यावर सुप्रसन्न असावें असें आह्मीं त्यांचें कशासाठीं आर्जव करावें ?

---

# पुस्तक दुसरें.

—:o:—

१. कोटा याचें भाषण ऐकून व्हेलिअस् त्यास ह्मणाला कीं, कोटा, तुझ्यासारख्या विद्वान आणि अलंकारशास्त्रवेत्याबरोबर ह्या वादास्पद विषयावर भाषण करतांना मीं पुरता विचार केला नाहीं. वक्तृत्वशक्तीवांचून नुसत्या विद्वत्तेवर अथवा तत्वज्ञानावांचून नुसत्या वक्तृत्वावर ( मग तें वक्तृत्व कितीही चांगलें असो ) मीं कांहीं तुझ्या भाषणाची प्रशंसा केली नसती; परंतु तुझें वक्तृत्व तुझ्या विद्वत्तेला आणि तुझें तत्वज्ञान तुझ्या वक्तृत्वाला शोभेल असें आहे; तथापि सांप्रत तुझें भाषण पुरें कर. लुसिलियस्, बाल्बस् याचें या विषयाच्यासंबंधानें काय ह्मणणें आहे तें आपण ऐकूं या.

बाल्बस म्हणाला कीं, कोटा याचें आणखी भाषण ऐकण्याची इच्छा आहे. ज्या वक्तृत्वशक्तीनें त्यानें आतांच खोट्या देवांचें अविद्यमानत्व सिद्ध करून दिलें आहे, त्याच वक्तृत्वशक्तीनें त्यानें खऱ्या देवांचें अस्तित्व सिद्ध करून द्यावें अशी माझी इच्छा फार आहे; कारण अशा प्रकारच्या विषयाची चर्चा करितांना एक्याडेमिक मतासारख्या पोकळ आणि अस्थिर मताचें समर्थन करणें

हें कांहीं कोटासारख्या तत्वज्ञानी व धर्माधिकारी यास योग्य होणार नाहीं. कोटा, तूं एपिक्यूरस् याच्या मताचें उत्तम रीतीनें खंडन केलें आहेस; परंतु या विषयाच्यासंबंधानें तुझें काय मत आहे तें ऐकण्यास मी फार उत्सुक आहें.

कोटा म्हणाला मीं पहिल्यानें काय सांगितलें तें तूं विसरलास. जीं मतें मला मान्य नाहींत तीं मतें कां खरीं नाहींत हें सांगणें जितकें मला सोपें आहे, तितकें जीं मतें मला मान्य आहेत तीं कां खरीं आहेत हें सांगणें मला सोपें नाहीं; आणि जरी एखाद्या विशेष मतावर माझा जास्त भरवसा आहे, म्हणजे तें मत खरें आहे असें मला वाटतें, तरी मी फार वेळ बोललों आहें, सबब तुझें भाषण ऐकण्याची मला विशेष इच्छा आहे. बाल्बस् ह्मणाला, जर तुझी तशी इच्छा आहे तर तुझ्या मर्जीस अनुसरून वागण्यास मी खुषी आहें; आणि मी माझें भाषण माझ्याच्यानें जितकें संक्षिप्त करवेल तितकें करीन. कारण, तूं एपिक्यूरिअन मताचें खंडन केलें आहेस, त्यापेक्षां त्याविषयीं मला कांहीं बोलावयाचें राहिलें नाहीं. अविनाशी देवांच्यासंबंधानें आपल्या मताचें समर्थन करणारांनीं या विषयाचे चार विभाग केले आहेत. पहिल्या विभागांत देवांचें अस्तित्व सिद्ध केलें आहे; दुसऱ्या विभागांत त्यांचा स्वभाव आणि वर्तन कोणत्या प्रकारचें आहे हें प्रदर्शित केलें आहे; तिसऱ्या विभागांत ह्या विश्वाचा कारभार त्यांच्या इच्छेनें आणि संकल्पानें चालला आहे असें प्रतिपादित केलें आहें; आणि चवथ्या विभागांत मनुष्यांच्या आचरणावर ते आपली देखरेख ठेवितात असें सिद्ध केलें आहे. आपण पहिल्या दोन गोष्टींचा प्रस्तुत, आणि शेवटच्या दोन गोष्टींचा एखादे वेळेस विचार करूं. कारण कीं, समग्र विषयाची वाटाघाट करण्याला वेळ जास्त पाहिजे. कोटा ह्मणाला, तसें नको. आपल्यास पुष्कळ वेळ आहे, आणि दुसरें असें आहे कीं,

ज्याविषयीं आपण वाटाघाट करीत आहोंत, तो विषय इतका महत्वाचा आहे कीं, कोणतेंही काम एकीकडे ठेवून त्याविषयीं विचार केला पाहिजे.

२. बाल्बस् म्हणाला, पहिल्या कलमाविषयीं कांहीं फार बोलण्याची गरज नाहीं. कारण, जेव्हां आपण आकाशाकडे अवलोकन करून तत्रस्थ पदार्थांविषयीं चिंतन करितों, तेव्हां जिच्या योगानें ह्या जगांतील सर्व वस्तूंचें नियमन होतें अशी एक अद्भुत दैविक शक्ति त्या पदार्थांच्या ठायीं आहे असें आपल्या सहज मनांत येतें; तस्मात्, यापेक्षां स्पष्ट आणि सुबोध असें दुसरें काय आहे? तसें जर नसतें, तर, *एनियस् यानें एका कवितेंत असें म्हटलें नसतें कीं, इंद्र हा जगाचा राजा असून इच्छेनें आणि संकल्पानें विश्वाचें राज्य करीत आहे; आणि तो सर्वव्यापक व सर्वशक्तिमान् आहे. आणि या कविशिरोमणीच्या वचनाविषयीं जर कोणी संशय घेईल, तर, त्या मनुष्यानें सूर्य आहे किंवा नाहीं, याविषयीं कां संशय घेऊं नये हें मला कळत नाहीं, कारण ह्यापेक्षां स्पष्ट असें तें काय असूं शकणार आहे? आणि आबालवृद्धांच्या मनांत जी गोष्ट भरली आहे ती जर खरी नसती तर, तिजविषयीं लोकांचा जो विश्वास आहे तो इतका दृढ नसता, आणि काळानें तो वृद्धीप्रत पावला नसता. प्रत्येक पिढीस त्यास बळकटी आणि टिकाऊपणा आला नसता; आणि जीं मतें खोटीं व निराधार होतीं तीं कालगतीनें कधींच लयास गेलीं असून त्यांचें आज आपणास स्मरण देखील नाहीं, हेंही सत्य कोणतें व असत्य कोणतें याचें एक प्रमाण आहे. एका देशांत अश्वमुखी

---

* प्राचीन काळीं एक मोठा कवि होऊन गेला. ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं १६९ वर्षांपूर्वीं हा गत झाला.

मनुष्यें आहेत असें आज कोणीं तरी खरें मानीत आहे काय? पाताळांत राक्षस आहेत असें मानून पूर्वी लोक फार भीत असत पण आतां तशी क्षीण बुद्धीची आणि मूर्ख अशी एखादी वृद्ध बायको तरी तुम्हांस सांपडेल काय? कालगतीनेंच चुकीच्या कल्पना व खोटीं मतें नाश पावतात; कालगतीनेंच, जगाला व सत्यांला बद्धमूलत्व प्राप्त होतें; आणि याच कारणानें आपल्यामध्यें आणि इतर राष्ट्रांमध्यें पवित्र नियम व देवांचें अर्चन यांस बळकटी आली असून त्यांत वेळोवेळीं सुधारणा झाली आहे. ही गोष्ट कांहीं सहजावृत्त्या किंवा मूर्खपणानें घडली नाहीं; परंतु, देवांनीं वारंवार आपल्यास प्रत्यक्ष दर्शनें दिल्यावरून आपला भक्तिभाव वाढला आहे.

३. देवांनीं घोड्यांवर बसून आपल्या शत्रूंबरोबर लढाया मारल्या हें आपण पाहिलें नाहीं काय? भावी स्थिती काय होणार आहे हें देवांनीं तरुण मनुष्यांचीं रूपें धारण करून आपल्यास सांगितलें, आणि तें खरें झालें. आपण प्रमाद करून देवांनीं ज्या गोष्टी सांगितल्या, त्या खऱ्या मानिल्या नाहींत, यामुळें आपणांवर अनर्थ गुजरले ते आपल्या स्मरणांतून गेले नाहींत. अशा प्रकारच्या अनेक उदाहरणांवरून देवांचें अस्तित्व सिद्ध झालें आहे. आपल्या लोकांचा जो इतका उत्कर्ष झाला आहे त्याचें मूळ बीज असें आहे कीं, धर्मसंबंधीं कर्तव्यकर्मे करण्याविषयीं आपण फार तत्पर आहोंत; आणि इतर राष्ट्रांवर जो अपला वरचढपणा आहे त्याचें कारणही तेंच आहे. येथें बाल्बस् यानें देवांच्या साक्षात्काराबद्दल कित्येक दंतकथा सांगितल्या आहेत. त्यांत कांहीं रहस्य नाहीं असें वाटल्यावरून तो मजकूर येथें वगळला आहे.

४. भविष्य कथन करणारे जीं भविष्यें सांगतात, तो दैविक शक्ती-

चा प्रादुर्भाव नव्हे काय ? आणि अशा प्रकारच्या प्रमाणांवरून प्रत्येक मनुष्यानें देवाचें अस्तित्व कबूल करावें हें त्यास उचित नाहीं काय ? आतां असें म्हणतां येईल कीं, भविष्य कथन करणारांनीं सांगितलेल्या सगळ्याच गोष्टी खऱ्या उतरल्या नाहींत; तर मग आपल्यास असाही सिद्धांत केला पाहिजे कीं, ज्यापेक्षां सगळे रोगी बरे झाले नाहींत त्यापेक्षां वैद्यकही खरें नाहीं कोणत्याही लक्षणानें भावी घडणाऱ्या गोष्टींविषयीं देव आपल्यास सूचना करितात. त्या लक्षणावरून आपण त्याचा जो अर्थ करितों त्याहून उलट परिणाम झाला, तर देव आपल्यास सूचना करण्यांत चुकले असा देवांकडे आपण दोष लावूं नये. आपण त्याचा अर्थ करण्यांत चुकलों असें समजलें पाहिजे. देव आहेत ही गोष्ट सर्व राष्ट्रांस मान्य झाली आहे; आणि ही समजूत नैसर्गिक असून जशी काय मनुष्यांच्या मनांवर कोरून ठेविली आहे. तेव्हां, देव आहेत याविषयीं कांहीं संशय राहिला नाहीं. एवढेंच पहावयाचें राहिलें आहे कीं, देव आहेत कसे ?

९. देवांच्या अस्तित्वाविषयीं कोणाचा नकार नाहीं. आपला मतानुयायी क्लीनथेस् यानें देवांविषयीं मनुष्याच्या मनाचा जो ग्रह झाला आहे, त्याविषयीं चार कारणें सांगितलीं आहेत. भावी घडणाऱ्या गोष्टींचें अगोदर ज्ञान होणें हें एक दैविक कृत्य असून त्याविषयीं मीं आतांच सांगितलें आहे, हें पहिलें कारण. हवेच्या नेमस्तपणापासून, जमिनीच्या सुपीकतेपासून, आणि दुसऱ्या प्रकारचीं अनेक तऱ्हेचीं विपुल साधनें आपल्यास प्राप्त होऊन, त्यांपासून आपलें उपजीवन होतें, हें देवांच्या अस्तित्वाचें दुसरें प्रमाण. सृष्टीमध्यें अनेकविध उत्पात होतात, ते देवांच्या अस्तित्वाचें तिसरें कारण आहे. विजेचे कडकडाट, उल्कापात, मेघगर्जना, चंडवात, बर्फ,

गारा पडणें, उपप्लव, रोगांच्या सांती, पाषाणवृष्टी आणि रक्ताच्या परजन्यासह भूकंप, एकाएकीं जमिनीमध्यें विवर पडणें, मनुष्यांमध्यें आणि पशूंमध्यें भयंकर आकृतीच्या व्यक्तींचें जनन होणें,—ह्या गोष्टी देवांचें अस्तित्वदर्शक आहेत. त्यापासून मनुष्याच्या मनाचा असा दृढ ग्रह होतो कीं, हे सगळे दैविक शक्तीचे प्रादुर्भाव आहेत.

चवथें कारण फार सबळ आहे. नक्षत्रमंडलाची नियमित गति आणि परिभ्रमण, चंद्र, सूर्य आणि सर्व नक्षत्रें यांची कांती, नियमपरता, चित्रविचित्रपणा आणि व्यक्तता, ह्यांरून अशी खातरजमा होते कीं, हे कांहीं यदृच्छेंकरून घडलेले परिणाम नाहींत. कारण, जेव्हां आपण एखाद्या गृहांत, विद्यालयांत, किंवा राजमंदिरांत प्रवेश करितों, आणि तेथील उत्तम व्यवस्था, बातबेत आणि रीतभात पाहतों, तेव्हां ह्या सर्व गोष्टी यदृच्छेंकरून घडल्या आहेत असें कांहीं आपल्या मनांत येत नाहीं. या गृहाचा कोणी स्वामी आहे आणि त्याच्या ह्या सर्व योजना आहेत, असा सिद्धांत करणें आपल्यास भाग पडतें. त्याप्रमाणेंच अनंत काळ होऊन गेला तरी ज्यांचा कोणताही भाग किंचित् देखील क्षीण झाला नाहीं, अशा ह्या अनंत आणि मोठ्या खस्थ पदार्थांच्या आश्चर्यजनक गति, परिभ्रमणें आणि व्यवस्थितपणा यांस, सर्वांहून श्रेष्ठ बुद्धीचा असा कोणी तरी प्राणी अनुशासक आणि प्रेरक आहे असें आपल्या मनांत भरतें ; याखेरीज दुसरी कल्पनाच करणें आपल्यास शक्य नाहीं.

६. *क्रिसिप्प्स् हा खरोखर कुशाग्र बुद्धीचा मनुष्य होता. त्यानें

---

* हा एक स्टोइक तत्ववेत्ता होता. त्यानें ३११ ग्रंथ लिहिले. तो फार मद्यप्राशन केल्यामुळें मेला असें ह्मणणें आहे. कोणी ह्मणतात कीं, एका चांदीचे भांड्यांत अंडीं ठेविलीं होतीं, तीं गाढव खात आहे असें पाहून त्यास इतकें हंसूं आलें कीं,

देवांच्या अस्तित्वाविषयीं जीं प्रमाणें सांगितलीं आहेत तीं इतकीं लवकर मनांत भरतात कीं, जसा काय सृष्टिधर्मच त्याचा गुरु होता. तो असें म्हणतो कीं, मनुष्याला करितां येत नाहींत अशा वस्तु जर सृष्टीमध्यें निर्माण केल्या आहेत तर, ज्यानें त्या निर्माण केल्या तो मनुष्यापेक्षां श्रेष्ठ असलाच पाहिजे. आकाशांतील चंद्र, सूर्य इत्यादि हा प्रचंड कार्यवर्ग, कांहीं मनुष्यें निर्माण करूं शकतील असा नाहीं; तेव्हां ईश्वरावांचून दुसरा असा कोणता प्राणी आहे कीं, तो असें कार्य करूं शकेल?

आतां ही गोष्टही खरी आहे कीं, ह्या जगतीतलावर मनुष्यांहून श्रेष्ठ असा दुसरा कोणी प्राणी नाहीं; कारण कीं, सर्व वस्तूंमध्यें अत्यंत श्रेष्ठ जी बुद्धि तेणेंकरून तो युक्त आहे; परंतु आपल्याहून जगांत कोणी श्रेष्ठ नाहीं असा त्यानें गर्व वहावा हा त्याचा मूर्खपणा आहे; कारण कीं, त्याहून कोणी तरी श्रेष्ठ आहे हें ह्या विश्वकार्यावरून स्पष्ट होतें. तेव्हां ईश्वर आहे ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते.

तुम्हीं जेव्हां एखादें रमणीय मंदिर अवलोकन करितां आणि त्याचा स्वामी तर तुमच्या दृष्टीस पडत नाहीं, पण कांहीं मांजरें, घुशी व उंदीर, इकडून तिकडे फिरतांना तुमच्या दृष्टीस पडतात; त्यावरून जर कोणी तुमच्या मनांत असें भरवून देण्याचा प्रयत्न करील कीं, तें मंदिर मांजरे वगैरे करितांच बांधलें आहे; तर तें तुह्मी खरें मानाल काय? हें जग एक रमणीय मंदिर आहे. चंद्र, सूर्य इत्यादि प्रकाशमान पदार्थांनीं तें अलंकृत केलें असून त्याजवर प्रचंड समुद्र आहेत, सुपीक जमिनीचीं मैदानें आहेत, आणि फलपुष्पयुक्त वृक्षा-

---

त्या योगानें तो मृत्यु पावला. ख्रिस्तिशकाच्या २०७ वर्षांपूर्वीं तो मेला. तेव्हां त्याचें वय ८० वर्षांचें होतें.

छादित पर्वत आहेत. तर हें विश्व फक्त मनुष्यांच्या वसाहतीसाठींच निर्माण केलें आहे, आणि अमर्त्य देवांसाठीं नाहीं असें तुह्मांस वाटतें काय ? खालच्या प्रदेशापेक्षां उंच प्रदेश चांगले हवाशीर असतात ही आपल्या नेहमींच्या अनुभवांतील गोष्ट आहे. आपली पृथ्वी ही अगदीं खालचा प्रदेश असून तिजवरील वातावरण फार जड आहे. आपल्यास असा अनुभव आहे कीं, ज्या देशाचें किंवा नगराचें वातावरण जड असतें, त्या देशांतील किंवा नगरांतील लोकही बुद्धीनें जड असतात; ह्मणजे वातावरणाचा आपल्या बुद्धीवर परिणाम घडतो.

अशा प्रकारची आपल्या बुद्धीमध्यें जरी उणीव आहे तरी, आपल्यापेक्षां शहाणपणानें श्रेष्ठ अशी कांहीं वस्तु या जगांत आहे असें आपल्यास शोधून काढतां येतें. आपल्या शरिरांतील ओलसरपणा, उष्णता, भरींवपणा, आणि ज्याच्या योगानें आपण श्वासोच्छ्वास घेतों तो आत्मा—यांची प्राप्ती आपल्यास कोणापासून झाली, याचा जर आपण शोध केला तर, आपल्यास स्पष्टपणें असें कळून येईल कीं, आप, तेज, पृथ्वी आणि वायु यांच्या अंगीं ते नैसर्गिक गुण असून त्यांपासून आपणांस त्यांची प्राप्ती झाली आहे.

७. पण ह्या सर्वांला मागें टाकणारी बुद्धि (तिला तुह्मी मन ह्मणा, समज ह्मणा, अंतःकरण ह्मणा, किंवा सदसद्दर्शन ह्मणा) आपल्यास कोठून प्राप्त झाली याचा शोध लावण्याचा आपण प्रयत्न केला कीं, आपण जी वस्तु हुडकीत आहोंत ती आपणांस सांपडलीच. हें जग सर्व गुणांनीं परिपूर्ण असून सर्व वस्तूंमध्यें अत्युत्तम बुद्धि ती मात्र त्याच्या ठायीं नाहीं असें होईल काय ? ह्या विश्वापेक्षां अत्युत्तम अशी दुसरी वस्तूच नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यापेक्षां उत्तम वस्तु आहे अशी आपल्याच्यानें कल्पना देखील करवत नाहीं.

सर्व वस्तूंमध्यें बुद्धि श्रेष्ठ आहे तर ती या जगाचा एक गुण आहे असें सिद्ध होतें.

ह्या विश्वांतील मनोरम आणि सुखजनक व्यापार पाहून मीं प्रतिज्ञापूर्वक जें सत्य सांगितलें आहे तें कोणही नाक़बूल करील ?

ह्या जगाला कोणी नियामक असण्याची गरज नाहीं असें जर मानिलें, तर एका ऋतूंत ही पृथ्वी फलपुष्पांनीं सुशोभित असते, आणि दुसऱ्या ऋतूंत ती बर्फानें आच्छादित होते; सूर्याच्या नियमित गतीनें दक्षिणायन आणि उत्तरायण अशीं अयनें होतात; चंद्रकलेच्या वृद्धीनें आणि क्षीणतेनें समुद्राची भरती-ओहोटी होते; नक्षत्रें आणि तारे नियमानें आकाशमंडळांत भ्रमण करितात; ह्या गोष्टी यदृच्छेंकरून घडल्या असत्या काय?

मीं येथपर्यंत जें कांहीं निरूपण केलें आहे तें विस्तारपूर्वक आणि स्पष्ट आहे, त्यामुळें एकॅडमिक्स याच्या कांक्षेस पात्र होणार नाहीं. झीनो यानें आपले विचार अल्पविस्तारानें आणि संकुचितपणानें सांगितल्यामुळें त्याजवर प्रतिपक्षकारांस कांक्षा घेण्याची सवड मिळाली; कारण, ज्या जलाशयाचा प्रवाह चालू असतो त्याचें उदक कधींही मलीन होत नाहीं; परंतु स्थिर उदक हें लागलीच मलीन होतें. त्याप्रमाणें आपण हातीं धरलेला विषय विस्तारपूर्वक कथन केला ह्मणजे आपल्या प्रतिपक्षास त्याजवूर दोष देण्यास सवड सांपडत नाहीं. मी ज्या विषयांच्या संबंधानें विस्तारपूर्वक सांगितलें आहे त्याच विषयांच्या संबंधानें झीनो किती संक्षेपानें सांगतो तें पहाः—

८. "ज्याला बुद्धि आहे तें ज्याला बुद्धि नाहीं त्यापेक्षां श्रेष्ठ आहे. जगापेक्षां कोणी श्रेष्ठ नाहीं म्हणून जगाला बुद्धि आहे. ह्याच नियमानें असें सिद्ध करतां येतें कीं, जग हें शहाणें, सुखी आणि

शाश्वत आहे; कारण हे गुणधर्म ज्यांच्या ठायीं आहेत ते, ज्यांच्या ठायीं ते गुण नाहींत त्यांपेक्षां श्रेष्ठ आहेत हें स्पष्ट आहे. जगापेक्षां जर दुसरें कांहीं श्रेष्ठ नाहीं, तर निर्विवाद सिद्धांत असा आहे कीं, जग हें ईश्वर आहे." झीनो आणखीं असें म्हणतो, "ज्याला इंद्रिय नाहीं, त्याला विषय ग्रहण करण्याची शक्ति नाहीं. जगाला विषय ग्रहण करण्याची शक्ति आहे तस्मात् तें इंद्रिय-विशिष्ट आहे. ज्याला प्राण आणि बुद्धि नाहीं तें, ज्याला प्राण आणि बुद्धि आहे, अशा प्राण्याचें जनक असूं शकणार नाहीं; परंतु ज्यापेक्षां प्राण आणि बुद्धियुक्त प्राण्यांस हें जग निर्माण करीत आहे, त्यापेक्षां तें स्वतः प्राण आणि बुद्धिरहित असूं शकणार नाहीं."

तो आपला पूर्वपक्ष नेहमींच्या सांप्रदायाप्रमाणें संक्षेपानें पुरा करितो. "जर एखाद्या वृक्षापासून, ज्याचे सप्तसूर सुस्वर बांधिले आहेत असें एक अलगुजें किंवा सनई उत्पन्न झाली, तर त्या वृक्षा-मध्यें तशा प्रकारचें अलगुजें किंवा सनई करण्याचें सामर्थ्य आहे किंवा नाहीं याविषयीं संशय घेशील काय? घेणार नाहींस; तर मग ज्यापेक्षां हें जग, प्राण आणि ज्ञानयुक्त प्राण्याला निर्माण करीत आहे, तर तें स्वतः सप्राण आणि सज्ञान आहे असें आपण कां बरें मानूं नये?"

९. देवांच्या अस्तित्वाविषयीं मला कांहीं फार बोलावयास नको होतें; कारण ती गोष्ट अगदीं स्पष्ट आहे असें मी माझ्या भाषणाच्या आरंभीं सांगितलें असूनही त्याच प्रकरणावर पुष्कळ वेळ बोललों. असो. आतां मी वस्तूंच्या अंगच्या स्वाभाविक धर्मांवरून देवांचें अस्तित्व सिद्ध करून देईन. ही एक तथ्य गोष्ट आहे कीं, जे प्राणी आहार भक्षण करून वृद्धीप्रत पावतात त्यांच्या शरिरांत

स्वाभाविक उष्णता आहे, आणि तिच्या योगानें पाचन आणि वृद्धि हे व्यापार घडतात. त्या साधनावांचून प्राण्याला पाचनही करितां आलें नसतें, आणि वृद्धीप्रतही पावतां आलें नसतें; कारण, हा चलनवलन-धर्म उष्णतेचा आहे. जोंपर्यंत अंगांत उष्णता असते, तोंपर्यंत प्राण्यांचे शरीरव्यापार नियमित आणि समान असतात, व प्राण्यांच्या ठायीं जीवित्व आणि ज्ञान असतें. उष्णतेचें विद्यमा-नत्व नाहींसें झालें कीं, तात्काळ प्राण्यांचा अंत होतो.

अशा प्रकारचीं प्रमाणें दाखवून सर्व प्राणिमात्रांच्या शरिरांत जी उष्णता आहे तिची शक्ति किती मोठी आहे याचें *क्लीन्‌थेस यानें आपणांस फार सुरेख ज्ञान करून दिलें आहे. त्यानें असा विचार केला आहे कीं, रात्र आणि दिवस मिळून ज्याचें पचन करितां येणार नाहीं असें कांहीं अन्न नाहीं. अन्नमळाचा संचय होण्याक-रितां उदरांत जे अवयव आहेत त्यांत देखील उष्णता आहे. शरि-रांतील रक्तवाहिन्या आणि शिरा ह्या नेहमीं वाऱ्यानें दीपज्योति हालतात त्याप्रमाणें हालत असतात. असें नेहमीं पाहण्यांत आलें आहे कीं, एखाद्या प्राण्याचें काळीज एकाएकीं हिसका मारून तोडून घेतलें तर तें, आपल्या उरांत धडकी भरल्यानें तें जसें हालत असतें त्याप्रमाणें हालत असतें. प्रत्येक वस्तु—मग ती प्राणिवर्गांतील असो, किंवा वनस्पतिवर्गांतील असो—तिच्यामध्यें जी उष्णता आहे तीच तिचा प्राण-आहे. दुसरें, उष्णता ही आपल्या नैसर्गिक धर्मानें ह्या साऱ्या विश्वांत पसरली आहे. ह्या विश्वव्यापक उष्ण-तेच्या गुणाविषयीं फार विस्तारपूर्वक सांगण्यांत येईल तेव्हां या वि-षयाचा चांगला बोध होईल.

---

* एक स्टोइक तत्ववेत्ता होऊन गेला. स्टोइकमताचा मूळ उत्पादक झीनो आणि क्लीनथेस हा त्याचा उत्तराधिकारी.

ह्या सृष्टीचा प्रत्येक भाग उष्णतेनें सावरून धरला आहे. पहिल्यानें आपण पृथ्वीवरील वस्तूंविषयीं विचार करूं. दगडावर दगड आपटला किंवा घांसला म्हणजे त्यांतून अग्नि बाहेर पडतो; यावरून प्रत्येक वस्तु उष्णतेनें व्यापिली आहे हें सिद्ध होतें. जमीन खोदली ह्मणजे त्यांतून उष्ण वाफा निघतात; त्याप्रमाणें विहिरींतील उदक उष्ण असतें; त्यांतही हिंवाळ्यांत तें जास्त उष्ण असतें; कारण, पृथ्वीच्या विवरदरींत उष्णता फार असते आणि ती ह्या ऋतूंत घन होते.

१०. सर्व वनस्पतींच्या उत्पत्तीस आणि वृद्धीस उष्णता कारण आहे हें दाखविण्याकरितां विशेष विस्तारानें सांगितलें पाहिजे. प्रत्येक प्रवाही पदार्थांत देखील उष्णता आहे. उदकांत उष्णता नसती तर तें थिजून त्याचें बर्फ झालें नसतें, आणि पुनः त्यास प्रवाहीपणा आला नसता. जेव्हां उदकांतील उष्णता कमी होते, तेव्हां तें थिजतें; आणि उष्णतेचा पुनः संयोग झाला असतां त्यास प्रवाहीपणा येतो. वाऱ्यानें जेव्हां समुद्र क्षुब्ध होतो, तेव्हां तो उष्ण होतो. यावरून आपल्याला असें गृहीत केलें पाहिजे कीं, ह्या प्रचंड जलाशयांत देखील उष्णता भरली आहे; आपल्याच्यानें अशी कांहीं कल्पना करवत नाहीं कीं, ती बाह्य आणि आगांतुक उष्णता आहे. समुद्राच्या अतिखोल भागांत व्यापून राहिलेली उष्णता जल हालूं लागलें ह्मणजे वर येते. आपल्या शरीरस्थ उष्णतेची देखील तशीच स्थिती आहे. आपण व्यायाम केला ह्मणजे आपल्या शरिरास जी उष्णता येते ती कांहीं बाह्य उष्णता नव्हे.

वायु हा अतिशीत आहे, तथापि त्यांत देखील उष्णता आहे. आपण प्रवाही पदार्थ तापविला म्हणजे त्यांतून जशी वाफ निघते, त्याप्रमाणेंच उदकांगभूत उष्णतेपासून उदकाचीही वाफ होऊन वा-

तावरणांत मिश्र होतें. ह्या विश्वाचा $\frac{1}{4}$ अग्नीमय असून आरोग्य-जनक आणि प्राणरक्षक उष्णतेचें उगमस्थान आहे. यावरून आपणांस असा सिद्धांत करितां येतो कीं, ह्या जगाच्या प्रत्येक भागाचें अस्तित्व ज्यापेक्षां उष्णतेवर अवलंबून आहे, त्यापेक्षां या साऱ्या जगाचें अस्तित्व देखील बहुत काळापासून तिजवरच अवलंबून असलें पाहिजे. सर्व सजीव प्राणिमात्राच्या उत्पत्तीस, वृद्धीस आणि संरक्षणास उष्णता कारण असून तिनें हें सर्व जग व्यापिलें आहे. हें एक ह्या जगाचें अस्तित्व उष्णतेवर अवलंबून आहे, ह्या आपल्या सिद्धांतास दुसरें एक प्रमाण आहे.

११. यास्तव ह्या जगाचें संरक्षण करणें आणि त्याची एकसारखी स्थिति कायम ठेवणें हें कार्य ज्या तत्वापासून घडतें त्यालाच आपण प्रकृती म्हणावें हें योग्य आहे. ती प्रकृति इंद्रियजन्य ज्ञानयुक्त असून बुद्धिसंपन्न आहे असें सिद्ध होतें; कारण निरनिराळे अवयव एकत्र मिळून झालेली जी वस्तु तिजमध्यें कोणता तरी एक गुण विशेष असला पाहिजे, जसें मनुष्यामध्यें मन आणि जनावरांमध्यें त्यासारखें दुसरें कांहीं तरी कीं, ज्यापासून सर्व प्रकारच्या कामना आणि इच्छा उद्भूत होतात. वृक्ष आणि इतर सर्व वनस्पती यांमध्येंही तसा विशेष गुण असून तो त्यांच्या मुळांत असतो अशी समजूत आहे. ज्या पदार्थांत इतर गुणांपेक्षां जो उत्तम गुण असतो त्यालाच त्या पदार्थाचा विशेष गुण असें मी ह्मणतों. यास्तव ज्या वस्तूमध्यें प्रकृतीचा विशेष गुण असतो ती वस्तू सगळ्यापेक्षां उत्तम असून सर्व पदार्थांवर वर्चस्व व सत्ता करण्यास अत्यंत योग्य असली पाहिजे.

आतां आपण असें पहातों कीं, अशी कोणतीच वस्तु नाहीं कीं, जी ह्या विश्वाचा भाग नाहीं, आणि ज्यापेक्षां प्रत्येक भागांत इंद्रियजन्य ज्ञान आणि बुद्धि आहे त्यापेक्षां या जगामध्यें हे पूर्वोक्त गुण (इंद्रियजन्य

ज्ञान व बुद्धि) विशेष प्रमाणानें व विशेष प्रबळ असले पाहिजेत. यास्तव हें सर्व व्यापक जग ही एक देवता आहे आणि ती अगाध शक्तियुक्त आहे हें सिद्ध आहे.

ह्या जगांतील उष्णता फार पवित्र, स्वच्छ व चपळ असून आपल्या ठायीं जी उष्णता आहे त्यापेक्षां ती फार श्रेष्ठ आहे. सृष्टिजन्य पदार्थांविषयीं आपण जें ज्ञान संपादन केलें आहे त्यावरून ही जगांतील उष्णता त्या सर्वांस जीवन देऊन त्यांचें संरक्षण करिते, असा आपला अनुभव आहे. ही उष्णता मनुष्याचें व जनावराचें संरक्षण करिते, त्यांस चलन देते व विचारशक्ति देते. अशी विशेष गुणविशिष्ट उष्णता ज्या जगामध्यें आहे त्या जगामध्यें ज्ञानशक्ति नाहीं असें ह्मणणें असमंजस आहे.

१२. आतां यासंबंधानें प्लेटो याचें काय ह्मणणें आहे तें आपणांस ऐकिलें पाहिजे; कारण तत्वज्ञानी यांजमध्यें आपण त्यास देवाप्रमाणें मानतों. त्याचें ह्मणणें असें आहे कीं, गतीच्या दोन जाती आहेत. एक अंतस्थ व दुसरी बाह्य. पदार्थांच्या अंगीं चलनवलन पावण्याचा स्वाभाविक धर्म असतो, ती अंतस्थगति; आणि पदार्थांवर बाहेरून प्रेरणा झाली म्हणजे ते चलनवलन पावतात ती बाह्यगति. ही जगांतील उष्णता जगाच्या गतीचें मुख्य कारण असून तिला बाह्य प्रेरणा लागत नाहीं. स्वाभाविक चलनवलन हें दैविक शक्तीचा प्रादुर्भाव असल्यामुळें बाह्य प्रेरणा झाल्यामुळें जें चलनवलन होतें त्यापेक्षां तें विशेष दिव्य भावांनीं युक्त आहे. नैसर्गिक चलनवलनशक्ति फक्त मनाच्या ठायीं मात्र आहे, असा प्लेटोचा अभिप्राय असून गतीचा मूळ उगम मनापासून आहे असाही त्याचा अभिप्राय आहे. यास्तव ज्यापेक्षां ह्या जगांतील उष्णता सर्व प्रकारच्या चलनवलनास कारणीभूत आहे, आणि त्या उष्णतेवर कांहीं बाह्य प्रेरणा होऊन तिला

चलनवलन प्राप्त होत नाहीं, आपोआप उत्पन्न होतें, तेव्हां उष्णता ही ह्या जगाचें मन आहे, आणि त्यापासून असें निष्पन्न होतें कीं जग हें सप्राण आहे.

या विचारसरणीवरून असें मत झालें आहे कीं ह्या जगाला ज्ञानशक्ति आहे; कारण त्याच्या कोणत्याही भागापेक्षां त्याच्यामध्यें जास्ती गुण असले पाहिजेत. जसा आपल्या शरिराचा कोणताही अवयव सगळ्या शरीरायेवढा होऊं शकत नाहीं तसा जगाचा कोणताही विशेष भाग जगायेवढा होऊं शकत नाहीं. यावरून असें सिद्ध होतें कीं, ज्ञानशक्ति हा गुण जगाच्या ठायीं विशेष असला पाहिजे, नाहीं तर जगाचा अंशभूत जो मनुष्य व जो बुद्धिसंपन्न आहे तो या जगापेक्षां श्रेष्ठ होईल.

आणि ह्याप्रमाणें आपण जर ह्या स्थावरजंगमात्मक सृष्टींतील अगदीं ओबडधोबड पदार्थांच्या स्वभावापासून अत्युत्तम पदार्थांच्या स्वभावापर्यंत अवलोकन करीत गेलों तर आपण शेवटीं देवतांच्या स्वभावापर्यंत जाऊन पोंचतों. आपण वनस्पतिवर्गाकडे लक्ष दिलें म्हणजे वनस्पतींचें संरक्षण होऊन वृद्धि व्हावी, इतक्यापुरतीच त्यांच्या संबंधानें प्रकृतीनें व्यवस्था केली आहे. पशूंना तिनें गति दिली असून इंद्रियविशिष्ट केले आहेत, व अपकारक वर्ज्य करण्याची आणि हितकारक ग्रहण करण्याची त्यांस बुद्धिशक्ति दिली आहे. मानवी प्राण्यांच्या संबंधानें प्रकृतीनें जास्त कृपा केली आहे. तिनें त्यांस जी बुद्धि दिली आहे त्या योगानें त्यांना आपल्या मनोवासनांवर अधिकार चालवितां येतो; म्हणजे कांहीं वासना नियमित प्रमाणावर आणून ठेवितां येतात, व कांहीं अगदीं जिंकून आत्मवश करून ठेवितां येतात.

१३. या पूर्वोक्त तीन वर्गांहून आणखी एक चवथा वर्ग आहे. ह्या वर्गांतील प्राण्यांची उत्पत्ति झाल्या वेळेपासून ते स्वभावतःच समीचीन व शुद्ध बुद्धिशक्तियुक्त असून ती बुद्धिशक्ति मनुष्याच्या बुद्धिशक्तीपेक्षां विशेष असल्यामुळें तो दैविक गुण आहे ह्मणजे तो जगाचा गुण आहे असें मानिलें पाहिजे; कारण जगाच्या ठायीं पूर्ण आणि निर्दोष अशी नैसर्गिक बुद्धि आहे. कोणत्याही व्यवस्थेंत पूर्ण आणि निर्दोष असें कांहींच नाहीं असें ह्मणणें न्याय्य नाहीं. ह्या जगांतील कोणत्याही वस्तूविषयीं आपण विचार केला ह्मणजे तीस तिच्या प्रमाणानें पूर्ण अवस्था आहेच. वनस्पति अथवा पशू यांच्या आयुष्यक्रमांत कांहीं जबरदस्त हरकत आली नाहीं, तर ते आपल्या पूर्ण अवस्थेच्या परमावधीपर्यंत सुखरूप जाऊन पोंचतात; आणि जशी चित्रकला, शिल्पशास्त्र आणि इतर दुसऱ्या कळाकुसरी यांस देखील पूर्णावस्था प्राप्त होण्याचा संभव आहे, आणि कधीं कधीं ती प्राप्त होते, या न्यायानें या जगांतील अगदीं सामान्य वस्तूला जर परिपूर्णावस्था आहे तर ते स्वतः परिपूर्ण असणें, यांत अपूर्व आणि ग्रहणानर्ह तें काय आहे?

या सृष्टींतील इतर वस्तूंच्या नित्यक्रमास बाहेरील अनेकविध विघ्नांपासून हरकती येण्याचा संभव आहे आणि त्यामुळें त्या पूर्णावस्थेला प्राप्त होणार नाहींत, हें संभवनीय आहे. परंतु ह्या जगाला प्रतिबंध करील अशी अन्य वस्तुशक्तीच नाहीं, कारण तें स्वतःच सर्व वस्तूंचें नियामक आहे. यास्तव त्याची बरोबरी करील अशी कांहीं वस्तु असूं शकणार नाहीं.

• ह्याप्रमाणें हें जग ज्ञान आणि बुद्धिसंपन्न असून आपणांस सर्व वस्तूंचा भरपूर पुरवठा करीत आहे. हा आपला अनुभव असतां त्याच्या परिपूर्णतेविषयीं जे वाद घालतात ते किती हो बालबुद्धि आहेत?

कांहीं लोक तें अमर्याद व परिपूर्ण आहे असें कबूल करितात, परंतु तें सप्राण आहे असें प्रथमारंभीं कबूल करीत नाहींत; आणि सरतेशेवटीं तें सदसद्विचारी आणि ज्ञानवान् आहे ही गोष्ट तर त्यांस सर्वथैव मान्य नाहीं. हे गुण जर जगाच्या ठायीं नाहींत तर तें परिपूर्ण कसें असूं शकेल ? तें जर वनस्पतिसारखें किंवा निदान पशूंसारखें असतें तर त्यास अतिशय चांगलें कां म्हणावें आणि अतिवाईट कां ह्मणूं नये याला कांहीं कारण नाहीं, आणि त्याजविषयीं विचार करण्यांत वेळेचा आणि बुद्धीचा व्यय करणें योग्य झालें नसतें. ह्या जगाच्या ठायीं नुसती बुद्धि असती आणि आरंभापासून शहाणपण नसतें तर मनुष्यापेक्षां देखील ह्या जगाची स्थिति वाईट झाली असती ; कारण मनुष्याला शहाणें होतां आलें असतें. परंतु हें जग जर अनादिकालापासून ज्ञानशून्य असतें तर त्यास ज्ञानप्राप्ती करून घेण्याचें साधनच नसतें. परंतु अशी कल्पना करणें ज्यापेक्षां असमंजस आहे त्यापेक्षां अनाद्यंतकालापासून तें ज्ञानसंपन्न आहे असें मानलें पाहिजे, आणि ती एक देवता आहे असें गृहीत धरलें पाहिजे. जगापेक्षां दुसरी कोणतीही वस्तु पूर्ण नाहीं. त्याला सर्व गोष्टींचा उत्तम पुरवठा होत असून त्याचे सर्व भाग पूर्णपणें निर्दोष आहेत.

१४. क्रिसिपूसनें यासंबंधानें मनांत भरण्याजोग्या शब्दांनीं निरूपण केलें आहे. तो ह्मणतो, “ तरवारीसाठीं म्यान करितात, त्याप्रमाणें हें विश्व खेरीज करून सर्व वस्तु दुसऱ्या कोणत्या तरी वस्तूसाठीं केल्या आहेत. ”

उदाहरण, जमिनीपासून सर्व जातींचीं धान्यें आणि फळें उत्पन्न होतात. तीं पशूंसाठीं उत्पन्न केलीं असून पशू मनुष्यासाठीं उत्पन्न केले आहेत. घोडे वाहनाकरितां, बैल जमीन नांगरण्याकरितां, कुत्रे

शिकारीकरितां आणि पहारा करण्याकरितां. परंतु मनुष्य उत्पन्न करण्याचा ईश्वराचा उद्देश-असा आहे कीं, त्यानें जगाचें अनुकरण करून त्याजविषयीं अनुचिंतन करावें; कारण मनुष्य हें कांहीं सर्वोपरी पूर्ण नाहीं. परंतु त्याजमध्यें पूर्णतेचा कांहीं तरी अंश आहे, असें ह्मणण्याचा मला अधिकार आहे. परंतु ह्या जगांत सर्व वस्तूंचा समावेश झाला असल्यामुळें आणि त्यांत ज्यांचा समावेश झाला नाहीं त्या वस्तूंचें मुळींच अस्तित्व नसल्यामुळें हें जग सर्वांशीं परिपूर्ण आहे. जर तें सर्वांशीं परिपूर्ण आहे तर त्यांत उणेपणा कसा असूं शकेल? त्याला ज्ञान आणि बुद्धि नाहीं असें होणार नाहीं. कारण कीं, इतर गुणांपेक्षां त्या गुणांची विशेष गरज आहे. क्रिसिपूस आणखी असें म्हणतो कीं, प्रत्येक वस्तु परिपूर्ण दशेला प्राप्त झाली म्हणजे ती आपल्या जातींतील अपूर्ण अवस्थेंतल्या वस्तूंपेक्षां श्रेष्ठ असते. जसें—घोडा आणि शिंगरूं, कुत्रा आणि त्याचें पिल्लूं आणि मनुष्य आणि मूल. तस्मात् या जगांत ज्या कांहीं उत्तम वस्तु आहेत त्यांच्या अंगीं कांहीं अंशीं तरी परिपूर्णता आणि निर्दोषपणा असलाच पाहिजे. परंतु सर्वांशीं परिपूर्ण असें या जगाशिवाय दुसरें कांहीं नाहीं, आणि सद्गुणाशिवाय दुसरी उत्तम वस्तु नाहीं; म्हणून हें जग नैसर्गिक स्वभावानें सद्गुणी आहे. मनुष्य परिपूर्ण नसून देखील त्याजमध्यें सद्गुण आहे. तेव्हां जग परिपूर्ण असल्यानें नैसर्गिक स्वभावानें सद्गुणी आहे, याविषयीं आपण दुसरें बळकट प्रमाण कोणतें दाखवावें? सारांश, जग सद्गुणयुक्त असून सुज्ञ आहे म्हणून ती एक देवता आहे.

१९. ह्या जगाच्या ठायीं देवत्व आहे, असें परिपूर्ण सिद्ध झालें आहे. त्याप्रमाणेंच नक्षत्रांच्या ठायीं देखील देवत्व आहे, असें आपल्यास कबूल केलें पाहिजे. तीं अतिशय तेजस्वी असून अतिशय

शुभ्र अशा *ईथरपासून निर्माण केलीं आहेत. त्यांजमध्यें कोणत्याही दुसऱ्या पदार्थांचें मिश्रण झालेलें नाहीं; आणि नक्षत्रें केवळ तेजोमय आणि पारदर्शक असल्यामुळें तीं प्राणयुक्त, इंद्रियविशिष्ट आणि ज्ञानवान् आहेत, असें ह्मणणें न्यायानुरूप आहे. क्लीनथेस असें म्हणतो कीं, त्वक् आणि चक्षु, ह्या दोन इंद्रियांच्या प्रमाणावरून ही गोष्ट सिद्ध होते. नक्षत्रांचे देह अगदीं तेजोमय आहेत; कारण सूर्याच्या आंगची उष्णता आणि कांती इतर उष्ण पदार्थांपेक्षां अतिशय प्रखर आहे. ह्या प्रचंड जगावर त्याचा प्रकाश पडतो, आणि त्याच्या आंगीं नुस्ती उष्णताच नाहीं, तो सदां जळत असतो. तसें जाज्वल्य त्याच्या आंगीं नसतें तर तो सदा उष्णही नसता, आणि सर्व जगावर त्याच्यानें प्रकाश पाडवला नसता. क्लीनथेस असें म्हणतो कीं, सूर्य हा अग्निमय असून समुद्रापासून ज्या वाफा निघतात, तें त्याचें सरपण आहे; कारण कीं, सरपणावांचून अग्नि कांहीं सदैव टिकून राहणार नाहीं. आपण अन्न शिजविण्याकरितां किंवा शरिराला उष्णता आणण्याकरितां ज्या अग्नीचा उपयोग करितों त्या जातीचा सूर्य असो, किंवा सजीव प्राण्याच्या शरीरांत जी उष्णता आहे त्या जातीचा तो असो.

आपल्या सोयीसाठीं ज्याचा आपण उपयोग करितों तो अग्नि प्रत्येक वस्तूला जाळून फस्त करणारा आहे. मग ती किती कां बळकट असेना ! तिचा त्याच्याशीं संयोग झाला कीं तिचा नाश झालाच. शरीरस्थ उष्णता ही त्याहून उलट आहे. ती सप्राण असून शरिरहितकर आहे. सर्व वस्तूंला प्राण देणें, संरक्षण करणें, वाढविणें आणि पोषण करणें, हे गुण तिच्या आंगीं आहेत. शिवाय ज्ञानेंद्रियांची उत्पादक तीच आहे. तस्मात् त्या उष्णतेची आणि सूर्याच्या

---

* वातावरणाच्या शेवटीं एक शुद्ध हवा आहे, तीस ईथर म्हणतात.

उष्णतेची एक जाती आहे, यांत कांहीं संशय घेण्यासारखें नाहीं. कारण सूर्याची उष्णता ही सर्व वस्तूंचें पोषण करून त्यांस परिपक्वतेस आणिते; आणि ज्यापेक्षां सूर्याची उष्णता सजीव प्राण्याच्या शरीरांत उष्णता आहे त्या जातीची आहे, तेव्हां सूर्यही सप्राण असला पाहिजे, आणि त्याप्रमाणें आकाशस्थ इतर तारेही सप्राण असले पाहिजेत.

*आरिस्टॉटल याचा असा अभिप्राय आहे कीं, ईश्वरानें कांहीं

---

* हा एक महान् तत्वज्ञानी होऊन गेला. त्याचा जन्म एका वैद्याच्या पोटीं स्टॅगिरा या नगरांत झाला. हें शहर मॅसेडोनिया देशाच्या सरहद्दीवर आहे. बाप वारल्यानंतर तो प्लेटो याचीं भाषणें ऐकण्याकरितां अथेन्स येथें गेला. तेथें लवकरच तो पराकाष्ठेचा बुद्धिवान् आहे, असें दिसून आलें. लहानपणीं तो बुद्धीनें जड असून त्याचा स्वभाव दुर्वृत्त होता, परंतु तरुण वयांत तो पराकाष्ठेचा बुद्धिवान् निवडला. त्यानें एकसारखीं वीस वर्षें प्लेटोचीं भाषणें ऐकण्यांत घालविलीं. नंतर तो लोकांस तत्वज्ञान शिकवूं लागला. आहारविहार करण्यांत तो फार नेमस्त होता. तो फार थोडा निजत असे. एका हातांत एक शिशाची गोळी धरून तो हात पलंगाच्या बाहेर ठेवीत असे, आणि त्या हाताखालीं एक पितळेचें ताट ठेवीत असे. ती गोळी झोंपेमुळें हातांतून सुटून ताटांत पडली म्हणजे तीपासून जो आवाज होई त्यामुळें तो लागलाच जागा होत असे. असें ह्मणतात कीं, तो कुरूप होता परंतु विधात्यानें त्याला कुरूप करून जो त्याचा तोटा केला होता तो त्यास विलक्षण बुद्धि देऊन भरून दिला होता. अलेक्झान्डर धी ग्रेट अरिस्टॉटलच्या शिक्षणाखालीं होता आणि तो त्याचा फारच सन्मान ठेवीत असे. एका तत्वज्ञान्यानें असें ह्मटलें आहे कीं, अलेक्झान्डरनें आपला बाप फिलिप याजपासून जी सत्ता आणि वैभव मिळविलें त्यापेक्षां आरिस्टॉटल याजपासून जें शिक्षण मिळालें त्याची किंमत फार जास्त होती. नानाविध विषयांवर त्यानें जे ग्रंथ लिहिले आहेत, ते सर्व प्रसिद्ध आहेत. त्यानें आपल्या मरणकाळीं ते सर्व थेवोफ्रास्टस् याच्या स्वाधीन केले. त्याजपासून एकानें विकत घेऊन ते सर्व अलेक्झान्ड्रियाच्या प्रसिद्ध पुस्तकालयांत ठेविले होते. अलेक्झांडर याचा पिता फिलिप यानें आरिस्टॉटल यास पत्र लिहिलें तें अद्याप जतन करून ठेविलें आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं " मला मुलगा झाला हें वर्तमान आपल्यास कळवितों. मला देवांनीं पुत्रवान

प्राणी पृथ्वीवर, कांहीं उदकांत आणि कांहीं हवेंत उत्पन्न केले आहेत. आणि आकाश हा विश्वाचा भाग प्राण्योत्पत्तीस विशेष योग्य असून त्यांत ईश्वरानें मुळींच प्राणी उत्पन्न केले नाहींत अशी कल्पना करणें असमंजस आहे. नक्षत्रें हीं आकाशांत आहेत, आणि ज्यापेक्षां आकाश हें मूळ तत्व परम कुशळ आणि सदा गतिमान असून त्याची शक्ती कधींही क्षीण होत नाहीं, त्यापेक्षां त्यांत जे प्राणी उत्पन्न होतात, ते अति कुशाग्रबुद्धीचे आणि अतिशय वेगवान असावे. ही कल्पना निर्विवाद ग्राह्य करण्यास पात्र आहे; यास्तव नक्षत्रें हीं आकाशांत उत्पन्न केल्यामुळें हें स्वाभाविक अनुमान आहे कीं, देवांच्या वर्गांत त्यांची गणना करावी, अशी त्यांस उत्तम बुद्धि आणि ज्ञान आहे.

१६. आपल्याला असा अनुभव आहे कीं, ज्या देशाची हवा निर्मळ आणि निर्दोष आहे तेथें राहणारे लोक यांची मेधा सकृत्ग्राही असते, तशी जड हवेंत राहणाऱ्या लोकांची असत नाहीं. दुसरें असेंही मानिलें आहे कीं, मनुष्य जें अन्न भक्षण करितें, त्या अन्नगुणाचा त्याच्या बुद्धीवर परिणाम घडतो; तेव्हां आकाशस्थ नक्षत्रें हीं उत्तम ज्ञानसंपन्न आहेत, हें स्पष्ट आहे. कारण ज्या प्रदेशांत तीं रहातात तेथील हवा चांगली आहे, आणि पृथ्वीपासून व समुद्रापासून ज्या वाफा निघतात, आणि आकाशांत जातांना ज्यांचें शुद्धीकरण होतें त्या, त्या नक्षत्रांचा आहार आहे. नक्षत्रांचे फेरफार वेगळे गमनमार्ग, नियमित गती यांवरूनही त्यांच्या ठायीं इंद्रियजन्य ज्ञान

---

केलें या अनुग्रहाबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहें. परंतु आपण त्याचें गुरुत्व कराल अशा वेळेस मला पुत्रवान् केलें याबद्दल त्यांचा मी फार उपकारी आहें. मला अशी आशा आहे कीं, आपण त्यास माझ्या मागें मॅसेडोन याचें राज्य चालविण्यास योग्य कराल." ख्रिस्ती शकाच्यापूर्वी ३२२व्या वर्षीं आणि आपल्या वयाचे ६३ व्या वर्षीं आरिस्टॉटल मरण पावला.

आणि बुद्धि आहे, हें स्पष्ट होतें. कारण गतीमध्यें न्यूनाधिकपणा नसणें, आणि दुसऱ्याच्या गमनमार्गांत अडथळा न आणितां आपल्याच मार्गानें गमन करणें, हें बुद्धीचें कार्य आहे. या गोष्टी कांहीं यदृच्छें-करून घडत नाहींत.

आरिस्टॉटल यानें आणखी फार सूक्ष्म विचार केला आहे, आणि त्याबद्दल त्यास फार शाबासकी दिली पाहिजे. त्याचा सिद्धांत असा आहे कीं, पदार्थाला चलनवलन प्राप्त होण्यास तीन कारणें आहेत. कांहीं पदार्थांच्या आंगीं स्वाभाविक वेग असतो, यामुळें ते गतिमान असतात. कांहीं पदार्थांवर बाहेरून प्रेरणा झाली म्हणजे त्यांस चलनवलन प्राप्त होतें, आणि कांहीं पदार्थ आपल्या इच्छेनें चलन-वलन पावतात. सूर्य, चंद्र आणि सर्व तारे यांस गति आहे; परंतु गतीचे पहिले दोन प्रकार सांगितले त्या जातीची त्यांची गति नाहीं. ते आपल्या इच्छेनें गमन करणारे आहेत. ज्या पदार्थांच्या आंगीं स्वाभाविक वेग असल्यामुळें चलनवलन पावतात त्यांस ऐच्छिक गति नाहीं. आपल्या भारामुळें खालीं उतरणें किंवा हलकेपणा-मुळें वर जाणें या दोनच गति त्यांस आहेत; परंतु सूर्य, चंद्र आणि नक्षत्रांच्या संबंधानें कांहीं तशी स्थिति नाहीं. ते नियमित वर्तुळांत आणि आपल्या कक्षेमध्यें गमन करीत असतात. त्यांजवर एखाद्या प्रबळ वस्तुशक्तीची प्रेरणा झाल्यामुळें त्यांस आपला स्व-भाव टाकून देऊन भ्रमण करावें लागतें असें कांहीं ह्मणतां येणार नाहीं; सबब त्यांची गति ऐच्छिक आहे, हें अगदीं स्पष्ट आहे. ही गोष्ट ज्याच्या मनांत ठसली आहे, त्याला ही गोष्ट जे मान्य करीत नाहींत आणि देवांचें अस्तित्व ज्यांस मान्य नाहीं ते लोक अज्ञानांध-कारांत अगदीं मग्न झाले असून पापी आहेत, असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. देवांचें अस्तित्व नाकबूल करणें किंवा त्यांस मनोरथ व कर्त-

पणा नाहीं, असें ह्मणणें, यांत कांहीं फारसा भेद नाहीं. कारण जें अगदीं जड आहे, त्याचें अस्तित्व कधींही टिकाऊ असूं शकणार नाहीं, असा माझा अभिप्राय आहे. देवांचें अस्तित्व इतकें स्पष्ट आहे कीं, तें जो नाकबूल करील त्याची बुद्धि ठिकाणीं आहे असें मी कधींही मानणार नाहीं.

१७. आतां आपणांस देव करतात काय, याविषयीं विचार करावयाचा आहे. आपल्या शरिरावयवांपासून आणि आपल्या पहाण्यांत नित्य ज्या गोष्टी येतात, त्यांपासून प्राप्त झालेलें ज्ञान एका बाजूस ठेवून आपले विचार आणि अभिप्राय बदलणें यासारखें बिकट कर्म दुसरें नाहीं. आणि त्यांत ज्ञानशून्य लोकसमुदाय आणि त्यांच्या पंक्तीस नेऊन बसविण्यास जे तत्वज्ञानी पात्र आहेत त्यांस स्वतःच्या शरिरापासून आणि नित्य अवलोकनांत ज्या गोष्टी येतात त्यांपासून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा त्यांच्या मनावर इतका जबर पगडा बसला आहे कीं, त्या अमर्त्य देवांना मनुष्याकृतीनें सजवि-ण्याखेरीज त्यांच्या स्वरूपाविषयीं दुसरे विचार मनांत आणण्याची त्यांजमध्यें योग्यताच राहिली नाहीं. या निर्बळ मताचें कोटा यानें उत्तम रीतीनें खंडन केलें आहे. सबब त्याबद्दल मला कांहीं माझे विचार कळविण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं. देवांविषयीं आपण पूर्वीं विचार केला आहे. त्यांत आपला तर्क असा आहे कीं, देव हे प्राणविशिष्ट असून त्यांहून दुसरें कोणी श्रेष्ठ नाहीं. तेव्हा सर्व वस्तूंपेक्षां अत्युत्तम विश्वाच्या ठायीं मन आणि ईशशक्ति आहे, असा तर्क केला असतां त्यांत काय दोष आहे, हें कांहीं मला कळत नाहीं. उलट ही कल्पना मला विशेष समर्पक वाटते.

एपिक्यूरस यास स्वतःच्या विचाराविषयीं किती कां अभिमान असेना; ज्याला आपल्या देशाला शोभेल असें चातुर्य आणि अक्कल

नाहीं त्या मनुष्यामध्यें दुसऱ्याच्या मतांची थट्टा करण्याची काहीं योग्यता येत नाहीं. ही चपळ आणि वर्तुळ देवता मला बोधातीत आहे, असें त्यास खुशाल म्हणूं द्या, परंतु जें मूळतत्व त्यास देखील मान्य झालें आहे त्याजपासून तो माझें मन कधींही फिरवूं शकणार नाहीं. देव आहेत असा त्याचा अभिप्राय आहे. आणि देव आहेत हें जर त्यास कबूल आहे तर सर्वांशीं परिपूर्ण अशा वस्तूंचें अस्तित्व तो कबूल करून चुकला आहे. हें जग सर्वांशीं परिपूर्ण आहे यांत कांहीं संशय नाहीं. प्राण, ज्ञानेंद्रियें, तर्क आणि बुद्धि हे गुणधर्म ज्या वस्तूमध्यें आहेत ती वस्तु तत्गुणहीन वस्तूपेक्षां श्रेष्ठ आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ह्या जगाला प्राण, ज्ञानेंद्रियें, तर्क आणि बुद्धि आहेत. तस्मात् ती देवता आहे, याविषयीं भ्रांती नाहीं. ज्या वस्तूंच्या उत्पत्तीस हें जग कारण आहे, त्यांचीं प्रमाणें देऊन वर सांगितलेली गोष्ट आणखी विशेष स्पष्ट करून दाखवितां येईल.

१८. व्हिलेनस, मी तुला अशी विनंती करितों कीं, आपल्यास कोणत्याही प्रकारचें अगदीं ज्ञान नाहीं, असें तूं नेहमीं ह्मणत जाऊं नकोस. गोपुच्छाकृती लंबवर्तुळ आणि पिरॅमिड ह्या आकृती तुझ्या दृष्टीनें वर्तुळापेक्षां सुंदर आहेत. इतर मनुष्यांच्या नेत्रांपेक्षां तुझ्या नेत्रांची रचनाच कांहीं निराळ्या प्रकारची असेल, ह्मणून तुला तसें दिसतें. वर्तुळापेक्षां त्या आकृतीमध्यें मला कांहीं सुंदरपणा दिसत नाहीं. वर्तुळामध्यें सर्व जातींच्या आकृतींचा समावेश झाला आहे. त्याजमध्यें ओबडधोबडपणा नाहीं. नापसंत असें त्यांत कांहीं नाहीं. तें न्यूनकोण नाहीं, विशालकोण नाहीं, समकोण नाहीं, कांहीं भग्न झालेलें नाहीं किंवा त्याला कोठें कांहीं फुगा आलेला नाहीं. दोनच आकृती काय त्या अति सुंदर आहेत.

भरीव पदार्थांत गोलाकृति आणि क्षेत्रामध्यें मंडळ, ह्याच आकृतीं-मध्यें सर्व भागाचा अगदीं सारखेपणा आहे. मध्यबिंदूपासून प्रत्येक शेवट भाग अगदीं सारख्या अंतरावर आहे. ह्या सृष्टिरचनेच्या व्यव-स्थेंत आणखी जास्त शहाणपण तें कोणतें असावें ? तूं नैसर्गिक तत्व-ज्ञानी आहेस, तूं कधीं पाटीवर धूळ घातली नाहींस, यास्तव गोला-कृतीवांचून गतीचा सारखेपणा आणि नियमित क्रम कधींही राह-णार नाहीं, हें तुला नवें शिकलें पाहिजे. हें जग वर्तुळ आहे किंवा नाहीं ह्याविषयीं संशय घेणें आणि तें दुसऱ्या एखाद्या आकृ-तीचें नसेल कशावरून आणि निरनिराळ्या आकृतींचीं अनंत जगें नसतील हें तरी कशावरून ? असें म्हणणें यासारखें ज्ञानशून्यदर्शक दुसरें कर्म नाहीं. दोन आणि दोन हे चारांबरोबर आहेत असें जर एपिक्यूरस कधीं शिकला असता तर त्यानें असें कधींही म्हटलें नसतें. एपिक्यूरस आपल्यास उचित वाटेल तशा कल्पना करितांना तो वर दृष्टी करून आकाशाकडे कांहीं अवलोकन करीत नाहीं.

१९. नक्षत्रांमध्यें दोन जाती आहेत. एका जातीचीं नक्षत्रें नित्य समगतीनें पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रवास करीत असतात. नेहमींच्या गमनमार्गापासून तीं किंचित् देखील इकडे तिकडे सरकत नाहींत; आणि दुसऱ्या जातीचीं नक्षत्रें आहेत त्यांस दोन प्रकारच्या गती आहेत. निरंतर आणि एकसारख्या गतीनें पूर्वेकडून पश्चिमेकडे गमन करून तीं पूर्वेकडेही सरकत असतात. ह्या गोष्टीवरून आम्ही ह्या जगाच्या आंगीं चपळत्व आहे ( तें वर्तुळ आकारा-वांचून कधींही असूं शकावयाचें नाहीं ) आणि नक्षत्रांचे गमनमार्ग वर्तुळ आहेत असें सिद्ध करितों. सर्व नक्षत्रांचा राजा सूर्य याचें परिभ्रमण अशा प्रकारचें आहे कीं, त्या योगानें ह्या सर्व पृथ्वीवर त्याचा प्रकाश पडतो. पृथ्वीच्या एका भागावर प्रकाश पडला म्हणजे

दुसऱ्या भागावर अंधार असतो. पृथ्वीची छाया मध्यें आली म्हणजे रात्र होते, आणि रात्रीचा काळ दिवसाच्या काळाइतकाच आहे. सूर्याचें जाणें येणें नियमित असल्यामुळें शीत आणि उष्ण हीं समप्रमाण असतात. सूर्याला आपला प्रवास पूर्ण करण्याला तीनशें पांसष्ट दिवस आणि सुमारें सहा तास लागतात. एका वेळेस तो उत्तरेकडे वळत असतो आणि दुसऱ्या वेळेस दक्षिणेकडे वळत असतो यामुळें ग्रीष्म, हिम, वसंत आणि शरत् या चार ऋतूंची उत्पत्ति होते; आणि समुद्रापासून आणि जमिनीपासून ज्या वस्तु उत्पन्न होतात त्यांस हे ऋतूच कारणीभूत आहेत, असें आम्हीं मानितों.

सूर्य जो प्रवास एका वर्षानें करितो तोच प्रवास चंद्र एका महिन्यांत आटपतो. तो जसजसा सूर्याजवळ जातो तसतसें त्याचें तेज अंधुक असतें, आणि जसजसा सूर्यापासून दूर अंतरावर जातो, तसतशी त्याची कांती वाढत जाते. त्याच्या तेजाची वृद्धि किंवा ऱ्हास होतो, तेव्हां त्याच्या आकृतीमध्यें आणि आकारामध्यें फेरबदल होतो इतकेंच नाहीं, तर त्याच्या स्थानामध्यें देखील पालट होते. तो कांहीं वेळ उत्तरेस आणि कांहीं वेळ दक्षिणेस असतो. या गतीच्या सरणीनें त्यास देखील सूर्याप्रमाणें कांहींअंशीं दक्षिण आणि उत्तर हीं दोन अयनें आहेत. त्याच्या आंगीं जी क्रियाशक्ति आहे तिच्या योगानें सजीव प्राण्याची वृद्धि आणि उपजीवन होतें, आणि सर्व वनस्पतींला परिपक्कदशा येऊन त्या परिपूर्ण अवस्थेला पावतात.

२०. परंतु ज्यांला मूर्खपणानें लोक भटकणारे तारे म्हणतात त्या पांच ग्रहांची गति फारच आश्चर्यजनक आहे. ते कांहीं उगीच इकडून तिकडे भटक्या मारीत नाहींत. अनाद्यंत काळापासून त्यांचें आगमन आणि परावर्तन अगदीं नियमानें घडत आहे. त्या ग्रहांमध्यें एक चम-

त्कारिक प्रकार आहे. कधीं कधीं ते दृष्टिगोचर असतात, कधीं कधीं अदृश्य होतात; कधीं कधीं ते सूर्याकडे जात असतात, कधीं कधीं सूर्यापासून पराङ्मुख होतात; कधीं कधीं ते सूर्यापुढें चालतात, कधीं कधीं त्याच्या मागें चालतात; कधीं कधीं ते फार जलद चालतात, आणि कधीं कधीं ते मंदगती असतात; आणि कधीं कधीं तर ते मुळींच हालत नाहींत, एके ठिकाणीं स्तब्ध असतात. ह्या ग्रहांच्या विषम गतींवरून गणितविद्याविशारद यांनीं सूर्य, चंद्र आणि पांच ग्रह आपआपली प्रदक्षिणा संपवून ज्या वर्षीं आपआपल्या पूर्व स्थळावर येतात त्या वर्षाला महा वर्ष म्हटलें आहे. अशी वेळ कधीं येईल याविषयीं मोठा वाद आहे; परंतु कधीं तरी अशी वेळ आलीच पाहिजे ही गोष्ट सिद्ध आहे; कारण ज्याला शनी म्हणतात तो आपली प्रदक्षिणा तीस वर्षांनीं पुरी करितो. हा पृथ्वीपासून अति दूर आहे. ह्या ग्रहाच्या खालीं गुरु हा ग्रह आहे, आणि तो शनीपेक्षां पृथ्वीच्या जवळ आहे. राशिचक्राला प्रदक्षिणा करून निघालेल्या जागेवर पुनः येण्यास त्याला बारा वर्षें लागतात. गुरूच्याजवळ मंगळ हा ग्रह आहे. ह्याला राशिचक्राची प्रदक्षिणा पुरी करावयास चोवीस महिने आणि सहा दिवस लागतात, अशी माझी कल्पना आहे. त्याच्याजवळ बुध हा ग्रह आहे. त्याला प्रदक्षिणा करण्यास एक वर्षाहून फार थोडा काळ लागतो. हा सूर्यापासून एका राशीपेक्षां फार लांब असत नाहीं. या पांच ग्रहांमध्यें सर्वांहून खालीं आणि पृथ्वीच्या अगदीं सन्निध शुक्र हा ग्रह आहे. सूर्याच्या पूर्वीं ह्याचा उदय होतो तेव्हां त्यास प्रातःकाळचा तारा आणि सूर्य अस्ताचलास गेल्यानंतर हा अस्तास जातो, तेव्हां त्यास अस्तमानचा तारा ह्मणतात. ह्याला राशिचक्राला प्रदक्षिणा करण्यास एक वर्ष लागतें, आणि सूर्यापासून हा दोन राशींच्या अंतरापेक्षां जास्त अंतरावर

कधींही असत नाहीं. कधीं तो सूर्याच्या पुढें असतो अथवा कधीं मागें असतो.

२१. ह्या ग्रहांना मन, अक्कल आणि कार्याकार्य विचार नसता तर अशा गोष्टी घडल्या असत्या, अशी कांहीं माझ्याच्यानें कल्पना करवत नाहीं; आणि हे गुणधर्म जर ग्रहाचे ठायीं आहेत तर त्यांस देवांच्या वर्गांत मोजल्यावांचून दुसरें गत्यंतर नाहीं. स्थीर ताऱ्यांच्या ठायीं देखील हेच गुणधर्म आहेत. त्यांची गति नियमपर आणि निरंतर आहे. ते कांहीं आकाशाबरोबर फिरत नाहींत व ते आकाशाला चिकटूनही नाहींत. ते आकाशाला चिकटून आहेत ही ज्ञानशून्य लोकांची वेडी कल्पना आहे; कारण आकाश हें अगदीं विरळ असून पारदर्शक आहे, आणि समान उष्णतेनें व्यापून टाकिलें आहे, यामुळें नक्षत्रांबरोबर परिभ्रमण करण्याची त्यांच्या आंगीं शक्ति आहे असें कांहीं वाटत नाहीं. अचल तारे यांस आपआपलें निरनिराळें स्थान आहे, आणि त्यांचा आकाशाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. जे आपला गमनमार्ग सोडून कधीं इकडे तिकडे जात नाहींत व ज्यांच्या नित्यक्रमांत कधीं अंतर पडत नाहीं, त्यांस मन असून त्यांचे ठायीं दैविक शक्ति आहे, ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे. असें असून हें ज्यास कळत नाहीं तो कोणत्याही प्रकारचा विषय ग्रहण करण्यास पात्र नाहीं.

यावरून नभोमंडलांत दैवघटित यदृच्छाजात अपरिणामदर्शी किंवा अस्थिर अशी कोणतीही वस्तु नाहीं. जिकडे पहावें तिकडे उत्तम व्यवस्था, सत्य, सदसद्विचार आणि नैरंतर्य दृष्टीस पडतें आणि हे गुण ज्या वस्तूंमध्यें नाहींत त्या सर्व वस्तु बनावू, छद्मरूपी आणि अशुद्ध असून त्यांचें वसतिस्थान हें भूमंडल आहे. यास्तव ही आश्चर्यजनक उत्तम व्यवस्था आणि नियमपरता ज्या

आकाशस्थ प्राण्यांमध्यें आहे आणि ज्या योगानें सर्व वस्तूंचें उपजीवन होतें त्यांस बुद्धि नाहीं असें ज्यास वाटतें तो स्वतःच बुद्धिहीन असला पाहिजे.

याप्रमाणें देवांविषयीं मी विस्तारपूर्वक सांगितलें आहे. त्यावरून अनंत देव आहेत असें स्पष्ट असून ते सदैव उद्योगी आहेत, पण त्यापासून त्यांस कांहीं श्रम किंवा त्रास होत नाहीं, कारण त्यांचे देह कांहीं अस्थिमांसचर्मयुक्त नाहींत. ते रूपानें फार सुंदर आहेत. नभोमंडळांतील अति शुद्ध प्रदेशांत त्यांचें निवासस्थान असून सर्व वस्तूंचें संरक्षण करण्याचें त्यांजमध्यें सामर्थ्य आहे.

त्याखेरीज देखील दुसऱ्या अनेक वस्तु या सृष्टीमध्यें आहेत, त्यांस अत्यंत सूज्ञ ग्रीक लोक आणि आपले पूर्वज यांनीं देवत्व दिलें आहे; कारण कीं त्या वस्तूंपासून आपल्यास अनेक प्रकारचे फायदे झाले आहेत. त्यावरून त्यांच्या मनांत असें भरलें होतें कीं, ज्या वस्तूंपासून मनुष्याला उपयोग होतो त्या वस्तूंच्या आंगीं तो गूण असण्यास दैवी प्रेरणा कारणीभूत आहे; म्हणून त्यांनीं श्रद्धा, शहाणपण, सुरक्षितपणा, ऐक्यभाव, औदार्य आणि विनय यांस निरनिराळीं नांवें देऊन देव मानिले आहेत.

प्राचीन काळापासून अशीही एक चाल चालत आली आहे कीं, ज्या पुरुषांनीं महत्कृत्यें करून जनांचें हित केलें ते स्वर्गीं विराजमान आहेत अशी कल्पना करून त्यांस देव मानावें. आपल्या पूर्वजांनीं अशा पुरुषांचीं मंदिरें बांधून ते देवांप्रमाणें त्यांची पूजा करीत होते.

मला असें वाटतें कीं, देवांचें अस्तित्व आणि ते कसे आहेत हें मी उपपत्तिपूर्वक सिद्ध करून दिलें आहे.

२२. आतां मला देवांच्या इच्छेनें ह्या जगाचा कारभार चालला आहे असें सिद्ध करून द्यावयाचें आहे. हा विषय फार महत्वाचा आहे. कोटा, यासंबंधानें मला तुझ्याबरोबर भांडावयाचें आहे. तुम्ही एकॅडेमिक हा विषय घोटाळ्यांत टाकण्याविषयीं नेहेमीं प्रयत्न करीत आहांत. व्हेलियस, निरनिराळ्या विषयांवर दुसऱ्या पंथाच्या लोकांचें म्हणणें काय आहे याविषयीं तुझ्या पंथांतील लोकांस फारच थोडी माहिती आहे. तुह्मी काय ते आपल्याच पंथांतील ग्रंथ वाचले असून, त्यांजवर तुमची आवड आहे, आणि परीक्षण करून गुणदोषविवेचन केल्यावांचून दुसऱ्याच्या सर्व ग्रंथांस तुम्ही तुच्छ मानितां. संक्षेपानें निरूपण करावयाचें असलें म्हणजे दूरदृष्टी ही या जगाचें राज्य करीत आहे, असें म्हणण्याचा सांप्रदाय आहे. येवढ्यावर तूं काल अशी कोटी केलीस कीं, आम्ही स्टोईक यांनीं दूरदृष्टी ही एक वृद्ध बाई नवीन देवता शोधून काढिली आहे. परंतु ही तुझी चूक आहे. देवांच्या दूरदृष्टीनें या जगाचा कारभार चालला आहे, असा त्याचा अर्थ आहे. आथेन्सच्या प्रजासत्ताक राज्याचा राज्यकारभार सेनेट सभा करीत आहे असें म्हटलें म्हणजे सेनेट सभा ही एक व्यक्ती असून तिला प्राण आणि बुद्धि आहे आणि ती राज्य करीत आहे, असा कांहीं त्या वाक्याचा अर्थ नाहीं. सेनेट सभेंत जे सभासद आहेत ते राज्य करीत आहेत, असा त्याचा अर्थ आहे. यास्तव तूं दुसऱ्याच्या मताचा उपहास करण्यांत तुझ्या मतानुयायांप्रमाणें इतका असमंजस होऊं नकोस, आणि मी तुला असा उपदेश करितों कीं, त्यांचें अनुकरण करण्याची गोष्ट तूं मनांत देखील आणूं नको. तसें करणें तुला शोभत नाहीं, तशी तुझी बुद्धि नाहीं, व ती गोष्ट तुला शक्यही नाहीं. हें माझें म्हणणें सर्वांशीं तुला उद्देशून आहे असें तूं समजूं नको. कारण

रोमन लोकांना शोभेल असा तुझा विद्याभ्यास झाला असून तुजमध्यें सभ्यपणा आहे. परंतु तुझ्या पंथांतील आणि त्यांत विशेषेंकरून तुझ्या मताचा प्रवर्तक ऐपिक्यूरस यास उद्देशून मी बोलत आहें. तुझा गुरु असभ्य, अक्षरशून्य, व निंदक होता; त्याला बुद्धि, अब्रू, आणि प्रौढपणा मुळींच नव्हता.

मी प्रतिज्ञापूर्वक असें सांगतों कीं, हें विश्व त्याच्या सर्व अवयवांसह मूळारंभीं निर्माण केलें असून कोणत्याही प्रकारच्या उपरमावांचून देवांच्या इच्छेनें आणि संकल्पानें त्याचा कारभार चालला आहे. हा पूर्वपक्ष सिद्ध करण्याकरितां आह्मी स्टोईक तीन प्रमाणांची योजना करितों तीं प्रमाणें हीं—पहिलें प्रमाण हें कीं, देव आहेत, ही गोष्ट एक वेळा सिद्ध झाली म्हणजे त्यापासून असें निष्पन्न होतें कीं विश्वाचा कारभार त्याच्या इच्छेनें आणि संकल्पानें चालला आहे. दुसरें प्रमाण असें आहे कीं, जर ही सृष्टि बुद्धियुक्त आहे आणि जगांतील सर्व वस्तूंवर तिची सत्ता असून त्यामुळेंच जगामध्यें उत्तम व्यवस्था आहे, तर ती चैतन्यविशिष्ट मूळ तत्वापासून निर्माण झाली आहे ही गोष्ट अगदीं सिद्ध आहे. नभोमंडळांत आणि पृथ्वीवर आपण जीं भव्य कार्यें पहातों हें तिसरें प्रमाण आहे.

२३. तेव्हां प्रथमतः देव आहेत किंवा नाहींत या दोन्हींतून एका गोष्टीचा आपल्यास अंगीकार केला पाहिजे. जर देव आहेत, असें आपण अंगीकारिलें, तर आपल्यास असें मानिलें पाहिजे कीं, ते कांहीं उद्योग करीत आहेत आणि तोही अत्युत्तम असेल तो. ह्या जगाचें नियमन करणें यासारखें सर्वोत्तम कार्य दुसरें नाहीं. तेव्हां देव हे ह्या जगाचें राज्य करीत आहेत असें मानिलें पाहिजे. जर तसें मानिलें नाहीं तर आपण जीं मनोरम आणि भव्य कार्यें अवलोकन

करितों त्यांच्या उत्पत्तीस आणि उत्तम व्यवस्थेस देवांहून श्रेष्ठ असें दुसरें कांहीं कारण आहे, असें मानिलें पाहिजे. मग तुम्ही त्या निर्जीव परमाणूंस कारणत्व द्या, किंवा एका प्रबळ शक्तीची प्रेरणा झाल्यामुळें अवश्यकता प्राप्त होऊन त्यापासून भव्य कार्यें उत्पन्न झालीं आहेत, आणि त्यांची व्यवस्थाही त्या अचेतन परमाणूंच्या किंवा नियतीच्या इच्छेनें होत आहे असें माना; परंतु तसें मानिलें ह्मणजे देवांच्या गुणांमध्यें श्रेष्ठत्व किंवा उत्तमत्व रहात नाहीं; परंतु देवांपेक्षां श्रेष्ठ अशी दुसरी वस्तूच नाहीं. आपण देवांला ज्ञान आहे असें मानिलें म्हणजे ते सदसद्विचारसंपन्न आहेत असें मानिलें पाहिजे. कारण त्यावांचून नुसत्या ज्ञानानें महत्वाचीं कार्यें त्यांच्या हातून कशीं घडतील? अज्ञान हें दैविक गुणाला विसंगत असून दौर्बल्य हें त्यांच्या महिम्याला आणि वैभवाला विरुद्ध आहे. तेव्हां या जगाची घडामोड देवांच्या इच्छेनें होत आहे ही गोष्ट सिद्ध आहे, आणि देव कांहीं जगाच्या आधीन नाहींत, जग तदधीन आहे.

२४. देवांचें अस्तित्व मान्य केलें (तें निर्विवाद सिद्ध आहेच) तर ते सचेतन असून बुद्धिविशिष्ट आहेत आणि आपण जसें एखाद्या देशाचें किंवा नगराचें सर्वानुमतें राज्य करितों, त्याप्रमाणें ह्या जगाचा कारभार कसा चालवावा, याजविषयीं देवांमध्यें वाटाघाट होऊन जे नियम बांधले आहेत, त्यांप्रमाणें ते राज्य चालवीत आहेत, ही गोष्टही सिद्ध आहे. आपल्यामध्यें जी बुद्धि, जो प्रामाणिकपणा आणि जो कार्याकार्यविचार आहे, तेच गुण देवांमध्यें आहेत, आणि आपल्यास ते देवांपासून प्राप्त झाले आहेत. बुद्धि, श्रद्धा, सदाचार-आणि ऐक्य हे दैविक गुण आहेत, म्हणून आपल्या पूर्वजांनीं त्यांचीं मंदिरें बांधिलीं आहेत. देवांच्या पवित्र आणि भव्य मूर्तींची

जर आपण आराधना करीत आहोंत तर देवांच्या ठायीं परिपूर्णत्व आहे, असें आपण कसें मानूं नये ? मनुष्यामध्यें बुद्धि, श्रद्धा, सदाचरण आणि ऐक्य हे गुण आहेत, ते जर स्वर्गांत नसते, तर ते पृथ्वीवर कोठून आले असते ? आणि जर आपल्या आंगीं शहाणपण, बुद्धि आणि परिणामदर्शन हे गुण आहेत, तर देवांच्या आंगीं हें गुण पुष्कळ अंशानें जास्त असले पाहिजेत; आणि अत्युत्तम आणि अतिप्रचंड कामाकडे त्यांचा त्यांनीं उपयोग केला पाहिजे. हें विश्व फार उत्तम आणि सर्वांपेक्षां मोठें कार्य आहे, तेव्हां तें देवांच्या शासनाखालीं आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे.

आह्मी सूर्य, चंद्र, स्थिर आणि अस्थिर तारे, आकाश आणि हें जग, आणि त्याशिवाय ज्याच्या आंगीं अद्वितीय सद्गुण आहेत, त्या वस्तु आणि ज्यांचा मानवी प्राण्यांला विशेष उपयोग होत आहे असे पदार्थ हे सर्व देव आहेत, असें पूर्णपणें सिद्ध करून दिलें आहे तेव्हां सर्व वस्तु त्यांच्या शासनाखालीं आहेत याविषयीं कांहीं भ्रांती नाहीं. पहिल्या प्रमाणाविषयीं जें कांहीं निरूपण केलें आहे तें बस आहे.

२९. आतां सर्व वस्तु प्रकृतीच्या आधीन असून त्यांची तिनें फार सुंदर कार्याकडे योजना केली आहे, असें सिद्ध करून देण्याचें माझें अवश्य कर्तव्यकर्म बाकी राहिलें आहे. परंतु त्यापूर्वी प्रकृती ह्मणजे काय याचें अगदीं बरोबर लक्षण केलें पाहिजे. त्यावांचून मी काय उपपादन करीत आहें त्याचा फार सुलभ रीतीनें बोध होणार नाहीं.

कोणी असें ह्मणतात कीं, प्रकृति ही एक विचाररहित शक्ती

असून तिजपासून आपल्या आपण सहज कांहीं कार्यें होतात. दुसरे असें म्हणतात कीं, प्रकृती ही एक बुद्धियुक्त ईशशक्ती आहे. प्रत्येक कार्य करण्यामध्यें तिचा कांहीं उद्देश असतोच. त्यावांचून उगीच ती कोणतेंही कार्य करण्यास प्रवृत्त होत नाहीं. प्रकृतीनें जीं कार्यें केलीं आहेत तीं इतकीं भव्य आणि सुंदर आहेत कीं तसें कार्य करण्याचें चातुर्य, कला आणि हस्तकौशल्य कोणामध्येंही नाहीं कीं त्याची नक्कल कोणी करूं शकेल. आणखी त्यांचें म्हणणें असें आहे कीं, ह्या प्रकृतीनें जीं बीजें निर्माण केलीं आहेत, त्यांच्या आंगीं असा कांहीं विलक्षण गुणधर्म आहे कीं, योग्य स्थळीं त्यांचें पतन झालें आणि त्यांच्या उपजीवनास आणि वृद्धीस उपयुक्त अशा वस्तूंचा त्यांशीं संयोग झाला म्हणजे त्यांपासून त्या बीजांच्या जातींची दुसरी वस्तु उत्पन्न झालीच. वनस्पतींचीं बीजें असलीं तर तीं आपल्या मुळ्यांतून पौष्टिक पदार्थांचें ग्रहण करून वृद्धीप्रत पावतात; आणि प्राण्याचें बीज असलें तर त्यापासून जो प्राणी उत्पन्न होतो त्याच्या ठायीं चलनवलन, इंद्रियें, वासना आणि आपल्याप्रमाणें दुसरा प्राणी उत्पन्न करण्याची शक्ती हे गुण असतात.

कांहीं लोक एपिक्यूरसच्या मताप्रमाणें या सृष्टींतील प्रत्येक वस्तूला प्रकृती म्हणतात. त्यांच्या मतानें रिकाम्या जागेंत परमाणूंचे संयोग होऊन हें जग बनलें आहे. त्याखेरीज जगाच्या उत्पत्तीस दुसरें कारणच नाहीं. पण आम्ही स्टोईक जेव्हां असें म्हणतों कीं, प्रकृती जगाला निर्माण करून त्याचें अनुशासन करीत आहे, तेव्हां एक मातीचें ढेंकूळ, दगडाचा तुकडा किंवा त्यासारखी दुसरी कांहीं वस्तु यास अनुलक्षून आम्ही बोलत नाहीं; कारण त्यांस निर्माण करण्यांत कांहीं उद्देशच दिसत नाहीं. एखाद्या वृक्षाला किंवा तशाच प्रकारच्या दुसऱ्या वस्तूला अनुलक्षून आमचें

ह्मणणें असतें. तो वृक्ष मातीच्या ढेंकळाप्रमाणें किंवा दगडाच्या तुकड्याप्रमाणें यदृच्छेंकरून बनला आहे, अशी कल्पनाच करितां येत नाहीं; कारण त्याच्या अवयवरचनेंत व्यवस्थितपणा असून कलेचें दर्शन आहे.

२१. जर प्रकृतीच्या आंगीं असें कौशल्य आहे कीं, वनस्पतींच प्राण देऊन त्यांची वृद्धि करिते तर पृथ्वीला देखील तिचा आधार आहे, ही गोष्ट निःसंशय सिद्ध आहे. कारण पृथ्वीमध्यें अनेक जातींचीं बीजें विपुल आहेत. त्यांपासून ती प्रत्येक जातीच्या वनस्पतीला उत्पन्न करिते, आणि त्यांच्या मुळांशीं आपला संयोग करून त्यांचें उपजीवन आणि वृद्धि करीत आहे. पृथ्वीला गरज लागली म्हणजे ती दुसऱ्या मूळतत्वापासून आपलें भक्ष्य मिळवून आपल्या वाफां-नीं वायु, आकाश आणि आकाशांतील श्रेष्ठ प्राण्यांच्या देहांचें योग्य रीतीनें पोषण करिते. जर प्रकृती पृथ्वीला आधारभूत झाली आहे तर त्याच कारणांनीं ह्या जगांतील सर्व वस्तूंवर देखील तिचें वर्चस्व आहे. कारण ज्याप्रमाणें पृथ्वी पौष्टिक पदार्थांचा पुरवठा करून वनस्पतींचें उपजीवन करिते त्याप्रमाणें वायु हा प्राण्याचें संरक्षण करितो. पहाणें, ऐकणें आणि बोलणें हे वायूच्या आंगचे गुण आहेत. त्यांवांचून आपल्यास पहातां, ऐकितां किंवा बोलतां आलें नसतें. तो आपल्याबरोबर चालत देखील आहे; कारण जेव्हां आपण बोलतों किंवा चालतों तेव्हां तो एकीकडे सरकून आपल्यास रस्ता देतो.

ज्या तत्वांचा संयोग होऊन हें सर्वव्यापक जग बनलें आहे, त्या तत्वांपैकीं एक तत्व नेहमीं अधोगतिप्रवण असतें, दुसरें नेहमीं ऊर्ध्वगतिप्रवण असतें आणि तिसरें नेहमीं मध्यबिंदूच्या भोंवतीं हेलकावे खात असतें. द्रव्याच्या अन्योन्यानुवर्ती विनिमयामुळें ह्या

जगाची स्थिति शाश्वत आहे, तीं चार द्रव्यें आहेत. पृथ्वीपासून उदक, उदकापासून वायु, वायूपासून उष्णता असा एक त्या चार द्रव्यांच्या उत्पत्तीचा क्रम आहे. जेव्हां उलट क्रिया घडते तेव्हां उष्णतेपासून वायु, वायुपासून उदक आणि उदकापासून पृथ्वी उत्पन्न होते. त्यामुळें ह्या जगाचा शाश्वत टिकाऊपणा कायम राहिला आहे. उपादान द्रव्यांची कधीं उणीव पडत नाहीं. ह्याप्रमाणें ह्या चार द्रव्यांचें नेहमीं मागें पुढें सरणें आणि खालीं वर जाणें ह्या विश्वाच्या भागाच्या संयोगसंरक्षणास कारणीभूत आहे. हा संयोग शाश्वत असो किंवा निदान आपल्याच्यानें कालमर्यादा करवत नाहीं अशा अनंत काळापर्यंत टिकणारा असो; ह्या विश्वाचें अनुशासन प्रकृतीकडून होत आहे; हा माझा पूर्वपक्ष योग्य प्रमाणसिद्ध आहे. तुह्मी द्राक्षाच्या वेलीकडे लक्ष लावून पहा, किंवा एखाद्या वृक्षाकडे पहा, ह्या विश्वरचनेंत जसें अत्युत्तम कौशल्य आहे तसें दुसऱ्या ठिकाणीं नाहीं, अशी आपल्या मनाची खातरजमा होते. तेव्हां ह्या विश्वरचनेंत बुद्धिविशिष्ट कारणाचा कोठें मागमूस देखील नाहीं असें तुह्मी ह्मणाल काय? आणि तसें जर तुह्मी ह्मणूं शकत नाहीं तर हें जग प्रकृतीच्या अनुशासनाखालीं आहे असें कबूल करा. ज्याअर्थी ह्या विश्वांत निरनिराळ्या जातींच्या अनेक वनस्पति आणि अनंत प्राणी असून त्यांचीं बीजेंही त्यांत आहेत, तर जगाचें अनुशासन प्रकृतीकडून होत नाहीं असें आपण म्हणूं शकतों काय? जर आपण तसें ह्मटलें तर मनुष्याचे दांत, पुंसलक्षण, दाडी, हीं प्रकृतीचीं कार्यें आहेत. परंतु स्वतः मनुष्य कांहीं प्रकृतीचें कार्य नाहीं, असें ह्मटल्याप्रमाणें होईल आणि त्याचा परिणाम असा होईल कीं, कारणापेक्षां कार्य मोठें मानलें जाईल.

२७. पेरणें, रोपणें, उत्पन्न करणें, पिकवणें, पोषणें, आणि संरक्षण

करणें हीं कार्यें जर प्रकृतीचीं आहेत तर जगाचें अनुशासन करणें हें कार्य तिचें नाहीं, असें कसें होईल? प्रकृतीच्या व्यवस्थेंत चूक ह्मणून कोठेंही दृष्टीस पडावयाची नाहीं. जीं मूलतत्वें अस्तित्वांत आहेत त्यांचा तिनें शक्य होता तितका उत्तम उपयोग केला आहे. ह्यापेक्षांही जास्त चांगला उपयोग करितां आला असता, असें कोणी अनुभवास आणून द्यावें. परंतु तसें कोणीही करूं शकणार नाहीं, आणि कोणी प्रयत्न करण्यास जाईल तो अगदीं वाईट काम करील किंवा कांहींच करूं शकणार नाहीं.

परंतु जर विश्वाच्या रचनेंत असें कांहीं चातुर्य आहे कीं, त्यापेक्षां सुंदर आणि उपयुक्त काम करतां आलें नसतें, तर तें काम सहजावृत्या घडलें आहे, किंवा वस्तुशक्तीचा तो स्वाभाविक परिणाम आहे किंवा दैविक शक्ति आणि शाहाणपणाचें तें कार्य आहे, याचा आतां आपण विचार करूं. बुद्धीवांचून नुसत्या शिल्पकलेनें कोणतेंही कार्य पूर्णपणें सुंदर करितां येत नाहीं, तर प्रकृति बुद्धिशून्य असूं शकणार नाहीं; कारण प्रकृतीचीं कार्यें अशीं सुंदर आहेत कीं, त्यांजपुढें शिल्पकलेची कांहीं मातबरी नाहीं. जेव्हां आपण एखादी मूर्ति किंवा तसबीर अवलोकन करितों तेव्हां आपण अशी कल्पना करितों कीं, मूर्तिकार किंवा चित्रकार यांच्या कलेचा तो परिणाम आहे. जेव्हां आपण एक तारूं शीड हाकारून समुद्रांतून जातांना पाहतों तेव्हां आपण असा तर्क करितों कीं, बुद्धि आणि शाहाणपण यांचा येथें उपयोग करून तें तारूं हाकारिलें आहे. जेव्हां आपण एखादें शंकुयंत्र किंवा उदकाच्या जोरानें चालणारें घड्याळ पाहतों, तेव्हां कारागिरानें शिल्पकलेचा उपयोग करून कालमान समजण्याकरितां तें यंत्र बनविलें आहे, यदृच्छेंकरून तें आपोआप बनलें नाहीं, असें आपल्यास वाटतें. असें असूनही ज्या विश्वामध्यें सर्व जाती-

च्या कलाकौशल्याचा आणि शिल्पकलांचा समावेश झाला आहे त्या प्रकृतीला ज्ञान आणि बुद्धि नाहीं, अशी तुम्ही कल्पना करणार काय? सामान्य अकलेच्या मनुष्यास देखील ही तुमची कल्पना संदर्भशुद्ध आहे असें वाटणार नाहीं.

आपला मित्र पोसीडोनियस यानें नुकताच एक खगोल तयार केला आहे, त्यांत सूर्य, चंद्र आणि दुसरे पांच ग्रह प्रत्येक दिवशीं आणि रात्रीं ज्या मार्गांनीं परिभ्रमण करितात ते मार्ग दाखविले आहेत. हा गोल जर सिथिया किंवा ब्रिटन् देशांतील अडाणी लोकांस नेऊन दाखविला तर बुद्धीचा उपयोग करून तो उत्तम रीतीनें तयार केला आहे, याविषयीं त्यांस किंचित तरी संशय वाटेल काय?

२८. तथापि एपिक्यूरियन यांस याविषयीं संशय आहेच. एका धनगरानें तारूं कधींही पाहिलें नव्हतें. जेव्हां एका पर्वतावरून तें त्याच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्यास मोठें आश्चर्य आणि भय वाटलें. परंतु तें जवळ आलें आणि त्यांतील खलाशी त्याच्या दृष्टीस पडले तेव्हां त्या खलाशांनीं आपल्या करामतीनें तें तयार करून समुद्रावर चालविलें आहे अशी त्याची खातरजमा झाली. त्याचप्रमाणें तत्वज्ञानी यांनीं हें प्रचंड विश्व प्रथमावलोकन केलें तेव्हां ते चकित झाले. परंतु जेव्हां त्यांनीं त्यांतील सुरेख व्यवस्था आणि त्याच्या नियमित समगतीविषयीं विचार केला तेव्हां त्यांस असें वाटलें कीं, असा एक कोणी पुरुष आहे कीं तो कांहीं ह्या अत्युत्तम स्वर्गरूपी मंदिरांतला नुसता रहिवाशी नाहीं, पण त्याचा प्रभू आणि कर्ता आहे.

२९. आकाश आणि पृथ्वीपासून आश्चर्यकारक वस्तु निर्माण होतात याविषयीं तुम्हांस तिळमात्र देखील संशय नाहीं, असें मला वाटतें. ही पृथ्वी विश्वाच्या अगदीं मध्यभागीं आहे आणि आपण श्वासोच्छ्वास करितों त्या वातावरणानें ती वेष्टित आहे, आणि त्या वाता-

वरणाच्या भोंवती अनंतपार आकाशाचें वेष्टण आहे. आकाशांत तेजविशिष्ट अनंत तारे असून त्यांत सूर्य मुख्य आहे. तो आपल्या तेजानें पृथ्वी प्रकाशित करून आपल्या उष्णतेपासून अनंत वस्तु निर्माण करीत आहे. त्याजमध्यें आणि इतर ताऱ्यांमध्यें इतकी उष्णता आहे-कीं, ते ह्या आपल्या पृथ्वीला एका क्षणांत जाळून राख करतील. परंतु जिनें हें विश्व निर्माण केलें आहे त्या प्रकृतीचें सामार्थ्य असें कांहीं विलक्षण आहे कीं, सूर्यासारख्या प्रचंड तेजो-विशिष्ट गोलाला तिनें आपल्या आटोक्यांत ठेवून त्याला ह्या विश्वाच्या हिताकरितां भ्रमण करण्यास लाविलें आहे.

३०. अशा प्रकारची ही विश्वस्थिति अवलोकन करूनही हे भरींव आणि पृथक् पृथक् गोल आपापल्या स्वाभाविक शक्तीनें आणि गुरुत्वाकर्षणाच्या योगानें गतिमान आहेत, आणि हें सर्व सुंदर विश्व दैववशात् परमाणूंचा संयोग होऊन बनलें आहे अशी कल्पना करणें शक्य आहे काय ? अशी असंबद्ध कल्पना करणारा मनुष्य अशी देखील कल्पना करील कीं, सुवर्णाचे किंवा दुसऱ्या एखाद्या धातूचे एकवीस वर्ण तयार करून जमिनीवर फेंकून दिले तर त्यांचा आपोआप असा संयोग होईल कीं, ह्या विश्वाचा साद्यंत इतिहास तयार होईल. पण मला तर असा देखील संशय आहे कीं, दैववशात् एक वाक्य तरी तयार होईल कीं नाहीं असें असून ज्याला रंग, रूप आणि चैतन्य नाहीं अशा परमाणूंचा संयोग होऊन आपल्या आपण हें विश्व निर्माण झालें आहे हें प्रतिपादन तरी कसें करितां येतें ? जर परमाणूंचा संयोग ह्या विश्वाला उत्पन्न करण्यास शक्त आहे तर तो मंदिर, घर, नगर कां निर्माण करीत नाहीं ? कारण हें काम कांहीं जग निर्माण करणें ह्या कामापेक्षां विशेष श्रमजनक किंवा कठीण नाहीं.

खरोखर ते लोक अविचारानें ह्या अधोलोकांच्या संबंधानें कांहीं तरी बडबड करीत आहेत. •नभोमंडळांतील चमत्कारिक वैभवाविषयीं त्यांनीं कधीं चिंतनच केलें नाहीं यामुळें त्यांस ईश्वरशक्तीचा बोध होत नाहीं.

आरिस्टाटल यानें याविषयीं फार उत्तम विचार केला आहे. तो ह्मणतो "आपण अशी कल्पना करूं कीं, कांहीं मनुष्यें नेहेमीं जमिनींत एक मोठें विवर होतें त्यांत राहत होतीं. तेथें त्यांचीं सोईवार आणि मोठीं घरें होतीं. तीं पुतळे आणि तसबिरांनीं सुशोभित केलेलीं असून अशा प्रकारच्या साहित्यांनीं सिद्ध करून ठेविलीं होतीं कीं, सुखी मनुष्याला जी कांहीं अनुकूलता असते ती त्यांत राहणारांस होती. •तेथून त्यांस बाहेर काढल्यावांचून जर आपण त्यांस ईश्वरशक्ति आणि महिमा यांविषयीं कांहीं गोष्टी सांगितल्या आणि कांहीं वेळानें जर त्यांस या विवरदरींतून बाहेर काढिलें तर तीं तात्काळ पृथ्वी, समुद्र आणि नभोमंडळ अवलोकन करतील. वायूच्या जोरानें मेघांचे एकमेकावर आघात होऊन जे कडकडाट होतात .आणि विद्युल्लतेचे प्रकाश पडतात, त्यांजविषयीं तीं मनन करतील. तीं सूर्याकडे अवलोकन करून त्याची विभूति, सौंदर्य आणि जननशक्तिविशिष्ट सामर्थ्य यांजविषयीं, आणि ह्या जगावर त्याचा प्रकाश पडतो यांजविषयीं चिंतन करतील; आणि जेव्हां रात्र पडेल, आणि हें जग अंधःकारानें व्याप्त होईल तेव्हां ताऱ्यांनीं सुशोभित केलेलें आकाश याजविषयींचा विचार त्यांच्या मनांत येईल. चंद्राची आश्चर्यजनक वृद्धि आणि क्षीणत्व, नक्षत्रांचा उदय आणि अस्त, त्यांचे अचल गमनमार्ग यांजविषयीं तीं विचार करतील, आणि त्यावरून तीं निःसंशय असा सिद्धांत करतील कीं देव आहेत आणि त्यांचीं हीं भव्य कार्यें आहेत."

३१. याप्रमाणें आरिस्टाटल याचें म्हणणें आहे. आतां आपण अशी कल्पना करूं कीं, आपणास पुष्कळ काळपर्यंत निबिड अंधःकारांत कोंडून ठेवून एकाएकीं आपल्यास उजेडांत आणिलें आहे, तर, स्वर्गसौंदर्य पाहून आपल्यास किती बरें आनंद होईल! परंतु तें आपण नित्य पहात आहों यामुळें त्याबद्दल आपल्यास कांहीं चमत्कार वाटत नाहीं. ज्या वस्तु नेहमीं आपल्या पहाण्यांत येतात त्या कितीही महत्वाच्या असोत, त्यांची उत्पत्ती कशी झाली याबद्दल शोध करण्याची आपल्याला इच्छाच होत नाहीं. अमुक एक अपूर्व वस्तु आहे, असें आपल्यास वाटतें तेव्हांच आपण तिच्या कारणाविषयीं शोध करण्यास प्रवृत्त होतों.

नभोमंडळाची सतत गति, ताऱ्यांचें नियमित गमन, सर्व वस्तूंचें परस्पराशीं यथायोग्य प्रमाण आणि संबंध यांविषयीं यथायोग्य विचार करण्यास आपली बुद्धिशक्ति समर्थ नाहीं. असें हें विश्व दैववशात् उत्पन्न झालें असून तेथें बुद्धिसंपन्न कारणाचें प्रयोजन नाहीं असें जो ह्मणतो, त्यास मनुष्य तरी म्हणावें काय? जेव्हां आपण कृतीनें केलेल्या वस्तु अवलोकन करितों तेव्हां त्या आपोआप बनल्या आहेत असा संशय तरी घेतों काय? नाहीं. आणि जें प्रचंड वेगानें भ्रमण करीत आहे आणि त्या योगानें वर्षामध्यें भिन्न भिन्न ऋतु उत्पन्न होत आहेत, आणि ते ऋतु सर्व वस्तूंच्या उत्पत्तीस आणि वृद्धीस कारण होत आहेत, असें हें विश्व बुद्धीचें कार्य नाहीं असा आपण संशय तरी घेऊं शकतों काय? मी नुसतें बुद्धीचें कार्य ह्मणत नाहीं, पण अत्युत्तम आणि ईश्वरी बुद्धीचें कार्य आहे, असें ह्मणतों. आतां आपण वाटाघाट करण्यांत सुधारलेला कावेबाजपणा एकीकडे ठेवून आपल्या नेत्रांनीं ज्या वस्तु पाहतों आणि ज्यांना आपण ईश्वरी कृति असें म्हणतों त्या वस्तूंच्या सौंदर्याविषयीं विचार करूं.

ह्या जगाच्या *मध्यभागीं जिची स्थिति आहे त्या पृथ्वीकडे आपण अगोदर निरीक्षण करून पाहूं. ही भरीव आणि वर्तुळ आहे. नानाजातींचीं रंगीबेरंगी पुष्पें, वनस्पति, वृक्ष आणि फळें यांहींकरून हिचा पृष्ठभाग आच्छादित झाला आहे. स्वच्छ आणि शीतळ उदकाचे झरे नद्यांकडे आणि नद्यांचे प्रवाह समुद्रास मिळण्याकरितां धांवा घेत आहेत. नद्यांचीं तटाकें तृणांनीं हिरवीं गार झालीं आहेत. गुहांचीं खोल विवरें, मेघमंडळापर्यंत ज्यांचीं शिखरें जाऊन पोंचलीं आहेत असे पर्वत, अमर्याद मैदानें, सुवर्ण आणि रजत यांचीं प्रच्छादित आकरें आणि संगमरवरी दगडांच्या अमर्याद खाणी या भूमीवर आहेत.

ह्या पृथ्वीवर माणसाळलेल्या आणि हिंस्र पशुपक्षांच्या किती तरीहो जाती आहेत! पक्षी आकाशांत उडताहेत आणि वृक्षांवर बसून मंजुळ शब्द करीत आहेत. पशूंनीं अरण्यें आणि क्षेत्रें व्यापून टाकिलीं आहेत. मनुष्यांविषयीं तर बोलण्याची सोयच नाहीं. जमिनीची लागवड करून पीक उत्पन्न करण्याकडे देवांनीं त्यांची योजना केली आहे. तिचा पिकाऊपणा तिजवर अरण्यें वाढून वृथा जाऊं नये व हिंस्र पशूंनीं देश ओसाड करूं नयेत, यासाठीं मनुष्यांची योजना केली आहे. त्यांनीं क्षेत्रांत, बेटांत आणि समुद्रकिनाऱ्यावर नगरें बांधून पृथ्वीला सुशोभित केलें आहे. नुस्तें आपण चर्मचक्षूंनीं जर हें मनोरम विश्व अवलोकन केलें तरी देखिल तें ईश्वरी शक्तीचा प्रादुर्भाव आहे, असें आपल्या मनांत भरतें. मग मानसिक विचारानें त्याविषयीं किती महिमा वाटेल हें काय सांगावें!

* जग जर अनंत आहे तर जगाच्या मध्यभागीं पृथ्वी आहे असें ह्मणतां येत नाहीं. ज्या वस्तूला मर्यादा आहे त्यालाच मध्यभाग असूं शकेल. अमर्याद वस्तूचा मध्यभाग अमुक, असें कांहीं सांगतां येत नाहीं. परंतु स्टोईक यांच्या मतानें जगाला कांहीं मर्यादा असावी असें दिसतें.

समुद्र कितीहो सुदर्शनीय आहे! त्याच्या विस्ताराकडे पाहिलें ह्मणजे मनाला किती संतोष वाटतो! त्याजमध्यें अनेक प्रकारचीं बेटें तरी किती पुष्कळ आहेत! त्याचे किनारे किती आनंदजनक आहेत! अनेक जातींचे आणि आकृतींचे असंख्य प्राणी यांनीं त्याला व्यापून टाकिलें आहे. कांहीं त्याच्या पोटांत वसले आहेत; कांहीं त्याच्या सपाटीवर तरंगत आहेत; आणि कांहीं आपल्या शिंपीच्या आधारानें कपारीला चिकटून राहिले आहेत. इकडे समुद्र जमिनी-पर्यंत पोंचून किनाऱ्यावर अशा कांहीं लीला करीत आहे कीं, तीं दोन मूळतत्वें जशीं काय एकच आहेत.

समुद्रावर वातावरण आहे. रात्रीं आणि दिवसा त्याजमध्यें पर्यायांतर होत असतें. जेव्हां तें विरळ होतें, तेव्हां फार उंच प्रदेशांत जातें; जेव्हां घन होतें तेव्हां त्यास मेघत्व प्राप्त होऊन त्याजमध्यें जें उदक सांचलें असतें त्याची पर्जन्यरूपानें पृथ्वीवर वृष्टी होऊन जमीन सुपीक होते. वातावरण क्षुब्ध झालें ह्मणजे त्यापासून वायु उत्पन्न होतात. निरनिराळ्या ऋतूंत भिन्न भिन्न प्रमाणांची उष्णता आणि शीत यांच्या उत्पत्तीस हेंच कारण आहे. ह्याच्याच आश्रयानें आकाशांत पक्षी उडतात, आणि सर्व सजीव प्राणि थास श्वासाबरोबर ग्रहण करितात, त्यामुळेंच त्यांचें जीवन होतें.

३२. हा विषय पुरा करण्याकरितां आतां नभोमंडळाविषयीं मात्र सांगणें राहिलें आहे. हा प्रदेश आपल्यापासून अतिदूर आहे आणि त्यामध्यें सर्व वस्तूंचा समावेश झाला असून त्यानें त्यास वेष्टून टाकिलें आहे. ह्याला आकाशही म्हणतात. हें ह्या विश्वाची परमावधीची शेवटची मर्यादा आहे. त्याजमध्यें सर्व ग्रह आणि

नक्षत्रें आपापल्या नेमलेल्या मार्गानें अतिशय आश्चर्यजनक गतीनें भ्रमण करीत आहेत. त्यांजमध्यें सूर्य हा पृथ्वीपेक्षां अतिशय मोठा आहे. तो पृथ्वीभोंवताली फिरत असून त्याचा उदय आणि अस्त दिवस आणि रात्रीस कारणीभूत आहे. हा कधीं अगदीं पृथ्वीच्या जवळ येतो, कधीं पृथ्वीपासून फार लांब जातो. तो लांब जातो तेव्हां ही पृथ्वी अगदीं उदास भासते. परंतु जेव्हां जवळ येतो तेव्हां नभोमंडळासह ती उल्हासित दिसते. गणिती यांचा असा सिद्धांत आहे कीं, चंद्र हा पृथ्वीच्या निम्मे भागापेक्षां कांहीं जास्त मोठा आहे. सूर्य ज्या मार्गानें प्रदक्षिणा करितो, त्याच मार्गानें चंद्रही प्रदक्षिणा करीत आहे; परंतु कधीं हा सूर्यापासून लांब जातो आणि कधीं त्याच्या जवळ असतो. हा कांहीं स्वयंप्रकाश नाहीं. सूर्यापासून तेज उसनें घेऊन तो या पृथ्वीला प्रकाशित करीत आहे. जेव्हां तो सूर्याच्या समीप किंवा समोर असतो तेव्हां त्याचा तेजोऱ्हास होतो; आणि जेव्हां पृथ्वी दोघांच्या मध्यें येते, तेव्हां चंद्राला ग्रहण लागतें. दुसरे तारे यांस देखील पृथ्वीभोंवती प्रदक्षिणा करण्याचे निरनिराळे मार्ग आहेत. सारांश, ह्या जगांत ग्रह आणि नक्षत्रें यांजसारखे अतिशय चमत्कारिक आणि अतिशय सुंदर असे दुसरे पदार्थच नाहींत.

ज्याला ज्ञानेंद्रियें आहेत-तो ह्या परम रमणीय विश्वाला दैववशात् परमाणूंचा संयोग होऊन बनलें आहे असें ह्मणेल काय? अथवा बुद्धि आणि तर्क नाहीं अशा वस्तूंपासून अशा गोष्टी घडूं शकतील काय? ह्या विश्वाची रचना करण्याकरितां प्रकृतीचे ठायीं किती बुद्धिमत्ता आहे, याविषयीं कल्पना करण्याची देखील आपली योग्यता नाहीं.

३३. या सानंदाश्चर्यजनक विषयाचें आपण किती जरी वर्णन केलें त-

री आपल्या मनाची तृप्ती होत नाहीं, अशी या विश्वरचनेंत मौज आहे. आतां आपण नभोमंडलासंबंधीं वर्णन एकीकडे ठेवून भूलोकस्थ वस्तूंविषयीं विचार करूं. भूलोकस्थ वस्तूंमध्यें तरी कौशल्याची अशी उणीव काय आहे कीं, त्यावरून बुद्धिसंपन्न प्रकृतीनें हें जग निर्माण केलें आहे ही गोष्ट प्रमाणासिद्ध नाहीं? वनस्पतींकडेच अवलोकन करा ह्मणजे त्या निर्माण करण्यांत प्रकृतीचें किती चातुर्य आहे तें समजून येईल. त्यांस आपलीं खोडें सांवरून धरण्याकरितां मुळ्या आहेत. मुळ्यांच्या योगानें पृथ्वींतील ओलावा शोषून घेऊन त्या आपल्या प्राणांचें रक्षण करितात. थंडीवाऱ्याचा आणि उष्णतेचा उपद्रव होऊंनये म्हणून त्यांस त्वचेचें वेष्टण आहे. असें देखिल म्हणतात कीं प्राणघातक आणि रोगजनक पदार्थांचा त्याग करून प्राणरक्षक आणि आरोग्यजनक पदार्थ ग्रहण करण्याची देखील त्यांजमध्यें बुद्धि आहे.

सजीव प्राण्यांच्या तरी कितीहो जाती आहेत! प्रत्येकाचें संरक्षण व्हावें ह्मणून किती चमत्कारिक योजना केल्या आहेत! कित्येकांला चर्माचें, कित्येकांला लोकरीचें, कित्येकांला रांठ केसांचें, कित्येकांला पंखांचें आणि कित्येकांला शिंपांचें आच्छादन आहे. कित्येकांला आपलें संरक्षण करण्यासाठीं शिंगें दिलीं आहेत, आणि कांहींना तर संकटापासून सुटून जाण्याकरितां पंख दिले आहेत. प्रकृतीनें कित्येक प्राण्यांला भिन्न भिन्न जातींच्या भक्ष्य पदार्थांचा पुरवठा केला आहे. अन्न ग्रहण करण्याची आणि तें पचन करण्याची प्राण्याच्या शरीरामध्यें जी रचना केली आहे, त्याजमध्यें फार शहाणपण आणि करामत आहे. शरीराच्या आंतील भागाची रचना अशी सुंदर आणि व्यवस्थित आहे कीं, त्यांत प्रयोजनातिरिक्त आणि निष्कारण असें कांहीं एक नाहीं. त्याखेरीज

प्रकृतीनें प्राण्यांस क्षुधा आणि ज्ञानेंद्रियें दिलीं आहेत. क्षुधा त्यांस हवा तितका भक्ष्य पदार्थ मिळविण्यास प्रवृत्त करिते आणि ज्ञानेंद्रियें त्यांस अपायकारक कोणतें आणि हितकारक कोणतें याची निवड करण्यास साधनीभूत होतात. कांहीं प्राणी चालून, कांहीं फरपटून, कांहीं उडून आणि कांहीं पोहून आपलें भक्ष्य मिळवितात. कांहीं तें आपल्या तोंडानें आणि दांतानें धरतात; कांहीं आपल्या हाताच्या पंज्ञानें धरितात; आणि कांहीं आपल्या चोंचीनें धरितात. कांहीं स्तनपान करितात, कांहीं चरतात, कांहीं गपाणा मारितात आणि कांहीं चर्वण करितात. कित्येक इतके ठेंगणे आहेत कीं, जमिनीवरील भक्ष्य पदार्थ ते सहज उचलून घेतात. परंतु जे उंच आहेत, जसें हंस, बगळे आणि उंट, त्यांस लांब माना दिल्या आहेत. हत्तीला सोंड दिली आहे. तीवांचून त्या अवजड शरीराच्या प्राण्यास आपलें भक्ष्य क्वचितच मिळवितां आलें असतें.

३४. जे प्राणी मांसाहारी आहेत त्यांस प्रकृतीनें शक्ति व चापल्य दिलें आहे. कित्येक प्राण्यांस तिनें पाचपेंच आणि कृत्रिम करून आपलें भक्ष्य मिळविण्याची अक्कल दिली आहे. एका जातीचा कोष्टी आहे, तो एका प्रकारचें जाळें विणतो आणि त्यांत जे जीव गुंततात त्यांस भक्षून आपली क्षुधा शांत करितो. दुसऱ्या जातीचा कोष्टी एके ठिकाणीं दबा धरून लपून बसतो आणि आपल्या भक्ष्य जीवावर झडप मारून त्यास खाऊन टाकतो. माशाची एक जात आहे, त्यास नेकर म्हणतात. त्यामध्यें आणि झिंगा मासा यांजमध्यें भक्ष्य मिळविण्याविषयीं संगनमत झालेलें आहे. नेकर यास दोन मोठ्या शिंपा आहेत. त्या नेहमीं उघड्या असतात. लहान मासे जेव्हां त्या शिंपांत भरतात तेव्हां झिंगा मासा त्यांस डसून

सूचना करितो तेव्हां नेकर लागलीच त्या शिंपांचीं दारें लावून टाकितो. ह्याप्रमाणें हे लहान प्राणी जरी निरनिराळ्या जातींचे आहेत तरी त्यांचें भक्ष्य सामायिक आहे. त्यांमध्यें कांहीं संकेत होऊन त्यांचें ऐक्य झालें आहे, किंवा स्वभावतः जन्मापासून त्यांजमध्यें मिलाफ आहे याविषयीं विचार करण्यांत मला मोठी करमणूक वाटते.

जलचरांमध्यें कांहीं जाती अशा आहेत कीं त्यांचें जनन जमीनीवर होतें, परंतु त्यांचा नैसर्गिक स्वभाव असा आहे कीं, उदक पाहिल्याबरोबर फरपटत जाऊन त्या त्यांत पडतात. आपण बदकांचीं आंडीं कोंबडीच्या खुराड्यांत पुष्कळ वेळां ठेविलीं आहेत. कोंबड्या आपल्या पिलांप्रमाणें त्या बदकांचें पालन पोषण करितात. परंतु जेव्हां बदकांच्या दृष्टीस जलाशय पडतो तेव्हां लागलीच स्वनिवासस्थानाकडे तीं धांव घेतात. ह्याप्रमाणें सर्व प्राणी आपापलें संरक्षण करण्याविषयीं परम तत्पर आहेत.

३९. मीं असें वाचिलें आहे कीं, एक जातीचा पक्षी आहे त्यास प्लॅटालिआ [ Platalia ] ह्मणतात. भक्ष्य मिळविण्याकरितां जे पक्षी समुद्रांत बुडी मारतात त्यांजवर तो टपून बसलेला असतो आणि जेव्हां ते पक्षी समुद्रांतून बाहेर येतात तेव्हां तो त्यांचीं डोकीं आपल्या चोंचीनें चेंपून धरून त्यांस तें भक्ष्य वमन करण्यास भाग पाडतो, आणि तें आपण खाऊन चट करितो. आणखी असेंही ह्मणतात कीं, तो शुक्तियुक्त मच्छांचें भक्षण करून त्यांस आपल्या जठराग्नीनें शिजवून पुनः त्यांस बाहेर काढतो आणि मग त्यांत जो तत्वांश असतो त्याचें पुनः भक्षण करितो.

आरिस्टाटलसारख्या महान तत्ववेत्त्यानें जी गोष्ट आपल्या मनांत भरवून दिली आहे तिजविषयीं विलक्षण चमत्कार वाटल्यावांचून

राहील असा कोण आहे ? जेव्हां बकांचा समुदाय जास्त उष्ण हवेकरितां समुद्रावरून उडत जात असतो तेव्हां तो त्रिकोणाकृतीनें उडत असतो. पहिल्या कोणानें ते बक वायूच्या प्रतिबंधाला दूर करीत असतात आणि त्यांचें उडणें सुलभ करण्याकरितां त्या कोणाच्या प्रत्येक बाजूस त्यांचे पक्ष वल्ह्याप्रमाणें उपयोगी पडतात, आणि त्यांच्या त्रिकोणाची स्थिती स्थीर राहण्याकरितां मागल्या बाजूचा वायु सहाय करीत असतो. त्या त्रिकोणाच्या पुढचे बाजूस जे बक असतात त्यांजवर मागच्या बाजूची बक मंडळी आपल्या मानांचा आणि मस्तकांचा भार ठेवून विश्रांती घेत असतात. पण पुढें उडत असतात त्यांस आपला भार दुसऱ्यावर ठेवण्यास कोणी नसतें, तेव्हां विश्रांती घेण्याकरितां ते मागें येतात आणि मागचे पुढें सरतात. याप्रमाणें उड्डाण संपेपर्यंत पाळी-पाळीनें क्रम चाललेला असतो.

३६. मी अशीं अनेक उदाहरणें दाखवीन, परंतु मला वाटतें कीं, हीं पुरे आहेत. आतां आपण ज्या वस्तूंशीं आपला नेहमीं सहवास आहे त्यांविषयीं विचार करूं. पशू आपलें संरक्षण कसें करितात, ते चरत असतां कसे सावध असतात, ते आपल्या गुहांत विश्रांती कशी घेतात ह्या गोष्टी प्रायशः आपल्यास माहीत आहेत, तथापि त्यांजमध्यें प्रशंसा करण्यासारखे दुसरेही गुण आहेत. कुत्रीं वांती करून आपले रोग बरे करितात. सांगण्यांत असें आलें आहे कीं, रानटी देशांत बिबे वाघ आहेत, त्यांस, विषमिश्रित मांस खाण्यांत आलें तर त्याजवर काय उपाय करावा हें माहीत आहे, आणि त्यापासून ते आपला प्राण वांचवितात. रानटी शेळ्यांस जर विषदिग्ध बाणांची जखम लागली तर **तुटपानी** नांवाच्या वनस्पतीचा शोध करून तिचा वास घेतात, म्हणजे तो बाण त्यांच्या शरीरांतून गळून

पडतो. हरणें हीं विण्यापूर्वी एका जातीच्या वनस्पतीचा जुलाब घेतात. पशूंला आपला बचाव करण्याकरितां निरानिराळीं साधनें आहेत. बैलास शिंगें, डुकराला सुळेदांत आणि सिंहाला पंजे व दांत दिले आहेत. कांहीं पलायन करून, कांहीं लपून राहून आणि कांहीं आपल्या असह्य घाणीनें पाठलाग करणारास मागें फिरणें भाग पाडून आपलें संरक्षण करितात.

३७. ह्या विश्वाचें सौंदर्य शाश्वत असावें, याविषयीं सृष्टिकर्त्यानें फार दूरवर विचार केला आहे. निरानिराळ्या जातींचे प्राणी, वनस्पति आणि वृक्ष, यांच्या जाती चिरस्थाई करण्याकरितां प्रत्येक वस्तूमध्यें बीज उत्पन्न केलें आहे आणि त्याच्या ठायीं असा गूण आहे कीं, एकापासून अनेकांची उत्पात्ति व्हावी.

सजीव प्राण्यांची नेहमीं उत्पत्ति व्हावी म्हणून किती बरें उत्तम योजना केली आहे ! हा उद्देश साधण्याकरितां प्रकृतीनें स्त्री आणि पुरुष अशा दोन जाती निर्माण केल्या आहेत. त्यांच्यापासून जनन व्हावें ह्मणून त्यांच्या अवयवांची योग्य रचना करून त्यांजमध्यें मैथुनाविषयीं चमत्कारिक ओढ उत्पन्न केली आहे. जेव्हां गर्भाशयांत बीज पतन होतें, तेव्हां तें मातेच्या आहारांतील पौष्टिक अन्नाचें शोषण करून घेतें. जेव्हां जनन होतें तेव्हां त्या प्राण्याचें उपजीवन दुधावर असलें, तर मातेच्या उदरांतील अन्नरसाचें दूध बनतें, आणि तो प्राणी कोणाकडून प्रेरणा झाल्यावांचून केवळ आंगच्या ज्ञानानें स्तनाची बोंडी कोणीकडे आहे याचा शोध करूं लागतो, आणि तेथें त्यास विपुल भक्ष्य प्राप्त होतें. यावरून असें दिसतें कीं, या गोष्टी कांहीं यदृच्छेकरून घडत नाहींत. ह्या कामांत प्रकृतीचें दूरवर अवलोकन आणि शहाणपण आहे. ज्यांस एका प्रसवकाळीं पुष्कळ पिलें होतात ( जसें, कुत्री, डुकरी ) त्यांस पुष्कळ

स्तन असतात, आणि ज्यांस थोडीं होतात त्यांस थोडे स्तन असतात. आपल्या पिलांचें संरक्षण आणि पोषण करण्याविषयीं पशूंमध्यें किती विलक्षण ममता आहे ! तीं स्वतः आपला बचाव करण्यास समर्थ होततोंपर्यंत विशेषेंकरून त्यांची आई त्यांजविषयीं फार काळजी बाळगीत असते.

३८. कांहीं प्राणी आणि वनस्पति अशा जातींच्या आहेत कीं, त्यांचें संगोपन करून त्यांजमध्यें सुधारणा करण्याकरितां मनुष्याच्या अकलेची आणि श्रमाची गरज आहे. त्यावांचून कांहीं प्राणी आणि वनस्पती यांचें संरक्षण होत नाहीं. त्याप्रमाणेंच मनुष्याच्या हातून सुधारणा व्हावी, आणि ज्या वस्तूंची त्याला गरज आहे त्या त्यास मिळाव्या याविषयीं उत्तम सोयी करून ठेविल्या आहेत. मिसर देशांत उष्ण-काळांत नाईल नदीचें पाणी सर्व देशभर पसरतें आणि पूर ओसर-ल्यावर शेतें खत घालून तयार केल्याप्रमाणें लागवडीच्या कामास उपयोगी पडतात. त्याप्रमाणें युफ्रेतिस नदीचा देखील उपयोग होत आहे. सर्वांहून मोठी सिंधू नदी शेतांना लागवडीस योग्य करिते इतकेंच नाहीं, पण असें ह्मणतात कीं, शेतांत पेरणीसुद्धां ती नदी स्वतः करिते, म्हणजे ती आपल्या प्रवाहाबरोबर धान्याचा इतका मोठा सांठा आणिते कीं, त्यापासून आपल्या आपण पिकें उत्पन्न होतात. इतर देशांत देखील प्रकृतीनें अशाच सोयी करून ठेविल्या आहेत. याविषयीं मला अनेक प्रमाणें दाखवितां येतील.

३९. ह्या उदार प्रकृतीनें आपल्यास भिन्न जातींच्या आणि भिन्न रुचींच्या भक्ष्यांचा विपुल पुरवठा करून दिला आहे. निरनिराळ्या ऋतूंत निरनिराळ्या जातींचे आणि निरनिराळ्या रुचींचे पदार्थ उत्पन्न होतात, आणि नेहेमींच्या सवयींत फेरफार झाला ह्मणजे

त्यापासून आपल्यास विशेष आनंद व्हावा, हा आपला नैसर्गिक स्वभाव आहे, त्यामुळें भिन्न रुचींच्या पदार्थांपासून आपल्यास जास्त सुख वाटतें. मनुष्याला, इतर प्राण्यांला आणि वनस्पतीला देखील इटेसियन* (Etesian) वायूपासून किती चांगला उपयोग होत आहे! यांच्या संयोगानें अतिशय उष्णाला नेमस्तपणा येतो आणि समुद्रपर्यटन करण्यास यांचा फार उपयोग आहे. हा विषय फार गहन आणि प्रचुर आहे, ह्यास्तव त्याजविषयीं अद्याप पुष्कळ सांगतां येईल; परंतु विस्तारभयास्तव कांहीं गोष्टी गाळल्या पाहिजेत. नद्यांचा किती उपयोग आहे; समुद्राच्या भरतीओहोटीपासून कोणतीं कार्यें घडतात; वनस्पती आणि वृक्ष यांनीं पर्वत आच्छादून टाकिले आहेत, त्यापासून किती उपयोग होत आहे; ह्या गोष्टी कांहीं अल्प विस्तारानें सांगतां येत नाहींत. सारांश इतकाच आहे कीं, प्रकृतिनिर्मित कोणत्याही वस्तूकडे तुह्मी पहा. त्याची रचना आणि योजना करण्यांत तिनें अतिशाहाणपण खर्च केलें आहे. सर्व वस्तु सुरक्षित असाव्या हा त्या सृष्टिकर्त्रीचा मुख्य उद्देश आहे.

जर आपणांस कोणी असें विचारिलें कीं, ही येवढी प्रचंड विश्वरूपी इमारत कोणासाठीं उभारली आहे? तर वनस्पती आणि वृक्ष यांजकरितां उभारली आहे असें आपण उत्तर दिलें असतां शोभेल काय? पशूंकरितां उभारली आहे असें म्हणणें देखील विवेकशून्य आहे. ज्यांना वाणी नाहीं आणि समज नाहीं अशा प्राण्यांकरितां देवांनीं इतके परिश्रम केले असतील हें सर्वथैव संभवनीय नाहीं. तेव्हां निःसंशय हें जग तर्कशक्तिसंपन्न प्राण्याकरितां निर्माण केलें आहे; आणि देव आणि मनुष्यें यांखेरीज तर्कशक्तिसंपन्न असे

---

* हे वायु वर्षांतून एक वेळा नियमानें येतात, आणि कांहीं ऋतूंत कांहीं वेळपर्यंत वहात असतात.

दुसरे प्राणी नाहींत; तस्मात् सर्ववस्तुसमन्वित हें विश्व देवांकरितां आणि मनुष्यांकरितां निर्माण केलें आहे ही गोष्ट स्पष्ट आहे.

जर मनुष्याच्या शरीर*रचनेकडे, आकृतीकडे आणि स्वभावाकडे आपण लक्षपूर्वक अवलोकन केलें तर देवांनीं मनुष्याच्या सुखासाठीं आणि कल्याणाकरितां फार काळजी बाळगली आहे असें आपल्या सहज ध्यानांत येतें. प्राणसंरक्षण करण्याकरितां तीन वस्तूंची फार जरूर आहे. खाणें, पिणें आणि श्वास घेणें ह्या कृत्यांकरितां मुखाची योजना फार शहाणपणानें केली आहे. नाकपुड्यांच्या सहायानें लागेल तितका वायु उदरांत सांठवितां येतो व बाहेर टाकितां येतो.

४०. भक्ष्य पदार्थांचे विभाग करून त्यांचें पिष्ट करण्याकरितां दांतांची योजना केली आहे. पुढचे दांत फार तीक्ष्ण आहेत आणि समोरासमोर आहेत. ते भक्ष्य पदार्थाला पृथक् करितात आणि मागले दांत ज्यांना दाढा म्हणतात ते चर्वण करून पदार्थाला बारीक करतात. ह्या कामांत त्यांस जिव्हेची मदत आहे. जिव्हेच्या मुळाशीं घसा आहे. जें कांहीं भक्षण करावें त्याचें तो ग्रहण करितो. त्याच्या दोन्हीं बाजूंस गलपीड आहेत. त्यांपासून टाळूच्या अगदीं आंतल्या बाजूपर्यंत घशाची मर्यादा आहे. जेव्हां जिव्हा अन्नाला घशांत लोटते तेव्हां त्याचे खालचे भाग प्रसृत होतात आणि वरचे

---

* मनुष्याचा देह हें ह्या जगाचें एक लघ्वाकार चित्र आहे; आणि ईश्वराचें अस्तित्व ज्यांस मान्य नाहीं, किंवा त्याविषयीं ज्यांस संशय आहे ते नास्तिक. ह्या ईश्वरास्तित्वबोधक चित्राला नेहेमीं आपल्या बरोबर घेऊन फिरतात तरी त्यांस ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं संशय आहेच. हा मोठा चमत्कार आहे. त्यांनीं आपल्या देहाविषयीं विचार करावा ह्मणजे सृष्टिकर्त्याचें शहाणपण, सामर्थ्य आणि चांगुलपणा यांविषयीं त्यांच्या संशयाची निवृत्ती होईल. अन्य प्रमाणांची मुळींच गरज नाहीं.—ग्रंथकार.

भाग संकुचित होतात. घशाजवळ आणखी एक नळी आहे, तीस वैद्य नरडें ह्मणतात. ही नळी फुप्पुसांपर्यंत जाऊन पोंचली आहे. आपल्या श्वासोच्छ्वसनक्रियेस तोच अवयव प्रधान आहे. वायु आंत घेणं आणि बाहेर टाकणें ही क्रिया नेहेमीं त्या नळीच्या योगानें घडत आहे. जिव्हेचा आणि घशाचा जेथें संयोग झाला आहे त्याच्या कांहींशा वरच्या बाजूस जिव्हेचा आणि नरड्याचा संयोग झाला आहे. तेथें नरड्याजवळ झांकणाप्रमाणें एक अवयव आहे. जेव्हां भक्षणक्रिया चाललेली असते तेव्हां अकस्मात त्या नळींत कांहीं अन्न अथवा पाणी जाऊन श्वासोच्छ्वसनक्रियेस व्यत्यय येऊं नये ह्मणून हा अवयव नेहेमीं नरड्याचें द्वार झांकीत असतो.

घशाच्याखालीं अन्नाशय आहे. तो अन्नोदकाचें कोठार आहे. अन्नाशय हा जसा अन्नोदकाला आपल्याकडे आकर्षण करीत असतो त्याप्रमाणें फुप्पुस आणि काळीज हीं बाहेरील वायूला आंत ओढीत असतात. जठराच्या रचनेंत फार मौज वाटण्यासारखें कौशल्य आहे. ज्ञानतंतु आणि मज्जातंतु यांचें तें एक जाळें विणलें आहे. पातळ किंवा घट्ट पदार्थाचें पचन होऊन त्याचें स्थित्यंतर होईपर्यंत आपल्यांत राहून ठेवण्याची अन्नाशयामध्यें शक्ती आहे. त्याची संकोचविकासक्रिया नेहेमीं चालली असते त्या योगानें अन्न मिसळून एकत्र होतें, आणि संकोचविकासक्रियेपासून उष्णता उत्पन्न होऊन अन्नाचें पचन होऊन प्राणापान इत्यादि वायूंच्या योगानें तें शरीराच्या इतर भागांत वांटलें जातें.

४१. फुप्फुस फार मऊ आणि स्पंजासारखे आहेत. त्या योगानें श्वासोच्छ्वसन करण्याकरितां त्यांचा चांगला उपयोग करितां येतो. अशुद्ध हवा बाहेर टाकून शुद्ध हवा ग्रहण करण्याकरितां भात्याप्र-

माणें नेहेमीं त्यांचा संकोचविकास होत असतो. त्या योगानें मुख्य जीवितसंरक्षक द्रव्य जो वायु तो नेहेमीं शुद्ध असतो. ज्या रसापासून आपलें पोषण होतें तो अन्नापासून वेगळा होऊन पक्वाशयांतून आंतड्यांत आणि आंतड्यांतून पित्ताशयांत जातो. ही क्रिया, आंतड्यांच्या जवळ **अंत्रावरण** म्हणून एक अवयव आहे, त्यामधून पित्ताशयाच्या द्वारापर्यंत जाणारे अनावृत्त आणि सरळ असे मार्ग आहेत, त्यांच्या योगानें घडते. पित्ताशयाला आणखी दुसरे मार्ग आहेत. त्या मार्गांनीं तो अन्नरस दुसरीकडे जातो. अन्नरसांतील दोष पित्ताच्या आणि मूत्राच्या रूपांनीं पृथक् होऊन बाकी राहिलेल्या शुद्ध अन्नरसाचें रक्त होतें. तें रक्त पित्ताशयाच्या तोंडाशीं रक्तवाहिन्या आहेत त्यांत शिरून काळजांत जातें, आणि काळजाला अनेक रक्तवाहिन्या जोडल्या आहेत त्यांतून शरीरांतील प्रत्येक भागांत पसरतें.

शिलक राहिलेल्या अन्नाच्या चोथ्याचा आंतड्यांच्या आंगीं संकोचविकासशक्ति आहे त्या योगानें कसा अधःक्षेप होतो याचें वर्णन करणें कांहीं कठीण नाहीं. परंतु तो विषय प्रौढ भाषणसांप्रदयास फार लज्जास्पद असल्यामुळें येथें गाळला पाहिजे. प्रकृतीचें दुसरें चातुर्य पुष्कळ वर्णनीय आहे, त्याचें आपण वर्णन करूं. फुप्फुसांमध्यें जो वायु आकर्षण केला जातो त्याचा फुप्फुसांत जी उष्णता असते तिच्याशीं, आणि फुप्फुसांच्या संकोचविकासापासून नवी उष्णता उत्पन्न होते तिच्याशीं, संयोग होऊन त्याचा एक भाग श्वासोच्छ्वासाबरोबर बाहेर येतो, आणि एक भाग काळजामध्यें एक कोश आहे, ज्याला Ventrical म्हणतात, त्यांत शिरतो. काळजाला दुसरा एक कोश जोडला आहे त्यालाही Ventrical म्हणतात. पित्ताशयांतील रक्त पोकळ शिरांच्या द्वारानें त्या कोशांत येतें. याप्रमाणें एका कोशाच्या योगानें रक्त पोकळ शिरांच्या

द्वारानें सगळ्या शरीरांत पसरतें आणि दुसऱ्या कोशाच्या योगानें धमनीच्या द्वारानें श्वासोच्छ्वासक्रिया घडते. धमनी आणि शिरा ह्या सगळ्या शरीरांत इतक्या पसरल्या आहेत कीं, त्यांवरून प्रकृतीचें कौशल्य अगदीं स्पष्ट बोधित होतें.

शरीराचा मजबूतपणा राखण्यासाठीं *अस्थींच्या सांध्यांची जडण जडण्यांत आणि शरीरावयवांचा उत्तम उपयोग करितां यावा म्हणून त्यांची योग्य रचना करण्यांत प्रकृतीनें जें चातुर्य खर्च केलें आहे त्याविषयीं मीं सांगितलें पाहिजे काय ?

शरीरावयवाला आपल्या इच्छेप्रमाणें वर्तविणाऱ्या ज्ञानतंतूंविषयीं देखील मीं सांगितलें पाहिजे काय ? पटाविण्याकरितां वीण तयार करतात त्याप्रमाणें शरीरांत ज्ञानतंतूंच्या अनेक विणी आहेत; आणि शिरा व रक्तवाहिन्या यांचें उगमस्थान जे काळीज तेंच त्यांचें उगमस्थान असून त्यापासून निघून ते सगळ्या शरीरांत पसरले आहेत.†

४२. प्रकृतीच्या कलाकौशल्यावर आाण दूरवर दृष्टीवर पुष्कळ विचार करून पाहिला म्हणजे तिनें मनुष्याला किती उत्तम वस्तूंचा पुरवठा केला आहे हें समजून मन सानंदित होतें. तिनें आपल्या शरीराची आकृती उंच आणि उभी केली आहे. असें करण्याचा उद्देश असा आहे कीं, आपण नभोमंडळाकडे अवलोकन करावें आणि त्यापासून देवांविषयीं आपल्यास ज्ञान प्राप्त व्हावें. हा हक्क

---

* मनुष्याच्या देहांत २८४ अस्थि आहेत आणि प्रत्येक अस्थिरचनेंत पन्नासाहून कमी उद्देश नाहींत. तस्मात् मनुष्याच्या देहांत अस्थींची रचना करण्यांत प्रकृतीचे १४२०० उद्देश आहेत.

† स्टोईक आणि पेरिपॅटेटिक्स् यांचें असें मत आहे कीं, ज्ञानतंतु, शिरा आणि रक्तवाहिन्या ह्या थेट काळजापासून निघाल्या आहेत. परंतु अर्वाचीन शरीरशास्त्राप्रमाणें त्यांचें उत्पत्तिस्थान मस्तिष्क आहे.

मनुष्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही प्राण्यास दिला नाहीं. अस्मानी बंगल्यांत आपण जसा उत्तम वस्तूंचा संचय करून ठेवितों त्याप्रमाणें वस्तुविवेचन करणारीं सर्व ज्ञानेंद्रियें आपल्या मस्तकाचे ठायीं स्थापन केलीं आहेत, आणि त्यांचा योग्य रीतीनें उपयोग व्हावा म्हणूनच मोठ्या चातुर्यानें अशी योजना करण्यांत आली आहे. सर्वांहून उंचस्थानीं नेत्रांची स्थापना केली आहे. आपल्याला सर्व वस्तूंचें ज्ञान व्हावें ह्मणून ते - पाहेरेकऱ्यांप्रमाणें काम करितात. तसेंच शब्दज्ञान व्हावें यासाठीं कर्णांची योजनाही फार मौजेची आहे. गंध ग्रहण करण्याकरितां नाकपुड्यांची योजनाहीं शहाणपणाची आहे, आणि अगदीं मुखाजवळ त्यांस स्थान देण्यांत फार मोठा उद्देश आहे. तो ह्म कीं, अन्नपाणी यांच्या चांगल्या वाईट गुणांविषयीं निवड करण्यास त्यांचें सहाय मिळावें. आपण जें भक्षण करितों त्याची आपल्यास अभिरुची कळावी, ह्मणून रसनेंद्रियाला मुखामध्यें स्थापन केलें असून स्पर्शेंद्रियाला सर्व शरिरांत पसरून दिलें आहे, अशासाठीं कीं, आपल्या शरिरावर कांहीं आघात झाला असतां तो आपल्यास लागलाच कळावा आणि शीत आणि उष्ण यांचे जबरदस्त आघात आपल्यास तात्काळ समजावे. कुशल शिल्पकार अमंगळ पदार्थांपासून गृहाधिपतीला त्रास होऊं नये ह्मणून त्यांस ठेवण्याची योजना जशी घरांतल्या एका बाजूस करून ठेवितो, त्या अमंगल वस्तु नजरेसमोर येऊं देत नाहीं, किंवा त्यांची घाण येऊं देत नाहीं, त्याप्रमाणें ह्या देहरूपी गृहांत जे अमंगल पदार्थ आहेत त्यांस आपल्या ज्ञानेंद्रियांपासून प्रकृतीनें फार दूर एकीकडे ठेविलें आहे.

४३. इंद्रियांची रचना करण्यांत प्रकृतीची बरोबरी करील असा बुद्धिवान् शिल्पशास्त्रवेत्ता ह्या जगावर कधीं तरी निर्माण होईल काय?

प्रकृतीनें अतिशय बारीक त्वचेनें नेत्रांस आच्छादन केलें असून ती पारदर्शक असल्यामुळें तिच्यामधून पाहतां येतें, आणि नेत्रांचें संरक्षण होतें. प्रकृतीनें नेत्रांला बुळबुळित आणि चलनविशिष्ट केलें आहे. त्यायोगानें अपकारक वस्तूपासून त्यांस आपला बचाव करितां येतो, आणि जिकडे पहावयाचें असेल तिकडे सहज रीतीनें ते फिरवितां येतात. अवलोकन करण्यास मुख्य साधनीभूत जो एक त्यांजमध्यें अवयव आहे त्यास बाहुली म्हणतात. ती इतकी सूक्ष्म आहे कीं, अपकारक वस्तूला ती तत्काळ वर्ज करूं शकते. डोळ्यांच्या पापण्या फार मृदु आणि गुळगुळित आहेत. त्यांपासून डोळ्यांस कांहीं इजा होत नाहीं. कांहीं अपघात होण्याचें भय उत्पन्न झालें कीं लागलीच त्या लावितां येतात, आणि आपल्यास वाटेल तेव्हां उघडतां येतात. पापण्यांच्या केंसांचा नेत्रांच्या भोंवतीं एक कठडाच केलेला आहे. डोळे उघडे असतात, तेव्हां उपद्रवजनक पदार्थांस त्यांपासून दूर ठेवणें आणि झोंपेंत जेव्हां ते झांकलेले असतात तेव्हां त्यांचा बचाव करणें ही त्या केंसांच्या कठड्याची कामगिरी आहे. त्यापासून नेत्र इतके निर्भय आहेत कीं, जसे काय ते एका डबींत घालून ठेविले आहेत. याखेरीज ते फार सोयीवारपणानें प्रत्येक बाजूस उंचवटा देऊन आच्छादित केले आहेत व संरक्षिले आहेत. वरच्या भागांत भिवया आहेत. त्यांपासून मस्तकावरून व कपाळावरून जो घाम उतरतो त्याचा डोळ्यांस उपद्रव होत नाहीं. खालच्या बाजूस गालांला थोडासा उंचवटा दिला आहे. त्यापासून खालच्या बाजूनें उपद्रव होत नाहीं आणि त्यांचें पार्थक्य करण्याकरितां मध्यें नाकाची भिंत घातली आहे.

श्रवणेंद्रियें नेहमीं उघडीं ठेविलीं आहेत; कारण ह्या इंद्रियांची निद्रेंत देखील गरज आहे. कांहीं शब्द श्रवणेंद्रियांत शिरला कीं,

आपण लागलीच जागे होतों. त्यांत कांहीं जीवजंतु शिरूं नये म्हणून त्यांच्या मार्गांत वांकण आहे. श्रवणेंद्रियांच्या वरील भागाची रचना अशी आहे कीं, त्या योगानें कानांत शिरलेला शब्द कांहीं वेळ थांबवून ठेवितां येतो. ती योजना केली नसती तर आपल्यास शब्दज्ञान होण्यापूर्वीं शब्दलोप झाला असता.

त्याप्रमाणें नाकपुड्या देखील उघड्या ठेविल्या आहेत; कारण कीं, त्यांची आपल्यास नेहमीं गरज आहे, आणि त्यांचे मार्ग अगदीं चिवळ आहेत त्यामुळें त्यांत कांहीं जीवजंतु शिरूं शकत नाहीं.

दुसरें, इतर प्राण्यांपेक्षां आपल्या ज्ञानेंद्रियांच्या ठिकाणीं परमावधीचें उत्कृष्टत्व आहे. आपल्या नेत्रांच्याच ठायीं किती उत्कृष्टत्व आहे तें पहा! प्रत्येक कलेमध्यें, मग ती चित्रकला असो, अथवा दुसरी कोणतीही असो, न्यूनाधिक्य काय आहे हें कुशाग्रदृष्टीनें शोधून काढणें आणि शरीराचे हावभाव जाणणें हा गुणधर्म आपल्या नेत्रांच्या ठायीं आहे. तो इतर प्राण्यांच्या नेत्रांच्या ठायीं नाहीं. आपल्या नेत्रांस वस्तूचें सौंदर्य, प्रमाण, रंगाची आणि आकृतीची शोभा जाणण्याची शक्ति आहे. अतिमहत्वाच्या वस्तूमध्यें गुणदोष काय आहेत हें जाणण्याची त्यांजमध्यें शक्ति आहे; म्हणजे सद्‌गुण कोणता आणि दुर्गुण कोणता हें देखील त्यांस समजतें. हा मनुष्य क्रोधी आहे किंवा शांत आहे, आनंदी आहे किंवा खिन्न आहे, हिंमतवान् आहे किंवा धैर्यहीन आहे, आणि धीट आहे किंवा भीरू आहे हें त्यांस समजतें.

आपल्या श्रवणेंद्रियांच्या ठायीं वाक्‌जात आणि वाद्यजनित गायनाच्या संबंधानें फार उत्तम तारतम्य आहे. नादांचे नानाविध प्रकार, परिमाण, अवसान, आवाजांचे भिन्न भिन्न प्रकार म्हणजे

उच्च, सवन, मंजुळ आणि कर्कश, उदात्त किंवा अनुदात्त, हें जाणण्याची मनुष्याच्या श्रवणेंद्रियाला जी शक्ति आहे ती इतर प्राण्यांच्या श्रवणेंद्रियांस नाहीं. त्याचप्रमाणें घ्राणेंद्रिय, रसनेंद्रिय, आणि स्पर्शेंद्रिय यांच्या ठायीं देखील फार विलक्षण गुण आहेत. यांच्या साधनानें आपल्या वासना तृप्त करण्याकरितां आपण नानाप्रकारच्या वस्तु शोधून काढल्या आहेत, कित्येक प्रकारचे सुगंधी पदार्थ शोधून काढिले आहेत, कित्येक जातींचे भक्ष्य पदार्थ शोधिले आहेत आणि शारीरसुखासाठीं आपण कित्येक तऱ्हेचे पदार्थ तयार करीत आहोंत.

४४. मनुष्याचा आत्मा आणि मन, त्याची तर्कशक्ति, अतिदूरवर विचार आणि तारतम्यज्ञान, हीं त्या विश्वकर्त्या प्रकृतीचीं कार्यें आहेत, असें ज्यांस वाटत नाहीं, त्याच्या ठायीं आत्मा आणि मन नाहीं, आणि ते सद्गुणीही नाहींत असें मी समजतों. कोटा, ह्या विषयावर मी भाषण करीत असतां माझे आंगीं तुझी वक्तृत्वशक्ती असती तर माझ्या भाषणाला किती बरें गोडी आली असती? दृष्टांत देऊन हा मनोरम विषय तूं किती सुबोध करून दाखविला असता? ह्या विषयाच्या संबंधानें तूं आपलें ज्ञान व्यक्त करून दाखविण्यांत सीमा करून सोडली असतीस. बाह्य पदार्थविषयक आपल्या विचारांचा आपल्या मनांत संग्रह करून पूर्व विचारांशीं उत्तर विचारांचें संयोजन करणें, सिद्धांत स्थापित करून त्यापासून अनुमानें काढणें आणि प्रत्येक वस्तूचें यथार्थ लक्षण करून तीविषयीं शुद्ध ज्ञान संपादन करून घेणें, याविषयीं तुझें ज्ञान इतकें मोठें आहे कीं, त्यावरून बुद्धि आणि ज्ञान यांची शक्ती किती मोठी आहे, हें अगदीं स्पष्ट होतें, आणि त्या शक्तीपेक्षां अधीक आश्चर्यकारक शक्ती स्वतः ईश्वराच्या ठायीं देखील नाहीं. आपलें बाह्यपदार्थविषयक इंद्रियजन्य ज्ञान (तुम्हीं एक्याडेमिक

जरी त्याला तुच्छ मानतां आणि आपल्यास तें ज्ञान आहे असें कबूलही करीत नाहीं ) किती मोठ्या मोलाचें आहे! त्या योगानें एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशीं काय संबंध आहे याचा आपल्यास बोध होतो, आणि त्या ज्ञानाच्या सहायानें आपल्या सुखासाठीं आणि संरक्षणासाठीं ज्या कलांची आपल्यास अवश्यकता आहे त्या आपण शोधून काढिल्या आहेत. वक्तृत्वशक्ती हा सद्गुण फार मनोवेधक आहे. तूं ह्मणतोस त्याप्रमाणें ती एक ह्या विश्वाची स्वामिनी आहे. वाक्पटुत्वापासून अज्ञात विषयाचें आपल्यास ज्ञान प्राप्त होऊन आपण जें शिकलों तें दुसऱ्यास शिकविण्याची आपल्यास योग्यता प्राप्त होते. तिच्या योगानें आपण दुसऱ्यांस उपदेश करितों; तिच्या योगानें आपण दुसऱ्यांचीं मनें वळवितों; तिच्या योगानें आपण दुःखीयांचें सांतवन करितों; तिच्या योगानें आपण भित्रे यांचें भय दूर करितों; तिच्या योगानें आपण मर्यादातीत हर्ष नेमस्त करितों; आणि तिच्या योगानें आपण क्रोधाचें आणि दुष्ट वासनेचें उपशमन करितों. असा हा वक्तृत्वशक्तीचा प्रादुर्भाव आहे. तिनें नीति आणि धर्मरूपसांखळींत मनुष्यांना गोंवून टाकिलें आहे, आणि रानटी अवस्थेचा त्याग करवून त्यांस रंगारूपास आणिलें आहे.

तूं जर विचारपूर्वक अवलोकन करणार नाहींस तर तुला त्या गोष्टी खऱ्या देखील वाटणार नाहींत. आपल्यास वाणी दिली आहे हें प्रकृतीचें कार्य किती बरें उत्तम आहे! फुप्फुसांपासून मुखाच्या मुळापर्यंत एक नळिका आहे तीपासून शब्दांची उत्पत्ती होते. शब्दांचें मूलतत्व मन आहे. जिव्हा ही मुखाच्या अगदीं मध्यभागीं असून तिच्याभोंवती दांतांचा कठडा आहे. त्यायोगानें शब्दांचा उच्चार स्पष्ट होतो, नाहीं तर शब्दोच्चार स्पष्ट समजला नसता.

४९. प्रकृतीनें आपल्यास हात दिले आहेत. ते किती उपयोगी आहेत! त्यांच्या योगानें आपण किती सुंदर कामें करितों याचें वर्णन करणें देखील शक्य नाहीं. त्यांच्या सांध्यांचा लवचिकपणा असा चमत्कारिक आहे कीं, आपल्यास आपले हात सहज उघडतां आणि मिटतां येतात. बोटांनीं आपल्यास चित्रें काढितां येतात, मूर्ति कोरतां येतात, आणि खोदीव कामें करितां येतात. त्यांनीं आपल्यास तंतुवाद्यें, अलगुजें व मुरल्या वगैरे वाजवितां येतात. हे करमणुकीचे प्रकार झाले. त्यांखेरीज ज्यांची आपल्यास ज्यास्त अवश्यकता आहे अशीं कामें आपण आपल्या हातांनीं करितों. नांगरणें, घरें बांधणें, कापड विणणें आणि लोखंडी व पितळी कामें करणें, हीं सर्व हातांनीं करावयाचीं कामें आहेत. शोध करणें ही मनाची कामगिरी आहे, जाणणें हें इंद्रियाचें काम आहे, आणि काम तयार करणें हें हाताचें काम आहे. जर आपल्यास घरें आहेत, जर आपल्यास प्रावरणें आहेत, जर आपण सुरक्षितपणें रहात आहोंत, जर आपल्यास नगरें आहेत, जर आपल्यास कोटकिल्ले आहेत, आणि जर आपल्यास मंदिरें आणि निवासस्थानें आहेत तर त्यांबद्दल आपण सर्व आपल्या हातांचे ऋणी आहोंत.

आपण आपल्या हातांनीं अनेक प्रतींचे भक्ष्य पदार्थ उत्पन्न करीत आहोंत; कारण कीं, कांहीं भक्ष्य पदार्थांच्या जाती अशा आहेत कीं, त्यांची **मशागत** केल्यावांचून ते पदार्थ उत्पन्न होत नाहींत. ह्याखेरीज मासे धरण्यांत आणि शिकार करण्यांत आपल्या हातांचा आपल्यास फार उपयोग आहे. आपल्या दोन हातांच्या सहायानें आपण चतुष्पाद जनावरांना वश करून त्यांचें बळ आणि गती यांच्या योगानें आपण आपलें मंदत्व आणि अशक्तपणाची उणीव भरून काढली आहे. हत्तीचें शहाणपण आणि कुत्र्यांची

गंधानें पदार्थ ओळखण्याची शक्ति यांचा आपल्या हिताकडे उपयोग करून घेतला आहे. आपण पृथ्वीच्या उदरांतून लोखंड खणून काढतों. ह्या धातूचा आपल्यास फार उपयोग आहे. तांबें, रुपें आणि सुवर्ण ह्या धातू पृथ्वींत अगदीं लपवून ठेविलेल्या आहेत. तरी त्यांस आपण आपल्या उपयोगाकरितां आणि त्यांचे अलंकार करून आपले देह शोभविण्याकरितां हातांच्या सहायानें बाहेर काढितों. आपण झाड तोडतों त्याचा उपयोग नुस्ता सरपणाचे कामींच करीत नाहीं, तर त्याचीं आपण घरें बांधून शीत आणि उष्ण यांपासून आपला बचाव करितों. सागाच्या लांकडांचीं आपण जहाजें तयार करून त्यांच्या योगानें ह्या जगांतील सर्व उपयुक्त पदार्थांची उणीव भरून काढितां येते. त्या अगाध जलाशयावर आणि प्रचंड वायूवर नौकाशास्त्रज्ञानबळानें आपली सत्ता चालवून त्यांस नौकापर्यटणास सहायभूत करून घेण्याची आपल्यास शक्ति आहे तशी कोणत्याही प्राण्यांस नाहीं. याप्रमाणें समुद्रापासून आपण अनेक वस्तूंची प्राप्ति करून घेतों. पृथ्वीवर जे कांहीं पदार्थ उत्पन्न होतात त्यांचें स्वतंत्र स्वामित्व आपल्याकडे आहे. भूमंडळावरील मैदानें आणि पर्वत यांचा आपण उपभोग घेतों. आपण पृथ्वीला सुपीक करून उपयुक्त पदार्थांची रेलचेल करून दिली आहे. नद्या आणि सरोवरें आपल्या आधीन आहेत. आपण नद्यांचे ओघ अडवून आपल्यास हवे तिकडे नेतों किंवा मागें फिरवितों. सारांश, आपल्या हातांनीं आपण इतकें काम करितों कीं, जसें काय आपण दुसरें विश्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोंत.

मनुष्याच्या तर्कज्ञानाविषयीं मी काय सांगावें बरें? तें नभोमंडळापर्यंत देखील जाऊन पोंचलें नाहीं काय? सर्व प्राण्यांमध्यें मनुष्यानेंच नक्षत्रांचे मार्ग शोधून काढिले असून त्यांचा उदयास्तकाल

निश्चित केला आहे. मनुष्यानें दिवस, महिना आणि वर्ष यांचा निर्णय केला आहे. सूर्य आणि चंद्र यांचीं ग्रहणें केव्हां होतात हें मनुष्यें पूर्वींच सांगतात. ग्रहण केवढें मोठें आहे, किती वेळ राहील आणि केव्हां लागेल आणि केव्हां सुटेल हें अगदीं बरोबर सांगतां येतें. अशा प्रकारच्या गोष्टींविषयीं विचार करून मनुष्याच्या मनानें ईश्वरी ज्ञानाचें हरण करून घेतलें आहे. ह्या ज्ञानापासूनच भक्ति उत्पन्न होते. त्या भक्तीशीं न्यायाचा संबंध आहे, आणि दुसरे सर्व सद्गुण यांचाही भक्तीशीं संबंध आहे. भक्तियोगानें आपलें आयुष्य सुखांत जातें; आणि शाश्वतपणा खेरीजकरून आपण देवांपेक्षां कोणत्याही गुणानें उणे नसून सुखानें राहण्याकरितां आयुष्याची शाश्वती विशेष जरुरीची आहे, असें नाहीं. मी ज्या गोष्टी विशद् करून सांगितल्या आहे त्यांजवरून इतर प्राण्यांपेक्षां मनुष्य श्रेष्ठ आहे, ही गोष्ट पूर्णपणें सिद्ध करून दिली आहे असें मला वाटतें, आणि त्याजवरून असें सिद्ध होतें कीं, मनुष्याची आकृति आणि त्याच्या अवयवांची स्थिति, त्याच्या मनाचें सामर्थ्य आणि त्याचें ज्ञान, या गोष्टी कांहीं यदृच्छेंकरून घडणाऱ्या नाहींत.

४६. आतां मला असें सिद्ध करून द्यावयाचें आहे कीं, जिचा आपल्यास उपयोग आहे अशी ह्या जगांतील प्रत्येक वस्तु बुद्धिपुरःसर आपल्यासाठीं निर्माण केली आहे.

सर्वांच्या आधीं देवांकरितां आणि मनुष्यांकरितां हें जग निर्माण केलें आणि नंतर त्यांतील सर्व वस्तु तयार करून आपल्या सेवेंत सादर केल्या आहेत. जग हें देवांचें आणि मनुष्यांचें सामायीक वसतिस्थान किंवा नगर आहे; कारण कीं तर्कज्ञानविशिष्ट कायते तेच प्राणी आहेत, सबब न्यायानें आणि कायदेशीरपणानें वागण्यास

तेच पात्र आहेत; ह्मणून आपल्यास असा तर्क केला पाहिजे कीं, आथेन्स शहर जसें ग्रीक लोकांकरितां बांधिलें आहे आणि त्या नगरांतील प्रत्येक वस्तूवर त्या लोकांचा जसा हक्क आहे, त्याप्रमाणें या जगांतील प्रत्येक वस्तूवर देवांचा आणि मनुष्यांचा हक्क आहे. आणि फक्त त्यांचाच हक्क आहे असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

आतां दुसरा प्रकार.—सूर्य, चंद्र आणि तारे यांच्या परिवर्तनांत दुसरे उद्देश आहेत, तरी त्यांचें अवलोकन करून त्यांजविषयीं चिंतन करण्याकरितां देखील त्यांची बुद्धिपुरःसर योजना केली आहे. आपल्या नेत्रांला तृप्त करील असा दुसरा विषयच नाहीं, आणि आपल्या कुशाग्र बुद्धीला आणि तर्कालाही तसा दुसरा मनोरम विषय नाहीं. ग्रहांचे मार्ग मोजून आपण कोणत्या ऋतूला केव्हां प्रारंभ होतो याचा निर्णय करून त्याचा स्थितिकाळ निश्चित केला आहे. त्यामुळें ऋतू केव्हां बदलतात हें आपल्यास कळतें; आणि ह्या गोष्टी जर फक्त मनुष्यांसच कळतात तर त्यांची योजना मनुष्यासाठींच केली आहे, असें आपल्यास मानिलें पाहिजे.

आतां ह्या पृथ्वीवर जीं फळें आणि धान्यें उत्पन्न होतात तीं मनुष्यांकरितां किंवा जनावरांकरितां? कांहीं फळें अशीं आहेत कीं, त्यांचा जनावरांस कांहींच उपयोग नाहीं. नांगरावें केव्हां आणि पेरावें केव्हां आणि कापणी केव्हां करावी हें कांहीं जनावरांस माहीत नाहीं. पृथ्वीवर जीं फळें उत्पन्न होतात, तीं कोणत्या ऋतूंत गोळा करावीं, त्यांचा संचय कसा करून ठेवावा आणि त्यांचें संरक्षण कसें करावें, हें जनावरांस कांहीं माहीत नाहीं. ह्या वस्तूंचा काय तो उपयोग मनुष्यांस मात्र आहे आणि तत्संबंधीं सर्व गोष्टी त्यांस माहीत आहेत.

४७. सनया आणि अलगुजीं ज्यांला वाजवितां येतात त्यांच्यासाठींच तीं जशीं केलीं आहेत, त्याचप्रमाणें ह्या पृथ्वीवरील सर्व वस्तु जो त्यांचा उपभोग घेईल त्याजकरितां बुद्धिपुरःसर उत्पन्न केल्या आहेत असें कबूल केलेंच पाहिजे. त्यांतील कांहीं भाग पशू आपल्यापासून अपहार करून घेवोत, परंतु त्या वस्तु त्यांच्यासाठींच निर्माण केल्या आहेत, असें कांहीं सिद्ध होत नाहीं. मनुष्यें धान्याचा संचय कांहीं घुशीकरितां आणि मुंग्यांकरितां करीत नाहींत. आपलीं बायकामुलें आणि दुसरे आप्तवर्ग यांच्या चरितार्थासाठीं संचय करितात. जनावरांनीं त्यांतून कांहीं अंश घेतला तर ती चोरी आहे. जीं फळें रुचकर आहेत इतकेंच नाहीं, पण सुवासयुक्त असून अवलोकनाई आहेत, तीं फक्त मनुष्यासाठींच निर्माण केलीं नाहींत काय? जनावराला त्यांत कांहीं वांटा घेण्याचा हक्क नाहीं. बकऱ्याच्या केंसांचा आपल्यास उपयोग नसता तर त्यांचा काय बरें उपयोग होता? मनुष्याच्या सहायावांचून त्या निरुपद्रवी पशूला आपलें भक्ष्य मिळविण्याची देखील शक्ति नाहीं. कुत्र्याचा इमानीपणा, आपल्या यजमानाचें आर्जव करून त्याची कृपा संपादन करण्याविषयीं त्याचा प्रयत्न, परक्याविषयीं त्याचा तिरस्कार, शिकार शोधून काढण्याविषयीं त्याचें शाहाणपण, आणि सावजाचा पाठलाग करण्याविषयीं त्याची उल्हासवृत्ति, इतक्या गुणांनीं युक्त जो हा प्राणी निर्माण केला आहे त्याचा उद्देश काय? मनुष्याच्या उपयोगाकरितां तो निर्माण केला आहे असें तुम्हांस वाटत नाहीं काय? बैलाविषयीं मीच कशाला सांगितलें पाहिजे! आपल्यास स्पष्ट दिसतें कीं, त्यांच्या पाठी ओझें वाहण्याकरितां केल्या नाहींत, परंतु त्यांच्या माना स्वाभाविकपणें जूं धरण्याकरितां केल्या आहेत, आणि त्यांचे रुंद खांदे नांगर ओढण्याकरितां केले आहेत. ज्या

सत्ययुगाविषयीं कवी वर्णन करितात, त्या युगांत शेतकरी लोकांस बैलाचा इतका उपयोग होता कीं, ह्या पशूवर कोणी जुलूम करीत नसे आणि त्यांचें मांस भक्षण करणें हें पराकाष्ठेचें पाप मानिलें होतें.

४८. प्रकृतीनें आपल्यासाठीं किती वस्तु निर्माण केल्या आहेत, हें माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं. कित्येक पक्षी आणि मासे इतके रुचकर आहेत कीं, कोणाला असें देखील वाटेल कीं, जसा काय विधाता स्वतःच पराकाष्ठेचा खादाड होता.

आपण शिकार करून जे रानटी पशू धरतों व मारतों त्यांचा आपण अनेक तऱ्हेनें उपयोग करितों. कांहीं पशूंच्या मांसाचा आपण अन्नाच्या ऐवजीं उपयोग करितों. कांहीं पशूंचें अनुकरण करून आपण युद्धकलेचें ज्ञान करून घेतों. ज्यांस पाळितां येतें व शिकवितां येतें त्यांचा आपण आपल्या कामीं उपयोग करून घेतों. जसें हत्ती. फार काळच्या अनुभवावरून आपण वनस्पतींचा जसा औषधाच्या कामीं उपयोग करतों त्याप्रमाणें अमके रोग आणि जखमा बऱ्या करण्याकरितां कोणत्या उपायाची योजना करावी हें आपण पशूपासून शिकत आहोंत. ही सर्व पृथ्वी आणि समुद्र जसे काय तुझ्या नेत्रांसमोर आहेत, अशी कल्पना करून त्यांजविषयीं तूं चिंतन कर; ह्मणजे सुपीक जमीनीचीं मोठीं मैदानें, वनस्पती आणि वृक्षाच्छादित पर्वत, अगणित कुरणें आणि विलक्षण गतीनें गमन करणारीं समुद्रावरील जहाजें तुझ्या दृष्टीस पडतील. आपण फक्त पृथ्वीच्या सपाटीवरील वस्तूंचा शोध केला आहे, असें नाहीं. अगदीं गुप्त विवरांत लपवून ठेविलेल्या वस्तूंचा शोध केला असून त्या फार उपयुक्त वस्तु आहेत व त्या मनुष्यासाठींच केल्या आहेत, म्हणून मनुष्यानेंच त्या शोधून काढिल्या आहेत.

४९. देव आपल्याविषयीं फार काळजी वाहतात, याबद्दल प्रश्न

आणि शकुन पाहण्याची विद्या हा फार बळकट पुरावा आहे, असा माझा अभिप्राय आहे. कदाचित तो तुम्हां दोघांलाही पसंत पडणार नाहीं. कारण कोटा, तुला आह्मा स्टोइकांची निंदा करण्यांत मोठी गंमत वाटते ; आणि व्हिलियस, तुझा गुरु एपिक्यूरस यानें भविष्यकथनविद्येचा जसा उपहास केला आहे तसा दुसरा कोणत्याही गोष्टीबद्दल केला नाहीं. तेव्हां तुला माझा अभिप्राय कसा आवडणार ! परंतु ह्या विद्येचा अनेक प्रसंगीं अनेक ठिकाणीं अनुभव आलेला आहे. शकुन सांगणारे जोशी यांनीं कथन केलेलीं भविष्यें पुष्कळ वेळां खरीं उतरलीं आहेत व शकुन खरे झाले आहेत. दैवीवाणीपासून, भाकितें कथन करणारापासून, स्वप्नापासून आणि भयजनक उत्पात झाल्यापासून मनुष्यांस भावी होणाऱ्या गोष्टी कळल्यामुळें त्यांनीं आपल्यावरील मोठीं संकटें टाळलीं आहेत. तुह्मी या विद्येला परमानंद म्हणा, कला ह्मणा किंवा स्वाभाविक बुद्धिशक्ति म्हणा; ही मनुष्याच्याच ठायीं आहे आणि ही त्या अमर्त्य देवांची एक मानवी प्राण्याला उत्तम देणगी आहे. हीं प्रमाणें पृथकत्वेंकरून ग्रहण केलीं असतां त्यांपासून तुमच्या मनावर कांहीं ठसा उठणार नाहीं, परंतु जर सर्व एकत्र करून विचार केलात तर खचित ह्या विद्येचें महत्व तुमच्या मनांत भरल्यावांचून रहाणार नाहीं.

९०. रोम आणि ग्रीस ह्या देशांत मोठे नामांकित पुरुष होऊन गेले, ते देवकृपेवांचून काय ? मीं पूर्वीं सांगितलें आहे त्याप्रमाणें देवांनीं वारंवार दर्शन देऊन ‘ आम्ही तुमची काळजी बाळगीत आहों,’ अशी कित्येक प्रख्यात पुरुषांची खातरजमा करून दिली आहे. देवकृपा झाल्यावांचून मनुष्य नांवलौकिकाला चढलाच नाहीं. एका मनुष्याच्या शेतावर हींव पडून धान्याचा नाश झाला किंवा दुसरें कांहीं नुकसान झालें येवढ्यावरून देव मनुष्यांचा द्वेष

करितात असा न्याय करणें हें कांहीं रास्त नाहीं. देव हे महत्वाच्या गोष्टीविषयीं जशी कांळजी बाळगतात तशी लहान सहान गोष्टीविषयीं बाळगीत नाहींत. येवढ्यावरून मनुष्याविषयीं ते अगदींच काळजी बाळगीत नाहींत असें म्हणावें काय ? ज्याला तत्ववेत्त्याचा राजा ह्मणतात त्या साक्रेतिसानें आणि आह्मी स्टोईक यांनीं ईश्वरकृपेनेंच मनुष्यें मोठ्या योग्यतेस चढलीं, असें अनेक प्रमाणांनीं सिद्ध करून दिलें आहे.

दैविक गुणांविषयीं मला जें कांहीं सुचलें तें सर्व मीं निरूपण केलें आहे. कोटा, मी तुला असा उपदेश करितों कीं, तूं देखील याच मताची पुष्टी करावी. ध्यानांत ठेव, या रोममध्यें तूं पहिल्या प्रतीचा मनुष्य असून धर्माध्यक्षाचा अधिकार चालवितोस, आणि ज्यापेक्षां तूं अशा मताचा आहेस कीं, पाहिजेल त्या मताचा तुला पक्ष घेतां येतो,* तर अलंकारयुक्त भाषण करण्याचा अभ्यास केल्यामुळें तुला जें वाक्पटुत्व प्राप्त झालें आहे त्याचा तूं माझें मत प्रतिपादन करण्याकडे उपयोग कर. कारण, देवांच्या अस्तित्वाला बाध येईल असें मत प्रतिपादन करणें परम अपवित्र आणि घातक आहे. मग तूं तसें खऱ्या मनानें कर किंवा ढोंगानें कर.

# पुस्तक ३ रें.

१. जेव्हां बाल्बस यानें आपलें भाषण समाप्त केलें तेव्हां कोटा हंसून त्यास ह्मणाला, कोणत्या मताचें मी मंडन करावें याविषयीं तूं

* एक्याडेमिक प्रत्येक गोष्टीविषयीं संशयी असल्यामुळें त्यास कोणत्याही मताचा पक्ष घेतां येतो.

मला फार उशिरां सूचना केलीस. कारण तुझें भाषण चाललें असतां त्यावर कोणत्या शंका घ्याव्या याविषयींचे विचार माझे मनांत घोळत होते. तुझें मत खंडन करावें हा कांहीं माझा मुख्य उद्देश नव्हता. ज्या गोष्टी मला चांगल्या समजल्या नव्हत्या त्या तुजपासून चांगल्या समजून घ्याव्या हा मुख्य उद्देश होता, आणि ज्यापेक्षां प्रत्येकानें आपल्या स्वतःच्या ज्ञानाचा उपयोग करावा असें आहे, तेव्हां प्रत्येक गोष्टींत तूं ह्मणतोस तसें करणें मला कांहीं शक्य नाहीं.

व्हिलीयस ह्मणाला, कोटा, तूं जें काय सांगणार आहेस तें ऐकण्याविषयीं मी किती उत्सुक आहें हें तुझ्या ध्यानांतच नाहीं. कारण तूं जेव्हां एपिक्यूरस याच्या मताचें खंडन केलेंस तेव्हां बाल्बस याला किती आनंद झाला हें तूं पाहिलेंस. तेव्हां स्टोइकांच्या मताचें तूं कसें खंडन करितोस हें ऐकण्याविषयीं मी किती बरें उत्सुक असलें पाहिजे! आणि यास्तव मी तुझ्या भाषणाकडे चांगलें लक्ष देईन. कारण मला असा भरवसा आहे कीं, बाल्बस याच्या मतावर कोटिक्रम करण्यास तूं सर्वतोपरी योग्य आहेस.

कोटा म्हणाला, व्हिलीयस, तुला असें वाटतें कीं, बाल्बस याजबरोबर वाद करणें फार सोपें आहे, पण तसें नाहीं. तुजबरोबर वाद करण्यापेक्षां बाल्बस याजबरोबर वाद करणें फार कठीण आहे. व्हिलीयस म्हणाला, असें का? कोटा ह्मणाला, तुमचा एपिक्यूरस देवांविषयीं कांहीं आपलें मनोगत स्पष्ट सांगत नाहीं असा माझा अभिप्राय आहे. लोकांनीं आपल्यास वाईट ह्मणूं नये किंवा राजदंड होऊं नये ह्मणून तो देवांचें अस्तित्व नाकबूल करण्यास भीत आहे. बाकी त्यानें देव अगदीं अनुद्योगी असून प्रत्येक वस्तूविषयीं उदासीन आहेत, त्यांस आपल्यासारखे अवयव आहेत, परंतु ते त्यांचा उपयोग

करीत नाहींत, असें जें सांगितलें आहे, ही सर्व थट्टा केली आहे. पण बाल्बस याचा प्रकार निराळा आहे. त्यानें देवांच्या अस्तित्वाविषयीं किती प्रमाणें दाखविलीं आहेत तीं तुझ्या देखील लक्षांत आहेत. आतां तीं कदाचित् खोटीं असोत, परंतु त्यांचा देवांच्या अस्तित्वाकडे संदर्भ असून तीं विचारणीय आहेत. यास्तव मीं पूर्वीं सांगितलें आहे त्याप्रमाणें त्याचें मत खंडन करण्याचा कांहीं माझा उद्देश नाहीं. पण ज्या गोष्टी मला स्पष्ट समजल्या नाहींत त्या त्याजपासून समजून घ्याव्या हा माझा मुख्य उद्देश आहे. मी भाषण करीत असतां, बाल्बस, प्रत्येक प्रकरणावर मला उत्तर देणें, किंवा मध्यें कांहीं अडथळा न होऊं देतां माझें भाषण पुरें होऊं देणें हें मी तुझ्या मर्जीवर ठेवितों. बाल्बस म्हणाला, जर तुला कांहीं गोष्टींविषयीं खुलासा करून घ्यावयाचा आहे तर तूं तेवढ्याच गोष्टी मला विचार. परंतु माझ्यापासून समजून घेणें यापेक्षां माझें मत खंडन करणें हाच जर तुझा मुख्य उद्देश असेल तर तुला वाटेल तसें तूं कर. मी प्रत्येक मुद्यावर तुला लागलीच उत्तर देईन किंवा तुझें भाषण संपेपर्यंत उगीच बसेन.

२. कोटा म्हणाला, फार उत्तम. मला आतां प्रकृत विषयाचें धोरण ठेवून बोलूं दे. आतां भाषण सुरू करण्यापूर्वीं माझ्या संबंधानें मला कांहीं गोष्टी सांगितल्या पाहिजेत; कारण तुझा अधिकार पाहून मीं त्वदधीन झालों आहें. भाषण समाप्त करते समयीं तूं मला असा उपदेश केला आहेस कीं, मी कोटा असून धर्माधिकारी आहें. हें मी स्मरणांत ठेवून मग जें काय बोलणें असेल तें बोलावें. या उपदेशाचें रहस्य मी असें समजतों कीं, आपल्या पूर्वजांचा धर्म, तत्संबंधीं पवित्र विधानें आणि संस्कार यांचें मी संरक्षण करावें. अगदीं निःसंशय मी आपल्या पुरातन धर्माचें संरक्षण

करीत आलों आहें, आणि पुढेंही करीन. अमर्त्य देवांच्या उपासनासंबंधीं माझ्या मनांत फेरबदल करणें, हें मोठ्या पंडितास देखील शक्य नाहीं, मग इतरांची कथा काय? पूर्वी जे मोठमोठे धर्माध्यक्ष होऊन गेले, त्यांचे धर्मसंबंधीं नियम मला सर्वांशीं अभिमत आहेत. झिनो, क्लीनूथेस अथवा क्रिसियस यांचे विचार मला मान्य नाहींत. यज्ञ करणें आणि पक्षी यांच्या शब्दावरून भावी होणाऱ्या शुभ अथवा अशुभ गोष्टी जाणणें हाच काय तो आम्हा रोमन लोकांचा प्रथमतः मुख्य धर्म होता. नंतर दैवीवाणीच्या आणि शकुनविद्येच्या साधनांनीं दुश्चिन्हें आणि भयंकर उत्पात यांपासून होणारे भावी परिणाम अगोदर आपल्यास कळूं लागले. त्यांत तिरस्कार करण्यासारखें कांहीं अशुद्ध आहे असें मला कधींही वाटलें नाहीं. माझें तर असें देखील मत आहे कीं, रोमुलस यानें प्रश्नविद्या आणि नुमा यानें यजनक्रिया या दोन गोष्टी प्रवृत्तींत आणून रोमच्या राज्याचा मजबूत पाया घातला. त्यांनीं आराधना करून देवांची कृपा संपादन केली नसती तर हें रोमराष्ट्र इतक्या उत्कर्षास आणि भरभराटीस कधींही आलें नसतें. बाल्बस, मी, कोटा आणि धर्माध्यक्ष या नात्यानें माझे धर्मसंबंधीं विचार असे आहेत. परंतु तूं मला समर्पक कारणबलानें आत्ममतवश करून घेतलें पाहिजेस. ज्या मताचा मी अंगीकार करावा, असें तूं ह्मणतोस तें मत खरें आहे असें मला प्रमाणानें सिद्ध करून दे, असें म्हणण्याचा मला अधिकार आहे. कारण कीं तूं तत्वज्ञानी आहेस. आतां मी कांहींएक प्रमाणाची अपेक्षा न करितां आमच्या पूर्वजांचा धर्म सत्य मानावा ही गोष्ट निराळी आहे.

३. बाल्बस ह्मणाला, कोटा, तूं मजपासून कोणत्या पुराव्याची अपेक्षा करितोस? कोटा ह्मणाला, बाल्बस, तूं चार गोष्टी सिद्ध

करून देण्याची प्रतिज्ञा केली आहेस, त्या द्या. पहिली, देवांचें अस्तित्व; दुसरी, त्यांच्या आकृती आणि उद्योग; तिसरी, हें विश्व त्यांच्या अनुशासनाखालीं आहे; आणि चवथी, मानवी प्राण्यांचें हित करण्याविषयीं विशेषेंकरून ते तत्पर आहेत. जर माझें स्मरण बरोबर असेल तर याप्रमाणें तुझ्या भाषणाचे तूं चार विभाग केले आहेस असें मला वाटतें. बाल्बस ह्मणाला 'होय. तूं ह्मणतोस तें अगदीं बरोबर आहे; पण तूं त्याबद्दल कोणत्या प्रमाणांची अपेक्षा करितोस तें मला कळूं दे.'

कोटा ह्मणाला आतां मला तुझ्या प्रत्येक पूर्वपक्षाचें परीक्षण करूं दे. पहिला पूर्वपक्ष देवांचें अस्तित्व हा आहे. अतिशय अपवित्र मनुष्यावांचून त्याविषयीं कोणीही संशय घेतला नाहीं. आणि जरी माझ्या मनांतून देवांचें अस्तित्व नष्ट होणार नाहीं, तरी तूं जीं प्रमाणें दाखवितोस त्यांवरून देवांचें अस्तित्व मला कबूल झालें आहे असें समजूं नको. माझे पूर्वज जी गोष्ट मानीत आले आहेत ती मी मानीत आहें. बाल्बस म्हणाला, जर देव आहेत असा तुझा दृढ विश्वास आहे तर मग कोणत्या प्रमाणांची तूं अपेक्षा करीत आहेस? कोटा म्हणाला, मी या वाटाघाटीस अशा रीतीनें प्रवृत्त झालों आहें कीं, जसा काय देवांविषयीं मी कधीं विचारच केला नाहीं, अथवा त्यांच्या संबंधानें कांहीं ऐकिलेंही नाहीं. मी अगदीं अविज्ञ आणि निःपक्षपाती असा तुझा शिष्य आहें, असें मान, आणि मी तुला ज्या गोष्टी विचारतों त्या तूं मला प्रमाणानें सिद्ध करून दे.

बाल्बस ह्मणाला, तर मग बोल तुला काय बोलावयाचें असेल तें. कोटा ह्मणाला, मला पहिल्यानें असें समजलें पाहिजे कीं, देवांचें अस्तित्व इतकें उघड आहे कीं, त्याविषयीं प्रमाणांचीं कांहीं अपेक्षा नाहीं असें तूं म्हणतोस, मग त्या पूर्वपक्षावर तूं फार वेळपर्यंत कां

बरें चर्चा केलीस ? बालूबस यानें उत्तर दिलें कीं, या बाबतींत मी तुझें अनुकरण केलें आहे. मी पुष्कळ वेळां असें पाहिलें आहे कीं, तूं आपला पक्ष सिद्ध करावयाचा असला म्हणजे वादाच्या स्वरूपाला अनुलक्षून प्रमाणावर प्रमाणें देऊन न्यायाधिशाला अगदीं घोटाळ्यांत पाडीत असतोस. आणि तत्वज्ञानी आहेत त्यांचीही रीत अशीच आहे, आणि ह्मणून तिला मी अनुसरावें हें योग्य आहे. तूं मला असें कां विचारीत नाहींस कीं, "जर तूं मला एका डोळ्यानें पाहूं शकतोस तर दोन डोळ्यांनीं तूं मला कां पाहतोस ?

४. कोटा म्हणाला, हें उपमान अगदीं बरोबर आहे कीं काय याचा तूंच विचार कर. कज्जामध्यें ज्या गोष्टी दोन्ही पक्षांला मान्य झाल्या आहेत त्यांवर मी कांहीं चर्चा करीत नाहीं. कारण उगीच कुतर्क काढीत बसल्यानें ज्या गोष्टी अगदीं स्पष्ट असतात त्या देखील भानगडींत पडतात. आणखी जरी मी वाद करीत असतां तूं ह्मणतोस त्याप्रमाणें करीत असेन, तथापि सांप्रतच्या विषयासारख्या विषयावर बोलत असतां तूं ह्मणतोस तसें मी कधींही करीत नाहीं. कारण हा विषय असा आहे कीं, त्याविषयीं फार सूक्ष्म शोधकपणा आणि तारतम्यज्ञान पाहिजे. आतां नेत्रांच्या संबंधानें जी तुझी कोटी आहे त्यांत कांहीं अर्थ नाहीं. दोन्ही नेत्रांचें दर्शन एकच असून ज्या प्रकृतीला तूं शाहाणी म्हणतोस तिला आंपल्यास दोन नेत्र देण्यांत, आपण मोठें चातुर्य खर्च केलें असें वाटलें आहे. असो. खरी गोष्ट अशी आहे कीं, तूं ह्मणतोस त्याप्रमाणें देवांचें अस्तित्व कांहीं स्पष्ट नाहीं, यास्तव त्याबद्दल तुला पुष्कळ प्रमाणें दाखविण्याची जरूर पडली. देव आहेत असें आमचे पूर्वज मानीत आले आहेत. सबब मीही तसें मानावें, इतकें म्हणणें पुरे आहे. जर तूं प्रमाणांनीं ती गोष्ट सिद्ध करून देण्याचा डौल घालीत आहेस तर तीं प्रमाणें खंडन क-

रण्याचा माझा हक्क आहे. देवांच्या अस्तित्वाविषयीं तूं जीं प्रमाणें दाखविलीं आहेस त्यांवरून देवांचें अस्तित्व सिद्ध होत नाहीं, इतकेंच नाहीं, पण उलटा तुझा पक्ष जास्त क्षीण वाटूं लागला आहे. मी तुझीं प्रमाणेंच नुसतीं लक्षांत ठेविलीं नाहींत, परंतु तुझा भाषणक्रम देखील माझ्या लक्षांत आहे. पहिलें प्रमाण तुझें असें आहे कीं, आपण जेव्हां नेत्र वर करून आकाशाकडे अवलोकन करितों, तेव्हां तात्काळ आपल्या मनांत असें येतें कीं, हा कांहीं दैविक शक्तीचा प्रादुर्भाव आहे. आणि आकाशस्थ तारे हे प्रत्यक्ष देव आहेत, असें तूं म्हणतोस, परंतु क्लिअँथिस आणि दुसरे पुष्कळ लोक त्यांस सजीव प्राण्यांच्या वर्गांत देखील मोजीत नाहींत.

५. तुझ्या समजुतीप्रमाणें दुसरें तुझें बळकट प्रमाण हें आहे कीं, देवांच्या अस्तित्वाविषयीं सगळ्या जगाचा विश्वास आहे, आणि मनुष्य प्राण्याची त्याविषयीं दिवसानुदिवस जास्त खातरजमा होत आहे. विशेषेंकरून तुझ्या पंथानुयायांनीं देखील ज्यांस वेडे म्हटलें आहे अशा मूर्ख लोकांच्या निर्णयावर अशी महत्वाची गोष्ट टाकावी हें उचित आहे काय? युद्धप्रसंगीं देव घोड्यावर बसून आपल्या शत्रूबरोबर लढतात. व्हाटिनियस यास ते निळ्या घोड्यावर बसून रस्त्यांत भेटले आणि त्यांनीं त्यास रोमन लोकांचा लढाईंत जय झाला हें वर्तमान सांगितलें. अशा थेरड्या म्हातारीच्या जुन्या काहण्यासारख्या भाकड कथा सांगून आमच्याकडून देवांचें अस्तित्व कबूल करविण्यास इच्छितोस यांत तुझा किती बरें असमंजसपणा आहे? अशा दंतकथा सांगून तूं आमची खातरजमा करूं शकणार नाहींस. प्रमाणांनीं तूं देवांचें अस्तित्व सिद्ध करून दे.*

६. आतां आपल्यास भविष्यकथनाच्या संबंधानें बोलावयाचें

---

* यापुढचीं मूळग्रंथाचीं कांहीं पानें गहाळ झालीं आहेत.

आहे. जें कांहीं होणार आहे तें कोणाच्यानें टाळवत नाहीं, आणि तें पूर्वी जाणणें हें तर सर्वथैव निरुपयोगी आहे. कारण ज्यांपासून सामान्य स्वास्थ्यभंग होतो अशा गोष्टी पूर्वी जाणणें हें उलटें दुःखास्पद मात्र आहे. तुझ्या मताप्रमाणें दैवच प्रधान आहे तर भावी होणाऱ्या गोष्टी अगोदर कळल्यापासून फायदा काय ? आणि ज्या गोष्टी अनिवार्य आहेत त्या पूर्वी कळल्या तरी त्या आपण टाळणार कशा ?

प्रश्नविद्या केव्हांपासून प्रचारांत आली ? कावळ्याच्या शब्दापासून अमुक एक गोष्ट होणार हें पहिल्यानें कोणी शोधून काढिलें ? चिठ्या टाकून आपल्या दैवीं काय लिहिलें आहे हें समजण्याची युक्ति पहिल्यानें कोणी शोधून काढली ? ह्या गोष्टींवर माझा विश्वास तर नाहींच, पण मी त्या अगदीं तुच्छ मानतों. शकुनजोशी भविष्यकथन करण्यांत नेहमीं चुकतात असें असून तुझ्यासारख्या तत्ववेत्त्यानें त्यांच्या सांगण्यावर भरवसा ठेवावा हें तुला उचित आहे काय ? वैद्य देखील तसेच नेहेमीं चुकतात, असें तूं ह्मणतोस. प्रश्नविद्या आणि वैद्यक यांजमध्यें तुल्यभाव कसा असूं शकेल ? प्रश्नाविद्येचें मूळ आपल्यास मुळींच माहीत नाहीं, आणि वैद्यकाचीं मूळतत्वें अशीं आहेत कीं, प्रत्येक व्यक्तीस तीं बुद्धिगम्य आहेत. तुझा असा विश्वास आहे कीं, एका कुटुंबांतील पुरुषांनीं आपल्या देशाकरितां आपले प्राण बळी देऊन देवांचें शांतवन केलें. *देवांचा हा किती मोठा अन्याय कीं, सत्कुलोत्पन्न पुरुषांचें रक्त प्राशन केल्यावांचून ते दुसऱ्या कोणत्याही पदार्थानें तृप्त झाले नाहींत ! पण खरी गोष्ट

---

* एका कुटुंबांतील तीन मनुष्यांनीं आपल्या देशाकरितां आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या असा इतिहास आहे. बापानें लॅटिनच्या युद्धांत, मुलानें टयुसकनच्या युद्धांत आणि नातवानें पीयऱ्हसबरोबर युद्ध केलें त्यांत.

अशी आहे कीं, त्या सेनापतींनींही एक युक्ति योजिली होती, आणि ती त्या प्रसिद्ध पुरुषांच्या नांवलौकिकास योग्य होती. कारण कीं, त्यांनीं आत्महितापेक्षां देशहित जास्त मानिलें आणि त्यांनीं योजिलेली युक्ति सफळ झाली. आपण जर शत्रूवर आवेशानें चालून गेलों तर आपलें सर्व सैन्य आपलें अनुकरण करील असें त्यांस वाटल्यावरून त्यांनीं शत्रूवर चाल केल्याबरोबर सर्व सैन्यानें एकदम हल्ला केला. त्यांत ते सेनापती तर प्राणास मुकले, परंतु त्यांच्या सैन्याचा जय झाला.

७. बाल्बस, तूं जीं कांहीं प्रमाणें दाखविलीं आहेस त्यांवरून देव आहेत असें कांहीं सिद्ध होत नाहीं. मी देव आहेत असें मानितों; परंतु स्टोईक जीं प्रमाणें दाखवितात त्यांवरून कांहीं मी मानीत नाहीं. तूं असें ह्मणतोस कीं, देवांविषयीं मनुष्यांच्या मनांत जी भावना आहे त्याचीं क्लीनृथेस यानें चार कारणें सांगितलीं आहेत (त्याविषयीं मीं पूर्वीं विस्तारपूर्वक सांगितलें आहे) तीं हीं. भावी होणाऱ्या गोष्टींचें अगोदर ज्ञान; दुसरें, सृष्टींतील झंझावात इत्यादि उत्पात; तिसरें, आपण ज्या वस्तूंचा उपभोग घेतों त्यांचा उपयोग आणि विपुलपणा; आणि चवथें, तारे आणि नभोमंडळ यांची फेरफारावेगळी सुरेख व्यवस्था. भविष्यज्ञानाविषयीं मी आतांच उत्तर देऊन चुकलों आहें. वायूमध्यें, समुद्रांत, आणि पृथ्वीवर जे उत्पात होतात त्यांस भिऊन पुष्कळ लोकांनीं असें मानिलें आहे कीं, त्या उत्पातांस अमर्त्य देव प्रेरक आहेत, हें मला ठाऊक आहे.

परंतु देव आहेत असें मानणारे लोक आहेत किंवा नाहींत, हा कांहीं प्रश्न नाहीं. देव आहेत किंवा नाहींत हा मुख्य प्रश्न आहे. लोकांनीं देव आहेत असें मानिलें ह्मणून कांहीं देव आहेत, असें सिद्ध होत नाहीं. आतां स्पृहणीय वस्तूंचा विपुल पुरवठा व ऋतूंची

व नक्षत्रमंडळाची फेरफारावेगळी सुरेख व्यवस्था ह्या दोन प्रमाणांवरून देव आहेत असें जें क्लीनूथेस याचें ह्मणणें आहे, त्याविषयीं, आणि देवांच्या दूरवर विचाराविषयीं तूं विस्तारपूर्वक बोलला आहेस त्याविषयीं मी जेव्हां उत्तर देईन, तेव्हां सांगेन. त्याचप्रमाणें क्रिसियस याजपासून तूं जें एक प्रमाण उसनें घेतलें आहेस कीं ' जर सृष्टीमध्यें अशा वस्तु उत्पन्न होतात कीं, तशा वस्तु निर्माण करण्याची कांहीं मनुष्यामध्यें शक्ति नाहीं व म्हणून मनुष्याहून श्रेष्ठ असा कोणी प्राणी आहे ही गोष्ट सिद्ध आहे ' त्या प्रमाणावर देखील मी मग बोलेन. तूं ह्या जगाची एका सुंदर गृहाशीं तुलना केली आहेस त्याविषयीं आणि ह्या जगाच्या ठाकठीकपणाबद्दल व मेळाबद्दल तूं जें कांहीं सांगितलें आहेस त्याजविषयीं, आणि उष्णतेच्या संबंधानें पदार्थविज्ञानशास्त्रांतून तूं जीं प्रमाणें निवडून काढिलीं आहेस त्यांविषयीं आणि सूर्य, चंद्र आणि दुसरीं सर्व नक्षत्रें यांस इंद्रियें असून ज्ञान आहे असें प्रतिपादन केलें आहेस त्याविषयींही मी मग सांगेन, आणि तुला वारंवार असा प्रश्न विचारीन कीं, कोणत्या प्रमाणांवरून देव आहेत अशी तुझी खातरजमा झाली आहे.

८. बाल्बस ह्मणाला, मला असें वाटतें कीं, देवांच्या अस्तित्वाविषयीं मी जीं प्रमाणें दाखविलीं आहेत तीं समर्पक आहेत; परंतु तुझी भाषण करण्याची शैली अशी चमत्कारिक आहे कीं, तूं एखाद्या मुद्यावर मला प्रश्न विचारतोस आणि मी उत्तर देण्याची तयारी करीत आहें, इतक्यांत भाषणाचा रोंख बदलून तूं दुसऱ्या विषयाकडे वळतोस. उत्तर देण्याची मला संधीच देत नाहींस. प्रश्न आणि शकुन पाहण्याची विद्या आणि देव यांविषयीं आम्ही स्टोइक यांनीं फार विचार केला आहे. त्या महत्वाच्या विषयाची तर तूं अगदींच हेळसांड केलीस. परंतु आपण ज्या विषयाची चर्चा करीत आहोंत.

त्याशीं त्याचा संबंध नाहीं असें जर तुला वाटत आहे तर तूं तें ह्या विषयांत मिश्र करूं नको, ह्मणजे आपण ज्या विषयाची चर्चा करीत आहोंत त्याचा स्पष्ट खुलासा होईल.

कोटा म्हणाला, फार उत्तम. तूं मुख्य विषयाचे चार भाग केले आहेस, त्यांत पहिल्या भागावर मला जें कांहीं बोलावयाचें तें मी बोललों आहें. आतां दुसऱ्या भागाविषयीं तुझ्या प्रमाणांवर माझ्या काय कोट्या आहेत त्या मी तुला सांगतों. देवांचें वर्तन कोणत्या प्रकारचें आहे याविषयीं तूं प्रमाणें दाखविलींस तेव्हां मला असा भास झाला कीं, जसेकाय मुळींच देव नाहींत, असें तूं प्रतिपादन करीत आहेस. कारण तूं असें म्हणालास कीं, आपल्या डोळ्यांत एकदां भरलें म्हणजे तें मनांतून काढून टाकणें फार कठीण आहे. देवांपेक्षां दुसरी उत्तम वस्तु नाहीं; आणि हें विश्व सर्वांहून उत्तम आहे, तेव्हां ती देवता आहे याविषयीं तुला कांहीं संशय नाहीं, आणि तें चैतन्यविशिष्ट आहे असेंही तुला वाटतें. ठीकच आहे. नेत्रांनीं तें पाहण्याचा तुला अभ्यास असल्यामुळें तुझ्या मनानें देखील तें तूं तसेंच पाहतोस.

पण मी तुला असें विचारतों कीं, विश्वापेक्षां दुसरी चांगली वस्तु नाहीं असें तूं कोणत्या समजुतीनें म्हणतोस? जर तुझ्या म्हणण्याचा अर्थ असा असेल कीं त्याजसारखें दुसरें सुंदर कांहीं नाहीं, तर मला तुझें म्हणणें कबूल आहे. आपल्या गरजा त्यापासून जशा पुरल्या जातात तशा दुसऱ्या कोणत्याही वस्तूपासून पुरवल्या जात नाहींत, असें तूं म्हणत असशील तर तेंही मला कबूल आहे. परंतु जगापेक्षां जास्त शाहाणें दुसरें कोणी नाहीं, असें जर तूं ह्मणत असशील तर मी कोणत्याही प्रकारें तुझ्या मताशीं मिळत नाहीं. नेत्रांच्या सहायावांचून स्वतंत्रपणें

कोणत्याही वस्तूविषयीं विचार करणें मला कांहीं अगदीं कठीण वाटत नाहीं. पण जसजसें माझें मन मी नेत्रांपासून वेगळें करून विचार करितों तसतसें तुझें मत समजण्याची माझी शक्ति कमी होते!

९. जगापेक्षां दुसरी चांगली वस्तु नाहीं असें तूं ह्मणतोस. खरोखर या पृथ्वीवर रोम नगरासारखें दुसरें सुंदर नगर नाहीं. म्हणून तुला असें वाटतें काय कीं, ह्या रोम नगराला मन आहे त्या योगानें तें विचार आणि तर्क करीत आहे; किंवा हें सुंदर नगर ज्ञानरहित असल्यामुळें त्याजपेक्षां मुंगीची योग्यता जास्ती आहे. कारण तिला बोध, विचारशक्ति आणि स्मरण आहे! बाळूबस, तुझा पक्ष कोणत्या प्रमाणानें सिद्ध होईल, याविषयीं तूं विचार कर. ज्या वस्तु तुला आवडतात त्या प्रमाणें ह्मणून पुढें आणूं नकोस.

झिनो याची अनुमान करण्याची एक जुनी रीत आहे, तिचा तूं या विषयप्रतिपादनाकडे उपयोग केला आहेस. ती अनुमान करण्याची रीत अशीः—"ज्याला तर्कज्ञान आहे तें, ज्याला तर्कज्ञान नाहीं, त्यापेक्षां श्रेष्ठ आहे; तस्मात् या जगाला तर्कज्ञान आहे म्हणून तें सर्व वस्तूंत श्रेष्ठ आहे." ही अनुमानपद्धत ग्रहण करून तुला हें जग ग्रंथ फार चागले वाचूं शकतें, असें देखील सिद्ध करून देतां येईल. झिनो याचें उदाहरण घेऊन तूं असें ह्मण: "जें चांगलें वाचूं शकतें तें, जें चांगलें वाचूं शकत नाहीं त्यापेक्षां श्रेष्ठ आहे. जग वाचूं शकतें ह्मणून त्यापेक्षां दुसरी वस्तु श्रेष्ठ नाहीं." आणि याच पद्धतीनें तुला असेंही सिद्ध करून देतां येईल कीं, हें जग वाचनपटु आहे, गणितविद्याविशारद आहे, वादनकलानिपुण आहे, त्याला सर्व शास्त्रें अवगत आहेत, आणि शेवटीं तें तत्वज्ञानी आहे. तूं वारंवार असें म्हटलें आहेस कीं, ईश्वरानें सर्व वस्तु निर्माण केल्या आहेत आणि कारण कांहीं आपल्याहून भिन्न वस्तु

निर्माण करूं शकत नाहीं. त्यापासून असें निष्पन्न होईल कीं, हें जग नुसतें चैतन्यविशिष्ट नाहीं, व शाहाणें नाहीं, तर त्याला सारंगी आणि सतार वाजवितां येते. कारण त्यानें अशीं मनुष्यें निर्माण केलीं आहेत कीं, तीं सारंगी आणि सतार वाजवितात. सारांश तुझ्या पंथाचा उत्पादक झिनो यानें अशीं प्रमाणें दाखविलीं नाहींत कीं, त्यांवरून जगाला तर्कज्ञान आहे असें आम्ही कबूल करावें किंवा तें सचेतन आहे असें मानावें. जरी असें म्हणतां येईल कीं, तें सर्व वस्तूंपेक्षां श्रेष्ठ आहे, सुंदर आहे, आपल्याला फार उपयोगी आहे, उत्तम प्रकारें अलंकृत केलें आहे आणि त्याच्या गती फार नियमित आहेत, परंतु ती एक देवता आहे असें कांहीं कोणाच्या मनांत ठसणार नाहीं. जर हें जग देव नाहीं तर असंख्य ताऱ्यांस तूं देव म्हणतोस हेंही खोटें ठरतें. कारण तारे हे ह्या जगाचा एक भाग आहे. आतां ताऱ्यांची नियमित गती फार आश्चर्यजनक आणि चमत्कारिक आहे. त्याजविषयीं आपण विचार करूं लागलों ह्मणजे आपल्यास मोठा आल्हाद होतो. परंतु बाल्बस, त्या नियमितपणाला ईश्वरी शक्ति कारण आहे असें मानितां येईल, तसेंच वस्तुस्वभाव त्यास कारण आहे असेंही मानतां येईल.

१०. समुद्राची भरतीओहोटी अशी नियमानें होत आहे कीं, तसा नियम दुसरे ठिकाणीं दृष्टिगोचर होत नाहीं. जिब्राल्टरच्या सामुद्रधुनींत आणि त्याचप्रमाणें स्पेन आणि ब्रिटन देशांच्या किनाऱ्यावर समुद्रांत नेहेमीं तुफानें होत असतात. त्यावरून आपण असें मानावें काय कीं, कोणी एक देवता प्रेरणा करीत असल्यामुळें भरतीओहोटी नियमानें होत आहे, व तुफानें होत आहेत! कृपाकरून विचार कर. जर आपण असें मानिलें कीं, ज्या वस्तूला नियम आहेत ती देवता आहे, तर मग तिजारे आणि चातुर्थिक ज्वर हे दे-

खील देव आहेत, असें मानावें लागणार नाहीं काय? कारण कीं, तेही फार नियमानें येतात. असे परिणाम कशानें होतात याविषयीं कारणें आहेत, परंतु तीं तुला माहीत नसल्यामुळें तुझ्याच्यानें सांगवत नाहींत यामुळें तुला काय ती देवांच्या मागें लपण्यास जागा आहे.

क्रिसियस याचीं प्रमाणें तुला फार वजनदार वाटलीं आहेत. निःसंशय हा मनुष्य फार हुशार आणि कुशाग्रबुद्धीचा होता. (जे आपले विचार उल्हासवृत्तीनें बदलतात त्यांस मी फार हुशार म्हणतों आणि ज्यांचीं मनें नेहमीं विचार केल्यामुळें प्रत्येक विषय ग्रहण करण्यास पात्र झालीं आहेत त्यांस मी कुशाग्रबुद्धि ह्मणतों.) क्रिसियस याचें म्हणणें असें आहे कीं "मनुष्याला उत्पन्न करितां येत नाहीं, अशी जर वस्तु आहे तर ती ज्यानें निर्माण केली तो, मनुष्यापेक्षां श्रेष्ठ आहे. जगांत अशा ज्या वस्तु आहेत कीं त्या निर्माण करण्यास मनुष्य कांहीं समर्थ नाहीं, ह्मणून त्यांचा निर्माणकर्ता मनुष्यापेक्षां श्रेष्ठ आहे. ईश्वरावांचून मनुष्यापेक्षां श्रेष्ठ कोण आहे? यास्तव ईश्वर आहे हें सिद्ध आहे."

ह्या प्रमाणांचीं मूळतत्वें देखील झिनो याच्या मूळतत्वांप्रमाणें चुकीचीं आहेत. कारण जास्त चांगलें आणि अत्युत्तम ह्मणण्याचा भावार्थ काय, याचा क्रिसियस कांहीं निर्णय करीत नाहीं. अथवा बुद्धिविशिष्ट कारण आणि स्वाभाविक कारण यांजमध्यें न्यूनाधिक्य काय आहे याचा निर्णय करीत नाहीं. क्रिसियस आणखी असें म्हणतो "जर देव नाहींत तर मनुष्याहून दुसरें कोणी श्रेष्ठ नाहीं. परंतु आपल्या ठायीं पराकाष्ठेचा अभिमान बाळगल्यावांचून आपल्याहून जगांत कोणी श्रेष्ठ नाहीं, असा विचार मनांत यावयाचा नाहीं." आतां आपण क्षणभर असें गृहीत करूं कीं, जगांत आपल्याहून कोणी श्रेष्ठ नाहीं असें मनुष्यास वाटत आहे,

तर त्यांत अभिमान कशाचा ? मनुष्याला बुद्धि आणि तर्कशक्ति आहे, तर त्यानें आपण बुद्धि आणि तर्कशक्तियुक्त आहोंत- हें जाणणें उलटें चांगल्या ज्ञानाचें प्रदर्शन आहे. क्रिसियस असें ह्मणतो " जेव्हां आपण एखादें सुंदर गृह अवलोकन करितों तेव्हां तें मनुष्यांकरितां बांधलें आहे, घुशीकरितां नाहीं, असा विचार आपल्या मनांत येतो; त्याप्रमाणें हें विश्व देवांकरितां बांधलें आहे असा विचार मनांत आणणें रास्त आहे." होय, मी जर हें विश्व प्रकृतीनें निर्माण केलें असें मानिलें तर, पण मी जर तसें मानीत नाहीं आणि त्याबद्दल मी पुरवा करण्यास तयार आहें कीं, हें जग वस्तुशक्तीपासून निर्माण झालें आहे तर मग काय ?

११. जगांत जर ज्ञान नाहीं, तर तें मनुष्यास कसें प्राप्त झालें ? असा साक्रेतीस यानें आपल्या शिष्यास प्रश्न विचाला होता. बाल्बस मी तुला असें विचारतों कीं, चंद्र जेव्हां सुर्याच्या जवळ येतो तेव्हां त्या दोघांचें परस्पर भाषण होत नसतें तर आपल्यास बोलतां येतें काय ? किंवा जर ह्या जगाला गातां वाजवितां आलें नसतें, तर आपल्यास गातां वाजवितां आलें असतें काय ? याजवर तूं काय उत्तर देतोस तें पाहूं. सारांश, चंद्र सूर्य बोलत नाहींत आणि हें जग गात नाहीं व वाजवीतही नाहीं. हा सगळा वस्तुस्वभावाचा नैसर्गिक परिणाम आहे. झिनो म्हणतों,- त्या काल्पनिक प्रकृतीचें हें कांहीं कार्य नाहीं. वस्तुस्वभावाची नियमित गती आणि फेरफार या योगानें प्रत्येक वस्तूचें स्वरूपांतर होत आहे.

ह्या सृष्टींतील वस्तूंमध्यें जें परस्पर ऐक्य आणि सर्वसाधारण सौरस्य आहे त्याविषयीं तुझें असें ह्मणणें आहे कीं, एकरक्तसंबंधानें जसा ऐक्यभाव आणि परस्परानुराग असतो त्याप्रमाणें ह्या जगांतील वस्तूंमध्यें ऐक्य आणि सौरस्य आहे, हें तुझें ह्मणणें मी

संतोषानें कबूल करितों. परंतु 'ईश्वरी तंत्रावांचून तसें असूं शकलें नसतें' हें वाक्य जें तूं जास्त जोडलें आहेस तें कांहीं मला कबूल नाहीं. दैविकशक्तीवांचून केवळ वस्तुस्वभावशक्तीचा हा परिणाम आहे. या जगांतील वस्तूंमध्यें एकजातीचें स्वभावानुगुण्य आहे, त्यायोगानें ह्या विश्वाचे सर्व भाग एकत्र जुळले आहेत.

१२. *क्यारनीडस यानें ज्या हरकती घेतल्या आहेत त्यांजपुढें तुझ्या मताचा, बाल्बस, कसा रे टिकाव लागेल? तो असें ह्मणतो—"जर ह्या जगांत कोणी अमर्त्य नाहीं, तर सर्वकालस्थायी अशीही वस्तु नाहीं, किंवा जिचें वियुक्तिकरण किंवा विभागीकरण करितां येत नाहीं, अशीही वस्तु नाहीं. आणि प्रत्येक प्राणी आपल्या जातिस्वभावानें निष्क्रिय आहे. आणि असा कोणताही प्राणी नाहीं कीं त्याजवर बाहेरील संस्कार होत नाहींत, ह्मणजे दुसऱ्या वस्तूंची त्याजवर प्रेरणा होत नाहीं. असा कोणीच प्राणी नाहीं कीं, त्यास दुःख होत नाहीं, आणि जर प्रत्येक प्राणी मर्त्य आहे, अमर्त्य कोणीच नाहीं, तर त्याचप्रमाणें प्रत्येक प्राण्याचे तुकडे करून विभागीकरण करितां येतें तर अपृथक्करणीय, अविभाज्य आणि आद्यंतशून्य अशी कांहींच वस्तु नाहीं. सर्व वस्तूंवर बाह्य पदार्थांची प्रेरणा होते. ह्मणून प्रत्येक प्राणी अवश्यत्वेंकरून नाशवंत, द्रवीकरणयोग्य आणि भेद्य आहे."

कारण अशा जातीचें पितळ, रुपें किंवा मेण नाहीं कीं, त्याची कोणतीही वस्तु करितां येणार नाहीं. ह्या पदार्थांची कोणतीही वस्तु केली ह्मणजे त्यांच्या मूळस्वरूपांत बदल होतो. त्याच न्यायानें जर सर्व मूळतत्वें अनियत आहेत, तर त्यांपासून निर्माण झालेली प्रत्येक वस्तु अस्थिर आहे.

१३. बाल्बस, तुझ्याच मताप्रमाणें जर सर्व मूळतत्वांला अने-

* पृष्ठ ४ यावरील टीप पहा.

कावस्था प्राप्त होतात तर त्यांपासून निर्माण झालेल्या सर्व वस्तूंला अवस्थांतर प्राप्त झालेंच पाहिजे. जर अविनाशी अशी कांहीं वस्तु असती तर सर्व वस्तु नाशवंत असल्या नसत्या. सारांश, प्रत्येक वस्तु नाशावंत आहे. कारण उदक, वायु, अग्नी किंवा पृथ्वी, या प्रत्येक मुळतत्वापासून अथवा सर्व मूळतत्वें एकत्र होऊन त्यांपासून किंवा त्यांपैकीं कांहीं मूळतत्वांचा संयोग होऊन त्यापासून सर्व वस्तु निर्माण होतात. आतां या मूळतत्वांत असें एकही मूळतत्व नाहीं कीं, जें नष्ट होत नाहीं. कारण पृथ्वीपासून जे पदार्थ निर्माण होतात ते ठिसूळ आहेत. उदक इतकें मृदु आहे कीं, अगदीं हलक्या आघातानें त्याचे परमाणु वेगळे होतात. आणि वायु अगदीं स्वल्प धक्यानें सरकून जातो, व उष्णाच्या योगानें विरळ होतो आणि अग्नी विझून जातो. आणि त्याखेरीज या चार मूळतत्वांपैकीं, प्रत्येकाचें स्वरूपांतर झालें ह्मणजे त्याचें पूर्वरूप नष्ट होतें. जसें पृथ्वीपासून उदक, उदकापासून वायु आणि वायूपासून आकाश. त्याचप्रमाणें त्याजमध्यें पुनः फेरफार होऊन उलट क्रिया होते, तेव्हांही तसेंच होतें. यास्तव जर प्रत्येक प्राण्याच्या रचनेंत नाशवंत वस्तूवांचून दुसरें कांहीं नाहीं, तर शाश्वत अशी कोणतीही वस्तु नाहीं, हें स्पष्ट आहे.

यास्तव अशा निर्बळ प्रमाणावरून अविनाशी प्राणी आहेत असें स्थापन करण्याच्या खटपटींत पडूं नको. असा प्राणीच नाहीं कीं, ज्याला आरंभ नाहीं; आणि ज्याला आरंभ आहे त्याला अंत नाहीं, असें कधींही होणार नाहीं. कारण प्रत्येक प्राणी विषयग्रहणक्षम असल्यामुळें अर्थात सर्व प्राणी शीत आणि उष्ण, गोड आणि कडू यांविषयीं जाणते आहेत. त्यांस फक्त सुखज्ञान मात्र आहे, आणि दुःखज्ञान नाहीं, असें मुळींच असूं शकणार नाहीं. ज्याप्रमाणें त्यांस सुख वाटतें त्याप्रमाणें दुःखही वाटतें; आणि ज्याला दुःख

वाटतें तो अवश्य मरणधर्मविशिष्ट असलाच पाहिजे. यास्तव प्रत्येक प्राणी मर्त्य आहे, असें कबूल केलेंच पाहिजे.

ज्याला सुख आणि दुःख समजत नाहीं, असा कोणी प्राणी असेल तर सुख आणि दुःख कळतें त्या प्राण्यामध्यें जें तत्व आहे तें त्या प्राण्यामध्यें असूं शकणार नाहीं. तेव्हां प्रत्येक प्राण्यास सुख-दुःख काय याचें ज्ञान असलें पाहिजे; आणि ज्याला सुखदुःख कळतें तो प्राणी कांहीं अमर्त्य असूं शकणार नाहीं. तेव्हां त्यापासून आपण असा सिद्धांत केला पाहिजे कीं, ज्यापेक्षां इंद्रियातीत प्राणी नाहीं, त्यापेक्षां अजरामर असाही प्राणी नाहीं. शिवाय ज्याला आवड आणि नावड नाहीं, असाही प्राणी नाहीं. जें त्याच्या स्वभावाला आवडतें त्याविषयीं आवड आणि जें त्याला आवडत नाहीं त्याविषयीं नावड असणें हा नैसर्गिक स्वभाव आहे. प्रत्येक प्राण्याच्या स्थितींत कांहीं वस्तु त्याच्या आवडीच्या असतात, कांहीं नावडीच्या असतात; आणि ज्या नावडीच्या असतात त्यांपासून त्याचा नाश होण्याचा संभव आहे, तेव्हां प्रत्येक प्राणी अपरिहार्य नाशाला पात्र आहे. ज्याला विषयग्रहणशक्ति आहे तो नाशवंत आहे, हें सिद्ध करण्याला अनंत प्रमाणें आहेत. कारण शीत, उष्ण, सुखदुःख आणि दुसऱ्या वस्तु ज्यांचा इंद्रियांवर परिणाम घडतो त्या जेव्हां जास्त होतात तेव्हां त्यांपासून नाश होतो. तेव्हां असा प्राणी नाहीं कीं, जो विषयग्रहणीं शक्त नाहीं आणि जो विषय ग्रहण-शक्त आहे, तो नाशवंत नाहीं.

१४. प्रत्येक प्राण्याचें उपादानद्रव्य शुद्ध किंवा मिश्र आहे. पृथ्वी, उदक, वायु अथवा अग्नि यांजपैकीं एका मूळतत्वापासून जी वस्तु बनली आहे त्या वस्तूचें उपादानद्रव्य शुद्ध (परंतु एकाच मूळतत्वानें वस्तु बनत असेल, असें संभवत नाहीं) आणि एकाहून

जास्त मूळतत्वें एकत्र होऊन जी वस्तु बनते तिचें उपादानद्रव्य मिश्र होय. मूळतत्वांचा संयोग होऊन बनलेल्या वस्तूंचें अस्तित्व कांहीं काळपर्यंत असूं शकेल, परंतु त्या सर्वकाळ राहाणार नाहींत. कारण प्रत्येक मूळतत्व आपल्या पूर्व स्थितीला प्राप्त झालेंच पाहिजे, तस्मात् नित्य असा प्राणीच नाहीं.

बाल्बस्, तुझ्या पंथाच्या मताप्रमाणें सर्व मूळतत्वांमध्यें उष्णच काय तें क्रियाशक्त मूळतत्व आहे. उष्णता नष्ट झाली म्हणजे सजीव प्राण्यांचें जीवित्व नष्ट झालेंच असें तुम्ही ह्मणतां. पण मला कांहीं तसें वाटत नाहीं. उष्णतेचा अभाव झाला म्हणजे सजीव प्राण्याचें जीवित नष्ट कां व्हावें? ओलावा किंवा वायु नष्ट झाला तर सजीव प्राणी नष्ट कां होऊं नयेत? विशेषेंकरून इतर मूळतत्वांपेक्षां उष्णतेवरच प्राण्यांचें जीवित अवलंबून आहे, असें तुझें ह्मणणें आह्मास सर्वांशीं ग्राह्य नाहीं.

तथापि वायु आणि उदक यांजमध्यें जे गुणधर्म आहेत तेच अग्नी आणि उष्णता यांजमध्येंही आहेत. परंतु त्यांपासून काय निष्पन्न होतें तें पाहूं. मी जर चुकत नसेन तर तुम्ही असें मानितां कीं, ह्या सर्व जगांत अग्नीवांचून स्वतःसिद्ध चैतन्यविशिष्ट अशी दुसरी वस्तु नाहीं. पण अग्नीच स्वतःसिद्ध चैतन्यविशिष्ट कां, आणि ज्याला आत्मा म्हणतात तो वायु स्वतःसिद्ध चैतन्यविशिष्ट कां नाहीं? उष्णता हेंच जीवित असें तूं कशावरून गृहीत करतोस? जीवित ह्मणजे उष्णता आणि वायूचा संयोग हें जास्त संभवनीय आहे. आतां तूं म्हणतोस त्याप्रमाणें जर अग्नी स्वतःसिद्ध चैतन्यविशिष्ट आहे आणि त्याजमध्यें दुसऱ्या मूळतत्वांचें मिश्रण झालें नाहीं तर तो विषयग्रहणक्षम असलाच पाहिजे. कारण कीं, त्याच्या योगानें आपलीं शरीरें विषयग्रहणक्षम झालीं आहेत. आणि आतांच

मी जो आक्षेप घेतला आहे कीं, जी वस्तु विषयग्रहणक्षम आहे तिला सुख आणि दुःख काय आहे, याचा अनुभव असलाच पाहिजे; आणि जिला दुःखाचा अनुभव आहे ती मरणधर्माला पात्र असलीच पाहिजे ; तो आक्षेप येथें देखील लागू होतो. म्हणून अग्नी हा नित्य आहे असें कांहीं तुझ्याच्यानें सिद्ध करवत नाहीं. तुम्ही स्टोईक असें मानतां कीं उष्णधर्मयुक्त वस्तूला आहाराची गरज आहे. त्यावांचून कांहीं त्याचें अस्तित्व कायम राहणार नाहीं. सूर्य, चंद्र आणि तारे यांचें मिष्टोदकानें किंवा क्षारोदकानें पोषण होतें. आणि क्लिन्थेसनें असें म्हटलें आहे कीं, सूर्य अयनवृत्ताच्या पलिकडे न जातां मागें परतत असतो त्याचें कारण हेंच आहे कीं, आपल्या भक्ष्य पदार्थांपासून फार अंतरावर त्याच्यानें जावत नाहीं. याविषयीं पुढें मी पूर्णपणें विचार करीन. परंतु यावरून आपल्यास असा सिद्धांत करितां येतो कीं, ज्या वस्तूंचें अस्तित्व नष्ट होतें त्या वस्तु स्वभावतः शाश्वत कधीं असूं शकणार नाहींत. आणि जर अग्नीला आहाराची गरज आहे तर तो न मिळाला असतां त्याचें अस्तित्व नष्ट होईल आणि म्हणून तो कांहीं स्वभावतः शाश्वत असूं शकणार नाहीं.

१९. हे सर्व विचार सध्या आपण एका बाजूस ठेवूं. समजा कीं देव आहेत असें आपल्याच्यानें सिद्ध करवलें; पण ते जर एकाही सद्गुणानें युक्त नाहींत तर ते असावे तरी कसे? परिणाम दर्शन या सद्गुणाची देवांच्या ठायीं आपण अपेक्षा करूं नये काय ? हा सद्गुण असा आहे कीं त्याच्या योगानें वस्तूंच्या आंगचे चांगले, वाईट आणि सामान्य गुण समजतात. पण ज्यांना कधीं पीडा होत नाहीं किंवा होऊं शकणार नाहीं, त्यांना परिणामदर्शन ह्या सद्गुणाचा काय उपयोग आहे ? ज्ञानाचा त्यांनीं कोठें उपयोग करावा ? ज्या गोष्टी

दुर्बोध आहेत त्या जाणण्याकरितां आह्मा मनुष्यांस त्यांची गरज आहे. पण देवांना दुर्बोध असें कांहीं असूं शकणार नाहीं. आतां न्यायनिष्ठपणाची देखील देवांना कांहीं गरज नाहीं. हा सद्गुण तुझ्या मताप्रमाणें मनुष्यांपासून व त्यांचे समाज बनल्यापासून उत्पन्न झाला आहे तेव्हां त्याचा आणि देवांचा संबंध काय? विषयभोगपरित्याग हें नियत वर्तनाचें लक्षण आहे; आणि जर विषयभोगपरित्याग ह्या सद्गुणाचा स्वर्गामध्यें वास आहे, तर तेथें विषयसुखें आहेत असें सिद्ध होतें; कारण विषयसुखें असल्यावांचून विषयभोगपरित्याग असूं शकणार नाहीं, आणि विषयभोगपरित्याग केल्यावांचून नियत वर्तन असूं शकणार नाहीं. सरतेशेवटीं जर धैर्य ह्या सद्गुणाची आपण देवांच्या ठायीं योजना केली तर तो सद्गुण त्यांच्या ठायीं दृष्टिगोचर व्हावा कसा आणि केव्हां? ते दुःखी असतील तेव्हां, श्रम करीत असतील तेव्हां, किंवा संकटांत असतील तेव्हां. या धर्मांपैकीं कोणताही धर्म देवांच्या आंगीं असूं शकणार नाहीं. अर्थात त्यांच्या आंगीं धैर्य हा गुणही नाहीं. ज्यांना बुद्धीचा उपयोग करितां येत नाहीं, व वर निर्दिष्ट केलेल्या गुणांपैकीं-कोणताही गुण त्यांच्या आंगीं असण्याचा संभव नाहीं, त्यांना आह्मी देव तरी कोणत्या गुणानें मानावें?

जेव्हां मी स्टोईकमताविषयीं विचार करितों, तेव्हां ह्या दुनियेंतील मूर्ख लोकांविषयीं माझा तिरस्कार नाहींसा होतो; कारण त्या लोकांनीं जे देव मानले आहेत ते हे आहेतः—सिरियन लोक एका मच्छाची पूजा करितात. मिसर देशांतील लोक बहुतकरून प्रत्येक जातीच्या जनावराला देव मानून त्यांची प्रतिष्ठापना करितात. जीं मनुष्यें मरून त्यांची राखरांगोळी झाली त्यांस ग्रीक लोक देव मानितात. आपले रोमन लोकही त्याचप्रमाणें रोमुलस वगैरे लोकांस

देव मानितात. त्यांची अशी कल्पना आहे कीं, स्वर्गांत त्यांस देवत्व प्राप्त झालें आहे.

अविद्य लोक जे देव मानितात ते हे आहेत.

१६. बाल्बस, तुम्हां तत्वज्ञान्यांचे याबद्दल विचार काय आहेत ते मला कळूंदे. ह्या विचाराच्या संबंधानें मूर्ख लोकांपेक्षां कोणत्या गुणानें ते श्रेष्ठ आहेत ? मी त्यांस सोडून पुढें चालतों; कारण त्यांचे विचार कसेही असोत ते स्वतः खरोखर फार प्रशंसनीय आहेत. तूं म्हणतोस त्याप्रमाणें हें विश्व देवता आहे असें घटकाभर मी कबूल करतों. परंतु आपण आणखी पुष्कळ देव त्या विश्वदेवतेच्या हुमाल्यास जोडले आहेत त्या देवांची संख्या तरी किती मोठी आहे ! कारण तुझ्या मताप्रमाणें प्रत्येक नक्षत्रही देवता आहे. कांहीं नक्षत्रांला तूं मेष, वृश्चिक, वृषभ आणि सिंह अशीं नांवें दिलीं आहेस, आणि कांहीं नक्षत्रांस निर्जीव पदार्थांचीं नांवें दिलीं आहेस. जसें–तारूं, होमकुंड, मुगूट इत्यादि.

आतां मी तुझ्या मर्जीखातर नक्षत्रें हीं देव आहेत असें कबूल करतों. परंतु तेवढ्यानें संपतें कोठें ? अनंत देवांची मालिका अजून उरलीच आहे. साधारण बोलण्याच्या परिपाठांत आपण धान्याला सेरेस (Ceres) आणि मद्याला बॅचस ( Bacchus ) ह्मणतों. परंतु तुला असें वाटतें काय कीं, आपण जें अन्न भक्षण करितों त्याला देव मानील असा कोणी वेडा आहे ? मनुष्य असून देव झाले असें तूं ह्मणतोस त्याविषयीं मी तुला असें विचारतों कीं, ही गोष्ट पूर्वीं कां शक्य होती आणि आतां कां शक्य नाहीं ? ज्यांची जळून राख झाली ते पुनः सजीव होऊन देव बनले कसे याची तर बाबा मला कल्पनाच करितां येत नाहीं.

मुख्यत्वेंकरून कोणत्या हरक्युलसची× आह्मी पूजा करावी, हें जर तुझ्यापासून मला कळेल तर मला फार आनंद होईल. ज्यांनीं इतिहास शोधले आहेत ते आह्मांस अनेक हरक्युलसविषयीं सांगतात. तेव्हां आम्ही पूजा करावी कोणाची?

१७. मी तुझी अशी खातरजमा करून देईन कीं, धर्मसंबंधीं ज्या कांहीं गोष्टी मला माहीत आहेत त्या मी माझ्या पूर्वजांपासून शिकलों आहें. स्टोईक यांजपासून कांहीं शिकलों नाहीं. तर आतां तूं मला सांग कीं जर मी तुमच्या पंथांतील शिष्य असतों तर मी ह्या प्रश्नाचें काय उत्तर दिलें असतें?

१८. ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे कीं, कित्येक देशांतील लोकांनीं पराक्रमी आणि परोपकारी पुरुषांस देवकोटींत मानून त्यांस दैविक सन्मान दिले. त्यांचा उद्देश असा आहे कीं, इतरांनीं त्यांचें अनुकरण करून सद्गुणविशिष्ट व्हावें आणि आपल्या देशाच्या हितासाठीं मोठ्या उत्साहानें मोठ्या धोक्याचीं कामें आंगावर घ्यावीं. ह्याच उद्देशानें ग्रीक लोकांनीं ॲरचथेयस* आणि त्याची कन्या यांस देव मानून त्यांचीं मंदिरें बांधलीं.

१९. बाल्बस, तूं आकाश आणि तारे देव आहेत, हें स्थापित करण्या-

---

× एक मोठा पुरुष होऊन गेला. त्याच्या मरणानंतर लोक त्यास देवांच्या वर्गांत मोजून त्याची पूजा करूं लागले. प्राचीन इतिहासाप्रमाणें या नांवाचे पुष्कळ पुरुष होऊन गेले. कोणी तीन, कोणी सहा आणि कोणी बेचाळीस हरक्युलस झाले असें सांगतात.

* हा ग्रीस देशाचा सहावा राजा होता. देवांचा दृष्टांत झाल्यावरून एका युद्धप्रसंगीं त्यानें आपली कन्या बळी दिली, आणि त्याचा युद्धांत जय झाला. दंतकथा अशी आहे कीं, त्यानें ५० वर्षें राज्य केलें. खिस्ती शकापूर्वीं १३४७ वे वर्षीं तो मरण पावला. लोक त्यास व त्याच्या कन्येस देव मानून त्यांची पूजा करूं लागले.

करितां जीं प्रमाणें दाखवितोस तीं तुला किती घोटाळ्यांत पाडतील याचा तूं विचार कां करीत नाहींस ? तूं सूर्य आणि चंद्र यांस देव मानतोस. जर चंद्र देव आहे, प्रातःकाळीं उदय पावणारा शुक्र आणि इतर तारे चल आणि अचल देव आहेत, तर तूं आकाशांत धनुष्य पडतें त्यास कां देवकोटींत मोजीत नाहींस ? कारण तें इतकें सुदर्शनीय आहे कीं, देवकोटींत मोजण्यास योग्य आहे. जर तूं धनुष्याला देवकोटींत मोजलेंस तर मेघांला तूं कोणत्या वर्गांत मोजशील ? कारण धनुष्याला जे चित्रविचित्र रंग प्राप्त होतात तो मेघांचा गुण आहे. तेव्हां तुला त्यांस देवकोटींत मोजलें पाहिजे. आणि तूं मेघांना देवत्व दिलेंस ह्मणजे तुला ऋतु, तुफानें, वृष्टी, वावटळ यांस देखील देवकोटींत मोजलें पाहिजे. ही गोष्ट खरी आहे कीं, आपले क्यापटन कोणताही प्रवास करावयाचा असला ह्मणजे जहाजावर पाय ठेवण्यापूर्वीं समुद्राच्या लाटांला बळी देत असतात. म्हणून त्यांना आपण देव मानावे काय ?

२०. तूं जर पृथ्वीला सेरेस नांव देऊन देवता मानली आहेस तर तिजपासून जीं फळें उत्पन्न होतात त्यांस कां देव मानीत नाहींस ? सागराला नेपट्यून ( Neptune ) नांव देऊन देव मानतोस तर नद्या, वसरोवरें यांसही तोच अधिकार दिला पाहिजे. यास्तव ज्यांची आपल्याच्यानें संख्या करितां येणार नाहीं, इतके देव मानिले पाहिजेत किंवा त्यांपैकीं कोणीही देव नाहीं असें मानलें पाहिजे; आणि जिला अंत नाहीं, अशा तामसी आणि अविधिश्रद्धाभक्तीचा सर्वांशीं त्याग केला पाहिजे.

२१. सारांश तूं जीं प्रमाणें दाखविलीं आहेस त्यांपैकीं एक देखील स्वीकारार्ह नाहीं. मृत्युवीन मनुष्यांना देव मानले आहेत. यासंबंधानें लोकमत असें आहे कीं, ज्यापेक्षां देवभक्तीनें निष्ठापूर्वक

आपले पूर्वज त्यांची उपासना करीत आले आहेत, त्यापेक्षां त्यांत कांहीं सत्य आहे, असें मानिलें पाहिजे. त्या ह्मणण्यावर आतां मला उत्तर द्यावयाचें आहे. जे आपणास ब्रह्मविद्यावेत्ते ह्मणवितात त्यांच्या मतें तीन ज्युपिटर्स *( Jupiters ) आहेत, आणि त्या तिघांपैकीं दोघांचा जन्म अरकाडिया Arcadia देशांत झाला. त्यांपैकीं एक ईथरचा पुत्र आणि प्रॉसरपाईन ( Proserpine ) व बॅकचस Bacchus याचा पिता. दुसरा क्यूलस ( Cœlus ) याचा पुत्र आणि मिनरवाईचा पिता जिला संग्रामदेवता म्हणतात. तिसरा शनीपासून क्रेटे या बेटांत जन्मला, तेथें त्याचें प्रेतमंदीर बांधिलें आहे. ग्रीक लोकांच्या पुराणांत ज्युपिटर याच्या पुत्राचीं अनेक नांवें आहेत. तूं एकाच सूर्याचें वर्णन केलें आहेस, परंतु ब्रह्मवेत्यांनीं पुष्कळ सूर्य आहेत व त्यांचें जनन भिन्न भिन्न पित्यांपासून झालें आहे, असें सांगितलें आहे.

२२. त्याचप्रमाणें कित्येक विश्वकर्ते आहेत असें मानिलें आहे. ते कोणत्या देशांत राहतात, त्यांचा जन्म कोणापासून झाला आणि ते करतात काय याविषयीं लांब लांब गोष्टी सांगितल्या आहेत.

२३. हीं सर्व मतें ग्रीस देशांत जुन्या काहाण्यावर विश्वास ठेविल्यापासून उत्पन्न झालीं आहेत. त्यांविषयीं लोकांचा विश्वास नष्ट केला पाहिजे, नाहीं तर सत्यधर्माला ग्लानी आल्यावांचून राहणार नाहीं. पण तुह्मी स्टोईक त्या मतांचें खंडन न करितां त्यांत जसें काय खरोखरें सत्य आहे असें मानून त्यांस तुह्मी पुष्टी देतां. याप्रमाणें मी

---

* ग्रीक आणि रोमन लोकांची ही सर्वांहून श्रेष्ठ देवता आहे. जीं तेजस्वी नक्षत्रें आहेत त्यांपैकीं एका नक्षत्राला हें नांव दिलें आहे. आपण ज्याला बृहस्पती ह्मणतों त्याला ग्रीक आणि रोमन लोक ज्युपिटर ह्मणतात.

विवेकशून्य मताचें स्पष्ट खंडन केल्यावरही आणखी प्रमाणाची गरज आहे, असें तुला वाटतें काय ?

२४. आपल्यास सहज समजतें कीं, मन, विश्वास, आशा, इमानीपणा, सन्मान, जय, आरोग्य, ऐक्य आणि अशाच जातींच्या दुसऱ्या गोष्टी ह्या केवळ स्वाभाविक असून, देवपणाचा तेथें कांहीं संबंध नाहीं. कारण मन, विश्वास, आशा, सदाचरण आणि ऐक्य, ह्या वृत्ती आपल्या ठायीं स्वाभाविक असून, सन्मान, आरोग्य आणि जय, हे आपल्यास स्पृहणीय आहेत. मला हें खचित माहीत आहे कीं, त्यांचा आपल्यास फार उपयोग आहे. आणि मोठ्या भक्तिभावानें मंदिरें बांधून त्यांत त्यांच्या मूर्ती स्थापन केल्या आहेत, हें आपण पाहतों. पण त्यांच्या ठायीं देवत्व आहे हें तर मी, तूं जेव्हां प्रमाणानें सिद्ध करून देशील, तेव्हां खरें मानीन. मला येथें विशेषेंकरून दैवाविषयीं सांगितलें पाहिजे. दैव हे पराकाष्ठेचें अस्थिर आणि अनिश्चित आहेत आणि हे गुण खरोखर देवपणाला अयोग्य आहेत, असें असून त्यांला देखील लोक देव मानतात.

२५. ह्या अविधिश्रद्धेचा परिणाम असा झाला आहे कीं घातक वस्तूला देखील देवत्व देऊन लोक त्यास बळी देऊं लागले आहेत. ज्वराचें देखील देवालय बांधलें असून दुर्दैवाला बळी देण्याकरितां एका टेंकडीवर होमकुंड बांधलें आहे. तत्वज्ञानांतून ह्या अशा गोष्टी अगदीं काढून टाकिल्या पाहिजेत, आणि तसें करणें हें कांहीं अयोग्य नाहीं. कोणतें खरें मानावें हें मला स्वतःला माहीत आहे. परंतु तूं जें सांगतोस त्याहून तें फार निराळें आहे. तूं नेपच्यून* (Neptune) ही देवता फार बुद्धिवान असून तिनें समुद्राचें आक्रमण करून टाकिलें आहे असें मानतोस. पृथ्वीच्या संबंधानें सेरेस ह्मणून जी

---

* एक जलदेवता मानली आहे. आपण तिला वरुण नांव दिलें तरी साजेल.

एक देवता मानली आहे त्याविषयींही तुझें मत तसेंच आहे. परंतु पृथ्वीमध्यें आणि समुद्रामध्यें कोणतें शहाणपण आहे हें मला तर्कज्ञानें देखील कळत नाहीं. यास्तव देव आहेत किंवा नाहींत, आहेत तर ते कसे आहेत व त्यांचें आचरण कोणत्या प्रकारचें आहें, यांविषयीं मला जें शिकावयाचें आहे तें मी दुसऱ्यापासून शिकलें पाहिजे. स्टोइक यांचें मत मला ग्राह्य नाहीं.

२६. आपल्या वादांपैकीं आतां दोन विषय शिल्लक राहिले आहेत. पहिला, ह्या जगाला वर्तविणारी अशी कांहीं दैविकशक्ति आहे कीं काय? आणि शेवटचा, त्या दैविकशक्तीचें मनुष्याकडे विशेष लक्ष आहे कीं काय? तुझ्या भाषणांतील शिल्लक राहिलेले हे दोन पूर्वपक्ष आहेत, आणि तुला मान्य असेल तर ह्या तुझ्या पूर्वपक्षावर विस्तारपूर्वक आणि बिनचूक आपण विचार करूं. व्हेलियस ह्मणाला, तूं येथपर्यंत जें कांहीं सांगितलेंस तें मला अंतःकरणापासून मान्य झालें असून यापेक्षां तुजपासून जास्त गोष्टी ऐकण्याची मला इच्छा आहे.

२७. बालबस ह्मणाला, कोटा, तुझ्या भाषणाला व्यत्यय आणावा अशी माझी इच्छा नाहीं. मी दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं माझीं मतें खरीं आहेत अशी तुझी खातरजमा करून देईन.[1]

---

१. मूळ ग्रंथांतील पुष्कळ भाग नष्ट झाला आहे. ग्रंथसंगतीवरून असें दिसतें कीं, जगाला वर्तविणारी अशी कांहीं दैविकशक्ति आहे कीं काय, या विषयावर कोटा याचे भाषणांतील पुष्कळ भाग नाहींसा झाला आहे. स्टोइक मताविरुद्ध कोटा याचें भाषण आहे हें तर स्पष्टच आहे. देवांचें मनुष्याकडे विशेष लक्ष आहे कीं काय या विषयावर आतां कोटा याचें भाषण सुरू झालें आहे. मनुष्याकडे देव विशेष लक्ष ठेवितात, याचें प्रमाण काय तर त्यांनीं मनुष्यास बुद्धि दिली असून इतर प्राण्यांस ती दिली नाहीं. कोटा याचें ह्मणणें अशा अर्थाचें आहे कीं, जर देवांनीं मनुष्यास बुद्धि दिली असें मानीत असाल तर त्यापासून जगांत अनेक प्रकारचे अनर्थ उद्भवतात, त्यांस देव कारणीभूत आहेत असें निष्पन्न होतें, आणि ते अनर्थ कोणते याविषयीं कोटा निरूपण करीत आहे.

२८. कोटा म्हणतो, बालूबस, देवांनीं इतर प्राण्यांस न देतां मनुष्यास मात्र दिली ती ही बुद्धि तिच्यापासून जगावर काय काय अनर्थ झाले व होत आहेत, हें तुझ्या लक्षांत येत नाहीं काय?

२९. थियेस्टेस[२] यानें जीं अघोर पातकें केलीं त्यांत बुद्धीचा वांटा आहे असें तुला वाटत नाहीं काय? अशा प्रकारच्या पातकांचीं नाटककार नाटकांत नुसतीं सोंगें आणतात असें नाहीं. लोक नेहेमीं आपल्या आयुष्यक्रमांत त्यांहूनही अधीक भयंकरपणानें तशीं दुष्कर्मे करितांना आपण पाहतों. सर्व लोकांस एक मतानें ही गोष्ट मान्य झाली आहे कीं, चांगलें आणि वाईट कर्म करण्यास बुद्धि ही मुख्य कारण आहे. त्यांत चांगल्या गोष्टी फार थोड्या घडतात, आणि केव्हां केव्हां वाईट गोष्टी फार पुष्कळ आणि वारंवार घडतात, आणि ज्यापासून पुष्कळ वाईट गोष्टी वारंवार घडतात ती बुद्धि आपल्यास देण्याचें देवांनीं नाकारलें असतें तर आपल्यावर फार मोठा उपकार केला असें झालें असतें. कारण कीं आपल्यास बुद्धि दिल्यानें आपल्यापासून अशीं अनुचित कर्में होतात. रोग्याला मद्य हें नेहेमीं अपकारक असुन क्वचितकाळीं पथ्यकर आहे. यास्तव वैद्यानें रोग्यास तें देऊं नये हें विशेष दूरदर्शीपणाचें काम आहे. क्वचित काळीं तें पथ्यकर असतें येवढ्यावर त्यास मद्य देण्याची येवढी मोठी जोखीम आंगावर घेणें हें कांहीं शहाणपण नाहीं. यास्तव मला असें वाटत नाहीं कीं, मानवी प्राण्यांला मनोव्यापार करण्याची शक्ति, शहाणपण आणि बुद्धि दिली नसती तर त्यापासून त्यांचा यत्किंचित देखील तोटा झाला असता. उलटें जास्त चांगलें झालें असतें. कारण कीं, बुद्धि हा असा गूण आहे कीं, तो पुष्कळांस घातक असून फार थोड्यांस हित-

---

२. ह्या मनुष्यानें आपल्या कन्येवर बलात्कार करून तिच्याशीं संभोग केला अशी कथा आहे.

कारक आहे. तेव्हां तो इतक्या उदारपणानें आणि इतका पुष्कळ द्यावयाचा नव्हता ! मनुष्यांला बुद्धि देण्यांत ईश्वरानें जर त्यांचें हित पाहिलें असेल तर जे त्या बुद्धीचा चांगला उपयोग करितात त्यांचें मात्र हित पाहिलें असें होतें. परंतु ते किती थोडे आहेत, हें अगदीं स्पष्ट आहे. यास्तव आमच्यानें असें कांहीं कबूल करवत नाहीं कीं, देवांनीं थोड्या लोकांच्या हिताकडे लक्ष दिलें आहे. खरा सिद्धांत हाच आहे कीं, त्यांनीं कोणाचेंही हितचिंतन केलें नाहीं.

३०. यावर तुझें उत्तर असें आहे कीं, मनुष्यांपैकीं पुष्कळांनीं ज्ञानाचा गैरशिस्त उपयोग केल्यामुळें देवांचा मोठेपणा कांहीं कमी होत नाहीं. त्यांनीं मनुष्यांचें अत्यंत हित व्हावें ह्मणून बुद्धि ही देणगी दिली आहे. आईबापांनीं आपल्या मुलांस वतनवाडी दिली तिचा जर मुलांनीं वाईट विनियोग करून आपण भिकेस लागले तर त्यांत आईबापांचा दोष काय ? गुरूनें शत्रूपासून रक्षण करण्याकरितां आपल्या शिष्यास शस्त्र दिलें तें जर त्यानें आपल्याच उरांत खुपसून घेतलें तर त्यास गुरूनें काय करावें ? वैद्य जखम बरी करण्याकरितां औषधउपाय करीत असतां रोग्यानें ती जखम शस्त्रानें फाडली तर त्यांत वैद्यानें काय चुकी केली ? बाल्बस, तूं ह्मणतोस तें मी सर्व कबूल करतों, परंतु येथें सादृश्य कोठें आहे ? कारण असें नेहमीं घडत असतें कीं, उपद्रव द्यावा ह्या बुद्धीनें लोकांनीं केलेलीं कर्में मनुष्याला हितकारक झालीं असून हित करण्याच्या बुद्धीनें केलेलीं कर्में अहितकारक झालीं आहेत. तस्मात् देणगी देणाराच्या इच्छेप्रमाणेंच देणगीचे परिणाम घडून येतात असें कांहीं नेहमीं निश्चित करितां येत नाहीं. आणि त्याप्रमाणेंच देणगीपासून कांहीं हित झालें तर त्यावरून असाही पुरावा होत नाहीं कीं, आपल्या हितकर्त्यापासून आपणांस तो लाभ झाला आहे. बुद्धि

आणि अनुचिंतन हीं ज्यांचें मूळ नाहीं, अशीं कोणतीं पापें आहेत? सत्कर्माकडे उपयोग केला ह्मणजे तिला सद्बुद्धि म्हणतात, आणि असत्कर्माकडे उपयोग केला म्हणजे तिला दुष्ट बुद्धि म्हणतात. देवांनीं आपल्यास नुसती बुद्धिशक्ति दिली आहे. तिचा सत्कर्माकडे किंवा असत्कर्माकडे उपयोग करणें अगदीं आपल्या हातांत आहे. ह्मणून देवांनीं आपल्यास बुद्धि दिली आणि बापानें आपल्या मुलास वतनवारसा दिला, ह्या दोन गोष्टी तुलनेनें सारख्या नाहींत. कारण मनुष्याला उपद्रव द्यावा हाच जर देवांचा मुख्य उद्देश असता तर अतिशय घातक बुद्धीशिवाय त्यांस दुसरें काय देतां आलें असतें? कारण बुद्धि जर असत्कर्माचें मूळ नसतें तर अन्याय, अनियत वर्तन आणि अतिक्रम हे दुसऱ्या कोणत्या बीजापासून उत्पन्न झाले असते?

मनुष्याचीं कपटें, दुर्लक्षणें, फसवणुकी आणि शकटभेद यांचें मूळ काय तें बुद्धि. त्यावांचून मनुष्याला अशीं कर्में करितां आलीं नसतीं.

३१. आतां आपण न्यायाच्या अदालतींत काय होतें तें पाहूं. न्यायाधीश कोणते न्याय करण्यासाठीं न्यायासनावर बसतात? एका मनुष्यानें आपल्या दप्तरखान्याला आग लाविल्याबद्दल, दुसऱ्या मनुष्यानें सरकारी दप्तरांत बनावटी लेख तयार केल्याबद्दल, तिसऱ्यानें न्यायाच्या कामांत लांच खाल्लयाबद्दल, चवथ्यानें दग्यानें एकाचा प्राण घेतल्याबद्दल, पांचव्यानें एकास विषप्रयोग करून मारल्याबद्दल, सहाव्यानें सरकारच्या पैशाचा खर्च केल्याबद्दल, सातव्यानें चोरी केल्याबद्दल, आठव्यानें त्यास सहाय्य करून चोरीचा माल घेतल्याबद्दल, नवव्यानें आपल्या दिमतींत माल होता त्याचा कपटानें असद्विनियोग केल्याबद्दल, ट्रस्टी यानें विश्वासघात केल्याबद्दल, विकत घेण्यांत व विकण्यांत, कर्ज घेण्यांत व उसनें देण्यांत

विश्वासघात केल्याबद्दल, एक वस्तु अमुक प्रकारची करून द्यावयाचें कबूल करून कपटानें दुसरीच करून दिली त्याबद्दल, न्यायाधिशापुढें चौकशी-होऊन न्याय होत आहे. आपल्याच्यानें असें म्हणवतें काय कीं, ह्या दुष्ट कारस्थानांचा उद्भव अजरामर देवांपासून झाला आहे ? मनुष्याला देवांनीं बुद्धि दिली आहे असे मानिलें तर जिच्या योगानें त्यास दुष्ट कर्में करितां येतात ती दुष्ट बुद्धिही त्यास देवांनींच दिली असें मानावें लागतें. फसवणुकी आणि इतर सर्व दुष्ट कर्में हीं बुद्धिपासून घडतात. त्याजवांचून आपल्याच्यानें कांहीं करितां आलें नसतें.

३२. तुझा असा दुराग्रह आहे कीं, हा कांहीं देवांचा दोष नाहीं, मनुष्यांचा आहे. परंतु जर वैद्यानें किंवा नावाड्यानें आपल्या करामतीचा परिणाम वाईट झाल्याबद्दल रोगाच्या प्रबळतेवर आणि तुफानाच्या प्रचंडपणावर दोष दिला तर आपण त्यांस हंसणार नाहीं काय ? जर संकट नसतें तर आपण त्यांस असें ह्मटलें असतें कीं, मग तुमची आह्मांस गरज तरी काय होती ? देवांकडे तर याहूनही विशेष दोष लागू होतो. तूं असें म्हणतोस कीं, मनुष्य पाप करितो त्याचा दोष मनुष्याकडे; बापड्या देवांकडे काय आहे ? परंतु देवांनीं मनुष्यास अशी कां बुद्धि दिली नाहीं कीं त्यापासून मनुष्याला पातक करितांच येऊं नये ? देव असें करण्यांत चुकले, असें कसें म्हणवेल ? आपण आपल्या मुलांना वतनवाडी करून दिली तेव्हां आपली इच्छा अशी होती कीं, मुलांनीं सुखासंतोषानें आपला निर्वाह करावा. त्यांत आपण फसूं, हें संभवनीय आहे; कारण मुलें कशीं निवतील याचें अनुमान आपल्यास करवत नाहीं. परंतु देवांची गोष्ट तशी नाहीं. कारण कीं, ज्यापेक्षां ते सर्वज्ञ आहेत, तर आपण मनु-

ण्यास बुद्धि दिल्यानें तिचा परिणाम काय होईल हें त्यांनीं अगोदर जाणिलें पाहिजे होतें. वैद्याला असें माहीत आहे कीं, आपण रोग्यास मद्यप्राशन करण्याची परवानगी दिली असतां तो मद्यप्राशन करून तात्काळ मरेल, तर त्याबद्दल वैद्यास आपल्यावरील दोष निवारण करण्यास कांहीं देखील सबब नाहीं, यास्तव तुझा देव मनुष्यास बुद्धि दिल्यानें कोणत्याही रीतीनें कमी दोषपात्र नाहीं, कारण कीं, परिणाम वाईट होईल हें त्यास माहीत होतें. देवाला भावी काय होणार होतें तें समजलें नाहीं, असें तूं म्हणतोस काय? तूं जर असें कबूल करशील तर मला जो आनंद होईल तसा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें होणार नाहीं. परंतु तुला तसें ह्मणण्याचें धैर्य नाहीं. देवांविषयीं तुझे विचार किती प्रगल्भ आहेत, तें मला माहीत आहे.

३३. आतां हा विषय लवकर संपविला पाहिजे. सर्व तत्वज्ञानी यांचें एक मत होऊन जर असें ठरलें आहे कीं, सर्व अनिष्टांमध्यें मूर्खपणा हें अत्यंत भयंकर अनिष्ट आहे, आणि जर खरें शहाणपण कोणासही प्राप्त होत नाहीं तर आपण (देव ज्यांची काळजी वाहातात असें ह्मणण्यांत आलें आहे ते) फार दुःखी आहोंत. कारण कीं, कोणीही चांगलें नाहीं अथवा कोणीही चांगलें असूं शकणार नाहीं, या दोन्ही वाक्यांचा अर्थ एकच आहे. आणि माझ्या अभिप्रायाप्रमाणें मनुष्य हा वास्तविकपणें शहाणा नाहीं, अथवा वास्तविकपणें शहाणा असूं शकणार नाहीं. हीं दोन्ही वाक्यें देखील तशींच समानार्थी आहेत. आतां कोणाचें असें म्हणणें आहे कीं, चांगला मनुष्य सुखी होईल आणि वाईट मनुष्य सुखी होणार नाहीं. परंतु तसें कांहीं नाहीं. जर देवांस मनुष्यांची काळजी असती तर त्यांनीं सर्वांस सदाचारसंपन्न केलें असतें. परंतु जर सर्व मनुष्यांच्या क-

त्याणाकडे त्यांनीं लक्ष दिलें नाहीं तर जे सदाचारसंपन्न आहेत त्यांच्या सुखाची तरी योजना करून ठेवावयाची होती.*

३४. आतां शेवटीं कांहीं दुष्ट लोकांना त्यांच्या कर्माचीं प्रायश्चित्तें भोगावीं लागलीं आहेत. पण असें कां? दुष्ट लोकांपासून सज्जनांचा छळ होऊं द्यावा आणि नंतर त्यांस त्यांच्या दुष्ट कर्माबद्दल शासन करावें, त्यापेक्षां त्यांच्याच्यानें सज्जनांचा छळ होऊं नये अशीच व्यवस्था कां करूं नये? पुष्कळ दुष्ट लोक यांस यातना देऊन शेवटीं ठार मारलें, हें खरें आहे. पण त्या दुष्ट लोकांकडून गुप्त घाले घालवून अथवा विषप्रयोग करवून चांगल्या लोकांचे प्राण घेववावे आणि नंतर त्यांचे सूड घ्यावे त्यापेक्षां सज्जनांचे प्राण संरक्षण करावे हें चांगलें नाहीं काय? डायोनायासियस(Dionysius) ह्या जुलमी राजानें अतिसमृद्ध आणि अबाद नगरांत ३८ वर्षे राज्य केलें. त्यापूर्वी पिसिस्ट्रयाटस् यानें ग्रीस देशांतील त्याच नगरांत पुष्कळ वर्षे तसेंच जुलमी राज्य केलें. फलारयारिस आणि अपोलोडोरस यांनीं आपल्या कर्माचीं फळें भोगिलीं, परंतु त्यांनीं पुष्कळ लोकांचे प्राण घेतल्यावर मग. पुष्कळ लुटारू लोक फांशीं दिले गेले, परंतु त्यांनीं ज्यांस लुटलें आणि मारलें त्यांची संख्या त्या लुटारू लोकांपेक्षां फार जास्त आहे. साक्रेतिसविषयीं मला तर बोलवत देखील नाहीं. प्लेटो याचे ग्रंथांतील त्याच्या मरणाची हकीकत जेव्हां जेव्हां मी वाचतों तेव्हां तेव्हां माझे नेत्रांतून नवे अश्रू येतात. यास्तव जर

---

* येथें कोटा यानें दुष्ट लोकांपासून सज्जनांचा कसा छळ झाला याचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. शेवटीं त्यानें असें म्हटलें आहे कीं, चांगल्या मनुष्यावर संकटें गुजरलीं याबद्दलचा आणि दुष्ट मनुष्यें भरभराटीस आलीं, याचीं उदाहरणें देऊं लागलों तर त्यांचा शेवट येणार नाहीं. विस्तारभयास्तव येथें सार्यंत मजकूर लिहिला नाहीं, कारण कीं, त्यांत कांहीं तत्वार्थ नाहीं. ऐतिहासिक गोष्टी आहेत.

मनुष्याच्या संबंधानें ज्या गोष्टी घडतात त्या सर्व देवांच्या इच्छेनें घडत आहेत, तर तुला असें कबूल केलें पाहिजे कीं, त्यांनीं चांगल्या आणि वाईट मनुष्यामध्यें कांहीं निवड केली नाहीं.

३९. डायोजिनीस धी सीनिक याचें असें ह्मणणें आहे कीं, दुष्ट लोकांची भरभराटी हा देवांविरुद्ध एक पुरावा आहे. डायोनायसियस याविषयीं मीं पूर्वीं सांगितलें आहे. यानें *प्रासरपाईनचें देवालय लुटलें आणि सिरॅकस येथें जलमार्गानें जाण्यास निघाला. याच्या जलप्रवासाला वारा फार अनुकूळ होता. तो पाहून डायोनायसियस हंसून आपल्या मित्रांस ह्मणतो "मित्रहो, देवांच्या लुटणारावर कृपावंत होऊन अजरामर देवांनीं त्यास अनुकूळ वाऱ्याचें कसें सहाय केलें आहे हें पहा." देवालय लुटल्यानंतर आपल्या प्रवासाचा सुफळ परिणाम पाहून तो जास्त अभिनंदित होत्साता जास्त अनुचित कर्मं करण्यास प्रवृत्त झाला. तो पेलोपोनेसस येथें उतरल्याबरोबर ज्युपिटरच्या[१] देवालयांत[२] शिरला आणि मूर्तीच्या आंगावर सोन्याचा झगा होता तो काढून घेतला, आणि उपहास करून म्हणाला "हा सोन्याचा झगा उष्णकाळांत ह्या देवाला फार जड आणि शीतकाळांत फार थंड" आणि कांबळ्याचा एक झगा त्या मूर्तीवर टाकून म्हणाला "सर्व ऋतूंत याचा चांगला उपयोग होईल." आणखी एका प्रसंगीं त्यानें इसक्युलापियस[३] याच्या मूर्तीची सोन्याची

---

* ग्रीक लोकांनीं मानिलेली एक देवता आहे. तिचा जन्म बृहस्पतीपासून सेरेस इच्या उदरीं झाला, अशी पौराणिक कथा आहे. सेरेस ही देखील एक देवता मानली आहे. इजकडे धान्याचें आणि कसलीच्या हंगामाचें अधिपत्य आहे असें ग्रीक लोक मानतात.

१ बृहस्पती अथवा इंद्र. २ ह्या जगांत सात अद्भुत गोष्टी आहेत त्यांतील हें एक मंदीर आहे. ३ आपण अश्विनीकुमारांस देवांचे वैद्य मानतों. त्याप्रमाणें ग्रीक लोकांनीं मानिलेली एक औषधी देवता आहे. इंद्राचा पुत्र अपोलो याजपासून ह्या देवाचा जन्म झाला अशी कथा आहे.

दाढी उपटून घेतली आणि ह्मणाला "बापाला दाढी नसतां मुलानें दाढी वाढवावी हें असभ्य कर्म आहे." कांहीं देवांच्या मूर्तीचे हात पुढें पसरलेले होते व त्या हातांत कांहीं सुवर्णपात्रें व दुसऱ्या कांहीं वस्तू होत्या त्या त्यानें कांहीं एक शंका न घेतां बुचाडून घेतल्या आणि म्हणाला "मी कांहीं त्या हिसकून घेत नाहीं, पण प्रसाद समजून ग्रहण करितों. कारण कीं देवांनीं हात पुढें करून द्यावयास काढिलेल्या चांगल्या वस्तू ग्रहण न करणें हा मूर्खपणा आहे. आपण नेहेमीं त्यांची प्रार्थना करितों कीं, त्यांनीं आपल्यावर कृपादृष्टी करावी, आणि ते हात पुढें करून आपल्यास देतात, तें जर आपण स्वीकारलें नाहीं, तर ते आपल्यावर रागवणार नाहींत कां?" देवालयांतून त्यानें ज्या वस्तू अपहार करून बलात्कारानें घेतल्या, त्या सर्व बाजारांत नेऊन विकण्याविषयीं हुकूम केला आणि लिलाव करून त्या सर्व विकल्या. त्याबद्दलचा पैका त्या लोकांपासून घेतला, आणि मग असा हुकूम केला कीं, अमूक मुदतींत त्या सर्व वस्तू विकत घेणारांनीं ज्या मंदिरांतून त्या आणिल्या होत्या त्या मंदिरांत पावत्या करून द्याव्या. याप्रमाणें देवांच्या संबंधानें त्यानें अपवित्र कर्म करून लोकांच्या संबंधानें अन्यायकर्म केलें.

इंद्रानें त्यास त्याच्या पापाबद्दल विजेचा तडाखा मारला नाहीं. येसकुल्यापियस[४] यानें त्याला घातक रोग जडवून त्याचा प्राण घेतला नाहीं. तो आपल्या बिछान्यावर समाधानवृत्तींत मरण पावला. लोकांनीं त्याचा सन्मानयुक्त प्रेतसंस्कार केला, आणि त्यानें दुष्ट कर्मे करून जी राज्यसत्ता संपादन केली होती ती प्रामाणिकपणानें आणि कायदेशीर मिळविलेल्या दायाप्रमाणें त्याच्या मुलास प्राप्त झाली. सर्व मनुष्यें ही गोष्ट कबूल करितात कीं, धान्य, फळें इत्यादि

४ औषधींची देवता.

ज्या बाह्य वस्तु आपल्या चरितार्थास अवश्य आहेत त्या सर्व आप- णांस देवांपासून प्राप्त झाल्या आहेत. आणि या समजुतीला योग्य कारण आहे. कारण आपण आपल्या सद्गुणाविषयीं लोकांच्या स्तुतीची अपेक्षा करितों. जर सद्गुण ही एक आपल्यास ईश्वराची देणगी असती तर आपण सद्गुणी आहोंत याबद्दल लोकांनीं आपला स्तव करावा अशी इच्छा करण्याचा आपल्यास हक्क नव्हता. जेव्हां आपल्यास कांहीं नवा अधिकार अथवा पदवी प्राप्त होऊन आपला गौरव होतो किंवा आपल्यास पुष्कळ संपत्ती प्राप्त होते; जेव्हां आपल्यास आपल्या अपेक्षेपेक्षां जास्त धन मिळतें किंवा आपल्या डोक्यावर येऊन ठेपलेलें संकट सुदैवानें निवारण होतें, तेव्हां त्याबद्दल आपण ईश्वराचे आभार मानतों, त्याबद्दल आपण स्तुतीस पात्र आहोंत असें कांहीं मानीत ना- हीं. परंतु आपण चांगले मनुष्य आहों याबद्दल आपण कधीं तरी देवांचे उपकार मानले आहेत काय ? आपण शाहाणे आहोंत, न्यायी आहोंत आणि मितव्यवहारी आहोंत याबद्दल कांहीं देवांचे उपकार मानीत नाहीं. संपत्ती, आरोग्य आणि सन्मान यांबद्दल आपण देवांचे उपकार मानतों. या गोष्टींविषयीं परम मंगल व परम समर्थ जो **ज्युपिटर** त्याची आपण प्रार्थना करितों. परंतु शहाणपण किंवा नियमितपणा किंवा न्यायीपणा यांसाठीं त्याची आपण कधीं प्रार्थ- ना केली नाहीं. आपल्या मिळकतीचा दाहावा हिस्सा आपण शहाणें व्हावें ह्मणून कोणी कधीं **हरक्यूलेस** यास अर्पण केला नाहीं. आतां हें खरें आहे कीं पायथ्यागोऱ्याविषयीं एक गोष्ट ऐकण्यांत येते कीं जेव्हां त्यास भूमितीचा एक नवीन सिद्धांत आढ- ळला तेव्हां त्यानें विद्यादेवीला एक बैल बळी दिला. परंतु ती गोष्ट मला विश्वसनीय वाटत नाहीं. कारण त्याच पायथ्यागोऱ्यानें

यज्ञवेदीवर रक्तस्राव होऊन ती दूषित होईल ह्मणून आपाले देवास बळी देण्याचें नाकारिलें. सुदैवाविषयीं आपण देवांस प्रार्थना करावी, पण शहाणपण आपल्यापासूनच आपल्यास प्राप्त झालें पाहिजे. जरी मन, सद्गुण, आणि श्रद्धा यांचीं देवालयें उभारलीं आहेत तथापि त्यांपासून कांहीं असें निष्पन्न होत नाहीं कीं, ते गूण आपल्या ठायीं स्वाभाविक नाहींत. आतां आशा, सुरक्षितपणा, सहाय्य आणि जय-यांविषयीं आपल्यसा ईश्वरकृपेवर अवलंबून राहिलें पाहिजे. पण यापासून असा तर्क निघतो कीं, **डायोजीन**-च्या म्हणण्याप्रमाणें दुष्ट लोकांची भरभराटी होणें ही गोष्ट हें जग ईश्वरी तंत्रानें चालतें या मतास बाधक आहे.

३६. आतां चांगल्या मनुष्याचा कधीं कधीं उत्कर्ष होतो, परंतु तो देवकृपेपासून होतो, असें आपल्याच्यानें कबूल करवत नाहीं. कारण त्याविषयीं कांहीं प्रमाण नाहीं. डायागोरास* नांवाचा एक पुरुष होता. त्यास लोक नास्तिक मानीत असत. त्याला त्याच्या एका मित्रानें कांहीं लोकांचीं चित्रें दाखविलीं. त्या चित्रांचा भाव असा होता कीं, मोठ्या तुफानांतून ते लोक बचावले होते. तो मित्र म्हणाला, "पाहा, देव नाहींत असें कोण ह्मणेल? देवांची प्रार्थना केल्यावरून किती लोक वांचले आहेत?" डायागोरास म्हणाला, "ओहो! असें काय! मी, जे तुफानांतून वांचले त्यांचीं चित्रें पहातों, परंतु समुद्रांत जे बुडाले त्यांचीं चित्रें कोठें काढिलीं आहेत? दुस-

---

* अथेन्स येथील एक तत्ववेत्ता होता. तो पहिल्यानें अतिशय देवभोळा होता. तो पुढें नास्तिक झाला, कारण कीं त्यानें जी कविता केली होती ती मी केली आहे असा एका मनुष्यानें दावा सांगितला. आणि त्याबद्दल त्यानें खोटी शपथ वाहिली असून त्यास कांहीं शासन झालें नाहीं. हें पाहून देवांविषयीं त्याची श्रद्धा नष्ट झाली.

त्या एका प्रसंगीं तो जहाजांत बसून प्रवास करीत असतां एक मोठें तुफान झालें, तेव्हां जहाजांतील दुसरे लोक त्यास ह्मणाले कीं, आह्मी तुला या जहाजांत बसूं दिल्यामुळें आह्मांवर हें संकट ओढवलें आहे. तेव्हां तो ह्मणाला कीं, पहा दुसरीं तारवें देखील अशींच संकटांत आहेत; त्यांत देखील मी बसलों आहें काय? सारांश चांगल्या अथवा वाईट गोष्टीच्या संबंधानें देवांकडे कांहीं नाहीं. राजाप्रमाणें देव प्रत्येक गोष्टीकडे कांहीं लक्ष देत नाहींत. परंतु या ह्मणण्यांत अर्थ काय आहे? जर राजानें एखाद्या गोष्टीकडे विशेष कानाडोळा केला तर तो अज्ञानी होता म्हणून तसें केलें असें ह्मणतां येईल. परंतु देवांच्या संबंधानें अज्ञानाची सबब कांहीं पुढें आणितां येणार नाहीं.

३७. देवांकडे न्यायीपणा आणण्याची तुझी पद्धत कांहीं अंशीं विलक्षण आहे. तूं असें म्हणतोस कीं, जर दुष्ट मनुष्य आपल्या पापाबद्दल शासन भोगल्यावांचून मरण पावला तर देव त्याच्या मुलांस, मुलांच्या मुलांस आणि त्याचे जे संबंधी असतील त्या सर्वांस त्याबद्दल शासन करितात. कायहो देवांचा हा चमत्कारिक न्याय? कायदे करणारानें जर असा कायदा केला कीं, बापानें किंवा आजानें अपराध केला तर त्याजबद्दल मुलानें अथवा नातवानें शासन भोगावें, तर आज या भूतलावर असें कोणतें नगर आहे कीं, तें त्या कायद्याचे भयंकर परिणाम सोशील? तूं म्हणतोस त्याप्रमाणें कवींनीं वर्णन केलें आहे. परंतु स्टोईक यांस कवींनीं भ्रष्ट केलें किंवा कवींना स्टोईक यांनीं असें म्हणण्याचा अधिकार दिला याविषयीं सहज निर्णय करणें मला शक्य नाहीं.

३८. विख्यात नगराचा जो नाश झाला तो आपण सहाय करून देवांस टाळतां आला नसता काय? निःसंशय टाळतां आला

असता. कारण तुझ्या मताप्रमाणें देवांची अगाध शक्ति आहे, आणि त्यांस कोणतेंही काम करण्यांस श्रम करावे लागत नाहींत. आपल्या शरीराच्या गतीस जशी आपली निश्चित बुद्धी अवश्य आहे, त्याप्रमाणें सर्व वस्तु उत्पन्न करणें, त्यांस गती देणें आणि त्यांजमध्यें फेरफार करणें हें देवांच्या निश्चित बुद्धीस शक्य आहे. तुझें हें मत केवळ असत्कल्पनेपासून उत्पन्न झालेलें नाहीं. स्वाभाविक आणि ठरीव मूळतत्वाचा - तुझ्या मतास आधार आहे. कारण तूं म्हणतोस कीं, ज्यापासून सर्व वस्तु निर्माण होतात त्या उपादानद्रव्या-मध्यें असा कांहीं गूण आहे कीं, त्याच्या पाहिजे त्या वस्तु करितां येतात, किंवा त्यांत फेरफार करितां येतो. आणि एका पळांत पाहिजेल ती वस्तु करितां येते आणि केलेली नाहींशी करितां येते; आणि त्या सर्व उपादानद्रव्यावर प्रकृतीचा इतका अधिकार आहे कीं, ह्या जगाच्या कोणत्याही भागांत तिला पाहिजे तें करितां येतें. त्यापासून मी असें अनुमान करितों कीं, त्या प्रकृतीला आपली शक्ति किती आहे हें माहीत नाहीं, किंवा ती सर्व मानवीप्राण्यांकडे दुर्लक्ष करिते, किंवा आमचें उत्तम कल्याण कशांत आहे हें तिला कळत नाहीं. तूं असें म्हणतोस कीं, प्रकृती ही कांहीं अमूक एक व्यक्तीविषयीं काळजी ठेविते असें नाहीं; तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. जर ती नगराविषयीं काळजी बाळगीत नाहीं, राष्ट्राविषयीं काळजी बाळगीत नाहीं, किंवा मनुष्याविषयीं काळजी बाळगीत नाहीं, ती जर सर्व रा-ष्ट्रांच्या हिताविषयीं उदासीन आहे तर ती मनुष्याविषयीं उदासीन आहे यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु स्वप्न पडणें ही दैवी प्रेरणा आहे, असें तूं मानतोस, तर देव लहानसहान गोष्टींत कांहीं आपलें मन घालीत नाहींत असें ह्मणतोस तें तूं कसें सिद्ध करून देतोस? स्वप्नावर जर तुझा विश्वास आहे तर तुला ह्या अडचणीचा उलगडा करून

दिला पाहिजे. दुसरें, तुझें असें ह्मणणें आहे कीं, आपण देवांची प्रार्थना करावी. ज्यांनीं देवांची प्रार्थना करावी असें ह्मणतोस, ती प्रत्येक पृथक् व्यक्ति आहे, त्यावरून देव प्रत्येक व्यक्तिविषयीं काळजी बाळगितात असें निष्पन्न होतें. आणि तूं कल्पना करितोस त्यापेक्षां मनुष्यांच्या हिताकडे लक्ष देण्यास त्यांस पुष्कळ अवकाश आहे असें सिद्ध होतें. आतां आपण अशी कल्पना करूं कीं जगामध्यें प्रकृतीला मोठमोठ्या घडामोडी करावयाच्या असल्यामुळें व पृथ्वी आणि समुद्र यांस आपल्या इच्छेप्रमाणें वर्तविणें असल्यामुळें तिला व्यक्तीच्या हिताकडे लक्ष देण्यास अवकाश सांपडत नाहीं; तर मी तुला असें विचारतों कीं ती पुष्कळ देवांना उगीच रिकामे कां बसूं देते? असंख्य देव आहेत असें तूं ह्मणतोस, तर त्या आळशी देवांस मानवी प्राण्यांच्या हिताकडे लक्ष देण्यास ती कां योजीत नाहीं?

३९. दैविक गुणांविषयीं मला जें सांगावयाचें होतें त्याचें हें तात्पर्य आहे. माझा कांहीं देवांचें अस्तित्व नष्ट करण्याचा उद्देश नाहीं. परंतु हा विषय दुर्बोध असून त्याविषयीं तुला खुलासेवार सांगणें किती कठीण पडलें तें तूं पाहिलेंस.

कोटा यानें आपलें भाषण समाप्त केलें असें पाहून बाल्बस म्हणाला, स्टोईक यांनीं भक्तिपूर्वक आणि शाहाणपणानें देवांच्या संबंधानें जें मत स्थापित केलें आहे त्याजवर तुझा फार कटाक्ष आहे. परंतु आतां फार वेळ होऊन गेला आहे यास्तव त्यावर माझें उत्तर मी दुसऱ्या एखाद्या वेळेस देईन. आपल्या यज्ञवेदी, आपल्या यज्ञशाला, आपलीं देवालयें, किंबहुना आपल्या नगराचा तट, ज्यांना तूं धर्माध्यक्ष या नात्यानें परम पवित्र मानतोस, तत्संबंधानें आमचें प्रमाण अतिशय महत्वाचें आहे. तूं धर्माचा आश्रय करून रोमचें संरक्षण

करितोस तितकें कांहीं नगराच्या भोंवती जो प्राकार आहे त्याच्या योगानें होत नाहीं. माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत अधर्माला प्रवृत्त झाल्यावांचून माझ्याच्यानें कांहीं देवभक्तीचा त्याग करवत नाहीं.

४०. कोटा म्हणाला, माझ्या मताचें खंडन करावेंस अशी माझी इच्छा आहे. मीं कांहीं वाद संपावा अशा रीतीनें माझे भाषणाचा उपसंहार केला नाहीं. माझे खासगत विचार काय आहेत, हें मी तुला कळविलें आहे, आणि तुझ्या प्रमाणांत किती वजनदारी आहे याविषयीं मी जाणत आहें. व्हेलियस म्हणाला, तूं ह्मणतोस तेंच खरें. ज्युपिटर स्वप्नें पाठवितो असें ज्यांचें ह्मणणें आहे त्यांस आपण फार भ्यालें पाहिजे. कारण जरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं, तरी मोठें महत्व आहे. तितकें महत्व कांहीं दैविक गुणांविषयीं स्टोइक यांचें म्हणणें आहे त्यांत नाहीं. येथें भाषण समाप्त झालें आणि आम्ही सर्व आपापल्या घरीं गेलों. व्हेलियस यास कोटाचीं प्रमाणें अगदीं बरोबर आहेत असें वाटलें. परंतु बाल्बसचीं प्रमाणें मला **सिसेरो** जास्त संभवनीय दिसतात.

---

* सिसेरो हा एकॅडेमिक मतानुयायी असल्या कारणानें, त्यानें आपलें मत एकॅडेमिक मतानुयायांच्या संप्रदायाप्रमाणें दिलें आहे. अमुक एक गोष्ट सत्यासारखी भासते व अमुक जास्त संभवयीय आहे यापलीकडे आपणास जास्त कांहीं समजत नाहीं असें त्या मताचें रहस्य आहे.

# मार्कस टलियस सिसेरो ( MARCUS TULLIUS CICERO ) याचें चरित्र.

## भाग १ ला.

१. सिसेरो याचा जन्म. २ बाळपणाचा त्याचा विद्याभ्यास. ३ तरुणपणीं त्यानें कोणत्या विद्यांचा अभ्यास केला याविषयींचा वृत्तांत. ४ तो बारिस्टरचा धंदा करूं लागल्यावर त्याचा लौकिक वाढत चालला याविषयींची हकीकत. ५ त्यास एकामागून एक राजकीय अधिकार मिळत चालले त्यांविषयींचा वृत्तांत. ६ सिसिली प्रांताच्या सुभेगिरीचा अधिकार चालवीत असतां त्यानें जें न्यायनिष्ठपणाचें वर्तन केलें त्याविषयींची हकीकत. ७ सिसेरोकडे न्यायमनसुबीच्या कामाची देखरेख करण्याचा अधिकार होता तेव्हां त्यानें सिसिलीचा सुभेदार व्हेरेस ( Verres ) याजवर अन्याय केल्याबद्दल खटला चालवून त्याचें पारिपत्य केलें वगैरे गोष्टी या भागांत आहेत.

सिसेरोचा जन्म ख्रिस्तिशकाच्या पूर्वी १०७ वे वर्षी आर्पिनम् ( Arpenum ) नगरांत झाला. याचें घराणें प्राचीन असून अश्वारोही वर्गांतील होतें. सिसेरोचा पिता व आजा यांची इटाली देशांतील लोकांत मानमान्यता असूनही त्यांनीं कधीं राज्यकारभारांत आपलें मन घातलें नाहीं. सिसेरोच्या बापास विद्येची आवड होती ह्मणून त्यानें त्याला चांगलें शिक्षण देण्याचा निश्चय केला. सिसेरो हा मोठ्या योग्यतेस चढेल अशी त्याची बुद्धिमत्ता आहे असें तो लहान-

पणीं शाळेंत शिकत असतांच दृष्टोत्पत्तीस आलें. पुढें उत्कर्षास येणाऱ्या ह्या मुलास पाहण्याकरितां लोक शाळेंत जात असत. याच्या बाळपणांतील गुरूंपैकीं एक कवी होता. त्याच्या शिक्षेखालीं त्यानें इतका उत्तम अभ्यास केला कीं, लहानपणींच तो कविता करूं लागला. तारुण्यदशेस आल्यावर एका प्रख्यात कायदेकानू जाणत्या बारिस्टराच्या शिक्षेखालीं त्यानें कायद्याचा अभ्यास केला. आपल्या देशाच्या कायद्यांचें आणि राज्यकीय नियमांचें पूर्ण ज्ञान करून घेण्यास त्यास फार काळ घालवावा लागला नाहीं.

त्या वेळेस **रोमन** लोकांचा असा कायदा होता कीं सर्वांनीं युद्धकलेंत प्रवीण असलें पाहिजे; त्याप्रमाणें **सिसेरोनें** युद्धकलेचा अभ्यास केला होता; आणि **रोमन** लोकांतील महान् विख्यात सरदार **पॉम्पी** याच्या बापाबरोबर तो एका मोहिमेवर गेला होता. तेथून परत आल्यावर तत्वज्ञानाच्या अभ्यासाकडे त्याच्या बुद्धीची साहजिक प्रवृत्ती असल्यामुळें त्यानें अक्याडेमिक मतानुयायी **फिलो** याजपाशीं तत्वज्ञानशास्त्राचा अभ्यास केला. परंतु, त्याचें विशेष लक्ष वक्तृत्वकलेकडे असल्यामुळें **मोलो** ( Molo ) नांवाचा त्या कालीं एक महाविख्यात अलंकारशास्त्रज्ञ होता, त्याच्याजवळ त्यानें वक्तृत्वकलेचा अभ्यास केला; आणि **स्टोइक** मतानुयायी **डायोडोटस** ( Diodotus ) यानें त्यास वादविवादांत सोपपत्तिक भाषणचातुर्यानें दुसऱ्याचा पराजय कसा करावा हें शिकविलें. **स्टोइकमताचा** प्रवर्तक **झिनो** याचे शिष्य त्या कलेंत त्या कालीं फार नांवाजलेले होते.

राज्यपद्धत कोणत्या कां प्रकारची असेना, राष्ट्रें आपआपसांत आणि परकीय राष्ट्रांबरोबर कज्जाभांडणें व लढाया करूं लागलीं, तेव्हांपासून दोन पेशांच्या लोकांवांचून अगदीं चालेनासें झालें होतें. जेव्हां एखाद्या देशांतील लोक रानटी अवस्थेंतून नुकतेच उदयास

येऊं लागतात, तेव्हां, त्यांजमध्यें युद्धकलेंत जे प्रवीण असतात त्यांस मोठें वैभव प्राप्त होऊन, लोक त्यांस फारच चहातात. आणि सुधारलेल्या काळांत वकिलीचा धंदा करणारे लोक सोपपत्तिक व सालंकार भाषणाच्या योगानें आपल्या पक्षाचा वाद सिद्ध करून मोठ्या प्रतिष्ठेस पावतात. **सिसेरो**चा जन्म झाला तेव्हां **रोमन** राष्ट्रांतील लोकस्थिति मध्यम अवस्थेला प्राप्त झाली होती. **रोमन** लोकांनीं ज्या साधनानें संपत्ति आणि ऐश्वर्य संपादन केलें होतें, त्या युद्धकलेविषयीं त्यांची ईर्षा बरीच कमी झाली होती. त्या काळीं फक्त आपल्या वाक्चातुर्यानें आणि न्यायमनसुबीच्या शहाणपणानें अत्युच्च पदास पावलेल्या **रोमन** लोकांत **सिसेरो** हा अग्रगण्य होता.

सुमारें पंचवीस वर्षांचें वय झालें तेव्हां **सिसेरो** वकिलीचें काम करूं लागला. त्यानंतर दोन वर्षांनीं **सेक्स्टस् रोशियस्** याजवर, आपला बाप मारल्याबद्दल आरोप आला होता त्या कामांत, **सिसेरो**नें त्याची वकिली करून, आपल्या वाक्चातुर्यानें त्यास दोषमुक्त करविलें. त्या आरोपाविषयीं कांहीं पुरावा नव्हता; फिर्यादीनें द्वेषबुद्धीनें दुसऱ्याशीं संगनमत करून खोटा आरोप आणिला होता. परंतु फिर्यादी हा **सिला** ( Sylla ) याचा आवडता असून, **सिला** याच्या सत्तेस कांहीं मर्यादाच नव्हती, यामुळें आरोपीची सुटका होणें हें काम कठीण होतें. त्या काळीं रोमन ज्यूरीपुढें आरोपी याचा निरपराधीपणा आणि वकिलाचें वाक्चातुर्य एवढ्यानेंच आरोपीची सुटका होत नसे. ज्यूरर लोकांचीं मनें वळविण्याकरितां दुसरींही अनेक साधनें लागत असत. तीं साधनें कोणतीं हें पुढें सांगण्यांत येईल. या कामांत **सिसेरोस** जय मिळाल्यावर त्यास कांहीं काळपर्यंत विसावा घ्यावा लागला. त्याची प्रकृति नाजूक होती व त्याचे फुप्फुस बळकट नव्हते यामुळें त्यास आपल्या वाणीची शक्ती कायम ठेवण्याकरितां फार

जपावें लागत असे. उघडया मैदानांत न्याय करण्याकरितां बसले-ल्या न्यायाधिशापुढें वकिलास उंच स्वरानें बोलावें लागत असे, यामुळें **सिसेरो** याला तें काम फार जड जाई ; सबब त्यानें कांहीं काळपर्यंत **रोम** सोडून विसावा घेण्याकरितां **अथेन्स** नगराचा आश्रय केला. त्यानें आरोपीचा बचाव केला हें **सिला** यास आवडलें नाहीं, यासाठीं त्यास **रोम** सोडावें लागलें, असेंही एका इतिहासकाराचें म्हणणें आहे.

तेथें त्यानें सहा महिने विद्याभ्यासंगांत घालविले; पण त्याचे त्यास कांहीं श्रम वाटले नाहींत. **सिसेरो**सारख्या पुरुषाला त्या काळीं **अथेन्स** नगर हें केवळ पवित्रभूमीप्रमाणें होतें. कविता, अलंकार-शास्त्र, तत्वज्ञान, आणि धर्म ह्यांचें तें नगर एक माहेरघर आहे असें त्यास वाटलें.

**सिसेरोनें** आणखीं दोन वर्षें **एशिआमायनर**मधील मुख्य मुख्य शहरें पाहण्यांत घालविलीं. **ऱ्होड्स** नगरांत कांहीं दिवस राहून त्याचा जुना गुरु **मोलो** याजपाशीं त्यानें आणखी अलंकारशास्त्राचा अभ्यास केला, व प्रत्येक ठिकाणीं अतिशय नामांकित ग्रीक तत्वज्ञानी यांचीं भाषणें ऐकून, आपल्या लेखनपद्धतींत आणि भाषणाच्या शैलींत पुष्कळ सुधारणा केली. **रोम** येथें परत आल्यावर लागलीच त्यानें आपलें लग्न केलें.

**सिसेरो रोम** नगरांत परत आला तेव्हां त्याची शरीरप्रकृति चांगली सुधारली होती. आणि मानासिक शक्ती इतकी वाढली होती कीं त्याचा हेवा करणारे मोठमोठे वक्ते वादविवादांत—कज्जा किती कां प्रतिकूळ असेना—त्यानें जिंकून हतगर्व केले. त्यानें ज्याचा कैवार घेतला त्याला यश मिळालें नाहीं असें बहुतकरून झालें नाहीं, यामुळें

समाजामध्यें त्याची योग्यता वाढली. त्याचें लग्न झाल्यानंतर लागलीच त्यास लोकांच्या बहुमतानें क्वेस्टरचा अधिकार मिळाला. **रोमन** राष्ट्राच्या अधिकाऱ्यांमध्यें या पदवीचे वीस अधिकारी असत. राष्ट्राच्या तिजोरीवर देखरेख ठेवावी हें त्यांचें काम. यानंतर त्यास आणखीं एकामागून एक असे दोन अधिकार मिळाले. एका अधिकाराचें काम असें होतें कीं, त्यानें सार्वजनिक इमारती, मार्केटें, रस्ते आणि राज्याची प्रायः सर्व मिळकत—यांजवर देखरेख ठेवावी. **सेनेट** सभेंत असे चार अधिकारी होते त्यांस **इडाईलस,** आणि दुसऱ्या अधिकाराचें काम मुख्यत्वेंकरून न्यायसंबंधीं होतें, त्यांस **प्रीटर** ह्मणत. ह्या अधिकारापासून त्याच्या वकिलीच्या धंद्यास कांहीं हरकत आली नाहीं. त्यास एक वर्ष **सिसिली** येथें गव्हरनर नेमिलें होतें. तेवढ्या काळांत मात्र त्यास वकिलीचें काम करण्यास सवड मिळाली नाहीं. **सिसिली** प्रांताचा राज्यकारभार चालवीत असतां तो एक मोठा कर्ता पुरुष आहे अशी त्याची कीर्ति झाली. त्या वर्षीं **रोम** येथें धान्याचा दुष्काळ पडला होता. **सिसिली** प्रांत हा राष्ट्राचें मोठें धान्यागार असून **सिसेरोनें** जे उपाय योजिले तेणेंकरून अकस्मात् प्राप्त झालेल्या संकटाचा परिहार झाला.

सरकारचा सारा देण्याऱ्या लोकांशीं तो फार उदारपणानें वागत असे. सर्व लोकांशीं सभ्यपणानें वागायाचें व सर्वांच्या भेटी घेऊन त्यांचें म्हणणें ऐकावयाचें, असा त्याचा वर्तनक्रम होता. राज्यकारभारांत अन्याय मुळींच करावयाचा नाहीं; आणि याहून त्याचा प्रशंसनीय गुण हा होता कीं, लांच घेऊन त्यानें आपला हात कधींही विटाळला नाहीं. प्रांतांतील लोकांस त्याच्या गुणांविषयीं जितका आनंद वाटला तितकाच अचंबाही वाटला; कारण, अशा गुणांच्या निस्पृह कामदाराची **रोम** राष्ट्रानें नेमणूक केल्याचा त्यांचा

हा पहिलाच अनुभव होता. प्रांतांतील लोकांनीं त्यास जो मान दिला तसा कोणत्याही गव्हरनरास पूर्वी मिळाला नव्हता. सिसेरो त्या वेळेस सगळा काय तो तीस वर्षांचा होता. तेव्हां ह्या सन्मानापासून त्याला फार गर्व व्हावा यांत कांहीं नवल नाहीं. 'मी सगळ्या रोम राष्ट्रांत एक अद्वितीय पुरुष आहें' असें देखील तो एका भाषणांत बोलून गेला; परंतु पुढें त्यास लागलीच असें कळून आलें कीं, आपला हा गर्व अगदीं पोकळ आहे. रोम येथें येत असतां कांहीं लोक त्यास असे भेटले कीं तो कोणत्या देशाच्या अधिकारावर होता हें देखील त्यांस माहीत नव्हतें.

सिसेरो याजकडे न्यायमनसुबीच्या कामाची देखरेख करण्याचा अधिकार होता, तेव्हां त्या काळच्या एका मोठ्या अपराध्याला त्यानें न्यायसभेपुढें उभा करून त्याजवर खटला चालविला. सिसिलीचा पहिला गव्हरनर व्हेरेस (Verres) आपल्या बापाप्रमाणेंच फार गैरचालीचा मनुष्य होता. त्यानें तीन वर्षांत सिसिली प्रांतांतील लोक अगदीं निर्धन करून टाकले. तो अधिकारावर गेला तेव्हां मुलूख आबाद व प्रजा सुखी होती; आणि अधिकारावरून परत फिरला तेव्हां मुलूख उद्ध्वस्त व प्रजा अगदीं बेजार आणि अनेक प्रकारच्या दुःखांनीं त्रस्त झाली होती. व्हेरेस यास असा पक्का भरंसा होता कीं आपल्या केंसालाही कोणी धक्का लावूं शकणार नाहीं. तो असें म्हणत असे कीं माझी एका वर्षाची प्राप्ती मला बस्स आहें; दुसऱ्या वर्षाची प्राप्ती माझ्या मित्रांचे मनोरथ पूर्ण करण्यास पुरेल, व तिसऱ्या वर्षाची प्राप्ती जूरीला लांच देऊन उरेल इतकी आहे.

रोम येथें सुमारें पांच एकर जमीनीचें एक मोठें मैदान होतें त्याला फोरम (Forum) म्हणत असत. ती नगरचा बाजार भरण्याची जागा होती; परंतु सार्वजनिक अथवा दुसऱ्या कांहीं कामाकरितां लोक

त्या जागेंत सभा भरवीत असत. न्यायाचें काम चालविण्याकरितां त्या जागेंत मोठ्या भव्य इमारती बांधल्या होत्या. तेथें सामान्य आरोपाची चौकशी होत असे. परंतु राज्याविरुद्ध आरोपाची चौकशी करण्यासाठीं त्या सगळ्या मैदानाचा उपयोग करीत असत. त्याच्या एका बाजूस उंचवटा होता त्यावर चालू कामापुरत्या कांहीं इमारती तयार करीत असत. त्या इमारतींत न्यायाधीश, वकील, साक्षीदार आणि जूरर यांस बसण्याकरितां सोयीवार आणि यथायोग्य योजना केलेल्या असून त्या मैदानाच्या सभोंवतीं उंचवट्यावर देवांचीं मंदिरें आणि दुसऱ्या भव्य इमारती होत्या. त्यांच्या पायऱ्यांवर अशा विशेष प्रसंगीं कोर्टांत काय चाललें आहे हें, ऐकूं आलें नाहीं तर नाहीं, पण निदान दृष्टीस तरी पडावें, यासाठीं लोकांची फार गर्दी होत असे.

व्हेरेससारख्या अपराध्याची चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमून त्याजपुढें पंचांच्या बहुमताप्रमाणें न्याय व्हावा अशी वहिवाट होती. **सेनेट** सभेंतील सभासदांखेरीज ज्यूरींत बसण्याचा दुसऱ्यास अधिकार नव्हता. आणि चिठ्या टाकून जूररची निवडणूक करीत असत. दोन्ही पक्षकारांला निवडलेला जूरर नाकबूल करण्याचा कांहीं मर्यादित अधिकार होता. **सेनेट** सभेंतील **प्रीटर** ( Pretor ) याजकडे न्यायाचा अधिकार असल्यामुळें अशा प्रसंगीं तो नेहमीं अध्यक्षस्थानीं एका भव्य न्यायासनावर बसत असे. परंतु आतांच्या काळीं सामान्य सभेच्या अध्यक्षाकडे जो अधिकार असतो त्यापेक्षां त्याजकडे न्यायाधीश या नात्यानें ज्यास्त अधिकार कांहींच नव्हता. न्यायाधीश या शब्दाचा आपण अर्थ समजतों त्याप्रमाणें त्या न्यायसभेंत ज्यूरीवांचून कोणाकडे कांहीं अधिकार नव्हता. कायद्यासंबंधीं आणि घडलेल्या गोष्टीसंबंधीं निर्णय करणें हीं दोन्ही कामें ज्यूरीकडे होती.

**कामन्स** सभेपुढें एखाद्या मनुष्यावरील दोषारोपाची ज्या पद्धतीनें आज चौकशी होते त्यांत आणि **व्हेरेस** याजवरील आरोपाच्या चौकशीच्या पद्धतींत बहुतांशीं सादृश्य होतें. आपल्यां वर्गांतील आरोपी याजवरील अपराध शाबीद करण्याकरितां आपल्यापुढें आलेल्या पुराव्याचें प्रामाणिकपणानें आणि निःपक्षपातानें परीक्षण करणें हें मनुष्याच्या हातून फार थोड्या प्रसंगीं घडतें. न्यायाधीश पुष्कळ असले म्हणजे एका व्यक्तीवर जी जबाबदारी असते त्या जबाबदारीपासून ते मोकळे असतात. आपल्या पक्षाचा जय व्हावा म्हणून कितीएकांचीं मनें तर पूर्वींच दूषित झालेलीं असतात; आणि त्यांत कांहीं ज्यूरर तर आपल्या पक्षाचे पराकाष्ठेचे तरफदार असतात. **सिसेरोनें** एका ग्रंथांत अशा जातीच्या न्यायाधिशांच्या स्वभावाचें फार उत्तम स्पष्टीकरण केलें आहे तें असेंः— "तरफदारीनें किंवा अनुग्रह करावा या बुद्धीनें, प्राप्तीच्या लोभानें किंवा रागानें, आशेनें किंवा भयानें, अथवा गैरसमजुतीनें किंवा कनवाळूपणानें मनुष्यांचीं मनें दूषित झाल्यामुळें त्यांच्या हातून यथायोग्य न्याय होत नाहीं. मुकदम्यांतील घडलेल्या गोष्टीकडे, पूर्वी घडलेल्या गोष्टीवरून स्थापित झालेल्या ठरावाकडे, आणि कायद्याच्या व न्यायाच्या नियमांकडे व तत्वांकडे ते मुळींच लक्ष देत नाहींत."

**रोम**नगरांतील अतिमोठ्या घराण्यांमधील लोकांचें **व्हेरेस** यास पाठबळ होतें. त्यांनीं प्रांताच्या गव्हरनराचा लांच खाण्याचा जसा काय एक कायदेशीर हक्कच आहे, असें ठरवून ठेविलें होतें. राष्ट्रांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांपैकीं कितीएकांनीं तर पूर्वींच **व्हेरेस** याचा किता वळविला होता; व कितीएक आपली पाळी आली म्हणजे तो कित्ता वळविण्याची वाट पहात होते. **व्हेरेस** याज-

वरील आरोपाची चौकशी लांबणीवर टाकावी किंवा त्याचा कोणी मित्र अथवा त्यानें वाढविलेला कोणी मनुष्य यास फिर्यादी नेमून न्यायनिष्ठपणाचा पोकळ डौल घालावा आणि व्हेरेस याच्या प्रतिपक्षाचे प्रयत्न निष्फळ करून त्याचा उपहास करावा म्हणून प्रयत्नही पुष्कळ झाले.

व्हेरेस याजवरील खटला चालविण्याचें काम मोठ्या उत्साहानें सिसेरोनें आपल्या अंगावर घेतलें त्यास कारणें होतीं. वकिलीचें काम करण्यांत आपण किती प्रवीण आहोंत हें लोकांच्या मनांत भरवून देण्याचा तो एक उत्तम समय होता. दुसरें तो पूर्वी सिसिलि प्रांताचा गव्हरनर असल्यामुळें त्या प्रांतांतील लोकांवर व्हेरेसनें केलेल्या जुलमाचा प्रतिकार करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्यास वाटलें आणि सर्वांत श्रेष्ठ कारण असें होतें कीं, मोठ्या अधिकारावरील अपराध्यावर काम चालविल्यानें लोकांत आपली कीर्ति वाढून आपल्यास राष्ट्रांतील अतिश्रेष्ठ पदाची तात्काल प्राप्ति होईल अशी त्यास आशा होती. त्या खटल्याची चांगली माहिती करून घेण्यासाठीं त्यानें परिश्रम करण्यांत कसर केली नाहीं. पुरावा गोळा करण्याकरितां त्यानें सगळा सिसिली प्रांत धुंडाळला आणि त्या कामांत त्यास जुन्या जनानुरागाचा मोठा उपयोग झाला.

माजी गव्हरनर व्हेरेस याजवरील आरोपाबद्दल पुरावा भरपूर होता. आपली धनतृष्णा तृप्त करण्याकरितां व आपल्या दुष्टकामना सिद्धीस नेण्याकरितां लोकांस दुःख देण्यांत त्यानें कांहीं कमतरता ठेविली नव्हती. त्यांत त्यानें एक मोठें भयंकर पातक केलें होतें त्याबद्दल ज्यूरीच्या मनांत त्याजविषयीं क्रोध उत्पन्न करण्याकरितां सिसेरोनें फार प्रयत्न केला. मनुष्यरूपी पशुयज्ञामध्यें एक दुर्दैवी रोमन सांपडला होता. सिसिलियन लोकांवर बला-

त्कार केल्याबद्दलचा मुकदमा आरोपीचा बचाव करितांना शहाण्या वकिलानें परिहासोक्तीनें सहज उडवून दिला असता आणि पशूला यातना झाली असतां आपल्या मनावर जितका करुणेचा संस्कार होतो त्यापेक्षां जुलमानें गांजलेले **सिसिलियन** लोक त्या पक्षपाती ज्यूरीला ज्यास्त करुणास्पद आहेत असें वाटलें नसतें. परंतु जो मनुष्य **रोमन** असून ज्याजवर कायदेशीर रीतीनें अपराध लागू झालेला नाहीं त्या मनुष्याच्या केंसास धक्का लावणें हें कोणत्याही ठिकाणीं व कोणत्याही अधिकाऱ्यास शक्य नव्हतें. मग तें ठिकाण **रोम** नगरापासून किती कां अंतरावर असेना, आणि तो अधिकारी किती कां सत्ताविशिष्ट असेना. ह्यासंबंधानें **सिसेरोनें** ज्यूरीला हकीकत सांगून ज्यूरीच्या मनांत त्या दुष्ट अपराध्याविषयीं क्रोध उत्पन्न केला तसा कांहीं दुसऱ्या कोणास उत्पन्न करितां आला नसता.

**सिसेरो** म्हणालाः—"सद्गृहस्थहो, **कान्सा** येथील नागरिक **पब्लियस ग्यासिअस्** या मनुष्याविषयीं मी सांगावें तरी काय? माझ्या वाणीमध्यें अशी कोठें शक्ती आहे? माझ्या भाषेंमध्यें असें कोठें सामर्थ्य आहे? आणि माझ्या आत्म्याला जो त्वेष आला आहे त्याचें यथार्थ स्वरूप प्रदर्शित करण्याइतकें वाक्पुटत्व माझे ठिकाणीं कोठें आहे, कीं, मी तुमच्या मनांत त्या गोष्टीचें यथार्थ स्वरूप बिंबवून देऊं शकेन? परंतु ह्या क्रूरकर्म्या पाप्याचा मला जो राग आला आहे तो कांहीं उणीव पडूं देणार नाहीं. तथापि ह्या माझ्या उपन्यासांत मला ऊरफोड प्रयास करून या विषयाचें खरें स्वरूप प्रदर्शित करण्याकरितां दुसऱ्या कांहीं जरूरीच्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत. कारण, हा आरोप असा आहे कीं, त्याविषयीं पहिल्यानें मला कळलें तेव्हां मी तो न्यायसभेपुढें आणण्याचें नाकारलें. मला माहीत होतें कीं, तो अगदीं खरा आहे; परंतु

मला असें वाटलें नव्हतें कीं, तो विश्वासार्ह आहे असें तुह्मास वाटेल. मी कितीएक तास झाले ह्या विषयावर बोलत आहें. दुसऱ्या मुद्यांवर मीं पुष्कळ बोलल्यामुळें माझ्या वाणीची शक्ती कमी झाली आहे; आणि हा मुद्दा असा महत्वाचा आहे कीं, त्याजवरच मीं माझ्या वाणीचें सर्व बळ खर्च केलें पाहिजे होतें; परंतु तें धोरण मला राहिलें नाहीं. माझ्या वाणीचें सर्व बळ मी खर्च करून बसलों तेव्हां आतां करावें काय तें कांहीं मला सुचत नाहीं. मला वाटतें कीं, आतां काय तो एकच मार्ग उरला आहे आणि तो मी स्वीकारला पाहिजे. घडलेल्या गोष्टी मी तुह्मांस निरूपण करीन आणि त्या स्वतःच अशा आहेत कीं या दुष्टाविषयीं तुमच्या मनांत त्वेष आणिल्यावांचून राहाणार नाहीत. अशा कामांत वाक्पटुत्वाची मुळींच गरज नाहीं. ‘माझें वाक्पटुत्व’ असें मी ह्मणत नाहीं; कारण, मला तें मुळींच नाहीं. परंतु दुसऱ्याच्या वाक्पटुत्वाची देखील गरज नाहीं. ह्या आरोपीनें दुसरे लोक बंदीखान्यांत टाकिले होते, त्यांत कान्सा येथील ग्यासियस् नांवाचा एक रोमन होता. कसें करून तरी तो त्या बंदीखान्यांतून पळून निभावला आणि मैसॉना येथें आला आणि जेव्हां त्यानें असें पाहिलें कीं आपण इटालीच्या अगदीं जवळ आलों आहों, आतां आपण काळाचे दाढेंतून निभावलों, स्वतंत्रतेचा आणि कायद्याचा वारा आपणास लागूं लागला आहे; तेव्हां तो बोलूं लागला कीं, मी रोमन असतां मला बिड्या घालून कैदेंत टाकिलें याबद्दल फिर्याद करण्यासाठीं मी थेट रोम येथें जातों, आणि व्हेरेसची तेथें वाट पहात बसतों. त्या आपद्ग्रस्त मूर्खाला असें कळलें नाहीं कीं, मी त्या गव्हर्नराच्या वाड्यांत जशा काय प्रत्यक्ष त्याच्या तोंडावर ह्या गोष्टी बोलत आहें. मी तुह्माला पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, व्हेरेस अन्यायानें जी संपत्ति

लुटून आणीत असे ती तेथें सांठवीत असे. दुष्कर्मानें मिळविलेली संपत्ति सांठविण्याचें त्याचें तें परम विश्वासू स्थळ होतें. **ग्याशिअस** याचें भाषण ऐकून पोलिसानें त्यास तत्काळ धरून सिटीमाजिस्त्रेट याच्या समोर आणिलें; आणि त्या दुर्दैवी मनुष्याच्या नशिबानें **व्हेरेस** त्याच दिवशीं तेथें आला. माजिस्त्रेटानें त्याला जाहीर केलें कीं, अमुक एक नगरवासी **सिऱ्याकस** येथें आपणास कैदेमध्यें टाकिल्याबद्दल गाऱ्हाणें सांगत असून आपल्या विरुद्ध भयप्रदर्शक भाषणें बोलत होता; त्याला आह्मी जाहाजावर चढतांना अटकावून कैदेंत ठेविला आहे; यास्तव आपल्यास उचित वाटेल तसा स्वतःच त्याचा न्याय करावा. **व्हेरेस** यानें त्याबद्दल माजिस्त्रेटाचे आभार मानून आपल्या हिताविषयीं त्याच्या तत्परतेबद्दल त्याची प्रशंसा केली; आणि रागानें लालभडक हात्साता स्वतः तो कोर्टांत आला. त्याच्या नेत्रांतून क्रोधाग्नीच्या ज्वाला निघत होत्या. त्याच्या मुखश्रीच्या प्रत्येक रेषेवर मूर्तिमन्त निष्ठुरता दिसत होती. तेथें जे हजर होते ते मोठ्या काळजीनें तो कोणीकडे जातो आणि काय करितो याजकडे लक्ष देऊन बघत होते. तों **व्हेरेस** यानें एकदम असा हुकूम केला कीं, त्या कैद्याला बाहेर आणून मैदानांत उघडा बोडका मुसक्या बांधून उभा करावा आणि वेताच्या छड्या तयार ठेवाव्या. **व्हेरेस**च्या हुकुमाप्रमाणें माजिस्त्रेटानें सर्व तयारी केली. तो दुर्दशापन्न **ग्यासिअस** मोठ्यानें ओरडून ह्मणाला कीं, मी **रोमन** असून **कानसा** येथील नागरिक लोकांपैकीं एक आहें; **रोमन** राष्ट्राच्या कायद्याप्रमाणें संमति देण्याचा मला अधिकार आहे. मी **लिसिअस् प्रेटिअस्** ह्या नामांकित सरदाराबरोबर मोहिमेवर गेलों होतों. मी ह्मणतों हें खरें आहे किंवा खोटें आहे याविषयीं **व्हेरेस**नें पाहिजेल तर त्या सरदारास विचारून आणवावें. **व्हेरेस** त्याजवर

उत्तर करितो कीं,—मला माहीत आहे कीं, तुला पळून गेलेल्या गुलामांच्या पुढाऱ्यांनीं सिसिली येथें हेर म्हणून पाठविला होता. ह्या-आरोपाबद्दल कांहीं पुरावा नव्हता इतकेंच नाहीं, परंतु कोणाच्या मनांत त्याविषयीं संशय देखील आला नव्हता. परंतु व्हेरेसच्या मनांतून त्यास मारून कुटून अपराधी करावयाचें होतें. त्यानें असा हुकूम फर्माविला कीं, त्याचें सगळें शरीर छडया मारून फोडून काढावें. सद्गृहस्थहो, मेसॉना येथील उघडया मैदानांत त्या रोमनच्या शरीराच्या चिंध्या कीं हो उडविल्या! त्यास छडया मारीत असतां, त्या छडयांच्या आवाजांत त्या विपन्न मनुष्याचें दुसरें भाषण तर कांहीं एक ऐकूं येत नव्हतें, परंतु 'मी रोमन आहें' हें त्याचें ओरडणें मात्र स्पष्ट ऐकूं येत होतें. त्याला असें वाटलें कीं, मी रोमन आहें असें प्रतिज्ञापूर्वक सांगितल्यानें निदान ह्या मारांतून सुटेन; परंतु तो माराच्या तडाक्यांतून सुटला नाहीं. इतकेंच नाहीं, परंतु तो जेव्हां फारच काकुलती करूं लागला आणि रोमचें नांव घेऊन ओरड करूं लागला, तेव्हां, त्या कपाळकरंट्या मनुष्याकरितां व्हेरेस यानें शूळ (क्रूस)—होय, मी ह्मणतों तेच खरे शूळ—आणण्याचा हुकुम केला. गव्हरनरानें आपल्या सत्तेचा असा वाईट उपयोग केल्याचें असें कधींही कोणी पाहिलें किंवा ऐकिलें नसेल.

"स्वातंत्र्य" हें नाम कर्णारूढ झालें म्हणजे; किती हो गोड लागतें! रोमन या नात्यानें जे आपणास हक्क आहेत ते आपलें केवढें वैभव आहे! पोरसिअस आणि सेमप्रोनिअस यांचे कायदे! त्यांअन्वयें न्याय करण्याचा आपला अधिकार! ह्या सर्वांचा असा काहो परिणाम घडावा कीं, रोमन लोकांच्या प्रांतांतील एका नगरांत, रोमन लोकांच्या कृपेनें ज्याला अधिकार प्राप्त झाला आह

त्यानें, त्या रोमनला भरबाजारांत उघडाबोडका करून मार द्यावा? शरीराला यातना देण्याकरितां लालभडक लोखंडाच्या पत्र्याचा उपयोग केला त्याबद्दल मी काय सांगावें? त्या दुर्दैवी प्राण्याच्या तळतळाटयुक्त आक्रोशानें आणि करुणापर विनवण्यानें जसा प्रेक्षक लोकांच्या मनाला द्रव सुटला तसा तुमच्या मनाला कोठून सुटणार? कारण तुम्हीं कांहीं तें अघोरकर्म प्रत्यक्ष पाहिलें नाहीं. परंतु तो भयंकर प्रसंग प्रत्यक्ष ज्यांनीं अवलोकन केला त्या रोमनगरवासी जनांच्या नेत्रांतून ज्या अश्रुधारा चालल्या आहेत त्या पाहून तुमच्या अंतःकरणाला द्रव येणार नाहीं काय? जो मनुष्य मी नागरिक आहें असा हक्क सांगत आहे त्याला ओढून तुह्मी शूळा (क्रूस) कडे नेऊं शकलां असतां काय? तुम्ही स्वतः पहात आहां कीं, आरोपी याच्या विरुद्ध सर्व लोकांचीं मनें कशीं त्वेषयुक्त झालीं आहेत आणि त्यांच्या सुरक्षितपणाला व्हेरेस याचें कर्म बाधक असल्यानें भयानें, ते कसे दुःखग्रस्त झाले आहेत!

व्हेरेस याजकडे सिसेरो वळून ह्मणाला—"व्हेरेस, जर तुझें मन संतुष्ट होत असेल तर आम्ही असें कबूल करितों कीं, ग्यासिअस हा हेर होता व त्याविषयीं तुला जो संशय आला होता तो तूं प्रामाणिकपणानें गृहीत केला होता. तुझ्या संशयाला प्रमाणें काय होतीं हें मी तुला विचारीत नाहीं. पण मी 'रोमन आहें' असें तो ह्मणाला हें खरें आहे कीं नाहीं? व्हेरेस, जर तुला धरून पर्शिआंत किंवा त्याहूनही दूरवरच्या प्रदेशांत नेलें असतें, आणि शुळापाशीं उभें केलें असतें तर तुझ्या बचावाकरीतां 'मी रोमन आहें' याखेरीज तूं ओरडून दुसरें काय सांगितलें असतें? पृथ्वीच्या अगदीं शेवटीं वसणाऱ्या रानटी लोकांच्या हातांत तूं सांपडला असतास तर, ह्या जगांतील सर्व राष्ट्रांत ज्याची कीर्ति पसरली आहे

त्या ‘ **रोमन** ’ नांवानें तेथें देखील तुझें संरक्षण झालें असतें असें असून, तूं **रोमन कान्सल माजिस्ट्रेट** असतां, ‘ आपण **रोमन** आहों ’ हा हक्क **ग्याशियस्** यानें सांगितल्यावर देखील त्यास तूं सोडलें नाहींस इतकेंच नाहीं, पण शिक्षा अमलांत आणण्यास तूं कांहीं विलंब देखील केला नाहींस.

“ संपत्ति नाहीं आणि मोठा दरजाही नाहीं असे गरीब कुळांत जन्मलेले खालच्या वर्गाचे लोक समुद्रांतून अशा प्रदेशांत जातात कीं तो त्यांनीं पूर्वीं कधींही पाहिलेला नसतो. तेथें त्यांचा कोणाशींही परिचय नसतो. ते अमुक राष्ट्रांतील लोक आहेत अशी साक्ष देणाराही त्या प्रदेशांत कोणी नसतो. परंतु फक्त आपण **रोम रा**-ज्यांतील स्वतंत्र लोकांपैकीं आहोंत या बळावर त्यांस अशी खातरजमा असते कीं, लोकमतानें आणि कायद्यांनीं ज्यांचा निग्रह केला आहे अशा आपल्या गव्हरनरांपासून, **रोमन** लोकांना जे हक्क आहेत त्या हक्कांचा जे अनुभव घेतात त्यांपासून, आणि भाषेच्या, कायद्याच्या आणि दुसऱ्या अनेक गोष्टींच्या संयोजनानें आपल्याबरोबर ज्यांचा संबंध जडला आहे त्यांजपासून, आपल्यास कोणतेंही भय नाहीं यांत काय विशेष आहे ? पण आपण कोठेंही गेलों तरी, आह्मी **रोमन** लोक आहोंत, असा शब्दोच्चार केल्याबरोबर आपल्या केंसाला धक्का लावण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. तर सद्गृहस्थहो, हा विश्वास नाहींसा करा. **रोमन** यांस जें अभयपत्र मिळालें आहे तें रद्द करा. आणि ‘ मी **रोमन** असून स्वतंत्र मनुष्य आहें ’ या शब्दांत कांहीं परित्राण नाहीं असे जाहिरनामे लावा. आणि **रोमन** अधिकाऱ्यांस आपल्या इच्छेप्रमाणें **रोमन** लोकांस शासन करूं द्या. ह्मणजे मग या जगांत आपल्यास पाऊल ठेवण्यास देखील जागा राहणार नाहीं !

"ग्याशिअस् याजविषयीं मी ज्यास्त कांहीं बोलत नाहीं. व्हेरेस, त्याजवर तुझा खासगी दावा होता तो तूं उगवून घेतलास पण तो रोमन असल्यामुळें त्या नात्यानें त्याचे स्वाभाविक जे हक्क होते त्यांविरुद्ध तूं वर्तन करून आपण त्या व्यक्तीचेच नाहीं, पण सर्व सापेक्ष स्वातंत्र्याचे वैरी आहोंत असें, लोकांच्या नजरेस आणून दिलेंस. मेसॉना येथील अधिकाऱ्यांनीं नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें डोकें उडविण्याचा शूळ नगराच्या मागें पाम्पेःयियन्च्या रस्त्यावर उभा केला होता; तो तेथून काढून सामुद्रधुनीकडे रस्ता जातो त्याच्या बाजूवर इटालीकडे तोंड करून उभा करण्याविषयीं तूं हुकुम केलास त्याचा कायरे अर्थ होता? ही गोष्ट तुझ्याच्यानें कांहीं नाकबूल करवणार नाहीं. सर्व लोक एकत असतां तूं उघडपणें असें बोललास कीं, 'मी रोम नगरवासी आहें' असा ग्याशिअस हक्क सांगत आहे तर त्या शुळावरून त्यानें आपला देश आणि घर पहावें ह्मणून मी ती जागा पसंत केली आहे. सद्गृहस्थहो, मेसाना नगर वसल्यापासून त्या जागेवर शूळ उभा केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. ही जागा आरोपी यानें पसंत केली त्याचें स्पष्ट कारण हेंच होतें कीं, त्या मरणोन्मुख मनुष्यानें शेवटच्या यातनेंत असें पहावें कीं, गुलाम आणि स्वतंत्र मनुष्याचे हक्क समुद्राच्या त्या अरुंद फांट्यानें कसे वेगळे केले आहेत; आणि इटाली देशानें असें पहावें कीं, देहान्तशासन फक्त गुलामाकरितांच असून तें आपलें अपत्य कसा सोशीत आहे!!

"रोमन यास बिड्या घालून कैदेंत टाकिल्याबद्दल हा व्हेरेस पापी आहे, त्याला कोरडे मारविले हें अघोर पातक ह्यानें केलें आहे, आणि त्याचा प्राण घेतला हें बहुतांशीं पितृहिंसासमान पातक आहे! या पाप्याचें अतिदुष्टत्व प्रदर्शित करण्याकरितां आपल्या भाषेंत

मुळींच शब्द नाहींत ! असें दुष्कर्म करूनही पलीकडे उभा आहे तो मनुष्य कांहीं संतुष्ट झाला नाहीं. तो ह्मणाला त्याला आपल्या देशाकडे पाहूंद्या. स्वातंत्र्य आणि कायदे यांचें पूर्णपणें चिंतन करीत असतां त्यास प्राण सोडूंद्या. व्हेरेस, तूं कांहीं नुसतें **ग्यासिअस** यास यातना देऊन मारलें नाहींस. तो बिचारा एक गरीब नागरिक होता. पण त्वां आमच्या सर्वसापेक्ष स्वातंत्र्याची निर्भर्त्सना करून त्यास अत्यंत लाजिरवाणें देहान्त शासन केलेंस !!"*

**व्हेरेस**नें **सिसेरो**चें सुरुवातीचें भाषण मात्र ऐकिलें. आपल्या तर्फे काम चालविण्याची व फिर्यादीचा निर्णय काय होतो हें पाहण्याची त्याची छाती झाली नाहीं. आपल्या उपेक्षेनें न्याय काय होईल तो होवो असा निराश होऊन कामाची सुरुवात झाल्यावर लागलीच **मार्सेलस** येथें निघून गेला. तेथें त्यानें लुटून आणलेल्या संपत्तीचा बरेच दिवस उपभोग घेतला व **सिसेरो**ची पदच्युती आणि अपमानजनक मृत्यु घडेपर्यंत तो जिवंत होता. शेवटीं **अॅन्टोनी**नें जे लोक मारले त्यांत तोही मारला गेला.

या चौकशीची समाप्ती झाल्यावर **सिसेरो** लागलीच रोमन न्यायसभेंत प्रमुखत्वास पावला. ह्या वेळेपर्यंत बारिस्टरच्या धंद्यांत **हॉर्टेन्सिअस** काय तो अग्रगण्य होता व तो **व्हेरेस**च्या तर्फे बारिस्टर होता. **सिसेरो** त्यास कोर्टाचा राजा म्हणत असे. **सिसेरो**पेक्षां वयानें तो आठ वर्षांनीं वडील होता

---

* सिसेरोच्या या मनोवेधक भाषणाची योग्यता जाणण्याकरतां तें मूळ भाषणच वांचलें पाहिजे. लॅटिन भाषेंतील ग्रंथाच्या भाषांतराला इंग्रजी भाषा देखील पात्र नाहीं. मग आह्मी तर इंग्रजी भाषांतरावरून गोषवारा दिला आहे, तेव्हां त्यांत चांगली गोष्ट कोठून असणार ?

आणि वृत्तिपरत्वें तर तो सिसेरोहून पुष्कळ वर्षांनीं वडील होता. असें ह्मणतात कीं त्यानें आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं पहिल्यानें लोकसमाजापुढें फार सुरेख भाषण केलें. त्याची स्मरणशक्ती फार विलक्षण होती. त्याची वाणी फार मंजूळ आणि वाचासरणी फार उत्कृष्ट होती; परंतु सिसेरोनें केवळ गर्भित अर्थानेंच नाहीं, पण कांहींसें स्पष्टपणें ह्मटलें आहे कीं, तो ज्यूरीला प्रसंगीं लांच देण्याला मागें सरेल असा नव्हता. तें कर्म त्या कालीं पार्लमेन्टची जागा मिळविण्याकरितां आपल्या तर्फे संमति देण्याला इंग्रजलोक लांच देतात त्याहून कांहीं जास्त अप्रतिष्ठास्पद मानीत नसत. भिन्न भिन्न नैसर्गिक स्वभावानें हे दोघे पुरुष फार विजातीय होते. हॉर्टेन्सियस हा फार नखरेबाज असून आपला पोषाख नीटनेटका असावा ह्मणून फार जपत असे. (त्यानें एकदा आपल्या सोबत्यावर आपल्या झग्याच्या चुन्या अव्यवस्थ केल्याविषयीं फिर्याद मांडली होती असें ह्मणतात.) इकडे सिसेरोची फुशारकी आणि दिमाख अगदींच निराळ्या प्रकारचा होता. व्हेरेसचा मुकदमा संपल्यानंतर हे दोघे बारिस्टर एकाच पक्षाचे वकील पुष्कळ वेळां झाले होते. सिसेरोचा जसजसा उत्कर्ष होत गेला तसतसा हॉर्टेन्सिअस् मागें पडत चालला. बाहेरून दिसण्यांत ते एकमेकाचे मित्र होते; परंतु आंतून दोघे परस्परांचा हेवा करीत असत. त्यांत सिसेरोकडे ज्यास्त दोष होता. हॉर्टेन्सिअस् सिसेरोशीं बऱ्याच मोकळ्या मनानें वागला असतांही त्या प्रमाणानें सिसेरोचें मन त्याजविषयीं शुद्ध नव्हतें. तथापि आपला प्रतिस्पर्धी मरण पावल्यावर सिसेरोनें "वैभव" या विषयावर एक ग्रंथ लिहिला होता. तो त्याचे नांवानें अर्पण करून त्याच्या गुणांना आणि वक्तृत्वाला मोठा मान दिला. तो ग्रंथ आज उपलब्ध नाहीं.

# भाग २ रा.

व्हेरेस याजवर खटला चालविण्यापासून सिसेरोस मोठा लाभ काय झाला कान्सलचा अधिकार मिळविण्याविषयीं त्याचा प्रयत्न. संमती देणारांचीं मनें कशीं वश करून घ्यावीं याबद्दल त्याचा बंधु क्किन्टस यानें त्यास पत्र लिहिलें त्यांतील तात्पर्य. सिसेरोच्या वक्तृत्वशक्तीचा प्रादुर्भाव. सिसेरोचे एकार्थाभिलाषी सहा प्रतिपक्षी मोठे प्रबळ असून व त्यांस सीझरसारख्या वजनदार पुरुषाचें पाठबळ असून लोकांनीं सिसेरोस कान्सल निवडलें. सिसेरोचा प्रतिस्पर्धी क्याटीलाईनविषयीं गुणदोष विवेचन. रोमराष्ट्राचें स्वामित्व आपणास मिळावें याबद्दल क्याटीलाईनचें दुष्ट कारस्थान व तत्संबंधानें सिसेरोचें वर्तन. क्याटिलाईन याच्या सोबत्यांनीं परकीय देशाच्या रोमन नगरांतील वकिलाबरोबर कारस्थान रचलेलें उघडकीस आलें. त्या कारस्थानांतील पुढारी लोकांस सेनेटच्या हुकुमानें सिसेरोनें देहान्त शासन केलें. क्याटिलाइन याच्या सैन्याचा पराभव आणि रणांगणीं त्याचा मृत्यु. कान्सल म्युरेना याजवर त्याच्या प्रतिपक्षानें आणलेला आरोप; आणि त्या प्रसंगीं सिसेरोनें म्युरेनातर्फे केलेलें भाषण. सिसेरोच्या अधिकाराचा शेवट. त्याची संपत्ति आणि प्रापंचिक सुख वगैरे प्रकरणें या भागांत आहेत.

व्हेरेस याजवर खटला चालवून त्यास देशत्याग करून जाणें भाग पाडल्यामुळें सिसेरोचा लौकिक वाढून त्याचा दिवसानुदिवस उत्कर्ष होत चालला. जें काम त्यानें हातांत घेतलें त्यांत त्याला यश मिळालें नाहीं असें बहुतकरून झालें नाहीं. या योगानें लोक त्यास फार चाहूं लागले.

**रोमन** प्रजासत्ताक राज्याच्या कान्सलचा* अधिकार आपणास मिळावा अशी **सिसेरोची** अत्युत्कट इच्छा होती, आणि त्या काळीं यासारखा महत्वाकांक्षी लोकांच्या मनाला आकर्षण करणारा दुसरा विषयही नव्हता. हा अधिकार मिळण्याकरितां **सिसेरोनें** कोणकोणते उपाय योजावे आणि कसें वर्तावें, याविषयीं त्याचा बंधू **क्विन्टस** (Quintus) यानें त्यास एक पत्र लिहिलें होतें त्यावरून कौन्सलचा हुद्दा मिळविण्याकरितां किती खटपटी कराव्या लागत असत, तत्कालीन सामाजिक स्थिती कशी होती आणि राजकीय व्यवहार किती घोटाळ्याचा होता याचा चांगला बोध होतो; यास्तव त्या पत्रांतील सारांश येथें देतों:—

**क्विन्टस** यानें **सिसेरोस** असें लिहिलें कीं, "तूं जेव्हां **फोरम** येथें जाशील तेव्हां ही गोष्ट चांगली लक्षांत ठेव कीं तूं नवा उमेदवार असून **रोम**सारख्या नगरांत सर्व अधिकारांहून अत्यंत श्रेष्ठ अशा अधिकाराची अपेक्षा करीत आहेस. तूं आपल्या वक्तृत्वशक्तीवर सगळा भरंवसा ठेव आणि तुझ्यानें करवेल तितकें करून तिजमध्यें तूं सुधारणा कर. **डेमास्थनिस** (Demosthenes) यानें आपलें वक्तृत्व सुधारण्याकरितां किती श्रम केले होते ते ध्यानांत ठेव. अनेक वर्गांतील लोक तुझे मित्र असून त्यांची संख्या फार मोठी आहे असें लोकांच्या मनांत आणून देण्यास चुकूं नको. सरकारी कर देणारे सर्व लोक तुझ्या पक्षास आहेत. बहुतकरून अश्वारोही वर्गही तुझ्या बाजूस आहे. म्युनिसिपल वार्डांतील पुष्कळ

---

***रोम** राष्ट्राचा राज्यकारभार चालविणारा मुख्य अधिकारी ज्याच्या हातांत एक वर्षपर्यंत कांहीं मर्यादेनें राजकीय सर्व सत्ता असे. एकाच व्यक्तीच्या हातांत अपार सत्ता दिल्यानें अन्याय होईल म्हणून दोन कान्सल निवडीत असत. ज्यांस संमती देण्याचा अधिकार असे त्या लोकांच्या बहुमतानें कान्सलची निवडणूक होत असे.

लोक तुझ्या पक्षास आहेत आणि न्यायाच्या कोर्टांत ज्यांचा तूं बचाव केलास असे प्रत्येक वर्गांत तुझ्या पक्षाचे पुष्कळ लोक आहेत. तुझें भाषण ऐकण्याकरितां तुझ्या भोंवतीं जे तरुण गृहस्थ गोळा होतात व जे लोक तुझी प्रशंसा करून तुजबरोबर नेहमीं फिरतात त्यांच्या मनांत चांगलें ठसवून दे कीं त्यांस आपली कृतज्ञता आणि प्रीति दाखविण्याचा उत्तम समय काय तो हाच आहे. बडे लोकांच्या वर्गाविषयीं माझी चांगली इच्छा आहे आणि माझे मनोरथ पूर्ण व्हावेत अशी त्यांचीही इच्छा आहे असें नेहमीं लोकांच्या निदर्शनास आणीत जा. त्यांच्या संमत्ती मिळविण्याकरितां श्रम करण्यांत तूं कसर करूं नकोस आणि त्यांच्या मनांत असें ठसवून दे कीं राजकीय व्यवहारांत तुझा अभिप्राय बडे लोकांच्या अभिप्रायाशीं मिळता असून तूं कांहीं कोणत्याही प्रकारें निव्वळ लोकपक्षपाती नाहींस. तूं केवळ लोकपक्षपाती आहेस असें जर कोणी ह्मटलें तर त्याच्या मनाची अशी खात्री करून दे कीं **पांपी** याचा आश्रय मिळविण्याकरितां मात्र मी लोकपक्षपाती आहें असें दाखविलें होतें.

"कान्सलच्या अधिकाराचा ज्या घराण्यांनीं उपभोग घेतला आहे तीं कदाचित् तुझ्या बढतीस आड येतील आणि ज्या लोकांनीं प्रीटरच्या अधिकाराचा उपभोग घेतला असून त्यांस कान्सलचा अधिकार मिळाला नाहीं त्यांच्या मनांत तुजविषयीं मत्सरभाव उत्पन्न होऊन ते तुझे शत्रु होतील; यास्तव तुझा जय होण्याकरितां प्रत्येक उपाय योजण्यांत कसर करूं नकोस. तुझा विजय दोन गोष्टींवर अवलंबून आहे. तुझ्या उत्कर्षाविषयीं तुझ्या मित्रांचें औत्सुक्य आणि तुजविषयीं लोकांचा अनुराग. तुझ्या मित्रांच्या संबंधानें तूं ही गोष्ट चांगली ध्यानांत ठेव कीं, आपल्या आयुष्यक्रमांतील नित्यव्यवहारांत आपण मित्र या शब्दाचा अर्थ करितों त्यापेक्षां

संमती मिळविण्याच्या प्रसंगीं त्या शब्दांचा अर्थ विशेष व्यापक करावा लागतो. यास्तव जे लोक तुजविषयीं चांगली इच्छा दाखवितील त्यांस व जे आपणांस तुझे मित्र ह्मणवितात त्या सर्वांस तूं आपल्या जिवलग मित्रांच्या कोटींत मोज. तुझे शेजारीपाजारी, तुझीं कुळें ( तूं ज्यांना बंधमुक्त केलें आहेस ), आणि तुझे गुलाम यांस आपलेसे करून ठेव. कारण या लोकांच्या द्वारें बहुतकरून लोकांत मनुष्याची कीर्ति पसरते. आपल्यावर आणखी उपकार करावे म्हणून लोक कृतज्ञता दाखवीत असतात; यास्तव तुझ्यापासून कांहीं प्राप्ती करून घेण्याची जे इच्छा दर्शवितील त्यांस निराश करूं नकोस. तुझे ऋणी आहेत त्यांस असें जाणीव कीं, त्यांनीं या समयीं तुझी सेवा केली असतां तूं उलटा त्यांचा ऋणी होणार आहेस. मित्रत्व करावें कोणाशीं आणि करूं नये कोणाशीं हा विचार अन्य प्रसंगाचा आहे; परंतु त्या विचाराचा हा समय नव्हे. आतां सगळेच तुझ्या उपयोगीं पडतील असें नाहीं. परंतु सर्वांच्या मनांत असा विश्वास उत्पन्न कर कीं तूं त्यांजबरोबर आजन्म मित्रभावानें वागशील. लोकांची संमती मिळविण्याकरितां तूं निरलस आणि लोकप्रिय लोकांचें सहाय्य अनुकूळ करून घे. इटालींतील ज्या नगरांना आणि वसाहतींना मत देण्याचा अधिकार आहे त्या नगरांचीं आणि वसाहतींचीं नांवें चांगलीं स्मरणांत ठेव आणि तुला मदत करण्याकरितां त्या नगरांतील व वसाहतींतील लोकांचीं मनें अशीं वश करून घे कीं, तुझें कार्य तें त्यांचें स्वतःचें कार्य आहे असें त्यांस वाटून त्यांनीं तुझ्यासाठीं प्रयत्न करावा. संमती देण्याचा ज्यांना अधिकार आहे त्यांची ओळख करून घेण्याविषयीं जितका प्रयत्न करणें शक्य असेल तितका कर. प्रांतांतील आणि खेड्यांपाड्यांतील लोकांशीं तूं परिचय केलास म्हणजे त्यां लोकांस असा अभिमान वाटेल

कीं, जसा काय तूं त्यांचा मित्र आहेस आणि त्यांपासून तुला फार उपयोग होईल. तुझ्याकरितां संमती मिळविण्याच्या कामीं तरुण मनुष्यें तुझ्या फार उपयोगीं पडतील; कारण तीं निरलस आणि उत्साही असतात. आत्महित साधण्याकरितां लोकप्रियता संपादणें हें मोठें चातुर्याचें काम आहे. ती संपादन करण्याकरितां खुशामत, आचरणांत कृपाळूपणा, उद्योगतत्परता आणि—लोकहितांकरितां आपले शरीर झिजाविणें या गुणांची फार जरूर आहे. तुझे मनोरथ सिद्धीस जाईपर्यंत तुझ्या सवयी तूं एका बाजूस ठेव. अशा प्रसंगीं खुशामतीची फारच अवश्यकता आहे. नित्यक्रमांतील व्यवहारांत अर्जव करणें हें नीच आणि दोषास्पद आहे; परंतु लोकमतानें अर्थ साधून घेण्याच्या कामीं त्याची फार अवश्यकता आहे. तुझें भाषण इतकें मधूर आणि मुखश्री इतकी आनंदी असावी कीं त्यांपासून दुसऱ्याला आल्हाद होईल. प्रत्येक व्यक्तीशीं फार विनयानें वाग, लोकांस मेजवान्या कर, तुला कोणी मेजवानी केली तर ती नाकारूं नको आणि तुझ्या मित्रांकडून लोकांस मेजवान्या करीव. जे कोणी तुला भेटावयास येतील त्यांजकरितां रात्रंदिवस तुझे दरवाजे मोकळे असूंदे आणि त्यांस असें भासीव कीं त्यांच्या भेटीकरितां तुझे दरवाजे सदैव मोकळे आहेत इतकेंच नाहीं, तर त्यांजविषयीं तुझें मन देखील तसेंच मोकळें आहे. कारण तुझ्या मुखश्रीवरून जर असें दिसेल कीं तूं त्यांचा तिरस्कार करीत आहेस, तर मग नुसत्या त्यांच्या भेटी घेतल्यापासून कांहीं अर्थ निष्पन्न होणें नाहीं"

"तुझ्या भोंवती नेहमीं पुष्कळलोक समुदाय असेल असें कर; आणि तुझे एजंट सगळ्या नगरभर तुझ्याकरितां संमती मिळविण्यासाठीं फिरूंदे. जे तुला भेटावयास येतील त्यांस असें दाखीव कीं, त्यांच्या भेटीपासून तुला फार आनंद झाला आहे, त्यांजकडे तुझें

लक्ष आहे, आणि त्यांच्या सभ्य चालीविषयीं तूं दुसऱ्यांशीं बोलत आहेस असें त्यांच्या दृष्टीस आण. तुला जो अभिवचन देत आहे तो तुला फसवीत आहे असें तुला वाटलें तरी तूं त्यास असें दाखीव कीं त्याच्या वचनावर तुझा पूर्ण भरवसा आहे. आपल्याविषयीं तुझ्या मनांत संशय आला आहे असें कोणास वाटून जर तो तुझी संशयनिवृत्ती करण्याचा प्रयत्न करील तर तुला त्याजविषयीं कधींच संशय आला नाहीं अशी त्याची समजूत कर. संमती देणाऱ्या लोकांच्या समुदायासह नेहमीं **फोरम** येथें जात जा. तुझ्या भोंवती लोकांची नेहमीं दाटी असावी हें फार अवश्य आहे. त्या योगानें तुला महत्व आणि भारदस्तपणा प्राप्त होईल आणि न्यायाच्या कोर्टांत ज्यांचा तूं बचाव करून दोषमुक्त केलें आहेस त्यांचा समुदाय तुझ्या भोंवती असल्यानें तुझा फारच मोठा गौरव होईल. परंतु तूं फार सावधच रहा. **रोमनगर** हें विश्वासघाताचें व फसवणुकीचें वसतीस्थान आहे. पुष्कळ लोक असे असतात कीं तुझ्या प्रसिद्ध गुणांमुळें आपण तुझे मित्र आहोंत असें त्यांस ढोंग करावें लागतें; परंतु त्यांच्या मनांत तुजविषयीं पूर्ण मत्सरभाव वसत असतो. एपीचार्मस–(Epicharmus) याचें ह्मणणें नेहमीं लक्षांत ठेव कीं, भोळे नसणें हें दूरदर्शीपणाचें मुख्य लक्षण आहे. तुझ्या प्रतिपक्षाच्या मित्रांस असें सांग कीं त्यांच्याविषयीं तुझी इच्छा चांगली आहे. संमती देणाऱ्या लोकांची सर्व प्रकारची मिथ्या प्रशंसा आणि अर्जव करण्यांत अगदीं कसर करूं नको. पहिलें तुझें कर्तव्यकर्म हें आहे कीं त्यांशीं तूं परिचय करावा, आणि त्यांस कळावें कीं तूं त्यांस ओळखतोस. अधिकारेच्छूनें असें दाखविलें पाहिजे कीं अर्थीयांचा जसा काय तो कल्पतरू आहे. प्रत्येक व्यक्तीशीं त्यानें विनयानें वागलें पाहिजे. तुझ्या तर्फे संमती देणाऱ्यावर मेहेरबानी कर-

ण्यास तूं पराकाष्ठेचा तत्पर आणि उल्हासी आहेस असें दाखीव. लोक उदार वचनांची अपेक्षा करीत असतात, यास्तव तीं देण्यांत अधिकारेच्छूनें कांकूं करूं नये. जें तूं करूं शकणार नाहींस त्याविषयीं कोणी तुजजवळ अभिवचन मागितलें–असें समज कीं तुझ्या मित्राचें वाईट करण्याविषयीं कोणी वचन मागितलें–तर त्याचा तूं किती उपकारी आहेस हें त्या मनुष्याच्या मनांत ठसवून त्याच्या विरुद्ध मी कांहीं करूं शकणार नाहीं असें त्यांस मोठ्या नम्रतेनें सांग आणि त्याचें ह्मणणें नाकारण्याबद्दल आपण फार खिन्न आहों असें दाखीव."

"मी, लोक असें बोलतांना ऐकलें आहे कीं, कांहीं बारिस्टर जेव्हां एखाद्या मोकदम्यांत वकिली करण्याचें नाकबूल करितात तेव्हां त्यांचें वर्तन त्या मोकदम्यांतील पक्षकाराशीं इतकें जास्त सभ्यपणाचें असतें कीं तितकें त्यांच्या कुळाशीं असत नाहीं. मनुष्यें गोड शब्दांनीं, आणि प्रेमयुक्त अवलोकनानें जितकीं संतुष्ट होतात तितकीं त्यांचें खरें हित केल्यानें होत नाहींत. कोणाच्या विरुद्ध पक्षाशीं तुझा पूर्वींचा संबंध असल्यामुळें त्यांचें काम तूं नाकारलेंस तर त्याबद्दल त्यांला कांहीं वाईट वाटणार नाहीं. परंतु मी एक महत्वाच्या कामांत गुंतलों आहें अशी सबब दाखवून त्या सबबीनें जर तूं त्यांचें काम नाकारशील तर तूं त्यास आपला शत्रु करून घेशील".

"लोक तुझ्याविषयीं चांगलें बोलतील आणि तुजविषयीं लोकप्रियता वाढवितील अशी तजवीज करण्यास चुकूं नको. प्रत्येक व्यक्तीच्या मनांत असें ठसवून दे कीं, पांपी मनापासून तुझ्या पक्षाला आहे आणि त्याला असें वाटत आहे कीं आपल्या हिताचा तुझ्या विजयाशीं अगदीं निकट संबंध आहे. ज्या नगरांत अनेक

राष्ट्रांचे समाज एकत्र झाले आहेत आणि पूर्ण कारस्थानें, कावेदावे, आणि अधर्म यांचें जें वसतिस्थान आहे त्या रोमनगरांत तुला जय मिळवावयाचा आहे हें ध्यानांत धर. तुला पुष्कळ उद्धतपणा-पुष्कळ द्रोहबुद्धि, पुष्कळ अभिमान पुष्कळ द्वेष आणि पुष्कळ पीडा सोसाव्या लागतील. तुला लाचलुचपतीच्या प्रचाराविरुद्ध भां-डावयाचें आहे यास्तव तुझ्या एकार्थाभिलाषी प्रतिपक्ष्यांना असें बजा-ऊन ठेव कीं, त्या अपराधाबद्दल तूं त्यांस न्यायाच्या कोर्टापुढें उभे केल्यावर त्यांची काय दशा होईल! त्यांस असें कळूं दे कीं, त्यांच्या वर्तनावर तुझी फार बारीक नजर आहे. आपल्यावर खटला होईल या भयानें कदाचित् ते लाचलुचपत देण्याच्या भरीस पडणार नाहींत आणि त्यांनीं तसें केलें तरी तुझ्या तर्फे मत देणा-रांच्या उत्साहवृत्तीपुढें त्यांच्या लाचलुचपतीचें कांहीं तेज पड-णार नाहीं."

याप्रमाणें **क्विन्टस**नें अनेक युक्ती योजण्याविषयीं **सिसेरो**स उप-देश केला आणि तत्कालीन राजकीय आणि सामाजिक स्थितीप्रमाणें त्या सर्व उपयुक्त होत्या; परंतु संमती देणारांचीं मनें आत्मवश क-रून घेण्याचें **सिसेरो**च्या वक्तृत्वांत जें सामर्थ्य होतें तें त्या सर्व युक्त्यांत देखील नव्हतें. त्या वर्षीं माजी * **ट्रायब्यून केयसकार्नें**-

---

* बडेलोकांकडून सामान्य वर्गाच्या लोकांवर फार जुलूम—बलात्कार होऊं लाग-ला आणि कान्सलचा अधिकार बडेलोकांच्या वर्गांतील लोकांस मिळत असल्या-मुळें सामान्यवर्गांतील लोकांचा कोणीच त्राता नाहीं असें झालें. तेव्हां त्यांनीं आपल्या संरक्षणाकरितां आपल्या वर्गांतून दोन अधिकारी निवडण्याचा आपल्यास अधिकार देणें **सेनेट**सभेस भाग पाडलें. पहिल्यानें दोन, मग पांच आणि शेवटीं दहा ट्रायब्यून निवडण्यांत येऊं लागले प्रत्येक वर्षी नवे ट्रायब्यून निवडण्यांत येत असत. पहिल्यानें त्यांचा अधिकार अगदीं मर्यादित असून सामान्य लोक संरक्षणापुरता होता, परंतु लवकरच बडे लोकांस आणि सेने

**लिस** ( Causcarneles ) याचा बचाव करण्याकरितां **फोरम** येथें भरलेल्या न्यायसभेपुढें **सिसेरोनें** जें भाषण केलें त्यायोगानें त्यास फार मोठी अब्रू मिळाली. **कॉर्नेलियस** ट्रायब्यून असतां त्यानें जो एक कायदा करण्याविषयीं सूचना केली होती तो आपण न्यायदृष्टीनें पाहिलें असतां अत्यंत न्यायपरायण होता असें आपल्यास सहज वाटतें. परंतु त्याबद्दल **सेनेट** सभेला मोठा राग आला. रोमराष्ट्रांतील मुख्य सभेच्या (योग्य रीतीनें एकत्र

---

सभेस तो फार दुःसह झाला. सामान्य वर्गाच्या लोकांच्या हक्कांचें संरक्षण करण्याच्या सबबीनें ते अमर्याद अधिकार चालवूं लागले. लोकांची सभा भरवून त्यांजकडून आपल्या इच्छेप्रमाणें कायदे करून घेऊं लागले. सेनेट सभेनें अमुक गोष्टीचा विचार करू नये, असा प्रतिबंध करूं लागले आणि सामान्य लोकांना प्रतिकूळ असा सरकारी अधिकाऱ्यांचा हुकूम तहकूब करण्याचा त्यांजकडेस अधिकार असल्यामुळें ते सेनेट सभेचे ठराव देखील रद्द करूं लागले. राष्ट्रांत कोणी अधिकाऱ्यानें राजकरणनियमांचा अतिक्रम केला ह्मणजे तर त्यांच्या सत्तेला मर्यादाच नव्हती.

कोणत्याही अधिकाऱ्याच्या वर्तनाविषयीं गुणदोषविवेचन करण्याचा त्यांस अधिकार असे. आणि त्यांस असें वाटलें कीं राष्ट्राची शांतता आतां धोक्यांत पडावयाची आहे तर ते कॉन्सल यांस देखील बंदींत ठेवीत असत. लोक त्यांचा इतका मानमरातब राखीत असत कीं, त्यांच्या शरीरास स्पर्श करणें किंवा ते भाषण करीत असतां त्यांस अटकाव करणें हें महत्पाप मानिलें होतें. असा त्यांचा जब्बर अधिकार असतां एका नियमानें त्यांची सत्ता अगदीं संपुष्टांत आणून ठेविली होती. सर्व ट्रायब्यूनचें एकमत झाल्यावांचून त्यांचा कोणताही हुकूम अगर ठराव अमलांत येऊं नये हा तो नियम. दहा ट्रायब्यूनमध्यें कांहीं तरी बुभुक्षित आणि दुराचरणी असावयाचेच. त्यांपैकीं एकास देखील सेनेट सभेनें लांच देऊन आपलासा करून घेतला ह्मणजे दुसऱ्या ट्रायब्यूनांचें कांहींच चालत नसे. ट्रायब्यून यांनीं रात्रीं नगर सोडून बाहेर जाऊं नये. त्यांनीं आपल्या घराचे दरवाजे रात्र दिवस खुले ठेवावे आणि सर्व लोकांच्या फिर्यादी ऐकून त्यांस लागलीच दाद द्यावी. असें सामान्य लोकांच्या संरक्षणाकरितां कित्येक कडक नियम केले होते. आगस्टस बादशहानें हे सर्व राजकीय अधिकार आपल्या हातांत घेतल्यापासून ट्रायब्यून निवडण्याचें बंद झालें.

जमलेल्या सर्व लोकांच्या ) मान्यतेवांचून कायद्याच्या बंधनांतून मुक्त होण्याचा कोणासही अधिकार नाहीं असें त्या कायद्याचें मुख्य तात्पर्य होतें. कोणताही कायदा विशेष समयीं तहकूब करण्याचा आपणास अधिकार आहे असें **सेनेट** सभेनें गृहीत धरून **कार्नेलियस** याची सूचना **रोमन** राजकरणनियमाविरुद्ध आहे असें ठरविलें. परंतु तो जों पर्यंत ट्रायब्यूनच्या अधिकारावर होता तोंपर्यंत त्याजवर कोणताही आरोप आणण्याची कायद्यानें मनाई असल्यामुळें त्याची अधिकाराची मुदत संपण्याची **सेनेट** सभा वाट पहात होती. त्याच्या अधिकाराची मुदत संपल्याबरोबर तिनें त्याजवर तो आरोप आणिला. आणि **सेनेट** सभेंतील मोठे नामांकित पुढारी लोक आरोपीच्या विरुद्ध खटला चालवीत होते, परंतु **सिसेरो**नें त्याचा पक्ष घेऊन त्यास दोषमुक्त केले. त्याबद्दल मोठ्या नयनिपुण लोकांनीं **सिसेरो**ची फार प्रशंसा केली व **कार्नेलियस** यानें जो कायदा करण्याविषयीं सुचना केली होती तो सामान्य लोकांच्या हिताचा असल्यामुळें त्यांनीं **सिसेरो**चा मोठा जयजयकार केला. त्यानें एका भाषणांत असें देखील बोलून दाखविलें कीं, **कार्नेलियस** यास न्यायसभेकडून दोषमुक्त करविल्या मुळे त्याचा मला कान्सलचा अधिकार मिळविण्यांत फार उपयोग झाला. आपली वक्तृत्वशक्ती आणि बुद्धि वैभव प्रगट करितां येईल अशा प्रसंगाची त्यास काय ती विशेष गरज होती. कारण वंशपरंपरेनें जे बडे लोकांच्या वर्गांतील नाहींत त्या सर्व रोमन नागरिकांपैकीं कोणासही कॉन्सल आणि सेन्सर या अतिश्रेष्ठ अधिकाराच्या दोन जागा मिळूं नये असा सांप्रदाय घालून ठेविला होता आणि सामान्य वर्गांतील लोकांपैकीं कोणी त्या अधिकाराच्या जागा मिळविण्याविषयीं प्रयत्न केला तर बडे लोक

त्याचा फार हेवा करीत असत यास्तव तो सांप्रदाय **सिसेरोस** मोडून टाकून सामान्य वर्गांतील लोकांपैकीं जो गुणानें पात्र असेल त्यास त्या जागा मिळतील असें करावयाचें होतें. परंतु सामान्य वर्गाच्या लोकांत तसा कर्ता पुरुष आहे असें सर्व लोकांच्या नजरेस आणून दिल्यावांचून तो जुना सांप्रदाय मोडणें शक्य नव्हतें. कारण एखाद्या शेतकऱ्याकडून नांगर सोडवून त्यास समाजाचें अधिपत्य देण्याचा काळ कधीच निघून गेला होता. **रोम** हें कांहीं आतां एक लहान संस्थान नव्हतें. त्याजकडे या जगावरील सर्व सुशिक्षित देशांचें स्वामित्व येत चाललें होतें. पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील सर्व देश त्यानें पादाक्रांत करून टाकिलें होतें. आफ्रिका, **ईजिप्त**, **सिरिया**, **ग्रीस**, **स्पेन**, **गाल**, **सिसिली** आणि **सार्डेनिया** ही त्याचीं मांडलिक राज्यें होतीं ; आणि तें ( रोम ) आपले कामगार नेमून इटाली देशाचा जसा कारभार चालवीत असे तसा आपल्या कामगाराकडून त्या मांडलिक राज्यांचाही कारभार करवीत असे.

**सिसेरोचे** एकार्थाभिलाषी असे कित्येक प्रतिपक्षी होते. त्यांत **क्याटिलाईन** ( Catiline ) नांवाचा एक मनुष्य होता. तो आफ्रिकेचा गव्हरनर असतां त्यानें पैशाची अफरातफर केल्याबद्दल त्याजवर आरोप आणिल्यामुळें त्यांतून मुक्त झाल्यावांचून कॉन्सलच्या अधिकाराकरितां त्यास उमेदवार होतां येत नव्हतें' आणि **सिसेरो**ची तर अशी खातरजमा होती कीं मध्यानकाळीं सूर्य कांहीं प्रकाश पाडीत नाहीं असें जर ज्यूरी म्हणूं शकेल तरच **क्याटिलाईन** हा निरपराधी आहे असें ज्यूरी ठरवूं शकेल. तथापि **क्याटिलाईन** दोषमुक्त झाला. त्याजवर खटला चालविणार **क्लोडियस** (Clodius) यानें आणि ज्यूरीनें त्याजपासून लांच घेऊन त्यास निरपराधी ठरविलें.

**सिसेरोस** एकार्थीभिलाषी सहा प्रतिपक्षी होते ते हेः—**क्याटि-लाईन** आणि **गाल्बा** ( Galba ) हे दोघे बडे लोकांच्या वर्गांतील होते. **सीआन्टोनिस** ( Ciantonius ) आणि दुसरे तिघे ( त्यांचीं नांवें सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं ) असे चार सामान्य लोकवर्गां-तील होते, ज्यांना **प्लेबियन** ( Plabeian ) म्हणत असत. परंतु **आन्टोनियस** आणि दुसरा एक हे मोठ्या घराण्यांतील असून त्यांच्या पूर्वजांनीं मोठमोठ्या अधिकाराचीं कामें केलीं होतीं. **सिसेरो** अश्वारोही घराण्यांतील असल्यामुळें त्यास आपल्या घराण्याच्या थोरपणाबद्दल बढाई मारण्यासारखें कांहीं नव्हतें. त्याच्या बाजूस ही मोठी जबर उणीव होती. सामान्य वर्गांतील मनुष्य राज्यांतील मोठ्या अधिकाराची जागा मिळविण्याकरितां पुढें सरला म्हणजे बडे लोक त्याचा फार हेवा आणि द्वेष करीत. आपले मनोरथ निष्फळ करण्याकरितां आपल्या प्रतिपक्ष्याजवळ कोणती सामग्री सिद्ध आहे हें **सिसेरोस** माहित होतें. ते फार संपन्न आणि वजनदार लोक असून संमती देणारांचा सर्व झोंक कायतो ज्यांपाशीं पुष्कळ द्रव्य आणि ज्यांना लोकांत मानप्रतिष्ठा आहे त्यांजकडे होता आणि अशा प्रसंगीं लाचलुचपत आणि दुसरीं अनेक प्रकारचीं गैरकायदेशीर साधनें निःशंकपणें प्रचारांत होतीं. दुसरें संमती देण्याचा अधिकार **रोम** नगरांतील लोकांकडेसच नव्हता. **इटालीं**तील ज्या शहरांतील लो-कांना संमती देण्याचा हक्क मिळाला होता ती लोकसंख्याही फार मोठी होती आणि **सिसेरो**च्या प्रतिपक्ष्यांना ते लोक सहज वश होतील असें होतें.

**ज्यूलीयस सीझर** ( Julius Cæsar ) आणि **क्रासस** (Crassus) यांनीं उघडपणें **क्याटिलाईन** आणि **आन्टोनियस** यांचा पक्ष घेतला.

**आन्टोनियस** फार वाईट चालीचा मनुष्य असल्यामुळें **सेन्सर*** यांनीं **सेनेट** सभेच्या सभासदांच्या पटांतून त्याचें नांव देखील काढून टाकलें होतें. **सिसेरोनें** एका भाषणांत त्या दोघांचीही फार फजिती

---

* **सेन्सर—रोमन** राष्ट्रांत **सेन्सर** ह्मणून एक कामगार असे. विशेष प्रसंगीं ह्या अधिकारावर एकापेक्षां अधिक **सेन्सर** नेमावे लागत. **सेन्सर** ह्यानें पांच वर्षांनीं मनुष्यगणति करावी, आणि लोकांच्या वर्तनावर नजर ठेवावी, हीं त्याच्या अधिकारांतील-मुख्य कामें होतीं. व मनुष्यगणति करावयाची ह्मणजे आतांप्रमाणें नुसतीं मनुष्यें मोजण्याचें काम नव्हे, प्रत्येक नागरिकाजवळ किती मिळकत आहे ह्याची चौकशी करित असत. मिळकतीची चौकशी कांहीं नुसते कर बसविण्याकरितां करीत नसत, राष्ट्रांत कोणाची किती योग्यता आहे हें जाणण्याकरितां ती चौकशी करीत असत. सेनेट सभेचे सभासद होण्यास कोण पात्र आहेत आणि कोणाकडे आतां अपात्रता आली आहे ह्याची यादी तयार करून, जे अपात्र झाले त्यांस काढून टाकण्याचा, आणि त्यांच्या जागीं दुसरे नेमण्याचा **सेन्सर** ह्यास अधिकार होता; कारण दुराचरणी मनुष्याचा सेनेट सभेंत प्रवेश होऊं देत नसत, आणि सदाचरणी कोण आणि दुराचरणी कोण हें ठरविण्याचें काम **सेन्सर** ह्याच्या पूर्ण अधिकारांतील होतें. ह्या कामगाराच्या हातांत जशी सत्ता होती तशी तर दुसऱ्या कोणाच्याही हातांत नव्हती. लोकांच्या वर्तनावर निरीक्षण करणें ह्या अधिकारबळानें त्यास पाहिजें तें करतां येत असे. त्यानें आपला अधिकार कसा चालवावा याविषयीं कांहीं कायदा नव्हता. आपल्या कर्तव्यकर्माविषयीं त्याच्या अंतःकरणाची प्रवृत्ति तोच त्याचा कायदा होता. कनिष्ठप्रतीच्या लोकांस वरिष्ठ प्रतीच्या लोकांत नेणें आणि वरिष्ठ प्रतीच्या लोकांस कनिष्ट प्रतींत टाकणें हें त्याच्या आधीन होतें. आयुष्यक्रमांतील अशी एकही गोष्ट नव्हती कीं, ती **सेन्सर** ह्याच्या निरीक्षणाखालीं यावयाची नाहीं. अपरिमित अहारविहार, आणि अनियत वर्तन यांजबद्दल, व अपयशस्कर गैरवर्तणुकीबद्दल तपास करण्याचा तर त्यास अधिकार होताच; परंतु उधळेपणानें व्यय केला, आपल्या मिळकतीची अनास्था केली, किंवा आपली जमीन चांगली लागवडीस आणली नाहीं, तर त्यास पौरजनवर्गांतून काढून टाकण्याचा देखील त्यास अधिकार होता. सगळ्या हक्कांत **रोमन** लोकांस पौरजनत्व ह्या हक्कासारखा कोणताही हक्क प्रिय नव्हता. **सेन्सर**-सारखा मोठा अधिकार एकाच मनुष्याच्या हातांत फार काळपर्यंत ठेवणें सुरक्षित नाहीं ह्मणून पांच वर्षांची मुदत अठरा महिन्यावर आणून ठेवीली होती.

उडविली. **सिसेरो** आणि **क्याटिलाईन** यांजमध्यें पुढें जें मोठें वैर माजलें त्यास त्याचें तें भाषणच मुख्य कारण झालें.

**सिसेरो**च्या बाजूस अशा अडचणी असतां आणि **सीझर**सारखे वजनदार आणि कर्ते पुरुष त्याच्या प्रतिपक्षास अनुकूळ असतांही तो इतका लोकप्रिय होता कीं संमती देणारांनीं **ब्यालोट** (Ballot) (गुप्तानुमती देण्याचें एक साधन आहे) चा उपयोग न करितां जयघोषपूर्वक त्यास कान्सल निवडिलें. ही गोष्ट ख्रिस्तीशकाच्या पूर्वीं ६३ व्या वर्षीं, **सिसेरो**चें वय ४३ वर्षांचें असतां, घडली. **क्याटि-लाईन**पेक्षां **आन्टोनियस** यास ज्यास्त मतें मिळाल्यामुळें तो **सिसे-रो**चा जोडीदार कान्सल झाला आणि बाकीच्या उमेदवारांचें तर कोठें नांव देखील निघालें नाहीं. **सिसेरो**विषयीं लोकांचा अत्यंत अनुरागच त्याच्या विजयास कारण झाला. त्याचें शुद्ध वर्तन आणि लोकोत्तर राजकीय शहाणपणा या गुणांनींच लोक त्यास वश झाले. संपत्ति, सत्ता, आणि पदवीविशिष्ट लोक त्यास प्रतिकूळ होते; विपुल द्रव्य असलें ह्मणजे बाजारांतील कोणतीही वस्तू जशी सहज विकत घेतां येते त्याप्रमाणें **सिसेरो**च्या विपक्षीय लो-कांस लोकमतें विकत घेतां येत होतीं असें असतांही **सिसेरो**चा जय झाला. त्याचा सर्व भरंवसा काय तो लोकांच्या कृतज्ञतेवर होता. व-किली करून त्यानें जो लोकानुराग संपादन केला होता, राजकीय व्यवहारांत शाहणपणा दाखवून त्यानें जें यश मिळविलें होतें आणि लोकोत्तर वक्तृत्वानें जी त्याची कीर्ति चोहोंकडे पसरली होती त्या सर्वांनीं विजयश्रीस भीड घालून तिजकडून त्याच्या गळ्यांत माळ घालविली. **रोम** येथील सामाजिक स्थिति अगदीं वाईट झाली होती. वरिष्ठ प्रतीच्या लोकांचें आचरण अगदीं दुष्ट आणि वाणी अगदीं भ्रष्ट होती. आणि पुष्कळ वर्षांपासून आपसांत कलह चालू असल्या-

मुळें समाज अगदीं नीतिभ्रष्ट झाला होता. अशा स्थितींत लाच-लुचपतीला व दुसऱ्या मोहक गोष्टींना नाकारून लोकांनीं बुद्धीचा आणि सद्गुणांचा गौरव केला यावरून त्यांचीं मनें बऱ्याच अंशीं सत्पथानुवर्ती होतीं असें कबूल केलें पाहिजे.

एकाच व्यक्तीच्या हातांत फार काळपर्यंत मोठा राजकीय अधिकार ठेवल्यामुळें अन्याय होतो, ह्मणून प्रजासत्ताक राज्याच्या नियमाप्रमाणें **सिसेरोस** कान्सलच्या अधिकाराचा उपभोग काय तो एक वर्षच घ्यावयाचा होता; परंतु तें वर्ष फार मोठ्या घडामोडींचें होतें व त्यांत मोठमोठीं राजकीय कारस्थानें उपस्थित झालीं. **म्यारीनस** आणि **शीला** यांच्या कारकीर्दींतील भयंकर दिवस निघून गेले होते तरी भ्रष्ट महाकुलीन समूह आणि बंडखोर प्रजा यांस रक्तस्राव करण्याची आणि दुराचाराची चटक लागली होती ती मागें आद्याप तशीच उरली होती. निरंकुश राज्यसत्ता आपणास प्राप्त व्हावी एतदर्थ आपला प्राण धोक्यांत घालण्यास तरुण बडे लोकांत पुष्कळ लोक तयार होते. आणि त्यांपैकींच **क्याटिलाईन** हा होता आणि ज्यांच्या सहाय्यानें आपणास ज्यास्त लाभ करून घेतां येईल त्यांना अनुसरण्यास बंडाळखोर मंडळी तयार होती. मग ते कोणी कां असेनात. असें **सिसेरोच्या** अधिकाराचें वर्ष मोठें खष्ट होतें त्यामुळें त्यास फार त्रास झाला व कित्येक वेळा त्याचें जीवित धोक्यांत पडलें. परंतु त्यांतही त्याला एक मोठा लाभ झाला तो हा कीं, आपल्या अंगीं किती कर्तृत्वशक्ती आहे हें दाखविण्याचा त्यास उत्तम समय मिळाला. **सिसेरो कान्सल** असतां जीं कांहीं अनेक कारस्थानें उपस्थित झालीं त्यांत **क्याटिलाईन** याचें कारस्थान फार प्रचंड होतें. आपणास आणि आपले सोबत्यांस **रोम** राष्ट्राचें स्वामित्व प्राप्त व्हावें यासाठीं त्यानें जो भगीरथ प्रयत्न केला तो त्याच्या कर्तृत्वाला

आणि साहसाला साजेल असा होता. तो एका मोठ्या कुळांत जन्मला होता परंतु तें कूळ अगदीं गरीबीस आलें होतें. **सिसेरोनें** त्याच्या गुणाचें जें एक चित्र काढिलें आहे तें फार मनोरम आहे. त्यावरून लोकप्रिय होण्याकरितां मनुष्यामध्यें कोणच्या गुणांची अवश्यकता लागते.—ज्याच्या योगानें **रोम** येथील तरुण लोकांपैकीं पुष्कळांचीं अंतकरणें **क्याटिलाईन** याजकडे ओढलीं होतीं, आणि त्याच्या तेजाखालीं ते दिपून जात होते, त्याचा चांगला बोध होतो.

**सिसेरोनें** त्याचें वर्णन केलें आहे तें असें—" **क्याटिलाईन** हा उत्तम गुणालंकृत होता, असें मी ह्मणूं शकत नाहीं. परंतु पुष्कळ सद्गुणांच्या त्याजवर छाया पडल्या होत्या. त्याच्या स्वभावांत असा एक दोष होता कीं त्यानें त्याला अतिशय दुष्ट विषयाचा यथेच्छ उपभोग घेण्याविषयीं चटक लाविली होती, परंतु धोक्याचें काम अंगावर घेण्याविषयीं त्याच्या उच्छाह वृत्तीला तोच दोष कारणीभूत होता. दुष्ट कामना त्याच्या मनांत सदैव वडवाग्नीप्रमाणें प्रदीप्त होत्या. युद्ध करण्याविषयीं त्याचा मनोत्साहही तसाच जबर होता. मला वाटतें कीं, अशा विजातीय स्वभावाचा दैत्य ह्या भूतलावर कधींही जन्मला नसेल. त्याच्या अभिरुची आणि कामना परस्पर इतक्या विरुद्ध होत्या कीं त्याच्या मनांत त्यांचा नेहमीं झगडा चाललेला असे. कधीं कधीं तो समाजांतील अतिशय नामांकित लोकांना परमप्रिय होत असे. कधीं कधीं तो अतिनीच लोकांशीं जिवलग मित्राप्रमाणें वागत असे. त्याच्यासारखा द्रव्यलोभी तर कधींच कोणी झाला नसेल. त्याच्यासारखा उधळेपणानें द्रव्यविनियोगही कधीं कोणीं केला नसेल. जेथें पहावें तेथें त्याचे मित्र आहेतच. आपल्या उपकारी स्वभावानें त्यानें त्यांस आपलेसे करून ठेविलें होते. आपल्या जवळ जें कांहीं असेल त्याचा त्यांस वांटा

देण्यास तो नेहमीं तयार असे. गरज लागली असतां त्यांच्यासाठीं आपलें द्रव्य व आपलें वजन खर्च करण्यांत व पराकाष्ठेचे कष्ट सोसण्यांत तो मागें पुढें पहात नसे. त्यांच्या हितासाठीं अघोर पातकांचें प्रयोजन पडलें तर तेंही करण्यास तो कांकूं करीत नव्हता. आपला नैसर्गिक स्वभाव बदलून जिकडून वारा वाहील तिकडे पाठ करण्याची त्याच्या मनामध्यें शक्ती होती. गंभीर बुद्धीच्या लोकांबरोबर तो विनयानें वागत असे. गुलहौशी लोकांचा तर तो एक जिवलग दोस्त होता. आपल्याहून जे वडील होते त्यांचा तो मान राखीत असे. तरुण लोकांचा तर तो परम आवडता खेळगडी होता. जिवावर उदार झालेल्या लोकांत तो पराकाष्ठेचा साहसकर्मी होता. असे त्याच्या स्वभावांत चांगले आणि वाईट अनेक रंग होते. त्या योगानें त्यानें पुष्कळ, दुष्ट आणि साहसी लोक आपल्या भोंवताली गोळा केले होते. इतकेंच नाहीं तर सदाचाराचें सोंग घेऊन शूर आणि सज्जन लोकांचीं मनेंही हरण करून घेतलीं होतीं. त्याच्या तमोगुणाचा त्याच्या त्या हृदयंगम सद्गुणाशीं योग झाला नसता तर सर्व लोकसत्ताक राज्यावर महापापरूप धाड घालण्याचा कट रचणें हें त्यास सर्वथैव अशक्य झालें असतें."

**क्याटिलाईन** आणि **सिसेरो** हे एकाच वर्षांत जन्मले होते व कान्सलचा अधिकार आपणास मिळावा याविषयीं दोघांची उत्कट इच्छाही सारखीच होती. **क्याटिलाइन** याची इच्छा सफळ न झाल्यामुळें तो **सिसेरो**चा अति द्वेष करूं लागला हें पूर्वी सांगितलें आहे. कुशील, महत्वाकांक्षी, आणि ज्यांच्या आंगीं कांहीं कर्तृत्व शक्ती असते ते आपल्यापेक्षां ज्यांची बुद्धिमता ज्यास्त असते, ज्यांना लोक फार चाहातात आणि ज्यांचें आचरण पवित्र असतें अशा एकार्थाभिलाषी प्रतिपक्षाचा नेहमीं द्वेष करीत असतात. **क्याटिला-**

**इनचें** राज्याची उलटापालट करण्याचें कारस्थान रंगारूपास आलें तेव्हां त्यास असें वाटलें कीं, आतां रोम राज्याच्या प्राक्तनांत मजखेरीज दुसरा स्वामी नाहीं. त्यानें आपल्या भोंवती तरुण बडे लोकांची जी मंडळी एकत्र केली होती ती सर्व त्याच्याप्रमाणेंच उधळी आणि कर्जबाजारी होती, व त्यास सामील झालेले सामान्य वर्गांतील लोक भुकेबंगाल आणि निःशंक होते.

**इटाली** देशांतील त्याचे पक्षपाती त्याच्यासाठीं फौज गोळा करीत होते. गुप्त माऱ्यानें प्राण घेणें, कर्जबाजाऱ्यास सावकाऱ्याच्या ऋणापासून जबरीनें मुक्त करणें आणि लोकांच्या मिळकतीचा अपहार करणें हीं त्या कारस्थानांतील प्रारंभींचीं कर्में होतीं. आणि त्या वर्षासाठीं निवडलेले **कान्सल** यांस मारून राज्यसत्ता आपल्या हातांत घ्यावी हें त्या कारस्थानाचें प्रधान कर्म होतें. दुसऱ्या वर्षाचे कान्सल निवडण्याकरितां सभा जमेल तेव्हां पहिल्या कान्सलनां मारून टाकावें असा संकेत ठरला होता व त्याकरितां मारेकरीही तयार करून ठेविले होते; परंतु **क्याटिलाईन**च्या उतावळीमुळें तें कारस्थान उघडकीस आलें, आणि नव्या कान्सलची निवडणूक करण्याचें काम लांबणीवर टाकण्यांत येऊन जेव्हां नवी निवडणूक झाली तेव्हां **सिसेरो** आपणावरील प्राणसंकट आपणास माहीत झालें आहे हें दाखविण्याकरितां अंगांत कवच घालून सभेंत आला होता, आणि त्याच्या संरक्षणाकरितां तें सगळें सभास्थान सामान्य वर्गांतील लोकांच्या जोरावर फौजेनें पूर्वींच वेढून टाकिलें होतें, यामुळें **क्याटिलाईन**चा सर्व बेत फसला, आणि **कान्सल** निवडण्याचें काम शांतपणें शेवटास जाऊन दुसऱ्या वेळेसही **क्याटिलाईन** नाकारला गेला, यामुळें तो आतां अतिशय चिरडीस गेला. त्याच रात्रीं त्यानें आपल्या कटांतील लोक एकत्र करून त्यांच्या विचारानें **रोम** नगरास आग

लावून जाळून भस्म करावें आणि शस्त्रानें लोकसंहार करावा असा बेत केला; परंतु अगोदर **सिसेरो**चा प्राण घेतल्यावांचून कांहीं आपलें कोणतेंही कर्म आपणास लाभास्पद व्हावयाचें नाहीं अशी **क्याटि-लाईन** याची पूर्ण खातरी होती, सबब त्यास मारून टाकण्याकरितां त्यानें पुनः दोन मारेकरी उभे केले. **रोमन**लोकांच्या सांप्रदाया-प्रमाणें त्यास सन्मान देण्याच्या निमित्तानें त्यांनीं प्रातःकाळीं त्याच्या घरीं जाऊन त्याचा वध करावा असा संकेत ठरला होता. परंतु त्या कुटांतील लोकांपैकीं एकाच्या **फुलविया** नांवाच्या उप-स्त्रीस तें वर्तमान समजल्यावरून तिनें तें **सिसेरोस** कळविल्यामुळें **क्याटिलाईन** याचा **सिसेरो**चा प्राण घेण्याचा दुसराही प्रयत्न निष्फळ झाला. संकेताप्रमाणें ते मारेकरी अगदीं पहाटेस **सिसेरो**-च्या घरीं गेले तों त्याचे सर्व दरवाजे बंद असून चवकीपाहाऱ्याचा चांगला बंदोबस्त असल्यामुळें त्यांचा आत प्रवेश झाला नाहीं.

आतां मात्र **सिसेरोची** पूर्ण खात्री झाली कीं **क्याटिलाईनचे** पूर्णपणें पारिपत्य केल्यावांचून कांहीं राष्ट्राची शांतता आणि आपलें जीवित सुरक्षित राहणार नाहीं. यास्तव **सेनेट** सभेचा विचार घेण्याकरितां त्यानें **प्यालेटाइन**च्या टेंकडीवरील ज्युपिटरचे मंदिरांत **सेनेट** सभा भरवून त्या कारस्थानाची साद्यंत हकीकत सभेस नि-रूपण केली. **क्याटिलाईन** याचें धारिष्ट फार विलक्षण ! तो स्वतः त्या सभेंत गेला. तेथें त्याच्याशीं कोणी भाषण-तर केलें नाहींच. पण तो आपल्या जागेवर येऊन बसला तेव्हां त्याच्या जवळचे **सेनेटर** तो मंचक सोडून दुसरीकडे जाऊन बसले. **सिसेरो** आपल्या भाष-णाचा उपसंहार करतांना ह्मणालाः—

" यास्तव ह्या कारस्थान्यास ( **क्याटिलाईन** ) एकदम आप-

त्या पक्षास जाऊन मिळूंद्या; त्यास प्रामाणिक नगरवाश्यांपासून एकदम विभक्त होऊंद्या आणि दुसऱ्या कोणत्याही स्थळीं त्यास व त्याच्या संगनमत्यांस जमूंद्या. आणि मी वारंवार म्हटलें आहे त्याप्रमाणें त्यास आपल्यापासून वेगळा होऊंद्या. कान्सल यांस स्वतःच्या घरांत मारेकरी यांजकडून मारवावयाचें, न्यायसभांना हत्यारबंद लोकांकडून भयप्रदर्शन करावयाचें, नागव्या तरवारींच्या शिपायांकडून **सेनेट** सभेला वेढा घालावयाचा आणि आपलें नगर जाळून भस्म करण्याकरितां लौकर पेट घेणारे पदार्थ गोळा करावयाचे हीं त्याचीं कारस्थानें फार काळपर्यंत चालूं देऊं नका. निदान **रोमन** लोकांत राजनिष्ठ कोण आहेत आणि कोण नाहींत हें प्रत्येकाच्या मुखश्री-वरून आपण जाणूं या. **सेनेट** सभासदहो, मी तुम्हांस असें अभिवचन देतों कीं तुमच्या कान्सलच्या परिश्रमांत किंचित देखील उणीव पडणार नाहीं आणि मला असा विश्वास आहे कीं तुमच्या स्वतःच्या निग्रहांत, **रोमन** बडे लोकांच्या उत्साहांत आणि सर्व प्रामाणिक लोकांच्या एकोप्यांतही उणीव पडणार नाहीं. **क्याटेला-ईन** एकदां आपल्यामधून निघून गेला ह्मणजे प्रत्येक गोष्ट उघड-कीस आणि उजेडांत येईल इतकेंच नाहीं, पण त्याचीं सर्व कारस्थानें निर्मूळ करून टाकितां येतील. त्याचें धारिष्ट तरी किती विलक्षण आहे तें पहा! अत्यंत दुष्ट कारस्थानें रचूनही तो निरपराधी मनुष्या-प्रमाणें **सेनेट** सभेंत आला आहे आणि राष्ट्राच्या कारभारांत वाटाघाट करीत आहे."

नंतर **क्याटिलाईन** याजकडे वळून त्यास ह्मणाला, "**क्याटिलाईन**, तुझ्या दुष्टाचरणाबद्दल तुझें चांगलें पारिपत्य करावें अशी आमची हिंमत आहे आणि तें आमचें कर्तव्यकर्म आहे. आमच्या क्षमाशील स्वभावाचा अतिक्रम करून तूं किती वेळपर्यंत टिकाव धरून राहशील? आम-

च्यापुढें तुझा उन्मत्तपणा किती दिवस चालेल? तुझीं सर्व कारस्थानें आह्मांस समजलीं आहेत असें तुझें मन तुला सांगत नाहीं काय? येथें जमले आहेत त्या सर्वांस तुझीं सर्व कारस्थानें कळून चुकलीं आहेत असें तुला वाटत नाहीं काय? गेल्या रात्रीं आणि तिच्या पूर्व रात्रीं तूं काय केलेस, तूं होतास कोठें आणि ज्या लोकांशीं तूं सल्लामसलत केलीस ते कोण होते, ह्या गोष्टी या मंडळीपैकीं कोणास माहीत नाहींत असें तूं समजतोस? मी तुला आज्ञा करितों कीं, तुझीं अपवित्र आणि दुष्ट कर्में सिद्धीस नेण्याकरितां तूं येथून निघून जा. राष्ट्राचा तरणोपाय, तुझा स्वतःचा पराभव आणि नाश व तुझ्या दुष्कर्माचे आणि फितुराचे जे सोबती आहेत त्यांची वाताहत होण्याकरितां तूं नीघ येथून, चालता हो कसा. 'हे जुपिटर प्रभो, जेव्हां **रोमलसनें** हें नगर वसविलें तेव्हांपासून आम्ही **रोमन** लोक तुझी भक्तिभावानें पूजा करीत आहोंत. तुला आम्ही आमच्या नगराचा आणि राष्ट्राचा स्वामी मानतों, यास्तव तूं आपल्या स्वतःच्या यज्ञवेद्या, तुझे गोत्रज देव यांचीं मंदिरें, आमचीं घरेंदारें, आमच्या नगरवासी लोकांची संपत्ती आणि प्राण यांचें, तो पलिकडे उभा आहे त्याजपासून आणि त्याच्या कुकर्माचे सोबती यांजपासून संरक्षण कर. ते सर्व सज्जनांचे वैरी आहेत. ते आपल्या देशावर धाड घालणारे असून **इटाली** देशाचे लुटारू आहेत. ते पापकर्में आणि लुच्चेगिऱ्या करण्याकरितां एकत्र जमले आहेत. तूं खचित त्यांस असें शासन करशील कीं तें कधींही संपणार नाहीं."

**क्याटिलाईन** याचें धारिष्ट खरोखर फार विलक्षण होतें. ज्या मंचकावर तो बसला होता त्या मंचकावरून दुसरे सभासद उठून गेले तरी तो एकटाच त्याजवर बसून राहिला होता. **सिसेरोचें** भाषण संपल्यावर उत्तर देण्याकरितां तो उठून उभा राहि-

ला, आणि बळेंच ओढून आणिलेल्या नम्र वाणीनें आपण निरपराधी आहों असें प्रतिज्ञा करून सांगितलें. 'मी प्राचीन आणि मोठ्या कुळांतील असतां एका परकीय मनुष्याच्या—**सिसेरोस** तो तिरस्कार पूर्वक परदेशस्थ म्हणत असे—शब्दावर भरंवसा ठेवून माझ्या दरजाच्या बडेलोकांनीं विचार केल्यावांचून मला अपराधी ठरविणें योग्य आहे काय ?' असे शब्द त्याच्या मुखांतून निघाले न निघाले तोंच चोहोंकडून 'राजद्रोही,' 'पितृघातक' या शब्दांची ओरड झाल्यामुळें त्याचें बोलणें कोणाच्या श्रवणीं पडेना. तेव्हां तो त्वेषानें **सेनेट** सभेंतून बाहेर पडला आणि त्याच दिवशीं ऐन आंधाऱ्या रात्रीं नगर सोडून निघाला. आणि त्याचा साथी **म्यॉनलियस** बंडखोर लोकांच्या सैन्यासह छावणी देऊन राहिला होता-तेथें त्यास जाऊन मिळाला.

दुसऱ्या दिवशीं सर्व लोकांची सभा भरवून त्यांस **सिसेरोनें** पूर्व दिवशीं **सेनेट** सभेंत घडलेली सर्व हकीकत कळविली आणि आपण **क्याटिलाईन** यास आपल्या हातांतून कां जाऊं दिलें याचीं कारणें सांगितलीं. त्याचें एकदम पारिपत्य केलें असतें तर त्याच्या कारस्थानांत दुसरे लोक सामील होते त्यांचा पत्ता लावतां आला नसता हें एक कारण त्याच्या सांगण्यांत आलें आहे. त्या वेळची राजकीय स्थिति चांगली अवगत असल्यावांचून **क्याटिलाईन** यास सुरक्षित जाऊं देण्यांत गुणदोष काय होते याचें विवेचन आपल्याच्यानें करवत नाहीं. बंडांतील मुख्य नायकास त्याचेसाठीं जमा झालेल्या सैन्यांत जाऊन मिळूं देणें आणि मग त्याचें पारिपत्य करण्याविषयीं तजवीज करणें हें राजकीय शहाणपणाला विसंगत दिसतें. परंतु **सिसेरो**सारख्या मुत्सद्याचे ते डावपेंच असल्यामुळें त्याबद्दल आपण त्यास दोष देण्यास पात्र नाहीं.

**क्याटिलाईन** नगर सोडून गेल्यावर त्याच्या संगनमत्यांनीं एक नवेंच कूट रचिलें त्या समयीं गाल देशाजवळील एका प्रदेशाचे कांहीं वकील लोक **रोम** येथें होते. कोणत्याही निमित्तानें त्यांच्या द्वारें **गाल** देशांत लढाई उपस्थित केली असतां आपला उद्देश सिद्धीस नेण्यास सुलभ पडेल असें त्यांस वाटून त्यांनीं एका मनुष्याच्या द्वारें आपला हेतू त्या वकिलांस कळविला आणि आपल्या कारस्थानाची एकंदर हकीकतही त्यांस सांगितली. त्या वकील लोकांच्या मनांत पहिल्यापासून **क्याटिलाईन**च्या मिलाफ्यांस फसवावयाचें होतें किंवा मग त्यांस भय वाटलें म्हणून किंवा **सेनेट** सभेची कृपा संपादन करण्याकरितां त्यांनीं ती गोष्ट उघडकीस आणिली हें कांहीं निश्चयानें सांगवत नाहीं. परंतु त्या वकिलांनीं **रोम** येथें त्यांचा एक पुरस्कर्ता होता त्यास तें सर्व वर्तमान सांगितलें आणि त्यानें तें तत्काळ **सिसेरोस** कळविलें.

**सिसेरो**च्या मसलतीप्रमाणें आपण जसे काय मनापासून त्या कारस्थानांत सामील होण्यास तयार आहोंत असें दाखवून त्या वकिलांनीं त्या लोकांपासून कांहीं लेखी दस्तैवज मिळविले. त्यांपैकीं दोन लेखांच्या कव्हरांवर **लेन्टलस** आणि **सेथेगस** ( Cethegus ) यांच्या नांवाचे प्रत्यक्ष शिक्के होते. आपण होऊन दगाबाजीनें हें कारस्थान उघडकीस आणिलें नाहीं, हें दाखविण्याकरितां ते वकील एका रात्रीं **क्याटिलाईन** यास भेटण्याकरितां जातों ह्मणून **रोम नगर** सोडून निघाले. कारस्थानी लोकांपैकीं **व्हलटरशियस**ही त्यांजबरोबर होता; आणि **सिसेरोचे** शिपाई संकेत ठरल्याप्रमाणें त्यास धरावयास गेले तेव्हां त्या वकील लोकांनीं लटका आवेश आणून तरवारी देखील उपसल्या. वकील लोकांस दस्तैवजासह **सिसेरो**च्या घरीं धरून

आणिऱ्याची बातमी सगळ्या **रोम** नगरांत एकदम पसरली आणि हें प्रकरण आहे तरी काय हें जाणण्याकरितां जिज्ञासु लोकांचे थवे त्याच्या घराभोंवतीं गोळा झाले.

**सिसेरो**नें लागलीच **सेनेट** सभा भरवून त्या कारस्थानांतील मुख्य **ग्याबीनीयस** (1 Gabinius.) **स्टॅटीलियस** (2 Statilius.) **लॅंट्युलस** (3 Lentulus.) आणि **सेथेगस** (4 Cethegus.) या चार असामींस आपल्या घरीं बोलावून आणिलें आणि त्याच वेळेस त्या वकिलांच्या सूचनेवरून त्यानें **प्रीटर सल्पिसियस** (Sulpicius) याजकडून **सेथेगस** याच्या घराचा झाडा घेतला तों तेथें युद्ध करण्याकरितां तयार करून ठेविलेल्या शस्त्रांचा मोठा सांठा सांपडला.

**सेनेट** सभा कांकॉर्ड * (Concord) च्या मंदिरांत एकत्र होऊन **सिसेरो**ची वाट पाहत होती. ते चार मुख्य कारस्थानी आणि ते वकील यांस आपल्या बरोबर घेऊन तो आपल्या घराहून निघाला. रस्त्यांतून जात असतां त्याच्या भोंवती लोकांची फार गर्दी झाली होती, आणि त्याच्या संरक्षणाकरितां नगरवासी जनांचा त्याच्या भोंवती वेढा पडला होता. तो **सेनेट** सभेजवळ येऊन पोंहचला तेव्हां तो हर्षानें फुगला आहे आणि राजद्रोही लोकांचें आतां आपल्यास यथास्थित पारिपत्य करितां येईल असें त्यास वाटत आहे, असें त्याच्या मुखश्रीच्या टवटवीवरून चतुर लोकांस कळून आलें. **सेनेट** सभेचें संरक्षण करण्याकरितां आटीकस याच्या सरदारीखालीं नाईट पदवीच्या हत्यारबंद लोकांनीं तें मंदिर वेष्टिलें होतें. लॅंट्युलस

---

* शांतता आणि ऐक्य याची एक मानलेली देवता.

आणि **सेथेगस** हे दोघे **सेनेटर** असल्यामुळें त्यांना बरोबर घेऊन **सि-सेरो सेनेट** सभेंत शिरला, आणि बाकीचे सर्व लोक बाहेर ठेविले. **सेनेट** सभेंत जें कांहीं निवेदन करावयाचें होतें तें करून त्यानें प्रथ-म **व्हल्टरासियस** यास सभेंत बोलावून सभेच्या आज्ञेनें तो जर खरा मजकूर सांगेल तर त्यास माफी देण्यांत येईल असें त्यास वच-न दिलें, व तें त्यानें स्वीकारून सर्व हकीकत सांगितल्यावर त्या वकीलांस सभेंत बोलावून आणून त्यांचा सर्व वृत्तांत ऐकून घेतला आणि मग **सेथेगस** यास त्याचें पत्र दाखविलें. तें जसेंच्या तसेंच होतें. त्याजवरची सील मोडली नव्हती किंवा दोरा कापला नव्हता. **सेथेगस** यानें आपली सील कबूल केल्यावर त्याच्या समक्ष तें पत्र फोडून वाचिलें. त्यांत त्या कारस्थानाविषयीं स्पष्टपणें मजकूर लि-हिला होता. शस्त्रांचा संग्रह करण्याचें प्रयोजन काय, असें पूर्वी त्यास विचारलें तेंव्हां चांगल्या शस्त्रांचा संग्रह करण्याचा मला छंद आहे असें त्यानें धीटपणाचें उत्तर दिलें, परंतु त्याचें पत्र त्यास दाखविल्याबरोबर तो घाबरून उगीच बसला.

**सेन्टलस** यास त्याचें पत्र दाखविल्यावर त्यानेंही तें आपण लि-हिलें आहे असें कबूल केलें. त्यांतही त्या कारस्थानाविषयीं मज-कूर लिहिला होता. **ग्याबिनियस** आणि **स्टॅटीलियस** यांनींही आपण त्या कारस्थानांत होतों असें कबूल केलें.

**सिसेरोचे** आज्ञेवरून त्या कुटांतील आणखी दुसरे पांच असा-मी धरण्यांत आले. सर्व अपराध्यांस कैद करून बंदोबस्तानें निर-निराळ्या स्थळीं ठेविल्यावर व त्या वकिलास व **व्हल्टरासियस** यांस बक्षिसें देऊन त्यांचा संतोष केल्यावर दुसरे दिवशीं त्या अपराध्यां-चें आतां पुढें करावयाचें काय याचा विचार करण्याकरितां **सेनेट**

सभा भरली. **सिसेरोनें** पुढच्या वर्षाकरितां निवडलेला **कॉन्सल सिल्यानस** यास पहिल्यानें बोलावयास सांगितलें; आणि त्यानें असा अभिप्राय दिला कीं त्या सर्व अपराध्यांस देहान्त शासन करावें. नंतर **जूलियस सीझर** यानें एक लांब भाषण करून देहांत शासनाखेरीज दुसरें कोणतेंही शासन त्या अपराध्यांस योजिलें असतां आपण आपली संमती देऊं असें सांगितलें. **सिसेरोनें** भाषण केलें त्यांत दोन्ही प्रकारच्या शासनांत सदसद्विचाराचा आणि न्यायाचा भाग आहे असें सांगून सभा जें शासन करावयाचें ठरवील तें अमलांत आणण्यास आपण तयार आहों असें बोलला; पण त्यानें एवढें मात्र निक्षून सांगितलें कीं जो कांहीं ठराव करावयाचा तो फार लौकर केला पाहिजे. तो ह्मणाला, हा प्रश्न असा महत्वाचा आहे कीं, **सेनेट** सभा, रोमन लोक, त्यांचीं बायकामुलें, त्यांच्या यज्ञवेद्या, त्यांच्या देवमूर्ती आणि मंदिरें, त्यांचें रोम नगर आणि त्यांचा इटालीदेश, त्यांचें स्वातंत्र्य आणि त्यांचें सार्वभौम आणि प्रजासत्ताक राज्य या सर्वांचा सुरक्षितपणा या प्रश्नाच्या झटपट निकालावर अवलंबून आहे. **सेनेटर**पैकीं पुष्कळ लोक **सीझरच्या** मतास अनुकूल होते. परंतु **पोर्सीयस क्याटो** ( Porcious Cato ) यानें जेव्हां भाषण केलें तेव्हां त्या वादाचा सगळा रोख बदलला. ज्यापेक्षां त्या अपराध्यांनीं देहांत शासनास योग्य असा अपराध केला आहे, त्यापेक्षां त्यांस देहांत शासनच योग्य आहे असें त्यानें प्रतिपादन केलें.

त्याच्या भाषणानें अपराध्यांच्या प्रारब्धाचा निकाल लागला. **सेनेट** सभेनें वकील लोकांजवळ ज्यांचीं पत्रें सांपडलीं त्या चार असामीस व पांचवा शिपारियस यांस देहांत शासन करण्याचा ठराव केला आणि तो ठराव **सिसेरोनें** तत्काळ अमलांत आणिला. पण तसें करण्यांत **सिसेरोनें** मोठी चूक केली.

इतकेंच नाहीं पण त्यानें एक मोठें पाप केलें असें कित्येकांचें ह्मणणें पडलें आहे. **रोमन** राष्ट्राच्या कायद्याप्रमाणें त्या अपराध्यांस न्यायसभेपुढें उभे करून सांप्रदायशुद्ध न्याय करावयाचा होता. सेनेट सभेस कायदेशीर काम चालविल्यावांचून अपराध्यांस देहांत शासन करण्याविषयीं हुकूम देण्याचा मुळींच अधिकार नव्हता ; कारण ती कांहीं न्यायाचें कोर्ट नव्हती. कानसल यास देहांत शासन करण्याचा अधिकार होता, परंतु त्यानें त्याबद्दल सेनेट सभेची परवानगी मागितल्यामुळें तो अधिकार त्यानें सोडून दिला असें होतें आणि ह्मणून त्या अपराध्यांचा न्याय कायद्याप्रमाणें न्यायसभेपुढेंच झाला पाहिजे होता; असा कायद्याचा यत्किंचित अतिक्रम देखील ज्यांस खपत नाहीं त्यांचा अभिप्राय आहे. परंतु सदसद्विचार करून पाहतां **सिसेरोस** त्याबद्दल दोष देण्यासारखें वर्तन त्याजकडून झालें नाहीं. त्या अपराधी मनुष्याच्या अपराधाविषयीं संशय घेण्यास मुळींच जागा नव्हती, आणि त्यांपैकीं बहुतेकांनीं तर आपले अपराध कबूल केले होते, व त्याबद्दल त्यांचे हातचे दस्तैवज **सिसेरोचे** हातीं आले होते. त्या काळीं सगळ्या **रोमनराष्ट्रांत क्याटो**सारखा नीतिमान पुरुष नव्हता. त्यानें देखील **क्याटिलाईन**चें कारस्थान दाबून टाकण्याकरितां सक्त उपायांची वेळेवर योजना केल्याबद्दल **सिसेरोची** तारीफ केली आहे. अतां ही गोष्ट खरी आहे कीं, **सिसेरोच्या** शत्रूंस तें एक छिद्र सांपडलें, आणि अपराधी लोकांच्या देहांतशासनाबद्दल ज्यांचीं मनें होरपळलीं होतीं असें **रोम** येथें पुष्कळ लोक होते, व तें प्रतिक्रियेच्या समयाची वाट पहात होते, व त्यांचा संकल्पही पुढें सिद्धीस गेला; परंतु तेवढ्यावरून **सिसेरो** अपराधी होता असें कांहीं मानतां येत नाहीं.

या कारस्थानाचा पसारा फार मोठा होता. जास्त चवकशी केली

असतां आणखी पुष्कळ लोक आणि सेनेट सभेंतील कित्येक सभासदही या कारस्थानांत सामील होते असें दृष्टोत्पत्तीस आलें असतें. प्रत्यक्ष **ज्युलियस सीझर** व **क्रासस** यासारखे पुरुष देखील त्या कारस्थानांत होते असा संशय आला होता; परंतु **सिसेरो**नें त्याबद्दल कांहीं जास्त चवकशी केली नाहीं. अपराध्यांस शासन केल्यावर **सिसेरोस** असें वाटलें कीं, आतां आपण आणि प्रजासत्ताक राज्य सर्व भयापासून मुक्त झालों आणि त्याच्या भोंवतालीं जो मोठा जनसमुदाय एकत्र झाला होता त्यानेंही त्याबद्दल त्याची स्तुति केली. सारांश, तूर्त सर्व कांहीं चांगलें झालें. **सिसेरो**च्या कडक उपायानें जिकडे तिकडे स्थीरस्थावर झाली, व दुष्ट लोक भयत्रस्त होऊन सज्जनांस धीर आला.

आतां आपण **क्याटिलाइन** याजकडे वळूं. आपल्यामागें **रोम** नगरीं घडलेल्या सर्व गोष्टींचें वर्तमान ऐकून त्यानें आपल्या वीस हजार फौजेसह गालदेशांत जाण्याचा निश्चय केला. परंतु **मीटर मेटलस** याच्या फौजेनें तिकडे जाण्याचा त्याचा रस्ता अडवून धरल्यामुळें त्याचा तो बेत सिद्धीस गेला नाहीं. त्याचा पराजय करण्याकरितां **रोम** येथून जें सैन्य निघालें होतें त्याचें अधिपत्य **सिसेरो**चा सोबती **कानसल अंटोनियस** यानें स्वीकारिलें होतें. परंतु त्याच्या मनांत **क्याटिलाइन**चा नाश करावा असें नव्हतें. कारण पूर्वी तो त्याचा मित्र होता व **कानसल**चा अधिकार मिळविण्याच्या कामांत ते उभयतां एकविचारानें वागत होते. आपले मनोगत सिद्धीस नेण्यास **आंटोनियस** यास यदृच्छेकरून एक निमित्तही सांपडलें. आपणास संधिवायूची लहर आली आहे असें ह्मणून त्यानें आपला अधिकार आपल्या हाताखालचा लेफ्टनंट जनरल **पेट्रीयस**

यास दिला. हा सरदार मोठा अनुभवी आणि शूर होता, व त्यानें आपलें कर्तव्यकर्मही आपल्या नांवलौकिकाप्रमाणें शेवटास नेलें.

दोन्हीं सैन्यें एकत्र होऊन मोठी निकाराची लढाई झाली. **क्याटिलाईन**च्या सैन्यांत गुलाम आणि बाजारबुणगें खेरीजकरून जे लोक होते ते सगळे धीट, शूर, आणि जिवावर उदार झालेले होते; व ते सर्व प्राण जाईपर्यंत सिंहाप्रमाणें लढले व दोन्ही पक्षांच्या सैन्याचा नाशही फार झाला. **क्याटिलाईन** यास जेव्हां असें वाटलें कीं आज विजयश्री आपल्यास पाठमोरी झाली आहे, तेव्हां तो शत्रूच्या सैन्याची जेथें अतिशय दाटी होती तेथें शिरून आपला देहपात होईपर्यंत निकरानें लढला. त्याच्या अंगीं जे सद्गुण होते त्यापैकीं धैर्यानें आणि शौर्यानें तर त्यास शेवटपर्यंत सोडलें नाहीं. तो फार उंच असल्यामुळें प्रेतांच्या ढिगांतून सहज ओळखून काढतां आला. त्या वेळेस त्याच्या देहांत उगीच कांहींशी धुगधुगी होती, पण मरणसमयीं देखील त्याच्या मुखश्रीवरील शौर्यतेज लोपलें नव्हतें.

आतां आपण थोडें मागें वळूं. **क्याटिलाईन**चें कारस्थान अगदीं रंगारूपास येऊन त्यापासून अत्यंत भयंकर परिणाम घडून येण्याचा समय अगदीं जवळ येऊन ठेपला होता. त्याचे मारेकरी **सिसेरो**चा प्राण घेण्याकरितां त्याच्या मागें फिरत होते, आणखी अनेक राजकारणांमध्यें **सिसेरो**चें मन निमग्न झालें होतें. अशा समयीं रोमन राष्ट्राच्या कारभाराचा आपल्या डोकीवरील सर्व भार एका बाजूस ठेऊन केवळ निष्काळजी मनुष्याप्रमाणें **सिसेरो**नें एका मोकदम्यांत आपल्या मित्राचा बचाव करण्याकरितां न्यायसभेपुढें जें भाषण केलें आहे त्यावरून त्याच्या दृढनिश्चयांत,

समयसूचकतेंत, त्याच्या रसिकतेंत, आणि त्याच्या विनोदी वृत्तींत कांहीं देखील फरक पडला नव्हता असें आपल्यास दिसून येतें.

त्या मोकदम्याचें स्वरूप असें होतें कीं, मोठीं कज्जाभांडणें होऊन **लुसियसम्युरेना** आणि **डेसिमस सिलॅनस** हे दोघे पुढच्या वर्षांकरितां कॉन्सल निवडल्यावर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांपैकीं **सर्व्हियस सल्पीशियस** यानें **म्युरेना** याजवर असा आरोप आणिला होता कीं, त्यानें लांचलुचपत देऊन व दुसऱ्या अयोग्य साधनांनीं संमति देणारांचीं मनें रंजन करून त्यांस आपलेसें करून घेतलें, आणि रोमन राष्ट्राच्या कायद्याप्रमाणें तसें करणें गैरकायदेशीर आहे, असें त्याचें ह्मणणें होतें. **सर्व्हियस** हा एक विख्यात बॅरिस्टर असल्यामुळें तो मोकदमा त्यानें स्वतः चालविला होता; व **एमक्याटो, पोस्टमियस,** आणि **सर्व्हियस** याचा मुलगा हे तिघे त्यास मदतगार होते. **म्युरेना**च्या बाजूस **हार्टेनासियस, क्रासस** आणि **सिसेरो** हे तिघेजण विख्यात बॅरिस्टर होते.

**म्युरेना** एक तर बेअब्रूचा मनुष्य आहे. दुसरें, दुसऱ्या उमेदवारांशीं त्याची तुलना करून पाहिली असतां तो कॉन्सल निवडण्यास अपात्र आहे; आणि तिसरें, त्यानें लांचलुचपत देऊन आपल्या तर्फे मतें मिळविलीं आहेत. अशा तीन मुख्य मुद्यांवर फिर्यादीचा मुख्य कटाक्ष होता, व त्याच क्रमानें फिर्यादीनें मोकद्दमा चालविला होता; व **सिसेरा**नें जीं उत्तरें दिलीं तीं सुद्धां तोच क्रम धरून दिलीं. **म्युरेना** आणि **सार्व्हियस** यापैकीं कॉन्सलच्या अधिकारास जास्त पात्र कोण ह्याविषयीं **सिसेरो**नें व्याख्या करितांना परिहासोक्तीनें बॅरिस्टरच्या धंद्याचा अगदीं उपहास करून शिपाईगिरीच्या धंद्याची फार स्तुती केली आणि **म्युरेना** यानें एशियामायनरमध्यें

मोठ्या लढाया मारून यश संपादन केलें आहे, यास्तव कॉन्सलच्या अधिकारास तोच विशेष पात्र आहे असें प्रतिपादन केलें.

**क्याटो** हा अत्यंत नीति परायण आणि स्टोईक मताचा निःसिम भक्त होता. उगीच कोणी कावळ्याची मुंडी मुरगळली तर तें कर्म देखील पितृहत्येसमान पातक आहे असें तो मानीत असे; आणि लोकांची संमती मिळविण्याकरितां उमेदवारांना ज्या अनेक तऱ्हा कराव्या लागत असत त्यांत कांहीं अशाही होत्या कीं, संमती मिळविण्याकरितां गैरकायदेशीर वर्तन केल्याचा दोष त्यांजवर आणितां यावा; तेव्हां **क्याटो**सारख्या नीतिमान सत्पुरुषास त्या खपतात कशा? **म्युरेना** जेव्हां कॉन्सलच्या अधिकाराकरितां उमेदवार होऊन रोमनगरीं परत आला तेव्हां हजारों लोकांच्या झुंडी त्यास भेटावयास नगरा बाहेर गेल्या होत्या. अर्थात त्यानें त्यांचीं मन-धरणी केली ह्मणून तें त्यास भेटावयास गेले असा **म्युरेना**वर **क्याटोनें** दोष आणिला. "**सिसेरो** म्हणाला, यांत सांप्रदायाविरूद्ध कांहींच नाहीं. लोक जर त्यास भेटावयास गेले नसते तर ती गोष्ट मात्र विस्मयकारक झाली असती." "**क्याटो** ह्मणाला, पण त्याच्या पक्षांतील लोक तो रस्त्यांतून जात असतां वरातीप्रमाणें त्याच्या मागून चालले होतें त्याचें प्रयोजन काय? **सिसेरो** ह्मणाला, यांत काय! त्यावरून त्या लोकांस लांच दिला होता असें शाबीत होतें काय? तसें होत असेल तर मी कबूलकरितों कीं, **म्युरेना** अप-राधी आहे. तसें जर शाबीत होत नाहीं तर लोक त्याच्या मागें चालले ह्मणून झालें काय? **क्याटो** म्हणाला, "पण तसें कर-ण्याची जरूर तरी काय होती?"

**सिसेरो** ह्मणाला—"असा सन्मान देण्याचें प्रयोजन तरी काय,

असें मला विचारतां काय? आपल्यामध्यें जो सांप्रदाय चालत आला आहे त्याची गरज काय होती असें तुह्मी मला विचारतां? वरिष्ठ वर्गांतील लोकांविषयीं आपली कृतज्ञता दाखविण्याचा किंवा त्यांस आपले उपकारी करण्याचा सामान्य वर्गांतील लोकांस काय तो एकच प्रसंग आहे, आणि तो अधिकार यांची निवड करण्याचा वेळ हा होय. "**क्याटो**, आपली सेवा करण्याची या लोकांना काय ती तेवढीच सवड आहे. तिचा तूं त्यांजपासून अपहार करून घेऊं नको. प्रत्येक गोष्टींची ते लोक आपल्यापासून अपेक्षा करितात, यास्तव त्याबद्दलचा मोबदला देण्याकरितां येवढी गोष्ट तरी त्यांच्या हातांत राहूं दे. आपला पक्ष घेऊन ते कांहीं न्यायसभेपुढें आपली वकिली करूं शकत नाहींत, किंवा कांहीं आपली जामिनकी करूं शकत नाहींत, किंवा आपणांस ते आपल्या घरीं बोलावून आपला आदरसत्कार करूं शकत नाहींत. या सर्व गोष्टींची ते आपल्यापासून अपेक्षा करीत आहेत; आणि त्याबद्दल जो मोबदला द्यावयाचा तो आह्मी तुमचे पक्षपाती आहोंत अशी आपली मनोवृत्ती उघड करून दाखविल्याखेरीज त्यांजपाशीं दुसरें कांहीं नाहीं." **क्याटो** म्हणाला, "नानाप्रकारचे खेळ करून संमती देणारांचीं मनें रंजन केलीं आणि त्यांस उघड रीतीनें मेजवान्या केल्या हें काय?" **सिसेरो** म्हणाला "या गोष्टी कांहीं **म्युरेनानें** केल्या नाहींत; नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें त्याच्या मित्रांनीं केल्या आहेत; पण त्याबद्दल **सेनेट** सभेंत चर्चा झाल्यामुळें, आम्ही उलट्या कित्येक संमत्या गमावल्या आहेत. ती गोष्ट माझे मनांत आल्यावांचून रहात नाहीं."

"तथापि **क्याटो** मजबरोबर स्टोइक तत्ववेत्त्याप्रमाणें मोठ्या निकराचा वादविवाद करीत आहे. आपल्याविषयीं ज्याची चांगली

इच्छा आहे त्याला चांगलें भोजन घालणें हें योग्य आहे असें तो कबूल करीत नाहीं. कॉन्सलची निवड करितांना संमति देणारास खुष करून संमति मिळविणें रास्त आहे असें तो मानीत नाहीं. संमति देणाराला आपल्या येथें उमेदवारानें फराळास बोलाविलें तर त्यानें कायदा मोडला, यास्तव त्यास अपराधी ठरविलें पाहिजे असें तो ह्मणतो. तो असें ह्मणतो कीं 'तुह्मी मनुष्यांचीं मनें भ्रष्ट करून व त्यांच्या विषयवासना वाढवून त्यांजपासून सत्तेची आणि अधिकाराची अपेक्षा करितां आणि राष्ट्राचें सुकाणूं आपल्या हातांत घ्यावें असें इच्छितां, आपल्या कुत्सितवासना तृप्त करण्याकरितां दुराचरणी तरूण लोकांचे अनंत करून त्यांच्या कृपेची तुह्मी इच्छा करितां हें तुह्मास योग्य आहे काय? **रोमन** राष्ट्राचें अधिपत्य मिळविण्याचा कांहीं हा प्रशस्त मार्ग नव्हे. **क्याटो** म्हणतो तें सर्व खरें आहे; पण **रोमन** राष्ट्राचे राजकीय नियमच असे आहेत कीं लोकरंजन केल्यावांचून राज्याधिकाराची प्राप्तीच होत नाहीं तर **क्याटो** याच्या नीतिशास्त्राचा उपयोग काय? लोकांना ज्या गोष्टी करण्याची संवय लागली आहे व ज्या पुष्कळ काळापासून प्रचारांत आल्या आहेत त्या जर आज केल्या नाहींत तर राष्ट्राचें स्वामित्व मिळणार कसें?

**सिसेरोनें** आपल्या भाषणाचा उपसंहार करितांना आपल्या गंभीर वाणीनें ज्यूरीला असें सुचविलें कीं **क्याटिलाईनच्या** कारस्थानामुळें आपलें राष्ट्र किती धोक्यांत येऊन पडलें आहे ही गोष्ट ध्यानांत घेऊन तिनें **म्युरेना** याजवर दया करून त्यास दोषमुक्त करावें हें योग्य आहे. त्याच्या विरुद्ध न्याय केला असतां त्याजवर फार मोठें संकट ओढवेल. ज्यूरीनें **म्युरेना** यास दोषमुक्त

केलें तेव्हां **क्याटो** हंसून ह्मणाला कीं " विनोदी वृत्तीचा आणि वक्तृत्वशक्तीचा किती मोठा प्रादुर्भाव आहे तो पहा. "

**क्याटिलाईनचें** व त्याच्या मिळाफ्यांचें पारिपत्य केल्यावर **सिसेरोच्या** अधिकाराची मुदत काय ती एक महिना उरली होती. पण त्या अल्पकाळांत त्याचा जसा गौरव झाला तसा फारच थोड्या लोकांचा झाला असेल. त्या **रोमन** राष्ट्राच्या त्रात्याला सन्मान देण्यांत बडे लोक आणि सामान्य लोक यांची स्पर्धा लागली होती. **क्याटूलस** आणि **क्याटो** यांची योग्यता अशी होती कीं त्यांच्या ओठांतून सन्मानदायक शब्द निघाले ह्मणजे सन्मानाची परमावधि झाली. ते **सिसेरोस** प्रसिद्धपणें " राष्ट्राचा पिता " या मरातबानें हाक मारून अभिवंदन करीत असत. राजधानींतील लोकांनींच नाहीं, पण इटली प्रांतांतील नगरवासी लोकांनीं सुद्धां त्याच्या अनुपम सेवेबद्दल त्यास अभ्रुपत्रें दिलीं. त्या नामांकित वक्त्याला आपल्या गुणांची जशी कदर होती तशी तर कोणासही नव्हती. खरोखर **सिसेरोप्रमाणें** आपल्या गुणाबद्दल स्वचित्तप्रसन्नतेचा डौल कोणी कधींही मिरविला नसेल. **सिसेरोसारख्या** नामांकित पुरुषाची ती फुशारकी होती, ह्मणून ती क्षमार्ह आहे. अशा मोठ्या मनाचे लोक या जगतीतलावर होऊन गेले कीं महत्कर्मे करूनही त्यांबद्दल त्यांस कधींही फुशारकी वाटली नाहीं, व त्याबद्दल त्यांनीं कधींही उच्चार केला नाहीं. परंतु **सिसेरो** मोठ्यांत मोठा असून त्याला तर आपण केलेलीं महत्कृत्यें आपल्या आयुष्यांतील नित्यभोग्य वस्तुस्थानापन्न होतीं. आपली धन्यता किती गाऊं आणि किती नाहीं, असें त्याला होत असे. आपण **कॉनसल** असतां प्रसंग असो अथवा नसो, त्यानें आपल्या लौकिकव्यवहारांत, न्यायसभेपुढील आणि लोकसमाजापुढील

भाषणांत, आणि साधारण बोलण्यांत देखील, आपले पोवाडे गायल्यावांचून तो कांहीं राहिला नाहीं. खरोखर त्याबद्दल त्याच्या जिवलग मित्रांनीं देखील त्याचा उपहास करावा असें तें त्याचें अश्लाघ्य कर्म होतें. ल्याटीन आणि ग्रीक भाषेंतील गद्यपद्यात्मक लेखांत त्यानें आत्मस्तुति करण्यांत कसर ठेविली नाहीं. त्यास दुसऱ्या भाषा येत नव्हत्या म्हणूनच इतर भाषेंत त्याचे पोवाडे लिहिले गेले नाहींत.

त्याच्या अधिकाराच्या शेवटच्या दिवशीं लोक त्याचा जयजयकार करीत असतां त्यांत असे कांहीं उच्चार बाहेर आले कीं त्यांवरून पुढें आपले शत्रू आपणावर कोणतें संकट आणणार आहेत याविषयीं **सिसेरोस** बोध झाला. राजवेत्र खालीं ठेऊन तो नेहमींच्या सांप्रदायाप्रमाणें आपलें शेवटलें भाषण करण्याकरितां उभा राहिला असतां नवा ट्रायबून **मेटेलस** यानें आपल्या अधिकाराच्या नात्यानें **सिसेरोस** भाषण करण्याचा निषेध करून तो लोकांस असें ह्मणाला कीं, ज्यानें रीतीप्रमाणें चवकशी केल्यावांचून व त्यांचें काय म्हणणें होतें तें एकल्यावांचून **रोमन** लोकांना ठार मारिलें त्याचें भाषण तुह्मी ऐकूं नये.

त्या **ट्रायबून**चा तो कायदेशीर अधिकार असल्यामुळें **सिसेरोस** आपलें भाषण बंद करावें लागलें. पण **कॉनसल**चा अधिकार सोडतांना जी शपथ घ्यावी लागते ती घेतांना त्यानें प्रतिज्ञापूर्वक असें सांगितलें कीं मी जें काय करावयाचें तें करून **रोमराष्ट्रा**चा बचाव केला आहे. लोक मोठ्यानें ओरडून ह्मणाले कीं 'आपण अगदीं सत्य बोलतां.' याप्रमाणें **सिसेरो**च्या अधिकाराचा शेवट होऊन तो आपल्या घरीं चालता झाला व त्याच्या कृतज्ञ देशबांधवांनीं त्याचा अंतःकरणापासून जयजयकार केला.

**सिसेरो** आपल्या वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी फार मोठा संपत्तिमान् झाला. त्यानें मोठमोठ्या हवेल्या, व बागबगीचे विकत घेऊन आपल्या अभिरुचीप्रमाणें त्यांत फेरफार केले व कांहीं अगदीं नवे बांधले. त्यानें बांधलेल्या इमारतींत पुस्तकालयासारखी दुसरी भव्य आणि सुशोभित इमारत नव्हती; आणि जमा केलेल्या सामानसरंजामांत पुस्तकांसारख्या मौल्यवान वस्तुही नव्हत्या. तो असें ह्मणत असे कीं ' प्राणावांचून जसा देह, तसें पुस्तकावांचून घर. ' त्यास पुस्तकें वाचण्याचा, उत्तम ग्रंथ-संग्रह करण्याचा अतिशय नाद होता. पुस्तकांची बांधणी कशी असावी आणि त्यांजवरील पृष्ठांचे रंग कसे असावे याविषयीं तो फार चिकित्सक असे. जीं पुस्तकें सहज विकत मिळण्यासारखीं नव्हतीं त्यांच्या प्रती करण्याकरितां त्याच्या गुलामांत उत्तम ग्रीक लेखक होते. त्याचा मित्र ' ॲटिकस् ' हा त्याच्यासाठीं प्रत्येक ठिकाणाहून हातानें लिहिलेले ग्रंथ, रंगाचीं चित्रें आणि खोदीव मूर्ती गोळा करीत असे. ह्या दोघां मित्रांच्या घरगुती अभिरुची आणि संवयी अगदीं सारख्या असून राजकीय संबंधानें दोघांचें वर्तन अगदीं वेगळें होतें. त्यांनीं परस्परांच्या समागमांत जे दिवस घालविले ते खरोखर उभयतांसही परम सुखास्पद होते. सणाच्या दिवसांत ते दोघे एका ठिकाणीं जमून सांवलीच्या पार्थवोटेनें रमत रमत फिरत असत; किंवा पुस्तकालयांत बसून इकडील तिकडील रिकाम्या गप्पा मारीत असत. त्यापासून त्यांच्या मनाला जें समाधान वाटत असे त्याची आपल्याच्यानें कल्पना करवणार नाहीं. **सिसेरो** असें ह्मणत असे कीं, " अटीकस याच्या समागमानें कांहीं वेळपर्यंत राजदरबारसंबंधी श्रम आणि त्रास आणि दुसरीं सर्व दुःखें मी अगदीं विसरून जातों. "

तथापि विश्रांतीच्या वेळेंत देखील त्यास उपद्रव होत होता. **सिसेरो**-

सारख्या मनुष्याचा समागम म्हणजे विश्रांतीचें माहेर आणि लाभ व ज्ञानप्राप्तीचें भांडारगृह ! विश्रांति घेण्याकरितां तो कोठें कां बसेना, त्याचे शेजारीपाजारी आणि त्याचे मित्र त्याला कांहीं चैन पडूं देत नसत. दिवसाचे दहा किंवा अकरा वाजल्यानंतर त्यास उपद्रव देऊं नये अशा विचाराचे त्याच्या भेटीकरितां येणाऱ्या लोकांमध्यें पुष्कळ होते; परंतु त्याच्या अगदीं जवळचे दोन शेजारी यांनीं तर त्याची पाठ पुरविली होती, आणि त्यांपैकीं एकाला तत्वज्ञानावर वादविवाद करण्याची इतकी चटक लागली होती कीं, **सिसेरो** याजबरोबर भाषण करण्याची संधि मिळावी ह्मणून तो आपल्या घरगुती कामाची देखील हेळसांड करीत असे, परंतु **सिसेरो**नें त्यांचा कधीं तिरस्कार केला नाहीं. जो कोणी भेटीस येईल त्यास तो मोठ्या आनंदानें भेटत असे.

त्या काळीं तो आपल्या कुटुंबांतही एक परम सुखी गृहस्थाश्रमी होता. त्या दोघां नवराबायकोमध्यें निर्मळ प्रेम होतें. त्याची कन्या टुलिया ही त्याला प्राणाप्रमाणें प्रिय होती. तिचें जरी लग्न केलें होतें तरी ती बहुतकरून आपल्या बापाजवळच असे. त्यांस एकच मुलगा होता. तरुण वयांत आल्यानंतर त्यानें आपल्या बापास कांहींसा त्रास दिला. ग्रीस देशावर **पॉम्पी**नें स्वारी केली त्यांत तो स्वारांचा सरदार होता. आणि त्यानें बरीच शूरत्वाचीं कामें केलीं होतीं. त्यानंतर **स्पेन** देशांत **सीझर** याच्या हाताखालीं नोकरी करावी असें त्याच्या मनांत होतें, परंतु **पॉम्पी**च्या मुलाचा पक्ष सोडून **सीझर**चा पक्ष धरावा हें त्याच्या बापास आवडलें नाहीं. **ॲटिकस्** आणि **सिसेरो** यांच्या मनांत त्यानें **आथेन्स** येथें जाऊन विद्याभ्यास करावा, पण ती चाकरी नको असें होतें; परंतु बहुतकरून तो स्वारांचा तरुण सरदार त्यांच्या मताला अनुकूळ नव्हता असें

दिसतें. आपल्या ऐपतीपेक्षां त्यानें जास्त खर्च केला त्यावरून आपल्या बापाप्रमाणेंच तो उदार व ममताळू स्वभावाचा होता असें दिसतें. **ऑगस्टस्** याच्या कारकीर्दींत तो फार लौकीकास चढला, परंतु लवकरच मरण पावला. त्यास संतति नव्हती यामुळें **सिसेरो**-चा वंश लयास गेला.

**सिसेरोस** एवढी संपत्ति मिळाली कोठून याविषयीं खातरजमेचा पत्ता लावण्यास त्याच्या जन्मचरित्रनिरूपकास फार अवघड पडेल. सर्व देशभर त्याच्या भव्य हवेल्या आणि बागबगिचे होते. त्यांची दागडुजी करणें, आणि त्या काळच्या ऐषआरामाच्या अभिरुची-प्रमाणें त्यांस सुशोभित करणें हें पुष्कळ खर्चाचें काम होतें. ह्या खर्चासाठीं **सिसेरोस** नेहमीं कर्ज काढावें लागत असे हें खरें, परंतु आपल्या मित्रांपासून उसनवार घेतलेला पैसा तो नेहमीं परत देत असे. यावरून त्याच्या संपत्तीचें उगमस्थान निराळेंच होतें असें दिसतें. त्याच्या वतनवाडीचें उत्पन्न फार थोडें होतें; आणि इतर **रोमन** सद्गृहस्थांप्रमाणें व्यापार करून त्यानें द्रव्य मिळविलें असें-ही कांहीं दिसत नाहीं. दुसरें, त्यानें लांचरुसवत घेऊन कधींही आपला हात विटाळला नाहीं. प्रांताचा राज्यकारभार चालवि-ण्याकरितां नेमलेले **रोमन** लोकांनीं तनाखोरी करून, बलात्कारपूर्वक द्रव्यापहार करून आणि धडधडीत लूट करून अपार संपत्ति मिळ-वीत असत, आणि **सिसेरोस**ही तसेंच करितां आलें असतें; परंतु त्यानें न्यायवृत्ति धरून **सिसीली** प्रांताचा कारभार करीत असतां तसें कांहीं केलें नाहीं. हें पूर्वीं सांगितलें आहेच. **कॉन्सलचा** अधिकार संपल्यानंतर देखील त्यानें पुनः प्रांताच्या गव्हरनराच्या अधिकाराचा हक्क सोडला तो प्रकार असाः—**कान्सलच्या** अधि-काराची मुदत संपल्यावर प्रत्येकास **रोमनराष्ट्राच्या** कायद्याप्रमाणें

एका प्रांताचा अधिकार मिळत असे, आणि कोणत्या प्रांताचा अधिकार कोणी चालवावा याबद्दल चिठ्या टाकून निवड करीत असत. त्याप्रमाणें चिठ्या काढतां **म्यासेडोनीया** प्रांत **सिसेरोच्या** आणि **सीस्यालपाईनगाल** प्रांत **अन्टोनाईन** याच्या वांट्यास आला. **म्यासेडोनीया** प्रांत मोठा आणि अबाद असल्यामुळें **सिसेरोनें अन्टोनाईन** याच्या संतोषाकरितां त्याजवरील आपला हक्क सोडून तो प्रांत **अन्टोनाईनच्या** वहिवाटीस दिला इतकेंच नाहीं, पण त्याच्या मोबदल्यांत आपल्या वांट्यास आलेला **सिस्यालपाईइनगाल** प्रांत **मेससेलेट** यानें **क्याटिलाईन** याचा पराजय करण्यांत बहादुरी केल्याबद्दल बक्षीस ह्मणून त्याच्या वहिवाटीस दिला; आणि कांहीं वर्षांनंतर **सिलीशिया** येथें तो असंतोषानें गव्हरनरच्या अधिकारावर गेला तरी त्यानें आपलें इमान आणि प्रामाणिकपणा यांस किंचित् देखील कलंक लागूं दिला नाहीं; असा तो **रोमन** अधिकाऱ्यांत केवळ अद्वितीय निस्पृह पुरुष होता. कायदेशीर प्राप्तीखेरीज तो कधीं कोणाच्या पैशाला शिवला नाहीं. त्याच्या मित्राच्या व संततिरहित कृतज्ञ कुळांच्या मृत्युपत्रांवरून त्यास पुष्कळ संपत्ति मिळाली. त्या काळीं **रोमन** लोकांमध्यें वांझपणा इतका माजला होता कीं, पुष्कळ मोठे लोक संततीवांचून मरत असत. त्यानें एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं अशा प्रकारच्या देणग्यांवरून आपणांस सत्रा लक्ष रुपये मिळाले. परकीय राजे आणि राष्ट्रें **रोम** नगरांतील पुढारी लोकांस अनुकूल करून घेण्याकरितां फार मोठ्या देणग्या देत असत. आपल्याच्यानें त्या देणग्यांस लांचलुचपत ह्मणवत नाहीं, कारण पुष्कळ कामांत परकीय राजे आणि **रोम** नगरांतील वजनदार लोक यांजमध्यें पोष्य-पोषक भाव स्थापित झाला होता, यामुळें **सेनेट** सभेंत आणि लोकांपुढें त्याचें हें निखालस कायदेशीर कर्त-

व्यकर्म बनून राहिलें होतें. सिसेरो याचें अभिमानपूर्वक असें ह्मणणें होतें कीं, वकिलीबद्दल त्यानें कोणापासून कधीं कांहीं घेतलें नाहीं; कारण कीं कायद्यानें तशा प्रकारची प्राप्ति मना केली होती.*

* रोमन लोकांच्या कायद्यांतून जीं मूळतत्वें हल्लीं गृहीत केलीं आहेत त्यांतीलच हें एक मूळतत्व आहे कीं, बारिष्टराची फी ही एक त्याच्या चाकरीबद्दल ऐच्छिक देणगी आहे, सबब त्याविषयीं त्यास फिर्याद करून मागतां येत नाहीं.

# भाग ३.

——ooo——

**सिसेरोचा** कान्सलचा अधिकार संपल्यावर देखील त्याची दरबारांत मोठी मान-प्रतिष्ठा होते.—**रोमन** राष्ट्रांत दुफळी होऊन **सीझर** आणि **पॉम्पी** हे मोठे प्रबळ होतात.—**पॉम्पी** मोठा जय मिळवून **रोमनगरीं** येतो.—**सिसेरो**चे शत्रू **पॉम्पी**ला अनुकूल करून घेऊन **सिसेरो**चा सूड उगविण्याची मसलत करितात.—तत्संबंधानें **मेटेलस**च्या प्रयत्नांची निष्फळता.—**क्लोडियस**च्या खाजगी आळसावरून **सिसेरोवर** मोठें संकट गुजरतें.—**क्लोडियस** स्त्रीवेष धारण करून एका दैविक समारंभांत स्त्रियांच्या समाजांत शिरल्याबद्दलच्या आरोपाची चौकशी व लांचखाऊ जूररच्या बहुमतानें त्याची दोषमुक्तता.—**क्लोडियस** ट्रायबूनचा अधिकार मिळविण्याविषयीं प्रयत्न करितो व त्यात त्याला यश येतें.—**पॉम्पी**चा जयोत्सव.—**पॉम्पी**च्या आचरणाविषयीं **सिसेरो**चा अभिप्राय.—वगैरे प्रकरणें या भागांत आहेत.

सणाचे कांहीं दिवस खेरीजकरून **सिसेरो रोम**नगर सोडून कधींही बाहेर गेला नाहीं. **कॉनसल**च्या अधिकाराची, मुदत संपल्यावर जरी त्याजकडे कांहीं अधिकार नव्हता तरी राजदरबारीं पुढारी लोकांत तो अग्रेसर होता. नुकतेंच त्यानें **कॉन्सलचें** काम केलें होतें, यामुळें **सेनेट** सभेंत त्याचें प्राधान्य होतें. त्या काळीं **रोमन** राष्ट्रांत दोन फळ्या होत्या आणि त्याचे दोन पुढारीही मोठे प्रबळ होत चालले होते. **पॉम्पी** आणि **सीझर** हे दोघे हळू हळू अनावर व भयंकर होत चालले; आणि दोघेही मोठे महत्वाकांक्षी

असून त्यांचीं कारस्थानें प्रजासत्ताक राष्ट्राच्या अवशिष्ट राहिलेल्या स्वातंत्र्यास सर्वथैव प्रतिकूळ होतीं.

दोघांच्याही मोहिमी सफळ होऊन त्यापासून त्यांस अनुपम कीर्ति आणि सन्मानप्राप्ति तर झालीच; पण त्यांचें सैन्य त्यांच्या हुकुमांत असल्यामुळें व ते सैन्याचे फार आवडते सेनानायक असल्यामुळें त्यांचा आपल्या राष्ट्रावर असा जबर पगडा बसला कीं उत्तरकाळीं त्यांच्या पुढें कोणाचें कांहीं चाळणार नाहीं, असें स्वप्नदृष्ट झालें. पॉम्पी अद्यापपर्यंत स्पेनदेशांतच होता, परन्तु रोमराष्ट्रानें कधींही अनुभवला नव्हता असा मोठ्या थाटाचा जय मिळवून तत्संबंधीं वैभवाचा व मानमरातबाचा उपभोग घेण्याकरितां, व थोड्या लोकांच्या हातांत राजसत्ता असावी असा ज्या लोकांचा हेतु होता ते लोक आपल्या मनोरथास अनुकूळ राहतील तोंपर्यंत त्यांचा पुढारीपणा पतकरण्याकरितां, तो आतां लवकरच रोम येथें परत येणार होता. सिसेरो यानें क्याटिलाईन याचें बंड मोडण्याकरितां सक्त उपाय योजून ज्यांस आपले शत्रू करून घेतले होते त्यांनीं पॉम्पी याच्या लौकिकाचा आणि जनानुरागाचा फायदा घेऊन सिसेरोचा सूड उगविण्याच्या उद्योगाला आरंभ केला. नव्या निवडलेल्या ट्रायबूनपैकीं मेटेलस यानें सेनेटपुढें कायद्याचा असा एक मसुदा आणिला कीं, मोडलेल्या राजकरणनियमांची पुनः स्थापना करण्याकरितां पॉम्पी यास सैन्यासुद्धां येथें बोलवावें. चौकशी केल्यावांचून नगरवासी लोकांस ज्यानें देहांत शासन केलें त्याचें पारिपत्य करण्याकरितां पॉम्पी यास बोलवावें हें त्या मसुद्याचें मुख्य रहस्य होतें. परंतु मेटेलस याचा जोडीदार, ट्रायबून क्याटो यानें त्या मसुद्याविरुद्ध भाषण केल्यामुळें सेनेट सभेनें त्या मसुद्यास आपली

संमति दिली नाहीं. पण मेटेलस यानें दुराग्रहानें तो मसुदा सर्व लोकांच्या सभेपुढें आणिला आणि त्या सभेंत आपल्या विरुद्ध पक्षाचा रिघाव होऊं नये ह्मणून बंदोबस्तही पक्का केला होता. परंतु क्याटो आपल्याबरोबर दुसरा ट्रायबून थेरमस यास घेऊन जबरीनें त्या सभेंत शिरला आणि मेटेलस आणि सीझर ज्या मंचकावर बसले होते त्याजवर दोघांच्या मध्यें घुसून बसला. जेव्हां एका कामदारानें लोकांस असें विचारिलें कीं, त्यांस हा कायदा पास करावयाचा आहे किंवा नाकारावयाचा आहे, तेव्हां क्याटो ह्यानें हें काम मुळींच चालवूं नये असा निषेध केला, व तो करण्याचा त्यास अधिकारही होता. परंतु मेटेलस यानें असा संकल्पच केला होता कीं; अशा रीतीनें कांहीं आपल्यास जेरीस यावयाचें नाहीं. त्यानें तो मसुदा त्या कामदाराच्या हातांतून हिसकून घेऊन तो स्वतः मोठ्या स्वरानें वाचूं लागला; पण क्याटोनें तो त्याच्या हातांतून हिसकून घेतला आणि मेटेलस स्मरणानें त्या मसुद्यांतील सारांश सांगूं लागला तेव्हां थेरमस यानें त्याचें तोंड दाबून धरलें. अर्थात दोन्ही पक्षांच्या लोकांस हातघाईवर येण्याचा प्रसंग आला. हें वर्तमान सेनेट सभेस समजल्यावर तिनें कॉन्सल म्युरेना यास दंग्याचा बंदोबस्त करण्याचा पूर्ण अधिकार देऊन सैन्यासह फोरम येथें पाठविल्याबरोबर त्यानें लागलीच क्याटो आणि थेरमस यांचा बचाव करून जिकडे तिकडे स्थीरस्थावर केलें. पॉम्पी याचें नांव पुढें आणिल्याबरोबर आपलें कार्य सिद्धीस जाईल असा मेटेलस यास भरवसा होता, आणि त्याचा संकल्प शेवटास गेला असतां रोम राष्ट्राचें स्वामित्व पॉम्पी यास प्राप्त होणार हें जरी सीझर जाणून होता तरी त्यानें मेटेलस यास सहाय केलें तरी देखील त्याचा उद्देश सिद्धीस गेला नाहीं.

**क्याटिलाईन**च्या कारस्थानाचा पसारा फार मोठा होता, व तें दाबून टाकण्याकरितां **सिसेरोनें** फार कडक उपाय योजिल्यामुळें पुष्कळ वजनदार लोक त्याचे कट्टे वैरी बनून राहिले होते. पण तो अत्यंत लोकप्रिय असल्यामुळें त्याजपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. त्याजवर जें महत्संकट गुजरलें तें निराळ्याच दिशेकडून आलें. एका दुराचरणी मनुष्याचा खाजगी आकस त्याच्या अत्यंत शोचनीय दुःखास कारणीभूत झाला. एका महाकुलीन घराण्यांत **क्लोदियस** नांवाचा एक तरुण मनुष्य होता. तो रूपानें सुंदर असून उत्तम वक्ता होता, व **सिसेरोशीं**ही त्याचें मित्रत्व असून **क्याटिलाईन** याचें कारस्थान मोडण्यांत त्यानें त्यास मदतही केली होती; परंतु तो मोठा छचोर व वाईट चालीचा मनुष्य होता, व पुढें तर तो फारच बहकला. एके प्रसंगीं कांहीं धर्मकृत्य करण्याकरितां **रोमन** लोकांच्या सभ्य स्त्रिया एकत्र झाल्या होत्या; त्यांत तो स्त्रीवेष घेऊन शिरला. त्या काळीं **रोमन** समाजाची स्थिति इतकी वाईट होती कीं, अन्य प्रसंगीं त्याबद्दल कोणी विचारपूसही केली नसती; परंतु तो दैविक समारंभ असल्यामुळें देवतेचा सगळ्या **रोम** नगरावर क्षोभ होण्यासारखें तें अशुद्ध कर्म आहे असें मानलें गेलें. **बोनाडिया** म्हणून **रोमन** लोकांनीं एक देवता मानिली होती. तिजविषयीं पौराणिक कथा अशी आहे कीं, तिनें आपलें लग्न झाल्यावर आपल्या पतीखेरीज दुसऱ्या पुरुषाचें मुखावलोकनच केलें नाहीं. या कारणामुळें तत्प्रीत्यर्थ जो विधि करावयाचा तो **रोमन** शिष्ट स्त्रिया रात्रीं करीत असत; आणि तो समारंभ पुरुष दृष्टिगोचर होऊं नये ह्मणून त्या समारंभाच्या जागेंतील पुरुषांचे पुतळे आणि तसबिरी ह्या देखील आच्छादन करून ठेवीत असत. अशा दैविक समारंभांत पुरुषानें स्त्रीवेष घेऊन

जाणें हें खरोखर महत्पाप आणि अक्षम्य अपराध! **सीझर प्राक्टर** होता म्हणून हा समारंभ त्याच्या वाड्यांत झाला; व त्यांत त्याची स्त्री **पॉम्पींया** मुख्य स्थानापन्न होती. तिजबरोबर त्या सोद्या मनुष्याचें कांहीं कारस्थान होतें असें लोक बोलूं लागले. त्यांत कांहीं तथ्य असो अगर नसो; **सीझरनें** लागलीच तिला सोडचिठ्ठी दिली ही गोष्ट खरी आहे. **सीझर** म्हणाला "माझ्यासारख्या पुरुषाच्या स्त्रीवर नुसता संशय देखील घेतां येऊं नये असें तिचें पवित्र आचरण असलें पाहिजे."

**क्लोडियस** याचें असभ्य कर्म क्षमार्ह नव्हतें ह्मणून त्याची कांहीं दिरंगाईनें पण न्यायसभेपुढें चौकशी सुरू झाली. **क्लोडियस** याच्या लांचलुचपतीनें व दुसऱ्या मनोधारणेच्या असभ्य साधनानें **जूरर** लोकांनीं त्यास वश होऊन अन्याय होऊं नये ह्मणून **सेनेट**-सभेनें प्रामाणिक **जूरर** निवडण्यांत यावे याकरितां फार सावधगिरी ठेविली होती. परंतु **क्लोडियस** याच्या कारस्थानापुढें तिचे सर्व उपाय निष्फळ होऊन वाईट चालीचे पुष्कळ लोक **जूरर** निवडण्यांत आले. त्यांत कांहीं तर इतके असभ्य होते कीं, त्यांजबरोबर न्यायासनावर बसण्याची सभ्य **जूररांस** लज्जा वाटली. आपण त्या दिवशीं मुळींच **रोम** नगरांत नव्हतों, असा आरोपीनें दोषनिवारणोपाय योजिला होता; पण ती **गोष्ट** खोटी आहे असें शाबीत करण्याकरितां **सिसेरो** न्यायसभेपुढें उभा राहिला तेव्हां त्या सभेंतील सर्व लोक त्याचा सन्मान करण्याकरितां उठून उभे राहिले आणि **क्लोडियस** याच्या पक्षांतील लोकांकडून त्यास उपद्रव होऊं नये ह्मणूनच जसे काय ते त्याच्या भोंवतीं गोळा झाले. **जूरींनें** त्यास शपथ न देतां त्याची साक्ष घेतली. त्यानें अशी साक्ष दिली कीं, अपराध घडला त्या दिवशीं प्रातःकाळीं

**क्लोडियस** माझ्या घरीं आला होता व त्याजबरोबर माझें भाषण झालें. **सिसेरो**ची साक्ष ऐकून **क्लोडियस** आणि त्याचे मित्र यांचे हातपाय गळून गेले व आरोपी दोषमुक्त होईल असें कोणाच्या स्वप्नींही नव्हतें. परंतु त्यानें व त्याच्या मित्रांनीं मोठा लांच देऊन व दुसरींही अप्रतिष्ठितपणाचीं साधनें करून जूरींतील बहुमतानें पुष्कळ लोक आत्मवश करून घेतले होते. बहुमतानें **ज्यूररनीं** **क्लोडियस** निरपराधी आहे असा ठराव केल्यामुळें तो दोषमुक्त झाला. या अन्यायाबद्दल **सिसेरो**स फार राग आला व वाईटही वाटलें. आरोपीस ज्यांनीं दोषमुक्त केलें त्यांची त्यानें **सेनेट**सभेंत फार फजिती उडविली. पण उपयोग काय ? **क्लोडियस** निरपराधी ठरला तो ठरलाच.

**सिसेरो**नें आपल्याविरुद्ध साक्ष दिली हें **क्लोडियस** याच्या मनांत सलतच होतें. **सिसेरो**च्या जुन्या शत्रूंनीं मोठ्या संतोषानें त्यास आपल्या कुटांत घेतलें, पण **सिसेरो**नें त्यांच्या द्वेषाची कांहीं पर्वा केली नाहीं. तो त्यांची **सेनेट**सभेंत कठोर शब्दांनीं नेहमीं फटफजिती करीत असे, व भररस्त्यांत देखील उपहासोक्तीनें त्यांचा पाणउतारा करी. उपहासोक्तीनें दुसऱ्यांचीं मर्मं बाहेर काढणें हा **सिसेरो**च्या स्वभावांत मोठा दोष होता. या दोषामुळें त्यानें आपणास पुष्कळ शत्रू करून घेतले. लोकोपहास करण्याची आपणास वाईट सवय जडली आहे ही गोष्ट त्याच्या ध्यानींमनींही नव्हती, इतकी ती त्याच्या अंगवळणीं पडून गेली होती. पण त्याचे प्रतिस्पर्धी ती कधींही विसरले नाहींत.

**क्लोडियस** प्रति **क्याटिलाईन** होता. तो कांहीं लोकप्रिय गुणांवाचून नव्हता. प्रसंग असा आला कीं त्यास लोकांनीं ट्रायबून निवडलें. कायदा असा होता कीं, हा अधिकार सामान्य वर्गांतील

मनुष्याकडे असावा. **क्लोडियस** बडे लोकांच्या वर्गांतील असून हा अधिकार आपणास मिळावा ह्मणून मुद्दाम सामान्य प्रतीच्या लोकांत शिरला तेव्हां त्याला त्या अधिकाराची प्राप्ती झाली. **ट्रायबून**च्या हातांत किती मोठी सत्ता होती याविषयीं पूर्वीं सांगितलें आहेच. **क्लोडियस** यानें सर्व वर्गांच्या लोकांची मर्जी संपादन करून त्यांस आपलेसें करून घेतलें होतें, व त्या वर्षासाठीं निवडलेले दोन कॉन्सल **पीसो** आणि **ग्याबीनियस** फार वाईट चालीचे असून त्यांस लांचलुचपत दिली असतां ते सहज **क्लोडियस**च्या उद्देशास अनुकूल होतील असें होतें. त्यानें त्यांस असें वचन दिलें कीं, "तुमच्या अधिकाराची मुदत संपल्यावर तुम्ही पसंत कराल त्या अत्यंत संपन्न प्रांताच्या गव्हरनराचा अधिकार तुम्हास मिळावा असा मी कायदा ठरवून देतों." याप्रमाणें **सिसेरो**चा सूड उगविण्याची **क्लोडियस** यानें कडेकोट तयारी करून ठेविली.

**सिसेरो**नें आपल्या बचावाकरितां कोणते उपाय योजिले हें येथें सांगणें जरूर आहे.

ख्रिस्तशकापूर्वीं ६१ व्या सेप्टेंबर महिन्यांत **पॉम्पी** याचा तिसरा जयोत्साह फार मोठ्या समारंभाचा झाला; तसा पूर्वीं कधींही झाला नव्हता. त्यानें पंधरा देश काबीज केले; एक हजार किल्ले व नऊशें शहरें जिंकिलीं; चांचे लोकांच्या आठशें जहाजांचा नाश केला; एकूणचाळीस नवीन नगरें वसविलीं; आणि साडे-आठ कोटी उत्पन्नाचा नवा मुलूख **रोम**राष्ट्रास जोडला व अपार संपत्ती **रोम** राष्ट्राच्या तिजोरींत सांठविली; असें त्याच्या जयाचें वर्णन केलें आहे.

कर्तेपणामध्यें **पॉम्पी ज्युलियस सीझरच्या** दुसऱ्या पायरीचा मनुष्य होता; आणि त्याच्या वर्तनावर **रोमन** राष्ट्राचें नशीब

अवलंबून राहिलें होतें, यास्तव त्याजविषयीं सिसेरोचा खरा अभिप्राय काय होता हें जाणणें अत्यंत महत्वाचें आहे; परंतु तो कांहीं त्याच्या लोकप्रसिद्ध भाषणावरून आपणास कळावयाचा नाहीं. कारण पॉम्पीसारख्या विजयी आणि लोकप्रिय सेनानायकाविषयीं लोकसमाजापुढें बोलतांना त्यानें त्याची मिथ्या प्रशंसा देखील केली असेल, आणि तसें करणें कांहीं शिष्टसांप्रदायाला विरुद्ध नाहीं. तस्मात् त्याच्या खाजगी पत्रव्यवहारावरूनच त्याचा खरा अभिप्राय आपण जाणला पाहिजे. त्या पत्रव्यवहारावरून असें दिसतें कीं, त्यानें पॉम्पीवर कधींही विश्वास ठेविला नाहीं; व पॉम्पीला तो कधींही आवडला नाहीं. पॉम्पीचें मानसिक दौर्बल्य सिसेरोच्या तेव्हांच लक्षांत आलें व हेंहीं त्यास समजून चुकलें कीं, आपली महत्वाकांक्षा पूर्ण करावी हाच काय तो त्याचा मुख्य उद्देश असून, स्वराष्ट्रहित करण्याचा त्यानें जो आव घातला आहे तें सर्व ढोंग आहे. पण सिसेरोस हेंही माहीत होतें कीं, सीझरसारख्या महत्वाकांक्षी आणि भयावह मनुष्याचे उद्देश निष्फळ झाले तर पॉम्पीच्याच हातानें होतील. त्याखेरीज सीझर यास आडवा येईल असा रोमन राष्ट्रांत दुसरा मनुष्य नाहीं.

आपल्या पूर्वजांपासून ज्या नियमांनीं रोमनराष्ट्राचा कारभार चालत आला आहे ते नियम सुरक्षित ठेवावे हाच काय तो सिसेरोचा मुख्य उद्देश होता. कारण सेनेटर लोकांपैकीं बहुतेकांविषयीं विशेषेंकरून बडे लोकांच्या तरुण मुलांविषयीं, त्याला फार तिरस्कार आला होता. सगळ्या रोमनराष्ट्रांत क्याटोसारखा परम नितिमान दुसरा मनुष्य नव्हता. परंतु समयानुरूप वर्तन करण्याचें त्याला धोरण नसल्यामुळें त्याजपासून कधीं कधीं चूक होत असे. बडे लोकांचा वर्ग विषयोपभोगसेवनें करून अगदीं दुर्बल झाला होता; व

त्यास छचोरपणाचे खेळ खेळण्याची सवंय लागली होती. सिसेरोनें बेड लोकांविषयीं असें ह्मटलें आहे कीं, पाळींव माशानें हांक मारल्याबरोबर त्यांजजवळ येऊन त्यांच्या हातांतला पदार्थ भक्षण केला ह्मणजे त्या मूर्खांस असें वाटत असें कीं आपण स्वर्गसुखाचा अनुभव घेत आहोंत. तें इतके मुर्ख होते कीं, रोमन प्रजासत्ताक राज्याचा नाश झाला तरी आपली मासे मारण्याची सरोवरें सुरक्षित राहतील असें त्यास वाटत होतें. रोमन राष्ट्राला अशी स्थिति प्राप्त झाल्यावर आपल्या शत्रूपासून आपला बचाव करण्याकरितां राष्ट्रांतील एका वरिष्ठ मनुष्याचा आश्रय असावा हें बरें असें सिरोरोस वाटून त्यानें पॉम्पी याजबरोबर निकट मैत्री करण्याचा निश्चय केला; पण त्यानें त्याजवर पूर्ण भरंवसा कधींच ठेविला नाहीं.

याच समयास सीझर स्पेन देशांतून रोम येथें आला. आपल्या जयाबद्दल सांप्रदाया प्रमाणें जयोत्साह करावा व आपल्यास कॉन्सलचा अधिकार मिळावा असे त्याच्या मनांत दोन उद्देश होते. पण जयोत्सव होईपर्यंत त्यानें रोमनगराबाहेर रहावें असा कायदा होता; आणि कॉन्सलचा अधिकार मिळविण्याकरितां तर त्यास शहरांत राहण्याची गरज होती. त्याच्या मर्जीकरितां कायदा मोडून त्यास नगरांत येण्याची सेनेट सभा जेव्हां परवानगी देईना व दोन उद्देश कांहीं साधत नाहींत असें त्यास दिसून आलें तेव्हां, जयोत्साह करण्याचा आग्रह सोडून देऊन कॉन्सलचा अधिकार मिळविण्याकरितां तो नगरांत आला. पण संमती देणारांना लांच देण्याकरितां विपुल द्रव्य पाहिजे होतें आणि तें तर त्याजपाशीं नव्हतें; यामुळें तो भग्नमनोरथ होऊन त्यास पुनः स्पेनदेशांत परत जावें लागलें. सगळें रोमन राष्ट्र किती नीतिभ्रष्ट झालें होतें याविषयीं एक प्रमाण येथें सांगण्यासारखें आहे. सीझर याजपाशीं द्रव्य तर नव्हतें, पण ती

अडचण दूर करण्याकरितां त्यानें एक युक्ती योजिली. ती अशीः— **लूशियस** नांवाचा एक मनुष्य मोठा संपन्न आणि महत्वाकांक्षी होता. आपणाकरितां व स्वतांकरितां संमती देणारास लांच देऊन **कॉन्सल**चे अधिकार मिळविण्याविषयीं त्याचे त्यानें मन वळविलें. हें वर्तमान ऐकून **सेनेट** सभेस मोठी धास्ती पडली. **सीझर** यास **कॉन्सल**चा अधिकार मिळाला असतां व **लूशियस**सारखा दुर्बळ मनुष्य त्याचा जोडीदार झाला असतां **सीझर** पुढें कोणाचें कांहीं चालणार नाहीं असें **सेनेट** सभेस भय वाटून तिनें **बिब्यूलस** यास **कॉन्सल**च्या अधिकाराकरितां उमेदवार करून पुढें आणिला; पण त्याजपाशीं देखील लांच देण्याकरितां द्रव्य नव्हतें. तेव्हां **सेनेट** सभेनें वर्गणीनें पैसा जमवून आपला हेतू सिद्धीस नेला. या वर्गणींत **क्याटो**नें देखील पुष्कळ पैसा दिला. राष्ट्राच्या हिताकरितां **क्याटो**सारख्या नीतिमान पुरुषाला देखील अशुद्ध कर्म करावें लागलें. असें **रोमन** राष्ट्र नीतिभ्रष्ट झालें होतें.

**सीझर** पुनः **रोम** येथें परत आला तेव्हां त्यानें **पॉम्पी** यास राष्ट्रांत अग्रगण्यत्व प्राप्त झालें आहे असें पाहिलें, व **क्रीसस** आणि **पॉम्पी** यांचें परस्पराविषयीं मन शुद्ध नाहीं असेंही त्यास कळून आलें. ते दोघे **कान्सल** आपआपल्या उत्कर्षाकरितां झटत होते. **सीझर**च्या ही गोष्ट तेव्हांच लक्ष्यांत आली कीं, त्या दोघांमध्यें मैत्री करून त्यास आपल्यास अनुकूल करून घेऊं शकलों तर त्यापासून आपला मोठा फायदा होईल. याप्रमाणें **क्रीसस**ची संपत्ती आणि **पॉम्पी**ची वजनदारी यांचा आपल्या हिताकडे उपयोग करून घेण्याचा त्यानें संकल्प केला व तो सिद्धीसही गेला. आपण **कॉन्सल** असल्यामुळें जो स्वार्थ आपणास साधून घेतां येत नाहीं तो **सीझर** यास **कॉन्सल**चा अधिकार मिळवून देऊन त्याच्या द्वारें साधून घेतां येईल

अशा समजुतीनें **पॉम्पीनें**ही त्याशीं मनापासून मैत्री केली.

**रोमन** राष्ट्रांतील तीन प्रबळ पुरुष यांजमध्यें सख्य होऊन त्यांच्या तंत्राप्रमाणें जरी राज्यव्यवस्था चालत होती तरी, **रोमन** राष्ट्राच्या राज्यरचनेंत आणि कायदेकानूंत कांहीं फेरफार झाला नाहीं. **सेनेट** आणि लोक यांजकडे राष्ट्राचें स्वामित्व कायमच होतें आणि **कॉन्सल व ट्रायबून** वगैरे अधिकारी त्यांच्या हुकुमाप्रमाणें राष्ट्राचा कारभार चालवीत होते; तरी तें राष्ट्ररूप तारूं आतां निराळ्याच दिशेनें चालूं लागलें आहे असें **सिसेरोच्या** तेव्हांच लक्ष्यांत आलें. **सिसेरोसारख्या** अत्यंत लोकप्रिय आणि अद्वितीय वक्त्याच्या सहायाची त्या त्रिवर्गास फार जरूर होती. परंतु आपण त्यास सहाय होऊन त्यांच्या उद्देशाप्रमाणें वागूं लागलों असतां **रोमन** राष्ट्राचें स्वातंत्र्य लयास जाईल ह्मणून तो त्या त्रिकुटास अनुकूलही झाला नाहीं, व त्यांच्याशीं त्यानें वैमनस्य ही केलें नाहीं. हें त्याचें वर्तन दुटप्पीपणाचें होतें हें स्पष्टच आहे; पण यापेक्षां जास्त शहाणपण खर्च करण्याचा तो कांहीं समय नव्हता. **रोमन** बडे लोकांचें मच्छपरिपूर्ण सरोवराच्या संरक्षणाकडे लक्ष होतें त्यापेक्षां राष्ट्रहिताकडे थोडें जास्त लक्ष असतें आणि **क्याटो, क्याटलस** आणि **सिसेरोसारखी** कांहीं अधिक मंडळी बडे लोकांच्या वर्गांत असती तर त्या त्रिकुटाविरुद्ध एक प्रबळपक्ष उभा करून त्याचे उद्देश निष्फळ करितां आले असते. आतां इतकें करूनही **रोमन** प्रजासत्ताक राज्य सुरक्षित ठेवतां आलें असतें किंवा नाहीं या प्रश्नाचा उलगडा करणें फार कठीण आहे. ही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे कीं, सगळी राजसत्ता काय ती लोकांच्या हातांत होती. सर्व राष्ट्राला लागूं पडेल असा कायदा करण्याचा **सेनेट** सभेस मुळींच अधिकार नव्हता. पण

जुनी राज्यव्यवस्था कायम राखण्याला लोकांच्या अंगीं जी पात्रता असली पाहिजे ती त्यांच्या अंगीं होती किंवा नाहीं हें आपण पाहिलें पाहिजे. आपआपसांत लढाया आणि कज्जाभांडणें करून श्रेष्ठ आणि कनिष्ठ या दोहीं वर्गांतील लोक अगदीं सत्वहीन झाले होते. **इटाली**तील नगरवासी लोकांना संमती देण्याचा अधिकार मिळाल्यामुळें संमती देणारांची संख्या फार वाढली. परंतु त्याजबरोबर राष्ट्राच्या सुरक्षितपणाची जबाबदारी थोड्या लोकांच्या शिरावर होती ती नाहींशी झाली, व स्वार्थू लोकांस आपले उद्देश सिद्धीस नेण्याकरितां ज्या वस्तू दुर्भिळ होत्या त्यांचीं अनेक नवीं दुकानें उघडण्यांत आलीं. विजयी सेनानायकांस व प्रांतांच्या **गव्हनरांस** प्रांतांत विपुल संपत्ती मिळत असे यामुळें आपल्या महत्वकांक्षा पुऱ्या करण्याकरितां तिचा ते पाहिजे तसा वाईट उपयोग करीत असत. लांचलुचपत देऊन संमति मिळविण्याचा प्रचार बंद करण्याकरितां कडक असे कायद्यावर कायदे करण्यांत आले, परंतु सर्व व्यर्थ ! सगळें राष्ट्र भ्रष्ट झाल्यावर नुसते कागदाचे घोडे करतात काय ? **सीझरनें** ज्याला आश्रय दिला त्या **लशियसचा** उद्देश निष्फळ करण्याकरितां **क्याटो**सारख्या नीतिमान पुरुषाला देखील लांच देण्याकरितां पैसा द्यावा लागला. प्राचीन काळचा साधेपणा आणि सदाचार हे तर कधींच लय पावले होते. आपणांस जो कोणी चांगलें नाचतमाशे व इतर खेळ दाखवील व थाटमाटाच्या मेजवान्या करील त्याजविषयीं आपलें मत देण्यास लोक तयार होते. पुष्कळ काळ होऊन गेला तरी ज्यांचीं नांवें आजपर्यंत अजरामर राहिलीं आहेत व तारुण्यावस्थेंत देखील ज्याजपासून अनन्वित कर्म घडलें नाहीं त्या **क्याटो, क्याटलस** किंवा **सिसेरो**सारखा एकही पुरुष सगळ्या **रोमन** राष्ट्रांत नव्हता. **क्याटिलाइन, क्लोडियस, क्युरिओ, डोलाबेला,**

**अंटोनियस, पॉम्पी** आणि **सीझर** हे सर्व, कोणी जास्त कोणी कमी, पण दुराचरणी होते. अशा स्थितींत **रोमन** प्रजासत्ताक राज्य पूर्वी होतें तसें कायम ठेवितां येईल अशी कल्पना करणें केवळ असमंजसपणाचें काम होतें. परंतु शेवटपर्यंत **सिसेरोस** कांहीं तसें वाटलें नाहीं. प्रजासत्ताक राज्यपद्धतीविषयीं त्यास मोठा अभिमान असल्यामुळें तिला जरा प्राप्त होऊन तिच्यांतील सर्व तत्वांश निघून गेला असून फक्त वरील आकार मात्र कायम राहिला आहे हें कांहीं त्याच्या मनांत वागलें नाहीं. समुद्राच्या लाटेबरोबर जे पोहत जातात त्यांस ती लाट आपणास केव्हां कोणत्या खडकावर नेऊन आपटील हें जसें कळत नाहीं तसें प्रजासत्ताक राज्याचा पक्ष धरून बसल्यामुळें आपला काय परिणाम होईल हें **सिसेरोस**ही कळलें नाहीं.

**सीझर** हा फांकडा शिपाई, मोठा वक्ता, आणि उत्तम मुत्सद्दी होता; आणि त्याच्या हातांत पूर्ण सत्ता आल्यावर न्यायानें राज्यव्यवहार चालविण्यांत त्याच्यासारखा दक्ष आणि चतुर पुरुषही सगळ्या **रोमन** राष्ट्रांत नव्हता. आपल्या पुढें आपल्या शत्रूंचें कांहीं चालेनासें झालें ह्मणजे तो त्यांच्याशीं मोठ्या उदार मनानें आणि विनयानें वागत असे; असे त्याच्या अंगीं अनेक उत्तम गुण होते. परंतु आपली महत्वाकांक्षा पूर्ण करण्याकरितां तो काय करील आणि काय न करील, याचा कांहीं नेम नव्हता.

संकटकाळीं तें त्रिकूट आपल्या उपयोगीं पडेल अशा आशेनें **सिसेरो**नें जरी त्यांशीं वांकडेपणा केला नाहीं, तरी यदृच्छेंकरून असा एक सहज प्रसंग आला कीं त्या योगानें तें त्याच्या नाशास प्रवृत्त झालें. **अंटोनियस** ह्यानें **म्यासेडोनिया** प्रांताच्या गव्हरनरांचा अधिकार चालवितांना अन्यायाचें वर्तन केल्याबद्दल त्याजवर

आरोप आणिला होता. त्याचा कैवार घेऊन न्यायसभेपुढें बोलतांना **सिसेरो**नें तुमच्या विरुद्ध कांहीं भाषण केलें असें कोणी त्या त्रिकुटास जाऊन सांगितलें; आणि तें त्याच्या श्रवणीं पडल्याबरोबर त्यानें **सिसेरो**चा सूड उगविण्याकरितां त्याच्या शत्रूंस उत्तेजन दिलें. **क्लोडियस** यास सामान्य लोक वर्गांत शिरल्या खेरीज **ट्रायबून**चा अधिकार मिळावयाचा नव्हता हें पूर्वी सांगितलें आहेच. या कामांत त्यास पुष्कळ आडचणी आल्या होत्या त्या **पॉम्पी**नें ह्या प्रसंगी एकदम दूर केल्या. अमुक काम करावें किंवा नाहीं असें द्वैत उत्पन्न झालें ह्मणजे दैवेच्छा काय आहे हें शकुनज्ञ याच्या द्वारें जाणून घेऊन **रोमन** लोक तदनुरूप वर्तन करीत असत. शकुनज्ञाची निवडणूकही लोकबहुमतानें होत असे. **पॉम्पी** लोकप्रिय असल्यामुळें त्या समयीं तो अधिकार त्यास दिला होता. त्यानें **क्लोडियस** यास सामान्य लोकवर्गांत शिरूं देण्यास देवाची आज्ञा झाली आहे असें सांगितल्याबरोबर तत्संबंधानें जो कांहीं विधी व्हावयाचा तो होऊन **क्लोडियस** सामन्य लोकवर्गांतील ठरला; आणि त्यास **ट्रायबून**चा अधिकार मिळावा ह्मणून **सीझर**नें देखील आपलें वजन खर्च करून त्याचा मनोरथ सिद्धीस नेला.

आपणावरील संकटनिवारणार्थ ज्यांच्या सहायाची आपण अपेक्षा केली त्यांनीं बेइमानीपणा करून उलटें आपल्या शत्रूंस सहाय केल्याबद्दल **सिसेरो**स फार वाईट वाटून त्यानें त्रासानें **रोम** नगर सोडिलें. राजकीय व्यवहारांत आतां आपल्यास मन घालावयाचें नाहीं असा संकल्प करून तो दुसऱ्या विद्याव्यासंगास लागला. परंतु त्याचा सगळा जन्म त्याच व्यवसायांत गेला असल्यामुळें त्याला जी संवय जडली होती ती कांहीं त्यास दुसऱ्या विषयाचा शांत मनानें व्यासंग करूं देईना. **रोम** नगरांत काय चाललें आहे हें जाणण्याची

त्यास नेहमीं उत्कट इच्छा असे, व त्याबद्दल तो नेहमीं चौकशी करीत असे.

**सिसेरोनें रोम** नगर सोडल्यामुळें तें अगदीं फिक्कें दिसूं लागलें. **सीझर** आणि **पॉम्पी** यांचे पुष्कळ हेतू **सिसेरो**च्या प्रतिकूळते-मुळें शेवटास जात नसत, यास्तव तो **रोम** नगरीं नसावा असें त्यांच्या मनांत होतें. आणि ती गोष्ट साधण्याकरितां त्यास ते प्रांतांतील मोठ्या अधिकारावर नेमण्यास सिद्ध होते; परंतु प्रांतांतील अधि-कार पत्करला असतां लोकांत आपला बोज कमी होईल ह्मणून त्यानें त्यांचें ह्मणणें कबूल केलें नाहीं. पण तो स्वतः होऊन **रोम** नगर सोडून गेला तेव्हां, ज्यांस तो **रोम** नगरांत नको होता त्यांस देखील असें वाटलें कीं, **रोम** राष्ट्राचें एक मोठें वैभव त्यांस सोडून चाललें झालें.

पूर्वीं म्हटलें आहे त्याप्रमाणें **पॉम्पी** खरोखर दुर्बळ मनाचा मनु-ष्य होता. त्याबद्दल एक गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे. त्यानें आपल्या बायकोला ( **म्युसिया** ) **सीझर**बरोबर व्यभिचार केल्या-च्या संशयावरून काडी मोडून देऊन त्याच्याच मुलीशीं आपलें लग्न केलें. आपल्या अब्रूवर ज्यानें हात घातला त्याच्या मुलीशीं आ-पण लग्न करतों काय याबद्दल त्यास कांहीं शरम वाटली नाहीं ! **पॉम्पी**च्या या असभ्य वर्तनाबद्दल लोक जसजसा त्याचा तिरस्कार करूं लागलें तसतसें त्याजपासून अपकार होण्याचें **सिसेरो**चें भय कमी होत चाललें.

**सिसेरो** कांहीं महिने बाहेर राहून **रोम** नगरीं परत आला तेव्हां त्या अधिपत्र्याविषयीं लोकांच्या मनांत फार तिरस्कार उत्पन्न झाला आहे असें त्यास कळून आलें. भररस्त्यांत त्यांची आणि विशेषेंकरून **पॉम्पी**ची लोक निर्भत्सना करीत असत आणि

नाटकगृहांत नाटकांतील पात्रानें त्यांना उद्देशून निंदागर्भित वाक्यांचा उच्चार केला ह्मणजे प्रेक्षक तींच वाक्यें पुनः पुनः त्याजकडून म्हणवीत.

**क्लोडियस** यास **ट्रायबून**चा अधिकार मिळाल्यावर **सीझर** आणि **पॉम्पी** लोकांच्या मनांतून उतरले आहेत असें पाहून त्यांच्याशीं बांकून वागण्याचें प्रथमतः त्याच्या मनांत आलें. परंतु ते पैकेवान असून सैन्याचें त्यांस मोठें पाठबळ आहे तस्मात् त्यांच्याशीं वैर करणें चांगलें नाहीं, असा शहाणपणाचा विचार त्याच्या मनांत येऊन तो त्यांच्या तंत्रानें वागूं लागला. पण त्याचें सगळें लक्ष्य **सिसेरो**चें पारिपत्य करण्याकडे लागलें होतें. 'मला **ट्रायबून**चा अधिकार प्राप्त झाला असतां मी **सिसेरो**स कांहीं उपद्रव देणार नाहीं' अशी **पॉम्पी**नें त्याजपासून शपथ घेतली होती. **पॉम्पी** नेहमीं असें ह्मणत असे कीं, मी कृपा केली ह्मणून **क्लोडियस** यास सामान्य लोकांच्या वर्गांत जातां आलें आणि त्या योगानें त्यास **ट्रायबून**चा अधिकार प्राप्त झाला. त्याजपासून जर **सिसेरो**स अपाय झाला तर मला जगांत तोंड दाखवावयास जागा राहणार नाहीं. त्यानें **सिसे-रो**स असें अभिवचन दिलें कीं, तुझ्या केंसाला देखील कोणी धक्का लावूं शकणार नाहीं. आणखी असेंही सांगितलें कीं, **क्लोडियस**-पासून तुला उपद्रव झाला तर तुझ्या मित्रतेपेक्षां मला जास्त प्रिय अशी दुसरी वस्तूच नाहीं, असें तुझ्यां व या जगाच्या अनुभवास येईल. त्याच्या मानसिक दौर्बल्याचें हेंही एक प्रमाण आहे. एका न्यायसभेपुढें **सिसेरो** आपल्या विरुद्ध बोलला हें कानीं पडल्या-बरोबर त्यानें **क्लोडियस** यास सामान्य लोकवर्गांत घालून त्यास **सिसेरो**ला अपकार करण्यास शक्त केलें; आणि तोच आतां **सिसेरो**च्या सुरक्षितपणाकरितां त्याजपासून शपथा वाहून घेत आहे, व पुढील त्याचें वर्तन पहाल तर अगदींच निराळें! **सिसेरो**नें **पॉम्पी**-

च्या वचनावर अगदीं विश्वासही ठेविला नाहीं व अविश्वासही ठेविला नाहीं. **क्लोडियस** याजपासून **पॉम्पीनें** शपथ वाहून घेतली तेव्हां त्याचें मन **सिसेरो**विषयीं निर्मळ असो अगर नसो; **क्लोडियस** याच्या मनांत आपली शपथ पाळण्याचें मुळापासूनच नव्हतें; पण **सिसेरो** कांहीं त्याची पर्वा करीत नसे. तो **रोम** नगरीं परत येऊन पुनः बॅरिस्टरचा धंदा करूं लागल्यावर त्याजविषयीं लोकांच्या मनांतील पूर्वींच्या पूज्य भावाला पुनः टवटवी आली. तो **कॉन्सल** असतां **रोम** राष्ट्राचें त्यानें संरक्षण केलें होतें त्याचे त्यांस स्मरण झालें आणि त्यास सन्मान देण्याकरितां लोकांचे थवेच्या थवे त्याच्या घराभोंवतीं जमूं लागले व तो रस्त्यानें जात असतां लोक त्याचा पूर्वींप्रमाणें जयजयकार करीत असत. आपल्याविषयीं लोकांचें इतकें प्रेम असल्यावर **क्लोडियस** आपलें काय वांकडें करूं शकणार आहे असें **सिसेरोस** वाटावें हें स्वाभाविक होतें.

परंतु तें त्याचें अनुमान अगदीं चुकलें. आतां यापुढें जें वृत्त निवेदन करावयाचें आहे तें फार हृदयद्रावक आहे. **सिसेरो**वर मोठें संकट गुदरल्याबद्दल आपणास जितकें वाईट वाटतें त्यापेक्षांही त्या प्रसंगींचें त्याचे मानसिक दौर्बल्य पाहून फारच जास्त वाईट वाटतें. **क्याटीलाईन**च्या अति भयंकर कारस्थानाला जो तिळमात्र भ्याला नाहीं, त्याचे मारेकरी प्राण घेण्याकरितां मागें फिरत असतां ज्याचें मन अस्थिर झालें नाहीं, **सीझर** मारला गेल्यावर तत्संबंधानें ज्याजवर अनेक भयंकर प्रसंग गुजरले असूनही ज्याचें धैर्य खचलें नाहीं, व आपल्या वधसमयीं देखील ज्याच्या मनाला वैक्लव्य प्राप्त झालें नाहीं, तो **सिसेरो** या प्रसंगीं मनानें इतका दुर्बळ कसा झाला आणि त्याचें धैर्य त्यास कसें सोडून गेलें, याबद्दल अत्यंत आश्चर्य व खेद वाटल्यावांचून रहात नाहीं.

**सिसेरोवर** देशनिकाल शासनाचा प्रसंग ख्रिस्तशकापूर्वी ५८ व्या वर्षी ह्मणजे **सिसेरोनें कॉन्सलचा** अधिकार सोडल्यावर पांच वर्षांनीं गुजरला. त्या वर्षांकरितां निवडलेले दोन **कॉन्सल पीसो** आणि **ग्याबीनियस** फार वाईट चालीचे मनुष्य होते व **क्लोडियस** यानें त्यांस आपलेसें करून घेतलें होतें हें पूर्वी सांगितलेंच आहे.

याप्रमाणें **सिसेरोला** अपकार करण्याची सर्व सामुग्री सिद्ध करून ठेवल्यावर **कमीशिया** नांवाच्या सर्व लोकांच्या सभेपुढें **क्लोडियस** यानें कायद्याचा एक मसुदा सभेच्या मंजुरीकरितां रुजूं केला तो असाः—‘ असा कायदा करण्यांत येत आहे कीं, योग्य रीतीनें चौकशी केल्यावांचून ज्यानें **रोमन** नगरवासी लोकांना देहांत शासन केलें त्याजबरोबर अन्नोदकाचा व्यवहार ठेवला जाणार नाहीं. ’ या मसुद्यांत **सिसेरोचें** कांहीं नांव नव्हतें. परंतु तो कायदा फक्त त्यास शासन करण्याकरितांच करावयाचा होता हें अगदीं स्पष्ट होतें. हा कायदा लोकांनीं मंजूर केला ह्मणजे तो अमलांत आणण्यास **क्लोडियस** एक पळाचाही उशीर लावणार नाहीं हें **सिसेरोस** माहीत होतें. तेव्हां लोकांच्या मनांत आपणाविषयीं कारुण्य उत्पन्न करून कायदा मंजूर होऊं देऊं नये, हाच काय तो **सिसेरोस** उपाय उरला होता. त्याकरितां **रोमन** लोकांच्या चालीप्रमाणें त्यानें शोकसूचक अशुभ वेष धारण करून आपल्या देशबांधवांनीं आपल्यावर कृपा करावी ह्मणून त्यांच्या विनवण्या करीत रस्तोरस्तीं आणि दारोदारीं फिरला. अश्वारोही वर्गांतील सर्व लोक तसाच वेश करून त्याजबरोबर फिरत होते. इटलींतील सर्व नगरवासी लोकांनीं **सिसेरोचें** संरक्षण करावें म्हणून विनंति करण्याकरितां **कॉन्सल** याजकडे प्रतिनिधी पाठविले होते. **सिसेरो** फोरम येथें व रस्तोरस्तीं लोकांच्या विनवण्या करीत फिरत असतांना त्याचे हजारों मित्र व

**रोम** नगरांतील फार मोठ्या नामांकित घराण्यांतील वीस हजार तरुण लोक अशुभ वेश धारण करून त्याजबरोबर फिरत असत. परंतु त्यापासून कांहींएक अर्थनिष्पत्ती झाली नाहीं. उलटें **क्लोडियस** आणि त्याचे अनुयायी त्या मंडळीचा उपहास करून **सिसेरोवर** दगड आणि धूळ फेंकीत असत.

**सेनेट** सभेनें असा ठराव केला कीं **सेनेट** सभेची इमारत अशुभदर्शक चिन्हांनीं विशोभित करून सर्व **सेनेट** सभासदांनीं अशुभ वेश धारण करावा. परंतु **कॉन्सल ग्याबीनियस** यानें आपल्या अधिकारबळानें तसें करण्याचा निषेध केला. आणि त्याचा हुकूम अमलांत आणण्याकरितां **क्लोडियस** हत्यारबंद लोकांसह **सेनेट** सभेच्या दरवाजाशीं तयारच होता. **कॉन्सल पीसो** यानें आपल्यास सहाय करावें ह्मणून **सिसेरोनें** त्याचें पुष्कळ अर्जव केलें, परंतु त्यानें त्याला एकच उत्तर दिलें कीं, **क्लोडियसची** मर्जी मोडून आह्मी दोघेही **कॉन्सल** तुझ्यासाठीं कांहींच करूं शकत नाहीं.

आतां **पॉम्पीनें** तुझ्या संरक्षणाकरितां मी अमुक करीन आणि तमुक करीन असें **सिसेरोस** अभिवचन दिलें होतें, त्याला अनुलक्षून काय केलें तें आपणास पहावयाचें आहे. या वेळेस तो **रोम** नगरापासून सुमारें वीस मैलांच्या अंतरावर आपल्या एका बागेंतील बंगल्यांत जाऊन राहिला होता. **सिसेरोला** अपाय करण्याचे कामीं आपण सामीलही होऊं नये, व त्याचा बचाव करण्याकरितां **रोम** नगरांतील शिष्ट लोक आपणास भीड घातल्यावांचून रहाणार नाहींत यास्तव तोही प्रसंग टाळावा, असे त्याच्या जाण्यांत दोन उद्देश होते. परंतु **रोम** नगरांतील पुष्कळ प्रतिष्ठित लोक त्याच्या मागें लागलीच गेले आणि **सिसेरो** हा **रोमराष्ट्रमंडपाचा** मुख्य स्तंभ असून तुझा मित्र आहे व त्याच्या संरक्षणाबद्दल तूं त्यास वारंवार अभिवचनेंही दिलीं

आहेस यास्तव त्याची उपेक्षा करून **रोम** राष्ट्रसंकटांत घालूं नकोस; अशा त्याच्या त्यांनीं विनवण्या केल्या, परंतु तो कांहीं त्यांस वळला नाहीं. **क्लोडियस** यास लोकांचें सहाय आहे सबब त्याजपुढें माझें कांहीं चालणार नाहीं, पण **कॉन्सल** आणि **सेनेट** सभा हे जर **सिसेरोस** अनुकूळ असतील आणि ते आपणास मदत करण्याकरितां मला बोलावितील तर **सिसेरोच्या** संरक्षणाकरितां मी माझी समशेर म्यानांतून बाहेर काढण्यांस तयार आहें, असें त्यानें उत्तर दिलें. सरतेशेवटीं **सिसेरो** स्वतः त्याजकडे गेला आणि त्याच्या पायांवर लोळण घालून त्याचें पुष्कळ अर्जव केलें, पण त्याच्या त्या दैन्य निवेदनापासून कांहीं अर्थ निष्पन्न झाला नाहीं. **सीझरच्या** इच्छेपुढें माझें कांहीं चालणार नाहीं असें त्यानें त्यास उत्तर दिलें.

आतां पुढें करावयाचें काय याविषयीं **सिसेरो** आणि त्याचे मित्र यांनीं एकत्र बसून विचारपूर्वक वाटाघाट केली. **सिसेरोनें** **क्लोडियस** याच्याशीं भररस्त्यांत सामना करून आपल्यावरील संकट निवारावें असें कित्येकांचें मत पडलें. हा धाडसाचा आणि बहादुरीचा उपाय अगदीं समयानुरूप होता, आणि तो आपण स्वीकारिला नाहीं याबद्दल **सिसेरोस** मग फार पस्तावा झाला. परंतु त्याचा नैसर्गिक स्वभाव सौम्य असल्यामुळें असें साहस कर्म करून आपणाकरितां दुसऱ्याच्या रक्तांचा श्राव करणें हें त्यास योग्य वाटलें नाहीं. असें साहस कर्म करण्याकरितां **सीझर**, **क्रामवेल**, किंवा **बोनापार्ट** यांच्यासारखेच साहसी आणि शूर पुरुष जन्मास यावे लागतात. **क्याटो**, **हार्टेनियस**, व **अटिकस** यांनीं आणि त्यांच्या परिवारांनीं त्यास अशी सल्ला दिली कीं, त्यानें सध्यां **रोम** नगर सोडून निघून जावें हाच काय तो उत्तम मार्ग आहे. **कॉन्सल पीसो** यानें छद्मोक्तीनें त्यास असें

सुचविलें कीं, तुह्मी आपण होऊन देशत्याग केला असतां दुसऱ्यांदा **रोम**चा बचाव केल्याचें श्रेय तुम्हांस प्राप्त होईल. आपली अशी फटफजीती करून घेण्यापेक्षां आत्महत्या करणें उचित नाहीं काय? असें **सिसेरो**नें आपल्या मित्रांस विचारिलें. त्यांणीं त्यास असें सांगितलें कीं, आत्महत्या करणें हें कर्म अशा चुकीचें आहे कीं, ती चूक पुनः कधींही सुधारतां येत नाहीं, यास्तव तें निंद्य कर्म तूं कधींही करूं नकोस.

या समयीं **सीझर रोम** नगराच्या तटाबाहेर आपल्या सैन्याचा तळ देऊन राहिला होता. परंतु सेनापत्य स्वीकारल्यावर सेनापतीला नगरांत राहण्याची किंवा येण्याची कायद्यानें मनाई केली असल्यामुळें, त्यास कांहीं **रोम** नगरांत येतां येत नव्हतें. आणि लोकसभेंत तर त्याची जरूर होती; सबब **क्लोडियस** यानें सर्व लोकांची सभा नगराबाहेर भरवून भरसभेंत उघडपणें **सीझर** यास विचारिलें कीं, **सिसेरो कॉन्सल** असतां त्यानें जें वर्तन केलें त्याविषयीं तुमचा अभिप्राय काय आहे. **सीझर**नें असें उत्तर दिलें कीं, **कयाटिलाईन**च्या मिलाफी लोकांना देहांत शासन करण्यांत **सिसेरो**नें **रोमन** कायद्याचा अतिक्रम केला. परंतु जी गोष्ट एकदां होऊन चुकली व मध्यें पुष्कळ काळ गेला आहे, तेव्हां त्याबद्दल आतां सक्त रीतीनें विचार करण्याची कांहीं जरूर नाहीं. मला नेहमीं सौम्य उपायच पसंत असतात. **सीझर**साारख्या बलाढ्य पुरुषाला देखील **सिसेरो** तर्फे याहून कांहीं जास्त सांगतां आलें नाहीं असा तो बिकट प्रसंग होता.

**सिसेरो** आपल्या मित्राच्या सल्ल्याप्रमाणें **रोम**नगर सोडून निघाला. त्याचे पुष्कळ मित्र त्याच्या वियोगाबद्दल अत्यंत दुःखी होत्साते त्यास नगराबाहेर पोंहोचवावयास गेले होते. त्यानें

आपला सर्व परिवार **रोम** येथेंच ठेविला, कारण आपल्याबरोबर त्यास संकटांत घालणें त्यास उचित वाटलें नाहीं, व आपणास आपले मित्र लौकरच परत आणतील अशी त्यास पूर्ण आशा होती.

**सिसेरो**नें **रोम** नगर सोडलें त्याच दिवशीं **क्लोडियस** यानें लोकसभा भरवून असा कायदा मंजूर करून घेतला कीं, **सिसेरो**बरोबर कोणी अन्नोदकाचा व्यवहार ठेऊं नये; आणि **रोम** नगरापासून पांचशें मैलाचे आंत त्यास कोणी आपले घरांत आश्रय देऊं नये. ठरविलेल्या मर्यादेच्या आंत तो दृष्टीस पडेल तर त्यास व त्याला जो आश्रय देईल त्यास कोणी ठार मारिलें असतां त्याजकडे मनुष्य वध केल्याचा दोष लागू होणार नाहीं. इटालींतील लोकांच्या सन्मानाकरितां ही गोष्ट येथें सांगितली पाहिजे कीं, **रोम**नगरापासून पांचशें मैलांचे आंत **सिसेरो**ला कोणी आश्रय देऊं नये असा त्या कायद्यांतील ठराव लोकांनीं मुळींच मानिला नाहीं.

कायदा मंजूर झाल्याबरोबर **सिसेरो**ची सर्व मिळकत सरकारांत घेतली. आणि त्याचे वाडे व बागबगीचे वगैरे लुटून फस्त केले, आणि **क्लोडियस** यानें त्याचा प्यालेटाईन टेंकडीवर एक भव्य महाल होता तो जाळून त्याची राख केली. आणि त्या जागेवर एक मंदीर बांधून त्यांत एक मूर्ती बसविली. आणि तीस स्वतंत्रता हें नांव दिलें.

आतां आपण **सिसेरो**कडे वळूं. **रोमन** राष्ट्रांतील सर्वांहून श्रेष्ठ अशा **कमीशिया** नांवाच्या लोकसभेनें **सिसेरो**ला बहिष्कृत करून देशनिकाल शासन केल्यावर व **सीझर** आणि **पॉम्पी**सारखे वजनदार पुरुष त्यास अनुकूळ नसल्यावर त्यास **रोम**नगरीं राहणें शक्य किंवा सुरक्षित नव्हतें. परंतु त्या निमकहराम नगराची पायधूळ झटकून त्यानें त्याजकडे शेवटपर्यंत आपली पाठ फिरविली

असती, आणि आपल्या मित्रांचें आदरातिथ्य स्वीकारून सुखानें आपलें अवशिष्ट आयुष्य बाहेर घालविलें असतें तर त्याच्या मोठे-पणाची कमाल झाली असती. अटीकस तर त्याचा परम जिवलग मित्र होता व आपली सर्व संपत्ती सिसेरोच्या सुखाकरितां खर्ची घालण्यास तयार होता. पण त्याखेरीजही त्या बेइमानी आणि अ-सज्जन लोकसमाजांत ज्यांचीं नांवें प्रातःस्मरणांत दाखल करावीं असे कांहीं पुण्य पुरुष होते. सीका, क्कॉकस् आणि फ्लॅचनासियस यांनीं निरपेक्ष बुद्धीनें आपल्या मित्राचें आदरातिथ्य आणि सेवा केली, परंतु सिसेरोच्या मनाला कांहीं समाधान होईना. तो बायका प्रमाणें विलाप करीत असे. पत्र लिहितांना त्याचे नेत्र अश्रूंनें भरून आल्यामुळें त्यास कांहीं दिसेनासें होई. दिवसाचा उजेड त्यास विषवत् वाटत असे. ॲटिकस यास असें वाटलें कीं, तो आतां वेडा होतो. सिसेरोसारख्या पुरुषाच्या नादान दुर्बळपणावर जास्त टीका करणें हें कांहीं प्रशंसनीय कर्म नाहीं. त्याच्या पर-मस्तुतिपाठकांनीं देखील सिसेरोचा त्या वेळेचा मनाचा दुर्ब-ळपणा कबूल केला आहे. निंदक लोकांनीं तर त्याची फजिती करण्यांत कसर ठेविली नाहीं.

सिसेरोच्या चरित्रलेखकांपैकीं फॉर्सिथ यानें त्याच्या मानसिक दौर्बल्याविषयीं विचार करून जें दोषपरिमार्जन केलें आहे ते ध्यानांत घेऊन सिसेरोचें मानसिक दौर्बल्य त्याजवर गुजरलेल्या संकटानुरूप होतें असें आपण मानावें हें योग्य आहे. फॉर्सिथ असें म्हणतो कीं:—

" दुर्दैवानें प्रगल्भ मनावर असा जबर घाला घातल्याचीं उदाह-रणें फार सांपडणार नाहींत; आणि सिसेरो याला देशबहिष्कारा-बद्दल जितकें वाईट वाटलें तितकें वाईट वाटल्याचा प्रसंग क्वचितच कोणावर गुजरला असेल. ही गोष्ट आपण चांगली लक्षांत ठेविली

पाहिजे कीं, प्राचीनकालीं स्वदेशावर लोकांची किती प्रीति होती त्याचें वास्तविक स्वरूप ध्यानांत आणणें हीं गोष्ट आजकाल फार कठीण आहे; आणि कांहीं वेळ देखील स्वदेश सोडून जाणें हें त्या कालीं असह्य संकट होतें. सिसेरो याजवर गुजरलेला प्रसंग किती बिकट होता याचें यथार्थ स्वरूप ध्यानांत येण्याजोग्या गोष्टी आतांच्या काळांत राजसत्ताक राज्याच्या दरबारांत दृष्टोत्पत्तीस येतात. राजाची आपल्या परमकृपेंतील मनुष्यावर एकदम इतराजी होते, तो त्याजकडे कपाळाला आंठ्या घालून पाहूं लागतो, नंतर त्यास अधिकारावरून दूर करितो, आणि शेवटीं त्याचें सर्वस्व हरण करून, त्याला आपल्या घरादारांतून, दरबारांतून आणि स्वदेशांतून लांब हकलून लावितो. सिसेरो याजवरचा प्रसंगच तसा दारूण होता. त्यास नुसतें देशाबाहेर हाकून लाविलें नव्हतें. पण त्यास जाति-बहिष्कृत केलें होतें. राजधानीपासून अमुक एक अंतरावर जर तो सांपडला तर मृत्युवांचून त्याला दुसरें शासनच नव्हतें, आणि जो कोणी त्याला अन्न पाणी देईल, किंवा त्यास आपल्या घरांत आश्रय देईल, त्याच्यासाठीं यमद्वार उघडें होतें. त्याच्या मिळकतीचा नाश करून टाकिला होता; त्याच्या कुटुंबांतील मनुष्यें निर्धन करून टाकिलीं होतीं; आणि ज्या लोकांची त्यानें प्रामाणिकपणें सेवा बजा-विली होती तेच त्याच्या विपद्दशेचे उत्पादक होते. ह्याप्रमाणें त्याजवर गुजरलेला प्रसंग मोठा बिकट होता तथापि अशा स्थितींत त्यानें लोकोत्तर धैर्य दाखवून प्राप्त झालेलें संकट तुच्छ मानिलें असतें तर ती गोष्ट त्याच्या नाम लौकिकास फारच भूषणास्पद झाली असती. पण मानवी प्राणी ज्या पूर्ण अवस्थेला पात्र नाहीं तिची आपण त्याच्याठायीं अपेक्षा करितों असें होतें."

सुमारें दीडवर्षपर्यंत त्यानें देशनिकालशासन भोगलें, त्यापूर्वी

फार दिवसांपासून त्याला **रोम** नगरांत आणण्याविषयीं विचार चालला होता. नवे **कॉन्सल** त्याला अनुकूळ होते. **क्लोडियस्** आपल्या मगरुरीमुळें **पॉम्पी**च्या मर्जींतून उतरला होता. **सीझर** आपल्या सैन्यासहीत **गॉल** देशांत गेला होता. **सिसेरो**चे सर्व मित्र ही अनुकूळ संधी पाहून त्याजविषयीं प्रयत्न करण्यांत परम तत्पर होते. त्यांत त्याचा प्रतियोगी महामनस्क **हॉरटेन्सियस्** तर पराकाष्ठेचा प्रयत्न करण्यांत अग्रगण्य होता. **क्लोडियस्** आणि तत्पक्षीय लोकांनींही उलट पुष्कळ प्रयत्न केले; परंतु त्यापासून इतकेंच फळ निष्पन्न झालें कीं, **सिसेरो**च्या पुनरागमनास कांहीं विलंब लागला. सरतेशेवटीं पुष्कळ बहुमतानें त्याला परत आणावें असा **सेनेट** आणि लोकसभेंत ठराव झाला.

ह्या प्रसंगीं **सिसेरो**च्या एका मित्रानें त्याचा कार्यभाग मोठ्या छानीनें आणि चातुर्यानें उरकून घेतला. **सेनेट** सभेंत **सिसेरोस** परत आणण्याविषयीं चर्चा चालली होती त्या सुमारास नाटकगृहांत एक नाटक झालें. त्या नाटकांत **ईसप** नांवाचा एक मोठा प्रवीण नाटककार होता. **सिसेरो**नें त्याजपाशीं वक्तृत्वांगभूत हावभावाचा अभ्यास केला होता, ह्यामुळें उभयतांचें गुरुशिष्यांचें नातें होतें, आणि **ईसप** **सिसेरोस** आपला मित्र मानीत असे. नाटकांतील संविधान प्रसंगास अनुकूळ होतें. एक कन्या आपल्या पित्याच्या वियोगाबद्दल शोक करीत आहे असा त्या नाटकांतील एक भाग होता. तो सर्व भाग त्या नाटकाचार्यानें **सिसेरो**वर लाविला. ज्या वाक्यांचा त्यानें गायनांत उपयोग केला तीं दोहोंकडे लावितां येतील अशीं समानार्थक होतीं आणि लोकांच्या मनावर **सिसेरो**विषयीं चांगला ठसा उठवावा म्हणून एक दोन नवीं वचनें **ईसप** यानें आपल्या पदरचीं त्यांत ज्यास्त जोडलीं.

॥ ज्यानें कीं दृढ निश्चयें तुमाचिया राष्ट्रासि संरक्षिलें ॥
॥ काया हे स्वजना वनीं आशि-सरो ऐसें मनीं लक्षिलें ॥
॥ तुह्मांशीं अनिवार्य संकटिं खऱ्या मित्रापरी वागला ॥
॥ त्या देशांतरिं धाडितां शुनकसे पाठीं कसे लागलां ॥

ह्या अर्थाचें तें पद्य होतें. तें पद्य करुणोत्पादक व मनोगतार्थ-सूचक असून, ईसपची वाणी व हावभाव हेही अत्यंत मनोवेधक होते. एकदां तो तें पद्य ह्मणून पडद्यांत शिरल्याबरोबर लोकांनीं त्याची वाहवा करून, त्यास पुनः परत बोलावून त्या पद्याची पुनरावृत्ति करण्याविषयीं सांगितलें. तेव्हां त्यास अधिक उत्तेजन येऊन, त्या नाटकालयांत जमलेल्या सर्व वर्गांच्या लोकांपुढें पृथक् पृथक् अंगुलीनिर्देश करून, त्या नाट्यचतुरानें त्या वाक्यप्रयोगाची वारंवार आवृत्ति केली, तेव्हां त्याचा कंठ दुःखानें सद्गदित झाला होता आणि त्याच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा चालल्या होत्या. प्रेक्षक जनांचीही तशीच अवस्था झाली आणि सिसेरोविषयीं एकसमयावच्छेदेंकरून सर्वांच्या मनांत करुणा उत्पन्न झाली; आणि त्या नाटकाच्या दुसरेच दिवशीं सेनेट सभेनें सिसेरोस परत बोलावण्याचा ठराव केला. सिसेरोनें स्वतः असें ह्मटलें आहे कीं, 'ह्या नाटककारानें जें भाषण केलें त्यांत त्याचें वाक्पटुत्व इतकें उत्तम होतें कीं, तसें भाषण मजसाठीं मला कांहीं करतां आलें नसतें.'

सिसेरोचा पुनरागमनसमारंभ मोठ्या थाटाचा झाला. तो आपल्या कन्येच्या जन्मदिवशीं ऱ्हेन्डूसियम येथें जाहजावरून उतरला. तिचा पति, पीसो (हा मोठ्या दिलदारीनें सिसेरो याचा पक्ष धरून राहिला होता.) हा नुकताच मृत्यु पावला होता तरी तिनें

आपलें सर्व दुःख एकीकडे ठेवून **सिसेरोची**, मोठ्या आनंदानें सर्वांच्या अगोदर भेट घेतली.

तो परःकाष्ठेचा मानी आणि जनानुरागप्रिय होता. आपलें पुनरागमन हृदयंगम व्हावें म्हणून एखाद्या विजयी राजाप्रमाणें तो लहान लहान मजला करीत **रोम** येथें आला. जो प्रवास सुखानें बारा दिवसांत करितां आला असता, त्याला त्यानें चोवीस दिवस लाविले; आणि अगदीं जवळचा रस्ता सोडून मुद्दाम तो मोठमोठ्या नगरांवरून मेजवान्या घेत **रोम** नगरांत आला. व त्या नगरवासी लोकांनींही त्यास फार आग्रह केला होता कीं, त्यानें आपलें आदरातिथ्य स्वीकारून मग **रोम** नगरांत जावें. **सिसेरो**च्या सत्काराचा वृत्तान्त आपण त्याच्याच मुखानें ऐकूं या. त्याची भाषाशक्ति फार मोठी असल्यामुळें त्याचें स्वसत्कारासंबंधानें निरूपण फार सुरेख आणि अत्यंत मनोरम आहे तसें कांहीं त्याच्या परमपटुस्तुती पाठकांना देखील करितां आलें नसतें.

आतां " आत्मश्लाघाम् तथानिंदाम् परेशाम् परिवर्जयेत " ' परनिंदेनें परवध आत्मस्तवनेच आत्मवध घडतो ' या नीतिवचना प्रमाणें पाहिलें असतां आत्मस्तवा बद्दल त्याजकडे मोठा दोष येतो परंतु त्यानें कांहीं आपली मिथ्या स्तुती केली नाहीं. खरा वृत्तांत स्वमुखानें निवेदन केला आहे, तस्मात त्याबद्दल त्याची हेलना करण्यास आपण योग्य नाहीं.

**सिसेरो** ह्मणाला मार्झे " **रोम** नगरांत परत येणे लोकांस किती अनंदास्पद झालें त्याचें मी कीती वर्णन करावें ? माझ्या सर्व देशबांधवाच्या तर्फे **ब्रंडीसी** नगगरच्या लोकांनीं माझा उजवा हात धरून माझें आगतस्वागत केलें त्या विषयीं मीं काय वर्णन करावें ? तेथपासून **रोम** नगरापर्यंत मजबरोबर सर्व इटाली कूच करीत आहे

असें मला वाटलें. असा एक ही प्रांत नाहीं, शहर नाहीं, आणि मंडळी अथवा वसाहत नाहीं, कीं, तेथील लोकांनीं मला सन्मान देण्या करितां आपले प्रतिनिधि मजकडे पाठविलें नाहींत. प्रत्येक मुकामीं माझा सत्कार कसा झाला, नगरांतील मार्गांत लोकांची कशी दाटी झाली होती, आणि कुटुंबातील पुढारी आपलीं बायका-मुलें घेऊन कसे एकत्र गोळा झाले होते, हें सांगण्याची काय गरज आहे ? मी सुरक्षित **रोम** नगरांत परत आलों याबद्दल सर्व लोकांनीं सणाच्या दिवसा प्रमाणें कांहीं दिवस उत्सव केला, त्याचें मीं वर्णन कसें करूं शकेन ? ज्या दिवशीं मीं माझें नगरांत प्रवेश केला आणि **सेनेट** सभा व सर्व वर्गाचे लोक मला सामोरे आलेले मीं पाहिलें, तेव्हां मला असें वाटलें, कीं, जसें काय **रोम** नगर स्वतःच आपल्या संरक्षकाच्या आलिंगनाकरितां पायापासून उपडून मजकडे धांव घेत आहे. आणि त्या दिवशीं मला असें वाटलें कीं, जसा काय मी अजरामर प्राणी आहें. प्रत्येक दरजाचे, पदवीचे, आणि धंद्याचे आबालवृद्ध पुरुष आणि स्त्रिया यांनीं माझा सत्कार केला, यांत काय नवल आहे ? परंतु **रोम** नगराचा प्राकार, गृहें, आणि मंदिरें हीं देखील त्या सार्वजनिक आनंदामध्यें आपला वांटा घेत आहेत असें दिसलें."

**सेनेट** सभेचे सभासद त्यास सामोरे गेले होते. नगराच्या दरवाजाजवळ त्यास बसण्याकरितां एक सोनेरी मुलाम्याचा रथ तयार ठेविला होता. त्याची स्वारी पहाण्याकरितां सर्व वर्गांच्या लोकांची नगरांत जिकडे तिकडे गर्दी झाली होती; आणि एखाद्या विजयी राजाच्या स्वारीपेक्षां देखील **सिसेरो** याच्या स्वारीचा थाट जास्त मनोवेधक होता.

जशी त्याची संकटावस्था जबर होती तशी त्याच्या अत्यानंदास-

ही मर्यादा राहिली नव्हती. त्यानें अत्यंत अलंकारयुक्त आणि मनोवेधक अशीं दोन भाषणें केलीं; त्यांत एक **सेनेट** सभेंत, आणि दुसरें एकत्र जमलेल्या नगरवासी लोकांसमोर. **सेनेट** सभेंतील भाषणांत त्यानें प्रथम त्या सभेची आणि मग दोन **कॉन्सल**ची आपणास परत बोलाविल्याबद्दल फार स्तुती केली. नंतर आपण **रोम** नगर सोडून कां गेलों, शस्त्र धारण करून **क्लोडियस** याच्या समोर कां उभा राहिलों नाहीं, याची कारणें सांगितलीं. तो म्हणाला कीं, " शस्त्र धारण करून **क्लोडियस** याजबरोबर सामना करण्याचें माझे अंगीं धैर्य किंवा सामर्थ्य नव्हतें असें मुळींच नाहीं. हें आपणास माहीत आहे. परंतु मी असा विचार केला कीं, **क्लोडियस** याचा पराभव केल्यानें कांहीं वैर संपणार नव्हतें. त्याचा पक्ष धरल्यामुळें जे माझे स्वाभाविक वैरी बनले होते त्यांचाही मला नाश केला पाहिजे होता. आतां शत्रूंनीं माझा एकट्याचा नाश केल्यानें वैराग्नी शांत होईल असें असतें तर कांहीं चिंता नव्हती. परंतु मजकरितां, माझ्याबरोबर, आणि माझ्या मागेंही, चांगल्या पुष्कळ लोकांना आपले प्राण बळी देण्याचा प्रसंग आलाच असता. मी **कॉन्सल** असतां शस्त्राचा उपयोग केल्यावांचून राष्ट्राचा बचाव केला असून मी अनधिकारी होऊन प्रजा बनल्यावर माझ्या स्वतांच्या संरक्षणाकरितां मी शस्त्र धारण करावें आणि तेणेंकरून **रोमन** लोकांचा रक्तश्राव व्हावा हें कांहीं मला उचित वाटलें नाहीं. माझ्या दुर्दैवाबद्दल चांगल्या मनुष्यांनीं दुःखी व्हावें हे बरें; परंतु मजकरितां त्यांनीं दुर्दैवी व्हावें हें कांहीं मला योग्य वाटलें नाहीं. आणखी मी असा विचार केला कीं, मी मारला गेलों असतां तो मृत्यु मला स्वतःला अपयशस्कर होईल. परंतु

मी जर दुसऱ्या पुष्कळ लोकांसह नाश पावलों तर ती गोष्ट सगळ्या राष्ट्राला विपज्जनक होईल."

**सिसेरो**नें देशनिकालशासनाबद्दल जें आपलें दैन्य दाखविलें तें त्याच्या मोठेपणास एक मोठें लांछनच होतें. परंतु **क्लोडियस** याजबरोबर मारामारीचा प्रसंग न आणितां त्या देशनिकालशासनाचा अंगिकार केला हें कांहीं त्याचें सामान्य प्रशंसनीय कर्म नाहीं. जगांत आपली फटफजिती करून घेण्यापेक्षां आत्महत्या करणें बरें असें ज्यास वाटलें होतें तो आपल्या जिवितासाठीं भिऊन **क्लोडियस**च्या समोर झाला नाहीं असा प्रकार मुळींच नव्हता. नगरवासी लोकांपुढील भाषणांत आपल्या पुनरागमनाबद्दल **सिसेरो**नें आपला स्तव केला; व **रोम** नगराला आपल्यासारख्या विख्यात पुरुषाची पुनः प्राप्ती झाल्याबद्दल त्याच्या प्रारब्धाची वाखाणणी केली. परम विख्यात **रोमन** लोक देशनिकालशासनापासून मुक्त करून परत बोलाविण्यांत आले; परंतु मी **रोम**नगरीं परत येतांना इटाली देशांतील लोकांनीं व **रोम**नगरीं आल्यावर नगरवासी लोकांनीं माझा जसा सन्मान केला तसा कधीं कोणाचा केला नाहीं असें तो ह्मणाला.

समाजांत जे दंगेखोर लोक असतात त्यांचा जिकडे पहाल तिकडे एकच मासला ! त्यांस चिथावून देणारा भेटला ह्मणजे ते अविचारानें अमूक एक अशुद्ध कर्म करणार नाहींत असें कांहीं सांगू शकवणार नाहीं. लोकसमाजापुढें **सिसेरो**चें भाषण चाललें असतां व त्याबद्दल त्याची लोक वाहवा करीत असतां **क्लोडियस** यानें त्या समाजांतील दंगेखोर लोकांच्या मनांत असें भरवून दिलें कीं, **रोम** नगरांत धान्य फार महाग होऊन दुष्काळ पडण्याच्या प्रसंगाला जो कारण झाला आहे त्याचें भाषण ऐकून तुम्ही त्याची

वाहवा काय करितां ! त्याला सन्मान देण्याकरितां इटाली देशांतील असंख्य लोक **रोम** नगरांत येऊन भरल्यामुळें धान्य दुर्मिळ झालें आहे, हें तुमच्या ध्यानांत कसें येत नाहीं ! त्या उनाड लोकांस ती गोष्ट अगदीं खरी वाटली आणि तेथेंच ते **सिसेरो**विषयीं अद्वातद्वा बोलूं लागलें, आणि त्यांनीं असा मोठा दंगा केला कीं, तो मोडण्याकरितां **सेनेट** सभेला **पॉम्पी** यास पूर्ण राजकीय अधिकार देणें भाग पडलें तेव्हां त्यानें तो दंगा मोडला.

**सिसेरो रोम** नगरीं परत आला व पुनः पूर्वींप्रमाणें वर्चस्वास पावला. परंतु त्याच्या स्थावरजंगम मिळकतीची **क्लोडियस** यानें नासाडी केली होती त्याबद्दलचें नुकसान त्यास भरून देण्याचें काम बाकी राहिलें होतें. त्या कामीं ज्या अनेक हरकती आणण्यांत आल्या त्यांत प्यालेंटाईनच्या टेंकडीवरील त्याचा महाल **क्लोडियस** यानें जाळून त्या ठिकाणीं एक देव मंदीर बांधिलें होतें ती जागा त्यास परत देऊन पूर्वींप्रमाणें वाडा बांधून द्यावा किंवा नाहीं या प्रश्नाचा उलगडा करितांना मोठी अडचण येऊन पडली. ज्या ठिकाणीं देवमंदीर बांधिलें गेलें आहे ती जागा कांहीं परत देतां येत नाहीं अशी **क्लोडियस**नें हरकत आणिली. तेव्हां धर्माधिकारी लोकांचा अभिप्राय विचारण्याकरितां हें प्रकरण त्यांजकडे पाठविण्यांत आलें. **सिसेरो**च्या वक्तृत्वशक्तीचा प्रभाव आपणास माहीत झाला आहेच. धर्माधिकारी यांनीं त्याचें भाषण ऐकून लागलीच असा अभिप्राय दिला कीं ती जागा त्यास परत दिली असतां धर्माचा अतिक्रम केला असें कांहीं होत नाहीं. हें प्रकरण शेवटीं निर्णया करितां **सेनेट** सभेपुढें आलें तेव्हां **क्लोडियस** यानें पुनः हरकत घेतली. त्यानें एकसारखें तीन तासपर्यंत या विषयावर भाषण केलें व पुढेंही तो जास्त बोलणार होता. कोणीकडून तरी वेळ मारून न्यावी हा

त्याचा मुख्य उद्देश होता; पण **सेनेट** सभेनें त्यास जास्त बोलूं दिलें नाहीं. आणि ती **सिसेरो**च्या तर्फे ठराव करण्याच्या विचारांत होती तों तेथें एक नवेंच विघ्न उत्पन्न झालें. ट्रायबून **सेऱ्यानस** ( Serranus ) यानें आपल्या अधिकारबळानें **सेनेट** सभेस ठराव करण्याचा निषेध केला. आतां पुढें करावें काय याचा मोठा विचार पडला. ट्रायबूनचा तो कायदेशीर अधिकार होता, यामुळें त्याचा अतिक्रम करून **सेनेट** सभेला कांहीं करितां येत नव्हतें; परंतु **सिसे-रो**ला परत बोलाविण्याबद्दल तिनें कायदा केला, तेव्हां एका ट्राय-बूननें अशीच हरकत आणिली होती, पण ती कांहीं **सेनेट** सभेनें मानली नव्हती. त्याचप्रमाणें **सेऱ्यानस** याचाही निषेध मानावयाचा नाहीं असा त्या सभेनें निश्चय केला आणि सरकारी इंजिनियरानें मक्तच्यानें इमारतींचीं कामें देऊन **सिसेरो**च्या सर्व इमारती पूर्वी-प्रमाणें बांधून द्याव्या असा ठराव करून सर्व माजिस्ट्रेटांस असा हुकूम दिला कीं सभेचा ठराव अमलांत आणण्याकरितां त्यांनीं चांगली मदत करावी, आणि **सेऱ्यानस** यास असें बजाविलें कीं तुझ्या दुराग्रहानें कांहीं वाईट परिणाम झाला तर त्याबद्दल **सेनेट** सभा तुला जबाबदार धरील. या धमकीपासून सभेचा इष्ट हेतू सिद्धीस गेला. **सेऱ्यान**स यास भय वाटलें व त्यानें आपला आग्रह सोडून द्यावा ह्मणून त्याच्या सासऱ्यानें त्याचे घट्ट पाय धरून विन-वणी केली. सेऱ्यानस ह्मणाला कीं, याबद्दलचा विचार करण्या-करितां मला एक दिवसाची मुदत द्या; पण सेनेट सभा कांहीं ती गोष्ट कबूल करीना. शेवटीं **सिसेरो**च्या विनंतीवरून त्यास एक दिवसाची मुदत दिली.

**सेऱ्यानस**नें त्या रात्रीं विचार केला आणि त्यास असें वाटलें कीं, आपण आपला आग्रह धरून बसलों आणि त्यापासून कांहीं

वाईट झालें तर आपल्यावर काय जबाबदारी येईल याचा नेम नाहीं यास्तव आपण मागें घ्यावें हें बरें; असा विचार करून त्याप्रमाणें त्यानें दुसरें दिवशीं आपली हरकत काढून घेतली, आणि **सेनेट** सभेनें **सिसेरो**ची मालमिळकत त्यास परत द्यावी, त्याच्या इमारती पुनः जशाच्यातशा बांधून द्याव्या आणि त्याचे सर्व नुकसान सरकारांतून भरून द्यावें असा ठराव केला, व तो अमलांतही आला. परंतु झालेलें नुकसान भरून देण्याचा प्रसंग आला म्हणजे तें कांहीं पूर्णपणें भरून दिलें जात नाहीं ; आणि भरून दिलें तर दिलें असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. आपल्या नुकसानीचा पूर्ण मोबदला आपणास मिळाला नाहीं असें **सिसेरो**चें म्हणणें होतेंच.

**क्लोडियस** अगदीं हात धुवून **सिसेरो**च्या पाठीस लागला होता. तो जिवंत होता तोंपर्यंत त्यानें कांहीं **सिसेरोस** सुखानें झोंप घेऊं दिली नाहीं. प्यालेंटाईनच्या टेंकडीवर **सिसेरो**चा वाडा बांधण्याचें काम चालू असतां तो आपल्या नोकरींतील लोकांच्या जमावासह तेथें गेला, आणि तयार झालेलें इमारतीचें काम पाडून टाकिलें; व दुसऱ्याही ठिकाणच्या तयार झालेल्या इमारती पाडल्या, पण त्याबद्दल त्याला सरकारानें कांहीं शासन केलें नाहीं. यावरून ही गोष्ट अगदीं स्पष्ट होते कीं, **रोमन** राज्यव्यवस्था अगदीं भ्रष्टावस्थेला प्राप्त झाली होती. आणि **सीझर** व **पॉम्पी**सारखे कर्ते पुरुष व दुसरे सरकारी अधिकारी आपला स्वार्थ साधण्याकरितां **क्लोडियस**सारख्या दुष्ट मनुष्याच्या दुष्टाचरणाकडे मुद्दाम कानाडोळा करीत असत; नाहीं तर **रोमन** राष्ट्रासारख्या बलिष्ठ राष्ट्राला **क्लोडियस**सारख्या क्षुद्र मनुष्याचें पारिपत्य करणें यांत दुर्घट तें काय होतें ?

**सिसेरो** परत आल्यावर **पॉम्पी**नें त्यास चांगला आश्रय दिल्या-

मुळें त्यास पूर्वींचें महत्व प्राप्त होण्यास .कांहीं वेळ लागला नाहीं, व तें कमी करण्यास **क्लोडियस**लाही त्रास झाला नाहीं. **क्लोडियस** यास **पॉम्पी**चा पूर्वीं आश्रय होता, परंतु तो पुढें फारच बहकून अति वाईट कर्में करूं लागल्यामुळें **पॉम्पी**चें मन त्यावरून अगदीं विटून गेलें होतें. पण **पॉम्पी** आणि **क्राशस** यांजमध्यें वांकडें असल्यामुळें **क्राशस**नें **क्लोडियस** याचा पक्ष घेतला. **क्लोडियस** यानें आपल्या चाकरीस पुष्कळ लोक ठेविले होते त्याबद्दलचा खर्च चालविण्याकरितां त्यास **क्राशस** पैशाचा पुरवठा करीत असे; असें ह्मणण्यांत आलें आहे.

**रोमन** राष्ट्रांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांची निवडणूक लोकबहुमतानें होत असे; यामुळें एकार्थाभिलाषी असे पुष्कळ लोक असत आणि त्यांजमध्यें नेहमीं वैर माजलेलें असे. **मिलो** नांवाचा एक मनुष्य मोठा दृढनिश्चयी आणि निःशंक होता. तो व **क्लोडियस** हे एकार्थाभिलाषी असल्यामुळें त्या उभयतांमध्यें पराकाष्टेचें वैर माजलें होतें. **मिलो** यानेंही पहिलवान लोक चाकरीस ठेऊन **क्लोडियस** याजबरोबर स्पर्धा मांडिली होती. एकमेकांचा पराजय करण्याकरितां दोन्ही पक्षांचे लोक **रोम** नगरच्या भररस्त्यांत लढाई करून परस्परांचें प्राण घेत असत. शेवटीं एके दिवशीं दोन्ही पक्षाच्या लोकांमध्यें मारामारी होऊन **क्लोडियस** मारला गेला, आणि **मिलो** ह्यास पळून जावें लागलें. **क्लोडियस** लोकप्रिय असल्यामुळें नगरांत मोठा दंगा झाला आणि त्याचा बंदोबस्त करण्याकरितां **पॉम्पी** यास **सेनेट** सभेनें कुलअधिकार दिला, तेव्हां त्यानें जिकडे तिकडे स्थीरस्थावर केलें.

**क्लोडियस** असल्या दुष्ट कर्मानें आपल्या शत्रूच्या हातून अशा वधास पात्र झाला होता. **पॉम्पी**नेंही त्याचा पक्ष सोडला

होता तरी **मिलो** यास अपराधी ठरवून त्यास शासन करावें असें **पॉम्पी**च्या मनांत होतें. यावरून **मिलो**विषयीं **पॉम्पी**च्या मनांत द्वेषभाव होता असें दिसतें.

निवडलेल्या जूरीपुढें **मिलो** याची चौकशी सुरू झाली. **सिसेरो** हा त्याच्या तर्फेचा बॅरिस्टर होता. **पॉम्पी** याच्या मनांत तर त्यास अपराधी ठरवावयाचें होतें. अर्थात उभयतांमध्यें पुनः वांकडेपणा येण्याचा प्रसंग आला. **रोमन** लोकांची राजकीय आणि सामाजिक स्थिति अशी कांहीं विलक्षण झाली होती कीं परस्परांमध्यें झालेली मैत्री फार काळपर्यंत कधींही टिकाव धरून राहिली नाहीं. एकाचे दोन शत्रू परस्परांचे कट्टे वैरी असले तरी कार्यापुरते मात्र परस्परांचे परम मित्र होत असत. आणि कार्यभाग आटोपला ह्मणजे पूर्वस्थळावर गोष्ट येई. आरोपीची चौकशी चालत होती तेथें जूरीला धाक दरारा दाखविण्यासाठीं **पॉम्पी**नें दंगाधोपा होऊं नये या मिषानें चहूंकडे हत्यारबंद लोकांचें पहारे ठेविले होते. स्वतंत्रपणानें आणि निःपक्षपातानें आरोपीचा न्याय व्हावा असा जेथें कायदा होता तेथें अशा प्रकारचें भयप्रदर्शन करणें हें पराकाष्ठेचें अन्यायकर्म होतें. **पॉम्पी** यानें कोर्टांत हत्यारबंद लोक कशासाठीं आणिले होते हें **सिसेरो**स चांगलें माहीत होतें; पण त्यानें जसें काय ते लोक कोर्टाच्यास्वास्थ्य संरक्षणासाठीं आणिले होते असें आपण समजतों असें दाखवून त्यासंबंधानें आरंभीं जें भाषण केलें तें फार मनोवेधक असून व्याजोक्तीचा एक अत्युत्तम नमुना आहे.

**सिसेरो** ह्मणाला 'सद्गृहस्थहो' मी एका शूर पुरुषाचा निरपराधीपणा सिद्ध करून देण्याकरितां येथें उभा राहिलों असतां, भित्रेपणा दाखविणें हें लाजिरवाणें आहे; आणि त्यांत '**मिलो**' स्वतःच आपल्या सुरक्षितपणापेक्षां राष्ट्राच्या सुरक्षितपणाविषयीं फार

ज्यास्त काळजी बाळगीत असल्यामुळें त्याचा बचाव करीत असतां मी निर्भयमनस्क नसावें हें ज्यास्त लाजिरवाणें आहे असें मीं समजतों. तथापि हा चमत्कारिक देखावा आणि ह्या न्यायसभेची विलक्षण रचना पाहून माझी नजर चळून बुद्धि गुंग होऊन जाते. कारण जिकडे पहावें तिकडे सगळी नवीच रचना. प्राचीन चालीप्रमाणें आरोपीचा न्याय करण्याकरितां कांहींच योजना केलेली दृष्टीस पडत नाहीं; कारण तुमच्या न्यायसभेभोंवतीं ज्यांनीं घेरा घातला आहे तो तुमचा नेहमींचा श्रोतृसमाज नाहीं. सर्व मंदिरांच्या पुढें जे हत्यारबंद लोक उभे केले आहेत ते जरी दंग्याधोप्याच्या बंदोबस्तासाठीं उभे केले आहेत, तरी वकिलांवर हा एक प्रकारचा बलात्कारच आहे. कारण, ज्यांनीं आपल्यास वेढा घातला आहे त्या लष्करी लोकांची न्यायसभेंत गरज आहे तरी तसें करण्यांत कांहीं तरी दुसरा उद्देश आहे अशी आपल्या मनांत धास्ती उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं. आणि मी जर असें मानिलें असतें कीं, '**मिलो**' यास अपराधी ठरविण्यासाठीं हा सर्व व्यूह रचला आहे तर मग मी, सद्गृहस्थ हो ! **मिलो** याचा बचाव करण्याच्या खटपटींतच पडलों नसतों. कारण जेथें शस्त्रांस्त्राचें भयप्रदर्शन करण्यांत येतें तेथें वकीलाच्या बुद्धीचा आणि वाक्चातुर्याचा उपयोग काय ? परंतु एका फार शहण्या व न्यायी मनुष्यानें ही सर्व व्यवस्था केली आहे यामुळें मला उलटें उत्तेजन येऊन मी **मिलो** याचा वकील झालों आहें. **पॉम्पी** फार शहाणा आणि न्यायी आहे. त्यानें आरोपीचा न्याय करण्याचें काम जूरीकडे सोंपविलें आहे. तो त्याला आतां आपल्या शिपायांच्या हवालीं करील, किंवा क्षुब्ध झालेल्या बंडाळखोर लोकांकडून त्याचा नाश करवील असें कधींही घडणार नाहीं. यास्तव ती शस्त्रें, ते सरदार, आणि

शिपायी हे आपणास दांडोरा पिटून असें सांगतात कीं, 'आम्ही तुह्मांस उपद्रव देण्याकरितां आलों नाहीं; परंतु तुमचें संरक्षण करण्यासाठीं आलों आहोंत.' ते आपल्याला असें उत्तेजन देतात कीं, आपण नुसतें अनुद्विग्न असावें इतकेंच नाहीं, पण निर्भय आणि निःशंक असावें. **मिलो** याच्या बचावाकरितां मी हें भाषण करीत असतां नुसतें माझें संरक्षण करण्याविषयीं त्यांनीं मला अभिवचन दिलें आहे असें समजूं नका; तर माझें समग्र भाषण यथासांग तुमच्या श्रवणीं पडावें यासाठीं तें ह्या न्यायसभेंत हूं का चूं होऊं नये असा त्यांनीं बंदोबस्त केला आहे. सद्गृहस्थहो, तुमच्या भोंवती जो दुसरा श्रोतृसमाजाचा गराडा पडला आहे त्यांत बहुतकरून साव्सूद नगरवासी लोक असून ते सर्व आपल्या बाजूस आहेत हें मला माहीत आहे. ह्या समाजांत असा एकही मनुष्य नाहीं कीं, जो आरोपीचा धीटपणा पसंत करीत नाहीं, आणि आपलें, आपल्या मुलाबाळांचें, आणि राष्ट्राचें दैव आजच्या न्यायपरिणामावर अवलंबून आहे असें ज्याला वाटत नाहीं असाही मनुष्य ह्या समाजांत नाहीं."

**मिलो** यानें आपला बचाव करण्याकरितां **क्लोडीयस** यास मारिलें म्हणून तो कांहीं अपराधी नाहीं. कदाचित् त्याजविषयीं अगदीं प्रतिकूल विचार केला तरी **क्लोडीयस** हा राष्ट्राचा शत्रू असल्यामुळें अशा मृत्यूस पात्रच होता ह्मणून तिकडूनही **मिलो** अपराधी ठरत नाहीं, असें **सिसेरोनें** उपपत्तीपूर्वक सिद्ध करून दिल्यानंतर त्यानें आपल्या भाषणाचा उपसंहार करितांना जें करुणारसप्रधान भाषण केलें आहे तें रसिक जिज्ञासूंनीं निराळेंच वाचावें असें तें मनोवेध आहे. या चरित्रांत त्या भाषणाचा संक्षेपानें देखील समावेश करणें शक्य नाहीं.

**सिसेरो** याच्या भाषणापासून कांहीं अर्थ निष्पन्न झाला नाहीं. **मिलो** यास प्रतिकूल अशीं अधिक मतें पडल्यामुळें तो अपराधी ठरला.

**सीझर** आणि **पॉम्पी** यांच्या संबंधाचा कांहीं जास्त वृतांत ह्या चरित्रांत सांगण्यासारखा आहे. कारण कीं, **सिसेरो**चा त्याशीं संबंध आहे. हे दोघेही मोठे महत्वाकांक्षी असल्यामुळें आपल्या इच्छा पूर्ण करण्याकरितां आपण ज्या मार्गाचा अवलंब केला आहे त्यापासून **रोमन** राष्ट्राला किती विपन्नावस्था प्राप्त होत आहे तें त्यांच्या ध्यानीं मनींही नव्हतें.

**रोमन** राष्ट्रासारखें विस्तृत आणि बलाढ्य राज्य या जगतीतलावर पुनः उत्पन्न होईल असें कांहीं कोणी सांगूं शकणार नाहीं. तें राज्य अगदीं रानटी लोकांनीं लयास नेलें. ती अवस्था त्यास प्राप्त होण्यास अनेक कारणें आहेत. त्यांत आपसांतील लढायामुळें तर जसा **रोमन** राष्ट्राचा विध्वंस झाला तसा कांहीं इतर सर्व कारण समुच्चयापासुन झाला नाहीं.

अर्वाचीनकाळीं **यूरोप**खंडांतील राष्ट्रांत आपआपासांत लढाया झाल्या नाहींत असें नाहीं, पुष्कळच झाल्या; परंतु प्राचीनकाळीं **रोमन** राष्ट्रांत आपआपसांत ज्या लढाया झाल्या त्यांतील आणि अर्वाचीन काळच्या आपआपसांतील लढायांतील उग्रत्वांत आणि दुराग्रहमूलक दीर्घ प्रयत्नांत फार अंतर आहे. अर्वाचीन काळीं उपस्थित झालेल्या लढायांत धर्माचे स्वातंत्र्याचें, किंवा राजकीय हक्काचें कांहीं तरी कारण असे. निदान तसें कांहीं कारण आहे असें निमित्त तरी दाखविण्यांत येत असे.

ज्यांची स्वतंत्र मिळकत असे व ज्यांचें राष्ट्रांतील लोकांवर वजन असे ते लोक दोन्ही पक्षांचे पुढारी असावयाचेच. सैन्यांतील

शिपाई लोक आपल्या पक्षाचा जय झाला असतां कांहीं तरी आपल्यास चिरस्थाई लाभ होईल या आशेनें लढत असत. संग्रामोत्सौक्य आणि गृहित पक्षाविषयीं परमास्था ही समाजांत चांगल्या रीतिनें पसरल्यामुळें एका पक्षाचा पराभव झाला कीं, त्या पक्षाची सरशी व्हावी ह्मणून नवे पक्षधारी आपले प्राण देण्यास तयारच असत तो प्रकार **रोमन** राष्ट्रांतील आपसांतील लढायांत मुळींच नव्हता. तें राष्ट्र आपसांत भांडून रसातळास गेलें तें फक्त **रोमन** राष्ट्राचा अधिकार कोणी चालवावा याकरितां, ह्मणजे एका व्यक्तीकरितां. राष्ट्रहिताकरितां म्हणून आपसांत एकही लढाई झाली नाहीं. राज्याधिकाराविषयीं सस्पृह झालेल्या उमेदवारांना जे लोक सहाय करीत त्यांत खऱ्या कळवळ्याचे फारच थोडे. भयानें किंवा पुष्कळ लाभ होईल या आशेनें कोणत्या तरी एका पक्षास जाऊन मिळावयाचे. राष्ट्राच्या हिताविषयीं मनांत कळकळ बाळगणारा असा त्यांत एकही माईचा पुत नसे. जो मोठें बक्षीस देईल किंवा देण्याविषयीं अभिवचन देईल त्यास सहाय करण्यास लोक तयार असत. मग तो कोणत्याही देशांतला, कोणत्याही वर्गांतला, आणि कोणत्याही जातींतला कां असेना, त्याविषयीं विचार ह्मणून मुळींच नव्हता. आणि त्याचा पराजय झाला किंवा त्यापासून दिलेल्या अभिवचनाप्रमाणें आपणास कांहीं प्राप्ती होत नाहीं असें समजलें ह्मणजे सैन्य त्याला सोडून चाललें दुसऱ्याकडे! आपसांतील लढायांत **रोमन** प्रजेला आपण वागावें कसें हें कांहीं कळेनासें झालें होतें. एका समयास तीन तीन चार चार एकार्थाभिलाषी उत्पन्न होत असत. एका नगरानें किंवा प्रांतानें एकाचें स्वामित्व कबूल केलें कीं दुसऱ्यानें त्या नगराची किंवा प्रांताची राखरांगोळी केलीच! व त्याचें स्वामित्व कबूल केल्याबद्दल तिसऱ्याच्या उपद्रवाला तें बिचारें पात्र

आहेच. काष्ठाच्या दोन्ही टोंकांनीं पेट घेतला असतां किंवा कुंभाराचा आवा चहूंकडून पेटला असतां तस्थ जीवांना जसा तरणोपायच नाहींसा होतो, तशी रोमन प्रजेची स्थिती झाली होती.

आतां ही स्थिती मनांत आणून विचार केला असतां राजसत्ताक राज्यपद्धत जितक्या अंशानें गौण मानण्यांत आली आहे तितक्या अंशानें ती गौण नसून प्रजासत्ताक राज्यपद्धत जितक्या अंशानें श्रेष्ठ मानिली गेली आहे तितक्या अंशानें ती श्रेष्ठ नाहीं, असें दिसून येतें. प्रत्येक गोष्टीविषयीं गुणदोषविवेचन करणें हा सुविचारी मनुष्याचा धर्म आहे. आणि त्या दृष्टीनें विचार केला असतां राजसत्ताक राज्यपद्धतींत एक मोठा गुण आहे. धनगराच्या पश्चांत मेंढ्यांच्या कळपाचे स्वामित्व त्याच्या मुलाकडे येतें त्याप्रमाणें राष्ट्राचा राजा मरण पावला म्हणजे त्याच्या पाळण्यांत खेळणाऱ्या मुलाकडे राष्ट्राचें स्वामित्व यावें आणि मोठे शूर आणि मुत्सद्दी यांनीं त्याजपुढें दंडवत घालून त्याजबरोबर निःसिम राजनिष्ठपणानें वागण्याविषयीं शपता घ्याव्या ही गोष्ट लाजिरवाणी आहे यांत कांहीं संशय नाहीं. परंतु जन्महेतुक राज्याधिकार म्हणजे राजाच्या मागें अमुकानें राजगादीवर बसावें या नियमापासून राष्ट्राचें फार हित झालेलें आहे व होत आहे. या राज्यपद्धतींत ज्यानें उठावें त्यानें राजपदाची इच्छा करावी या महत्वाकांक्षेला मनुष्याच्या मनांत मुळींच जागा मिळत नाहीं.

रोमन लोकांच्या प्रजासत्ताक राज्याला आरंभ झाल्यापासून रोमन राष्ट्राचा पूर्ण लय होईपर्यंतचा इतिहास तुम्ही पाहाल तर त्या राज्याच्या प्रजेला जीं दुःखें भोगावीं लागलीं तशीं कधीं कोणी भोगिलीं नसतील. बडे लोक आणि सामान्य लोक यांजमध्यें वर्चस्वाच्या संबंधानें जो वैराग्नी पेटला होता तो कांहीं तें राज्य समूळ

नाश पावेपर्यंत विझाला नाहीं. बडे लोकांच्या हातांत सत्ता होती तोंपर्यंत त्यांनीं सामान्य लोकांचा अतीशय छळ केला आणि सामान्य लोकांच्या हातीं सत्ता आल्यावर त्यांनीं बडे लोकांचीं वंशविशुद्ध आणि राजमान्य घराणीं लयास नेलीं; आणि जो उठला तो राज्य-पदाची इच्छा करूं लागला. महत्वाकांक्षी लोकांचे आशादीप प्रज्वलित होऊन अत्यंत नीच मनुष्यास देखील शौर्य आणि संपत्तीच्या बळानें दुर्बळ राज्याधिपापासून साम्राज व लक्ष्मी मुरगाळून घेण्याची इच्छा उत्पन्न झाली. **अलेक्झांडर सरव्हस** याची कत्तल केल्यावर आणि **मॅगझिमिन** ( Maxiamin ) साम्राज्याधिप झाल्यावर त्याच्या मागें **रोम**गादीवर जे बादशहा झाले त्यांस आपल्या जिविताचा भरंवसा नाहिसा झाला. बादशहास सिंहासनावर बसविण्यापूर्वी त्याची अगोदर चिता रचून ठेवावी लागत असे, असें एका ठिकाणीं **गिबन्स** यानें ह्मटलें आहे. अशा प्रसंगाचें मूळ बीज पहाल तर अमुकामागें अमुकानें राज्याधिकार चालवावा याविषयीं नियम नव्हता; ह्मणजे राजसत्ताक राज्यपद्धत प्रचारांत नव्हती. प्रजासत्ताक राज्यपद्धतीपेक्षां राजसत्ताक राज्यपद्धत गौण मानिली होती हे होय.

अमुकामागें अमुकानें राजगादीवर बसावें या नियमाचा प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेंत अभाव असल्यानें **रोमन** प्रजासत्ताक राज्य शेवटीं कोणत्या परिणामाला आलें हें जाणण्याकरितां **मॅग्झिमिन** ह्यास राज्यपद कसें प्राप्त झालें याबद्दलचा वृतांत कथन करण्यासारखा आहे.

हा मनुष्य अगदीं रानटी होता. त्याचें शरीर फार धिप्पाड असून शरीरबळ विलक्षण होतें. यानें **सरव्हस** बादशहाच्या पदरचे मोठे बलाढ्य सोळा पाहिलवान एका वेळेस चित केले आणि त्याच्या घोड्याबरोबर तो कित्येक मैल धांवला, उड्या मारल्या,

रानटी नाच नाचण्यांत आपल्या देशबांधवांस मागें टाकिलें, आणि इतकें करूनही सात पहिलवानांबरोबर कुस्ती मारून त्यांस चित केलें तरी त्याला श्रम झाले नाहींत; हें पाहून बादशहा चकित झाला आणि त्यानें त्यास बक्षिस देऊन घोडेस्वारांच्या लष्करांत चाकरीस ठेविलें. पुढें तो सैन्यांत मोठ्या योग्यतेस आला. बादशहा त्याजवर जसजसा अनुग्रह करूं लागला तसतसा तो दुष्ट जास्त बेईमानी होत चालला, आणि आपल्या गुणानुरूप आपणास अद्याप ऐश्वर्य प्राप्त झालें नाहीं असें त्यास वाटूं लागलें, व परवशता त्यास आवडेनाशी झाली. त्याजमध्यें दुसरें कांहीं शहाणपण नव्हतें; परंतु आत्महित कसें साधावें या कामीं तो बडा खबरदार होता. सैन्याची आपल्या बादशहावर प्रीती नाहीं हें त्यास समजल्यावर आपलें हित साधण्याकरितां तो सैन्यांत जास्त असमाधान वाढाविण्याच्या उद्योगास लागला. सैन्याला वारंवार बक्षिसें मिळेनाशीं झालीं आणि त्याचे मनोरथ पूर्ण होईनासे झाले, ह्मणजे त्याच्या मनांत नीतिमान राजाविषयीं देखील दुष्टभाव उत्पन्न करण्यास कांहीं कठीण पडत नसे; अशी **रोमन** सैन्याची तत्कालिन स्थिती होती. सैन्याचा सरदार अत्यंत शूर आणि मोठा उदार असल्यावांचून कांहीं त्याजवर सैन्याची प्रीती बसत नाहीं. परंतु अत्यंत शौर्य बहुतकरून रानटीलोकांचे ठायीं वास करीत असतें; आणि मोठ्या औदार्याला द्रव्याची गरज असल्यामुळें लोकांच्या संपत्तीवर धाड घातल्यावांचून मोठें औदार्य दाखवितां येत नाहीं. बादशहा **सरव्हस** याजमध्यें हे दोन्हीही गूण त्याच्या सैन्याला संतुष्ट ठेवण्यापुरते नव्हते. यामुळें **मॅग्झिमिन** याचें ह्मणणें सैन्यांतील लोक मोठ्या आनंदानें ऐकूं लागले. आपल्या मातोश्रीचा आणि **सेनेट** सभेचा जो केवळ दास बनून राहिला आहे आणि ज्यानें सतत तेरा वर्षें

पर्यंत कडक सैनिक अनुशासनाखालीं तुह्मास त्रस्त करून सोडलें आहे त्याचे तुह्मी आज्ञाधारक बनून राहिलां आहांत हें तुह्मांस मोठें लांछन आहे असें त्या दुष्टानें सैन्याच्या मनांत भरवून दिलें.

एके वर्षीं बादशहा डान्यूब नदीच्या किनाऱ्यावर सैन्याची छावणी देऊन राहिला होता. एके दिवशीं मॅग्झिमिन कवाईत घेत असतां सैन्यानें त्याच्या नांवाचा जयजयकार करून त्यास आपला बादशहा केलां. आणि सरव्हस याचा वध करण्याकरितां कांहीं लोक त्याच्या तंबूकडे धांवत गेले, आणि अत्यंत निर्दयपणानें त्यांनीं त्याचा वध केला. तें त्यांचें कर्म इतकें उग्र होतें कीं, तें आपल्याच्यानें बोलवत किंवा लिहवत नाहीं. मानवी प्राण्याच्या अशा जातीच्या उग्र· कर्मांवरून आपणास असें ह्मणणें भाग पडतें कीं, त्याच्यासारखा दुष्ट प्राणीही या भूतलावर दुसरा नाहीं.

रोमच्या गादीवर नेरो, कामोडस वगैरे पुष्कळ क्रूर आणि दुष्ट बादशहा होऊन गेले, परंतु मॅग्झिमिन याच्या क्रौर्याचे आणि दुष्टत्वाचें उगमस्थान कांहीं वेगळेंच होतें. तो आपला भीमविग्रही देह, ती आपल्या शरीराची आठ फूट उंची, तें आपलें वेडेंविद्रें भयानक रूप, राजकीय शहाणपणाविषयीं तर आंवळ्या येवढें पूज्य, आणि आपला रानटी लोकांत व हीनकुलीं जन्म या सर्व गोष्टींनीं आपण रोम राज्यपदास सर्वथैव अपात्र आहोत हें तो पक्कें जाणून होता. त्यास आपल्या पूर्वीच्या कंगाल अवस्थेचें चांगलें स्मरण होतें. रोम येथील बडेलोकांच्या दर्शनाकरितां त्यांच्या दरवाजावर प्रहरोन प्रहर तो उभा राहिला असतां त्यांच्या मगरूर सेवकांनीं त्यास दरवाजांत पाय घालूं दिला नाहीं हें कांहीं तो विसरला नव्हता. कांहीं सज्जन लोकांनीं त्याचे दारिद्र्य निवारण करून त्यास चांगल्या स्थितीला आणलें होतें हें-हीं त्याच्या ध्यानांत होतें ; परंतु त्याच्या दुष्ट दृष्टीनें उपकार कर-

णारे आणि अपकार करणारे हे दोघेही सारखेच अपराधी होते. ज्यांनीं त्याला अपकार केले होते त्यानां त्यानें मारून टाकिलें हें त्याच्या दुष्ट स्वभावानुरूपच होतें; परंतु ज्यांनीं त्याजवर उपकार केले होते ते त्याची प्राथमिक दीनावस्था जाणत होते, हाचं काय तो त्यांचा वधार्ह अपराध! आणि त्याबद्दल त्यानें त्यांचे प्राण घेतले. त्या दुष्टात्म्याचें मन सत्कुलोत्पन्न आणि गुणवान लोकांविषयीं सदैव संशयी असे. आपल्या विरुद्ध कोणी कांहीं कारस्थान रचलें आहे असें त्याला समजलें म्हणजे त्याच्या क्रौर्याला आणि निर्दयपणाला सीमाच नाहींशी होई.

तो जोंपर्यंत बडे लोकांचा नाश करीत होता तोंपर्यंत सामान्य लोकांचा त्याच्या दुष्कर्माकडे कानाडोळा होता. परंतु शिपाई लोकांची धनतृष्णा पूर्ण करण्याकरितां जेव्हां त्यानें देवार्पण धनावर व सर्व वर्गांच्या लोकांच्या मिळकतीवर हात घातला तेव्हां त्याचा जुलूम आणि बलात्कार अगदीं असह्य झाला. द्रव्यापहार करण्यांत त्यानें इतका अन्याय केला कीं, अत्यंत द्रव्यलोभी शिपाई देखील त्या द्रव्यांत वांटा घेण्यास लाजूं लागले, आणि त्याच्या नाशाकडे सर्व राष्ट्राचें लक्ष लागलें. चहूंकडे बंडें झालीं, आणि एकेदिवशीं त्याच्या भरंवशाच्या लोकांनींच त्याच्या तंबूंत जाऊन त्याचा व त्याच्या पुत्राचा वध करून त्याची बादशाही लयास नेली. त्या मनुष्यरूप राक्षसानें तीन वर्षें राज्य केलें त्यांत **रोमन** लोकांवर त्यानें जो जुलूम केला तसा कधीं कोणी कोणावर केला नसेल.

सांगण्याचें मुख्य तात्पर्य हें आहे कीं, ज्या प्रजासत्ताक राज्यपद्धतीविषयीं **सिसेरोला** मोठा अभिमान होता व त्याचे संरक्षण करण्याकरितां त्यानें आपला प्राण देखील बळी दिला, त्या राज्यपद्धतीपासून असे दुष्ट परिणाम घडून आले. यावरून अमुकामागें अमु-

कानें राज्यकारभार चालवावा हा नियम त्या राज्यपद्धतींत क-रितां येत नाहीं हा मोठा दोष आहे. आतां वरील प्रकार सिसेरो-च्या मागें पुष्कळ वर्षांनीं घडला हें खरें आहे; परंतु वास्तविक पाहिलें असतां रोमन प्रजासत्ताक राज्य अशा दुष्ट परिणामाला येऊन पोंचण्याच्या पंथास कधींपासूनच लागून चुकलें होतें.

अमेरिकेंतील युनायटेडस्टेटसचा कारभार प्रजासत्ताक राज्यपद्धतीनें फार उत्तम रीतीनें चालला आहे असें कित्येकांचे म्हणणें आहे. परंतु त्यांत देखील एका वर्गाच्या लोकांवर अन्यायानें जुलूम व बलात्कार होतात. जेव्हांपासून सामान्य वर्गांतील लोकांचें वर्चस्व स्थापन होऊन सर्व राज्यसूत्र त्यांच्या हातांत आलें तेव्हांपासून त्या लोकांच्या लहरीप्रमाणें कायदेकानू आणि रीतिभाती प्रचारांत आल्या आहेत. राजकीय कामांत बडे लोकांचें वजन इतकें कमी झालें आहे कीं, त्यांची संपत्ती आणि वैभवही त्यांस उलटीं अपायकारक झालीं आहेत. सामान्य वर्गाच्या लोकांबरोबर भांडण्याचें त्यांनीं आतां सोडून दिलें आहे. पाहिजे तर त्यांनीं आपल्या बायकांपासून किंवा चाकरांपासून आपली बडेजाव करून घ्यावी. लोकांत त्यांस कोणी विचारीत नाहीं. या स्थितीला ते स्वसंतोषानें कांहीं वश झाले नाहींत; उपाय नाहीं म्हणून वश झाले आहेत. त्याबद्दल त्यांनीं आपला असंतोष इतका झांकून ठेविला आहे कीं, आपल्यास उपद्रव होत आहे असें ते दाखवीत नाहींत. उलटें प्रजासत्ताक राज्याविषयीं आपला मोठा संतोष दाखवितात. मधल्या काळांत ( Middle age ) ज्यू लोक जशी आपली संपत्ती लपवून ठेवीत असत त्याप्रमाणें अमेरिकेंतील बडे लोक आपली संपत्ती लपवून ठेऊं लागले आहेत. त्यांचे पोषाख अगदीं साधे असतात. त्यांचें वर्तन साळसूदपणाचें दिसतें; पण त्यांचें अंतःकरण पहाल

तर मोठें हेवेखोर आहे. निवडक मंडळीखेरीज ते कधीं कोणाला आपल्या घरीं येऊं देत नाहींत. पण बाहेर निघाले ह्मणजे सर्वांशीं मोठ्या गोडीगुलाबीनें वागतात. परंतु त्या राज्यपद्धतीविषयीं त्यांस अंतःकरणापासून तिरस्कार आहे. सामान्य वर्गांतील लोकांचा त्यांस जितका तिटकारा आहे तितकेंच त्यांचें त्यांस भयही आहे. प्रजासत्ताक राज्याच्या कारभाराचा जेव्हां असा परिणाम होईल कीं, राज्यसत्ताक स्थापन करण्याचीं चिन्हें दिसूं लागतील तेव्हां बडे कोकांच्या अंतःकरणांतील वर लिहिलेले मनोधर्म केव्हांच प्रगट होतील*

यावरून ही गोष्ट अगदीं खास आहे कीं, प्रजासत्ताक राज्यपद्धत राष्ट्रांतील सर्व लोकांना सुखकारक आहे असें मुळींच नाहीं. आज इंग्लंडांतील बडे लोकांच्या हक्काला अपायकारक असे कायदे कॉमन्स सभेंतून होत नाहींत कीं काय? नेहमीं होतात. एका राज्यपद्धतींत मोठ्या समाजाचा अल्प समाजावर जुलूम होत आहे तर दुसऱ्या राज्यपद्धतींत अल्प समाजाचा मोठ्या जनसमूहावर जुलूम होत आहे. परंतु तत्वदृष्ट्या विचार केला तर राज्याच्या सत्तेला मर्यादा केलेली आहे आणि प्रजा जर आपलें खरें स्वरूप पूर्णपणें जाणत आहे तर राजसत्ताक राज्यपद्धत इतर पद्धतीहून उत्तम आहे यांत संशय नाहीं.

वरील निरूपणावरून **सीझर** आणि **पॉम्पी** यांजमध्यें कां झगडा लागला होता व त्यापासून **रोमन** राष्ट्रावर कोणते वाईट परिणाम घडून आले हें सहज लक्ष्यांत येईल. दोन मत्त गज कु-

---

* अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्य (Democricy & America) बुक पहिलें, पान १७९।८०. De Tocguevill.

दलीवनांत भांडत असतां त्या वनाचा जसा विध्वंस होतो तसा त्या दोघांच्या भांडणांत **रोम** राष्ट्राचा होत होता. दोघांमध्यें साम करवून कलह मिटवावा यासाठीं पुष्कळ प्रयत्न करण्यांत आले, परंतु ते कांहीं सिद्धीस गेले नाहींत. **पॉम्पीनें सीझरची** कन्या **जुलिया** हिला सोडचिठ्ठी देऊन दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न केल्यामुळें उभयतांमध्यें शरीरसंबंधानें जो प्रेमबंध होता तोही तुटला होता. दोघांमध्यें लढाया होऊनं दोघांचेही जय-पराजय होतां होतां शेवटीं एका लढाईंत **पॉम्पी**चा पराभव होऊन त्यास पळूनही जावें लागलें. **सीझर**च्या पायदळापुढें **पॉम्पी**च्या घोडेस्वारांचें कांहीं चाललें नाहीं. **पॉम्पी** जलमार्गानें या बंदराहून त्या बंदरीं पळत फिरत होता. त्याचा नांवलौकिक फार मोठा होता, व त्यानें पुष्कळांवर उपकारही फार केले होते; परंतु तो पराजित आहे असें समजल्यावर त्यास कोणीच आश्रय देईना. शेवटीं तो **माइटीलेन** येथें येऊन पोहोंचला. तेथें त्यानें आपलीं बायकामुलें ठेविलीं होतीं. त्याच्या बायकोला त्याच्या लष्करांतील एका सरदारानें पूर्वीं अशी बातमी सांगितली होती कीं, **सीझर**चा पराभव होऊन तो **पॉम्पीस** शरण देखील आला आहे; पण **पॉम्पी** स्वतां तिला भेटला तेव्हा त्या बिचारीचें सर्व मनोराज्यच विलयास गेलें. आतां आश्रय तरी कोणाचा करावा, याविषयीं विचार होऊन **इजिप्ट** देशाच्या राजाच्या आश्रयास जावें असें ठरलें. त्या राजावर **पॉम्पीनें** मोठे उपकार केले होते. त्याला त्याच्या प्रजेनें राजपदावरून काढून टाकिलें असतां **पॉम्पीनें** त्याचा पक्ष घेऊन त्यास पुन्हा गादीवर बसविलें होतें, व त्याच्या संरक्षणाकरितां त्यानें आपल्या भरंवशाचें कांहीं सैन्य त्याजपाशीं ठेविलें होतें; तेव्हां त्याच्या आश्रयाला जाऊन राहण्याचा **पॉम्पीनें** विचार केला त्यांत कांहींच वावगें नव्हतें;

परंतु त्याचें दैव त्याला पाठमोरें झाल्यानंतर त्याचा कोणताही बेत सुखपरिणामी झाला नाहीं. तो राजा मरण पावून त्याचीं मुलें अज्ञान असल्यामुळें त्याच्या राज्यव्यवस्थेंत घोंटाळा झाला होता; पण त्याबद्दल **पॉम्पी** यास कांहींच माहीत नव्हतें. तो **इजिप्त** देशाच्या एका बंदरांत जाऊन पोहोंचला तेव्हां तें वर्तमान त्यास समजलें. त्या समयीं नवा, तरूण राजा आपल्या पालकांसह त्या बंदराजवळच मुक्काम करून राहिला होता त्याजपाशीं **पॉम्पीनें** किनाऱ्यावर उतरण्याची परवानगी मागितली. **रोम** राष्ट्राच्या भोंवतालीं जीं मांडलिक राज्यें होतीं तीं नेहमीं **रोमन** लोकांच्या आपसांतील लढायांची संधी साधून व विजयी पक्षाला अनुकूल होऊन आपला अर्थ साधून घेत असत. जुलमी राजाचा पक्ष घेऊन त्यास **इजिप्त**च्या गादीवर बसविल्याबद्दल **पॉम्पी** याचा **इजिप्शियन** लोक पराकाष्ठेचा द्वेष करीत असत; व संधी सांपडली म्हणजे त्याचा सूड उगविण्याकरितां ते टपून बसले होते. मग **पॉम्पी** आयता त्यांच्या हातांत सांपडल्यावर ते त्याला जिवंत कसे राहूं देणार ! नव्या राजाच्या पालकांनीं **पॉम्पी**ची विनंती मान्य करून त्याला किनाऱ्यावर आणण्याकरितां एक बोट पाठविली. त्या बोटींत **पॉम्पी**च्या ओळखीचा **सेप्टिमियस** नांवाचा एक **रोमन** सरदार होता. **पॉम्पीला** किनाऱ्यावर नेण्याकरितां जे लोक पाठविले होते त्यांच्या भाषणांवरून **इजिप्शिअन** लोकांवर भरंवसा ठेवणें योग्य नाहीं, असें त्याच्या बायकोस व त्याच्या मित्रांस वाटलें, व त्यांनीं आपल्या संरक्षणाकरितां आपले शिपाई बरोबर घेतल्यावांचून बोटींत बसूंनये अशी त्यास विनंती केली; परंतु **सेप्टिमियस** त्या लोकांबरोबर होता ह्मणून **पॉम्पी** यास कांहीं विश्वासघात होईल असें वाटलें नाहीं. दैव प्रतिकूळ झालें ह्मणजे मनुष्याची बुद्धी विचारक्षम नसते.

**पॉम्पी** आपल्या परिवारासह बोटींत बसून बाणाच्या टप्याइतका दूर गेला नाहीं तों त्याच्या बायकोच्या डोळ्यांसमोर त्या दुष्ट **इजिप्शिअन** लोकांनीं त्याचा वध केला, आणि त्याचें मस्तक कापून घेऊन चालते झाले. त्याचें धड वाळूंत पडलें होतें तें त्याच्या एका गुलामानें कांहीं काष्टें एकत्र करून दहन केलें. याप्रमाणें **सीझर** याच्या प्रतिपक्षाचा शेवट होऊन त्याच्या उद्देशास आडवा येईल असा कोणी त्याला प्रतिपक्षी राहिला नाहीं.

**पॉम्पी** याजमध्यें अनेक उत्तम गूण होते. तो कांहीं मोठा शूर योद्धा नव्हता. तो केवळ प्रामाणिकपणानें मोठ्या उत्कर्षास पावला होता. भूमध्यसमुद्रांतील चांचे लोकांचा लौकर पराभव झाला नाहीं त्याचें कारण हें होतें कीं, **सेनेट** सभेस व गव्हरनरांस लांच देऊन त्यांजकडून ते आपल्या दुष्कर्मांवर झांकण घालवीत असत. पण त्यांचा पराभव करण्याकरितां **पॉम्पी**ची योजना केल्यावर त्यांच्या पारिपत्यास कांहीं विलंब लागला नाहीं. कारण तो त्यांच्या लांचलुचपतीला वश होईल असा नव्हता. त्याचे कट्टे शत्रू देखील त्यानें अन्याय केल्याबद्दल त्याजवर कधींही आरोप आणूं शकले नाहींत. **प्टॉलेमी** यास **इजिप्ट**च्या गादीवर पुन्हां नेऊन बसविलें, पण त्याबद्दल त्यानें त्याजपासून कांहीं लांच घेतला नाहीं. जेव्हां सगळें **रोम**सष्ट्र त्याच्या मुठींत होतें त्या समयीं देखील त्याची संपत्ती अगदीं नेमस्त होती. असा तो **रोमन** लोकांत एक अद्वितिय प्रामाणिक मनुष्य होता. त्याचा मित्र **लेंटुलस** यासही त्याची चिता विझाली नव्हती तोंच कोणी मारून टाकिलें, यामुळें तर त्याचा पक्ष अगदींच विलयास गेला.

आतां आपण **सिसेरो**कडे वळूं. **पॉम्पी** याचा पराभव होऊन तो आपलें सैन्य सोडून पळून गेल्यावर **सिसेरो**नें त्या सैन्याचें

सेनापतित्व स्वीकारून सीझरबरोबर लढाई चालवावी असें **पॉम्पी-च्या** पक्षांतील लोकांचे मनांत होतें, व **क्याटो** यानें त्याबद्दल **सिसेरोची** विनवणी केली; व तो जेव्हां ऐकेना तेव्हां सैन्यांतील लोकांनीं त्याजवर तरवारी उपसल्या, परंतु तो कांहीं त्यांच्या विचारास अनुकूळ झाला नाहीं. **पॉम्पीचा** मुलगा व त्याचे मित्र त्यास हा विश्वासघातकी आहे असेंही ह्मणाले, परंतु सर्व व्यर्थ. **सिसेरोस** असें वाटलें कीं, मोडलेली घडी पुन्हा कांहीं नीट बसणार नाहीं. ह्मणून तो इटाली देशांत परत आला.

# भाग ४.

—ooo—

**सिसेरो** याजवर घरगुती संकटें गुजरलीं. त्यानें पहिल्या बायकोस सोडचिठ्ठी देऊन दुसरें लग्न केलें, व तिलाही सोड चिठ्ठी दिली. **सीझर** याचा उत्कर्ष व त्याचें आपल्या शत्रूंशीं उदात्त वर्तन; राजकीय व्यवस्थेंत सुधारणा व त्यामुळें त्यास नवे नवे शत्रु उत्पन्न होतात; **सिसेरोचें रोमनगरीं** आगमन व **सीझरच्या** संबंधानें त्याचें मनोवेधक व अत्यंत स्तुतीपर भाषण. **सीझर** याचा वध करण्याविषयीं त्याच्या शत्रूंचें कारस्थान. **सेनेट** सभेंत त्याचा वध; त्याचा मोठ्या थाटाचा प्रेतसंस्कार; त्या प्रसंगीचें ॲन्टर्नीचे करुणापर भाषण.

**सिसेरो इटाली**देशांत आल्यावर त्याजवर एक मोठा प्रसंग गुजरला, आणि तो त्याच्या देश निकालशासनदुःखापेक्षां कांहीं कमी दुःखास्पद नव्हता ह्मणून आपणांस त्याची फार करुणा वाटते. त्याची परम आवडती मुलगी **टुलिया** हिनें पुनः लग्न केलें होतें, परंतु दुर्दैवानें त्या वराबरोबरही तिचें न पडल्यामुळें सोडचिठ्ठी झाली आणि पुढें लवकरच ती मरण पावली. **सिसेरो** याचे दुःखास कांहीं पारावार राहिला नाहीं. तो तीस दिवसपर्यंत अगदीं एकांत वासांत होता. त्याच्या परम मित्रांनीं त्यास दुःखशमनार्थ पत्रें लिहिलीं, परंतु त्यांपासून त्याच्या मनाला कांहीं समाधान झालें नाहीं. **सिसेरोनें** स्वतः हृदयद्रावक शब्दांनीं असें लिहिलें आहे कीं, माझे मनाला कांहीं समाधान व्हावें ह्मणून मी वेदांतशास्त्रांचें अवलोकन करूं लागलों, परंतु सर्व व्यर्थ. माझा शोक कांहीं कमी झाला नाहीं.

यानंतर **सिसेरो** आणि त्याचा भाऊ **क्विंटस** यांजमध्यें बेबनाव झाला. त्याजबद्दल **सिसेरो** यास फार दुःख झालें. कारण परस्परां-

मध्यें बंधुप्रेम फार उत्तम होतें. उभयतांमध्यें बेबनाव होण्याचें खरें कारण कांहीं समजत नाहीं; परंतु असें दिसतें कीं, **पॉम्पी** याचा दोघां भावांनीं पक्ष धरला याबद्दलचें सगळें खापर **सिसेरोच्या** डोक्यावर फोडून **सीझर** याच्या दृष्टीनें आपण निर्दोष व्हावें असें **क्रीनटस** याचे मनांत येऊन त्यानें तशा कांहीं गोष्टी **सीझर** यास सांगितल्या; आणि याचमुळें दोघां भावांमध्यें वैमनस्य पडलें. **सिसेरो** यास त्याबद्दल इतकें वाईट वाटलें कीं, त्या दुःखानें कांहीं दिवस तो आजारी पडला होता.

**सिसेरो** आणि **आटिकस** यांजमध्यें अशी मैत्री होती कीं, तशी फारच विरळा! **सिसेरो** यानें **आटिकस** यास जीं पत्रें लिहिलीं तीं इतक्या मोकळ्या मनाची आहेत कीं, दर्पणामध्यें जसें हुबेहूब प्रतिबिंब उठतें त्याप्रमाणें **सिसेरो** याच्या साऱ्या जन्मांतील लहानमोठ्या सर्व मानसिक विचारांचें त्या पत्रांत प्रतिबिंब उठलें होतें. प्रसिद्ध पुरुषद्वयांचा परस्परांवर जो विश्वास होता तो फार अपूर्व होता. मैत्रीपासून होणाऱ्या सुखाचा प्रसादाचा उभयतांनीं जसा उपभोग घेतला तसा फारच थोड्या लोकांनीं घेतला असेल! **सिसेरो** याचीं पत्रें प्रसिद्धीस आल्यानें त्याचें वाईट अंतरंग देखील सर्व दुनियेस कळून आलें, हें त्याच्या मोकळे मनाला एक प्रकारचें शासनच झालें. **आटिकस** यानें **सिसेरोस** लिहिलेलीं सर्व पत्रें गाहाळ झालीं यामुळें त्याचें खरें हृद्गत कांहीं बाहेर आलें नाहीं.

**आटिकस** याचे विचार फार पोक्त होते आणि **सिसेरो** कधींही त्याच्या सल्लामसलतीचा अव्हेर करीत नसे, आणि कधीं केलाच तर त्या चुकीबद्दल त्याला अनुताप होत असे. **आटिकस** हा फार शांत स्वभावाचा होता व स्वहिताविषयीं परम तत्पर असे. दूरवर

विचाराच्या प्रसंगीं **सिसेरो**सारख्या शीघ्रकोपी आणि उतावीळ स्वभावाच्या मनुष्याला त्याचे उपदेश फार हितकारक असत.

**सिसेरो**नें आपली बायको **टेरेन्टिया** हीस सोडचिठ्ठी दिली. हा प्रसंग त्याच्या आयुष्यक्रमांतील अनेक वाईट प्रसंगांपैकीं एक होता. त्यास आपली बायको कां त्यागावी लागली, याविषयीं लोकांच्या अनेक कल्पना आहेत. कोणी म्हणतात तो प्रवासांत असतां तिनें त्याला पैशाचा पुरवठा केला नाहीं व तो **ब्रिनडिसियम** येथें फार काळपर्यंत राहिला असतां ती त्यास भेटण्यास गेली नाहीं व मुलालाही पाठविलें नाहीं. तिनें पुष्कळ कर्ज करून ठेविलें असून घर पहावें तर अगदीं रिकामें करून ठेविलें होतें. परंतु **सिसेरो**च्या पत्रावरून त्यानें तिजवर अशा प्रकारचे आरोप आणिल्याचें कांहीं दिसून येत नाहीं. कोणाचें असें ह्मणणें आहे कीं, टेरेन्टिया कुत्सित स्वभावाची आणि फार तापट असून मनस्वी उधळी होती. संसारकृत्यांतही तिची हयगयफार असे. **सिसेरो** जेव्हां मोठ्या अधिकारावर होता तेव्हां त्याची कृपा संपादण्याचें मुख्य द्वार काय तें तीच होती. तो जेव्हां तारुण्याच्या भरांत होता व चोहोंकडून दैव अनुकूळ होतें तेव्हां त्यानें तिचें दौरात्म्य सहन केलें. परंतु त्यास उत्तरावस्था प्राप्त झाली, चोहोंकडून संकटें येऊन गुजरलीं आणि घरचेंही सुख नाहींसें झालें तेव्हां मात्र त्याला **टेरेन्टिया** हिचें वर्तन सहन होईना. **सिसेरो**नें आपल्या मित्रास एक पत्र लिहिलें त्यावरून असें दिसतें कीं, त्याची बायको त्याजबरोबर कांहीं प्रामाणिकपणानें वागली नाहीं. त्याच्या पत्रांत बहुवचनांत शब्द आहेत ते त्यानें आपल्या भावाला आणि पुतण्याला उद्देशून लिहिले आहेत असें दिसतें. त्याच्या पुतण्यानें त्याला इतका त्रास दिला होता कीं, त्यास आपलें जीवित

नकोसें झालें होतें व तो आत्महत्या देखील करण्यास तयार झाला होता. कांहीं असो; जें दंपत्य तीस वर्षेंपर्यंत गुण्यागोविंदानें नांदलें व टेरेंटिया हिजपासून झालेल्या दोन अपत्यांवर सिसेरोचे पंचप्राण होते त्या दंपत्यामध्यें सोडचिट्ठी झाली ही सिसेरोच्या आयुष्यक्रमांतील अत्यंत दुःखास्पद गोष्टींपैकीं एक गोष्ट होय, इतकें सांगणें बस्स आहे. टेरेंटिया ही १०४ वर्षेंपर्यंत वांचली, आणि सोडचिठ्ठी झाल्यावर तिनें तीन वेळा लग्नेंही केलें असें एका इतिहासकाराचें ह्मणणें आहे.

सिसेरो यानें दुसरें लग्न करण्यास वेळ लाविला नाहीं. त्याच्या मित्रांनीं त्यास कांहीं स्थळें दाखविलीं, परंतु तीं त्यास पसंत पडलीं नाहींत. त्यास आपल्या उतारवयांत देखील तरुण आणि सुंदर बायको हवी होती. त्यानें पब्लिलिया नांवाच्या एका तरूण मुलीबरोबर लग्न केलें. ती फार श्रीमान् होती. त्या वेळेस सिसेरोचें वय ६१ वर्षांचें असून पब्लिलिया हिला तर पुरतें तारुण्यही प्राप्त झालें नव्हतें. अशा विजोड दंपत्यामध्यें बहुतकरून नेहमीं जो परिणाम होतो तोच या दंपत्यामध्यें घडून आला. सिसेरोस या बायकोला लवकरच सोडचिठ्ठी द्यावी लागली. सिसेरोचा सिरेलिया हिजबरोबर अंतरंगसंबंध होता तो निर्वेध चालावा म्हणून त्यानें आपल्या दुसऱ्या बायकोस सोडचिठ्ठी दिली असा त्याच्या शत्रूंनीं त्याजवर आरोप आणिला होता, परंतु ती गोष्ट कांहीं खरी नाहीं. दुसऱ्या बायकोची सोडचिठ्ठी झाली ते समयीं सिसेरो हा ६६ वर्षांचा असून ती ७० वर्षांची होती. त्या बाईला तत्वज्ञानशास्त्राची विलक्षण आवड होती. यामुळें तिचा सिसेरोबरोबर सहवास असें इतकेंच काय तें खरें. सिसेरोच्या दुसऱ्या बायकोनें आपला पुनः स्वीकार करावा असा प्रयत्न केला, परंतु तो सफळ झाला नाहीं.

**पॉम्पी** मारला गेल्यावर **सीझर** **इटली** देशांत कांहीं लागलीच परत आला नाहीं. त्यास **स्पेन** देशामध्यें कांहीं जास्त बंदोबस्त करावयाचा होता. **रोम** राष्ट्राच्या कोणत्याही भागांत कोणी कारस्थान करून आपल्या अधिकाराला अडथळा करील असें **सीझर** यास मुळींच भय उरलें नव्हतें.

स्पेन देशांतील काम आटपल्यावर तो **रोम**नगरीं परत आला, आणि राजकीय व्यवस्थेमध्यें सुधारणा करण्याच्या कामास लागला. पहिल्यानें आपणाविषयीं लोकांच्या मनांत भय उत्पन्न झालें होतें तें दूर करण्याचा त्यानें प्रयत्न केला. आपल्या प्रतिपक्षी लोकांपैकीं जे जिवंत राहिले होते त्यांस त्यानें आपली माफी मागण्याविषयीं सांगितलें, व माफीविषयीं ज्या त्यानें अटी सांगितल्या त्या कांहीं अयोग्य नव्हत्या; परंतु त्या लोकांनीं पहिल्यानें त्याचें सांगणें तुच्छ मानलें. त्या लोकांस असें वाटलें कीं, त्याजमध्यें आपल्यास शासन करण्याचें सामर्थ्य नाहीं, ह्मणून तो आपल्यास माफी देत आहे; परंतु जेव्हां त्यांची अशी खात्री झाली कीं, त्याच्या सामर्थ्याला आणि अधिकाराला आतां मर्यादा राहिली नाहीं, तेव्हां ते निरुपायानें त्यास शरण गेले. **सीझर** यास माहीत होतें कीं, ते आपले पराकाष्ठेचे द्वेष्टे आहेत; परंतु आतां कोणतेंही कारस्थान करण्यांचें कांहीं त्याजमध्यें सामर्थ्य राहिलें नाहीं, तस्मात त्यांस माफी करावी हेंच योग्य आहे, असें त्यानें मनात आणिलें, मागल्या सर्व गोष्टी आपण विसरून गेलों आहोंत असें दाखविण्याकरितां त्यानें शत्रू आणि मित्र यांस वागविण्यांत कांहीं द्वैत भाव ठेविला नाहीं. त्यानें शत्रू मित्र-भाव मनांत न ठेवितां ज्या जागेस जे योग्य होते त्यांस त्या निष्पक्षपातानें दिल्या. **क्याशियस** यानें **सिलिसिया** येथील लढाईंत **सीझर**वर असा दुर्घट प्रसंग

आणला होता कीं त्यांत त्याचे प्राणच जावे; पण ती गोष्ट **सीझर** यानें मनांत न आणितां **पर्शियन** लोकांपासून **सिरिया** प्रांताचें त्यानें संरक्षण केलें होतें, या सरकारचाकरीबद्दल त्यास मोठ्या पदवीस चढविलें. त्याचप्रमाणें त्यानें आपली मैत्रीण **सरव्हीलिया**-चा पुत्र **मार्कस ब्रूटस** यासही क्षमा करून त्यास मोठ्या योग्यतेस आणिलें **ब्रूटस** यानेंही **सीझरबरोबर** लढाई केली होती, आणि त्या लढाईंत **ब्रूटस** मारलाच गेला असता; परंतु **सीझरनें** विशेष हुकूम देऊन त्याचा प्राण वांचविला होता. त्याचप्रमाणें त्यानें **सिसेरो**स माफी देऊन त्यास आपला आश्रय दिला व अशा शेंकडों लोकांस त्यानें माफ्या देऊन त्यांजपासून आपल्या-बरोबर इमानानें वागण्याविषयीं शपथा घेतल्या. जे त्याचे शत्रू रणांगणांत खपले त्यांच्या बायकामुलांस त्यांची सर्व मालमिळकत देऊन त्यांच्या घराण्यांतील पदव्या त्यांजकडे कायम ठेविल्या. क्षमा मागितली असतां आपण अपराधी आहोंत असें सहजच सिद्ध होईल, ह्मणून कित्येकांनीं माफी मागितली नव्हती; तरी **सीझर** यानें त्यांस क्षमा केली; आणि **रोमन** राष्ट्राला बळकटी आणावयाची, हाच काय तो आपला उद्देश आहे, असें दाखविण्या-करितां त्यानें **सिला** आणि **पॉम्पी** यांचे पुतळे खोदून टाकिले होते ते पुनः पूर्वस्थळीं बहुमानपुरःसर स्थापन केले.

याप्रमाणें आपल्या मनांत कोणाविषयीं द्वेषभाव नाहीं; **रोमन** राष्ट्राचें कल्याण व्हावें, हीच काय ती आपली इच्छा आहे, असें लोकांच्या निदर्शनास आणून देऊन मग तो राजकीय व्यवहा-रांत सुधारणा करण्याच्या कामीं लागला. पण दुर्दैवानें त्यानें चांगलें म्हणून जें कांहीं केलें तें त्यानें प्रत्येक नवें पापकर्म केलें, असें त्याच्या प्रतिस्पर्ध्यांस वाटत असे; कारण पाहाल तर त्याजपुढें

त्यांचें कांहीं चालत नसे एवढेंच. पूर्वी ते सर्व अधिकाराचा जसा काय मक्ताच घेऊन बसले होते. तो त्यानें तोडला हा काय तो त्याचा दोष.

त्यानें **सेनेट** सभेमध्यें नऊशें सभासद असावे असें ठरवून त्या सभेंत प्रांतांतील नांवलौकिकवान् पुरुषांस सभासद नेमिले इतकेंच नाहीं, पण गाल देशांतील रानटी लोकांस व जे गुलामगिरी-पासून मुक्त केले होते त्यांच्या स्वगुणानें लौकिकास चढलेल्या पुत्रांस देखील **सेनेट** सभेचे सभासद नेमिले. पण तेणेंकरून **सीझर**-विषयीं जुन्या सभासदांचा द्वेष फार वाढला. त्यांनीं असें एक खासगी सर्क्युलर फिरविलें होतें कीं, नव्या सभासदांस सभेंत कोणी सन्मान देऊं नये.

लोकांच्या नीतिसंबंधी वर्तनावर **सीझर**ची देखरेख फार कडक असे. गैरवर्तन करून आपल्या अब्रूस ज्यानें कलंक लावून घेतला त्याची त्यास तिळमात्र क्षमा नसे. मग तो **सेनेट** सभासद असो, किंवा दुसऱ्या कोणत्याही मोठ्या अधिकारावरील मनुष्य असो. स्वतःच्या आणि त्याच्या घरांतील सर्व मनुष्यांच्या संवयी अशा मितव्ययी असत कीं, लोकांनीं त्यांचा कित्ता उचलावा. ऐष-आरामानें सगळें **रोमन** राष्ट्र विगतवीर्य करून टाकिलें होतें; त्यांतून त्याची मुक्तता करण्याचा त्यानें प्रयत्न केला. त्यानें बडे लोकांचीं आळशी मुलें पालख्यांत बसवून नेण्याची चाल बंद केली. **रोमन** राष्ट्रांतील बडे लोकांनीं सगळ्या जगांतील मिष्ट पदार्थांचे बाजार अगदीं खलास करून टाकिले होते. **सीझर** यानें त्या-बद्दलची देखरेख ठेवण्याकरितां जे कारागार नेमिले होते ते कित्येक वेळां पाहुण्यापुढचीं व घरांतील यजमानापुढचीं मिष्टा-न्नाचीं ताटें देखील उचलून नेत असत. अशा प्रकारची देखरेख

ठेवून **सीझरनें** आपणास आणखी नवे नेव पुष्कळ शत्रू करून घेतले. परंतु दुसऱ्यास जे ऐषआराम भोगूं दिले नाहींत ते त्यानें स्वतः भोगिले असें कांहीं कोणी ह्मणूं शकणार नाहीं. त्याचा घरगुती खर्च अगदीं काटकसरीचा असे, व त्याबद्दल चोख हिशेब ठेवण्यांत येत असे. त्याच्या मितव्ययांत हलकेपणा नव्हता. त्याच्या मित्रांच्या आणि कामगार लोकांच्या भोजनाच्या दोन निरनिराळ्या पंक्ती असत. जेवणाचा बेत अगदीं साधा पण उत्तम प्रकारचा असे. एकदां पक्वान्नविक्यानें **सीझर** याला चांगल्या आणि दुसऱ्याना वाईट चपात्यांचा पुरवठा केल्याबद्दल **सीझरनें** त्याच्या पायांत लागलीच बेडी ठोकली. लोकांच्या नीतीसंबंधीं वर्तनावर त्याचें निरीक्षण फार सक्त होतें, असें पूर्वी सांगितलें आहेच.

एका **रोमन** स्त्रीबरोबर गुलामागरींतून मुक्त केलेल्या मनुष्यानें व्यभिचार केल्याबद्दल त्यास **सीझरनें** देहांतशासन केलें. एका **सेनेट** सभासदानें पहिल्या नवऱ्यापासून सोडचिठ्ठी घेतलेल्या स्त्रीबरोबर दोनच दिवसांनंतर लग्न केलें, सबब त्यानें तें लग्न गैरकायदेशीर आहे असें ठरविलें.

**रोमन** कायद्यामध्यें त्यानें सुधारणा केली. मोठमोठ्या शहरांत पुस्तकालयें स्थापन केलीं. **सेनेट** सभासद प्रांतांत जाऊन लोकांच्या पैशावर चैन मारीत ती त्यानें बंद केली. त्याची प्रकृती क्षीण दिसत असे, पण त्याच्या अद्वितीय उत्साहवृत्तीला कांहीं जरा आली नव्हती. त्यानें राष्ट्राच्या उत्कर्षाकरितां अनेक गोष्टी केल्या, परंतु त्यांपासून त्याच्या मनाला कांहीं समाधान वाटलें नाहीं; कारण त्याच्या गुणांची कोणाला कदर नसे.

इहलोकसंबंधीं त्याच्या ऐश्वर्याची आणि सत्तेची कमाल झाली

होती. **सेनेट** सभेनें त्यास मोठमोठ्या पदव्या दिल्या, व तो मनुष्यरूपी एक देव आहे असें ह्मणून त्यास दैवीक सन्मान दिले; परंतु **सेनेट** सभेच्या बहुमानाचीही त्यास इच्छा नव्हती, व लोकांच्या स्तवाची व निंदेचीही त्यास परवा नव्हती. आपल्या कर्तव्यकर्माकडे काय तें त्याचें लक्ष होतें. त्यास माहित होतें कीं, **सेनेट** सभा आपला द्वेष करीत आहे, व त्यास हेंही माहीत होतें कीं, साधेल तर माझा प्राण घेण्यास **सेनेटर** कांहीं विलंब करणार नाहींत. आपली स्तुती करण्याविषयीं ज्यांच्या जिव्हा परम पटु झाल्या आहेत, त्यांचेच हात आपल्या उरांत कट्यारी खुपसण्यास तप्त होऊन राहिले आहेत, हें त्यास चांगलें माहीत होतें. मारेकऱ्यांपासून आपलें संरक्षण करण्याच्या खटपटींत तो मुळींच पडला नाहीं. **स्पेन** देशांतून आल्यावर कांहीं दिवस तो आपल्याबरोबर बॉडिगार्ड ठेवीत असे, परंतु नंतर तो खुशाल एकटाच पाहिजेल तिकडे फिरूं लागला. तो असें ह्मणत असे कीं, "लवकर मरावें हें बरें, परंतु सदैव राज्यकारस्थानांचे भयांत जिवंत राहणें चांगलें नाहीं.*

**सीझर**नें **सिसेरो** यास जरी माफी दिली होती तरी तो कांहीं **रोम** नगरांत आला नव्हता. त्यानें **अॅन्टनी** आणि **सीझर**चा मित्र **ओपियस** यांजबरोबर पत्रव्यवहार ठेविला होता, व **सीझर**चे खरें मनोगत समजेपर्यंत त्यांच्या सल्ल्यानें **ग्रीस** सोडून **ब्रिनडिसी** येथें येऊन राहिला होता. त्या समयीं तो फार वाईट स्थितींत होता. **सीझर**चे शिपाई आपला अपमान करतील किंवा इजा करतील ह्मणून तो रस्त्यांतून देखील फिरत नसे.

परंतु हळू हळू त्याचें भय कमी होत गेलें. **सीझर** यानें त्यास

---

* "Better," he said, "to die at once than live in perpetual dread of treason."

एक प्रेमयुक्त पत्र लिहिलें व **इमपरेटर** ( imperator ) पदवी उपभोगण्याची त्यास परवानगी दिली, आणि स्पेन देशांतून परत येतांना त्याच्या येथें मुक्काम करून त्याजबरोबर भोजन केलें. दुसऱ्या विषयावर उभयतांचें बोलणें झालें, परंतु राजकीय विषयांच्या संबंधानें **सीझर** यानें एक शब्दही काढिला नाहीं.

**सीझर**च्या मागोमाग **सिसेरो**ही **रोम**नगरीं आला आणि **सेनेट** सभेंत त्यानें आपली जागा पुनः घेतली. त्या समयीं त्या सभेंत **सीझर** याच्या अतिप्रशंसेचा सुकाळ माजलेला पाहून त्याचा स्तव करण्याची **सिसेरो** यानेंही एक उत्तम संधी साधली. **मार्कस मारसेलस** यास देशपार केलें होतें त्यास परत आणण्याबद्दल **सेनेट** सभेनें **सीझर** यास विनंति केल्यावरून त्यानें त्यास परत येण्याची परवानगी दिली इतकेंच नाहीं, पण सभेनें अपेक्षा केली होती त्यापेक्षांही **सीझर** यानें **मार्कस मारसेलस** याजवर जास्त कृपा केली. **सिसेरो** यानें त्याबद्दल **सीझर** याचे उपकार मानितांना जें भाषण केलें तें फार मनोवेधक आहे.

**सिसेरो** ह्मणाला "मी आजपर्यंत मौन धरलें होतें त्याचें कारण भय नव्हे, परंतु दुःख आणि अविश्वास हीं होत. आतां मौन धरण्याचा काळ निघून गेला, आणि जुन्या चालीप्रमाणें माझे विचार कळविण्याची मला इच्छा झाली आहे. अशा प्रकारची करुणा, अशा प्रकारचें कधीं न ऐकिलेलें औदार्य, अशा प्रकारच्या अधिकाराचा नेमस्तपणा, असें प्रत्ययातीत ईश्वरी शाहाणपण पाहून माझ्या मनांतील उद्गार बाहेर काढल्यावांचून कांहीं मला राहवत नाहीं."

नंतर **सिसेरो सीझर** यास संबोधून ह्मणालाः—"आपण आपल्या शत्रूस जिंकिलें इतकेंच नाहीं, पण आपण आपला क्रोध आवरून धरून स्वतःलाही जिंकिलें. आपण आपल्या प्रख्यात प्रतिस्पर्ध्यास

त्याचे जुने सर्व हक्क देऊन त्यानें गमाविले होते त्यापेक्षां त्यास जास्त दिले ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. हें आपलें कर्म इतकें अभिनंदनीय आहे कीं, आपल्यांत आणि ईश्वरांत थोडेंच अंतर आहें असें वाटतें. आपल्या लढाईचा वृत्तांत प्रत्येक राष्ट्रांतील मनुष्यें निरंतर वर्णन करतील. न्याय, दया, अनौद्धत्य आणि शाहाणपण हे सद्गुण असे आहेत कीं, ते एखाद्या कादंबरींत वाचण्यांत आले किंवा ज्या मनुष्याला आपण कधीं पाहिलें नाहीं त्याजविषयीं ऐकण्यांत आले तर त्यांबद्दल आपण त्याची वाखाणणी करितों. मग त्या गुणांची प्रत्यक्ष मूर्ति आमच्या समोर उभी असल्यावर आह्मी त्यांजबद्दल किती तरी वर्णन करावें! आपल्या मुखश्रीवरून आम्हांस अशी खातरजमा वाटते कीं, लढाई संपल्यावर जें स्वातंत्र्य अवशिष्ट राहिलें आहे तें आपण आम्हांस द्याल, आपल्यावर आम्ही किती प्रेम करावें आणि आपली आह्मी किती स्तुती करावी? मी ईश्वरास स्मरून सांगतों कीं, या सभेच्या भिंती देखील आपली कृतज्ञता दाखविण्याकरितां जसें काय आपलें वाक्चातुर्य खर्च करण्यास इच्छीत आहेत! आपसांतील लढाईमध्यें विजयी होऊन शांतवृत्तीनें वागलेला असा आह्मी आपल्यावांचून दुसरा पुरुष पाहिलाच नाहीं. आज आपली उपमा आपल्यासच साजते. लढाईमध्यें मिळविलेली लूट ज्यांची त्यांस परत देऊन आपल्या विजयाचें आपणच दमन केलें. लढाईच्या कायद्याप्रमाणें पाहिलें असतां आमचे प्राण आपल्या मुठींत आहेत. आह्मी आज जिवंत आहोंत, हा सगळा आपल्या चांगुलपणाचा प्रादुर्भाव आहे"! सभासदहो, "सीझर याच्या शासनांत किती खुबी आहे ती पहा! आपल्या मनांत ही गोष्ट कशी आली तें कांहीं मला कळत नाहीं; परंतु आपण त्याजवर शस्त्र उचललें; आपण चुकी केली असें मानून आपल्यास

त्याच्यानें निरपराधी ठरवितां येत नाहीं. परंतु आपण निरुपद्रवी आणि निष्पाप आहोंत असें तो मानतो. या गोष्टीला तुमच्या विनंतीवरून त्यानें **मारसेलस** यास क्षमा केली हें प्रमाण आहे. त्याने आपण होऊनच मला जिवदान दिलें आणि माझ्या देशाशीं माझी पुनः गांठ घालून दिली. लढाईतून जिवंत राहिले असे मोठमोठे विख्यात पुरुष त्यानें माघारा आणिले. ज्यांस आपण आज या मंत्रीमंडळींत पाहात आहोंत त्यांस तो कांहीं आपले शत्रू मानीत नाहीं. त्यानें असा निर्णय केला आहे कीं, तुह्मी त्याजबरोबर लढाई करण्यास प्रवृत्त झालां त्याचें कारण तुमचें अज्ञान आणि पोकळ भीति हीं होत. महत्वाकांक्षा किंवा वैरभावहीं नव्हत. आतां स्वतःमजविषयीं विचाराल तर मी नेहमी राष्ट्रांमध्यें स्वास्थ्य इच्छिणारा मनुष्य आहे. **मारसेलस** आणि **सीझर** यांनाही स्वास्थ्यच आवडतें. ज्यांच्या विजयाविषयीं **मारसेलस** यास भय वाटत होतें असें तुमच्यामध्यें उपद्व्यापी लोक होतेच. दोन्ही बाजूंला कांहीं ना कांहीं तरी कारणे होतीच त्यांत चांगलीं वाईट कोणतीं याची मी येथें निवड करीत बसत नाहीं; असें करण्यापेक्षां जय मिळविलेल्या पक्षाबरोबर प्रातिपक्षानें किती टिकाव धरला असता याची चिकित्सा करणें उपयुक्त दिसतें. परवांच्या शेवटच्या लढाईनें आतां तो घोर संग्राम संपला आणि सर्वांनीं आपापल्या तरवारी म्यानांत घातल्या आहेत. गेल्या घोर संग्रामामध्यें आपण ज्यांस आंचवलों ते आपल्या त्वेषाच्या भरांत लढत असतां मरण पावले. **सीझर** याच्या कोपानें एकही मरण पावला नाहीं. त्याच्या आंगांत शक्ति असती तर त्यानें त्यांस केव्हांच जिवंत केलें असतें. **सीझरच्या** प्रतिपक्षाला जय मिळाला असता तर त्यानें काय केलें असतें हें मात्र कांहीं

सांगवत नाहीं. **सीझरच्या** . विरुद्ध पक्षानें आपल्या समोर शस्त्र धारण करून उभें राहिलेल्या प्रतिपक्षास भय घातलें होतें इतकेंच नाहीं, पण जे बिचारे घरीं बसून होते त्यांसही धमक्या दिल्या होत्या.

नंतर **सिसेरो** असें ह्मणाला कीं, 'आपणास मारेकऱ्यांकडून मारण्याचा विचार चालू आहे असे **सीझर** याच्या मुखांतून शब्द निघाल्याचें माझे कानीं आलें आहे. नंतर त्यानें विचारिलें कीं, असें अधम कृत्य कोण करूं शकणार आहे ? ज्यांस त्यानें क्षमा केली आहे ते तर असें अघोर कर्म कधींही करणार नाहींत; कारण त्या लोकांचें त्याजवर अद्वितीय प्रेम आहे. **सीझरच्या** सोबत्यांकडून असें निंद्य कर्म तर कधींच होणार नाहीं; कारण ते इतके मूर्ख नाहींत कीं, ज्याच्या कृपेनें ते उत्कर्षास आले त्याचा ते विनाश करतील. **सीझर** यास मुळींच शत्रु नाहींत, तेव्हां त्याच्या शत्रूंकडून असें कर्म होण्याचा मुळींच संभव नाहीं. जे त्याचे शत्रु होते ते बहुतकरून आपल्याच हट्टवादानें मृत्युमुखीं पडले, व जे शिल्लक राहिले ते त्याच्या उदार मनानें जिवंत राहिले आहेत; तस्मात् ते कांहीं त्याचे शत्रु नव्हत. तथापि इतकी गोष्ट खरी आहे कीं, तसें कांहीं कारस्थान आहे असें मानिलें पाहिजे.'

पुनः **सिसेरो सीझर** यास म्हणाला—"आपण नेहेमीं सावध असावें आणि आम्ही देखील सावध असलें पाहिजे. ज्यापेक्षां आमचें सर्वांचें जीवित आणि राष्ट्राचा उत्कर्ष आपल्या जीवितावर अवलंबून आहे त्यापेक्षां असा मूर्ख कोण असेल कीं, तो आपल्या ( सीझर ) संरक्षणाविषयीं उपेक्षा करील ! माझे स्वतःविषयीं ह्मणाल तर माझें कर्तव्यकर्म समजून मी रात्रंदिवस आपल्याविषयीं काळजी करीत असतों. मानवी देहाचें क्षणभंगुरत्व, त्याजवर अकस्मात् येणारीं संकटें

व त्याचें बुद्धिदौर्बल्य, या गोष्टी मनांत आणून मी जेव्हां चिंतन करतों तेव्हां, वास्तविक पाहिलें असतां जें प्रजासत्ताक राज्य स्वतः अजरामर असावें त्याचें अस्तित्व एका मर्त्य मनुष्याच्या जीवितावर अवलंबून असावें याबद्दल मला अत्यंत खेद होतो ! आणि अशा स्थितींत आणखी महा पापरूप कारस्थानें चाललीं आहेत तेव्हां आह्मी आतां शरण तरी कोणत्या देवाला जावें ? भयंकर संग्रामाच्या योगानें आमच्या सर्व संस्था जमीनदोस्त झाल्या आहेत. त्यांना पूर्व पदावर आणण्यास आपल्यावांचून कोणामध्यें शक्ति नाहीं. न्यायाच्या कोर्टाची पुनःस्थापना झाली पाहिजे; समाजांत पत वाढली पाहिजे; भ्रष्टाचार मोडला पाहिजे; समाजाचें बंधन अगदीं ढिलें होऊन गेलें आहे तें दृढ केलें पाहिजे; मनुष्यें अति निकरावर येऊन असा घोर संग्राम उद्भवल्यावर या राष्ट्रानें अत्यंत भूषणभूत असे पुष्कळ पुरुष गमाविले असलेच पाहिजेत. पण जें झालें तें झालें, आतां ती उणीव भरून काढण्यास आपल्यावांचून कोणी समर्थ नाहीं. आपण फार वांचलों असे उद्गार आपल्या तोंडांतून निघतात असें मी ऐकिलें आहे. वयाच्या मानानें पाहतां त्यांत कांहीं सत्य आहे. परंतु आपण आजपर्यंत वांचला ते प्रतिष्ठा मिळविण्याकरितां; परंतु आपण आपल्या देशाकरितां कांहीं वांचलां नाहीं. तें आपलें कर्तव्यकर्म आतां आपल्या पुढील आयुष्यांत करावयाचें आहे. यावरून आम्ही आपल्यास हात जोडून विनंति करितों कीं, मृत्युची बेपरवा करूं नका. ह्मणजे जेणेंकरून आमचा नाश होईल अशा रीतीनें आपल्या जिवावर उदार होऊं नका."

"मी जास्त जगण्याची इच्छा करीत नाहीं" असें वारंवार आपल्या मुखांतून निघाल्याचें माझे कानीं आलें आहे. तसें आप-

ल्या मनांत वागलें आहे याबद्दल मला संशय नाहीं. आपणास स्वतःच्याच संबंधानें विचार करावयाचा नसता तर आपल्या उद्विग्नतेबद्दल मी आपल्यास दोष दिला असता. परंतु आपल्या आजपर्यंतच्या कृत्याचा असा परिणाम झाला आहे कीं, प्रत्येक नगरवासी जनाचें आणि सगळ्या प्रजासत्ताक राज्याचें कल्याण आपल्या गळ्यांत गोंविलें गेलें आहे. आपल्यास उभारावयाच्या इमारतीचें सर्व काम अधुरतें राहिलें आहे. अद्याप पुरते पायेसुद्धां भरले नाहींत. अशा स्थितींत आपल्या आयुष्याचा लांबआंखूडपणा मोजण्याचा एकट्या आपल्यासच अधिकार आहे काय! महाराज, जर आपल्या महत्कृत्याचा हाच एक परिणाम असेल कीं, शत्रूचा पराभव करून हें राष्ट्र अशा स्थितींत सोडून चालतें व्हावें तर आपल्या कृत्याबद्दल आह्मी आपली स्तुति मात्र करावी; परंतु आह्मी आपणास एवढे मोठे सन्मान कां द्यावे तें कांहीं मला कळत नाहीं. यास्तव कार्यभाग शेवटास जाईपर्यंत आपण जगा. आपला देश शांत आणि स्वस्थ आहे असें आपल्या नेत्रांनीं पहा, आणि जेव्हां आपलें ऋण आपण निःशेष फेडिलें असें होईल आणि आपल्या आयुष्यरूप पात्रांत स्वकर्तृत्वरूप उदक इतकें भरलें जाईल कीं, तें उचंबळून जाऊं लागलें, तेव्हां आपली इच्छा असेल तर खुशाल आतां हें आयुष्य पुरे, असें म्हणून या जगांतून चालते व्हा. आपल्या आत्म्याचा आपल्या शरीराशीं संयोग हें कांहीं आपलें आयुष्य नव्हे; तर आपली कीर्ति जोंपर्यंत लोकांच्या स्मरणांत राहील तें आपलें आयुष्य. पुढल्या परंपरेचे लोक जिचें नेहमीं स्मरण करितील आणि अनादिपरंपरा स्वतः जिजवर आपला पाहरा ठेवतील ती आपली कीर्ति या जगांत जोंपर्यंत वास्तव्य करील तें आपलें आयुष्य. लोक आपली स्तुति करितील असें आपण पुष्कळ केलें आहे; आणि आपला त्यांनीं जास्त स्तव करावा असें आपल्यास पुष्कळ

करावयाचें राहिलें आहे. या अफाट साम्राज्याचे, त्यांतील प्रांतांचे, न्हाईन नदीचे, समुद्राचे आणि नील नदीचे, अनेक लढायांचे आणि आश्चर्यजनक विजयांचे वृत्तांत लोक मोठ्या कौतुकानें वाचितील. परंतु या प्रजासत्ताक राज्याची पुर्वीप्रमाणें शांतपणानें पुनः स्थापना झाल्यावांचून आपली कीर्ति अजरामर होणार नाहीं. ती इकडून तिकडे साऱ्या जगभर भटकत फिरेल, परंतु तिला कांहीं विश्रांतीचें स्थळ मिळणार नाहीं. आणि यापुढें जे जन्मास येतील ते आह्मी आपल्याबरोबर वादविवाद केला तसा आपल्याविषयीं आपसांत वादविवाद करितील. कांहीं आपला फार स्तव करितील, कांहीं ज्या गुणाची अवश्यकता होती तो गुण आपल्यामध्यें मुळींच नव्हता असें ह्मणतील. यास्तव यापुढें आपल्यास ज्या न्यायसभेसमोर उभें रहावयाचें आहे तिचें स्मरण करा. भावी जन्मणाऱ्या लोकांस आपल्या कृत्याबद्दल न्याय करावयाचा आहे. त्या लोकांस आपल्या मोठेपणाशीं स्पर्धा करण्याचा प्रसंगच आलेला नाहीं, तेव्हां आपल्याविषयीं त्यांच्या मनांत कांहीं द्वेषभाव असणार नाहीं, व आपल्यास संतुष्ट करावें म्हणूनही त्यांस कांहीं करावयाचें नाहीं, अर्थात् ते आमच्यापेक्षां आपल्याविषयीं योग्य न्याय करण्यास जास्त पात्र आहेत; यास्तव आपण असें करा कीं, ते आपल्यास उत्तम न्याय देतील.

**सिसेरो** सर्व सभासदांस ह्मणतो—‘ आपणामधील आपसांतील कलह **सीझर** यानें बाहुबळानें आणि सामोपचारानें सर्वांशीं लयास नेले आहेत, तेव्हां आतां आपला सर्वांचा, नुस्त्या शहाण्याचाच नव्हे, तर ज्याला सामान्य अक्कल आहे त्यांचा सुद्धां, एकच उद्देश असला पाहिजे. ’ **सीझर,** ‘ आपलें संरक्षण केल्यावांचून आह्मास गत्यंतरच नाहीं. महाराज, यास्तव आह्मी आपल्यास असा उपदेश

करितों व हस्त जोडून विनंती करितों कीं, आपण आपल्या संरक्षणाची काळजी ठेवावी. ज्यापेक्षां आपली अशी खातरजमा झाली आहे कीं, आपलें जीवित धोक्यांत आहे त्यापेक्षां मी स्वतःविषयीं आणि दुसऱ्याविषयीं सुद्धां मनापासून सांगतों कीं, आह्मी सर्व आपल्या संरक्षणाकरितां संरुयांप्रमाणें आपल्यावर पहारा करूं आणि आपल्यावर संकट गुजरण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां आह्मी आपले देह मध्यें बळी देऊं, पण आपल्या केंसाला धक्का लागूं देणार नाहीं.'

**सिसेरो**च्या वक्तृत्वशक्तीच्या आंगीं दुसऱ्याचें मन हरण करून घेण्याचें किती सामर्थ्य होतें याविषयीं एक उदाहरण सांगण्यासारखें आहे.

**लिग्येरियस** ह्मणून **सीझर** याच्या शत्रूंपैकीं एक मनुष्य होता. त्याजवर **ट्यूबेरो** यानें **सीझर** याच्या विरुद्ध लढाई चालविल्याबद्दल जेव्हां आरोप आणिला तेव्हां त्याचा बचाव करण्याकरितां **सिसेरो**नें त्याची वकिली पतकरिली होती. ही गोष्ट जेव्हां **सीझर** याचे कानावर गेली तेव्हां तो आपल्या मित्रास ह्मणाला कीं, " **लिग्यारियस** हा वाईट मनुष्य असून शत्रु आहे याविषयीं कांहीं संशय नाहीं. परंतु **सिसेरो** याचें पुनः भाषण ऐकण्याची आलेली संधी आपण कां घालवावी ? " या **सीझर**च्या भाषणांतील स्पष्ट भावार्थ असा होता कीं, **लिग्येरियस** अपराधी आहे; तो कांहीं **सिसेरो** याच्या भाषणानें निरपराधी ठरत नाहीं. मग त्या प्रसिद्ध वक्त्ययाचें भाषण ऐकण्यापासून आपल्याला एका प्रकारचें अनुरंजन होणार आहे तें आपण कां दवडावें ? परंतु **सीझर** स्वतः न्याय करण्याकरितां न्यायासनावर बसून **सिसेरो** याचें भाषण ऐकूं लागला, तेव्हां त्याच्या मुखश्रीचा रंग बदलला आणि त्यास गहिंवर आला आहे, असें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. आणि **सिसेरो**

जेव्हां **फारसेलिया** येथील लढाईच्या प्रसंगास उद्देशून बोलूं लागला तेव्हां तर **सीझरास** इतकी करुणा आली कीं, त्याच्या शरीरास कंप सुटला, त्याच्या हातांतील कागद गळून पडले, आणि **सिसेरो** याच्या उपपत्तीपुढें तो इतका कुंठित झाला कीं, त्यानें **लिग्यॅरियस** यास निरपराधी ठरविलें.

काय हा वक्तृत्वशक्तीचा विलक्षण प्रभाव ! **सीझर**यानें आपणास माफी दिल्याबद्दल त्याच्या कारुण्याची प्रशंसा केली आणि त्याचप्रमाणें आरोपी त्यांच्या कारुण्यास पात्र आहे असें जेव्हां करुणास्वरानें ह्मटलें तेव्हां लिग्यॅरियस याजवर आरोप आणणार **ट्युबेरो** यानें लज्जेनें आपली मान खालीं घातली. **सिसरो**नें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, **सीझर**ला जसजसे लोक चांगलें म्हणूं लागले व त्याचे सर्व शत्रु त्यास शरण येऊन त्याचे आज्ञांकित झाले तसतसा त्याचा स्वभाव जास्त शांत होत चालला. आणि शेवटीं त्याच्या कारुण्याला सीमाच नाहींशी झाली.

**सीझर** यास संतुष्ट करण्याकरितां सेनेटसभा त्यास पदव्यांवर पदव्या आणि अधिकारावर अधिकार देत होती. त्याच्या मस्तकीं राजमुगूट नव्हता इतकेंच काय तें अंतर. कित्येक इतिहासकार ह्मणतात, त्यास राज्यपदाची अपेक्षा होती; कित्येक ह्मणतात, सेनेटसभा त्यास राज्यपद देण्यास सिद्ध झाली असतां त्यानें तें नाकारलें. खरें काय असेल तें असो. **सिसेरो**च्या चरित्रांत तत्संबंधानें विशेष चर्चा करण्यांत अर्थ नाहीं.

**सीझर** आपल्या शत्रूंबरोबर पराकाष्ठेच्या क्षमेनें आणि सदयान्तःकरणानें वागला असतांही त्यांच्या मनांतील भय कांहीं कमी झालें नाहीं. त्यांच्या मनांत त्याजविषयीं अत्यंत द्वेषभाव होता तो होताच. प्रत्येक व्यक्तीनें आणि सर्वांनीं मिळून **सीझर**चें संरक्षण

करण्याच्या शपथा घेतल्या होत्या, त्यांत कांहीं अर्थ नव्हता. नगराचा पाया घातल्यापासून तों **रोमन** राष्ट्र समूळ लयास जाई-पर्यंत बडे लोकांच्या वर्गांत नेकीनें वागणारे असे पुरुष फारच थोडे जन्मास आले. आपल्या वर्गाची सदैव बडेजाव असावी, याखेरीज त्या लोकांनीं दुसरा व्यवसायच केला नाहीं. ते केवळ आपल्या स्वार्थाकरितां **सीझर**चा द्वेष करीत होते. स्वराष्ट्रहित हें त्या लोकांचें अगदीं लटकें मीष होतें. प्रजासत्ताकराज्यमिषानें सगळा राज्यकारभार आपणांस ढवळतां यावा हाच काय तो त्यांचा मुख्य उद्देश होता.

**सीझर** याजवर घाला घालून त्याचा वध करण्याच्या कटांत साठ मनुष्यें होतीं.- त्यांत नऊदशांश लोक त्यानें ज्यांस माफी देऊन मोठमोठे अधिकार दिले त्यांपैकीं होते. त्यांच्या संबंधानें **सीझर**नें जीं कांहीं बरीं वाईट कर्मं केलीं त्यांत त्यांस माफी देण्याचें सामर्थ्य त्याच्या आंगीं आलें. या कृत्याबद्दल त्याच्या मनाला जें दुःख वाटत होतें, तसें त्यानें केलेल्या कोणत्याही अपकाराबद्दल त्यांस वाटत नसे. या कारस्थानांत **सीझर**चा पक्ष घेऊन त्याच्या शत्रूंबरोबर लढलेल्या लोकांपैकीं देखील कांहीं लोक होते. **सीझर**-च्या कृपेनें त्यांस पुष्कळ -संपत्ति मिळाली व मोठे अधिकार प्राप्त झाले तरी आपल्या इच्छेप्रमाणें आपणांस लाभ झाला नाहीं असें मानून ते **सीझर** याचा वध करण्यास उद्युक्त झाले.

**सीझर** आपल्याबरोबर पाहारा ठेविल्यावांचून व शास्त्र धारण केल्यावांचून खुशाल एकटा फिरत असे, व सेनेट सभेंत जात असे. तेव्हां त्याचा सहज वध करितां येईल, असें त्याच्या शत्रूंस वाटलें. त्या समयीं नगरांत कांहीं सैन्य नव्हतें, व **सीझर**च्या घोडेस्वारांचा सरदार **लेपिडस**ही नगरांत नव्हता. **सीझर**नें त्यास **गाल** देशाचा

गव्हर्नर नेमिल्यामुळें तो शहराबाहेर मुक्काम देऊन राहिला होता; परंतु **सीझर**च्या शत्रूंस हें पक्कें माहीत होतें कीं, **सीझर**चा वध केल्याबरोबर सामान्य वर्गांतील लोक तात्काळ आपले प्राण घेतील; तस्मात् सामान्य लोकप्रिय मनुष्य आपल्या कटांत असल्यावांचून कांहीं आपल्या घोर कर्माचा चांगला परिणाम होणार नाहीं. शेवटीं त्या कटांतील सर्व लोकांचा असा संकल्प झाला कीं, आपल्या कारस्थानांत मार्कस **ब्रूटस** सामील झाला तरे त्या कामांत मन घालावयाचें, नाहीं तर नाहीं.

मार्कस **ब्रूटस** हा **क्याटोची** बहीण **सर्व्हीलिया** हिचा पुत्र. **सर्व्हीलिया** इच्याशीं **सीझर** याचा अंतरंग संबंध होता, असा अपवाद होता. पण **ब्रूटस** याची आपल्या मातुश्रीविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि असल्यामुळें, व **सीझर** आणि **ब्रूटस** यांच्या वयामध्यें काय तें पंधरा वर्षांचें अंतर असल्यामुळें लोक ती गोष्ट खरी मानीत नव्हते. **क्याटो** हा **सीझर** याचा कट्टा शत्रु होता, आणि त्याच्या आग्रहामुळें **ब्रूटस सीझर**च्या प्रतिपक्षास अनुकूळ झाला होता. परंतु **सीझर** विजयी झाल्यावर त्यानें त्याची माफी स्वीकारली आणि त्याच्या पुष्कळ कृपाप्रसादांचाही त्यानें अंगीकार केला, व **सीझर**च्या कृपेबद्दल तो पूर्णपणें कृतज्ञ होता, व त्याची त्याजवर कृपाही तशीच निर्मळ होती. त्यानें त्यास **प्रीटर**चा अधिकार देऊन **म्यासिडोनियाचा** गव्हर्नर नेमून ठेविला होता.

**क्याटो** मरण पावल्यावर **ब्रूटस**नें त्याजविषयीं एक प्रशंसापर लेख लिहून तो लोकांत प्रसिद्ध केला. **क्याटो** हा **सीझर**चा प्रतिस्पर्धी असल्यामुळें त्याची प्रशंसा ती **सीझर** याची गर्भित निंदा असा प्रकार होता. पण त्याबद्दल **ब्रूटस** याजविषयीं **सीझर**च्या मनांत कांहीं वागळें नाहीं. इतकें त्याजवर त्याचें प्रेम होतें.

सीझर याजबरोबर इमानानें वागण्याविषयीं व त्याचें संरक्षण करण्याविषयीं सर्वांनीं जशा शपथा घेतल्या होत्या तशीच ब्रूटसनें ही शपथ घेतली होती; आणि तो अशा क्षुद्रमनाचा नव्हता कीं, सहज शपथ मोडून मोकळा होईल; परंतु त्याच्या स्वभावांत एक मोठी गोम होती. तो प्रजसत्ताक राज्यांचा एक धर्मखुळा पक्षपाती असून फार घुम्या स्वभावाचा होता. स्वप्नें आणि शकुन यांना तर तो अर्पण केला होता, यामुळें कांहीं मनःकल्पित गोष्टी सांगून त्याचें मन सहज वळवितां येईल असा तो धर्मभोळा होता. सर्व धर्मभोळ्या लोकाचें कपाळच असें ! त्याचा मेहुणा क्याशिअस ह्या कटांत प्रमुख होता. त्यानें मोठ्या सावधगिरीनें ब्रूटस याजपाशीं ती गोष्ट काढून त्या कारस्थानांत सामील होण्याचें त्याजपासून कबूल करून घेतलें. क्याशिअसला ब्रूटसचा स्वभाव माहित होता. हें कुलूप कोणत्या किल्लीनें उघडेल हें त्यास चांगलें माहित होतें. ब्रूटस नांवाचा एक पूर्वीं मोठा प्रजासत्ताक राज्याभिमानी होऊन गेला. राज्यसत्ता ल्यास नेऊन प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्यांत तो प्रमुख होता. त्यानें प्रत्यक्ष आपले दोन पुत्र प्रजासत्ताक राज्याच्या विरुद्ध पक्षांत होते ह्मणून ठार मारले. त्या गोष्टीचें क्याशिअसनें ब्रूटस यास स्मरण देऊन असें ह्मणाला कीं, रोमन राष्ट्राचें अस्तित्व व स्वास्थ्य राखण्याकरितां ब्रूटस नामांकित मनुष्यालाच ईश्वरानें नेमिला आहे. ही केवळ थट्टा होती. पण त्या धर्मभोळ्या ब्रूटसला तें सर्व खरें वाटून सीझरचा वध करणें हें आपलें एक पवित्र कर्तव्यकर्म आहे असें मानून तो त्या कटांत मोठ्या उत्साहवृत्तीनें सामील झाला. या कारस्थानात अब्रूदार आणि अस्वार्थी असा काय तो एक ब्रूटसच होता. तो या कारस्थानांत सामील झाल्यामुळें त्या दुष्कर्माला देखील मोठें महत्व प्राप्त झालें इतका तो चांगला मनुष्य

होता. त्याच्या सदाचारावर लोकांचा इतका विश्वास होता कीं, योग्य असेल तेंच तो करील.

**सीझर** यास सेनेट सभेंत मारावें असा कायमचा बेत ठरल्यावर **सीझर** याजबरोबर त्याचा सोबती **ॲन्टनी** यास मारावें किंवा नाहीं, हा प्रश्न उत्पन्न झाला, आणि मारिलें असतां अत्यंत प्रजाक्षोभ होईल यास्तव त्यास कांहीं मारूं नये असें ठरलें.

**सीझर** यास मारिलें त्याच्या पूर्व दिवशीं दुष्टभाव सूचक अशा गोष्टी घडून आल्या. मारसनामक देवतेचें बखतर दिवाणखान्यांत खुंटीस लटकावून ठेविलें होतें तें सहज खालीं गळून पडलें. **सीझर**-च्या खोलीचे दरवाजे रात्रीं आपल्या आपण एकदम उघडले. त्याची बायको **क्यालपुरनिया** इला असें स्वप्न पडलें कीं, आपल्या पतीस ठार मारिलें आणि स्वर्गारोहण करितांना ईश्वरानें त्याचा हात धरून त्यास वर नेलें. प्रातःकाळीं **सीझर** उठला तेव्हां त्याचेंही चित्त कांहीं स्वस्थ नव्हतें. नेहेमींप्रमाणें त्याची वृत्ति उल्हासित नव्हती. त्यास कांहीं ग्लानि आली होती असें दिसलें. आपल्या बायकोच्या विनंतीवरून त्यानें निश्चय केला कीं आज सेनेट सभेंत कांहीं जावयाचें नाहीं.

सेनेट सभा गच्च भरली होती. त्या कारस्थानांतील सर्व लोक आपल्या झग्यांत व कागदांत कव्यारीं लपवून आपापल्या जागेवर बसले होते. **सीझर** याचें सिंहासन एका बाजूस ठेवण्याकरितां एक चाकर सभेंत आला तेव्हां तो आज सभेंत येत नाहीं, असें समजल्यावर त्यांची पांचांवर धारण बसली. त्यांस असें वाटलें कीं, **सीझर** यास कांहीं संशय आला आहे ह्मणून तो सभेस येत नाहीं. कारस्थानाची बातमी फुटून मोठा अनर्थापात होईल, असें सर्वांच्या मनांत भय उत्पन्न झालें.

**सीझरचा** मित्र **डेसियस ब्रूटस** यास **सीझरला** सभेंत घेऊन येण्याकरितां पाठविलें; कारण त्याजवर **सीझरचा** फार विश्वास होता. त्या वेळेस दिवसाचे अकरा वाजले होते. **डेसियस ब्रूटस** याच्या विनंतीवरून आपलें औदासीन्य टाकून **सीझर** सेनेट सभेस जाण्यास सिद्ध झाला. दिवाणखान्यांतून बाहेर निघतांना त्याचा पुतळा फरसबंदीवर कोसळून पडून त्याचे तुकडे झाले. पण त्या अपशकुनाची त्यानें परवा केली नाहीं. लोकोत्तर पुरुषावर मृत्यूचा प्रसंग आला म्हणजे स्थावर वस्तूला देखील धसका बसतो अशी कल्पना करण्याची लोकप्रवृत्ति आहे. **सीझर** सेनेट सभेकडे जात असतां एका तिऱ्हाईत मनुष्यानें त्याच्या हातांत एक पत्र देऊन तें तेथेंच **वाचा** अशी त्यानें विनंति केली. त्या पत्रांत त्या कारस्थानाची इत्थंभूत हकीगत लिहिली होती व कारस्थानांतील मंडळींची नांवनिशी दिली होती. **सीझर यास** वाटलें कीं, ती एक कोणाची अर्जी आहे आणि त्यानें निष्काळजीनें ती आपल्या कागदांत ठेविली.

**सीझरच्या** मित्रांनीं त्यास वारंवार सावध केलें असून व दुःशकुनांनीं अडथळे आणिले असूनही तो **सेनेट** सभेंत गेला, तस्मात काळानें त्याच्या गळ्यास फांस लावून त्यास **सेनेट** सभेंत नेलें असेंच ह्मणावें लागतें. ज्या कारस्थानांत साठ मनुष्यें होतीं तें कारस्थान- कांहीं गुप्त राहील असें नव्हतें व गुप्त राहिलेंही नाहीं. **ट्रेबोनियसनें ॲन्टनी** याजपाशीं देखील ही गोष्ट काढिली होती. आतां ती त्यानें खरी मानली नाहीं, हें खरें, पण दुष्ट कारस्थान घाटत आहे हें त्याच्या कानावर गेलें होतें. **सीझरच्या** मित्रांनीं त्यास सावध राहण्याकरितां सूचना केल्या होत्या, पण तो ह्मणाला कीं, " शत्रू मला मारतील तें पुरवलें, पण तें मला आज मारतील,

उद्यां मारतील, ह्या काळजींत नेहमीं राहणें मला आवडत नाहीं." आणि अतःपर ही गोष्ट आपणाजवळ कोणी काढूं नये अशी त्यानें आपल्या मित्रांस ताकीद दिली होती. त्याच्या मित्रांनीं त्याच्या संरक्षणाची इतकी उपेक्षा करावी हें नवल नव्हे काय ! तो आपल्या मृत्यूविषयीं किती कां बेपरवा असेना, त्याच्या निमकहलाल नोकरांनीं आणि त्याच्या जिवलग मित्रांनीं त्यास नेहमीं गराडा घालून राहावयाचें होतें, त्याची अशी उपेक्षा करावयाची नव्हती.

ॲन्टनी सीझरबरोबर होता. संकेत झाल्याप्रमाणें ट्रिबोनियस यानें त्यास सभेच्या बाहेर खोळंबून धरलें. सभेच्या दरवाज्याशीं सीझर पालखींतून उतरला तेव्हां पापिलियस त्याजपाशीं जाऊन कांहीं वेळपर्यंत कांहीं कानगोष्टी करीत होता. तो कारस्थानी लोकांच्या कटांतील असल्यामुळें तो फितला कीं काय, असें सर्वांस भय वाटलें, आणि असें देखील ह्मणण्यांत आलें आहे कीं, आपलें कारस्थान शेवटास जाण्यापूर्वी प्रसिद्धीस आलें असें समजल्याबरोबर आपल्याच हत्यारांनीं आपले प्राण घेण्यास ते तयार होऊन राहिले होते. सीझर सभेंत शिरल्याबरोबर सर्वजण उठून उभे राहिले, आणि तो आपल्या खुर्चीवर येऊन बसल्यावर त्याच्या तेजापुढें सर्व दिपून गेले. आणि कारस्थानी लोकांस देखील असें वाटलें कीं, आपण जर आपलें कृत्य लवकर उरकून घेतलें नाहीं तर आपलेंही धैर्य आपणास सोडून जाईल आणि मग आपल्याच्यानें कांहींच होणार नाहीं. सीझर सर्वांबरोबर सलगीनें वागत असे, याजमुळें त्याजजवळ सर्वांस जातां येत असे. त्या कटांतील लोक त्याच्या भोंवताली एकत्र झाले. त्यानें सर्वांकडे अवलोकन करून पहातां त्यांत असा एकही नव्हता कीं, सीझर यानें त्याजपासून कृतज्ञपणाची अपेक्षा करूं नये. यामुळें ते आपल्या भोंवताली

कांहीं दुष्ट संकल्पानें जमले आहेत, असा त्यास कांहीं संशय आला नाहीं. एक कांहीं त्यास निवेदन करीत आहे तों दुसरा कांहीं विनंती करीत आहे, असें चाललें असतां टयुलियस* सिंबर अगदीं त्याच्याजवळ येऊन आपल्या भावाला देशनिकालशासनांतून मुक्त करावें ह्मणून आग्रहपूर्वक विनंती करूं लागला. व दुसरेही त्याबद्दल रदबदली करण्याच्या मिषानें सीझर भोंवतीं गोळा झाले. पण सीझर कांहीं त्यांचें ऐकेना. तेव्हां टयुलियस सिंबरनें सीझरचा झगा ओढून मानेवरून एकीकडे केला, आणि क्यासियस सीझर याच्या मागें होता त्यानें त्याच्या मानेवर एक कट्यारीचा घाव केला. सीझर मोठ्यानें ओरडून उठला आणि क्यासिअसचा हात धरून "दुष्टा, हें काय करतोस ?" ह्मणून बोलला तों दुसऱ्यानें त्याच्या छातींत कट्यार खुपसून प्राणघातक जखम केली. तरी सीझर यानें क्यासिअसचा हात गच्च धरिलाच होता. परंतु जेव्हां त्यानें ब्रूटस यास आपल्यावर कट्यार उगारतांना पाहिलें आणि आपल्या भोंवताली जमलेल्या लोकांपैकीं एकाच्याही मुखावर मित्रभावाचें चिन्ह त्याच्या दृष्टीस पडलें नाहीं आणि आपल्याकडे रोखलेल्या कट्यारींचें एक वर्तुळ आपल्या भोंवतीं चमकत आहे असें त्यानें पाहिलें, तेव्हां आपला झगा आपल्या तोंडावर घेऊन व मरण पावल्यावर आपला देह अस्ताव्यस्त पडूं नये ह्मणून झग्याचे पदर आपल्या भोंवती वेष्टून घेऊन एकही शब्द न उच्चारतां खालीं बसला. त्याजवर कट्यारींचे प्रहार करण्यांत त्या दुष्ट लोकांची इतकी धांदल उडाली कीं, त्यांपैकीं कित्येक आपल्याच सोबत्यांच्या कट्यारीनें जखमी झाले. ब्रूटस याच्या हातावरही एक जखम लागली.

---

* सीझर यानें याला नुकताच बिथिनयाचा मख्त्यार नेमिला होता.

**सिसेरो** या प्रसंगीं सभेंत विद्यमान होता. त्यानें **ॲटिकस** यास एक पत्र लिहिलें. त्यांत तें कर्म पहतांना त्यास जो आनंद झाला तो त्यानें प्रदर्शित केला आहे. त्याच्या दृष्टीनें नृपहत्या हें कांहीं पातक नव्हतें, आणि कीर्तिकर कर्मांत तें अत्यंत श्लाघनीय कर्म समजून तो त्याची स्तुति करीत असे. **सीझर**च्या संबंधानें **सिसेरोनें** जीं भाषणें केलीं त्यांच्या झोंकावरून **सीझरनें** एकछत्री राज्य करून ठेविलें होतें त्याबद्दल त्याचा **सिसेरोस** अति तिट-कारा आला होता असें दिसून येतें. राष्ट्रहिताकरितां **सीझरास** मारलेंच पाहिजे होतें, असें त्याचें मत होतें. **सीझरचा** वध झाल्या-वर **ब्रूटसनें सीझर**च्या रक्तानें माखलेली कट्यार परजवून **रोमन** रष्ट्राचें स्वातंत्र्य रक्षण केल्याबद्दल **सिसेरो**ा शाबासकी दिली.

या कारस्थानांत जे सामील नव्हते ते सर्व सभासद घाबरून उठले आणि फोरमांत एकत्र झाले. **ॲन्टनीस** तें वर्तमान समजल्या-बरोबर गुलामाचा वेष घेऊन तो आपल्या घरीं गेला, आणि एकांत जागेंत लपून बसला. ते खुनी लोक सभेंतून बाहेर निघून मोठ्यानें गर्जून लोकांस सांगूं लागले कीं, प्रजापीडक जुलमी राजा मरण पावला, आणि **रोम**राष्ट्र स्वतंत्र झालें. थोड्या दिवसांपूर्वीं ज्या सभेंत **सिसे-रोनें** असें म्हटलें होतें कीं, **सीझर** याची राष्ट्राला इतकी गरज आहे कीं, त्याच्या जिवाकरितां सर्व **सेनेटर** आपले प्राण देतील, त्याच जागेंत **सीझरचें** प्रेत टाकून सर्व सभासद चालते झाले.

मारेकऱ्यांस असें वाटलें होतें कीं, जुलमी अधिकाऱ्याच्या हातांतून राष्ट्र मुक्त केल्याबद्दल लोक आपलें अभिनंदन करतील, परंतु तसें कांहीं झालें नाहीं. जिकडे तिकडे भयानक सामसूम आणि अनिष्टसूचक चिन्हें दिसूं लागलीं. कांहीं थोडे लोक एकत्र जमले होते त्यांजपुढें **ब्रूटस** आणि **क्याशिअस** यांनीं कांहीं भाषणें

केली, त्यांत त्यांनीं जुन्या राजकारणानियमांची प्रशंसा केली. त्या नियमांचा **सीझर**नें अतिक्रम करून सर्व राज्यसत्ता आपल्या हातांत घेऊन **रोमन**राष्ट्र गुलाम करून टाकिलें, म्हणून आम्हीं त्यास मारिलें, आमचा त्याच्याशीं कांहीं खासगत द्वेष नव्हता, असें त्यांनीं सांगितलें. श्रोतेमंडळी प्रेतवत् होऊन भाषण ऐकत होती. त्यांजकडून आश्वासनसूचक असा एकही जयशब्द निघाला नाहीं. नगरवासी लोक ही गोष्ट कांहीं विसरले नव्हते कीं, थोड्या दिवसांपूर्वीं **सीझर**ची प्रशंसा करितांना ज्या लोकांनीं असें म्हटलें होतें कीं, **सीझर** हा **रोमन** राष्ट्राचा त्राता असून त्यास मानवी सन्मान देणें हें कांहींच नाहीं, यास्तव तो देव कल्पून त्याची मूर्ति स्थापन करण्याकरितां एक मंदीर बांधावें, तेच लोक त्याचा वध करून आज त्याची निंदा करीत आहेत. कारस्थानी लोकांच्या मनाप्रमाणें कांहीं बेत उतरला नाहीं. तेव्हां ते **क्यापिटल** नांवाचें एक सभास्थान होतें. तेथें निघून गेले, आणि **सिसेरो** आणि दुसरे लोक त्यांस जाऊन मिळाले. पुढें करावयाचें काय, या मसलतींत त्यांनीं सर्व रात्र घालविली. त्यांच्या मनांत असें होतें कीं, **सीझर** यास जुलमी ठरवून त्याचें प्रेत **टायबर** नदींत टाकून द्यावें आणि त्याची सर्व मिळकत लुटून सरकारांत घ्यावी; परंतु **सीझरास** जर जुलमी ठरविलें तर त्याचीं सर्व कृत्यें रद्द करावीं लागतील; आणि तसें केलें असतां कारस्थानांतील मंडळीपैकीं पुष्कळांना **सीझर** याजकडून मोठमोठे अधिकार मिळाले होते ते सर्व रद्द होतील **डेसिमस ब्रूटस** याजकडे इतालीच्या उत्तरभागाचा, **मार्कस ब्रूटस** याजकडे **म्यासिडोनियांचा** गव्हर्नर या नात्यानें राज्यकारभार चालविण्याचा कांहीं अधिकार राहणार नाहीं, व **सीझर** यानें आपणास **कान्सल** नेमून ठेविलें आहे असा **डोलाबेला** यास कांहीं

हक्क सांगतां येणार नाहीं. सबब तो विचार त्यांनीं सोडून दिला. सीझरनें केलेले हुकूम रद्द केले असतां दुसराही एक मोठाच अनर्थापात होणार होता. सीझरनें आपल्या हातांखालीं सहस्त्र लष्करी लोकांस जिंकलेल्या मुलुखाची जमीन वांटून दिली होती, आणि त्या मुलुखांत वसाहत करण्याकरितां ते लोक जाण्याच्या तयारींत होते. सीझरच्या हुकुमाप्रमाणें त्यांस जमीन न दिली तर किती मोठा अनर्थ गुजरेल याची तर कल्पनाच करवत नव्हती. ॲन्टनी याजकडे कान्सलचा अधिकार असल्यामुळें कायद्याप्रमाणें राष्ट्राचें स्वामित्व काय तें त्याजकडेसच होतें आणि लेपिडस हा सेनाधिपति असल्यामुळें राष्ट्राचें सर्व सैन्य त्याच्या हुकुमांत होतें. तेव्हां सीझरास गुन्हेगार ठरवून त्याचें प्रेत नदींत टाकून देणें आणि त्याची मिळकत लुटून सरकारांत घेणें याचा आपल्याकडे अधिकार तरी काय आणि तें कर्म शेवटास जाणार कसें, इत्यादि अनेक गोष्टी त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं तो बत सोडून दिला. भय आणि स्वहित यांनीं त्यांस पोक्त विचार करण्यास भाग पाडलें. सीझरनें केलेल्या नेमणुका व त्यानें केलेले हुकूम कायम राखले पाहिजेत म्हणून त्यांनीं असा ठराव केला कीं, सीझरच्या प्रेताचें सन्मानपूर्वक दहन करावें; पण ॲन्टनीच्या मदतीवांचून कांहीं कोणतीही गोष्ट सुध्यां रीतीनें पार पडणार नाहीं. सबब त्यास बोलावणें पाठवावें असें ठरवून त्या कामीं सिसेरोची योजना केली. सिसेरोपासून कितीही मोठ्या चुका झाल्या असोत, तो कांहीं मूर्ख मनुष्य नव्हता. त्यानें त्या मंडळीस असें सांगितलें कीं, ॲन्टनी तुम्ही ह्मणाल त्यास हो म्हणेल, परंतु त्याजवर विश्वास ठेविल्याबद्दल शेवटीं तुह्मांस अनुताप करावा लागेल. ॲन्टनीकडे जाण्याचें काम दुसऱ्यानें आपल्या आंगावर घेतलें आणि

ॲन्टनीनें त्या मंडळीस भेटण्याचें कबूल केलें आणि दुसरे दिवशीं सकाळीं टेराच्या मंदिरांत सेनेट सभा एकत्र झाली.

ॲन्टनी कान्सलर असल्यामुळें अध्यक्षस्थानीं बसला होता आणि त्याचें थोडें भाषण झाल्यावर **सिसेरो** भाषण करण्यास उठला. त्याचें भाषण प्रसंगानुरूप आणि अत्यंत मनोवेधक असावयाचेंच. पहिल्यानें त्यानें रोमनराष्ट्राचा सर्व इतिहास सांगितला. ज्या राष्ट्रांत दुफळी असते त्याची कशी दुर्दशा उडते हें त्यानें अथेन्स आणि दुसऱ्या राष्ट्रांचीं उदाहरणें दाखवून दोन्ही पक्षांस असा उपदेश केला कीं, आतां त्यांनीं आपसांतील वैरभाव सोडून द्यावा, आणि ऐक्य राहील असें करावें, नाहीं तर या भग्न राष्ट्राचे दुसरेच लोक स्वामी होऊन बसतील.

आणखी तो ह्मणाला—"सीझर मारला गेला. क्यापिटेल (एक-सभागृह) ऑपटिमेटस optimates यांच्या ताब्यांत असून फोरम यास लेपिडस याच्या सैन्यानें वेढा दिला आहे, आणि लोक अत्यंत भयभीत झाले आहेत. अशा स्थितींत प्रदीप्त झालेल्या वैराग्नींत आणखी नवीन अपकाररूप तेल ओतून तो जास्त भडकविण्यांत अर्थ काय? या कालचक्रांत पुष्कळ वर्षेंपर्यंत एक-मेकांस अपकार करून बहुतांशीं अरण्यपशूप्रमाणें आपण आपलें आयुष्य घालविलें. आतां आपण मागल्या गोष्टी विसरून जाऊं या. आजपर्यंत जें कांहीं केलें त्याजवर आतां आपण आच्छादन घालूं आणि कोणत्याही मनुष्याच्या कर्माबद्दल यापुढें आपणास चिकित्सा करावयाची नाहीं. सीझर अशा मरणाला पात्र होता याविषयीं पुष्कळ बोलतां येईल, व ज्यांनीं त्यास मारिलें त्यांच्या प्रतिकूळही पुष्कळ बोलतां येईल; परंतु सूक्तासूक्त कोणतें याची आपण वाटाघाट करूं लागलों तर त्यापासून नवीं कज्जाभांडणें मात्र

निष्पन्न होतील. जो प्रसंग आपण पाहिला तो सृष्टिनियमाप्रमाणें घडून आला असें मानण्यांतच शहाणपण आहे. **सीझर**चे हुकूम आणि त्यानें केलेल्या नेमणुका कायम ठेवूं. घडून गेलेल्यां गोष्टीची चिकित्सा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, कारण जें केलें तें केलें नाहीं, असें कांहीं होत नाहीं. "

**सिसेरो**चा उपदेश फार उत्तम होता, परंतु **सीझर**सारख्या पुरुषाच्या मृत्यूविषयीं लोकांचें मन सहज शांत करणें हें कांहीं शक्य नव्हतें. **सिसेरो**च्या भाषणापासून लोकांचीं मनें शांत झालीं, असें कांहीं वेळपर्यंत दिसलें. लष्करी लोकांस असें समजलें कीं, आपल्यास दिलेल्या जमीनीची देणगी कायम राहिली आहे, तेव्हां तेही शांत झाले. परंतु दोन प्रश्न मोठे महत्वाचे होते, आणि त्यांपैकीं एका प्रश्नाचा तर तात्काल निर्णय झाला पाहिजे होता. **सीझर**चें प्रेत **सेनेट** सभेंतून त्याच्या तीन चाकरांनीं त्याच्या घरीं नेलें होतें तें तसेंच होतें. तें जर नदींत टाकून द्यावयाचें नाहीं तर त्याचें करावयाचें काय? **सीझर**नें मृत्युपत्र केलें होतें तें **ॲन्टनी**पाशीं सुरक्षित होतें. तें मृत्यूपत्र वाचून मंजूर करावें कीं नाहीं? हा दुसरा प्रश्न होता. **सिसेरो**नें **सेनेट** सभेला अशी सल्ला दिली होती कीं, **सीझर** तशा मृत्युला पात्र होता कीं नाहीं, याबद्दल कांहीं वाटाघाटच करूं नये; परंतु जसें **सिसेरो**च्या तसेंच सर्वांच्या हें ध्यानांत होतें कीं, **सीझर**नें **रोमन**राष्ट्राच्या राजकारणनियमाचा अतिक्रम केल्याबद्दल जर त्यास अपराधी ठरविलें नाहीं, तर त्यास ज्यांनीं मारलें त्यांनीं अक्षम्य असें पापकर्म केलें असें सहज सिद्ध होणार आहे. **सीझर**चा प्रेतसंस्कार प्रसिद्धपणें सन्मानपूर्वक केला असतां काय निष्पन्न होईल हेंही **सिसेरो**च्या ध्यानांत होतें. **सीझर**च्या मृत्युपत्रांत अशा कांहीं गोष्टी असतील कीं, तेणेंकरून त्याच्या

तशा मृत्युबद्दल लोक पराकाष्ठेनें संतापून जातील हेंही त्यास माहीत होतें. यास्तव **सिसेरोनें** अशी सल्ला दिली कीं, **सीझर यास बरें** किंवा वाईट ह्मणण्याचा प्रसंग न आणितां त्याचा प्रेतसंस्कार खासगी रीतीनें करावा आणि त्याची मिळकत बेतन माल ठरवून सरकारांत द्यावी. परंतु **सीझरनें** राष्ट्रासाठीं पुष्कळ गोष्टी केल्या होत्या आणि त्याचा प्रेतसंस्कार सन्मानपूर्वक केल्यावांचून कांहीं लष्करी लोक संतुष्ट होणार नव्हते, यामुळें **सिसेरोच्या** मसलतीप्रमाणें कांहीं करितां येईना.

असें समजा कीं, **सिसेरोच्या** मसलतीप्रमाणें **सीझरचा** प्रेतसंस्कार खासगी रीतीनें केला असता तरी लवकर किंवा उशिरानें त्या दुष्ट लोकांच्या अघोर कर्माचें खरें स्वरूप लोकांच्या मनांत पूर्णपणें बिंबल्यावांचून कांहीं राहिलें नसतें. **सीझरचे** प्रतिपक्षी काय ते **रोमन**राष्ट्राचे राजकरणनियम **सीझरनें** मोडल्याबद्दल बडबड करीत असत, परंतु त्यांच्या हातांत राजसत्ता होती तेव्हां जुने राजकरणनियम ह्मणजे त्यांच्या हातांतील एक कळसूत्राचें बाहुलें होतें. त्यास ते आपल्या इच्छेप्रमाणें नाचवीत असत. ज्या राजसत्तेचा ते लोक आपल्याच स्वार्थाकडे अन्यायानें उपयोग करीत असत ती सत्ता त्यांजपासून हिरावून घेण्यांत **सीझरनें** आपलें सगळें आयुष्य घालविलें होतें. **सीझरनें** प्रांतांतील जुलमी कामगारांस कडक शासनें केलीं. त्यानें बडे लोकांस आपण बळकाविलेल्या जमिनींतून सामान्य लोकांस वांटा देणें भाग पाडलें. त्यानें प्रांतांतील आणि वसाहतींतील लोकांकरितां स्वातंत्र्याचा दरवाजा मोकळा ठेवून त्यांस **सेनेट** सभेचे सभासद नेमिले. **सेनेट** सभेनें त्याचा द्वेष केला तो फक्त यांच कृत्याबद्दल ! त्याकरितांच ते त्याजबरोबर लढले; त्याचकरितां त्यांनीं

त्याचा प्राण घेतला. राष्ट्रांत शांति असतां किंवा लढाई चालली असतां सीझरनें आपल्या देशाची सेवा बजाविली, तशी कोणत्याही रोमननें बजाविली नव्हती आणि त्याबद्दल याप्रमाणें त्याला बक्षीस मिळालें !

हे विचार सहस्रावधि लोकांच्या मनांत घोळत होते. सूड उगविण्याकरितां मनें संतप्त होऊन राहिलीं होतीं. कोणत्या रीतीनें सूड उगवावा येवढा मात्र निश्चय झाला नव्हता. सीझरचा प्रेतसंस्कार सिसेरोच्या मताप्रमाणें केला असतां कोणता भयंकर अनर्थ उद्भवेल याची कल्पनाही कोणी करूं शकेना; यास्तव ॲन्टनीनें सीझरचा प्रेतसंस्कार सन्मानपूर्वक करावा असा सेनेट सभेस आग्रह केला आणि तिनें त्याप्रमाणें परवानगी दिली.

सीझरचें प्रेत फोरमांत आणून व्यासपीठावर ठेविलें. प्रेतावरील पोषाख कांहीं बदलला नव्हता. कट्यारींचे भोसके पडलेला आणि रक्तानें माखलेला झगा त्या प्रेतावर तसाच होता. पहिल्यानें मृत्युपत्र वाचलें गेलें. त्यांत प्रत्येक नागरिकाला तीन पौंड द्यावे आणि आपला टायबर नदीवरील बाग सार्वजनिक खेळाकरितां द्यावा, असें मृत्युपत्रांत लिहिलें होतें. हा मजकूर लोकांच्या कानीं पडल्याबरोबर आपल्या हिताविषयीं सीझर किती उत्सुक होता याची त्यांस आठवण झाली. सीझरनें आक्टेव्हियस यास आपला वारस नेमिला होता; आणि त्याचें कांहीं बरें वाईट झालें तर डेसियस ब्रूटस यास वारसा मिळावा असें ठरविलें होतें. सीझरास आग्रह करून सेनेट सभेंत घेऊन आला तो हा डेसियसब्रूटस. लोकांच्या हिताविषयीं सीझरची उत्कट इच्छा जाणून त्याच्या मरणानें सगळा समाज अत्यंत क्रोधाकुल झाला होताच. आणि त्यांत ज्याच्यावर त्यानें अत्यंत विश्वास ठेविला होता त्यानें अत्यंत नीचपणानें

त्याचा विश्वासघात केला ही गोष्ट त्याच्या मनांत भरल्यावर मग काय विचारतां ! समाजाचा क्रोध अगदीं अनावर झाला. लोकांची अशी स्थिति होईपर्यंत **अॅन्टनी** उगीच बसला होता तो आतां पुढें सरसावला.

**सिसेरोस अॅन्टनीचें** फार भय होतें. **अॅन्टनी** एक फांकडा शिपाई होता. त्यास जिवाची मुळींच पर्वा नव्हती. तो मोठा महत्वाकांक्षी आणि उधळ्या होता. त्या काळांतील **रोमन** सद्गृहस्थांपेक्षां तो कांहींसा जास्त दिक्कतखोर होता, परंतु **सीझर**विषयीं त्याचा स्नेहभाव लोकोत्तर होता. पहिल्यानें त्यानें एका अमीराकडून **सीझर** उत्सुक नसतां **सेनेट** सभेनें सर्वसंमतानें बहुमानपुरःसर त्याजवर पदव्यांचा वर्षाव केला त्याबद्दल एक तपशिलवार यादी, वारंवार त्याचा स्तव करून अभिनंदन केल्याबद्दलचे **सेनेट** सभेचे ठराव आणि संकटापासून त्याचें संरक्षण करण्याकरितां **सेनेट** सभासदांनीं शपथा घेतल्याबद्दलचा प्रतिज्ञालेख सर्व लोकांस वाचून दाखविल्यानंतर तो भाषण करण्यास उभा राहिला. त्याचें तें भाषण अत्यंत आवेशयुक्त असून खऱ्या मित्रपणाला शोभेल असें होतें परंतु त्यांत असा एकही शब्द नव्हता कीं, त्यांत सत्य नव्हतें. **सीझरनें रोमन** राष्ट्राची सेवा केली ती अशी ठळक होती कीं, त्यांत अतिशयोक्तीची मुळींच गरज नव्हती.

पहिल्यानें त्यानें सांप्रदायाप्रमाणें **सीझरची** स्तुति केली. त्याचें घराणें, त्याचा जन्म, त्याचा पूर्वकालीन इतिहास, त्याचा स्वभाव, त्याचा खासगी खर्चांत काटकसरपणा, लोकांविषयीं त्याचें औदार्य, मित्रांविषयीं त्याची अत्यंत सानुरागता, शत्रूविषयीं त्याची परमक्षांति, त्याचें पवित्राचरण आणि दुसऱ्याच्या दुष्टाचरणाविषयीं कोणीं कांहीं सांगितलें असतां त्याजवर विश्वास ठेवण्याविषयीं

त्याची अत्यंत अनिच्छता यांविषयीं जें सांगावयाचें तें सांगून अँन्टनी ह्मणालाः—

'सत्ता हातांत आल्यावर बहुतेक लोकांनीं आपले दोष उजेडांत आणिले. सीझरनें आपल्या हातांत सत्ता आल्यावर आपले सद्गुण जगविश्रुत केले. आपल्या उत्कर्षकाळीं तो कधींच उन्मत्त झाला नाहीं. कारण त्याचें ऐश्वर्य त्याच्या नैसर्गिक स्वभावाला अनुरूप होतें. स्पेन देशामध्यें त्यानें प्रथम रोमन राष्ट्राची सेवा बजाविली, त्याबद्दल आपण त्याचा जयोत्सव केला आणि त्याच्या कायदेकानूविषयीं तर मी जन्मभर त्याची स्तुति करीन. गाल देशामध्यें त्यानें केलेले पराक्रम तुह्मा सर्वांस माहीत आहेतच. ज्या प्रदेशांतून लोकांच्या झुंडीच्या झुंडी इटली देशावर हल्ला करीत असत ते प्रदेश इटलीप्रमाणें आज शांत आणि स्वस्थ आहेत. सीझरनें तुमच्या राष्ट्राला जर्मनी आणि ब्रिटन देश जोडले असते, परंतु त्याच्या शत्रूंनीं त्यास तसें करण्याचा अवकाश दिला नाहीं. त्याच्या शत्रूंनीं प्रजासत्ताक राज्य हें आपली वतनवाडी मानली होती त्यामुळें त्यास परत यावें लागलें. ते इतका राजपापहार करूं लागले कीं, तुह्माला सीझरच्या सहायाची गरज पडली. त्यानें स्पेन देशाला स्वातंत्र्य दिलें. पाम्पी याजबरोबर सख्य करण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु पाम्पीस पूर्वेकडील देश तुमच्या सत्तेखालीं आणण्याकरितां ग्रीस देशांत जाणें पसंत पडलें आणि आपल्या हट्टवादानें तो मृत्युमुखीं पडला. सीझरनें पाम्पीचा पराभव केल्याबद्दल कधींही डौल मारला नाहीं, व पाम्पीच्या पक्षास मिळालेल्या लोकांचा सूड घ्यावा असेंही त्याच्या मनांत कधीं वागलें नाहीं. उलट पाम्पीशीं जे इमानानें वागले त्यांचा त्यानें स्तव केला आणि बेइमानानें वागले त्यांची निंदा केली. पाम्पीच्या मृत्यूबद्दल त्यास फार

वाईट वाटलें आणि विश्वासघात करून ज्यांनीं त्यास मारलें त्यांस यथायोग्य शासनें केलीं. त्यानें **इजिप्त** आणि **आरमेनिया** देशांत शांतता केली. नव्या नव्या फंदफितुरानें जर त्यास **इटलींत** परत येणें भाग पडलें नसतें तर **पारथियन** लोकांचाही त्यानें चांगला बंदोबस्त केला असता. त्यानें सर्व फंदफितूर मोडून टाकिले; आफ्रिका आणि स्पेन देशांत त्यानें स्थीरस्थावर केलें. त्याचें अंतःकरणच परम शुद्ध होतें. त्याची मनोवृत्ति सदैव सारखी असे. क्रोधानें किंवा अर्थ सिद्धीनें तींत कधीं चलबिचल झाली नाहीं. त्यानें कधीं वैर प्रतिक्रिया केली नाहीं. आपल्या भावी अर्थाला व्यत्यय येईल ह्मणून त्यानें कधीं कोणाला उग्र शासन केलें नाहीं. . आपल्या शत्रूंनीं करूं दिलें तर त्यांचें संरक्षण करावयाचें, हा त्याचा अथपासून इतिपर्यंत मुख्य प्रयत्न असे. पूर्वीच्या कारकिर्दींत जे अन्यायानें गांजले गेले होते त्यांस त्यानें सुखी केलें. **सिला** यानें जीं घराणीं धुळीस मिळविलीं होतीं तीं त्यानें पूर्व स्थितीवर आणिलीं, आणि **सिला** आणि **सिरिया** यांजमध्यें झालेल्या पत्रव्यवहाराचे सर्व कागद वाचून जाळून टाकले. ते अशा हेतूनें कीं, त्यांवरून ज्यांचे दोष उघडकीस येतील त्यांस कांहीं उपद्रव होऊं नये व उपद्रव होईल असें त्यांस भय देखील वाटूं नये. तुह्मी सर्वांनीं त्यास पित्याप्रमाणें सन्मान दिलें, तुह्मी आपला हितेच्छू मानून त्याजवर प्रीति केली, तुम्ही त्याला राष्ट्राचें स्वामित्व दिलें. त्यानें कधीं तुमच्या सन्मानाची अपेक्षा केली नाहीं आणि तुह्मी त्यास ज्या पदव्या दिल्या त्या जरी त्याच्या योग्यतेला कमी होत्या, तरी त्यानें त्या जास्त मानिल्या. दैविक कर्मामध्यें तो श्रेष्ठ होता. तुमचा तो **कान्सल** ( राष्ट्रांतील मुख्य अधिकारी ) होता. सैन्याचा तो सेनापति होता, आणि आपल्या

देशाच्या शत्रूचा तो डीक्टेटर* होता. सारांश तुमच्या राष्ट्राचा तो पिता आणि तुमचा मुख्य धर्माधिकारी ज्याचा देह अनपकारार्ह असें ज्ञापित केलें होतें तो हा शूर पुरुष मरण पावलेला तुमच्यापुढें आहे. तो कांहीं रोगानें मरण पावला नाहीं. तो कांहीं अधिदैविक उपद्रवानें मरण पावला नाहीं. तर येथें आपल्या देशांत तुमच्या नगराच्या सीमेंत सेनेट सभागृहांत तो शूर पुरुष निःशस्त्र असतां त्याच्या शत्रूंनीं संगनमत करून त्याचा वध केला. परकी शत्रू युद्धप्रसंगीं ज्याच्या केंसाला धक्का लावूं शकले नाहींत त्याचा तुमच्या देशबांधवांनीं कीहो वध केला! त्यानें ज्यांचे प्राण वांचविले व ज्यांजवर परम दया केली त्याला त्यांनीं विश्वासघात करून मारिलें! सीझर, मानवी प्राण्याविषयीं तुझें कारुण्य आतां कोठें आहे? तुझ्या आत्म्याचा पवित्रपणा कोठें आहे? तुझे कायदे कोठें आहेत? ज्या फोरममधून तुझी स्वारी जातांना लोक तुझ्या नांवाचा जयघोष करीत असत व तुझ्या गळ्यांत हारांचे भार लोळत असत तो तूं आज या फोरमांत वध केलेला पडला आहेस; ज्या व्यासपीठावरून लोक तुझें भाषण एकाग्र मनानें ऐकत असत, त्या व्यासपिठावर आज तुझें प्रेत ठेविलें आहे! हाय! हाय! तुझे करडे केंस रक्तबंबाळ कीरे झाले आहेत. अरेरे!! तूं आपला देह बळी देतांना जो झगा पांघरला होतास त्याजवर कट्यारींच्या अग्रानीं भोसके कीरे पडले आहेत!'

ॲन्टनीचें भाषण संपल्याबरोबर लोक अत्यंत क्रोधाविष्ट झाले. त्यांनीं दगेखोर लोकांस शिव्या–शाप दिले. सीझरचा वध होत असतां जे सेनेट सभासद उगीच बसून राहिले होते त्यांचाही

---

* राष्ट्राचें अस्तित्व धोक्यांत असलें ह्मणजे ज्याला संपूर्ण अधिकार देत असत त्याला डीक्टेटर म्हणत असत.

अत्यंत परुषोक्तीनें धिःकार केला. 'सीझरचा प्रेतसंस्कार आम्ही करणार' असें ह्मणून ते पुढें सरसावले. फोरमच्या कामगारांनीं सीझरचें प्रेत मोठ्या सन्मानानें व्यासपीठावर ठेविलें होतें त्याभोंवतीं ते गोळा झाले. कोणी अशी सूचना केली कीं, तें प्रेत ज्युपिटरच्या मंदिरांत नेऊन तेथें मारेकऱ्यांच्या डोळ्यांसमोर दहन करावें. कोणी ह्मणाले कीं, ज्या सभेंत सीझरचा वध केला तीच सभा सीझरची चिता मानून तींत त्याचें दहन करावें. शेवटीं जेथें तें प्रेत आहे तेथेंच जाळावें असें ठरलें. प्लॅटफॉर्म मोडून त्याच्या काष्ठांची आणि खुर्च्या आणि मंचकांची एक मोठी चिता रचली. सीझरच्या चितेंत आपल्या हातची एखादी धलपी तरी पडावी म्हणून लोकांनीं इतकी गर्दी केली कीं, चितेजवळ जाण्यास रीघ होईना. नाटकी आपले पोषाख करून तेथें धांवत आले; गवयी आपलीं वाद्यें घेऊन धांवले आणि आपलीं हत्यारें घेऊन सर्व लष्करी लोक एकत्र झाले. स्त्रियांनीं आपल्या कंठांतील हार, मुलांच्या आयांनीं मुलांचे खेळ चितेंत टाकिले. अशा रीतीनें झीझरचा प्रेतसंस्कारविधी आटपला, आणि लोकांनीं त्या चितेंतील कोलितांनींच त्या कटांतील पुढाऱ्यांच्या वाड्यांस अग्नि लावून जाळून फस्त केले.

# भाग ५

प्रजासत्ताक राज्याविषयीं **सिसेरो**च्या निःसीम भक्तीची निष्फळता. त्याचें **रोम** नगर सोडून बाहेर जाणें. त्याचा **अॅन्टनी**बरोबर पत्रव्यवहार. **अॅन्टनी**चें अनीतिपर आचरण. **सिसेरो**नें आपला काळ ग्रंथरचनेंत घालविला. त्याचें **रोम** नगरीं पुनरागमन. **रोम** राष्ट्राची तत्कालीन स्थिति. **सिसेरो** व **अॅन्टनी** याजमधील वैराग्नी जास्त वृद्धीस पावतो. **अॅन्टनी**नें **सीझर**चा वारस **ऑक्टेव्हियस** यास **सीझर**च्या संपत्तीचा ताबा दिला नाहीं, यामुळें त्या दोघांमध्यें फार वैर माजलें. **ऑक्टेव्हियस** आणि **डेसिमसब्रूटस अॅन्टनी**वर चाल करून गेले, परंतु नव्या **काउन्सिला**कडून सरकारी फौजेची मदत न मिळाल्यामुळें **अॅन्टनी**चा पराभव झाला नाहीं. नवें **कौन्सील हेरटियस** व **पानसा** यांच्या मनांत **अॅन्टनी**-बरोबर साम करावयाचें होतें. व त्याजकडे वकील पाठविण्याचा विचार ठरला. **अॅन्टनी**नें **सेनेट** सभेच्या अटी कबूल केल्या नाहींत. व त्यानें ज्या अटीवर साम करण्याचें कबूल केलें होतें त्या अटी **सेनेट** सभेस मान्य होतील अशा नव्हत्या. **अॅन्टनी**ची समजूत पाडण्याकरितां **सिसेरो**स पाठवावें अशी **सेनेट** सभेंत सूचना करण्यांत आली. परंतु **सिसेरो**नें त्याविरुद्ध भाषण केल्यामुळें ती सूचना रद्द झाली. व **अॅन्टनी**बरोबर युद्ध करून त्याचें पारिपत्य करावें असें ठरलें.

**सिसेरो**चा ज्या गोष्टींशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं त्या गोष्टी कितीही महत्वाच्या असोत, त्या कांहीं येथें निरूपण करितां येत नाहींत.

**सीझर** मारला गेल्यावर **सिसेरोनें** केलें काय आणि त्याचा शेवट परिणाम झाला काय, इतकेंच आपल्यास पहावयाचें आहे.

**सिसेरो** स्वातंत्र्यदेवतेचा निःसीम भक्त होता. प्रजासत्ताक राज्यरूप देवतेचें विलासमंदीर संरक्षण करण्याकरितां कोणत्याही प्रकारचें पाप केलें असतां तें कांहीं त्याच्या दृष्टीनें पाप नव्हतें इतकी त्याची प्रजासत्ताक राज्यसंस्थेवर प्रीति होती. परंतु हें मोठें आश्चर्य आहे कीं, त्याच्यासारख्या राज्यनिपुण पुरुषाला हें समजलें नाहीं कीं, स्वातंत्र्यदेवतेचें देवत्व कधींच नष्ट होऊन तिच्या उपासकांनीं तिच्या विलासमंदिरांत अनेक प्रकारचीं दुष्ट कर्मे करून तें अगदीं अपवित्र करून टाकिलें आहे व त्याला इतकी जर्जर दशा प्राप्त झाली आहे कीं, आतां कोणत्याही उपायानें तें कांहीं सावरून धरितां येत नाहीं.

**सिसेरोच्या** समजुतीप्रमाणें **सीझर** मोठा जुलमी अधिकारी होता असें कल्पिलें तरी **सीझरच्या** मृत्यूनें एका जुलमी अधिकाऱ्याच्या हातून राष्ट्र मुक्त झालें असें ह्मणतां येईल, परंतु जुलमापासून मुक्त झालें असें कांहीं ह्मणतां येणार नाहीं, कारण जुलूम जिवंतच होता. **सीझरास** मारण्याच्या कटांत जे लोक होते त्यांचा तरी हेतु हाच होता कीं, राज्यसूत्र आपल्या हातीं घेऊन स्वेच्छपणें आपले मनोरथ सिद्धीस न्यावे. **सीझरच्या** पूर्वी प्रजासत्ताक राज्याच्या मिषानें जे थोडे लोक राज्य चालवीत होते ते आपल्याच पापानें, आपल्याच मूर्खपणानें व आपल्याच लोभानें नाश पावले. **सीझर** हा केवळ निमित्ताला मात्र कारण होता. आणि तीच अवस्था पुढील परंपरेची होणार होती व झाली. **सीझरचा** प्राण घेतल्यानें पुनः प्रजासत्ताक राज्य पूर्व पदावर येईल असें मानणें केवळ मृत्यु पावलेला प्राणी सजीव होईल असें मानण्याप्रमाणें होतें.

सर्व राष्ट्राचें हित तेंच आपलें हित हें मूळतत्व जोंपर्यंत सर्व लोकांच्या मनांत जागृत होतें तोंपर्यंत रोमन राष्ट्राची भरभराटी झाली, परंतु राज्य व्यवस्था पाहणारे लोक आपलाच स्वार्थ पाहूं लागले तेव्हां प्रजासत्ताक राज्याला क्षीणावस्था येऊं लागली आणि त्यांनीं आपल्या स्वार्थसाधनाची सीमा केली तेव्हां त्याचें अवसान झालें. पन्नास वर्षांपासून राज्यसूत्र श्रीमंत लोक चालवीत असत. जो पुष्कळ लांच देईल त्यास आपली संमती द्यावयाची असा प्रतिनिधी निवडणाराचा क्रम चालू होता. बडे लोकांचीं पांचशें घराणीं, त्यांचे संबंधी आणि आश्रित **रोमन** राष्ट्राला कसरीप्रमाणें खाऊन फस्त करीत होते. ऐषआराम भोगावयाचे हाच काय तो त्यांचा धंदा आणि त्यांच्या कामना अशा अचाट होत्या कीं, त्या कधीं तृप्त झाल्याच नाहींत.

**सिसेरो** अशा धिराचा पुरुष नव्हता कीं, अशा आणिबाणीच्या प्रसंगीं **रोम** नगरांत राहूं शकेल. **ब्रूटस, कॅशिअस** वगैरे संगनमती लोक जसे नगर सोडून निघून गेले त्याप्रमाणें **सिसेरो**ही निघून गेला. तो या गांवाहून त्या गांवीं, आणि या उपवनांतून त्या उपवनांत भटकत फिरत होता. आणि राजकीय विषयाचें चिंतन करण्याचें सोडून देऊन त्यानें आपलें लक्ष्य तत्वज्ञानाकडे लाविलें. **सीझर**चा परममित्र **अटिकस** याची आणि **सिसेरो**ची भेट झाली तेव्हां **अटिकस**नें **सिसेरोस** स्पष्ट सांगितलें कीं, **सीझरस** मारल्यापासून उलट **रोमन** राष्ट्राची अशी वाईट स्थिति झाली आहे कीं, तशी कधींच झाली नव्हती. **सीझर**सारख्या बुद्धिवान् आणि शक्तिमान पुरुषाच्यानें जें राष्ट्र संकटांतून मुक्त केलें गेलें नाहीं तें दुसरा कोणी मुक्त करील हा पोकळ भ्रम होता.

**सिसेरो ॲन्टनी**चा अत्यंत द्वेष करीत असतांही त्यानें त्याला

एकपत्र लिहिलें. त्यांत त्यानें आपला अॅन्टनीविषयीं परम मित्र-भाव दर्शविला होता, आणि आणखी असें लिहिलें होतें कीं, पूर्वी-पासून त्याजवर आपली प्रीति होतीच. परंतु हल्लींच्या प्रसंगीं त्याचें उत्तम वर्तन पाहून ती आतां इतकी वाढली आहे कीं, तशी आपली प्रीति दुसऱ्या कोणावरही नाहीं. राज्यकारस्थानांत सिसेरोचें वर्तन नेहमीं 'मनस्येकं वचस्येकम्' असेंच असे. हें पत्र लिहिल्यानंतर सिसेरोनें सेनेट सभेंत एक भाषण केलें त्यांत अॅन्टनीची फार फजिती उडविली. त्यावर उत्तर देतांना तें पत्र अॅन्टनीनें सभेंत वाचून दाखवून 'सिसेरो कशा प्रकारचा मनुष्य आहे याची तुम्हीच किंमत करा असें सभेस सांगितलें.

त्यानंतर दुसऱ्या एका प्रसंगीं सिसेरोनें भाषण केलें त्यांत अॅन्टनीनें आपलें पत्र सेनेट सभेंत वाचून दाखविलें हा विश्वास-घात केला असा त्याजवर आरोप आणिला असून आणखी असें म्हटलें आहे कीं, 'जर मी असें म्हणेन कीं, मीं कांहीं असें पत्र लिहिलें नाहीं तर तुजपाशीं असा काय पुरावा आहे कीं तें पत्र मींच लिहिलें ? कोणत्या पुराव्यावरून तूं मजवर आरोप शाबीत करशील ? माझ्या हस्तलेखावरून काय ? बनावटी लेख करण्यांत तर तूं मोठा प्रवीण आहेस. अशी तुझी लोकांत कीर्ति गाजली आहे ! (सीझरच्या सहीशिक्याचें बनावटी लेख केल्याबद्दल अॅन्टनीवर दोष आला होता, त्याला उद्देशून सिसेरोचें हें म्हणणें होतें.)

डोलाबेला दुसरा कान्सल—अॅन्टनीचा सोबती याला ही सिसेरोनें असेंच मित्रत्वाच्या नात्यानें पत्र लिहिलें होतें, आणि त्यांत त्याचीही फार स्तुती केली होती. सिसेरोचा मित्र अॅटिकस यास कांहीं तें आवडलें नाहीं. आणि अतःपर तूं असें करूं नको असा त्यानें सिसेरोस निषेध केला.

**सिसेरोचें** सगळें लक्ष्य **ब्रूटस** आणि **क्याशियस** यांच्या वर्तनाकडे लागलें होतें. त्यांत ब्रूटसच्या कर्तृत्वशक्तीवर त्याचा मोठा विश्वास होता. **ॲटिकसनें सिसेरोस** अशी सूचना केली होती कीं, आतां तुह्मी कांहीं राजकीय खटपटींत पडूं नये. परंतु 'जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं' या ह्मणीप्रमाणें **सिसेरोची** स्थिति झाली होती. त्याला असें नेहमीं वाटत असे कीं, **सीझरचा** वध करणारांनीं आपल्या मसलतीप्रमाणें वर्तन केलें असतें तर **रोमनराष्ट्र** पुनः ठिकाणीं पडलें असतें.

**सीझरचें** प्रेत दहन करण्यापूर्वी **ॲन्टनीनें** भाषण करून लोकांचे मनांत **सीझरविषयीं** अत्यंत पूज्यबुद्धि आणि त्याच्या मारेकऱ्यांविषयीं अत्यंत तिरस्कारबुद्धि उत्पन्न केली, यावरून तो एक मोठा वक्ता आणि राज्यकारस्थानांत परम प्रवीण पुरुष होता असें आपल्या मनांत येण्याचा संभव आहे; पण तो कांहीं तसा मोठा राज्यकारस्थानी नव्हता व वक्ताही नव्हता. **सीझरचीं** उदात्त कर्मेंच अशीं होतीं कीं, तीं कोणाच्याही मुखांतून निघालीं असतां लोकांच्या मनांत त्याजविषयीं पूज्यबुद्धी उत्पन्न झाल्यावांचून राहूंच नये आणि त्या मारेकऱ्यांचें दुष्ट कर्महीं असें उग्र होतें कीं, त्यांजविषयीं लोकांच्या मनांत द्वेषभावही उत्पन्न झाल्यावांचून राहूं नये.

**ॲन्टनीच्या** हातांत राजसूत्र आल्यावर त्यानें **सीझरच्या** सहीशिक्याचे बनावट लेख करून जें इच्छिलें तें शेवटास नेलें. **सीझरचीं** सर्व कृत्यें कायदेशीर आहेत असें ठरलें होतें आणि त्याचा प्रायव्हेट सेक्रेटरी **ॲन्टनी** यास अनुकूल होता यामुळें त्यास कोणतीही अडचण पडली नाहीं. त्यानें लांच घेऊन लोकांस मोठमोठ्या जागा व पदव्या दिल्या. **सीझरला** स्वतःला जें करितां आलें नसतें तें त्याच्या नांवानें **ॲन्टनीनें** केलें इतकें सांगितलें ह्मणजे त्यानें काय

केलें त्याचा बोध होण्यासारखें आहे. त्याखेरीज त्यान सीझरच्या द्रव्याचा आपल्या मर्जीस येईल त्याप्रमाणें विनियोग केला. सीझरचा वारस आक्टेव्हियस आपल्या मिळकतीचा ताबा मागत असतां तें सगळें द्रव्य सरकारी आहे असें अॅन्टीनीनें त्यास उत्तर दिलें. सेनेट सभेचें आणि त्याचेंही बनेनासें झालें, व लोकांच्याही मनांतून तो उतरला.

सिसेरो सेनेट सभेचा सभासद असल्यामुळें रजा घेतल्यावांचून कांहीं त्यास गैरहजर राहतां येत नव्हतें, आणि रजा तर त्यानें घेतली नव्हती. पण सेनेट सभेने डोलाबेलास पारथियन लोकांचा पराजय करण्याकरितां नेमिलें तेव्हां सिसेरोची त्याच्या हाताखालीं लेफ्टेनन्टच्या हुद्यावर नेमणूक केल्यामुळें त्यास रजा घेतल्यावांचून रोम नगर सोडून राहण्यास सहजच सवड मिळाली.

सिसेरोनें रोम नगर सोडल्यानंतर पुनः तो परत येईपर्यंत मध्यें जो काळ गेला तो त्यानें ग्रंथरचना करण्यांत घालविला. शेवटच्या दोन वर्षांत त्याच्या बुद्धीला जी उज्वलता प्राप्त झाली होती तशी त्याच्या सगळ्या आयुष्यांत प्राप्त झाली नव्हती.

रोमनगरीं परत जाण्यासारखीं अनुकूल चिन्हें कांहीं दिसून येईनात तेव्हां सिसेरो इटली देश सोडून अन्य देशांत जाण्यास निघाला. अॅटिकस आणि सिसेरो यांस असें वाटलें कीं, आतां कांहीं पुनः आपण एकमेकांस भेटणार नाहीं. अॅटिकसनें सिसेरोस पत्र लिहिलें त्यांत वियोग झाल्यावर आपणास किती रडूं कोसळलें तो मजकूर लिहिला होता. सिसेरोनें असें उत्तर लिहिलें कीं, तूं जर माझे समक्ष रडला असतास तर मीं मुळींच गेलों नसतों. असें त्या उभयतांमध्यें निर्मळ प्रेम नांदत होतें.

सिसेरो या देशांतून त्या देशांत प्रवास करीत असतां त्यास एके

ठिकाणीं रोमनगराहून आलेले कांहीं गृहस्थ भेटले, आणि त्यांनीं त्यास कांहीं महत्वाच्या गोष्टी सांगितल्या. त्यांत एक गोष्ट अशी सांगितली कीं, अॅन्टनीच्या मनांत ब्रूटस व क्याशियस यांजबरोबर सख्य करावयाचें आहे. त्या सद्गृहस्थांनीं अॅन्टनीनें लोकांपुढें भाषण केलें त्याची एक नक्कल सिसेरोस दाखविल्यावरून तर त्यास आनंद झाला आणि त्यानें लागलीच दुसरीकडे जाण्याचा बेत रहित करून रोमगनरीं परत जाण्याचा निश्चय केला. इतक्या त्वरेनें सिसेरोचें परत येणें अॅटिकसास कांहीं आवडलें नाहीं. सिसेरो जेव्हां नगराच्या दरवाजाशीं येऊन पोंचला तेव्हां त्याचें आगतस्वागत करण्याकरितां सहस्त्रावधी लोक धांवून गेले. तो त्यांचा सगळा दिवस परस्परक्षेमकुशल विचारण्यांतच गेला. तेरा वर्षांपूर्वीं देशनिकालशासनांतून मुक्त होऊन तो परत आल्यावर लोकांनीं त्याचा सत्कार केला होता तसाच या वेळेसही केला. सिसेरोमध्यें कितीही दोष असोत व त्याचें मन कितीही अस्थिर असो, रोमनगरांत त्याच्या अब्रूची बरोबरी करील असा एकही गृहस्थ नव्हता. त्याच्या बुद्धिवैभवापुढें सगळे कवडीमाल होते. आणि खरोखर त्याच्या बरोबरीचा एकही मनुष्य जिवत राहिला नव्हता. डोलाबेला आणि अॅन्टनी हे पराकाष्ठेचे उधळे, महत्वाकांक्षी आणि दुराचरणी आहेत अशी त्यांची दुष्कीर्ति झाली होती. सीझरचा वारस आक्टेव्हियस स्वतः कांहीं उदयास आला नव्हता. एका मोठ्या मनुष्याचा तो वारस आहे इतकेंच लोकांस माहीत होतें. रोमन् राष्ट्ररूप नाटकरंगभूमीवरील मोठमोठीं पात्रें आपापलीं कामें करून निघून गेलीं होतीं आणि नाटकगृह भयाण होऊन राहिलें होतें. क्याटो, पाम्पी, क्युरिपो आणि सीझर हे रक्तमिश्र कबरींत जाऊन निजले होते. रोमन् राष्ट्राच्या मुत्सद्यांला

साजतील असे कांहीं गुण ब्रूटसमध्यें होते, पण तो तर बाहेर भटकत फिरत होता. सगळ्या **रोम**नगरांत एकही वक्ता नव्हता. **रोमन** राष्ट्ररूप तारूं कर्णधारावांचून इकडे तिकडे भटकत होतें, आणि तें एखाद्या खडकावर आपटून फुटतें किंवा कांठाला लागतें, याविषयीं कांहीं अनुमान करितां येत नव्हतें. पुनः आपसांत लढाई होईल आणि ज्याच्या बाहुबळांत विशेष शक्ति असेल, त्याला **रोमन** राष्ट्रलक्ष्मी माळ घालील, अशींही चिन्हें दिसत होतीं. **डोलाबेला** पराकाष्ठेचा दुष्टाचरणी असल्यामुळें व **ॲन्टनी** सद्गुणाखेरीज केवळ दुसरा **सीझर** असल्यामुळें त्याजमध्यें आणि **सेनेट**-सभेमध्यें फार वैमनस्य आलें होतें.

**रोमन** प्रजासत्ताक राज्याचा अधिकार अशा लोकांच्या हातांत असल्यावर **सिसेरोस** मोठ्या उत्साहानें लोकांनीं मान द्यावा यांत कांहीं नवल नाहीं. कोणत्याही प्रसंगीं **सेनेट** सभेंत किंवा फोरमांत **सिसेरोनें** भाषण केल्यावर अत्यंत गुंतागुंतीच्या प्रश्नांचा निकाल लागला नाहीं, असें घडलेंच नाहीं, असें त्याच्या शहाणपणांत आणि वाणींत विलक्षण सामर्थ्य होतें. तेव्हां **सिसेरो**ची वाग्देवी आतां आपल्याला काय उपदेश करिते तें श्रवण करण्याकडे **सेनेट** आणि लोकांचें चित्त लागावें यांत कांहीं नवल नाहीं. त्यानेंही त्यांस निराश केलें नाहीं. आपल्या सगळ्या आयुष्यांत त्यानें जीं सत्कृत्यें केलीं त्यांत आयुष्याच्या शेवटचीं त्याचीं कृत्यें फार उदात्त होतीं. **सीझर**च्या शाहाणपणापुढें त्याची कांहीं मात्रा चालेना, तेव्हां त्यानें **पाम्पीचा** पक्ष घेतला; कारण **पाम्पीनें** त्याजवर कांहीं उपकार केले होते, त्याबद्दल तो त्याचा वाजवीपेक्षांही जास्त कृतज्ञ होता. परंतु **पाम्पी** कांहीं मोठा मुत्सद्दी नव्हता व मोठा योद्धाही नव्हता. यामुळें आपसांतील लढाई चालू

होती तोंपर्यंत तो त्याचा पक्ष धरल्याबद्दल अनुताप करून हें करूं का तें करूं, असा संदिग्ध मानस होता; परंतु आतां त्याला खुला मार्ग झाला आणि त्याचें कर्तव्य कर्म स्पष्ट होतें. त्यानें आतां शेवटचा फासा टाकून हार किंवा जीत होतों हें पहावें असा दृढ निश्चय केला. जेव्हां त्याला असें समजलें कीं, जी आशा धरून आपण **रोमनगरीं** परत आलों ती भ्रममूलक आहे, तेव्हां त्यानें **ॲन्टनी**च्या उद्देशास अडथळा आणण्याचा दृढ संकल्प केला आणि आपल्या जिवाची पर्वा न करितां त्यास इतक्या जबर धमकावण्या दिल्या कीं, त्याबद्दल **सिसेरो**चा प्राण घेतल्यावांचून कांहीं **ॲन्टनी**चा क्रोधाग्नि शमला नाहीं.

एके दिवशीं **सेनेट** सभेच्या सर्व सभासदांची भरमजलस भरणार होती; त्याच्या पूर्व दिवशीं असें समजलें होतें कीं, उद्यां **ॲन्टनी सीझरास** दैविक सन्मान देण्याविषयीं सूचना करणार आहे. सर्व सभासदांनीं सभेंत हजर व्हावें असा **ॲन्टनीनें कान्सल**च्या अधिकारानें हुकूम फिरविला होता, आणि जो सभासद गैरहजर राहील त्यास दंडाचें शासन करावें असा कायदा होता, परंतु **सिसेरो** कांहीं त्या सभेस हजर झाला नाहीं. **सीझरला** केवळ देवरूप करून बसवावें हें कांहीं त्यास प्रशस्त वाटलें नाहीं. व **ॲन्टनी**च्या सुचनेविरुद्ध मत देऊन त्याचें आपलें इतकें उघड वैर करून घ्यावें, हेंही त्यास बरें वाटलें नाहीं. त्यानें आपली प्रकृति चांगली नाहीं असें **ॲन्टनी**स सांगून पाठविलें. तें ऐकून त्यास अतिशय राग आला. "मी आतांच मजुर लोक पाठवून **सिसेरो**चा बंगला त्याच्या मस्तकावर तोडून पाडवितों" असें तो म्हणाला. **सिसेरोनें** तें वर्तमान ऐकल्यावर त्यासही मोठा राग आला. देशनिकालशासनमुक्त होऊन परत आल्यावर सरकारी

खर्चानें त्याला सदर्हू इमारत बांधून दिली होती. ती **सिसेरोस** एक मोठें भूषण होतें. आणि त्याजविषयीं **ॲन्टनी** असें अभद्र भाषण बोलला याबद्दल **सिसेरोस** जास्तच क्रोध आला; परंतु तो त्यानें आपल्या मनांतच जिरविला. त्यानंतर लागलीच दुसरी **सेनेट** सभा भरली त्या सभेंत **सिसेरो** हजर होता, पण **ॲन्टनी** आला नाहीं. त्यानेंही आपली प्रकृति स्वस्थ नाहीं, असें निमित्य सांगितलें. त्या दिवशीं **सिसेरोनें** भाषण केलें त्यांत **ॲन्टनी**-वर अनेक आरोप आणून त्याची फार फटफजिती केली. **सेनेट** सभेंत फोरममध्यें आणि जेथें प्रसंग येईल तेथें **सिसेरोनें** भाषणें कर-ण्याचा आणि व्याख्यानें देण्याचा सपाटा चालविला होता, व त्याचप्रमाणें **ॲन्टनी**चाही क्रम सुरू होता. **सिसेरोनें** ॲन्टनीवर आरोप आणावे, त्याचें **ॲन्टनीनें** खंडन करून **सिसेरोवर** नवे आरोप आणावें आणि **सिसेरोनें** त्याचें परिमार्जन करून **ॲन्टनी**-वर पुनः नवें आरोप आणावे असा क्रम चालू होता. पण **ॲन्ट**-नीच्या आंगीं **सिसेरोची** बरोबरी करण्याचें सामर्थ्य नव्हतें. **सि-सेरोच्या** भाषणावर **उत्तर** देण्याकरितां त्यास पंधरा पंधरा दिवस भाषण तयार करावयास लागत, व त्याकरितां एखाद्या अलंकार शास्त्रज्ञाची त्याला मदत घ्यावी लागत असे. तरी देखील **सिसे-रोच्या** भाषणावर तोड होणें ही गोष्ट सर्वथैव अशक्य होती **सिसेरोस** तसें कधींच करावें लागत नसे. त्याची ज्ञानसंपत्ति फार होती, त्याची स्मरणशक्तिही अपूर्व होती, आणि त्याची समय-सूचकताही विलक्षण होती. व्यासपिठावर उभा राहून तो भाषण करूं लागला ह्मणजे सहस्त्रावधि श्रोते मंडळी भिंतीवरच्या चित्रा-प्रमाणें स्तब्ध होत असत. त्याजवर सरस्वतीनें असा कांहीं प्रसाद केला होता कीं, त्याला आपल्या मनांतील गोष्ट श्रोत्यांच्या अंतः

करणांत ठसवून देण्याला कांहीं सायास पडत नसत. अॅन्टनीमध्यें तसें सामर्थ्य मुळींच नव्हतें. यामुळें त्याचें भाषण फिकें पडत असे.

सीझरचा वारस आक्टेव्हियस यास अॅन्टनीनें सीझरच्या संपत्तीचा ताबा दिला नाहीं, हें पूर्वी सांगितलेंच आहे. शेवटीं त्या दोघांमध्यें फार वैर माजलें. आणि आक्टेव्हियसनें आपल्या खासगी खर्चानें एक मोठी फौज जमा करून अॅन्टनीची खोडकी जिरविण्याचा निश्चय केला. सेनेट आणि अॅन्टनी यांजमध्यें वैमनस्य आलें होतेंच. कान्सलच्या अधिकारावर असतां देखील तो राष्ट्राचा शत्रू आहे असा सेनेट सभेनें ठराव केला होता. नंतर त्याच्या अधिकाराची मुदत संपल्यावर जसे इतर नगरवासी लोक तसा तो आणि त्यानें कांहीं सैन्य एकत्र केलें होतें, यामुळें तर तो बंडखोराच्या वर्गांत आला. सिसेरोनें यानंतर त्याला पाजींतला पाजी मनुष्य ठरवून ठेविलें होतें. आणि सिसेरोचें प्रत्येक वचन श्रुतिप्रमाणें लोकांना मान्य होतें. आक्टेव्हियस फौज घेऊन अॅन्टनीवर चाल करून आला. व डेसिमस ब्रूटसनें त्यास म्युटिना शहराजवळ आडवून धरलें होतें. परंतु नव्या कान्सलांनीं सरकारी फौजेची मदत केल्यावांचून अॅन्टनी कांहीं हार जाईल असा तो निर्बळ नव्हता.

नवे कॉन्सल्स हिरटियस ( Hertius ) व पानसा ( Pansa ) हे दोघे ज्युलियन पक्षांतील असून सीझरचे सर्वस्वी ऋणि होते. सीझरकडे डिक्टेटरचा अधिकार असल्यानें त्यानें त्यांस कॉन्सल नेमून ठेविले होते. ह्मणूनच त्यांस आतां येवढा मोठा अधिकार मिळाला होता. सीझर मरण पावल्यावर ते मोठ्या सावधगिरीनें, तिऱ्हाइतपणानें वागत असत. राजकीय कामांत किंचित देखील मन घालीत नव्हते. सिसेरोविषयीं त्यांचे मनांत पुज्यबुद्धि होती. परंतु

**सिसेरो**चा कांहीं त्यांजवर पुरा विश्वास नव्हता. ते राजनिष्ठ आणि मोकळ्या मनाचे होते असें त्यांच्या वर्तनावरून दिसत असे. **अॅन्टनी सीझर**च्या पक्षांतील असल्यामुळें त्यास अगदीं निकरावर आणावें असें कांहीं त्यांच्या मनांत नव्हतें. त्यापासून आपसांतील लढाई उत्पन्न होऊन पूर्वीपेक्षांही जास्त रक्तस्राव होईल, असें त्यास भय वाटत असे. दुसरें आपला हितकर्ता **सीझर** यास मारणाऱ्या लोकांपैकीं **डेसिमसब्रूटस** हा साक्षात **अॅन्टनी**चा वैरी आहे ही गोष्ट ते विसरतील अशी नव्हती. आणि **आक्टेव्हियस** खेरीजकरून **अॅन्टनी**चे विरुद्ध पक्षांतील सर्व लोक **सीझर**चा प्राण घेऊन मोठें यश संपादन केलें असें मानणारे होते. यास्तव त्यांनीं **कॉन्सल अॅन्टनी** प्रजाधर्मानें वागण्यास योग्य होईल, असे तडजोडीचे उपाय योजण्याचा संकल्प केला.

तारीख १ ज्यानेवारी रोजीं **ज्युपिटर**च्या मंदिरांत **सेनेट** सभा भरली आणि सांप्रदायाप्रमाणें दैवीक विधानें झाल्यावर **कॉन्सल**नीं सभेपुढें असा प्रश्न आणिला कीं, **अॅन्टनी**नें फौज एकत्र केली आहे तेव्हां त्याच्याशीं वागावयाचें कसें ? **कॉन्सल**च्या भाषणावरून **सिसेरो**स असें वाटलें कीं, सक्त उपायाची योजना करून **अॅन्टनी**स ठिकाणीं आणावयाचें असें त्यांच्या मनांत आहे. परंतु पुढील प्रकारावरून **सिसेरो**चे कान उघडले. पहिल्यापासून संकेत करून ठेविल्याप्रमाणें **कान्सल पानसा** याचा सासरा **क्यालेनस** यानें पहिल्यानें आपला अभिप्राय द्यावा असें **कान्सल**नीं फर्माविलें. पूर्वी तो लोकांचा **ट्रिब्यून** होता. आणि त्यानें **क्लोडियसा**स मुक्त करण्याकरितां फार प्रयत्न केला होता. आणि तेव्हांपासून तो **सीझर**चा उत्कट पक्षपाती होता, व **सीझर**नें त्यास तीन महिन्यांकरितां **कान्सल** नेमिला होता. **सिसेरो**नें एक वर्षापूर्वी एक पत्र

लिहिलें होतें त्यांत त्याला आपला शत्रू म्हटलें होतें. आणि त्याच समयास ॲन्टनीची बायको फउलव्हिया आपल्या मुलासह क्यालेनसच्या आश्रयानें त्याच्या घरांत राहत होती. अशा मनुष्याला पहिल्यानें आपला अभिप्राय देण्यास सांगणें ही गोष्ट अनिष्टसूचक होती, आणि त्यापासून मोठा वादविवाद होईल असें चिन्ह दिसूं लागलें.

क्यालेनसचा अभिप्राय असा होता कीं, ॲन्टनीकडे एक वकील पाठवून त्यास येथें बोलवावें आणि सेनेट सभेच्या हुकुमाला आधीन होऊन राहण्याविषयीं त्यास समजूत द्यावी. पूर्वी कान्सलचा अधिकार ज्यांनीं उपभोगिला होता त्यांनींही क्यालेनसच्या अभिप्रायाला आपली संमत्ती दिली. सरतेशेवटीं सिसेरोची बोलण्याची पाळी आली. पांचवें फिलिपिक् ( Fifth Philippic ) या नांवानें तें भाषण प्रसिद्ध आहे. तें भाषण सारांशरूपानें देखील येथें येत नाहीं. कारण त्यापासून वाचकांचें कांहीं रंजन होईल, असें वाटत नाहीं. कोणतेंही भाषण समग्र वाचल्यावांचून कांहीं त्यांतील खरें रहस्य समजत नाहीं. भाषणाच्या संक्षेपानें उलट रसाभास होतो. दुसरें त्या भाषणापासून कांहीं नवा वृत्तांत कळेल किंवा नवें ज्ञान प्राप्त होईल असेंही नाहीं. सिसेरोनें ॲन्टनीचे दोष विस्तार करून सांगितले आहेत. याखेरीज त्यांत दुसरें कांहीं नाहीं. आतां तो मोठाच वक्ता होता तेव्हां त्याचें एकच भाषण दहा वेळां वाचलें तरी प्रत्येक वेळीं तें जसें काय आपण पहिल्यानेंच वाचीत आहों असें वाचकांना वाटावें, असें तें सुरस आहे यांत संशय नाहीं. परंतु त्यांतील सारांश आपल्या भाषेंत सांगितल्यानें वाचकांना कांहीं विशेष आनंद होईल असें वाटत नाहीं. ज्यांची उत्कट इच्छा असेल त्यांनीं मूळ ग्रन्थासच तोंड लावावें हें योग्य आहे.

जो मनुष्य **सेनेट** सभेनें राष्ट्राचा शत्रु आहे असें ठरविलें आहे त्याच सभेनें त्या मनुष्याकडे वकील पाठविणें हें कांहीं योग्य नाहीं; तसें केल्यानें तो उलटा जास्त मगरूर होऊन बसेल व तुम्हीच त्याला आपल्या बरोबरीच्या योग्यतेचा मानला असें होईल; असें **सिसेरोनें** अनेक कारणें दाखवून प्रतिपादन केलें व **ॲन्टनीचे** अनेक अपराध उघड करून सांगितले.

**ॲन्टनी**कडे वकील पाठवावा किंवा नाहीं याबद्दल पुष्कळ मत-भेद होता. अस्तमान होऊन गेला तरी वादविवाद संपला नाहीं. सरतेशेवटीं तो विषय दुसऱ्या दिवसापर्यंत तहकूब ठेवावा लागला. दुसऱ्या दिवशीं आणि तिसऱ्या दिवशीं त्याबद्दल पुनः भवती–न भवती झाली आणि या प्रसंगी ज्यांनीं भाषणें केलीं त्यांपैकीं पुष्कळ **सिसे-रोच्या** मताचे होते. त्यावरून सभेपुढील प्रश्नावर सभासदांची संमती घेतली तर **सिसेरो**च्या तर्फे जास्त मतें पडतील असें स्पष्ट दिसून आलें; तेव्हां **कान्सलस**नीं मतें घ्यावयाचीं नाहींत असा ठराव केला व तसें करण्याचा त्यांस अधिकार होता, पण तेणेंकरून कांहीं प्रश्नाचा निकाल लागला नाहीं तेव्हां **ट्रिब्यून** सालव्हियसनें **सिसेरो**ची सूचना सभासदांच्या संमताकरितां सभेपुढें आणूं नये असा निषेध केल्यानें **कान्सलस** यांची अडचण दूर होऊन त्यांच्या सूचनेप्रमाणें **ॲन्टनीकडे** वकील पाठविण्याचा **सेनेटसभेनें** ठराव केला. मोठ्या पदवीचे तीन गृहस्थ कमिशन ह्मणून पाठविण्याचें ठरलें आणि सभेच्या हुकमाचा मसुदा करण्याचें काम **सिसेरोस** सोंपविलें होतें. त्या हुकमांत ज्या अटी होत्या त्या ह्याः–**ॲन्टीनीनें** **म्युटिना** शहरास घेरा घातला आहे तो उठवावा. **डेसिमस ब्रूटस** याशीं वैर करूं नये.

* **सिशालपाइनगाल** आपल्या ताब्यांत घेऊं नये. **सेनेट** आणि लोक यांच्या आज्ञेप्रमाणें वागावें. याप्रमाणें त्यानें वर्तन केलें नाहीं तर राष्ट्राच्या शत्रूप्रमाणें त्यास वागविण्यांत येईल. आणखी नेमिलेल्या कमिशनरास असा हुकूम होता कीं, त्यांनीं **डेसिमस ब्रूटसास** असें कळवावें कीं, त्यानें आणि त्याच्या लष्करानें राष्ट्राची जी सेवा केली ती **सेनेट** आणि लोक यांच्या लक्ष्यांत आहे. आणि त्यास असें आश्वासन द्यावें कीं, त्याबद्दल जे सन्मान आणि बक्षिसें द्यावयाचीं आहेत तीं त्याजकरितां आणि त्याच्या हाताखालच्या सरदारांकरितां तयार करून ठेविलीं आहेत.

कमिशनर **अॅन्टीनी**कडे निघून गेले ते कांहीं ज्यानेवारी अखेर परत आले नाहींत. लोक नानाप्रकारच्या बातम्या उठवीत होते. कोणी ह्मणत **अॅन्टीनी** कांहीं त्या अटी कबूल करणार नाहीं. कोणी ह्मणत त्यास निदान फरदर गालची सुभेगिरी दिल्यावांचून तो कांहीं शरण येणार नाहीं. असे लोकांचे अनेक तर्क चालले होते.

**अॅन्टीनी**कडे तीन कमिशनर पाठविले होते. त्यां पैकीं एकतर प्रवासाच्या श्रमानें **अॅन्टीनी**च्या लष्करांत जाऊन पोंहोंचल्यावर लागलीच मरण पावला. ज्या वेळेस त्यास कमिशनर नेमलें त्यावेळेस तो आजारी होता, आणि आपल्याच्यानें हें काम झेपणार नाहीं असें त्यानें सांगितलें असून **सेनेट** सभेनें त्यास फार आग्रह केल्यामुळें त्यास जाणें भाग पडलें. **सिसेरोस** त्यानें तेव्हांच सांगितलें होतें कीं, आपला प्राण जाईल तो पुरवला पण **सेनेट** सभेची मर्जी कांहीं मोडावयाची नाहीं.

---

* **गाल** देशाचे दोन भाग केले होते. एका भागास **सिशालपाइनगाल** आणि दुसऱ्यास **फरदर गॉल** ह्मणत असत.

**सेनेट** सभेनें **ॲन्टीनीकडे** कमिशन पाठवून त्यास **सिसेरोनें** ह्मटल्याप्रमाणें आपल्या बरोबरीचा प्रतिस्पर्धी करून ठेविला. कमिशनरनीं त्याजबरोबर जी बोलाचाल केली ती अशा धाटिची होती कीं, जसा काय तो एक रोमन राष्ट्राचा प्रतिस्पर्धी अन्य राष्ट्राधिप आहे, तेव्हां त्यानेंही कमिशनरांस बरोबरीच्या नात्याच्या उलट मागण्या केल्या. त्यानें **सिशालपाईनगाल** देशावरचा हक्क सोडून देण्याचें कबूल केलें, परंतु त्याऐवजीं दुसऱ्या मुलुखाचें अधिपत्य पांच वर्षेंपर्यंत आपल्याकडे असावें, **डेसिमस ब्रूटसच्या** ताब्यांतील-सैन्याच्या सहा पलटणी आपल्या ताब्यांत असाव्या, आपल्या सैन्याला जमीन आणि पैका द्यावा, आपण दिलेल्या देणग्या कायम कराव्या, **सीझरच्या** सहीशिक्याचे बनावटी कागद केल्याबद्दल निमित्य करून जे ठराव रद्द केले आहेत ते सर्व कायम करावे, आपसदेवतेच्या मंदिरांतून आपण जें द्रव्य घेतलें त्याचा हिशेब मागूं नये, ज्यूरीबद्दल आपण केलेला कायदा रद्द करूं नये आणि आपणास जे लोक अनुसरले त्यांस उपद्रव न होण्याबद्दल क्षमा पत्र द्यावें. या अटी **सेनेट** सभेनें मान्य केल्या नाहींत, तर बाहुबळानें शेवटास नेण्याचा त्याचा दृढ संकल्प झाला होता. त्यानें त्या दोन कमिशनरांस म्युटिना शहरांत जाऊन **ब्रूटसची** भेट घेण्याची साफ मनाई केली आणि ते कमिशनर त्याच्या लष्करांत असतां नगरास घेरा घालण्याचें काम जास्त जोरानें चालविलें. **ॲन्टनीचें** नावडतें उत्तर ऐकून परत येण्यावांचून कमिशनरास दुसरा मार्गच नव्हता, आणि ते परत आल्यावर **कान्सल पान्सानें ॲन्टनीच्या** उत्तराचा विचार करण्याकरितां लागलीच **सेनेट** सभा भरविली.

**ॲन्टनीचें** उत्तर ऐकून **सिसेरोस** पराकाष्ठेचा राग आला. **सेनेटचे** हुकूम **ॲन्टनीस** मान्य नाहींत असें समजल्याबरोबर क-

मिशनरांनीं परत यावयाचें होतें. **ॲन्टनी**बरोबर बरोबरीच्या नात्यानें बोलाचाल करून त्याच्या अटी काय आहेत हें त्यास विचारावयाचेंच नव्हतें. अशा मगरूर मनुष्याबरोबर बोलाचाल करून कमिशनरांनीं **सेनेट** सभेची बेअब्रू मात्र केली असें **सिसे-रोनें** सांगितलें.

**ॲन्टनी**च्या अटी कबूल होण्यासारख्या नव्हत्याच, तेव्हां **कान्सलांनीं सेनेट** सभेस येवढेंच विचारलें कीं, **ॲन्टनी**बरोबर लागलीच युद्ध सुरू करावें कीं नाहीं. कान्सलस यांच्या प्रश्नाचा विचार करितांना **ॲन्टनी**चे पक्षपाती सभासद लढाई करूं नये असें कांहीं ह्मणूं शकले नाहींत; परंतु तिला लढाई ह्मणूं नका भांडण ह्मणा असें त्यांचें बोलणें पडलें. **सिसेरो**स तें कांहीं आवडलें नाहीं. वस्तूंना योग्य नांवें न देणें हा मूर्खपणा आहे असें तो म्हणाला. **सेनेट** सभासदांनीं फुसकीं भाषणें करून **सेनेट** सभेची उत्साह-वृत्ति भंग केल्याबद्दल त्यानें त्यांस मोठा टपका दिला. या समयाचा **सिसेरो**चा जोम प्रशंसनीय होता. **ॲन्टनी**चें पारिपत्य करण्या-करितां **सेनेट** सभेच्या आणि लोकांच्या मनांत आवेश उत्पन्न करण्यासाठीं त्यानें आकाश आणि पाताळ एक करून सोडलें. त्या काळीं **रोमन** राष्ट्राचा तो एक आत्माच आहे असें लोकांस वाटूं लागलें. वेळोवेळीं **सेनेट** सभेंत आणि फोरमांत त्यानें जीं भाषणें केलीं तीं अशीं आवेशोत्पादक होतीं कीं, तशीं पूर्वीं कधीं त्याच्या ओंठांतून निघालीं नव्हतीं. **ॲन्टनी** आणि दुसरे बदमाश लोक यांच्या विरुद्ध तो बोलूं लागला ह्मणजे त्या लोकांचे पक्षपाती असे गजबजून जाईत कीं, जसें काय त्यांजवर आकाश कोसळून पडतें आहे. **सीझर** आणि **पाम्पी** यांजमध्यें लढाई चालली अस-तां कोणतां रास्त आहे या विषयीं त्याला संशय असल्यामुळें

त्याचें मन नेहमीं संदिग्ध असे. परंतु या प्रसंगीं तसा त्यास कांहीं संशय नव्हता अॅन्टनी राष्ट्राचा शत्रू आहे, त्याचें पारिपत्य केलेंच पाहिजे, असा त्याच्या मनाचा दृढ निश्चय झाल्यामुळें आपलें कांहीं कां होईना, आपल्या देशाची सेवा करणें हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे असें मानून तें कृत्य करण्यास तो प्रवृत्त झाला. स्वदेशावर त्याची अत्यंत प्रीति होती. आणि अॅन्टनी सीझरपेक्षां जुलमी अंमलदार होता यामुळें त्याच्या हातांत राज्यसत्ता गेली कीं, रोमन राष्ट्राचें स्वातंत्र्य लयास गेलें असें त्याच्या मनांत पूर्णपणें बिंबलें होतें.

पुनः एक वेळां कमिशन पाठवून अॅन्टनीची समजूत घालावी व त्या कामाकरितां सिसेरोस पाठवावें अशी सेनेट सभेस सूचना करण्यांत आली. सिसेरो ह्मणाला " माझ्या जीविताची मला कांहीं पर्वा नाहीं, परंतु छळ आणि यातना झाल्यावांचून मला मरण प्राप्त व्हावें अशी माझी इच्छा आहे. परंतु तुम्हां रोमन लोकांना माझ्या जीविताची कांहींच किंमत असूं नये हें कांहीं योग्य नाहीं ; कारण मी जर चुकत नसेन तर मला असें वाटतें कीं, मी मोठ्या काळजीनें आणि सावधान पूर्वक दुष्ट मनुष्यापासून आपला प्राण जाईल याचें भय न बाळगितां तुमच्या देशाची मीं सेवाच केली आहे. प्रजासत्ताक राज्याला मजकडून तिळमात्रही उपद्रव झाला नाहीं; तर तुह्मीच विचार करा कीं, मजवरील संकटाचा मी विचारच करूं नये कीं काय ? " नंतर त्यानें अॅन्टनीकडे जातांना आपणास रस्त्यांत किती धोके आहेत हें स्पष्ट करून दाखविलें आणि शेवटीं असें ह्मणाला कीं ' तुम्ही जर मला राहूं द्याल तर मी रोम नगरांत राहण्यास इच्छितों; हेंच माझें निवासस्थान. हाच माझा मजबूत किल्ला. मजपेक्षां दुसरे कमी मित्र आहेत असें नाहीं, परंतु मला जसें माझ्या

जीविताकरितां भ्यावें लागतें तसें कांहीं कोणास आपल्या जीविता-साठीं भ्यावें लागत नाहीं; आणि या गोष्टी अगदीं स्पष्ट आहेत. वीस वर्षांपासून आपल्या देशाचे शत्रूंचा मजवर डोळा आहे. त्यांनीं आपल्या पापाचें प्रायश्चित्त प्रजासत्ताक राज्याला भोगावयास लाविलें आहे; आणि प्रजासत्ताक राज्यानें मला आजपर्यंत जिवंत ठेविलें आहे तें कांहीं मजकरितां नाहीं. त्यानें स्वतःकरितां ठेविलें आहे.

**सिसेरो**च्या उपपत्तीचा इच्छित परिणाम झाला, आणि **ॲन्ट-नी**कडे पुनः कमिशन पाठविण्याचा विचार रहित झाला.

# भाग ६.

**कानसल हेरिटियस, पानसा** व **आक्टेव्हियस** यांच्या सैन्यांनीं **अॅन्टनी**बरोबर युद्ध करून त्याचा पराभव केल्यामुळें **म्युटीना** शहराचा वेढा उठवून तो **गाल** देशाकडे चालता झाला हें विजयाचें वर्तमान ऐकून **रोमन** लोकांनीं **सिसेरो**चा मोठा जयजयकार केला. तत्संबंधानें **सिसेरो**च्या अत्युत्तम भाषणांतील सारांश व त्यापासून लोकांच्या मनावर झालेला परिणाम. **अॅन्टनी** मारला गेला नाहीं व पकडलाही गेला नाहीं, यामुळें त्याच्या पराभवा पासून इच्छित अर्थ सिद्धिस गेला नाहीं. **कान्सल हेरिटियस** व **पानसा** हे **अॅन्टनी**बरोबर युद्ध करतांना रणांगणीं पडल्यामुळें **कान्सल**चा अधिकार कोणास द्यावा याविषयीं अडचण उत्पन्न झाली. **सिसेरो** सेनापत्य स्वीकारून लढाईवर जाण्यास योग्य नसल्यामुळें या प्रसंगीं **कॉन्सल**च्या अधिकारास तो पात्र नाहीं असें ठरलें. **सेनेट** सभेनें **डेसियस ब्रूटस** यास **कॉन्सल** निवडलें. पण **ऑक्टेव्हियस** यास ती गोष्ट आवडली नाहीं. त्याच्या मनांत आपणास **सिसेरो**चा जोडीदार **कॉन्सल** नेमावें असें होतें. **सेनेट** सभेनें त्याचें म्हणणें ऐकिलें नाहीं, व आपल्या फौजेस कबूल केल्याप्रमाणें पगार व बक्षिसें दिलीं नाहींत म्हणून त्यानें **अॅन्टनी**बरोबर सख्य केलें हें वर्तमान **डेसियस ब्रूटस** याच्या सैन्यास समजल्यावर तेंही त्यास सोडून गेलें. व **ब्रूटस** याचा एका अधमी मनुष्यानें वध केला. **ऑक्टेव्हियस** आपल्या सैन्यासह **रोम** नगराजवळ आला, तेव्हां **सेनेट** सभेनें निरुपाय होऊन त्यास **कॉन्सल** नेमिलें.

**अॅन्टनी**बरोबर युद्ध करून त्याचा पराजय करण्याचा बेत ठरल्याप्रमाणें **कान्सल हिरटियस** लष्कर घेऊन पूर्वींच **म्युटिना** शहराकडे निघून गेला होता, व **पानसा**नें आणखी लष्कर जमवून तोही त्याच्या मागून गेला. **आक्टेव्हियस** मोठ्या युद्धकुशल सैन्यासह **अॅन्टनी**वर चाल करून येत होता. तिन्ही लष्करें एकत्र होऊन **अॅन्टनी**बरोबर लढलीं असतां त्याचा सहज पराभव होईल हें ठरल्यासारखेंच होतें, व त्याप्रमाणें गोष्ट घडून आली. दोन्ही पक्षांमध्यें तीन चार लढाया होऊन **अॅन्टनी**चा पराभव झाला व त्यास **म्युटिना** शहराचा घेरा उठवून **गाल** देशाकडे जावें लागलें. **सेनेट** सभेचा जय तर झाला, परंतु तिचे दोन्ही **कान्सल** लढायांत मारले गेले. पहिल्या लढाईंत **हिरटियसास** जखमा लागल्यामुळें तो कांहीं दिवसांनीं मरण पावला, आणि शेवटच्या लढाईंत **पानसा** मारला गेला.

युद्ध सुरू असतां मध्येंच अशी गप्प उठली होती कीं, **अॅन्टनी**चा जय झाला. हें वर्तमान **रोम** नगरांत पसरल्याबरोबर **अॅन्टनी**च्या पक्षांतील लोकांनीं नगरांत मोठी धांदल उडवून दिली; परंतु लोकांच्या **ट्रिब्युना**नें लोकांची सभा भरवून आणि त्यांजपुढें एक सालंकार भाषण करून ती बातमी खोटी आहे असें लोकांच्या मनांत भरविलें, आणि त्यानंतर दोन किंवा तीन तासांनीं **अॅन्टनी**चा पराभव झाल्याबद्दल बातमी आल्यावर **अॅन्टनी**च्या पक्षाकडील लोकांचीं तोंडें म्लान होऊन राष्ट्रीय पक्षांतील लोकांच्या आनंदाला तर पारावारच नाहींसा झाला. ज्याच्या वाग्देवतेच्या प्रसादानें हा सुदीन प्राप्त झाला त्या **सिसेरा**च्या घरीं जयोत्सव करण्याकरितां लोक धांवून गेले आणि त्यास घेऊन मोठ्या समारंभानें **ज्युपिटर**च्या मंदिरांत गेले व तेथें देवांची प्रार्थना करून पुनः

विजयी राजाच्या स्वारीच्या थाटानें त्यास त्याच्या घरीं परत घेऊन आले.

याजपासून **सिसेरोस** जो आनंद झाला, त्याचें वर्णन करणें हें कांहीं सामान्य मनुष्याचें काम नाहीं. त्याचा आनंद वर्णन करण्यास तोच योग्य होता. त्या युद्धांत मरण पावलेल्यांना संबोधून त्यानें भाषण केलें, त्यावरून त्याच्या आनंदाचें कांहींसें स्वरूप आपल्या ध्यानांत येईल.

तो म्हणाला—'हे वीरहो, मृत्यु हा या विश्वाचें ऋण आहे. तें प्रत्येक प्राण्याला फेडल्यावांचून कांहीं चालत नाहीं. पण तुह्मी मरण पावून तुमच्या देशाचेंही ऋण तुह्मी फेडिलें हें तुमच्या मृत्यूंत विशेष आहे. तुह्मी तुमच्याच देशाकरितां जन्मलां होतां. *मार्सनें हें **रोम** नगर जगाकरितां निर्माण केलें आणि तुह्मांस या नगराकरितां निर्माण केलें. रणांगणांतून पळतांना मरणें हें अपयशस्कर आहे; परंतु जय मिळवून मरणें हें अत्यंत यशस्कर आहे; कारण **मार्स** मोठे शूर असतात त्यांसच नेहमीं युद्धाकरितां निवडीत असतो. ज्यांची रणांगणांत तुह्मी कत्तल केली ते पितृहंते आणि दुर्दैवी लोक अनंत काळपर्यंत नरकयातना भोगतील आणि शत्रूशीं लढत असतां तुह्मी मरण पावलां त्या तुह्मांस स्वर्गी उत्तम सुख प्राप्त होईल. विधात्यानें आपणांस अगदीं थोडें आयुष्य दिलें आहे; परंतु सदैव स्मरणांत राहील अशा सत्कर्मीं ज्यांनीं आपल्या आयुष्याचा उपयोग केला आहे त्यांचें आयुष्य अजरामर आहे. आपल्या आयुष्याची जो मर्यादा आहे त्याजपेक्षां जर जास्त असती तर असा कोण वेडा आहे कीं, अत्यंत मोठें यश आणि कीर्ति

---

* ग्रीक लोकांनीं मानलेली एक रणदेवता आहे.

मिळविण्याकरितां अत्यंत श्रम आणि संकटें सोसण्यास तो तयार झाला असता ? '

'तस्मात् हे शूर वीरांनों, तुम्ही जिवंत होतां तोंपर्यंत तुह्मी शूर पुरुषांत अग्रगण्य होतां, आणि युद्धांत मरण पावून तुह्मीं आतां विगत कल्मषांत श्रेष्ठत्व पावलांत. हल्लीं विद्यमान आहेत त्यांस व पुढें जन्मास येतील त्यांस तुमच्या गुणांचें कधींही विस्मरण होणार नाहीं. जेव्हां सेनेट आणि रोमन लोक आपल्या हातानें तुमच्या विजयाबद्दल अविनाशी असे जयस्तंभ उभारतील तेव्हां हल्लीं विद्यमान आहेत त्यांस व पुढें जन्मास येतील त्यांस तुमच्या गुणांचें कधींही विस्मरण होणार नाहीं. मागें ज्या मोठमोठ्या लढाया झाल्या त्यांत पुष्कळ मोठ्या व पराक्रमी सेना होत्या; परंतु अशा प्रकारचा सन्मान कोणत्याही सैन्यास मिळाला नाहीं, आणि आह्मीं करूं शकलों असतों तर याहूनही जास्त सन्मान तुह्मांस दिला असता; कारण तुह्मी तुमच्या देशावर तसाच अनुग्रह केला आहे. तुह्मी ॲन्टनीस पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें हांकून लाविलें. पुनः परत येण्याचा प्रयत्न करीत असतां आणखी त्यास तुह्मी पिटाळलें यास्तव तुमची कीर्ति अजरामर करण्याकरितां एक मोठी भव्य आणि सुंदर इमारत बांधण्यांत येईल, आणि 'तुमच्या दैवीक शक्तीची अजरामर साक्षी' अशीं त्या इमारतीवर अक्षरें कोरलीं जातील; आणि जे लोक ती भव्य इमारत आपल्या डोळ्यांनीं पाहतील व जे लोक तुमची कीर्ति कानांनीं ऐकतील त्यांच्या मुखांतून तुमच्याविषयीं कृतज्ञतादर्शक शब्द कधींही निघाल्यावांचून राहणार नाहींत. '

नंतर रणांत मरण पावलेल्या वीरांच्या शोकग्रस्त आप्तवर्गाचें समाधान करण्याकरितां सिसेरोनें भाषण केलें तें असें:—

'परंतु ज्यापेक्षां, 'सेनेटसभासदहो, जे शूर पुरुष रणांत खपले त्यांची कीर्ति अजरामर करण्याकरितां एक भव्य इमारत बांधण्याचा आपण संकल्प करून त्यांस जो मान द्यावयाचा तो आपण दिला आणि तसें करून त्यांच्या निकट आप्तवर्गांचेंही आपण समाधान केलें आहे. त्या वीर मातापितरांस असें वाटेल कीं, धन्य आपली कीं, रोमनराष्ट्रमंडपाचे केवळ आधारस्तंभ असे पुरुष आपल्या उदरीं निर्माण झाले. त्या वीरांच्या संततीस आपल्या घराण्यांतील पुरुषांचे सद्गुण अनुकरणनीय होतील. त्या वीर स्त्रियांस असें वाटेल कीं, आपल्या पतींकरितां आपण शोक करीत बसावें त्यापेक्षां त्यांचा स्तव करावा हेंच आपणांस योग्य आहे. त्यांच्या बंधुवर्गास अशी इच्छा होईल कीं, आपण शरीरानें जसे तत्सदृश आहोंत तसेच त्यांच्या गुणांनीं देखील आपण तत्सदृश व्हावें. त्यांचें शांतवन करण्याकरितां केवळ मीच त्यांस उपदेश केला पाहिजे असें नाहीं. कोणीही त्यांस उपदेश केला असतां त्यांस आपलें दुःख एकीकडे ठेवून आनंद मानावा लागेल; कारण मानवी प्राण्याला मरण येण्याचे अनेक मार्ग आहेत, त्यांपैकीं अत्यंत उत्तम मरण तें त्यांच्या आप्तवर्गांना प्राप्त झालें आहे, आणखी त्यांचा प्रेतसंस्कारही चांगला झाला. त्यांचीं प्रेतें रणांगणांत कांहीं कोल्ह्याकुत्र्यांस भक्षूं दिलीं नाहींत. स्वदेशाकरितां लढत असतां तशी स्थिति प्राप्त झाली तर ती कांहीं वाईट मानली जात नाहीं; आणि त्यांच्या अस्थि कांहीं निरनिराळ्या आणि भुईसरशा थडग्याखालीं पुरल्या नाहींत; पण एके भव्य समाधीखालीं पुरल्या आहेत, आणि ती समाधी त्यांच्या सद्गुणांची एक यज्ञवेदी ह्मणून चिरकाळ कायम राहील. ती यज्ञवेदीरूप समाधी त्या वीर पुरुषांचें, सेनेट सभेच्या भरवशाचें आणि त्या दुष्ट लढाईच्या आठवणीचें केवळ निवासस्थान पाहून त्यांच्या

दुःखांचें अतिशय शांतवन होईल. त्या बहादुर शिपायांनीं शत्रूंचा पराभव केला नसता तर त्या पितृघातक **अॅन्टनीनें** **रोमन** लोकांचें नांवनिशाण देखील राहूं दिलें नसतें.'

या भाषणानंतर **सिसेरोस** भाषण करण्याचा प्रसंग आला नाहीं, असें नाहीं. परंतु दुसरीं भाषणें उपलब्ध नसल्यानें हें त्याचें शेवटचें भाषण आहे असें मानिलें पाहिजे. ही दुसरी आपसांतील लढाई चालली असतां **सिसेरोनें** जीं भाषणें केलीं, तीं इतकीं उत्तम आहेत कीं, त्यांची किती जरी स्तुती केली तरी मनाचें कांहीं समाधान होणार नाहीं. हीं सर्व भाषणें लोकविश्रुत वक्ता **डेमास्थनीस** याच्या भाषणाच्या तोडीचीं आहेत, किंबहुना कांकणभर सरस आहेत, असें देखील **सिसेरोच्या** एका जन्मचरित्रकाराचें ह्मणणें आहे. **सिसेरोचें** भाषण एकदां सुरू झालें कीं, श्रोतृसमाज तल्लीन होऊन मंदवायूनें जसा वृक्षसमूह डोलूं लागतो तसा डोलत असे. **सिसेरोनें** लोकांच्या मनांत उत्साह उत्पन्न केला नसता आणि **सेनेट** सभेला **अॅन्टनी**बरोबर युद्ध करण्याविषयीं उत्तेजन दिलें नसतें तर एकट्या **आक्टोव्हियस**च्या सैन्यानें कांहीं **अॅन्टनी**चा पराभव करवला नसता. **सिसेरोच्या** भाषणांतील कांहीं वाक्यांनीं तर दैवीक शक्तिप्रमाणें कार्यभाग उरकला. 'आपल्या देशाकरितां तुमचे प्राण गेले तरी बेहत्तर आहे, पण तुह्मी गुलामगिरी कांहीं पतकरूं नका, आणि तुमच्या वाडवडिलांच्या नांवलौकिकाला शोभेल असें वर्तन करा,' असें जेव्हां त्यानें लोकांस सांगितलें तेव्हां स्वभावतः जे फुसके होते त्यांना देखील आवेश आला. **सेनेट** सभेला उत्तेजन द्यावयाचें आणि तीस लोकांची अनुकूलता करून द्यावयाची, हा सगळा **सिसेरोच्या** वाणीचा प्रादुर्भाव! **रोमन** राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंरक्षणाकरितां जें काम सहस्त्रावधि फौजेनें व्हाव-

याचें नाहीं, तें **सिसेरो**च्या वाणीनें केलें. **सिसेरो**च्या शब्दप्रहारांनीं जसा शत्रूंचा पराभव झाला तसा कांहीं शस्त्रप्रहारानें झाला नाहीं. राष्ट्राच्या प्रतिपक्षाविरुद्ध तो बोलूं लागला म्हणजे ते अगदीं गर्भगळीत होऊन जात. हा त्याच्या वाणीचा प्रभाव कोणाच्या मनाला सानंदाश्चर्यजनक होणार नाहीं ? **अॅन्टनी**बरोबर सख्य करण्याविषयीं राष्ट्रांतील मोठमोठ्या लोकांचा आग्रह होता, परंतु एकट्या **सिसेरो**नें तो शेवटास जाऊं दिला नाहीं. त्याकरितां त्यानें आपणास नवे शत्रु करून घेतले, परंतु स्वातंत्र्यदेवतेच्या उपासनेपासून तो कांहीं पराङ्मुख झाला नाहीं, असा तो प्रऱ्हादाप्रमाणें तिचा एकनिष्ठ भक्त होता. लोकांनींही त्याबद्दल त्याचा तसाच सन्मान केला. तो रस्त्यांतून जाऊं लागला म्हणजे लोकांचे थवेच्या थवे त्याजभोंवती जमून त्याचा जयजयकार करीत.

**अॅन्टनी** मारलाही गेला नाहीं, व पकडलाही गेला नाहीं, हें वर्तमान ऐकून **सिसेरो**स वाईट वाटलें. **डेसिमस ब्रूटस**नें लागलीच त्याचा पाठलाग केला नाहीं, याबद्दल **सिसेरो**नें त्यास टपका दिला. परंतु **ब्रूटस**च्या आंगीं पाठलाग करण्याचें मुळींच सामर्थ्य नव्हतें, याविषयीं पुढें खुलासा होईल.

**अॅन्टनी**चा पराभव झाला आणि **सेनेट** सभेला जय मिळाला, परंतु त्यापासून इच्छित अर्थाची निष्पत्ती मुळींच झाली नाहीं. **रोम** नगराचे दोन मुख्य अधिप युद्धांत मरण पावल्यामुळें **रोम** नगराला वैधव्यदशा प्राप्त झाली. **मार्कस ब्रूटस** आणि **कॅशियस** राज्यसूत्र हातांत धरण्यास योग्य होते, परंतु **सीझर**चा वध करण्यांत ते अग्रेसर असल्यामुळें त्यांस **कान्सल**चा अधिकार दिला असतां **सीझर**चा वारस **आक्टोव्हियस** यास आवडणार नाहीं, म्हणून तसें कांहीं करितां येत नव्हतें आणि तेही आपल्या बचावाकरितां लांब अंत-

रावर आपल्या शत्रूबरोबर झुंज करीत होते. **ॲन्टनी** तर राष्ट्राचा उघड शत्रू होता. आतां भरवसा काय तो **सिसेरो**चा. परंतु सेनापत्य स्वीकारून लढाईवर जाण्यास तो सर्वथैव योग्य नव्हता. राष्ट्रांत नेहमीं शांतता असावी अशी ज्यांची उत्कट इच्छा असते तें प्रसंगीं लढाई करण्यास समरंगणांत उभे राहिले तरी ज्यांनीं अनेक लढाया मारल्या आहेत त्यांजप्रमाणें कांहीं त्यांच्या हातून काम होत नाहीं. अशा प्रसंगीं **सीझर, क्रॉमवेल** किंवा **नेपोलियन** किंवा **ड्यूक आफ् वेलिंग्टन** असेच पुरुष लागतात. **ग्ल्याडस्टन** किंवा **बेकन फिवड** यांचें हें काम नव्हे. **सिसेरो**नें तें काम आंगावर घेतलें असतें तर त्याच्यानें तें झेंपलें नसतें असें नाहीं, परंतु गैरकायद्यानें तर कांहींच करावयाचें नाहीं हा त्याचा दृढ संकल्प होता. **सेनेट** सभेच्या आणि लोकांच्या इच्छेवांचून त्यास कांहीं सेनाधिपत्य स्वीकारतां येत नव्हतें, आणि त्या दोघांची तशी इच्छा होती असें कांहीं दिसून येत नाहीं. **सिसेरो** आणि **ॲटिकस** हे एकमेकांपासून लांब अंतरावर असले ह्मणजे त्यांजमधील पत्रव्यवहारावरून राष्ट्रांत काय खटपट चालली आहे हें चांगलें समजत असे; कारण उभयतांमध्यें नेहमीं पत्रव्यवहार चालू असे व असा एकही विषय नव्हता कीं, त्याबद्दल **सिसेरो**नें **ॲटिकसा**ची सल्लामसलत घेतली नाहीं. परंतु या प्रसंगीं **ॲटिकस रोम** नगरांत होता यामुळें पत्रव्यवहाराचें कारण पडलें नाहीं, आणि त्यामुळें त्या काळीं राष्ट्रांत काय खटपट चालली होती हें समग्रपणें जाणण्यास कांहीं साधन नाहीं.

**सेनेट** सभेचे दोन्ही सेनानायक रणांत पतन पावल्यामुळें त्यांच्या हाताखालचें सैन्य **ॲन्टनी**चा पाठलाग करण्यास समर्थ झालें नाहीं, परंतु **आक्टोव्हियस**नेंही त्याचा पाठलाग केला नाहीं. **डेसि-**

मस ब्रूटसनें त्यास आग्रहपूर्वक सांगितलें असून त्या गोष्टीकडे त्यानें लक्ष्य दिलें नाहीं. यावरून त्याचे मनांत दुसरेच विचार घोळत होते, असें ब्रूटसास दिसून आलें.

**सेनेट** सभेला कोणी चांगला पुढारी मिळेना तेव्हां तिनें **डेसिमस ब्रूटसास कान्सल** नेमिलें. पुढच्या वर्षाकरितां त्यास अगोदरच तो अधिकार देऊन ठेविला होता. पण ही गोष्ट **आक्टेव्हियसास** कांहीं आवडली नाहीं. त्याच्या मनांत दोन **कान्सलस**पैकीं एक **कान्सल** आपल्यास नेमावें असें होतें, व आपणास मदत करण्याबद्दल त्यानें **सिसेरोस** शिफारसही केली होती. त्याच्या मनांत असें होतें कीं **सिसेरोनें** आपला जोडपी व्हावें ह्मणजे राष्ट्राचा कारभार सुरळित चालेल. प्रसंगाकडे दृष्टी दिली असतां ही मसलत कांहीं वाईट नव्हती. **आक्टेव्हियस**सारख्या तरुण मनुष्याबरोबर **सिसेरो**सारख्या वयोवृद्धि आणि ज्ञानवृद्ध पुरुषाचा संयोग झाला असता तर **आक्टेव्हियसास सिसेरो**च्या तंत्रानें वागावें लागलें असतें ; परंतु त्या समयीं याचें वय सगळें एकवीस वर्षांचें होतें, यामुळें कायद्याप्रमाणें तो **कान्सल**च्या अधिकारास योग्य नव्हता. चाळीस वर्षांचें वय झाल्याखेरीज, व दुसऱ्या कित्येक अधिकाराच्या कामांचा अनुभव घेतल्याखेरीज, **कान्सल**चा अधिकार मिळत नसे, यामुळें व दुसऱ्या कांहीं कारणांमुळें **सेनेट** सभेनें त्याचें ह्मणणें कबूल केलें नाहीं.

**सेनेट** सभेनें आपलें ह्मणणें ऐकिलें नाहीं याबद्दल **आक्टेव्हियसास** फार राग आला. त्याखेरीज कबूल केल्याप्रमाणें त्याच्या फौजेला **सेनेट** सभेनें पगार व बक्षिसें दिलीं नाहींत याबद्दलही त्यास संताप येऊन त्यानें सैन्यास चिथवून दिलें. त्यानें पहिल्यानें आपल्या फौजेंतील लोकांपासून अशी शपथ घेतली कीं, **सीझर**च्या सरदारीखालीं ज्या लोकांनीं लढाया मारल्या आहेत त्यांजबरोबर

आपण कांहीं लढणार नाहीं. नंतर त्यानें आपल्या फौजेंतून चारशें सुभेदार निवडून काढून त्यांस **सेनेट** सभेकडे पाठविलें. कायदा असा होता कीं हत्यार घेऊन कोणीं **सेनेट** सभेंत जाऊं नये; परंतु ते जयोन्मत्त लोक हत्यारांसह **सेनेट** सभेंत शिरून त्यांनीं आपल्या सैन्यास कबूल केलेलें बक्षीस द्यावें, आणि आपल्या सेनापतीस **कान्सल**चा अधिकार द्यावा असें मागणें केलें. **सेनेट** सभा जेव्हां त्यांचें ह्मणणें कबूल करीना तेव्हां एका सरदारानें आपली समशेर नागवी करून ह्मणाला कीं, "तुह्मी **कान्सल**चा अधिकार देत नाहीं तर ही समशेर देईल." त्या समयीं **आक्टोयिसा**व्हास वाईट वाटेल, असे कांहीं शब्द **सिसेरो**च्या मुखांतून निघाले, असें ह्मणतात. **सिसेरो**स दुसऱ्याचा उपहास करण्याची मोठी वाईट खोडी होती आणि यामुळें देखील त्यानें आपणास पुष्कळ शत्रू करून घेतले. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, **आक्टेव्हियस** आणि **सिसेरो** यांजमध्यें वैमनस्य आलें.

**आक्टेव्हियसा**स **कान्सल**चा अधिकार **सेनेट** सभा देत नाहीं असें सैन्यास समजलें तेव्हां त्यानें आपणास **रोम** नगराकडे घेऊन जाण्याविषयीं त्यांस आग्रह केला आणि त्यांनीही लागलीच आपल्या सैन्याचा **रोम** नगराकडे मोहोरा फिरविला. या सैन्यांत आठ पलटणी, घोडेस्वार आणि शिवाय मदतीस आलेलें दुसरें लष्कर असा मोठा जमाव होता. **सेनेट** सभेजवळ त्या लष्कराशीं सामना करील असें लष्कर मुळींच नव्हतें. आफ्रिकेंतून कांहीं लष्कर जमा करून आणिलें होतें, तें निखालस फुसकें होतें.

आतां आल्प्स् पर्वताच्या पलीकडे काय चाललें आहे तिकडे आपण लक्ष्य देऊं. **डेसिमस ब्रूटस**चें सात हजार सैन्य होतें, तें दहा

हजार झालें; परंतु त्या सैन्यांत सगळे तरुण आणि अल्लड लोक होते. **डेसिमस** आल्प्स् पर्वत ओलांडून **प्लँकसास** जाऊन मिळाला. पण **ॲसिनिरस पोलिपो सेनेट** सभेशीं बेमान होऊन **ॲन्टनीस** जाऊन मिळाल्यामुळें त्याचें सैन्य फार जोरावर झालें, हें पाहून **प्लँकसही ॲन्टनीस** जाऊन मिळाला, यामुळें **डेसिमस**च्या संकटाला सीमाच नाहींशी झाली. आपल्या जवळच्या बेइमानी लष्करांत काय तो स्वतः इमानी होता. **सीझर**च्या सरदारीखालीं लढलेल्या सैन्याबरोबर लढून जय मिळविणें **डेसिमसास** सर्वथैव अशक्य होतें. पण धारातीर्थी त्यानें आपला देह अर्पण केला असता तर त्याचा लौकिक झाला असता, परंतु त्यानें जो मार्ग स्वीकारिला त्याबद्दल त्यास दोष देण्याचा आपणांस अधिकार नाहीं. लढत असतां तो शत्रूच्या हातीं लागून त्यांनीं त्याची विटंबना केली नसती हें कशावरून सांगतां येईल? तेव्हां त्याला लढाई न करितां परत फिरणेंच भाग होतें. पुनः आल्प्स् पर्वत ओलांडून इटालींत यावें तर मध्यें **आक्टेव्हियस** आपणास अडथळा करील हें त्यास भय होतें; कारण **ॲन्टनी**बरोबर त्यानें सख्य केलें होतें, हें त्यास माहीत होतें, यास्तव त्यानें **मॅसिडोनियांत मार्कसब्रूटसास** जाऊन मिळण्याचा निश्चय केला. परंतु त्याच्या सैन्यावर कांहीं त्याचा भरवसा पटेना. कांहीं सैन्य त्यास सोडून जाऊं लागलें. सरतेशेवटीं त्यानें आपल्याजवळ सुवर्ण होतें तें सर्वांस वांटून देऊन त्यांस रजा दिली. सरतेशेवटीं त्याजजवळ दहा स्वार राहिले. तो आपला वेश बदलून जात असतां त्यानें ज्याजवर पूर्वी उपकार केले होते त्या मनुष्यानें त्यास ओळखून **ॲन्टनीस** लागलीच खबर दिली, आणि त्यानें हुकूम दिल्याप्रमाणें त्या कृतघ्न मनुष्यानें **डेसिमस**चा शिरच्छेद केला.

**आक्टोव्हियस रोम**नगराजवळ आला तेव्हां त्याजकडे वकील पाठवून तो सांगेल तें ऐकावयाचें याखेरीज **सेनेट**सभेस दुसरा उपाय च राहिला नव्हता, आणि त्याप्रमाणें तिनें केलें. **आक्टेव्हियस** विजयी राजाप्रमाणें नगरांत आला आणि **सेनेट** सभेनें लोकांकरवीं **कान्सल** निवडण्याचा एक लटका विधी करवून त्यास **कान्सल** नेमिलें आणि त्याच दिवशीं प्रजासत्ताक राज्य सर्वांशानें लयास गेलें.

# भाग ७.

## सिसेरोचा मृत्यु.

वरील भागाच्या शेवटीं निरूपण केलेला प्रसंग घडून आला तेव्हां **सिसेरो** कांहीं **रोम**नगरांत नव्हता. त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यामुळें त्यास **रोम** नगर सोडून जाणें भाग पडलें. त्याचे मित्र आणि शत्रु एकदिल झाल्यामुळें त्यास आपल्या जीवितसंरक्षणाकरितां इकडून तिकडे भटकत फिरण्याचा प्रसंग आला. त्याचा भाऊ **क्विनटस** याचें उभयतांच्या दुर्दैवानें **सिसेरो**शीं पुनः सख्य करून दिलें. उभयतांनीं निश्चय केला असता तर ते **मॅसिडोनिया** येथें सुरक्षित जाऊन पोंचले असते. परंतु **सिसेरो**च्या स्वाभाविक धरसोडपणानें त्यास गोत्यांत पाडलें. **ॲन्टनी**चे मारेकरी अगदीं त्याच्याजवळ येऊन पोंहोचेपर्यंत काय करावें हें कांहीं त्यास सुचलें नाहीं. **सेनेट** सभेपुढें **आक्टेव्हियस**च्या इमानीपणाबद्दल **सिसेरो**नें केलेल्या स्तुतीचा असा परिणाम पाहून खरोखर त्यास अत्यंत दुःख झालें. त्यानें **सेनेट** सभेला असें सांगितलें होतें कीं, **ॲन्टनी**चा पराभव केल्यावर तुम्ही **आक्टेव्हियस** यास जितके सन्मान द्याल तितके त्याच्या सेवेला थोडे आहेत. तो **आक्टेव्हियस** राष्ट्राचे कायदे आणि नियम पायांखालीं तुडवून तरवारीच्या बळावर **रोमन** राष्ट्राचा स्वामी होऊन बसला आहे हें पाहून **सिसेरो** खरोखर अत्यंत खिन्न झाला. **पोलियो** आणि **प्लँकस अन्टनी**स जाऊन मिळाल्याबद्दल त्यास फार वाईट वाटलें. विश्वास ठेवण्याला जगांत कोणी मनुष्यच नाहीं, असें त्यास वाटलें.

**रोमन** राष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट होऊन **सेनेट** सभा हें एक रजिस्टर आफिस झालें. हें पाहून त्याला अत्यंत यातना झाल्या. अशा प्रकारच्या दुष्ट निराशांत त्याला काय तें एकच समाधान होतें. मनुष्याची किंमत करण्यास तो चुकला असेल, व समयानुरूप वर्तन करण्यांत त्याजपासून गाफिली झाली असेल; परंतु त्याच्या बुद्धीच्या न्यायपरायणत्वांत कांहीं चूक नव्हती. **रोम** राष्ट्राचें स्वातंत्र्य-रक्षणाकरितां मरणधर्मी जितकें करूं शकेल तितकें त्यानें केलें. निर्वीर्य **सेनेट** सभा आणि क्षणिकबुद्धि लोक यांस त्यानें धैर्य दिलें, त्यांच्या मनांत आवेश उत्पन्न केला, त्यांस युद्ध करण्यास सिद्ध केलें, आणि **रोमन** **राष्ट्राचा** गरुडध्वज आपल्या हातांत धरून ठेविला होता. प्रजासत्ताक राज्य आपसांतील वैरानें अगदीं क्षीण-बळ होऊन राहिलें होतें हा कांहीं त्याचा अपराध नव्हता. सर्व **राष्ट्रास** गुलामगिरी करणें आवडल्यावर तिजपासून त्यांस मुक्त करणें हेंही त्यास शक्य नव्हतें.

**आक्टेव्हियसनें** पहिल्यानें आपलें दत्तकत्व कायदेशीर करून घेतलें. त्यावांचून त्यास आपणास '**ज्युलियस सीझर**' ह्मणवून घेतां येत नव्हतें. **डोलाबेला** यास **सेनेट** सभेनें राष्ट्राचा शत्रु ठर-विलें होतें, तो ठराव त्यानें रद्द करविला. **सीझरास** मारण्यांत जे लोक सामील होते त्यांनीं न्यायसभेपुढें हजर होऊन आपला न्याय करून घ्यावा, आणि त्याप्रमाणें त्यांनीं केलें नाहीं तर त्यांस देहा-न्त शासन करावें असा लोकांकडून कायदा पास करून घेतला. या कायद्याचा उद्देश स्पष्ट होता. **मार्कस** ब्रूटस आणि **कॅशियस** यांनीं **सीझरच्या** रक्तानें आपले हात भरविले होते त्याबद्दल त्यांस शासन करावयाचें होतें.

**अँन्टिनस** आणि **लेपिडस** यांजबरोबर युद्ध करण्याच्या निमि-

त्यानें **आक्टेव्हियस** लागलीच निघून गेला. त्याचा सोबती **कान्सल पेडिसस** यानें **अॅन्टनी** आणि **लेपिडस** राष्ट्राचे शत्रु आहेत असा पूर्वी जाहीरनामा फिरविला होता. तो एक कायदा करून रद्द केल्यावरून **आक्टेव्हियस** कोणत्या उद्देशानें नगर सोडून गेला याविषयीं कांहीं संशय उराला नाहीं. त्या तिघां एकार्थाभिलाष्यां-मध्यें ऐक्य होऊन हें दुसरें अधिपत्रय (Triumvirate) स्थापित झालें. प्रत्येकाला दुसऱ्या दोघांना वैरोद्धारास्तव आपला एक एक मनुष्य बळी देण्याकरितां हवालीं करावा लागला. **आक्टेव्हियसनें सिसेरोचा, लेपिडसनें** आपला प्रत्यक्ष भाऊ **पाल्स,** आणि **अॅन्ट-नीनें** आपला चुलता **लिसियस सीझर** या तिघांचे यमदूतरूपी मारेकऱ्यांनीं खुशाल प्राण घ्यावे अशी परवानगी दिली.

हें वर्तमान समजल्याबरोबर **सिसेरो** आणि त्याचा भाऊ **क्विंटस** यांनीं जीविताकरितां पळून जाण्याचा निश्चय करून ते ज्या उपवनांत राहत होते तेथून निघाले. परंतु वाटखर्चाक-रितां त्यांनीं आपल्याबरोबर कांहीं घेतलें नव्हतें. सबब **क्विंटस रोम** नगरीं परत आला. त्याच्या मनांत खर्चाकरितां पैसा घेऊन **सिसेरोकडे** परत जाण्याचें होतें. परंतु दुर्दैवानें तो नगरांत आला आहे असें त्या **अॅन्टनीच्या** यमदूतांस समजलें. त्यांनीं **क्विंटसच्या** पुत्राला प्रथमतः पकडलें आणि आपला बाप दाखविण्याकरितां इतक्या यमयातना केल्या कीं त्या कांहीं **क्विंटसच्यानें** ऐकवेनात. तेव्हां तो आपण होऊन मारेकऱ्यांचे स्वाधीन झाला, आणि आपणास आधीं मारावें असें प्रत्येकाचें मागणें पडल्यावरून त्या दुष्टांनीं एकसमयावच्छेदेंकरून दोघांचाही वध केला. **सिसेरो असटुरा** येथें सुरक्षित पोंहोचला, आणि एका जहाजावर जाऊन बसला. तें जहाज हाकारण्याचे तयारींत

होतें तों त्याच्या मनांत एक विलक्षण विचार आला. त्यानें आपणास पुनः किनाऱ्यावर नेवविलें. त्याच्या मनांत पुनः रोम् नगरीं जाऊन **आक्टेव्हियस**च्या खासगत यज्ञवेदीपुढें आपल्या काळजांत कट्यार खुपसून प्राण द्यावयाचा होता. असें केल्यानें तरी त्या विश्वासघात्यावर ईश्वराचा कोप होईल असें त्याला वाटलें. त्याच्या इमानी चाकरांनीं पुनः त्याचें मन वळवून त्यास पुनः जहाजावर बसविलें. परंतु वारा प्रतिकूल असल्यामुळें व समुद्रांत तुफान असल्यामुळें तो आजारी पडला आणि काजेटच्या बंदराजवळ त्याचें एक उपवन होतें तेथें तो पुनः उतरून पडला. आतां पुढें जावयाचें नाहीं असा त्यानें संकल्प केला. त्याच्या नोकरांनीं त्याची पुष्कळ विनवणी केली. परंतु तो ह्मणाला कीं, ' ज्या देशाचें मीं वारंवार संरक्षण केलें त्याच देशांत मला मरूं द्या. ' मारेकरी त्याचा शोध करीत फिरतच होते. ते आतां अगदीं जवळ आले असें समजल्यावर त्याचे नोकर पुनः त्यास पालखींत घालून घेऊन निघाले. परंतु मारेकऱ्यांनीं त्यांस गांठलें. तेव्हां **सिसेरो**नें आपली पालखी खालीं ठेवविली आणि आपला बचाव न करण्याविषयीं आपल्या चाकरांस ताकीद केली, आणि आपलें मस्तक पुढें करून त्या मारेकऱ्यांस म्हणाला ' हे ज्ञानवृद्ध शिपाईहो, हा पहा मी येथें आहें; तुह्मांस योग्य वाटत असेल तर मजवर प्रहार करा. ' त्या समयीं **सिसेरो** धुळीनें माखला होता. त्याची दाढी आणि डोक्याचे केंस अस्ताव्यस्त झाले होते, आणि श्रमानें त्याचें वदन अगदीं म्लान झालें होतें. ही त्याची स्थिति पाहून कित्येक मारेकऱ्यांना त्याची दया आली आणि त्यांनीं आपलीं तोंडें आपापल्या हातानें झांकून घेतलीं. पण **पांपीलस** नांवाचा त्यांचा मुख्य नायक होता तो पुढें सरला आणि कित्येक घाव करून त्यानें **सिसेरो**चें मस्तक धडापासून वेगळें केलें. या मनुष्यावर

**सिसेरोनें** मोठा उपकार केला होता. त्याजवर पितृवध केल्याबद्दल आरोप आला होता. त्यांतून **सिसेरोनें** त्यास मुक्त केलें होतें. त्याबद्दल त्यानें त्यास असा मोबदला दिला! **सिसेरो** मरणकाळीं त्रेसष्ट वर्षें, अकरा महिने आणि पांच दिवसांचा होता.

मारेकऱ्यांनीं त्याचे दोन हात तोडून त्यांसह त्याचें मस्तक घेऊन ते **ॲन्टनी**कडे आले. त्या वेळेस तो न्यायसभेंत बसून न्याय करीत होता. **सिसेरोचें** मस्तक पाहून त्यास फार आनंद झाला, आणि मारेकऱ्यांस कबूल केल्यापेक्षां त्यानें जास्त बक्षीस दिलें. **ॲन्टनीची** बायको **फुलव्हीया** हिच्या आनंदाला तर मर्यादाच राहिली नाहीं. तिनें तें मस्तक आपल्या ओटींत घेऊन जसें काय तें जिवंत आहे असें कल्पून अत्यंत दुःश्राव्य शब्दांनीं तिनें त्याची निर्भर्त्सना केली. ज्या जिव्हेच्या व्यंग्योक्तीनें तिचें अंतःकरण होरपळून जात असे तिला तिनें बाहेर ओढून काढिलें, आणि स्त्रीजातीच्या स्वभावाला शोभेल अशा दुष्टपणानें तिनें तीस दाभणानें भोंक पाडिलें. ज्या फोरमांत **सिसेरोनें** अनेक भाषणें करून लोकांकडून अभिनंदन करून घेतलें त्या फोरमांत तें मस्तक आणि दोन्ही हात लटकून ठेविले होते.

**सिसेरोस** एक पुत्र होता तो **आक्टेव्हियस** जेव्हां बादशाहा पदाला पावला तेव्हां मोठ्या योग्यतेस आला होता, व त्याच्या बापाला मारण्याविषयीं आपण अनुमति दिली याबद्दल त्यास अनुताप होऊन त्यानें त्यास मोठ्या अधिकारावर चढविलें होतें, परंतु पुढें त्याचें काय झालें, हें कांहीं समजत नाहीं. त्याच्या मागें **सिसेरोचा** निर्वंश झाला.

चरित्राच्या शेवटीं चरित्रनायकाचे गुणदोषविवेचन करावें असा संप्रदाय आहे, परंतु त्याप्रमाणें मी कांहीं करीत नाहीं; कारण प्रत्येक प्रसंगीं **सिसेरो**च्या स्वभावांत गुणदोष काय होते यांचा या चरित्रांत विचार केला आहे. तेव्हां पुनः त्याच त्या गोष्टी सांगत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

**समाप्त.**

# शुद्धिपत्र.

—:o:—

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | २ | त्यावर ... | ... त्याजवर |
| ४ | २४ | क्षत्रविद्या.. | ...क्षात्रविद्या |
| ५ | ८ | विषाद ... | ... विवाद |
| ७ | ८ | ग्रथं ... | ... ... ग्रंथ |
| ९ | १ | तत्वान्वेक्षण | ...तत्वान्वेषण |
| " | २ | पुनर्जीवन | ...पुनरुज्जीवन |
| " | ६ | असें मला सांगण्यांत आलें आहे. | असें मी ऐकिलें आहे |
| " | १९ | तत्वान्वेक्षण | ...तत्वान्वेषण |
| ११ | २० | माराव्या.. | ... माराव्या |
| १५ | ३ | बांधलों ... | ... बांधला |
| २२ | ११ | आरिस्टो... | आरिस्टोटल |
| २४ | ७ | प्राण्यांच्या... | ...प्राण्यांची |
| ३० | ८ | आंद्यत ... | ... आद्यंत |
| " | ९ | नहेमी ... | ... नेहमी |
| ३१ | ८ | केले ... | ... केलेस |
| " | २२ | मान्यता ... | ... पूज्य |
| ३२ | १२ | जसे तसे... | ... असें तसें |
| ४७ | १२ | तिकके ... | ... तितके |
| ५५ | २० | वातत ... | ... वाटत |
| ६३ | १२ | परजन्य ... | ... पर्जन्य |
| ७६ | १ | ईथरपासून.. | ईथरापासून |
| " | १४ | टिकून ... | ... टिकला |
| ८१ | ९ | ज्ञानेंद्रिये... | ... ज्ञानेंद्रियें |
| ८५ | ५ | ग्रहाचं ... | ... ग्रहांचें |
| ९६ | ७ | सामाथ्र्य... | ... सामर्थ्य |
| ११० | ४ | घेणं ... | ... घेणें |
| " | २२ | फुप्फुस ... | ... फुप्फुसें |
| ११२ | ४ | होतं ... | ... होतें |
| ११६ | १८ | पुंर्व ... | ... पूर्व |
| १३२ | ५ | होण्ऱ्या ... | ... होणाऱ्या |

| पृ० | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १३१ | ३ | येते ... | ... येती |
| १३९ | ९ | पुरवा ... | ... पुरावा |
| १४० | १८ | अवश्यत्वे... | ..अवश्यकर्तें |
| १४१ | ४ | नाशांवत... | ... नाशवंत |
| १४१ | ५ | मुळ. ... | ... मूळ |
| " | ९ | ठिमूळ ... | ... ठिसूळ |
| १४३ | २३ | दुसाऱ्या ... | ... दुसऱ्या |
| १४४ | २४ | सद्गुण ... | ... सद्गुण |
| १४६ | ७ | आसो ... | ... असोत |
| १५४ | १४ | ते ... | ... ...ती |
| " | १५ | आता ... | ... आतां |
| १६१ | ७ | आपलयसा. | ...आपल्याला |
| " | ८ | डायोजीन. | ... डायोनिस |
| १६५ | १६ | सिसेरो... | ...( सिसेरो ) |
| | | **भाग १** | |
| १० | १८ | पुटत्व ... | ... पटुत्व |
| १२ | १२ | हात्साता... | ... होत्साता |
| १३ | २ | पुढऱ्यानीं. | ...पुढाऱ्यांनीं |
| " | १६ | करव्यां.... | ... करंव्या |
| " | २५ | आह. ... | ... आहे |
| २७ | ७२ | ... | ... २७ |
| " | २ | सिसेरोनं... | ... सिसेरोनें |
| " | १४ | ह्मणजे..... | ... च |
| " | १६ | शाततां.... | ... शांतता |
| " | १८ | मांन ... | ... मान |
| " | २३ | ठरांव ... | ... ठराव |
| २८ | २० | त्मास ... | ... त्यास |
| २९ | १४ | अपल्या ... | ...आपल्या |
| ३१ | २२ | एको ... | ... एकही |
| " | २९ | ठेवीली ... | ... ठेविली |
| ३३ | १५ | होतां ... | ... होता |

| पृ० | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३३ | १६ | त्माना | त्यानां |
| ३४ | १७ | त्यांच्या | त्यांची |
| " | १३ | उच्छाह | उत्साह |
| ३७ | १३ | आत | आंत |
| ४३ | १३ | करण्यावा | करण्याचा |
| ४९ | १ | केलं | केलें |
| " | १४ | दोषं | दोष |
| ५३ | १६ | एकेल्या | ऐकल्या |
| ५५ | १९ | शूरत्वावी | शूरत्वाचीं |
| ६३ | २३ | भावेती | भोंवती |
| ६४ | ६ | ज्यूरसनो | ज्यूररनीं |
| " | ८ | वाइर्टे | वाईट |
| ६६ | २३ | निति | नीति |
| ७२ | १५ | सामन्य | सामान्य |
| ७३ | ७ | नेमण्याप | नेमण्यास |
| ७६ | २२ | इटलतीली | इटालितील |
| ८५ | २३ | नगगरच्या | नगरच्या |
| ८६ | २१ | गरर्दी | गर्दी |
| ८८ | ४ | लाछंन | लांच्छन |
| ८९ | ८ | गनरी | नगरी |
| " | १२ | आल्प | आल्या |
| " | १९ | धर्मधिकारी | धर्माधिकारी |
| ९५ | २४ | मनोवध | मनोवेधक |
| ९८ | २ | तस्थ | तत्स्थ |
| १०९ | ३ | उद्दात | उदात्त |
| ११२ | १ | नकीसें | नकोसें |
| ११६ | १३ | गुलामगरितून | गुलामगिरींतून |
| ११८ | १३ | पक्षां | पेक्षां |
| १२३ | २ | नसतां | असतां |
| १२३ | ३ | असतां | नसतां |
| १२६ | १३ | हात | होत |
| १२७ | २० | शात्र | शस्त्र |
| १२९ | १८ | आस्तत्व | अस्तित्व |
| १३४ | ११ | रष्ट्राचे | राष्ट्राचें |
| " | " | सिसेरो | सिसेरोला |
| १३७ | २५ | नवी | नवीन |
| १३८ | २ | घडूव | घडून |
| १३९ | १७ | सीझरनो | सीझरानें |
| " | १८ | जुलमें | जुलमीं |
| १४१ | २४ | क्षांति | शान्ती |
| १४२ | १५ | राजपापहार | राज्यापहार |
| १४६ | १६ | समेत | सर्मेत |
| " | २१ | सुचरा | सूचना |
| १४१ | १७ | स्वेच्छपणे | स्वैच्छपणे |
| १४८ | ५ | झाले | संपले |
| १४९ | १५ | लिहिले | लिहिलें |
| १५० | १४ | उद्दात | उदात्त |
| १५१ | १ | त्यान | त्यानें |
| १५३ | २० | उद्दात | उदात्त |
| १५९ | १५ | कारण्या | करण्या |
| " | १६ | द्रीव्यून | ट्रीब्यून |
| " | १७ | संमता | संमती |
| १६१ | ३ | अशा | अशा |
| " | २० | उत्त | उत्तर |
| १६३ | १५ | काराण | कारण |
| १६८ | ६ | यतील | येतील |
| १७३ | ५ | नेमिके | नेमिले |